अहवाल क्रमांक : ४२

सत्यमेव जयते

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या आर्थिक क्षेत्र
अहवालामधील कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२),
जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४, ३.५ व ३.६),
यावरील

बेचाळीसावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक जुलै, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
जुलै, २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या आर्थिक क्षेत्र
अहवालामधील कृषी व पदुम (मत्सव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२),
जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३, ३.४, ३.५ व ३.६),
यावरील

बेचाळीसावा अहवाल

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

* (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.
(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.
(७) श्री. रविंद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५- २०१६ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील कृषी व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२), जलसंपदा विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३,३.४,३.५ व ३.६) यावर विचार करून लोकलेखा समितीचा बेचाळीसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २६ सप्टेंबर, दिनांक १, २१ व २२ नोव्हेंबर, २०१७, दिनांक ५ व २० फेब्रुवारी, दिनांक ३, २४ एप्रिल, दिनांक ३० मे व २६ जून, २०१८ रोजी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, कृषी व पदुम (मत्स्यव्यवसाय), व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १३ व १८ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर.
दिनांक : १८ जुलै, २०१८

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	कृषी व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभाग (परिच्छेद क्र. २.२)	१
(२)	जलसंपदा विभाग (परिच्छेद क्र. ३.३) (परिच्छेद क्र. ३.४) (परिच्छेद क्र. ३.५) (परिच्छेद क्र. ३.६)	९७

मत्स्यव्यवसाय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ मत्स्यव्यवसाय विभागाचे कामकाज यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१. परिच्छेद क्र. २.२ : मत्स्यव्यवसाय विभागाचे कामकाज-

कार्यकारी सारांश-

महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभागाच्या २०११-१६ कालावधीच्या कार्यसिध्दी लेखा परीक्षेत असे आढळून आले की, सांख्यिकीय परिपूर्ण / सक्षम आणि शास्त्रोक्त पध्दतीचा वापर करुन केल्या जाणा-या भूजलाशयीन मासेमारी विषयी विश्वसनीय माहिती उपलब्ध नसल्यामुळे मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी केले जाणारे नियोजन अपर्याप्त होते. विभागाने दीर्घकाळ मत्स्य सहकारी संस्थांकडून भाडेपटटा व कर्जाच्या लक्षणीय हिश्श्याची वसुली केली नव्हती.

२०११-१६ दरम्यान निर्धारित ७.५० लक्ष टन वार्षिक मत्स्य पैदाशीच्या (भुजल व सागरी) तुलनेत सरासरी वार्षीक पैदास फक्त ५.९१ टन होती. ६० कोटी इतकी वार्षिक मागणी असताना २०११-१६ दरम्यान मत्स्यबीज केंद्रातील वार्षिक मत्स्यबीज उत्पादन २.४३ कोटी ते ८.१६ कोटी होते. स्थानिक मच्छिमारांकडुन होणा-या विरोध, जमीन अधिग्रहण करण्यात, निधी मुक्त करण्यात आणि निविदा प्रकियेत होणा-या विलंबामुळे मासेमारीसाठीची बंदरे, जेटी, सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, बर्फाचा कारखाना आणि शीतगृहे इत्यादी सारख्या सागरी मत्स्यव्यवसायाच्या पायाभूत सुविधा निर्मितीवर प्रतिकूल परिणाम झाला.

मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठीच्या विविध योजनांमध्ये अयोग्य जागेची निवड, लाभार्थी मच्छिमारांना अर्थसहाय्य देण्यातील विलंब, अर्धवट बांधकाम /कामाचे सदोष कार्यान्वयन इत्यादीमुळे त्यांचा अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम झाला. विभागाकडे स्वतःच्या मालकीच्या उच्च क्षमतेच्या इंजिन चलित गस्ती नौका नसल्यामुळे सहा सागरी तटीय जिल्हयांमध्ये गस्त घालण्यासाठी कमी क्षमतेच्या इंजिन चलीत नौकांचा भाडेतत्तवावर वापर केला जाता होता. विभागाने प्रत्यक्षात परवाने दिलेल्या सागरी नौकांपेक्षा नोंदणी झालेल्या नौकांची संख्या खूपच अधिक होती, जे बेकायदेशीर मासेमारी होत असल्याची शक्यता दर्शविते.

मच्छिमारांसाठी विभागाकडून ज्या दोन कलयाणकारी योजनांची अंमलबजावणी व्हावयाची होती त्यांपैकी एक (किरकोळ मत्स्यविक्रीसाठी फिरते वाहन योजना) सदोष नियोजनांमुळे सुरुच होऊ शकली नाही.तसेच दुसरीची (आदर्श मच्छिमार ग्रामविकास) अंमलबजावणी दीर्घकाळ लांबली. सहआयुक्त, प्रादेशिक उपायुक्त, सहाय्यक आयुक्त इत्यादी महत्तपूर्ण पदांवरील मनुष्यबळ अपूरे होते.विभागातील सनियंत्रण कार्यतंत्र पर्याप्त नव्हते.

परिच्छेद क्र. २.२.१ प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यांला ८७ लक्ष हेक्टरच्या खंडान्त उतार क्षेत्रासह , ३.१७ लक्ष हेक्टर गोडया पाण्याचे क्षेत्र आणि ०.८० लक्ष हेक्टर निमखा-या पाण्याचे क्षेत्रासह ७२० कि.मी. लांबीचा सागरी किनारा लाभला आहे जो मत्स्यव्यवसायाला पोषक आहे.केंद्रीय /मध्यवर्ती सागरी मत्स्यव्यवसाय संशोधन संस्था, कोचिन द्वारे २००५ मध्ये करण्यात आलेलया जनगणनेनुसार राज्यातील सक्रिय मच्छिमारांची संख्या ३.२४ लक्ष होती.२०१५-१६ दरम्यान राज्यात ५.८० लक्ष टन मत्स्य उत्पादन झाले होते.

(i) मासेमारीचे क्षेत्र वाढवून आणि उत्पादन क्षमता वाढवून उपलब्ध तसेच नवीन जलस्त्रोतांमधून जास्तीत जास्त मत्स्यउत्पादन करणे, (ii) मच्छिमारांना शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देणे आणि नव्याने मत्स्यव्यवसाय सुरु केलेल्या मच्छिमारांना प्रोत्साहन देणे (iii) सागरी क्षेत्रात मासे योग्यरितीने उतरविणे व प्रक्रिया करण्यासाठी बंदरे व जेट्टी व मच्छिमार नौकांची यांत्रिकीकरण, बर्फाचे कारखाने शितगृहे इ.सारख्या आधूनिक पायाभुत सुविधा उपलबध करुन मत्स्यव्यवसायांत सुधारणा करणे, आणि (iv) समाजातीली कमकुवत घटकांमध्ये मोडणा-या मच्छिमारांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारणे ही महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागांची (विभाग) मुख्य उद्दीष्टे आहेत. राज्यात मत्स्यव्यवसायासाठी विकासासाठी विभागाकडून अनेक केंद्र तथा राज्य पुरस्कृत योजना राबविल्या जातात.

परिच्छेद क्र. २.२.२ संघटनात्मक संरचना

प्रधान सचिव हे मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रमुख आहेत. मत्स्यव्यवसाय आयुक्त मुंबई (आयुक्त) राज्यात विविध योजना राबवितात ज्यांना सात प्रादेशिक (RDC) आणि ३५ सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (ACF) सहाय करतात. मत्स्यव्यवसाय विकास अधिका-यांच्या सहाय्याने ३३ मत्स्यबीज केंद्र (प्रमूखपदी ACF असलेली) आणि मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी प्रमुखपदी असलेली सहा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र विभागाकंडून चालवली जातात.

परिच्छेद क्र. २.२.३ लेखापरिक्षेची उददीष्टे

लेखापरीक्षेच्या उददीष्टानुसार पडताळणी करावयाच्या बाबी.

- राज्यातील मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठीच्या योजना पुरेशा सर्वेक्षणानंतर आखण्यात आल्या होत्या,
- पर्याप्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती आणि निधीचे वाटप विनाविलंब करण्यात आले होते,
- विविध राज्य तसेच केंद्र योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे करण्यात आली होती, आणि
- विगाभातील सनियंत्रण कार्यतंत्र प्रभावी होते.

परिच्छेद क्र. २.२.४ लेखापरिक्षेचे निकष

खालील दस्ताऐवजावरुन लेखापरिक्षेचे निकष निश्चित करण्यात आले.

- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१,
- महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८,
- केंद्र (GOI) तसेच राज्य शासनाने (GOM) वेळोवेळी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे व सुचना, आणि
- २०१२-१७ ची पंचवार्षिक योजना आणि विभागाचा वार्षिक विकास कार्यक्रम

परिच्छेद क्र. २.२.५ लेखा परीक्षेची व्याप्ती आणि कार्यपध्दती

मत्स्यव्यवसाय विभाग (मंत्रालय), मत्स्यव्यवसाय आयुक्तांचे मुंबई येथील कार्यालय, सात पैकी दोन RDC, ३५ पैकी १० ACF, आणि सहा पैकी दोन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या दस्तऐंवजांच्या चाचणी तपासणीद्वारे २०११-१६ कालावधीची कार्यसिध्दी लेखापरीक्षा जानेवारी ते मे २०१६ दरम्यान करण्यात आली. त्याचप्रमाणे, केंद्र /राज्य/इतर शासकीय संस्थांकडून अर्थपुरवठा केल्या जाणा-या ज्या २२ मुख्य योजना राज्यात राबविल्या जात होत्या (परिशिष्ट २.२), त्यापैकी १७ योजनांची चाचणी तपासणी केली गेली.

१७ मे २०१६ रोजी प्रधान सचिव, मत्स्यव्यवसाय विभाग यांचे बरोबर लेखापरीक्षापूर्व बैठक घेण्यात आली ज्यामध्ये लेखापरीक्षेची उद्दीष्टे, निकष, व्याप्ती आणि कार्यपध्दती विषद करण्यात आली. १४ ऑक्टोबर २०१६ रोजी घेतलेल्या अंतिम बैठकीत लेखापरीक्षा निष्कर्षावर प्रधान सचिवांशी चर्चा करण्यात आली. राज्य शासनाने १ डिसेंबर २०१६ रोजी सादर केलेल्या उत्तरांचा समावेश अहवालात करण्यात आला आहे.

परिच्छेद क्र. २.२.६ लेखापरिक्षेचे निष्कर्ष

नियोजनातील पर्याप्तता

राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी योजना व धोरणे आखतांना मासेमारी उत्पादनक्षमता, खाजण क्षेत्रातील जैवशास्त्रीय स्थिती, जलाशयांचा शोध, मासे उतरविण्यासाठीची केंद्र, होडया आणि अवजारे इत्यादी विषयी विश्वासनीय आणि अद्यावत माहिती आवश्यक असते.तसेच, क्षेत्रीय कार्यालयांकडून माहिती/सहकार्य आणि कार्यान्वयन संस्थांचा/कार्यालयांचा नियोजन प्रक्रियेतील सहभाग याला अनन्यसाधारण महत्व आहे.

दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, आयुक्तांनी २०१२-१७ साठी तयार केलेल्या (सप्टेंबर २०११) पंचवार्षिक योजनेत योजनांच्या (केंद्र व राज्य) फक्त काही घटकांसाठी संचयी लक्ष्य निर्धारित करण्यात आली होती जी योजनेच्या कालावधी अखेर साध्य करावयाची होती. परंतु या पंचवार्षिक योजनेत, योजनेच्या कालावधीतील इतर घटकांसाठी वर्षनिहाय उदिदष्टे आणि त्यासाठी समतुल्य वित्तीय खर्च दर्शविला नव्हता.

आयुक्तांनी तयार केलेल्या वार्षिक विकास कार्यक्रमांतून (२०१२-१३ ते २०१५-१६) मागील वर्षापर्यंत विभागाने वेगवेगळया योजनांवर (केंद्र व राज्य) केलेला खर्च आणि वार्षिक विकास आराखडा ज्या चालू वर्षाशी संबंधित आहे त्या चालू वर्षाचा अंदाजित खर्च दर्शविला होता. अशाप्रकारे, वार्षिक विकास कार्यक्रम पंचवार्षिक योजनेच्या आधारावर तयार करण्यात आला नव्हता.

नियोजन प्रक्रियेदरम्यान क्षेत्रीय कार्यालयांकडून (RDC/ACF) माहिती/सहभाग प्राप्त होता किंवा त्यात कार्यान्वयन संस्थांचा (ACF) सहभाग होता याची सुनिश्चीती करण्यात आली होती याचा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता.

तसेच, ऑक्टोबर २००४ पासून मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी माहिती संच व GIS चे बळकटीकरण यासाठी राज्य शासन १०० टक्के केंद्र पुरकृत योजना राबवित आहे.सांख्यिकीदृष्टया परिपूर्ण /सक्षम तसेच शस्त्रोक्त पध्दतीचा वापर करुन भुजलाशिय तसेच सागरी मत्य संपतीचा माहितीसंच सुधारणे व मासेमारी करणे हे या योजणेचे एक उदिष्ट होते.यासाठी, राज्य शासनाने केंद्र शासनाच्या मंजुरीने आयुक्ताच्या कार्यालयात चार नियमित पदे निर्माण केली (ऑक्टोबर, २००४). या चार पदांच्या वेतन, प्रवास खर्च , कार्यालयीन खर्च इत्यादीवरिल खर्च योजेने अंतर्गत केंद्र शासनाने मुक्त केलेल्या अनुदानातून भागवत होते. भुजलाशीयीन मत्स्यव्यवसायचे नमुना सर्वेक्षण न करता प्रत्येक जिल्हाच्या ACF ने सादर केलेल्या माहितीच्या अधारे तयार केलेल्या वार्षिक मत्स्य उत्पादन अहवालांच्या संकलनाचे काम या चार पदावरिल कर्मचा-याकडून होत होते. परंतु, नमुना सर्वेक्षणाव्दारे प्रमाणीकृत कार्यपध्दतीचा वापर करुन भुजलाशीयीन मासेमारी विषयाची गणती करण्यासाठी महत्वपूर्ण माहिती गणकांची पदे सुरवातीपासूनच रिक्त होती.

लेखापरिक्षेत असे आढळून आले की, १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे केंद्र शासनाने जरी ऑक्टोबर २०१३ मध्ये मंजुर केली होती. आणि २०१३-१४ पासून प्रत्येक वर्षी वेतनासाठी अनुदाने मुक्त केली जात होती (चार सध्याची पदेआणि १२ माहिती गणकांची पदे यासाठी) तरीही ३८ महिन्यांचा कालावधी उलटूनही विभागाकडून माहिती गणकांची पदे भरली जाऊ शकली नव्हती (नोंव्हेबर २०१६) १२ माहीती गणकांच्या वेतन अनुदानाचा अखर्चित हिस्सा / भाग GOI ला प्रत्यार्पित करण्यात आला किंवा पुढील वषिर्च्या वापरासाठी GOI ने तो पुर्नवैध केला.

माहिती गणकांची नियुक्ती केली नसल्याने राज्यातील भुजलाशयीन मत्स्यसंपत्ती आणि मासेमारीचा माहिती संच विश्वसनिय नव्हता ज्याचा राज्यातील मत्स्यव्यसायाच्या एकात्मिक विकासासाठीच्या नियोजनावर परिणम झाला.

आयुक्तांनी मान्य केले (जानेवारी २०१६) की, क्षेत्रिय स्तरावर कर्मचा-यांची कमतरता असल्याने मासेमारी विषयाची संपूर्ण आकडेवारी उपलब्ध नव्हती.राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि गणकांची नियुक्ती करण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल असे सांगितले. (डिसेंबर २०१६).

शिफारसः शासनाने (i) पंचवार्षिक योजनेत प्रत्येक वर्षी साध्य करावयाची विशिष्ट प्रत्यक्ष आणि वित्तीय लक्ष्ये दर्शविली जातील. यांची खात्री करावी, आणि (ii) मत्स्यविषयक आकडेवारी संकलित करण्यासाठी गणकांची नियुक्ती त्वरेने करावी जेणे करुन राज्यात मत्स्यव्यवसायांच्या विकासासाठी आखलेल्या योजना आणि धोरणे विश्वासनीय, भक्कम आणि कार्यान्वयन योग्य होतील.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी योजना व धोरणे आखतांना मासेमारी उत्पादनक्षमता, खाजण क्षेत्रातील जैवशास्त्रीय स्थिती, जलाशयांचा शोध, मासे उतरविण्यासाठीची केंद्र, होडया आणि अवजारे इत्यादी विषयी विश्वसनीय आणि अद्ययावत माहितीबाबतची मत्स्य विभागामार्फत प्रसिध्द केलेल्या FISH PRODUCTION REPORT पुस्तिकेची प्रत सोबत ठेवण्यात आली आहे. या पुस्तिकेमध्ये सर्व माहितीचा अंतर्भाव आहे. सदरची माहिती दरवर्षी अद्ययावत करण्यात येते.क्षेत्रिय कार्यालये, मच्छिमार सहकारी संस्था व मच्छिमार यांचे समन्वयाने विभागाच्या मच्छिमारीबाबतच्या सर्व योजना राबविण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यांची आर्थिक स्थिती विचारांत घेऊन नियोजन व वित्त विभागामार्फत वार्षिक योजनेसाठी नियतव्ययांची मर्यादा दरवर्षी देण्यात येते. या मर्यादित नियतव्ययांमध्ये विभागांच्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व घटकांना निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. योजनांच्या प्राथम्य क्रमानुसार निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही होत असते. सबब, पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट सर्वच घटकांना निधीची उपलब्धता नसल्यामुळे त्यांच्यावर खर्च दर्शविता येत नाही. आयुक्त यांच्या स्तरावर क्षेत्रीय कार्यालयांकडून दरवर्षी निश्चित कार्यक्रमानुसार वार्षिक योजना तयार करण्यासाठी माहिती मागविण्यात येते. त्यानंतर सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे अधिकारी (RDC/ACF) यांची बैठक आयोजित करण्यात येऊन शासनाच्या उपलब्ध नियतव्ययांच्या मर्यादेत वार्षिक योजनेमध्ये विविध घटकांचा समावेश करुन अंतिम करण्याची कार्यवाही केली जाते.

आयुक्तालयामार्फत तयार करण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनेमधील समाविष्ट घटकांना केंद्र शासन व राज्य शासनामार्फत निधीची उपलब्धता अपेक्षित असते. परंतु प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये सर्वच घटकांना निधी उपलब्ध होत नाही. ज्या घटकांना निधी उपलब्ध होतो अशा घटकासमोरच वर्षनिहाय उद्दिष्टे आणि समतुल्य वित्तीय खर्च दर्शविला जातो.

१२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे वित्त विभागाच्या मान्यतेने निर्माण करण्याची कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाकडून या घटकांसाठी प्राप्त निधी दि. ०५.०७.२०१६ च्या पत्रान्वये पुर्नवैध करुन मिळालेला आहे. सन २०१७-१८ साठी निधी पुर्नवैध करुन मिळण्यासाठी दि. १९.०४.२०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती केली आहे. अद्यापि, मान्यता अप्राप्त आहे.

(i) राज्यातील त्या त्या विभागाची भौगोलिक रचना व आवश्यकता विचारात घेऊन प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या मार्फत योजना संदर्भाने कार्यक्रम तयार करण्याचे दृष्टीने आयुक्त स्तरावर विभागाच्या आढावा बैठकीत केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनांसाठी असलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन विभागाचे VISION २०२० तयार करण्यात आले आहे.

तसेच आयुक्त मत्स्यव्यवाय स्तरावर भुजल मत्स्यव्यवसाय, सागरी मत्स्यव्यवसाय, निमखा-या पाण्यातील मत्स्यव्यवसाय, मासळीचे सुरक्षण वाहतुक व पणन तसेच इतर कार्यक्रमांतर्गत उपलब्ध योजना राबविण्याचे तसेच शिक्षण व प्रशिक्षण या अंतर्गत आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मच्छिमारांना/मच्छिमार समाजाच्या मुलांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने विभागाची सहा प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वयीत ठेवणे. वार्षिक विकास कार्यक्रम तयार करून कार्यक्रम अंदाज पत्रक व वार्षिक विकास कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येतो. या कार्यक्रमामध्ये प्रत्येक वर्षी साध्य करावयाची विशिष्ट प्रत्यक्ष आणि वित्तीय लक्ष्ये दर्शविली जातील याची दक्षता घेण्यात येत आहे.

(ii) मत्स्यव्यवसाय विषयक आकडेवारी संकलीत करण्यासाठी माहीती गणकाची नियुक्ती करण्यासाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत दि.१६.०९.२०१६ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. प्रस्तुत प्रस्ताव तपासला असता वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनानुसार विहीत प्रपत्रात माहिती नसल्याने त्यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त कार्यालयाला सूचित केले होते. सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच दिनांक ९.२.२०१७ रोजी वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला असता, वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित करून दिनांक ९.५.२०१७ रोजी विभागाकडे प्राप्त झाला आहे. वित्त विभागाने उपस्थित मुद्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाच्या दि.१२.०५.२०१७ च्या पत्रान्वये आयुक्त मत्स्यवयवसाय यांना कळविण्यात आले होते. वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयाची माहीती आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे दि.२६.०९.२०१७ पत्रान्वये प्राप्त झाला असून, प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर बाह्यस्त्रोताद्वारे १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

परिच्छेद क्र. २.२.७ वित्तीय व्यवस्थापन

विभागाला राज्य शासनाकडून अर्थसंकल्पाच्या पाठबळाद्वारे निधी प्राप्त होतो ज्यामध्ये वेगवेगळया योजना राबविण्यासाठी अनुदाने व कर्जाच्या रुपात केंद्र शासनाकडून तसेच राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ (NFDB), राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) आणि कृषी व ग्रामीण विकासासाठीची राष्ट्रीयकृत बँक (NABARD) या इतर शासकीय संस्थांकडून प्राप्त होणा-या निधीचा समावेश असतो. सर्व अनुदाने व कर्जे राज्य अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मार्गस्थ केली जातात/वितरीत केली जातात. मत्स्य बीजांची विक्री, तलाव/जलाशयांचे भाडेपट्टी भाडे, मच्छिमारांकडून मासेमारीसाठी आणि मच्छिमार नौकांसाठी प्राप्त केलेले अनुज्ञप्ती शुल्क, मत्स्य सहकारी संस्थांना (FCS) वितरीत केलेल्या कर्जाची वसुली इत्यादी माध्यमातून देखिल विभागाला महसूल प्राप्त होतो.

२०११-१६ दरम्यान, विभागाने रु.७९८.१९ कोटी खर्च केला. (भांडवली, महसुली आणि FCS ला वितरीत केलेली कर्जे) आणि रु. ८६.०३ कोटी (९.७३%) बचती प्रत्यार्पित केल्या जे तक्ता २.२.१ मध्ये दर्शविलेले आहे.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

यापूर्वी राष्ट्रीय सहकार विकास निगम या योजनेतंर्गत २५% रक्कम अदा केलेल्या २५४ अपूर्ण नौका पुर्ण करण्यासाठी सदर लेखार्शिर्षाखालील रक्कम ५५% कर्ज वितरीत करण्यासाठी ६४०५ कर्जे या शिर्षाखाली पुर्णविनियोजनाने वळती करण्याबाबत प्रस्तावित केले होते. वित्त विभागाकडून मार्च अखेरीस सदर ५५% च्या प्रस्तावांस मंजूरी प्राप्त झाली नाही. तथापी, ४१ गटांसाठी २५% रक्कम वितरीत करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाकडून दि.३१/३/१३ रोजीमंजूरी प्राप्त झाली. दरम्यानच्या कालावधीत बीडीएस प्रणाली बंद झाल्यामुळे २५ % रक्कम ४१ गटांनावितरीत करणे शक्य झाले नाही. सबब सदर रक्कम अखर्चित राहीली असल्याने समर्पित करणे क्रमप्राप्त झाले .

रु.४.२७९ कोटी एवढी रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे बीडीएस वर उपलब्ध झाली. परंतु दरम्यानच्या कालावधीत बीडीएस प्रणाली बंद झाल्यामुळे सदर रक्कम खर्च झाली नाही. त्यामुळे रु.४.२७९ कोटी रक्कम समर्पित करण्यात आली आहे.

तक्ता २.२.१ : सन २०११-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज, खर्च आणि बचत (रु. लाखात)

वर्ष	अर्थ संकल्पीय अंदाज	अतिम सुधारित अनुदान	खर्च	अर्थ संकल्पीय अंदाजाच्या तुलनेत बचत	अर्थसंकल्पीय अंदाजाची बचतीची टक्केवारी
२०११-१२	१७४.०२	१४२.९५	१४२.६७	३१.३५	१८.०१
२०१२-१३	१६७.७७	१४४.२४	१४४.२४	२३.५३	१४.०२
२०१३-१४	१७०.८४	१६३.६४	१६३.६४	७.२	४.२२
२०१४-१५	१४२.०१	१२७.३१	१२७.३१	१४.७	१०.३३
२०१५-१६	२२९.५८	२२९.०२	२२०.३३	९.२५	४.०२
	८८४.२२	८०७.१६	७९८.१९	८६.०३	५०.६०

भांडवली व महसुली खर्च व कर्जाचे संवितरण यासाठी केलेली तरतुद समाविष्ट

राष्ट्रीय कृषी विकास योजना, नाबार्ड आणि NFDB अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतुन केलेला खर्च समाविष्ट नाही.

लेखा परिक्षा तपासणीत असे आढळून आले की, २०११-१६ च्या एकूण रु.८६.०३ कोटी बचतीपैकी रु.३०.४४ कोटी ची बचत (२०१३-१४ व्यतिरिक्त) मुख्यत्वे NCDC अंतर्गत 'मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण' या योजनेअंतर्गत झाली होती.

शासनाने सांगितले की, २०१२-१३ दरम्यान नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी NCDC कडून कर्जाच्या रुपात प्राप्त व्हावयाचा निधी मार्च २०१३ अखेरपर्यंत मंजूर करण्यात आला नव्हता, परिणामी २०१२-१३ दरम्यान मोठया प्रमाणात बचत झाली.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१६ या कालावधीत प्राप्त अंतिम सुधारित तरतुद खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	अतिम सुधारित अनुदान (रु.लक्ष)	खर्च (रु.लक्ष)	बचत (रु.लक्ष)
२०११-१२	१४२.९५	१४२.६७	०.२८
२०१२-१३	१४४.२४	१४४.२४	०.००
२०१३-१४	१६३.६४	१६३.६४	०.००
२०१४-१५	१२७.३१	१२७.३१	०.००
२०१५-१६	२२९.०२	२२०.३३	८.६९
	८०७.१६	७९८.१९	८.९७

विभागास रु. ८०७.१६ लक्ष अंतिम सुधारित अनुदान प्राप्त झाले असुन त्यापैकी रु. ७९८.१९ लक्ष इतका खर्च झाला आहे व प्रत्यक्षात रु.८.९७ लक्ष इतकी बचत झाली असून ती फक्त १.११ टक्के इतकी नगण्य असून ती क्षमापित करण्यात यावी.

शासन मंजुरी प्राप्त झालेल्या यांत्रिक नौकांना रक्कम अदा करण्यासाठी शासनाकडून बीडीएसवर पुनर्विनियोजनाद्वारे प्राप्त झालेली तरतुद पुर्ण खर्च करण्यात आली होती.

शासन मंजुरी प्राप्त झालेल्या यांत्रिक नौकांना रासविनी रक्कम अदा करण्यासाठी बीडीएसवर प्राप्त झालेल्या तरतुदीनुसार खर्च करण्यात आला असुन मुळ तरतुदीनुसार बीडीएसवर अप्राप्त असलेली तरतुद समर्पित करण्यात आली होती.

परिच्छेद क्र. २.२.७.१ मत्स्य सहकारी संस्थांकडून थकबाकीची वसुली न होणे

चाचणी तपासणी केलेल्या दोन RDC आणि १० ACF च्या दस्तऐवजाच्या तपासणीत असे आढळून आले की, विभागाने वेळोवेळी भाडेपटयावर दिलेल्या तलावांच्या भाडयापोटी FCS कडून रू. ३३.७४ लक्ष रककमेची वसूली प्रलंबित होती (मार्च २०१६) रू. ३३.७४ लक्ष पैकी रू. २४.८० लक्षची वसूली २००६-०७ पूर्वीच्या कालावधीशी संबधित होती.

शासनाने सांगीतले की, कसूरदार FCS ना काळया यादीत टाकण्यात येत होते आणि थकबाकीची वसूली जमीन महसूलाप्रमाणे करण्यासाठीचे प्रस्ताव जिल्हाधिका-यांना पाठविण्यात येत होते.

NCDC कडून FCS ना (i) मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण, (ii) बर्फाचे कारखाने, शीतगृहे स्थापन करणे, जमीनीवरील वाहतुकीसाठीची वाहने, मत्स्य उत्पादने (जतन, वाहतुक आणि पणन योजनेअंतर्गत) साठवण्यासाठी गोदामांचे बांधकाम आणि (iii) जाळी, नौका आणि इतर साधन सामग्रीची खरेदी (१००% भागभांडवल योजनेअंतर्गत) यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. FCS ना संवितरीत केलेल्या कर्जाच्या वसूलीची मार्च २०१६ ची स्थिती तक्ता २.२.२ मध्ये दिली आहे.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या विभागाने केलेल्या (Recovery made from FCS by the ACF) चा माहे सष्टेंबर २०१७ अखेरचा वसुलीचा अहवाल प्रपत्रात सोबत जोडला आहे.

अ) रु.२४.८० लक्ष एवढी रक्कम वसुली करणेबाबत संबंधित मच्छिमार सहकारी संस्थांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

ब) रासविनि अंतर्गत कर्जाच्या वसूलीबाबतचा सद्यस्थिती अहवाल सोबत जोडत आहे.

२.२.७.१

तक्ता २.२.२ : NCDC योजनांच्या अंतर्गत FCS कडून देय असलेल्या रक्कमेच्या वसूलीची मार्च २०१६ ची स्थिती.

(रू. कोटीत)

योजनेचे नांव	FCS कडून देय असलेल्या वसुलीची रक्कम	वसूल रक्कम	प्रलंबित वसूली	प्रलंबित वसूलीची टक्केवारी
मासेमार होडयांचे यांत्रिकीकरण	४७१.६५	१७४.२३	२९७.४२	६३
जतन, वाहतुक आणि पणन	३०.५१	११.५३	१८.९८	६२
१०० % भागभांडवल	१५.६३	७.८२	७.८१	५०
एकूण . .	५१७.७९	१९३.५८	३२४.२१	६३

स्त्रोत : मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांनी सादर केलेली माहिती.

रू. ३२४.२१ कोटी इतकी मोठया प्रमाणातील थकीत वसूली विभागातील वसूलीचे व्यवस्थापन सुमार असल्याचे दर्शिविते.

शासनाने सांगितले की, जर नौकेच्या मालकाने सलग तीन हप्ते भरले नाही तर सदर कसूरदार नौका मालक ज्या FCS शी संलग्न असतो त्या FCS ला अकार्यक्षम संस्था म्हणून घोषित केले जाईल आणि वसूली पूर्ण होईपर्यंत संस्थेला देण्यात येणारे शासकीय लाभ स्थगीत ठेवण्यात येतील.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल परंतु क्रियाशील मच्छिमारांच्या गटांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी नवीन नौका बांधण्यासाठी रासविनि योजनेतंर्गत अर्थसहाय्य /कर्ज मंजुर करण्यात येते. शासनाकडून कर्ज मंजुर करतेवेळी शासन निर्णय दिनांक ०२.०१.२०१४ अन्वये नवीन नौका हेच तारण म्हणून विचारात घेतले जाते. त्यामुळे कर्जाची वसुली केवळ नौकेपासुन मिळणा-या उत्पन्नावर अवलंबून राहते.

तथापि मत्स्यव्यवसाय विभागाकडुन कर्ज वसुलीसाठी अथक प्रयत्न चालू आहेत.

राज्याच्या ७ सागरी जिल्ह्यामध्ये (पालघर जिल्हा धरुन) एकूण ०६ वसुली अधिका-यांची पदे मंजूर आहेत. पैकी ०३ पदे ऑक्टोबर २०१४ मध्ये नियमितरित्या भरली असून उर्वरित ०३ रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार अन्य अधिका-यांकडे सोपवून वसुलीविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

शासकीय रक्कमेची थकबाकी असलेल्या मच्छीमार सहकारी संस्थांची यादी सोबत जोडली आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक संस्थेकडे थकीत रक्कमेची माहितीदेखील यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

परिच्छेद क्र. २.२.७.२ रोख पुस्तिका ठेवण्यांत आढळलेल्या विसंगती

ACF, RDC आणि आयुक्त यांच्या कार्यालयातील रोख पुस्तिका आणि इतर दुय्यम दस्तऐवज यांच्या चाचणी तपासणीतून खालील बाबी आढळून आल्या.

* मे २०१४ पासून ACF, अलिबाग कार्यालयाने रोख पुस्तिकेत नोंदी घेतल्या नव्हत्या.

* ACF, पुणे आणि मुंबई शहर/उपनगर यांनी अनुक्रमे एप्रिल २०११ आणि जून २०१५ पासून रोख पुस्तिकेचा दैनिक व मासिक ताळमेळ घेतला गेला नव्हता.

* आयुक्त व ACF, मुंबई शहर/उपनगर यांनी अनुक्रमे नोव्हेंबर २०१५ व डिसेंबर २०१५ पासून प्रत्येक महिन्याच्या अखेरीस रोख पुस्तिकेचा बँक शिल्लकींशी ताळमेळ घेतला नव्हता.

रोख पुस्तीका न ठेवणे आणि बँक शिल्लकीशी त्यांचा ताळमेळ न घेणे यामुळे विभागामध्ये शासकीय रक्कमेचा दुर्विनियोग होण्याचा धोका निर्माण झाला.

रोख पुस्तिका योग्य प्रकारे ठेवली जात असल्याची सुनिश्चीती करण्यासाठी आवश्यक सुचना देण्यांत येत असल्याचे राज्य शासनाने सांगितले.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयातील महालेखापरिक्षक यांचा मार्च २०१६ च्या आर्थिक क्षेत्र अहवालानुसार आयुक्त कार्यालयातील रोख नोंदवही मधील बँक शिल्लकींशी ताळमेळबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यांत येत आहे.

१. नोव्हेंबर २०१० ते नोव्हेंबर २०१५ या वर्षामधील रोख नोंदवहीमधील जमा खर्चाची बँकेच्या विवरणपत्रानुसार/ शिल्लकीनुसार प्रधान महालेखाकार मुंबई कार्यालयाने लेखापरिक्षण केले आहे.

२. सदरील रोखनोंदवहीमधील माहे नोव्हेंबर २०१५ ते डिसेंबर २०१५ चे बँक शिल्लकीशी ताळमेळाबाबत बँकेचे विवरणपत्र वेळेत प्राप्त नझाल्याने त्याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

३. महिना अखेरीस बँकेत जमा होणारी शिल्लक रक्कम व रोकड नोंदवहीतील शिल्लक रक्कम यांचा महिन्याच्या अखेरीस ताळमेळ नियमीतपणे घेण्यांत येत आहे.

४. महालेखापरिक्षण यांच्या माहे नोव्हेंबर २०१० ते नोव्हेंबर २०१५ च्या अहवालानुसार लेखाशाखेमध्ये रोकड नोंदवही, रजीस्टर, अभिलेखेतील नोंदी व्यवस्थित ठेवल्याबाबतची नोंद महालेखाकार कार्यालयाने त्यांच्या अभिलेखी घेतलेली आहे.

शिफारस२ : (i) मत्स्य सहकारी संस्थांकडून थकबाकीची वसुली करण्यासाठी शासनाने विशेष मोहीम हाती घ्यावी , आणि (ii) शासकीय रक्कमेच्या दुर्विनियोगाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी रोखपुस्तिका आणि बँक शिल्लकीतील तफावतींचा यापुढे त्वरीत ताळमेळ घ्यावा.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(i) थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली असुन मच्छिमार संस्थांचे जिल्हानिहाय सहायक आयुक्त यांच्या स्तरावर २ वसुली अधिकारी यांच्या स्तरावर ५ मेळावे आयोजित करण्यात येऊन थकित कर्जाच्या रक्कमा त्वरेने भरण्याबाबत आवाहन करण्यात आले. तसेच थकबाकीदार यांना महाराष्ट्र जमीन महसुल १९६६ मधील कलम १७६ अंतर्गत थकबाकी वसुलीची नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. थकबाकीदार मच्छिमार यांच्या निवासस्थानी भेटी देवुन कर्जाची रक्कम भरण्याबाबत विनंती केली आहे.

(ii) शासकीय रक्कमेच्या दुर्विनियोगाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी रोख पुस्तिका आणि बँक शिल्लकीतील तफावतींचा ताळमेळ नियमितपणे घेण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. २.२.८ मत्स्य उत्पादनातील तूट

२०११-१६ दरम्यान राज्यातील एकूण मत्स्य उत्पादन (भूजलाशयीन व सागरी) तक्ता २.२.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे होते.

तक्ता २.२.३ : २०११-१६ दरम्यान राज्यातील मत्स्य उत्पादन

(टन मध्ये)

वर्ष	भूजलाशयीन मत्स्य उत्पादन			सागरी मत्स्य उत्पादन			एकूण मत्स्य उत्पादन		
	लक्ष्य	प्रत्यक्ष उत्पादन	तूट (टक्के)	लक्ष्य	प्रत्यक्ष उत्पादन	तूट (टक्केत)	लक्ष्य	प्रत्यक्ष उत्पादन	तूट (टक्केत)
२०११-१२	१५००००	१४५११०	३.२६	६०००००	४३३६८४	२७.७२	७५००००	५७८७९४	२२.८२
२०१२-१३	१५००००	१३७४६१	८.३६	६०००००	४४८९१३	२५.१८	७५००००	५८६३७४	२१.८१
२०१३-१४	१५००००	१३५२२१	९.८६	६०००००	४६७४५८	२२.०९	७५००००	६०२६७९	१९.६४
२०१४-१५	१५००००	१४४४७९	३.६९	६०००००	४६३५८५	२२.७३	७५००००	६०८०६४	१८.९२
२०१५-१६	१५००००	१४५५७०	२.९५	६०००००	४३४११५	२७.६५	७५००००	५७९६८५	२२.७१
सरासरी	१५००००	१४१५६८	५.६२	६०००००	४४९५५१	२५.०७	७५००००	५९१११९	२१.१८

स्त्रोत : २०११-१५ वर्षाचे कार्यकारी/कार्यसिध्दी अर्थसंकल्प, मत्स्य उत्पादन अहवाल आणि मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांनी सादर केलेली २०१५-१६ ची अंतरीम आकडेवारी तक्ता २.२.३ वरून असे दिसून येते कि, २०११-१६ दरम्यान ७.५० लक्ष टन इतक्या निर्धारीत वार्षिक सरासरी मत्स्य उत्पादनाच्या (भूजलाशयीन तसेच सागरी) उद्दिष्टाच्या तुलनेत सरासरी वार्षिक उत्पादन ५.९१ लक्ष टन होते म्हणजेच २१ टक्क्यांची तूट होती. भूजलाशयीन मत्स्य उत्पादनातील तुटीशी (५.६२ टक्के) तुलना करता सागरी मत्स्य उत्पादनातील तूट (२५.०७ टक्के) तीव्र होती.

मत्स्य उत्पादनाच्या क्षेत्रनिहाय विश्लेषणातून असे आढळून आले कि, राज्यातील सात क्षेत्रापैकी चार क्षेत्रातील (कोकण, नाशिक, औरंगाबाद आणि लातूर) मत्स्योत्पादनात २०११-१२तुलनेत २०१५-१६ मध्ये घट झाली होती. कोकण क्षेत्रात पाच टक्के, नाशिक क्षेत्रात १४ टक्के, औरंगाबाद क्षेत्रात २९ टक्के आणि लातूर क्षेत्रात ३६ टक्के घट होती.

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि सांगितले कि, भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय क्षेत्रात मच्छिमार प्रामुख्याने लहान आकाराच्या फिश फ्राय चा साठा करतात ज्यामुळे त्यांचा मृत्यूदर अधिक असतो व उत्पादन कमी असते. अतः मत्स्यबोटुकली चा साठा करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे ज्यामुळे माशांचा मृत्यूदर कमी होईल व भूजलाशयीन मत्स्य उत्पादन वाढेल. त्यांनी सांगितले कि, बंदिस्त जलाशयात जोपासना (cage culture) करणे (भूजलाशयीन मत्स्य व्यवसायासाठी), सागरी किनारी बंदिस्त जलाशयात जोपासना करणे (सागरी मत्स्य व्यवसायासाठी) यास प्रोत्साहन देवून, उबवणी केंद्राचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करून, निमखा-या पाण्यात माशांचे संवर्धन क्षेत्र वाढवून राज्यातील मत्स्योत्पादनासाठी दरी साधण्यासाठी आणि उत्पादन अधिकतम क्षमतेत करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्यात आली.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१६-१७ मध्ये भुजलाशयीन मत्स्य उत्पादनांचे लक्ष्य १.५० लाख होते मात्र, प्रत्यक्ष उत्पादन हे २.०० लाख झाले असुन मत्स्य उत्पादनात ३३.३३ टक्के वाढ झाली आहे.

सन २०१६-१७ मध्ये सागरी मत्स्य उत्पादनांचे लक्ष्य ६.०० लाख होते मात्र, प्रत्यक्ष उत्पादन हे ४.६७ लाख झाले असुन सागरी मत्स्यउत्पादनात २२.१६ टक्के तुट आली असुन ही तुट मागील वर्षाच्या तुलनेत ५.०० टक्क्याने कमी आहे.

विभागाचे सन २०१६-१७ चे एकूण मत्स्य उत्पादन (भुजल असागरी) विचारात घेता मत्स्य उत्पादनांचे लक्ष्य ७.५० लाख होते मात्र, प्रत्यक्ष उत्पादन हे ६.६७ लाख झाले असुन मत्स्यउत्पादनात ११.०६ टक्के तुट आली असुन ही तुट मागील वर्षाच्या तुलनेत ११.०० टक्क्याने कमी आहे.

गोडया पाण्यातील मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी जलद वाढ होणारे व चांगल्या प्रतीच्या मत्स्यबोटुकलीची साठवणूक जलाशयात / तलावात करणे आवश्यक असते. याकरीता विभागाच्या मालकीच्या राज्यातील ३० मत्स्यबीज उत्पादन केंद्र (हॅचरी) व १६ संवर्धन केंद्र यांच्यामार्फत जास्तीत जास्त मत्स्यबीज निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच मत्स्यबीज केंद्राचे खाजगीकरण करुन बीजांची निकड भागविण्यात येत आहे. तसेच सागरी क्षेत्रातील मत्स्य उत्पादन वाढविण्याच्या दष्टीने राज्यांच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारीवर प्रतिबंध करण्यासाठी दि. ०५.०२.२०१६ अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे. शाश्वत मत्स्य उत्पादन, मत्स्यबीज जाळ्यातन अडकता बीजांची नैसर्गिकरीत्या वाढ होऊन प्रजननक्षम माशांची वाढ व मासळी साठ्यांचे जतन या दृष्टीने ट्रॉल जाळ्यांच्या कॉडेएन्ड च्या आसाचा व्यास ४० मीमी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने १०.०१.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यात ४.१८ लाख हेक्टर भूजलाशयीन क्षेत्र उपलब्ध असून त्याकरीता ११४ कोटी मत्स्यबोटुकलीची आवश्यकता आहे. मत्स्यबोटुकलीची गरज भागविण्याकरीता राज्यास ११४ मिनी हॅचरी ५३ पोर्टेबल ह्चरी, २८ बांध बंधारेची आवश्यकता आहे. मिशन फिंगरलिंग अंतर्गत सन २०१७-१८ करीता १८ मिनी हॅचरीची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. सदर १८ हॅचरीमधून ९ कोटी मत्स्यबोटुकली उत्पादन अपेक्षित आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY) अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये ३६ पोर्टेबलहॅचरीची स्थापना करण्यात येणार आहेत. सदर ३६ पोर्टेबलहॅचरी मधून ५.४० कोटी मत्स्यबोटुकली उत्पादन अपेक्षित आहे. तसेच केंद्र शासनाच्या निलक्रांती योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना या योजनेअंतर्गत नवीन हॅचरीज स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या नवीन हॅचरीज मधूनही मत्स्यबोटुकलीचे उत्पादन वाढविण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

राज्यामध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय वाढ करण्याकरीता पिंजरा मत्स्यसंवर्धन करण्याच्या धोरणास दि.१७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.या धोरणाअंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाने प्रसिध्दी देवून इच्छुक प्रकल्प धारकांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्याप्रमाणे आजमितीपर्यंत ५९ बॅटरीज मंजूर करण्यात आल्या आहेत. यामध्ये एका बॅटरीत ४८ पिंजरे याप्रमाणे २८३२ पिंजरे उभारण्यास विभागाने मंजूरी दिली आहे. तसेच दि. १७/१०/२०१६ शासन निर्णयान्वये महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत १७१ बॅटरीज मंजूर करण्यात आल्या असून त्यापासून ८२०८ पिंजरे उभारण्यात येणार आहेत. तसेच मत्स्यबीज केंद्राचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्याकरीता RKVY योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील ४ शासकीय मत्स्यबीज केंद्राचे नुतनीकरण करण्याकरीता रु.६.२५ कोटी इतका निधी सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करुन दिला आहे. उपरोक्त सर्व उपाय योजना करुन राज्यातील मत्स्योत्पादनातील तूट भरून काढण्यासाठी विभागामार्फत भरीव प्रयत्न करण्यात येत आहेत.

परिच्छेद क्र. २.२.८.१ नियमांचे योग्य पालन न करता केली जाणारी Purse seine मासेमारी.

माशांचा समुदाय एखाद्या जागी असल्याचे निश्चित झाल्यावर त्या संपूर्ण क्षेत्राला वेढणारी जाळयाची मोठी भिंत म्हणजे Purse seine. राज्य शासनाने गठीत केलेल्या (सप्टेंबर २०११) समितीच्या असे निदर्शनास आले की सुरमई, बांगडा आणि माशांच्या इतर निर्धारीत प्रजाती परिपक्व होण्यासाठी त्या किमान आकाराच्या वाढण्या आधीच त्यांची पिल्ले मोठया प्रमाणात

Purse seine मासेमारीत पकडली जातात ज्याचा परिणाम अशा प्रजातींच्या भविष्यातील उत्पादनावर होतो. समितीच्या असेही निदर्शनास आले की, उथळ पाण्यात तसेच प्रजनन काळात Purse seine मासेमारीचा प्रतिकुल जैवशास्त्रीय परिणाम होतो. कारण त्यामुळे तळांतील जलाशयाच्या निम्नस्तरावरील (benthic) वनस्पतीचे संतुलन बिघडते. वेगवेगळया प्रकारच्या जाळयाचा वापर करुन मच्छीमार अनुसरत असलेल्या मासेमारीच्या पध्दतीत एकूण सागरी मासेमारीचे प्रमाण तसेच मासेमारी नौके कडून प्रत्येक फेरीत केलेले मत्स्योत्पादन निर्धारीत करतात.

लेखापरीक्षेत असे आढळून आले की, २०११-१२ दरम्यान वेगवेगळ्या जाळयांचा (Purse seine जाळयासह) वापर करुन यंत्रचलीत नौकांनी प्रत्येक फेरीत ४४० कि.ग्रॅम उत्पादन केले होते. (जे २०१४-१५ दरम्यान ३५२ कि.ग्रॅम इतके कमी झाले) त्याचवेळी फक्त Purse seine जाळयांचा वापर करणा-या यंत्रचलित नौकांनी २०११-१२ दरम्यान प्रत्येक फेरीत २५८० कि.ग्रॅम उत्पादन केले होते जे २०१४-१५ दरम्यान २९५३ कि.ग्रॅम पर्यंत वाढले. Purse seine पध्दतीने राज्यात केली जाणारी मासेमारी कोणत्याही नियमांचे पालन न करता बेसुमार प्रमाणात केली जात असल्याचे हे निदर्शक आहे.

(i) राज्यातील Purse seine मासेमारीची स्थिती, (ii) Purse seine मासेमारीचा पारंपारीक पध्दतीने केल्या जाणा-या मासेमारीवर होणारा पर्यावरणीय तसेच आर्थिक परिणाम, आणि (iii) कमाल शाश्वत मत्स्योत्पादनाच्या आधारावर Purse seine मासेमारी नौकांच्या संख्येची निश्चीती याबाबींचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने एक समिती गठीत केली होती. समितीन सादर केलेल्या (मे २०१२) अहवालात राज्यात Purse seine पध्दतीचा वापर करुन केलाजाणारा मत्स्यव्यवसाय विनियमीत करण्यासाठी Purse seine पध्दतीचा वापर करणा-या मच्छीमारांचे कार्यक्षेत्र मर्यादीत करणे आणि प्रमाणित आकाराच्या जाळयाचा वापरकरणे, Purse seine नौकांची संख्या कमी करणे, हंगामी परवाना पध्दती लागू करणे, Purse seine उद्योगात अधिक गुंतवणूकीस आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक धोरण आखणे, राज्यातील मत्स्यव्यवसायाचा कायम स्वरुपी विकास साधण्यासाठी मत्स्यव्यवसाय धोरणाचा मसुदा तयार करणे इत्यादी सारख्या अनेक शिफारसी समाविष्ट होत्या.

राज्य शासनाने मार्च २०१५ मध्ये शिफारसी मान्य केल्या परंतू ज्या क्षेत्रा मध्ये Purse seine पध्दतीने मासेमारी केली जाऊ शकेल असे क्षेत्र मासेमारीसाठी वापरल्या जाणा-या जाळयाच्या लांबी व आकारमानासह विनिर्दीष्ट करणारी अधिसुचना फेब्रूवारी २०१६ मध्ये जारी केली/प्रसिध्द केली. तसेच, समितीने मे २०१२ मध्ये शिफारस केलेले प्रारुप मत्स्यव्यवसाय धोरण विभागाने नोव्हेंबर २०१६ पर्यंत तयार केले नव्हते.

राज्य शासनाने सांगितले की, समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्यांत झालेला विलंब जाणून बुजून करण्यांत आला नव्हता. राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारसींवर निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरीय सल्लागार समित्यांशी चर्चा करण्यांस व बैठका घेण्यास हा कालावधी लागला होता.

परंतु Purse seine पध्दतीने केली जाणरी मासेमारी विनियमीत करण्यासाठी अधिसुचना जारी करण्यात राज्य शासनाला ४५ महिन्यांचा कालावधी (मे २०१५ ते फेब्रूवारी २०१६) लागला होता आणि समितीने शिफारस केल्या प्रमाणे प्रारुप मत्स्यव्यवसाय धोरण अद्यापही आखले गेले नव्हते ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पर्ससीन मासेमारीने माश्यांचे लहान पील्ले प्रजात्पादनाचे किमान अवस्था येण्या पूर्वी पकडले जातात व त्यांची जिवनचक्रामध्ये एकदा तरी पुर्नउत्पादनाची संधी मिळत नसल्याने पूढील वर्षाच्या मत्स्य उत्पादनावर परिणाम होतो. उथळ पाण्यातील व प्रजोत्पादन हंगामातील पर्ससीन मासेमारीमूळे समुद्राचे तळावरील जीवसृष्टीची होणारी हानी, यामुळे पर्यावरणावर प्रतिकुल परिणाम होऊन कमाल शास्वत मत्स्योत्पादन बाधीत होतो.

सदरबाबी लक्षात घेता, शासनाने पर्ससीन मासेमारी व तीचा पारंपारीक मासेमारीवर व महाराष्ट्र राज्याच्या सागरी किना-याच्या पर्यावरणावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.व्ही.एस.सोमवंशी, माजी महा निदेशक, केंद्रीय मत्स्य सर्वेक्षण, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक मत्सवि-२०११/C.R.२१२/ADF-१४, दि.०९.०९.२०११ ने अन्वयेसमिती गठीत करण्यांत आली होती.

सदर समिती सविस्तर अभ्यास करुन जाळयांची आकारमान (जाळयांची उंची व लांबी) मर्यादीत ठेवणे, पर्ससीन मासेमारीसाठी क्षेत्र मर्यादित ठेवणे तसेच पर्ससीन मासेमारी नौकांना हंगामी परवाने देण्यात यावेत इत्यादीशिफारशी शासनास दिनांक १० मे २०१२ रोजी केल्या होत्या. सादर केलेल्या अहवालातील शिफारसी शासनाने दिनांक १६ मे २०१५ रोजी पुर्णतः स्वीकृत केल्या आहेत.

सदर शिफारसीवर कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या कलम-३-१ व कलम-४-१ व ४-२ मधील तरतूदीनूसार मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा सल्लागार समिती समोर राज्यस्तरीय समितीचा अहवाल ठेवण्यांत आला.

समितीमध्ये पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणा-या मच्छीमारांचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांचे समवेत सदर विषयाबाबत चर्चा करुन अभिप्राय घेण्यांत आले होते.

प्रत्येक सागरी जिल्हयामार्फत जिल्हा सल्लागार समितीचे अभिप्राय प्राप्त करुन राज्यातील मत्स्यव्यवसाचा कायमस्वरुपी विकास साधण्यासाठी शासनाने स्वीकृत केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचा आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना इत्यादी शिफारशींचा प्रारुप मसुदा शासनास प्राप्त झाला होता.

सदर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणा-या नौकांवर प्रतिबंध घालण्याच्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने सल्लागार समितीची शिफारस प्राप्त करुन राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचा आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना, पर्ससीन मासेमारी परवान्यांची संख्या टप्या टप्याने कमी करणे बाबत महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत मत्स्यवि. १११५/प्र.क्र.२८२/पदुम-१४, दिनांक ०५ फेब्रूवारी २०१६ अन्वये अधिसुचना निर्गमीत करण्यांत आली.

समितीचा अहवाल दिनांक १० मे २०१२ रोजी शासनास प्राप्त झाला व शासनाने दिनांक १६ मे २०१५ रोजी समितीच्या शिफारसी स्विकृत केल्या.सदर शिफारसीवर कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ च्या कलम-३-१ व कलम-४-१ व ४-२ मधील तरतूदीनूसार मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा सल्लागार समिती समोर राज्यस्तरीय समितीचा अहवाल ठेवण्यांत आला.समितीमध्ये पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणा-या मच्छीमारांचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांचे समवेत सदर विषयाबाबत चर्चा करुन अभिप्राय घेण्यांत आले होते.

प्रत्येक सागरी जिल्हयामार्फत जिल्हा सल्लागार समितीचे अभिप्राय प्राप्त करुन राज्यातील मत्स्यव्यवसाचा कायम स्वरुपी विकास साधण्यासाठी शासनाने स्वीकृत केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचा आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना इत्यादी शिफारसीचा प्रारुप मसुदा शासनास प्राप्त झालाहोता.

सदर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणा-या नौकांवर प्रतिबंध घालण्याच्या उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने सल्लागार समितीची शिफारस प्राप्त करुन राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचा आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना, पर्ससीन मासेमारी परवान्यांची संख्या टप्याटप्याने कमी करणेबाबत महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत मत्स्यवि. १११५/प्र.क्र.२८२/पदुम-१४, दिनांक ०५ फेब्रूवारी २०१६ अन्वये अधिसुचना निर्गमीत करण्यांत आली. त्याचप्रमाणे विभागाचे मत्स्यधोरण निश्चित करण्याकरिता धोरणाचा मसूदा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

परिच्छेद क्र. २.२.८.२ मत्स्य बीजांचे नगण्य उत्पादन

राज्यांत अंतर्गत मत्स्य उत्पादन वाढवण्याच्या उद्देशाने विभाग ३३ मत्स्य बीज केंद्रे (३० उबवणी केंद्रासह) चालविते, यामध्ये तयार केलेल्या मत्स्य बीजांची आयुक्तांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दराने मच्छिमार/ FCS ना विक्री केली जाते. या ३३ मत्स्यबीज केंद्राची उत्पादन क्षमता आणि २०११-१६ दरम्यान त्यामध्ये झालेले प्रत्यक्ष उत्पादन तक्ता २.२.४ मध्ये दर्शविले आहे.

वर्ष	उत्पापदन क्षमता (कोटीत)	मत्स्यबीजांचे प्रत्यक्ष उत्पादन (कोटीत)	उत्पादनपातील तूट (टक्केवारीत)
२०११-१२	२०.९३	७.०८	६६.१७
२०१२-१३	२०.९३	३.५०	८३.२८
२०१३-१४	२०.९३	३.३५	८३.९९
२०१४-१५	२०.९३	२.४३	८८.३९
२०१५-१६	२०.९३	८.१६	६१.०१

स्त्रोत : मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांनी सादर केलेली माहिती.

लेखापरीक्षा छाननीत असे आढळून आले कि, राज्यात वार्षिक ६० कोटी मत्स्यबीजांची मागणी असताना त्या तुलनेत या ३३ मत्स्यबीज केंद्रांची क्षमता २०११-१६ दरम्यान २१ कोटी इतकी स्थिर होती. परंतु, उत्पादन क्षमतेच्या तुलनेत प्रत्यक्ष वार्षिक उत्पादन नगण्य होते जे २०११-१६ दरम्यान २.४३ कोटी (८८टक्क्याची तूट) आणि ८.१६ कोटी (६१टक्क्याची तूट) होते. खुल्या बाजारातून मत्स्यबीजांची खरेदी करून मच्छिमार/ FCS नी तूट भरुन काढली. २०११-१६ दरम्यान या ३३ मत्स्य बीज केंद्रांना रु.१०.५५ कोटी व्यवसायिक तोटा झाला होता.

चाचणी तपासणी केलेल्या १० पैकी ६ ACF नी लेखापरीक्षकांना सादर केलेल्या मत्स्य बीज उत्पादनाच्या वार्षिक प्रगती अहवालांच्या (२०११-१२ ते २०१४-१५) छाननीत असे आढळून आले की, (i) केंद्रामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, (ii) मत्स्यबीजांच्या संवर्धनासाठी/ वाढीसाठी पोषक वातावरण नसणे. (iii) फलनासाठी गोडेपाणी उपलब्ध नसणे, (iv) पाणी साठवण्यासाठी तलावांची व्यवस्था नसणे/ देखभाल न करणे, (v) मनुष्यबळाची कमतरता, आणि (vi) विभागाकडून वेळेवर निधी प्राप्त न होणे या कारणांमुळे प्रामुख्याने केंद्राच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यात आला नव्हता.

तसेच २०११-१६ दरम्यान ३३ पैकी पाच मत्स्य बीज केंद्रात माशांची पैदास झाली नव्हती. या पाच बीज केंद्रापैकी नांदेड येथील एक केंद्र कर्मचा-यांची व पाणी पुरवठा वाहिन्यांची कमतरता यामुळे २००८-०९ पासून कार्यरत नव्हते आणि तीन केंद्रातील (चंद्रपूर येथील दोन व भंडारा येथील एक) उबवणी केंद्रे पाच वर्षापासून कार्यरत नव्हती आणि भीषण दुष्काळामुळे औरंगाबाद मधील एका मत्स्य केंद्रावर प्रतिकूल परिणाम झाला होता.

कर्मचा-यांची कमतरता, अपुरा पाऊस, मोडकळीस आलेली उबवणी केंद्रे आणि अपर्याप्त वीण (brood) साठा या बाबी क्षमतेचा पुरेपूर वापर न होण्यासाठी जबाबदार असल्याचे राज्य शासनाने सांगितले. परंतु, शासनाने पुढे असेही सांगितले कि, चांगले नियोजन आणि शिस्तबध्द कार्यपध्दती आणि चांगला पाऊस यामुळे २०१६-१७ दरम्यान मत्स्य बीज उत्पादन मोठया प्रमाणात वाढले. RKVY अंतर्गत अर्थसहाय प्राप्त होण्यासाठी उबवणी केंद्राची दुरुस्ती तसेच वीण (brood) बँक निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

लेखापरीक्षेत असेही आढळून आले कि, विभागाने यवतमाळ जिल्हयात अरूणावती आणि बेंबळा येथे दोन नवीन मत्स्य बीज केंद्रे (क्षमता प्रत्येक एक कोटी मत्स्य बीजे) रु.७.६५ कोटीच्या अंदाजित खर्चात बांधण्यासाठी मंजूरी दिली होती. (जानेवारी २०१२) परंतु जवळ जवळ पाच वर्षाचा कालापव्यय (जानेवारी २०१२ ते प्टेंबर २०१६) आणि रु.८.४१ कोटी खर्च करूनही दोन्ही

मत्स्यबीज केंद्राचे काम पूर्ण होवू शकले नव्हते.भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वर्ष २००८-०९ च्या अहवालातील मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्गत नियंत्रण यावरील लेखापरीक्षा परिच्छेदांवर चर्चेनंतर लोकलेखा समितीने (PAC) तिच्या १७ व्या अहवालात (फेब्रुवारी २०१४) अशी शिफारस केली होती कि, राज्यात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी वेगवेगळया तालुक्यांमध्ये मोठया संख्येत मत्स्यबीज केंद्रे स्थापणे आवश्यक आहे. PAC ने शिफारस करुनही सध्याची मत्स्यबीज केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत नाहीत आणि मोठया प्रमाणात गुंतवणूक करून व कालापव्यय होवूनही नवीन प्रकल्प सूरू होवू शकले नाहीत.

शिफारस ३ : राज्यात मत्स्यव्यवसायाचे प्रभावी व्यवस्थापन व शाश्वत विकास साधण्यासाठी शासनाने त्वरेने मत्स्यव्यवसाय धोरण आखावे. मत्स्यबीज केंद्राच्या पायाभूत सुविधा मध्ये सुधारणा /बळकटी करण करुन तसेच त्याला पर्याप्त मनुष्य बळाची जोड देऊन मत्स्यबीज उत्पादनांतील कमतरतांवर तोडगा काढावा.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विभागाकडे राज्यातील ३० मत्स्यबीज उत्पादन केंद्र (हॅचरी)असून १६ संवर्धन केंद्र आहेत. विभागाच्या तसेच राज्यातील सद्याच्या खाजगी मत्स्यबीज निर्मिती केंद्रातून राज्यातील सर्व तलावासाठी मत्स्यबीजाचा पुरवठा होत नसल्याने ब-याच प्रमाणात इतर राज्यातून मत्स्यबीजाची आयात केली जाते राज्यातील पाटबंधारे विभाग, तलाव, जिल्हा परिषद तलाव, माल गुजारी, ग्राम पंचायत, तलाव, खाजगी तलाव तसेच मत्स्य संगोपन तलावात मत्स्योत्पादनासाठी मत्स्यबीजांच्या साठवणूकीची आवश्यक असते.

राज्यात ४.१८ लाख हेक्टर भूजलाशयीन क्षेत्र उपलब्ध असून त्याकरीता ११४ कोटी मत्स्यबोटुकलीची आवश्यकता आहे. राज्यात शासकीय हॅचरी (भाडेतत्वावर दिलेल्या हॅचरीसहीत) १०.७८ कोटी, खाजगी हॅचरी मधून ७.४५ कोटी, खाजगी मत्स्य संवर्धकांनी आयात मत्स्यबीजाद्वारे १८.२२ कोटी मत्स्यबोटुकली उत्पादन तर तसेच बांध बंधारेद्वारे २.३० असे एकूण ३८.७५ कोटी मत्स्यबोटुकली सन २०१६-१७ मध्ये उत्पादित करुन जलाशयात संचयन करण्यात आले आहे. मत्स्यबोटुकलीची गरज भागविण्याकरीता राज्यास ११४ मिनी हॅचरी ५३ पोर्टेबल ह्चरी, २८ बांध बंधारेची आवश्यकता आहे. मिशन फिंगरलिंग अंतर्गत सन २०१७-१८ करीता १८ मिनी हॅचरीची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, सदर १८ मिनी हॅचरीचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही. सदर १८ हॅचरीमधून ९ कोटी मत्स्यबोटुकली उत्पादन अपेक्षित आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY) अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये ३६ पोर्टेबल हॅचरीची स्थापना करण्यात येणार आहे. सदर ३६ पोर्टेबल हॅचरीमधून ५.४० कोटी मत्स्यबोटुकली अपेक्षित.

राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY) अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये काटेपूर्णा जि.अकोला, नागठाणा जि. भंडारा, इटियाडोह जि. गोंदिया, कोराडी जि.बुलढाणा या चार केंद्राच्या नुतनीकरणासाठी ६.२५ लक्षांचा निधी मंजुर करण्यात आला आहे.त्यामुळे देखील मत्स्यबीज उत्पादन निश्चित वाढ होईल.तसेच केंद्र शासनाच्या निलक्रांती योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना या योजनेअंतर्गत नवीन हॅचरीज स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या नवीन हॅचरीज मधूनही मत्स्यबोटुकलीचे उत्पादन वाढविण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

तसेच राज्यामध्ये ६ ठिकाणी ब्रुड बँक स्थापन करण्याकरीता RKVY योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मान्यता प्राप्त झाली असून त्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु आहे.

यवतमाळ जिल्हयातील अरुणावती व बेंबळा ही २ नवीन मत्स्यबीज केंद्रे बांधून पूर्ण झाली असून अरुणावती केंद्रासाठी रु.३६६.६५ लक्ष तर बेंबळा केंद्रासाठी रु.५००.०० लक्ष एवढा खर्च झालेला आहे.सदरची दोनही केंद्रे शासन धोरणानूसार भाडेपट्टीने देण्याची कार्यवाही सुरू आहे. आजमितीस सदर दोन मत्स्यबीज केंद्रे सुरु नसून चालू वर्षी मत्स्यबीज उत्पादन करण्यात आले नाही.

मत्स्यबीज केंद्रांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा / बळकटीकरण करण्यासाठी RKVY योजनेअंतर्गत निधी प्राप्त करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. यानुसार राज्यात जास्तीत जास्त मत्स्यबीज उत्पादन घेण्याकरीता प्रयत्न सुरु आहेत.

सन २०१७-१८ मध्ये मत्स्यबोटुकली उत्पादन शासकीय मत्स्यबीज केंद्रात (भाडेतत्वावर दिलेल्या मत्स्यबीज केंद्रासह) १०.४७ कोटी, खाजगी मत्स्यबीज केंद्रात १.०९ कोटी व बांध बंधारेद्वारे ३.३५ कोटी मिळून एकूण १४.९१ कोटी मत्स्यबोटूकली उत्पादन घेण्यात आले आहे.

(१) तलाव ठेका धोरण : दि. ३०.०६.२०१७ रोजी शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेला आहे.

(२) राज्यामध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय वाढ करण्याकरीता पिंजरा मत्स्यसंवर्धन करण्याच्या धोरणास दि.१७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.या धोरणाअंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाने प्रसिध्दी देवून इच्छुक प्रकल्प धारकांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्याप्रमाणे आजमितीपर्यंत ५९ बॅटरीज मंजूर करण्यात आल्या आहेत. यामध्ये एका बॅटरीत ४८ पिंजरे याप्रमाणे २८३२ पिंजरे उभारण्यास विभागाने मंजूरी दिली आहे.तसेच दि. १७/१०/२०१६ शासन निर्णयान्वये महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत १७१ बॅटरीज मंजूर करण्यात आल्या असून त्यापासून ८२०८ पिंजरे उभारण्यात येणार आहेत.

(३) डॉ.सोमवंशी शिफारसीनुसार पर्ससीन मासेमारीवर प्रतिबंध करण्यासाठी दि.०५.०२.२०१६अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे. शाश्वत मत्स्यउत्पादन, मत्स्यबीज जाळ्यातन अडकता बीजांची नैसर्गिकरीत्या वाढ होऊन प्रजननक्षम माशांची वाढ व मासळी साठ्यांचे जतन यादष्टीने ट्रॉल जाळ्यांच्या कॉडेएन्डच्या आसाचा व्यास ४० मीमी नियंत्रित करण्याच्या दष्टीने १०.०१.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आली आहे.

(४) मत्स्यबोटुकलीची गरज भागविण्याकरीता राज्यास ११४ मिनी हॅचरी ५३ पोर्टेबल ह्चरी, २८ बांध बंधारेची आवश्यकता आहे. मिशन फिंगरलिंग अंतर्गत सन २०१७-१८ करीता १८ मिनी हॅचरीची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. सदर १८ हॅचरीमधून ९ कोटी मत्स्यबोटुकली उत्पादन अपेक्षित आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY)अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये ३६ पोर्टेबल हॅचरीची स्थापना करण्यात येणार आहेत. सदर ३६ पोर्टेबल हॅचरीमधून ५.४० कोटी मत्स्यबोटुकली अपेक्षित.राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY)अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये काटेपूर्णा जि.अकोला ,नागठाणा जि. भंडारा, इटियाडोह जि. गोंदिया, कोराडी जि.बुलढाणा या चार केंद्राच्या नुतनीकरणासाठी ६.२५ लक्षांचा निधी मंजुर करण्यात आला आहे.त्यामुळे देखील मत्स्यबीज उत्पादन निश्चित वाढ होईल.तसेच केंद्र शासनाच्या निलक्रांती योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना या योजनेअंतर्गत नवीन हॅचरीज स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या नवीन हॅचरीज मधूनही मत्स्यबोटुकलीचे उत्पादन वाढविण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(५) मच्छिमारांना ०५ बर्फ कारखाने व ०७ शितगृहे निर्माण करण्यात आलेली आहेत. तसेच मासळी उतरविण्यासाठी १७३ ठिकाणी कायमस्वरुपी व अराखीव स्वरुपात १४३ इतक्या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत.

परिच्छेद क्र.२.२.९ केंद्र व राज्य योजनांची अंमलबजावणी

राज्यात मच्छिमारांकडून वैयक्तिकरित्या किंवा FCS द्वारे मासेमारी केली जाते. आणि वेगवेगळ्या केंद्र तसेच राज्य पुरस्कत योजनांची अंमलबजावणी करुन विभाग मच्छीमार / FCS ना अर्थसहाय देते.जे परिशिष्ट २.२ मध्ये दर्शविले आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.१ :जलसाठयातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंशतः अंमलबजावणी

लहान जलसाठयातून प्रती हेक्टर प्रती वर्ष ५०० कि.ग्रॅम मध्यम जलसाठयातून प्रती हेक्टर प्रती वर्ष २०० कि.ग्रॅम आणि मोठया जलसाठयांतून प्रती हेक्टर प्रती वर्ष १००-१५० कि.ग्रॅम इतक्या प्रमाणात सरासरी उत्पादन क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने जलसाठयातील मत्स्य बोटुकलीचा कायमस्वरुपी साठा करण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाकडून (NFDB) २१ अर्थसहाय्याने 'जलसाठयातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रम'राबविण्याचा विभागाने निर्णय घेतला (मार्च २००९) जलसाठयांची निवड करणे आणि आणि लाभधारकांना (FCS) ते भाडेपट्टयावर देणे, साठवणं व फलन संनियंत्रण ठेवणे व त्यांचे मूल्यमापन करणे, लाभधारकांना तांत्रिक मदत पुरविणे आणि लाभधारकांना वेळोवेळी क्षमा बांधणी करणे इत्यादीची जबाबदारी विभागावर होती. भाडेपट्टयावर दिलेल्या जलसाठयात मत्स्यबोटुकलीचा साठा करण्यासाठी लाभधारकांना प्रत्येक मत्स्यबोटुकली मागे एक रुपया इतके अर्थसहाय्य NFDB कडुन दिले जाणार होते. २०१०-११ पासून कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

आयुक्तांच्या कार्यालयाच्या लेखापरिक्षा तपासणीत असे आढळून आले की, २०११-१२ व २०१४-१५ दरम्यान कार्यक्रम राबविला गेला नव्हता.

ज्याची कोणतीही कारणे दस्तऐवजात उपलब्ध नव्हती/नोंदली नव्हती. उर्वरीत तीन वर्षात (२०१०-११, २०१२-१३ आणि २०१३-१४) ९४ जलसाठयांमध्ये मत्स्यबोटुकलीचा साठा करण्यासाठी NFDB ने मान्यता दिली आणि विभागाला रु.३.८६ कोटीचा निधी मुक्त केला. मत्स्यबोटुकलीच्या उत्पादनासाठी आवश्यक बीजे उपलब्ध नसणे, न्यायालयीन प्रकरण, जलसाठे वन क्षेत्रात तसेच MIDC २२ क्षेत्रात असणे, जलसाठयात पाण्याचा तुटवडा (आठ प्रकरणे), विद्यमान जलसाठयांचा भाडेपट्टा कालावधी पूर्ण न झाल्याने या कार्यक्रमासाठी त्यांचा वापर केला न जाणे (१० प्रकरणे) या कारणांमुळे ९४ जलसाठयांपैकी २८ जलसाठयामध्ये (३० टक्के) मत्स्यबोटुकलीचा साठा करतायेऊ शकला नव्हता. त्याचप्रमाणे उर्वरीत १० जलसाठयांमध्ये कार्यक्रम न राबविण्याची कारणे दस्तऐवजांवरुन पडताळता येऊ शकत नव्हती. परिणामी, जुलै २०१३ ते ऑक्टोंबर २०१५ दरम्यान विभागाने NFDB ला रु.९२.१४ लक्ष प्रत्यार्पित केले. ज्या ६६ जलसाठयांमध्ये कार्यक्रम राबविला गेला तेथील संबंधित ACF नी आयुक्तांना कार्यक्रम राबविण्यापूर्वी व राबविल्यानंतर झालेले उत्पादन दर्शविणारे त्रैमासिक प्रगती अहवाल सादर केले नव्हते किंवा आयुक्तांनी अशा अहवालांची मागणीही केली नव्हती. अशा प्रकारे, कार्यक्रमाच्या यश अथवा अपयशांचे मुल्यमापन करता येऊ शकले नाही.

शासनाने सांगितले की, २०११-१२ व २०१४-१५ दरम्यान मराठवाडा आणि विदर्भात अनियमित पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे मत्स्यबोटुकलीचा साठा होऊ शकला नव्हता, परिणामी NFDB ला निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) य विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मत्स्य व्यवसाय करिता जलाशय विकास कार्यक्रम

मत्स्यव्यवसाय करिता जलाशय विकास कार्यक्रम ही योजना मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून राबविण्यात येते. राज्यातील जलाशय लाभार्थ्यांना ठेक्याने देण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडून कार्यवाही केली जाते. जलाशयामध्ये शाश्वत मत्स्यबोटुकलीचे संचयन व्हावे व सरासरी उत्पादन वाढावे या दृष्टीने सदरची योजनेसाठी राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद यांचेकडुन अर्थसहाय्य अनुदानित केले जाते.

राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद यांचेकडून मत्स्यबोटुकलीचे संचयन करण्यासाठी रु.१ प्रति मस्यबोटुकली या दराने संस्थेस/लाभार्थ्यास अर्थसहाय्य केले जाते. मत्स्यव्यवसाय करिता जलाशय विकास कार्यक्रम ही योजना मार्च २००९ मध्ये कार्यान्वित झाली. परंतु प्रत्यक्षात योजनेची सुरवात २०१०-२०११ ला झाली. २०१०-११, २०१२-१३, २०१३-१४ यावर्षात सदर योजना ९४ जलाशयामध्ये राबविण्यात आलेली आहे. सन २०११-१२, २०१४-१५ यावर्षात मत्स्यबीज कमतरता व तलावातील कमी पाण्यासाठया अभावी योजना राबविण्यात आलेली नाही. मराठवाडा व विदर्भ विभागात अनियमित पर्जन्यमान असल्यामुळे सदरची योजना राबविण्यात आलेली नाही. म्हणुन सन २०११-१२ ते २०१३-१४ या वर्षात अनुक्रमे प्रथम वर्षी अवर्षण व पुढील वर्षी अतिवृष्टी यामुळे सन २०११-१२ ते २०१४-१५ मत्स्यबोटुकलीचे संचयन झालेले नाही व त्यासाठी प्राप्त झालेला निधी राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद यांना परत करण्यात आला आहे.

तसेच सदरची योजना महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडूनही राबविली जाते. त्यामुळे लाभार्थी दोन विभागांकडून सदर योजनेचा लाभ घेत असल्याने, आढळून आल्याने, व यामध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने तसेच काही लाभार्थी त्यांच्या कडील एक किंवा दोन वर्ष शिल्लक असतांना सदरच्या योजनेचा लाभ घेवून पुढील तलाव ठेका मुदतवाढीचा लाभही घेतात. त्यामुळे त्यांच्या तलावाची ठेका मुदत संपल्यानंतरही सदर योजना राबविल्यामुळे मदुतवाढ द्यावी लागते. या सर्व कारणास्तव सदरची योजना सन २०१५-१६ पासून या विभागाकडून राबविण्यात आलेली नाही.

परिच्छेद क्र.२.२.९.२ बंदिस्त जलाशयात मत्स्यशेती करण्यासाठीच्या राज्य योजनेचे निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यातील तूट.

नव्याने बांधलेल्या तलाव/ जलसाठयां मध्ये जलद गतीने मत्स्य बीजांचा साठा करुन राज्यातील एकंदर भूजलाशयीन मत्स्योत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने पाच वर्षासाठी बंदिस्त जलाशयातील मत्स्यशेती ही योजना आखली (सप्टेंबर २०१०). विभागाकडून चालविल्या जाणा-या मत्स्यबीज केंद्रातून मत्स्यबीजे प्राप्त करावयाची होती. पाच वर्षापैकी पहिल्या दोन वर्षी मत्स्यबीजांचा संपूर्ण साठा करण्याची जबाबदारी विभागाची होती आणि त्यानंतरच्या वर्षात साठा ७०,५० व २५ टक्क्यापर्यंत कमी करावयाचा होता. उर्वरीत साठा (२५, ५० व ७५ टक्के) FCS ने करावयाचा होता ज्यांना तलाव/ जलाशय भाडेतत्वावर देण्यात आले होते. FCS चा सहभाग टप्याटप्याने वाढविणे ही यामागील संकल्पना होती/उद्देश होता.

या योजनेअंतर्गत RDC नाशिक २४ व अमरावती २५ येथे मत्स्यबीजांच्या साठयाच्या लक्ष्याची पूर्तता आणि तूट यांची आयुक्तांनी सादर केलेली स्थिती तक्ता २.२.५ मध्ये दर्शविली आहे.

क्षेत्र	भाडेपट्टीने दिलेले तलाव/ जलाशय संख्या	मत्स्यबीज साठयाचे लक्ष्य	साध्य	तूट	तुटीची टक्केवारी
नाशिक	५६	१२०.७२	१००.२८	२०.४४	१६.७३
अमरावती	४४	८५.३०	४६.४८	३८.८२	४५.५०
एकूण	**१००**	**२०६.०२**	**१४६.७६**	**५९.२६**	**२८.७६**
स्त्रोत : मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांनी सादर केलेली माहिती					

तक्ता २.२.५ वरून दिसून येते कि, २०११-१६ दरम्यान १०० तलाव/जलाशयात साठा करावयाच्या निर्धारीत २०६.०२ लक्ष मत्स्य बीजांच्या लक्ष्याच्या तुलनेत प्रत्यक्ष साठा १४६.७६ लक्ष होता, म्हणजेच २९ टक्के तूट होती. RDC नाशिक मध्ये योजनेच्या पहिल्या वर्षात ५६ पैकी आठ तलावांमध्ये विभागाने मत्स्यबीजांचा कोणताही साठा केला नव्हता. आयुक्तांकडे RDC, औरंगाबाद, लातूर, नागपूर, आणि पुणे यांच्याकडून मत्स्यबीजांच्या साठयाकरीता निर्धारीत केलेल्या लक्ष्याची पूर्तता व असल्यास तूट यांची स्थितीदर्शक माहिती उपलब्ध नसल्याने, या चार RDC मध्ये योजनेची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व प्रभावीपणे झाली असल्याची खात्री लेखापरीक्षकांना करता आली नाही. २०११-१५ दरम्यान विभागाने योजनेवर रु.१.५७ कोटी खर्च केला.

RDC नाशिक व अमरावती कडून लक्ष्याची पूर्तता करण्यात आलेल्या तुटी विषयी राज्य शासनाने कोणतेही विशिष्ट उत्तर सादर केले नाही. अंतिम बैठकीत (ऑक्टोबर २०१६) विभागाकडून चालविल्या जाणा-या मत्स्यबीज केंद्रातील अपर्याप्त मत्स्यबीज उत्पादन या तुटीसाठी जबाबदार असल्याचे प्रधान सचिवांनी सांगितले.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

बंदिस्त जलाशयात (नवीन निर्माण झालेल्या तलावात) मत्स्यबीज व झिंगाबीज संचयन करण्याच्या योजनेस शासन निर्णय दि.१८/०९/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये नव्याने निर्माण झालेल्या तलावामध्ये पहिल्या ५ वर्षामध्ये १००% , १००%, ७५%, ५०%, २५% असे मत्स्यबीज संचयन विभागामार्फत करणे अपेक्षित आहे. सन २०११-१६ या दरम्यान प्रादेशिक विभाग नाशिक व अमरावती यांचेकडून एकूण २९% तूट आल्याचे आर्थिक क्षेत्र अहवालात नमुद केले आहे. सदरच्या योजनेअंतर्गत साठवणूक करावयाचे मत्स्यबीज हे शासकीय मत्स्यबीज केंद्रातून शासकीय दराने खरेदी करून केले जाते. नाशिक व अमरावती विभागात एकूण७ मत्स्यबीज केंद्रे असून ५ संवर्धन केंद्रे आहेत. या केंद्रामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, पाणीपुरवठयाच्या सोयी व सुविधांचा अभाव योग्य वेळी निधीचा अभाव , मनुष्यबळाची कमतरता इ.बाबींमुळे मत्स्यबीज केंद्रांचा पुरेपूर वापर करून क्षमतेप्रमाणे मत्स्यबीज उत्पादन करणे शक्य झाले नाही. तसेच या कालावधीमध्ये नाशिक व अमरावती विभागात कमी पर्जन्यवृष्टी झाल्याने त्याचाही प्रतिकूल परिणाम मत्स्यबीज निर्मितीवर झाला आहे.

शासकीय मत्स्यबीज केंद्रामध्ये कर्मचा-यांची कमतरता, अपुरा पाऊस, मोडकळीस आलेली उबवणी केंद्रे व योग्य संख्येचे मत्स्य प्रजनक उपलब्ध न झाल्याने पुरेशा प्रमाणात मत्स्यबीज उत्पादन झाले नाही. त्यामुळे सदरहु योजनेमध्ये २९% तूट दिसून येत आहे. राज्यातील मत्स्यबीज केंद्रांची दुरुस्ती व बळकटीकरणव मत्स्य प्रजनक साठा केंद्र स्थापन करणे चा कार्यक्रम विभागाने हाती घेतला आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.३ मत्स्य बीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी केंद्रीय अर्थसहायचा वापर न करणे.

विभागाच्या नियंत्रणाखालील १५ मत्स्य बीज केंद्रामध्ये मत्स्य बीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण या केंद्रीय योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने RKVY (एक १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) अंतर्गत रु.८.०६ कोटी मंजूर केले. (जुलै २०१०)

केंद्र शासनाने या पाच केंद्रासाठी मुक्त केलेल्या रु.३.५५ कोटी निधीचा वापर करुन विभागाने २०१३-१४ दरम्यान या पाच मत्स्य बीज केंद्राचे बळकटीकरण /आधुनिकीकरण पूर्ण केले. परंतु, जिल्हयांच्या संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी आयुक्तांना योजनेची तपशीलवार अंदाजपत्रके सादर न केल्यामुळे उर्वरीत १० केंद्राच्या बळकटीकरण /आधुनिकीकरणाचे काम या योजनेखाली हाती घेण्यात आले नाही. १५ मत्स्य बीज केंद्राच्या बळकटीकरण /आधुनिकीकरणाची सर्व कामे जरी आयुक्तांनी मंजूर केली होती तरी, जिल्हा कार्यालयाकडून योजनेची तपशीलवार अंदाजपत्रके प्राप्त करण्यासाठी आयुक्तांनी देखील कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

आधुनिकीकरणानंतर पाचपैकी तीन मत्स्यबीज केंद्रातील प्रत्यक्ष वार्षिक उत्पादन १२ ते १११ टक्के इतक्या लक्षणीय प्रमाणात वाढले ही वस्तुस्थिती विचारात घेता विभागाने RKVY मंजूरी मिळालेल्या १० मत्स्य केंद्रातील उत्पादन वाढविण्याची संधी स्पष्टपणे गमावली.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्टीय कृषि विकास योजना (RKVY) ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या कामांना मंजूरी देण्याचे अंतिम अधिकार हे SLSC (State level sanctioning committee) यांचेकडे आहेत. सदरच्या समितीचे अध्यक्ष हे मा.मुख्य सचिव , महाराष्ट राज्य, मुंबई हे असतात. सन २०१०-११ मध्ये एकूण १५ मत्स्यबीज केंद्राच्या सुधारणा व बळकटीकरण या योजनेस दि.२८/०७/२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ५ केंद्रांसाठी प्राप्त झालेल्या रु.३.५५ कोटी निधीचा वापर करून केंद्राचे बळकटीकरण व आधुनिकीकरणाचे काम पूर्ण केले. उर्वरीत १० मत्स्यबीज केंद्रांची कामे पूर्ण करण्याकरीता त्यांची अंदाजपत्रके प्राप्त करून घेण्याकरीता आयुक्त स्तरावरुन जा.क्र.मत्स्य/भू/०२०९१५/८७/२०११, दि.१२/१०/२०१२ च्या पत्रान्वये संबंधित प्रादेशिक कार्यालयांना कळविण्यात आले होते. दि.१८/०७/२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या १५ मत्स्यबीज केंदांच्या सुधारणा व बळकटीकरण पैकी फक्त ५ मत्स्यबीज केंद्रांचे कामे पूर्ण करण्यात आले. ही बाब खरी आहे.

त्यानंतर राज्यातील मत्स्य उत्पादन केंद्र काही तांत्रिक अडचणी, अपुरा निधी व अप्रशिक्षित अपु-या कर्मचारी वृंदामुळे पूर्ण क्षमतेने या केंद्रातून मत्सयबीज उत्पादन घेणे शक्य झाले नसल्याने सदरची केंद्रे ठेक्याने देण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावरून सन २०१३-१४ मध्ये घेण्यात आला. त्याप्रमाणे कृषि व पदुम विभागाचे शासन निर्णय क्र. मत्स्यवि/२०१३-सं.क्र.३३४/प्र.क्र.९५/ पदुम-१३, दि.१८/०१/२०१४ च्या अन्वये राज्यातील १४ मत्स्यबीज केंद्रे कंत्राटी पध्दतीने भाडेपट्टीने देण्यास शासन मान्यता देण्यात आली. यामध्ये RKVY योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या करंजवण व मुक्ती या २ केंद्रांचा समावेश होता. तसेच १५ मत्स्यबीज केंद्रापैकी मुळानगर व चारगांव ही दोन मत्स्यबीज केंद्र महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली. त्यामुळे या केंद्राचे नुतनीकरण व बळकटीकरण करण्यात आलेनाही. उर्वरीत सीना (अहमदनगर), खोपोली (रायगड), वेण्णा (नागपूर), नागठाणा (भंडारा), अंभोरा (गोंदिया) आणि अंमलनारा (चंद्रपूर) या ६ मत्स्यबीज केंद्रांचे तपशिलवार

अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने सदरची कामे हाती घेण्यात आली नाहीत. राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत (RKVY) अंतर्गतसन २०१७-१८ मध्ये काटेपूर्णा जि.अकोला ,नागठाणा जि. भंडारा, इटियाडोह जि. गोंदिया, कोराडी जि. बुलढाणा या चार केंद्राच्या नुतनीकरणासाठी रु.६.२५ कोटींचा निधी मंजुर करण्यात आला आहे. त्यामुळे देखील मत्स्यबीज उत्पादन निश्चित वाढ होईल.

परिच्छेद क्र. २.२.९.४ कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणात विलंब

मत्स्य बीज केंद्राव्यतिरिक्त विभागाच्या नियंत्रणाखाली ठाणे जिल्हयात आसनगांव व बाडापोखरण येथे कोळंबी संवर्धन केंद्रे आणि रत्नागिरी येथे निमखा-या पाण्यातील एक कोळंबी बीज केंद्र आहे. तलावातील क्षारांचे प्रमाण आवश्यक मात्रेपेक्षा अधिक असल्याने दिर्घकाळापासून दोन कोळंबी संवर्धन केंद्रे कार्यरत नव्हती. म्हणूनच विभागाने ही दोन खाजगी संस्थाना भाडेपटटयावर देण्यासाठी विभागाने जाहिर केलेल्या निविदा सूचनेला कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता. रत्नागिरी येथील निमखारे पाण्यातील कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणासाठी आणि सुधारणेसाठी केंद्र शासनाने RKVY अंतर्गतरु. १.६६ कोटी मुक्त केले (जून २०११) सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) जुलै २०११ ते मार्च २०१२ दरम्यान ३७ घटकांचा समावेश असलेली सुधारणात्मक कामे पूर्ण करायची होती. आयुक्तांच्या कार्यालयातील दस्तऐवजांच्या छाननीत असे आढळून आले की, मे २०१२ पर्यत (PWD) ने ३७ पैकी २५ घटकांचे काम पूर्ण केले होते परंतू तलावातील गाळ पूर्णपणे काढलेला नसने, फिडींग कॅनलच्या (Feeding Canal) पृष्ठभागाची दुरुस्ती न होणे, तलावात आवश्यक उंचीपर्यंत पाणी साठवण्यातील असमर्थता, सांडवा/पाचराचे (sluice gates) प्रबलित सिमेंट कॉंक्रीटिकरण केलेले नसणे इत्यादी वेगवेगळया दोष/कमतरतांमूळे हे अर्धवट पूर्ण झालेले केंद्र ताब्यात घेण्यास ACF रत्नागिरी यांनी नकार दिला. फेब्रू. २०१३ पर्यंत (PWD) ने रु. १.५० कोटी खर्च केला आणि (PWD) ने ज्या कंत्राटदारास हे काम सोपविले होत त्याने नियमबाहयतेने काम केल्याच्या आरोपासाठी त्याच्याविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे सप्टेंबर २०१३ त्यानंतर काम थांबवण्यात आले. नोव्हें. २०१६ पर्यंत देखील काम अपूर्ण होते. अशाप्रकारे रु.१.५० कोटीचा खर्च होऊनही आणि चार वर्षापेक्षा अधिक काळ लोटूनही रत्नागिरी येथील कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नव्हते.

शासनाने वस्तूस्थिती मान्य केली.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निमखारे पाण्यातील आसनगाव कोळंबी बीज केंद्र जि. पालघर,व बाडापोखरण कोळंबी बीज उत्पादन केंद्र जि. पालघर दि. १८/१/२०१४ शासन निर्णयान्वये १५ वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार माहे फेब्रु. २०१७ मध्ये आसनगाव कोळंबी बीज संवर्धन केंद्र खाजगी ठेकेदारास १५ वर्षाकरीता ई-निविदा पध्दतीने ठेक्याने देण्यात आले आहे. बाडापोखरण कोळंबी बीज उत्पादन केंद्र जि. पालघर भाडेतत्वार देण्याकरीता विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

रत्नागिरी येथे निमखा-या पाण्यातील कोळंबी बीज उत्पादन केंद्राच्या बळकटीकरण व सुधारणासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गतरु.१.६६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता. माहे फेब्रू. २०१३ पर्यंत PWD ने रु.१.५० कोटी खर्च केला असून सदर निधी तलाव नुतनीकरण व sluicegate उभारणीसाठी खर्ची पडला आणि PWD ने ज्या कंत्राटदारास हे काम सोपविले होते त्याने नियमबाहयतेने काम केल्याच्या आरोपासाठी त्याच्या विरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे माहे सप्टेंबर २०१३ त्यानंतर काम थांबवण्यात आले. माहे नोव्हें. २०१६ पर्यंत देखील काम अपूर्ण होते. अशाप्रकारे रु.१.५० कोटीचा खर्च होऊनही आणि चार वर्षापेक्षा अधिक काळ लोटूनही रत्नागिरी येथील कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही हे खरे आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.५ मच्छिमार नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी वित्तीय सहाय्याचे अपर्याप्त वितरण.

महाराष्ट्र राज्याला ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा सागरी जिल्हयांलगत ७२० कि.मी. इतका विस्तीर्ण किनारा लाभला आहे जेथे १७३ मासे उतरविण्याची केंद्र आहेत. मार्च २०१६ रोजी २४,३४० सागरी मच्छीमार नौका कार्यरत होत्या ज्यापैकी ७,९७६ हस्तचलित व १६,३६४ यंत्रचलित होत्या. यंत्रचलित नौका समुद्रात खोलवर जाऊ शकतात त्यामुळे मासेमारीची संभाव्यता वाढते.

मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण ' या योजनेखाली मासेमारीस दुर्बल गटातील कार्यक्रम असल्याचे गृहीत धरुन NCDC कडून FCS ला शिथिल अटींवर अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेखालील अर्थसहाय्य राज्य शासन, NCDC आणि लाभार्थी यांना १०:८०:१० या प्रमाणात विभागून द्यावयाचे होते. योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे आधी राज्य शासनाने निधी मुक्त करावयाचा होता. योजनेच्या अर्थसहाय्याच्या आकृतीबंधानुसार प्रारंभी लाभार्थ्यांना नौकांची बांधणी करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के रक्कम मुक्त करायची होती, त्यानंतर नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी इंजिन, यारी (winch)जीवरक्षक साधन इत्यादींच्या खरेदीसाठी ५५ टक्के मुक्त करायचे होते.

२०११-१६ दरम्यान विभागाने ४२२ नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी (एकूण प्रकल्प खर्चः १० टक्के लाभार्थी अंशदानासह रु. २३०.७५ कोटी), रु. २०७.९१ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले आणि सप्टेंबर २०१६ पर्यत रु. ६५.५२ कोटी वितरीत केले.

आयुक्तांच्या कार्यालयात केलेल्या अर्थसहाय्य वितरणाच्या सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या विवरणपत्रांच्या छाननीत असे आढळून आले की, २०११-१६ दरम्यान लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या रु. ८०.८२ कोटी (रु. २३०.७५ कोटीच्या ३५ टक्के) अर्थसहाय्यापैकी विभागाने फक्त रु. ३९.८८ कोटी वितरीत केले आणि उर्वरीत रु. ४०.९४ कोटीचे वितरण केले गेले नव्हते. (सप्टेंबर २०१६). तसेच, एकूण रु. १२७.०९ कोटी उर्वरित रु. ४०.९४ कोटीचे वितरण केले गेले नव्हते (सप्टेंबर २०१६). तसेच, एकूण रु. १२७.०९ कोटी अर्थसहाय्यापैकी (रु. २३०.७५ कोटीच्या ५५ टक्के) विभागाने फक्त रु. २५.६४ कोटी वितरीत केले, अशाप्रकारे रु. १०१.४५ कोटी शिल्लक राहिले जे वितरीत करण्यात आले नव्हते (सप्टेंबर २०१६)

लेखापरक्षकांना पुढे असे आढळून आले की, विभागाने २०११-१४ दरम्यान ४२२ पैकी २७८ नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी प्रकल्प खर्चाच्या (रु. १४७.९४ कोटी) ३५ टक्के एवढे म्हणजे रु. ५१.७७ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले. परंतु रु. ५१.७७ कोटींपैकी सप्टेंबर २०१६ पर्यत विभागाने एक ते चार वर्षांपर्यंतच्या विलंबाने लाभार्थ्यांना रु. ३७.६० कोटी (७३ टक्के) मुक्त केले.

नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत न करणे/ विलंबाने वितरीत करणे याचा परिणाम फक्त दुर्बल गटातील मच्छीमारांवरच नाही तर सागरी मत्स्य उत्पादनावर देखील झाला जे २०११-१६ दरम्यान ४.४९ लक्ष टनाचा पल्ला ओलांडू शकले नव्हते.

अंतिम बैठकीत, प्रधान सचिवांनी विषद केले की, वित्त विभाग मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियत व्ययात कपात करत होता ज्यामूळे नियतव्यय आणि प्रत्यक्ष प्राप्ती यांत तफावती होत्या.

निधी कमी प्रमाणात प्राप्त होऊनही मत्स्यव्यवसाय विभागास NCDC अंतर्गत ' मच्छीमार नौकांचे यांत्रिकीकरण ' या योजनेत २०११-१६ दरम्यान रु. ३०.४४ कोटीची बचत झाली होती जिचा अधिक चांगल्या रितीने वापर करता येऊ शकला असता, ही वस्तुस्थिती कायम राहते.

शिफारसी ४ : केंद्र व राज्य योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व कार्यक्षमतेने होत असल्याची शासनाने सुनिश्चती करावी. जेणेकरुन मत्स्यउत्पादन वाढ आणि मच्छिमारांची आर्थिक सबलीकरण ही दुहेरी उद्दीष्टे साध्य करता येतील. नेमके पणाने योजनेसाठी योग्य जागेची निवड केली जाईल आणि निधीचे वितरण वेळच्या वेळी केले जाईल यांची शासनाने सुनिश्चती करावी.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सद्यस्थितीत विभागाकडे एकूण ४१२ नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर प्रकल्पांची एकूण किंमत रु. २२६.०६ कोटी इतकी आहे. आणि या प्रकल्प किंमतीच्या १०टक्के रक्कम रु. २२.४३ कोटी इतकी येत असून अक्षेपामध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरची १० टक्के रक्कम लाभार्थी अंशदानासह रु. २३०.७५ कोटी इतकी होत नाही.

सन २०११-१६ दरम्यान रु. १६३.७१ कोटी (२५ टक्के रक्कम रु. ५१.८०कोटीअ ५५ टक्के रु. १११.९१ कोटी) इतका एकूण अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. तसेच रु. १६३.७१ कोटी इतका निधी प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे.

सदर रक्कमेमध्ये स्थानिक जिल्हा नियोजन मंडळामार्फत वितरीत होणारी १० टक्के रक्कम रु. २२.४३ कोटी समाविष्ट नाही. सदरची रक्कम समाविष्ट केल्यास सन २०११-१६ चे एकूण वितरण रु. १८६.१४ कोटी इतकी होईल. सबब या प्रकल्पावरील ३५ टक्के रक्कम रु. ७४.२३ कोटी इतकी होते.

शासन स्तरावरुन प्रकल्प खर्चाच्या आवश्यकतेनुसार प्राप्त एकूण रु. १६३.७१ कोटी इतक्या रक्कमेचे वितरण विभागाच्या स्थरावरुन करण्यात आले असून सदर रक्कमेमध्ये स्थानिक जिल्हा नियोजन मंडळामार्फत वितरीत होणारी १० टक्के रक्कम रु. २२.४३कोटी समाविष्ट नाही.

बी.डी.एस. प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीपैकी कोणतीही रक्कम विभागाने समर्पित (Surrender) केलेली नाही.

सन २०११-१४ दरम्यान विभागाने एकूण ४१२ प्रकल्पांना मान्यता प्राप्त झाल्यानुसार त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के रक्कम रु. ५१.०६ कोटी इतकी रक्कम वितरीत केली आहे.

सन २०११-१६ दरम्यान प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के रक्कम रु. ७४.२३ कोटी इतकी वितरीत केली आहे. म्हणजेच रु.२३.१७ कोटी रक्कम सन २०१५-१७ या कालावधीत शासन स्तरावरुन प्रत्यक्ष वितरीत झाल्यानंतर विभागाने वितरीत केले आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेणे क्रमप्राप्त असल्याने सदर प्रकल्पांची पूर्ण रक्कम एकाच हप्त्यात वितरीत करणे विभागास शक्य झालेले नाही.

सोबत शासनस्तरावरुन प्राप्त झालेल्या निधीचा वर्षनिहाय तपशिल सोबत जोडले आहे.

गेल्या ०५ वर्षांचे सरासरी मत्स्योत्पादन पहाता सरासरी मत्स्योत्पादनात मोठया प्रमाणात तफावत असल्याचे आढळून येत नाही. सोबत मत्स्योत्पादनाची अधिकृत आकडेवारी तपशिल- ४ जोडला आहे

वित्त विभागाकडून राज्याची आर्थिक स्थिती विचारांत घेऊन मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियत व्ययात कपात केली जाते.

प्रत्यक्ष अर्थसंकल्पीत तरतूद रक्कम रु. १९४.२८ कोटीच्या ऐवजी विभागास प्रत्यक्ष बीडीएस संगणक प्रणालीवर रु. १६३.७१ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली. उपलब्ध बीडीएस प्रमाणे पूर्ण खर्च झाला आहे, त्यामुळे बचत निरंक.

केंद्र व राज्य योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व कार्यक्षमतेने होण्यासाठी दरमहा सचिव स्तरावर बैठकींचे आयोजन करण्यात येवुन योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येतो. योजनांच्या अंमलबजावणीतील व निधी वितरणातील अडचणी असल्यास त्वरित निवारण करण्यात येऊन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे. परिणाम स्वरुप मत्स्य उत्पादनांत सन २०१५-१६ मध्ये असलेली २२.७१ टक्के तुट कमी होऊन ती ११.०६ टक्के पर्यंत कमी करण्यात विभागास यश आलेले आहे. मच्छिमारांना विमा योजना , घरकुल योजना, डिझेल अनुदान, जाळयांच्या पुरवठा, कर्ज पुरवठा, तसेच केंद्र शासनाच्या निळक्रांती योजनेतंर्गत विविध व्यकतीगत लाभांच्या योजना राबविण्यात येऊन मच्छिमारांची आर्थिक सबलीकरण करण्यात येत आहे. योजनांच्या जागेची निवड करण्यासाठी प्रथम सर्वेक्षण करण्यात येते या सर्वेक्षणानुसार तांत्रिकदष्टया योग्य असलेल्या जागेची निवड योजनासाठी करण्याची दक्षता घेतली जात आहे. तसेच योजनांवरील निधी वितरण वेळच्या वेळी केली जाईल याबाबत सुध्दा शासनस्तरावरुन दक्षता घेण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. २.२.१० सागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधांचा विकास

सागरी मत्स्य संपत्ती योग्य प्रकारे उतरवणे, तिची प्रक्रिया आणि विक्री करण्यासाठी बंदरे आणि जेट्टी, बर्फ कारखाने, शीतगृहे इत्यादींसारख्या पायाभूत सुविधांचा विकास करणे हे विभागाचे महत्त्वाचे उद्दीष्ट आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.१ मच्छिमार बंदरे विकसित न करणे

२००२-०३ मध्ये लागू झालेल्या सागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे यासाठीच्या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत केंद्र शासनाने एकुण रु.१६५.४७ कोटी खर्चात आनंदवाडी, सिंधुदुर्ग (फेब्रुवारी २००८), करंजा रायगड (मार्च २०११) आणि अर्नाळा ठाणे (मार्च २०११) येथे तीन मच्छिमार बंदरे बांधण्यास मंजुरी दिली. मंजुरी आदेशानुसार आनंदवाडी येथील मच्छिमार बंदर फेंब्रुवारी २०११ पर्यंत तर करंजा व अर्नाळा येथील बंदर मार्च २०१५ पर्यंत पुर्ण करायचे होते. प्रकल्पावरील

खर्च केंद्र व राज्य शासनाने ७५:२५ प्रमाणात विभागुन करायचा होता. अपवादर आवंदवाडी बंदराचा येथे तो समान विभागुन करायचा होता. आयुक्तांनी ही कामे बंदर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यावर सोपविली. आयुक्तांच्या कार्यालयातील प्रकल्प नस्तीचा तपासणीत असे आढळुन आले कीः

स्थानिक मच्छिमारांकडुन विरोध झाल्यामुळे एकूण १६०० मीटर लांबीपैकी ४२० मीटर बंधा-याचे काम पुर्ण झाल्यावर जुन २००८ पासुन आनंदवाडी प्रकल्पाचे काम बंद करण्यात आले होते. गावाच्या ५०० मीटर परिघात बंदर प्रकल्प राबविण्यात येऊ नये अशी मच्छिमारांची मागणी होती. तद्नुसार, सागरी अभियंता, सिंधुदुर्ग यांनी रु.९२.५० कोटी अंदाजित खर्चाचा सुधारीत प्रकल्प आराखडा सादर केला.

- (सप्टेंबर २०१३), ज्याला विभागाने सप्टेंबर २०१५ मध्ये मंजूरी दिली. नोव्हेंबर २०१६ पर्यंत सुधारीत खर्चास केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाली नव्हती. प्रकल्प पुर्ण करण्यसाठी निर्धारीत केलेल्या तारखेपेक्षा प्रकल्पास आधीच ६९ महिन्यांचा विलंब झाला आहे. (मार्च २०११ ते नोव्हेंबर २०१६) प्रकल्पावर रु.५.१७ कोटीचा खर्च झाला आहे.

- मार्च २०१३ पर्यंत रु. ९.५५ कोटी खर्च झाल्यावर १. बंदर प्रकल्पामुळे बोटींच्या पाडावाच्या सध्याच्या तळाला बाधा येण्याची शक्यता असल्याने बोटींच्या पाडावासाठी तळ स्थानक बांधण्याची मागणी करण्या-या स्थानिक मच्छीमांराकडुन होणा-या विरोध आणि२. प्रकल्पस्थळावर उत्खननादरम्यान कठीन खडक आढळूण येणे या कारणामुळे करंजा प्रकल्पाचे (मंजूर खर्च : ६८.०२ कोटी) काम बंद करण्यात आले. परिणामी प्रकल्प खर्च रु.१५९.५३ कोटी पर्यंत वाढला (जुलै २०१४) राज्य शासनाने सागितले की रु.१५३.९६ कोटी खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आणी त्यासाठी केंद्र शासनाची मंजुरी प्रतिक्षित आहे (नोव्हेबर २०१६) प्रकल्प पुर्ततेसाठी निर्धारित केलेल्या तारखेपासून प्रकल्प कार्यान्वयनात २० महीन्यांत (एप्रिल २०१५ ते नोव्हेंबर २०१६) विलंब झाला.

- स्थानिक मच्छिमार व ग्राम पंचायतीने खुद्द बंदरांच्या बाधंकामासच हरकत घेतल्याने अर्नाळा बंदर प्रकल्प (मंजुर खर्च : रु.६१.५६ कोटी) नोव्हेंबर २०१६ पर्यंत सुरु होऊ शकला नव्हता. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेला निधी रु.३.०० कोटी परत करण्यात आला. (नोव्हेंबर २०१६)

स्थानिक मच्छिमार जे या योजनेचे मूख्य लाभार्थी होते त्यांच्याकडुन विरोध झाल्यामुळे या तीनही मच्छिमार बंदर प्रकल्पांचे दिर्घकाळ बांधकाम लांबले हि वस्तुस्थिती विभागामध्ये योग्य सल्लामसलत कार्यतंत्राचा अभाव असल्याचे निदर्शक आले ज्यामुळे या प्रकल्पांच्या कार्यान्वयनात वेळ व खर्च यांचा लक्षणीय अपव्यय झाला.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

२००२-०३ मध्ये लागू झालेल्या सागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे यासाठीच्या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत केंद्र शासनाने एकुण रु.१६५.४७ कोटी खर्चात आनंदवाडी, सिंधुदुर्ग (फेब्रुवारी २००८), करंजा रायगड (मार्च २०११) आणि अर्नाळा ठाणे (मार्च २०११) येथे तीन मच्छिमार बंदरे बांधण्यास मंजुरी दिली. मंजुरी आदेशानुसार आनंदवाडी येथील मच्छिमार बंदर फेंब्रुवारी २०११ पर्यंत तर करंजा व अर्नाळा येथील बंदर मार्च २०१५ पर्यंत पुर्ण करायचे होते. प्रकल्पावरील खर्च केंद्र व राज्य शासनाने ७५:२५ प्रमाणात विभागून करायचा होता. सदरची कामे ही किनारी अभियंता, मुंबई यांच्या मार्फत करण्यात येणार होती.

आनंदवाडी येथील मच्छिमार बंदाराचे कामास महाराष्ट्र शासन, कृषि, प्रशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे शासन निर्णय, क्रमांकमत्स्यवि -१००८/प्र.क्र.२७५/पदूम-१४, दि.२१.०९.२०१५ अन्वये रु.९२.५० कोटी राज्य हिस्सा ७५ टक्केप्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. परंतू त्याला सेंट्रल इन्स्टी ऑफ कोस्टव्ह इंजिनिअरिंग फॉर फीशरीज (सीआयसीइएफ) यांनी रु.८८.४४ कोटीची मान्यता दिली आहे. त्यापैकी केंद्र शासनाकडून या योजनेसाठी रु.२५.०० कोटी मिळणार आहेत. उर्वरित रु.६३.४४ कोटी रक्कम राज्य शासनाकडुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

करंजा येथे मच्छिमार बंदाराचे कामास महाराष्ट्र शासन, कृषि, प्रशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे शासन निर्णय, क्रमांक मत्स्यवि -१५१४/प्र.क्र.१७०/पदूम-१४, दि.०१.१२.२०१६ अन्वये रु.१५३.९६ कोटी इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता केंद्र हिस्सा प्राप्त होणेकरीता राज्य शासनामार्फत केंद्र शासनास दि.०३.०१.२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास अद्याप केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही.

अर्नाळा बंदराचे काम काही मच्छिमारांचा व ग्रामस्थांचा विरोध असल्याने तसेच अर्नाळा बंदरा विरोधात ग्रामसभेत ठराव झाला असल्याने अद्याप सुरू करता आलेले नाही. पत्तन अभियंता कार्यालयाने सरपंच अर्नाळा ग्रामपंचायत व ग्रामसेवक यांना दि.३०.१०.२०१२ रोजी पत्रान्वये जनमत तयार करण्याबाबत कळविले आहे. जेने करुन सदरचे काम लवकरात लवकर करणे शक्य होईल.

किनारी अभियंता यांचे पत्र क्र.किअ/का/२४८/अर्नाळा/१९१५, दि.०६.११.२०१२ अन्वये आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना नियोजित अर्नाळा बंदराबाबत स्थानिक समस्या निकाला काढण्यासाठी त्यांचे अधिपत्याखाली संबंधीत मत्स्यव्यवसाय अधिकारी स्थानिक मच्छिमांरासोबत पुनश्च चर्चा करून ग्राम सभेत पुन्हा विषय मांडून सकारात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यास कळविले आहे.

दि.२२.१०.२०१३ रोजी पत्तन अभियंता यांनी अर्नाळा सरपंच सौ. पाटील यांची भेट घेऊन सद्यस्थिती कथन केली व प्रकल्प सुरु करण्याबाबत स्थानिक जनतेचे मत वळविण्याची विनंती केली.

अर्नाळा बंदराबाबत निर्णय होणेसाठी दि. ५/०७/२०१४ रोजी प्रादेशिक उपआयुक्त (मत्स्यव्यवसाय) बांद्रा मुंबई यांच्या कार्यालयात कार्यकारी अभियंता, मत्स्यव्यवसाय मुंबई यांचे अध्यक्षतेखाली सह आयुक्त (सागरी) मत्स्यव्यवसाय मुंबई यांचे प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस अर्नाळा व अर्नाळा किल्ल्यामधील सहा मच्छिमार सहकारी संस्था यांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतू दोन मच्छिमार संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. व त्यांनी प्रस्तावित अर्नाळा बंदरास विरोध दर्शविला.

किनारी अभियंता यांचे पत्र जा.क्र.किअ/का-२/प्रशा/अर्नाळा/१६१६, दि.१९/११/२०१५ च्या पत्रान्वये मा.आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई यांना सदर काम पुन्हा सुरु करणेबाबत प्रयत्न करणेचे निर्देश देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच मा.अतिरिक्त मुख्य सचिव (सा.बां.) यांनी दि.२७/११/२०१५ रोजी सदर बंदराच्या कामास असलेला मच्छिमार व स्थानिक ग्रामस्थांचा विरोध मावळण्यासाठी मुख्य अभियंता, किनारी अभियंता यांनी प्रत्यक्ष कामाच्या जागेवर जाऊन शहानिशा करुन सदरचे काम त्वरित सुरु करण्याचे निर्देश दिले याप्रमाणे मा.आमदार श्री.हितेंद्र ठाकूर,वसई यांच्याबरोबर दि.२/१२/२०१५ रोजी अर्नाळा बंदराबाबत मुख्य अभियंता, किनारी अभियंता, सहाय्यक पत्तन अभियंता यांच्यासोबत काम सुरु करणेबाबत बैठक झाली. तदनंतर मा.आमदार श्री. हितेंद्र ठाकूर,वसई यांची किनारी अभियंता यांनी दि.६/१/२०१६ रोजी भेट घेऊन त्यात सदरील बंदराचे काम सुरु करण्यासाठी स्थानिक मत्स्यव्यवसाय सोसायटीच्या प्रतिनिधींसोबत पुनश्चः बैठक घेऊन त्यांचे विरोध मावळण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत विनंती केली. सद्यःस्थितीत अर्नाळा बंदराचे काम सुरु होण्याबाबत मुख्य अभियंता,विशेष प्रकल्प, सा.बां.विभाग, मुंबई , किनारीअभियंता, सा.बां.मंडळ,मुंबई या कार्यालयाकडून शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. गावक-यांचा विरोध मावळताच काम लगेचहाती घेण्यात येईल.

स्थानिक मच्छिमार जे या योजनेचे मुख्य लाभार्थी होते त्यांच्याकडुन विरोध झाल्यामुळे या तीनही मच्छिमार बंदर प्रकल्पांचे दिर्घकाळ बांधकाम लांबले ही वस्तुस्थिती खरी असुन सदरच्या बंदराचे काम वेळेवर सुरु करण्यासाठीवेळोवेळी स्थानिकांची बैठका घेऊन काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच कामे सुरु करण्याबाबत प्रयत्न केले आहेत.

परिच्छेद क्र. २.२.१०.२ जेट्टींच्या बांधकामातील विलंब -

राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य -

राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत १९ जेट्टींचे बांधकाम करण्यासाठी विभागाने मंजूरी दिली (एप्रिल २०११ व डिसेंबर २०११) केंद्र शासनाने २०११-१२ ते २०१३-१४ दरम्यान रु.५७.४२ कोटी मुक्त केले आणि एकुण रु.५७.३६ कोटी खर्चासाठीचे कार्यादेश ३० डिसेंबर २०११ ते नोव्हेंबर २०१२ दरम्यान दिले गेले. कार्यादेशानुसार मे २०१३ मे २०१४ दरम्यान जेट्टींचे काम पुर्ण करावयाचे होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बंदर अभियंत्यांनी आयुक्तांना सादर केलेल्या मासीक प्रगती अहवालांच्या छाननीत असे आढळुन आले की रु.४२.५१ कोटी खर्चात १९ जेट्टींपैकी ऑगष्ट २०१५ पर्यंत फक्त १० जेट्टींचे काम पुर्ण झाले होते. सात जेट्टींचे बांधकाम प्रगतीपथावर होते व जुलै २०१६ पर्यंत रु.१४.०४ कोटी खर्च झाला होता आणि उर्वरित कामे पुर्ण करण्यसाठी रु.१०.०२ कोटी इतक्या अतिरिक्त रक्कमेची आवश्यता होती. राज्य वन विभाग आणिमिठ आयुक्य यांच्याकडुन मंजूरी प्राप्त न झाल्यामुळे विभागाने उर्वरित देान जेट्टींना दिलेली मंजूरी रद्द केली.

नाबार्ड अंतर्गत अर्थसहाय्य -

तसेच विभागाने नाबार्ड (९५ टक्के) आणि राज्य शासन (५ टक्के) यांच्या अर्थसहाय्याने एकुण रु.११६.१५ कोटी खर्चात २० जेट्टीचे बांधकाम करण्यास मंजुरी दिली (मार्च २०११ व नोव्हेंबर २०११) मे २०१२ ते नोव्हेंबर २०१२ दरम्यान रु.६६.६७ कोटी खर्चात २० जेट्टींचे काम पुर्ण करण्याचे होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बंदर अभियंत्यांनी आयुक्तांना सादर केलेल्या मासिक प्रगती अहवालांच्या छाननीत असे आढळुन आले की २० जेट्टींपैकी नोव्हेंबर २०१५ पर्यंत रु४५.९४ कोटी खर्चात फक्त नऊ जेट्टींचे काम पुर्ण झाले होते. १० जेट्टीचे बांधकाम प्रगतीपथावर होते व जुलै २०१६ पर्यंत रु.१९.०७ कोटी खर्च आणि नाबार्ड अंतर्गत १०) १३ चे काम पुर्ण झालेले आहे आणि चार (रा.कृ. वि.यो. व नाबार्ड अंतर्गत प्रत्येकी दोन) जेट्टींचे काम प्रगतीपथावर होते.

रा. कृ. वि. यो. व नाबार्ड अंतर्गत प्रत्येकी दोन जेट्टींचे काम अनुक्रमे २९ महीने (जुन २०१४ ते नोव्हेंबर २०१६) आणि २४ महिन्यांचा (डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१६) कालावधी उलटुनही अद्याप पुर्ण झाले नव्हते ही वस्तुस्थिती कायम राहते. तसेच, राज्य शासनाने रा. क.वि.यो. व नाबार्ड अंतर्गत बांधकाम पुर्ण झालेल्या व काम प्रगतीपथावर असलेल्या जेट्टींवर झालेल्या खर्चाची माहीती सादर न केल्यामुळे लेखापरिक्षकांना बांधकाम पुर्ण झालेल्या/प्रगतीपथावर असलेल्या जेट्टींवर झालेल्या वाढीव खर्चाची परिगणना करता आली नाही.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ६९.९९४९ कोटीची १९ कामाना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरच्या कामापैकी १० कामे पुर्ण झालेली असुन उर्वरित ७ कामे भौतीकदृष्टा पुर्ण झालेली आहेत. उर्वरित २ कामेरद्द करण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे. सदरच्या कामांवर आजमितीस उपलब्ध करुन दिलेल्या रु.६२.९५ कोटीच्या तरतूदीपैकी रु.५७.७० कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे. सदरची सर्व कामे ही किनारी अभियंता, मुंबई यांचे मार्फत करण्यात आलेली आहेत. प्रस्तुत कामे ही मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

नाबार्ड टप्पा क्र.१६ अंतर्गत रक्कम रुपये १०२.०० कोटीची २० कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरच्या कामांपैकी १९ कामे पुर्ण झालेली आहेत. एक काम हे स्थानिकांच्या विरोधामुळे रद्द करण्यात आलेले आहे. सदरच्या कामावर आजमितीस रु.६८.४३ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदरच्या योजनेच्या कामामधील काही कामे जागाउपलब्ध नसल्यामुळे रद्द करण्यात आलेली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत कामे ही लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. त्यामूळे कामाच्या प्रशासकीय मान्यतेपेक्षा कमी खर्च झालेला आहेत.

नाबार्ड टप्पा क्र. २३ अंतर्गत एकुण १० कामासाठी रु. ५०.०० कोटी इतका निधी नाबार्डकडून मंजुर झालेला आहे.

तसेच प्रस्तुत कामासाठी विभागांस उपलब्ध नियतव्ययामधुन निधी उपलब्ध करुन द्यावयाचा असतो. विभागास नियतव्ययातून विभागांच्या सर्व योजनांना निधी देणे आवश्यक असते.या सर्व बाबींची पुर्तता करताना नाबार्ड टप्पा अंतर्गत कामांना निधी उपलब्धतेमध्ये मर्यादा येतात.

परिच्छेद क्र. २.२.१०.३ सागरी मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र नबांधणे-

महाराष्ट्र शासनाने रायगड जिल्हयातील अलिबाग येथे रु.१.८५ कोटी खर्च करुन प्रदर्शन सभागृह आणि वस्तूसंग्रहालय यांचा समावेश असलेले मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र बांधण्यास मान्यता दिली. (जुलै २०१०) घटत्या सागरी मत्स्यउत्पादनात

कायमस्वरुपी वाढ करण्यासाठी या प्रकल्पातून मत्स्यउद्योगाला प्रशिक्षित व्यावसायिक तरुण मच्छीमार उपलब्ध होणे अपेक्षित होते. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने RKVY अंतर्गत रु.१.८५ कोटी मुक्त केले. (२०१०-११). परंतु केंद्र बांधण्यासाठी प्रस्तावित केलेल्या जागेचा ७/१२ चा उतारा उपलब्ध नसल्याने जानेवारी २०१४ पर्यंत काम सुरु होऊ शकले नव्हते.

विभागाने रु.४.७३ कोटीची सुधारित मंजूरी दिली (सप्टेंबर २०१४) आणि काम सुरु करण्यासाठी सप्टेंबर २०१५ मध्ये PWD ला रु. एक कोटी मुक्त केले. परंतु PWD ने निविदा प्रक्रियेत विलंब केल्याने नोव्हेंबर २०१६ पर्यंत काम दिले गेले नव्हते. RKVY अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचा वापर करुन विभागाने प्रशिक्षण केंद्रासाठी (जे अद्याप सुरु व्हायचे होते) रु.१.०५ कोटी खर्चात एक प्रशिक्षण नौका खरेदी केली होती. (नोव्हेंबर २०१६)

अशा प्रकारे ६ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटूनही मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र प्रस्थापित होऊ शकले नव्हते.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.मत्स्यवि-२०१०/प्र.क्र.१८८/पदुम-१२, दि.२८/०७/२०१० अन्वये रु.१,८५,००,०००- रकमेस मान्यता दिली होती. तथापि प्रशिक्षण केंद्र बांधण्यासाठी जमीन उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम सुरु करता आले नाही. त्यानंतर विभागीय आयुक्त, काकेण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर यांनी त्यांच्या दि.०६/०१/२०१४ च्या आदेशान्वये ०.०६.७१ हे.आर जमीन सर्वे क्र.३५/१ अलिबाग (कोळीवाडा) मत्स्यव्यवसाय विभाग,मुंबई यांना उलपब्ध करुन दिली. त्यानंतर सन २०१०-११ ते सन २०१३-१४ पर्यंत जिल्हा दरसूची (DSR) मध्ये झालेली वाढ लक्षात घेऊन सन २०१०-११ ते सन २०१३-१४ पर्यंत जिल्हा दरसूचीनुसार (DSR) तयार करण्यात आलेल्या अंदाज पत्रकातील वाढीव दरवाढ गृहीत धरुन रु.२,८८,००,०००/- इतक्या वाढीव खर्चास प्रशासकीय मान्यता शासनाने दि.०६/०४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये दिली आहे.

त्यानुसार मत्स्यव्यवसाय विभागाने मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारत बांधकामासाठी जा.क्र.मत्स्य/भू/ ०८१५१०/ ९९/२०११, दि. ०७/०९/२०१५ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, रायगड-अलिबाग यांच्याकडे रु.१,००,००,०००/- वर्ग केले आहेत. तसेच चिफ ऑफिसर म्युनिसिपल, अलिबाग यांना देखील दि.०१/०७/२०१६ अन्वये रु.१,४७,६०१/- इतका निधी वर्ग केला आहे.

यानंतर कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.अलिबाग यांनी निविदा प्रक्रिया सुरु केली व त्याची ऑनलाईन विक्री कालावधी दि.२१/११/२०१५ ते दि.२१/१२/२०१५ होता. यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन मे.सुप्रभात इनफ्राझोन प्रायव्हेट लि.यांची रु.२,६७,७०,१२९/- ची निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.रायगड, कोकण भवन, नवी मुंबई यांनी जा.क्र.रामं/निविदा/१७३५, दि.२१/०४/२०१६ अन्वये स्विकृती दिली.

सदर निविदा धारकाला सुरक्षा रक्कम भरण्यास सूचित केले असता ते सुरक्षा रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यामुळे सदर निविदा रद्द करुन अधिक्षक अभियंता, सा.बां.वि.रायगड, नवी मुंबई यांनी दि.०३/०७/२०१७ च्या पत्रान्वये फेर निविदेसाठी मान्यता दिली आहे.

कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.अलिबाग कार्यालयाच्या नोटीस क्र.१९ सन २०१७-१८ (जा.क्र.अवि/लेशा/निविदा/७४३९/ २०१७, दि.२८/०७/२०१७) नुसार सदर कामाची फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदेचा कालावधी दि.०८/ ०८/२०१७ ते ३०/०८/२०१७ शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सुधारीत शासन निर्णयानुसार १५ दिवसांचा ठेवण्यात आला होता. परंतु शासनाच्या बदललेल्या शासन निर्णयानुसार सदर कामाची प्रारुप निविदा बदलने आवश्यक असल्याने त्याप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या. सद्यस्थितीत प्रारुप निविदा अधिक्षक अभियंता, रायगड (सा.बां.वि.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई या कार्यालयामार्फत मुख्य अभियंता, मुंबई (सां.बां.वि.) प्रादेशिक कार्यालयात मंजुरीस्तव सादर केलेली आहे. प्रादेशिक कार्यालयाकडून निविदा प्राप्त होताच साधारणतः पुढील १० दिवसात निविदा ऑनलाईन (http://mahatenders.gov.in) या साईटवर प्रसिध्द होईल. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच ठेकेदार निश्चिती करुन काम हाती घेण्यात येईल.

वरील कारणांमुळे सदर प्रकल्पास विलंब झाला आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.४ सुरिमी प्रक्रिया केंद्रासाठी निधी मुक्त न करणे. -

सुरिमी हे जास्त नफा देणा-या काही मोजक्या मौल्यवान सागरी उत्पादनापैकी एक उत्पादन आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सुरिमीची वाढती मागणी लक्षात घेता NCDC ने रु. २५.३५ कोटी खर्चात रायगड जिल्ह्यातील उरण येथे दरवर्षी ५००० टन सुरिमीच्या उत्पादनासाठी सुरिमी प्रक्रिया केंद्र (SPU) प्रस्थापित करण्याच्या विभागाच्या ऑक्टोबर २०१३ च्या प्रस्तावास मान्यता दिली (मार्च २०१४) या SPU ची स्थापना, व्यवस्थापन आणि कार्यान्वयन ससून डॉक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादित (संस्था) यांनी करायची होती. या प्रकल्पावरील खर्च राज्य शासन, NCDC आणि संस्था यांच्यात १०:८०:१० असा विभागावयाचा होता. मार्च २०१६ ला SPU कार्यान्वित करायचे होते.

ACF, मुंबई शहर यांच्या कार्यालयाच्या दस्तऐवजांची तपासणी करता असे आढळून आले की, जानेवारी २०१६ पर्यंत विभागाने केलेल्या रु. १०.२२ कोटी प्राथमिक संवितरणानंतर संस्थेला उर्वरित रु. १२.५९ कोटी रक्कम मुक्त केली नव्हती (नोव्हेंबर २०१६). संस्थेने जानेवारी २०१६ पर्यंत सुरिमी प्रक्रिया वाहिनी चे प्रापण, प्रशितन आणि जल प्रक्रिया साधनसामग्री, स्थापत्ये/बांधकाम आणि विद्युतीकरण इत्यादीवर रु. १३.०५ कोटी (ज्यामध्ये तिचा १० टक्के हिस्सा होता) खर्च केले होते आणि प्रयोगशाळा/विद्युत उपकरण आणि इतर स्थिर मत्तांचे प्रापण अद्याप करायचे होते. नोव्हेंबर २०१६).

संस्थेला निधी मुक्त करण्यात विलंब झाल्याने विभागाला मार्च २०१६ पर्यंतच्या प्राथमिक कालमर्यादेत काम पूर्ण करण्यास अपश्यश आले असे सकृतदर्शनी दिसते.

शासनाने वस्तुस्थिती स्वीकारली. अंतिम बैठकीत प्रकल्प मार्च २०१७ पर्यंत पूर्ण होईल असे प्रधान सचिवांनी सांगितले.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सुर्मी प्रकल्पास सन २०१४ मध्ये प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सन २०१५-१७ या कालावधीत एकूण प्रकल्प रक्कम रु. २५३५.३६ लाख पैकी रु. २३८१.५८ लाख इतकी रक्कम म्हणजे एकूण प्रकल्प किंमतीच्या ९४ टक्के इतकी रक्कम वितरीत करण्यात आली असून प्रकल्प सद्यस्थितीत कार्यान्वित करण्यात येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प प्रगतीत असुन प्रकल्प अंदाजपत्रकाची उर्वरित रक्कम उपलब्ध करण्यात येऊन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

शासनस्तरावरुन वितरीत निधीचा तपशिल-४ सोबत जोडण्यात आले आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.५ बर्फाचा कारखाना आणि शितगृहे प्रस्थापित न करणे -

एनसीडीसी (NCDC) ने जतन वाहतुक आणि पणन (PTM) योजनेखाली रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुका येथे बर्फाचा कारखाना (क्षमता १०० टन प्रति दिवस) आणि शतगृह (क्षमता १०० टन) बांधण्यासाठी हरनेपाज फिशिंग आणि क्रेडीट सहकारी संस्था मर्यादित (संस्था) या संस्थेला रु. तीन कोटी अर्थसहाय्य मंजूर केले (डिसेंबर २०११) सदर प्रकल्प मार्च पर्यंत पूर्ण करावया होता.

आयुक्तांनी, कामाच्या प्रगतीच्या अनुरुप संस्थेला निधी मुक्त करण्याच्या सूचनेसह ACF, रत्नागिरी यांना रु. १.१५ कोटी मुक्त केले. (मार्च २०१२ ते मार्च २०१३ दरम्यान) , लेखापरीक्षेला असे आढळून आले की जानेवारी २०१४ मध्ये प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, कार्यस्थळावर जरी कामाची सुरुवात झाली नव्हती तरीही ACF नी तोपर्यंत संस्थेला रु. ०.७५ कोटी मुक्त देखील केले होते. फेब्रुवारी २०१४ मध्ये संस्थेने निविदा उघडल्या आणि रु. ३.९९ कोटीची निम्नतम बोली स्वीकारली. प्रकल्पाच्या खर्चातील वाढ विचारात घेता संस्थने ACF ला त्याच महिन्यात अतिरिक्त अर्थसहाय्य देण्याची किंवा रु. तीन कोटीच्या मंजूर अर्थसहाय्यात प्रकल्प उभारणे शक्य होण्यासाठी व्याप्ती ५० टक्क्यांनी कमी करण्याची विनंती केली. मार्च २०१४ मध्ये ACF नी ही बाब आयुक्तांकडे संदर्भित केली परंतु त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. तथापि, एप्रिल २०१४ मध्ये, ACF ने देखिल संस्थेला उर्वरित रु. ०.४० कोटी रक्कम मुक्त केली. जमीन खरेदीसाठी संस्थेने खर्च केलेल्या (मार्च २०१३) रु. ९.१६ लक्ष रक्कमे व्यतिरिक्त उर्वरीत रु. १.०५ कोटी रक्कम संस्थेने त्या जमिनीवर कोणतेही काम न करता स्वतःकडे ठेवून घेतली होती. (नोव्हेंबर २०१६)

अशाप्रकारे केवळ बर्फाचा कारखाना व शीतगृहाचे बांधकाम ४४ महिन्यांनी लांबले असे नाही तर संस्थेने मार्च २०१३ पासून स्वतः जवळ ठेवलेली रु. १.०५ कोटी रक्कम देखील विनावापर पडून राहिली.

अंतिम बैठकीत सह आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी असे नमूद केले की, शासन अतिरिक्त अर्थसहाय्य देऊ शकत नसल्यामुळे संस्थेला कामाची व्याप्ती कमी करुन सुधारित प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात येईल

शिफारस ५ : मच्छीमारांना मत्योत्पादन ,प्रक्रिया आणि मत्स्य साधनसंपत्तीचे जतन कार्यक्षमतेने आणि कायमस्वरुपी करणे शक्य व्हावे यासाठी शासनाने सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील सर्व पायाभूत विकास कामे वेळेवर पूर्ण होतील याची सुनिश्चिती करावी.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरचा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी संस्थेच्या स्थरावरुन आवश्यक ते प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. संस्थेने निविदा प्रक्रिया अंतिम करताना संबंधित निविदाधारकांच्या सोबत चर्चा करुन निविदेतील अंतिम रक्कम शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीत होईल यांची खबरदारी घेणे आवश्यक होती. तसेच निविदा प्रक्रियेतील अटी व शर्ती मध्ये सुध्दा प्रकल्पांच्या किंमतीच्या अनूषंगाने निविदा धारकांची खर्चाच्या रक्कमाला नमूद कराव्यात अशी अट नमूद करणे आवश्यक होती. तथापी तशी कार्यवाही संस्थेकडून झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच संस्थेने मंजूर प्रकल्प रक्कमपैकी काही रक्कम खर्च केली आहे. संबब सद्यस्थितीत राष्ट्रीय सहकार विकास निगम आणि शासनाने अंतिमता मंजूर केलेल्या प्रकल्पांच्या संरचनेमध्ये बदल करण्याचे अधिकार या विभागास नाहीत. यास्तव संबंधित संस्थेला वितरीत केलेली रक्कम रु.१.१५ कोटी वसुल करण्यात आली असून सदर रक्कमेवरील व्याजाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन निदर्शनास येणा-या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

केंद शासनाच्या माध्यमातुन सागरी मत्स्यव्यवसाय पायाभुत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे अंतर्गत तीन मच्छिमार बंदरे बांधण्याचे प्रस्तावित आहे. RKVY योजनेअंतर्गत १० जेटटींची बांधकामे पुर्ण झाली असुन ०७ जेटटींची बांधकामे भौतिकदष्टया पुर्ण झालेली आहेत. नाबार्ड टप्पा १६ अंतर्गत १९ जेटटीचे बांधकामाने पुर्ण केली आहे. नाबार्ड टप्पा २३अंतर्गत १० जेटटीचे बांधकामास मान्यता प्राप्त झालेली आहे. अलिबाग येथे मच्छिमार प्रशिक्षण केंद्र बांधण्याचे काम निविदा प्रक्रियेत आहे.

सुरमी या जास्त नफा देणा-या सागरी उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रकल्प मंजुर करण्यात आला आहे.निळक्रांती योजनेतंर्गत मच्छिमारांना मत्स्यउत्पादन प्रक्रिया व जतन या बाबीसाठी विविध योजनांचा समावेश असुन मागणी नुसार त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही केली जात आहे.

परिच्छेद क्र. २.२.११ नियामक तरतूदींची अंमलबजावणी न करणे. -

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (MMFRA) १९८१च्या कलम ३(२)(iv) नुसार मत्स्य संवर्धन आणि शस्त्रोक्त पध्दतीने मासेमारी व्यवसायाचे नियमन करण्याच्या दृष्टीने जिल्हयातील प्रत्येक बंदरात नोंदणीकृत होण्यासाठी विशिष्ठ प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संख्या राज्य शासनाने निश्चित करायची होती. तसेच, MMFRA च्या कलम ७ अन्वये कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात परवाना प्राप्त नसलेल्या मच्छीमार नौकांचा वापर करुन मासेमारी करणे प्रतिबंधित केले आहे.

परिच्छेद क्र. २.२.११.१ बंदरातीलमच्छीमारनौकांचीकमालसंख्यानिश्चितनकरणे.

विभागाच्या कार्यक्षेत्रातील ससुन डॉक व न्यु फिश जेटी (मुंबई शहरातील) आणि मिरकरवाडा बंदर (रत्नागिरी जिल्हया तील) या तीन बंदरापैकी फक्त न्यु फिश जेटी (मुंबई शहरातील) या एका बंदरात नोंदणी करावयाच्या विशिष्ट प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संख्या विभागाने विहित केली होती. इतर दोन बंदरांसाठी मच्छीमार नौकांच्या संख्येची मर्यादा निर्धारीत न केल्यामुळे या दोन बंदरांतून अनधिकृत मच्छीमार नौकांकडून बेसुमार प्रमाणात मासेमारी केली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये मत्स्यव्यवसाय शाश्वत पध्दतीने करण्याच्या दृष्टीने जिल्हयातील प्रत्येक बंदरात नोंदणीकृत होण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संख्या राज्य शासनाने निश्चित करावयाची होती व त्याप्रमाणे कारवाई सुरुआहे. राज्यामध्ये ससुनडॉक, न्यु फिश जेट्टी (मुंबई शहर) व मिरकरवाडा बंदर, रत्नागिरी ही ३ बंदरे उपलब्ध असून, या बंदरामध्ये मासेमारी नौका मासेमारीसाठी जातात. न्यु फिश जेट्टी हे बंदर महाराष्ट्र मुंबई पोर्ट ट्रस्ट (M.B.P.T.) यांच्या अधिपत्याखाली असल्यामुळे या संस्थेमार्फत बंदरामध्ये मासळी उतरविण्याकरीता येणार संख्या निश्चित करण्यांत आली होती. भाऊचा धक्का या ठिकाणी धक्यावर बोटी उतरवून घेण्याची क्षमता एका दिवशी १५० बोटी इतकी असल्याने मासेमारी बोटी मार्फत करण्यांत येणा-या मासेमारीचे स्वरुप लक्षात घेता न्यु फिश जेट्टी (भाऊचा धक्का, माझगांव, मुंबई) या विनिर्दिष्ट क्षेत्रात ७५० पेक्षा जास्त नाही. इतक्या बोटींना परवानगी देण्यात आली होती. तसेच न्यु फिश जेट्टी येथे दुस-या पाळीत सायंकाळी ४:०० ते ८:०० मध्ये अधिकच्या ५०० नवीन बोटींना परवानगी देण्यात आलेली आहे.

परंतू इतर दोन बंदरामध्ये मासेमारी नौका आपली मासळी उतरविण्याकरीता त्यांच्या वेळेनुसार येतात व आपला मासळीसाठा बंदरावर उतरविल्यानंतर दुस-या नौकेला जागा प्राप्त करुन देतात. ससुनडॉक येथे केंद्र शासनाच्या अर्थसहाय्यात आधुनिक बंदर बांधकाम झाल्यामुळे या बंदरावर जास्त अधिक भार पडत नाही व मच्छीमारांना त्याचा त्रास होत नाही. ससूनडॉक बंदारावर नोंदणी झालेल्या एकूण नौकांची संख्या १६२० एवढी असून पैकी १५९ बोटी पर्ससीन, ९२० बोटी ट्रॉलींग, २६० बोटी डोलनेट, २६८ बोटी गिलनेट व १३ बोटी हुकलायनर आहेत. मिरकरवाडा बंदर येथे रत्नागिरी ते मि-या येथील परिसरातील नौका मासेमारीसाठी बंदराचा वापर करण्यांत येतो, तथा मिरकरवाडा टप्पा दोन मध्ये बंदराचा विकास करुन मासेमारी नौका उतरविण्यासाठी अधिक जागेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे मासेमारी नौका उतरविण्याकरीता मच्छिमारांमध्ये वाद नसल्यामुळे या ठिकाणी नौकांची संख्या निश्चित करण्यांत आलेली नाही. मच्छीमार नौकांची संख्या निश्चित करण्याकरीता विलंब होत आहे. कारण प्रत्येक मासेमारी नौकेची तपासणी सुरु आहे. तथा मासेमारी परवाना घेतल्याशिवाय कोणत्याही मासेमारी नौका अनधिकृतपणे मासेमारी करीत नाहीत व अनधिकृतपणे मासेमारी करणा-या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत कारवाई केली जाते.

परिच्छेद क्र. २.२.११.२ अधिक क्षमतेच्या गस्ती नौकांची अनुपलब्धता.

मासेमारीची नियमन करण्याची तरतूद MMFRA मध्ये आहे, त्यानुसार कुठल्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी प्रतिबंधीत केली जाऊ शकते. म्हणूनच, समुद्रामध्ये मासेमारीसाठी अनधिकृतरित्या संचार करणा-या नौकांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यासाठी विभागाकडे पर्याप्त संख्येत गस्तीनौका उपलब्ध असणे आवश्यक असते.

लखापरिक्षेत असे आढळून आले की, गस्त घालण्यासाठी विभागाकडे स्वतःची एकही नौका नव्हती आणि राज्याच्या सर्व सहा सागरी तटीय जिल्हयामध्ये भाडयाच्या नौकांद्वारे गस्त घातली जात होती (२०११-१६). परंतु भाडयाने घेतलेल्या नौकांची इंजिन क्षमता कमी असल्यामुळे गस्तीचे काम परिणामकारक आणि कार्यक्षमतेने होत नव्हते.

विभागाने आयुक्तांना उच्च इंजिन क्षमतेच्या पाच गस्तीनौका खरेदी करण्याच निर्देश दिले (मे २०१५) आणि नवीन नौका खरेदी करेपर्यंत नौका (उच्च इंजिन क्षमतेच्या) भाडे तत्वावर वापरण्याचे ठरविले (सप्टेंबर२०१५). परंतु, आयुक्तांनी मागविलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे नोव्हेंबर २०१६ पर्यंत एकाही नौकेची खरेदी होऊ शकली नाही.

अशा प्रकारे १८ महिन्यांचा (जून २०१५ ते नोव्हेंबर २०१६) कालावधी उलटूनही विभागाने उच्च इंजिन क्षमतेच्या नौकांची खरेदी केली नव्हती किंवा भाडयानेही घेतल्या नव्हत्या.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासन पत्र दि. १६.०५.२०१५ नूसार शासनाने मत्स्यव्यवसाय विभागास उच्च इंजिन क्षमतेच्या ०५ गस्ती नौका खरेदी करण्यांचे निर्देश दिले. त्याप्रमाणे दि.१४.०७.२०१६ रोजी मत्स्यव्यवसाय विभागाने रु.१५६२.७२ लक्ष चा नौका खरेदी प्रस्ताव सादर केला होता. शासन निर्णय दि.०१.०९.२०१५ नुसार हायस्पीड गस्ती नौका भाड्याने घेण्याबाबत मान्यता प्रदान केली. गस्तीनौका भाडेतत्वावर घेण्यांत आलेल्या आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे जिल्हा निहाय भाडेतत्वावर गस्तीनौका वापरण्यात आलेल्या आहेत.

क्र.	जिल्हा	गस्तीनौकेचे नाव	नौका नोंदणी क्रमांक	कालावधी
१	ठाणे -पालघर	माऊली साई.	IND-MH-२-MM-३४८३	२०१६-१७
२	मुंबई शहर/उपनगर	जय कामधेनु	IND-MH-२-MM-१७८२	२०१६-१७
३	रायगड	एम.एल.भुत-१	BEDI-PORT-BP-१४७५	२०१६-१७
४	रत्नागिरी	संजीवनी	IND-MH-५-MM-२२४	२०१६-१७
५	सिंधुदुर्ग	हुषार	IND-MH-५-MM-२२३	२०१६-१७

तसेच सन २०१७-१८ मध्ये भाडेतत्त्वावर गस्ती नौका घेण्यासाठी निविदा मागविण्यात आलेल्या असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असुन, प्रत्यक्षात गस्तीनौका तपासणी अहवाल जिल्हा कार्यालयामार्फत मागविण्यात आलेला आहे. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या गस्तीनौका तपासणी अहवाल प्राप्त झालेला असुन , सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गस्तीनौका सुरु करण्यात आलेली आहे. उर्वरित जिल्ह्यांचे गस्तीनौका तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत जिल्ह्यांमध्ये देखील गस्ती नौकामार्फत महाराष्ट् सागरी मासेमारी अधिनियम १९८१ ची अंमलबजावणी होईल.अशी आयुक्तामार्फत दक्षता घेण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. २.२.११.३ नोंदणी झालेल्या सागरी नौका आणि प्रत्यक्ष जारी केलेले परवाने यांच्या माहितीचा ताळमेळ न घेणे.

राज्यातील मच्छीमार नौकांची नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB) हे तत्कालीन प्राधिकारी होते तर मच्छीमार नौकांना परवाने विभागाकडून जारी केले जात होते. केंद्र शासनाच्या नौकानयन मंत्रालयाने अधिसुचना जारी केल्यावर (ऑगस्ट २०१४) सर्व नागरी मच्छीमार नौकांची नोंदणी करण्याचे अधिकार सागरी राज्यांच्या अधिसूचित निबंधकांना (राज्याचे मत्स्यव्यवसाय विभाग) सोपविण्यांत आले होते.

अधिसुचनेनुसार कार्यवाही करताना (MMB) ने २३,२७३ नोंदणीकृत मच्छीमार नौकांची माहिती विभागाला सुपूर्त केली (डिसेंबर २०१४) परंतु मार्च २०१६ पर्यंत विभागाने फक्त १६,४७० मच्छीमार नौकांना (२३,२७३ नोंदणीकृत नौकांच्या तुलनेत) परवाने जारी केले होते. म्हणजेच ६,८०३ इतक्या लक्षणीय संख्येत नौकांच्या माहितीचा ताळमेळ घेतला गेला नव्हता. ज्या परवान्याशिवाय मासेमारी करत असल्याची शक्यता होती.

शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि सांगितले की, नोव्हेंबर २०१६ पर्यंत राज्यात २४,३४० नौकांची नोंदणी झाली होती व १५,०३९ परवाना धारक नौका प्रत्यक्ष व्यवसाय करीत होत्या. तफावतीचा ताळमेळ घेण्यासाठी नौकांची प्रत्यक्ष तपासणी करण्याची मोहिम हाती घेण्यांत आली आहे व काम तीन महिन्यात पूर्ण केले जाईल.

शिफारस ०६: शासनाने सागरी तटीय जिल्हयात गस्तीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अधिक क्षमतेच्या गस्तीनौका भाडयाने /विकत घेण्यासाठी त्वरेने कार्यवाही करावी. अनधिकत सागरी नौका सक्रिय परवानाधारक नौकांच्या संख्येतील तफावतीचा लवकरात लवकर ताळमेळ घ्यावा.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रियलक्राफ्ट अंतर्गत दिनांक ०१-०८-२०१७ च्या नोंदणीनूसार नोंदणी झालेल्या नौकांची एकूण संख्या २४०३५ इतकी आहे. मासेमारी परवाना असलेल्या नौकांची संख्या १४२९९ इतकी असून, उपरोक्त नौकांच्या संख्येमध्ये असणारी तफावत ९७३६ इतकी आहे. सन २०१७-१८ मध्ये सागरी जिल्हयांमध्ये मासेमारी नौका सर्वेक्षण अभियान माहे जून २०१७ पासून हाती घेण्यांत आलेले आहे. सदर अभियानानूसार दिनांक ११-०८-२०१७ पर्यंत तपासणी केलेल्या नौकांची संख्या ११८४६ इतकी आहे.

रियलक्राफ्ट नोंदणी नूसार तफावत असलेल्या ९७३६ नौकांपैकी ४७०८ नौकांची तपासणी करण्यांत आलेली आहे. नोंदणी रद्द केलेल्या नौकांची संख्या ७६९ इतकी आहे.

राज्यातील कोकण विभागा अंतर्गत मासेमारी नौका (यांत्रिक/बिगरयांत्रिक) मासेमारी नौका सर्वेक्षण अभियान सन २०१७-१८ अंतर्गत तपासणी झालेल्या व बंद/निकामी नौकांना संबंधीत जिल्हा कार्यालयांकडून नोटीसा देण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर बंद व निकामी नौकांचे नोंदणी प्रमाणपत्र (VRC) रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येणार आहे.

उच्च इंजिन क्षमतचया ०५ गस्ती नौका खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रथम निविदाना प्रतिसाद मिळला नाही. सबब जिल्हानिहाय प्रत्येकी ०१ प्रमाणे ०५ गस्ती नौका भाडेतत्तवावर खालीलप्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत.

क्र.	जिल्हा	गस्तीनौकेचे नाव	नौका नोंदणी क्रमांक	कालावधी
१	ठाणे -पालघर	माऊली साई.	IND-MH-२-MM-३४८३	२०१६-१७
२	मुंबई शहर/उपनगर	जय कामधेनु	IND-MH-२-MM-१७८२	२०१६-१७
३	रायगड	एम.एल.भुत-१	BEDI-PORT-BP-१४७५	२०१६-१७
४	रत्नागिरी	संजीवनी	IND-MH-५-MM-२२४	२०१६-१७
५	सिंधुदुर्ग	हुषार	IND-MH-५-MM-२२३	२०१६-१७

रियलक्राफ्ट अंतर्गत दिनांक ०१-०८-२०१७ च्या नोंदणीनूसार नौकांची संख्या २४०३५ इतकी आहे. तर परवानाधारक नौकांची संख्या १४२९९ इतकी असुन, त्यामध्ये ९७३६ इतकी तफावत आहे. सन २०१७-१८ मध्ये सागरी जिल्हयांमध्ये मासेमारी नौका सर्वेक्षण अभियान माहे जून २०१७ पासून हाती घेण्यांत आले असुन, या तपासणी मध्ये नौकांची संख्या ११८४६ इतकी आढळुन आली आहे.

रियलक्राफ्ट नोंदणी नूसार तफावत असलेल्या ९७३६ नौकांपैकी ४७०८ नौकांची तपासणी करण्यांत आलेली आहे. नोंदणी रद्द केलेल्या नौकांची संख्या ७६९ इतकी आहे.

राज्यातील कोकण विभागा अंतर्गत मासेमारी नौका (यांत्रिक/बिगरयांत्रिक) मासेमारी नौका सर्वेक्षण अभियान सन २०१७-१८ अंतर्गत तपासणी झालेल्या व बंद/निकामी नौकांना संबंधीत जिल्हा कार्यालयांकडून नोटीसा देण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर बंद व निकामी नौकांचे नोंदणी प्रमाणपत्र (VRC) रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येणार आहे.

परिच्छेद क्र. २.२.१२ मच्छिमारांसाठी कल्याणकारी योजना.

परिच्छेद क्र. २.२.१२.१ फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र योजनेची अंमलबजावणी न करणे.

विदर्भ व मराठवाडा या दुष्काळ प्रवण जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने आर्थिक विवंचनाग्रस्त पाच शेतक-यांचा गट करुन प्रत्येक गटाला एका फिरत्या वाहनासाठी (फिरते किरकोळ मत्स्य विक्री केंद्र) अर्थसहाय देण्यासाठी एक योजना मंजूर केली (जुलै २०१५) या योजनेसाठी NFDB (४० टक्के) आणि राज्य शासनाने (६० टक्के) अर्थसहाय देण्याचे प्रस्तावित केले आहे. हे फिरते किरकोळ मत्स्य विक्री केंद्र म्हणजे एक चार चाकी वाहन असणार होते ज्यामध्ये मासे ठेवण्यासाठी एक विसंवाही (insulated) खोका, शीतकपाट, स्टोव्ह आणि स्वयंपाकाचा गॅस असणार होता ज्याचा उपयोग शेतक-यांनी मत्स्य विक्रीसाठी करुन त्याव्दारे अर्थार्जन करावयाचे होते. त्यानूसार, राज्य शासनानेविदर्भ व मराठवाडयातील१४ जिल्हयांसाठी ६६० फिरत्या किरकोळ मत्स्य विक्री केंद्राच्या खरेदीसाठी (रु.१० लक्ष प्रति केंद्र) रू.६६.०० कोटी मंजूर केले.

राज्य शासनाने १० जिल्हयातील ४४ फिरत्या मत्स्य विक्री केंद्रासाठी स्वतःचा रु.२.६४ कोटीचा (६० टक्के) हिस्सा मुक्त केला (मार्च २०१६) आणि ही रक्कम शेतक-यांच्या गटप्रमुखाच्या व संबंधित ACF च्या संयुक्त बँक खात्यांमध्ये हस्तांतरीत केली. परंतु (i) मान्यता प्राप्त प्रमाणकानुसार प्रति फिरत्या मत्स्य विक्री केंद्रामागे NFDB चे दायित्व रु.१० लक्ष प्रति केंद्र नसून रू.६.५० लक्ष प्रति केंद्र इतकेच मर्यादित होते आणि म्हणून प्रति फिरत्या मत्स्य विक्री केंद्रासाठी रु.२.६० लक्ष (रु.६.५० लक्षाच्या ४० टक्के) एवढेच अर्थसहाय देणे शक्य होतेआणि (ii) पाच शेतक-यांचा गट नोंदणीकृत संस्था नव्हता किंवा सहकारी संस्था देखील नव्हता आणि म्हणून त्यास कायदेशीर संस्था म्हणून विचारात घेतले जावू शकत नव्हते आणि भविष्यात त्यांच्या मालमत्तांचे व्यवस्थापन, मालकी आणि जबाबदा-या यामध्ये अडचणी उद्‌भवण्याची शक्यता होती, या कारणांकरीता NFDB ने त्यांचा रु.१.७६ कोटीचा (रु.४० टक्के) हिस्सा मुक्त केला नव्हता.

NFDB कडून अर्थसहायाबाबत ठोस आश्वासन मिळाले नसल्याने आयुक्तांनी जिल्हा नियोजन आणि विकास समिती अंतर्गत योजनेचा १०० टक्के अर्थसहाय देण्याचे प्रस्तावित केले (एप्रिल २०१६) ज्यावर महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा निर्णय प्रलंबित (नोव्हेंबर २०१६) होता.

अशाप्रकारे, सदोष नियाजनामुळे दुष्काळ प्रवण क्षेत्रातील विवंचनाग्रस्त शेतक-यांसाठी स्वयंरोजगार निर्माण करण्याचे योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

शासनाने वस्तुस्थिती मान्य केली.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१) अवर्षणामुळे बाधीत भागातील शेतक-यांना मासळी विक्री फिरते वाहन उपलब्ध करुन देण्याची योजना औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर या ४ विभागातील १४ जिल्हयात राबविण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र.मत्स्यवि-२०१५/ प्र.क्र.१५०/पदुम-१३, दि.३०/०७/२०१५ अन्वये मंजूरी दिली.

२) मासळी फिरते वाहन देण्यासाठी १००% अनुदानित योजना करिता जिल्हास्तरीय (DPDC) योजनातुन ६०% व राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड (NFDB) ४०% या धर्तीवर योजना राबविण्याची शासन निर्णय दि. ३०/०७/२०१५रोजी निर्गमित झाला.

३) सदर योजनेमध्ये वाहन खरेदी फॅब्रीकेशन करण्यासाठी रु. १०.०० लाख खर्च अपेक्षित होता. त्यामुळे DPDC मार्फत रु. ६.०० लाख/ वाहनव NFDB मार्फत रु.४.०० लाख / वाहनचा प्रस्ताव दि. १७.०८.२०१५ रोजी सादर केला गेला.

४) याप्रमाणे प्रथमवर्षी ०५ गट प्रति जिल्हा याप्रमाणे गटांची छाननी करुन रु. ६.०० लाख प्रति गटास DBT द्वारे त्याचे खातेमध्ये जमा करण्यात आले . (सोबत विवरणपत्र जोडण्यात येत आहे.)

५) याच दरम्यान NFDB हैद्राबाद यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ४०% रक्कम म्हणजेच रु. ४.०० लाख प्रति लाभार्थी प्राप्त होऊ न शकल्यामुळे मासळी फिरते वाहन खरेदी प्रक्रियेस विलंब झाला.

६) प्रस्तृत योजनेकरीता DPDC कडून रु.६.०० लक्ष प्रति शेतकरी गट याप्रमाणे रु.२.६४ कोटी इतका निधी एक वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून संयुक्त खात्यात जमा आहे.

७) प्रस्तुत प्रकरणी मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे ही योजना १००% जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) कडील अर्थसहाय्याने राबविण्यात मंजूरी मिळणेबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई कार्यालयाची समक्रमांकाचे दि.२८/०९/२०१६ व दि.८/१२/२०१६ च्या पत्रान्वये शासनास कळविण्यात आले होते.

८) उर्वरीत रु.४.०० लक्ष प्रमाणे रु.१.७६ कोटी निधी NFDB किंवा DPDC माध्यमातून उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने वाहनाचा आकार कमी करुन रु.६.०० लक्ष प्रति वाहन उपलब्ध करुन देण्याकरीता शासन निर्णय निर्गमित व्हावा याबाबत दि.३१/०५/२०१७ अन्वये शासनास कळविण्यात आले आहे.

९) मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव दि.०९.०६.२०१७ रोजी नियोजन व वित्त विभागास सादर केला आहे. नियोजन व वित्त विभागाकडुन काही मुददे उपस्थित केले असुन त्यात १०० टक्के अनुदानाची योजना राबविणे मुलतः चुकीचे आहे. अशी प्रधान सचिव (नियोजन) यांचे अभिप्राय आहेत. सदर नस्ती दि.२७.०९.१७ रोजी प्राप्त झाले असुन सदर मुददयाबाबत तसेच वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुददांबाबतचे निराकरण करुन फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सुचना त्याच दिवशी म्हणजे दि.२७.०९.१७ रोजी आयुक्त मत्स्य यांना दिल्या आहेत.

परिच्छेद क्र. २.२.१२.२ आदर्श मच्छिमार गावे निर्माण करण्यात विलंब.

"मच्छीमारांच्या कल्याणसाठी राष्ट्रीय योजना' ही केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाकडून १९९१-९२ पासून ५०:५० तत्वावर राबविण्यात येत असलेली एक केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेचा एक घटक म्हणजे आदर्श मच्छीमार गांवे विकसीत करणे हे होत, ज्या अंतर्गत मच्छीमारांना (भूजलाशयीन आणि सागरी) घरे, पेयजल आणि मनोरंजनासाठी समाज केंद्र, अशा मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात येणार होत्या. राज्यात २०१२-१३ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली होती.

कृषी मंत्रालयाने पाच जिल्हातील सात FCS साठी २५१ मच्छिमार घरांसाठी (प्रत्येक घरासाठी रू.५०.०००) रू.१२७.८५ लक्ष मंजूर केले(२०१२-१३) आणि विभागाने रू.१०० लक्ष (केंद्र हिस्सा ५० लक्ष आणि राज्य हिस्सा ५० लक्ष) मुक्त केले. परंतू निधी मुक्त करताना विभागाने घराचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा विहीत केली नव्हती. जिल्हा ग्रामिण विकास अभिकरण (DRDA) (i) घरांच्या बांधकामांसाठी लाभार्थिना निधी मुक्त करणे, (ii) कामाच्या प्रगतिवर लक्ष ठेवणे, आणि (iii) विभागाला उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे, यासाठी जबाबदार होते.

नोव्हेंबर २०१६ पर्यंत मच्छिमारांच्या २५१ घरांपैकी फक्त ११९ घरांचे बांधकाम पूर्ण झाले होते, ७५ घरांचे बांधकाम प्रगती पथावर होते, ३३ घरांच्या बांधकामास सुरवातही झाली नव्हती ज्याकरीता लाभार्थींकडून रक्कम वसुल करण्यात आली होती आणि २४ घरांची मंजूरी विभागाकडून रद्द करण्यात आली होती. तथापी, घरांचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी कालमर्यादा विहीत केली नसल्याने ११९ घरे बांधण्यात जर काही विलंब झाला असेल, तर त्याची पडताळणी लेखापरीक्षेला करता येऊ शकले नाही. तसेच ज्या ७५ घरांचे बांधकाम चालू होते त्यासाठीच्या मंजूर खर्चात (३७.५० लक्ष) वाढ होऊन तो रू.४४.८० लक्ष झाला होता आणि त्यासाठीचे सुधारीत प्रस्ताव मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविले होते, ज्यावरील निर्णय प्रलंबीत होता(नोव्हेंबर २०१६).

अशा प्रकारे, ३ वर्षांपेक्षा अधिक काळ उलटुन गेल्यावरही, २५१ घरांपैकी फक्त ११९ घरे(४७ टक्के) पूर्ण होऊ शकली होती. आयुक्तांनी सादर केलेल्या दस्तऐवजात ३३ घरांचे बांधकाम सुरू न करण्याची आणि २४ घरांची रद्द करण्याची कारणे उपलब्ध नव्हती.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या घरकुलाची सद्यःस्थिती

अ.क्र.	जिल्हा	गांव	मंजूर प्रकल्प	प्रकल्प किंमत रुपये	पूर्ण झालेली घरे-	काम प्रगती पथावर असलेले	बांधकाम सुरु न झालेले	रद्द झालेली घरे	परत केलेला निधी
१	ठाणे	शहापूर	२२	११.३०	२२	-	-	-	-
२	ठाणे	माळ	८६	४५.०५	८६	-	-	-	-
३	हिंगोली	भाटेंगाव	४३	२१.५०	२२	-	-	२१	६.००
४	नांदेड	सुगांव	२७	१३.५०	२०	६	१	-	-
५	नांदेड	मंग्याळ	१८	९.००	-	१२	६	-	-
६	यवतमाळ	जोडमोडा	१६	८.००	१६	-	-	-	-
७	बीड	जवळबन	३९	१९.५०	-	-	१८	२१	१२.३४
एकुण			२५१	१२७.८५	१६६	१८	२५	४२	१८.३४

वरीलप्रमाणे २५१ घरकूलांपैकी १६६ घरकुले पुर्ण झालेली असुन १८ घरकुलांची कामे प्रगतपथावर आहेत. बनावट/ दुबार प्रस्ताव अन्य अनुषांगिक कारणांमुळे ४२ घरकुले रद्द झालेली आहेत. तसेच अद्याप बांधकाम सुरु न झालेल्या बीड जिल्हयातील १८ व नांदेड जिल्ह्यातील ०७ घरकुलाबाबत संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा सुरु आहे.

ठाणे ,हिंगोली नांदेड यवतमाळ आणि बीड या पाच जिल्ह्यांतील ०७ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या २५१ घरांसाठी (प्रत्येक घरकुलांसाठी रुपये ०.५० लक्ष) रु. १२७.८५ लक्ष प्रकल्प किंमतीस (केंद्र+राज्य हिस्सा) सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाने मंजुरी दिली होती. सदरील प्रकल्प किंमतीपैकी सन २०१२-१३ मध्ये पहिल्या हप्त्यांपैकी रु. ८०.०० लक्ष (रु. ४०.०० लक्ष केंद्र + रु. ४०.०० लक्ष राज्य हिस्सा) वितरित केले होते.सन २०१२-१३ मध्ये सदर रक्कम खालील प्रमाणे संबंधित जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेकडे सोपविण्यात आली

(रुपये लाखात)

अ.क्र.	जिल्हा	गांव	मंजूर प्रकल्प	प्रकल्प किंमत रूपये	वितरीत निधी		
					केंद्र हिसा रूपये	राज्य हिस्सा रूपये	एकूण रूपये
१	ठाणे	शहापूर	२२	११.३०	२.५७	२.५७	५.१४
२	ठाणे	माळ	८६	४५.०५	१२.९१	१२.९१	२५.८२
३	हिंगोली	भाटेगांव	४३	२१.५०	५.००	५.००	१०..
४	नांदेड	सुगांव	२७	१३.५०	४.८८	४.८८	९.७६
५	नांदेड	मंग्याळ	१८	९.००	३.०३	३.०३	६.०६
६	यवतमाळ	जोडमोहा	१६	८.००	१.८६	१.८६	३.७२
७	बीड	जवळबन	३९	१९.५०	९.७५	९.७५	१९.५०
		एकूण	२५१	१२७.८५	४०.००	४०.००	८०.००

सन २०१३-१४ मध्ये शासनाने दुस-या हप्तापोटी रु.२०.०० लक्ष (केंद्र+राज्य) वितरीत केले होते. सदर रक्कम खालीलप्रमाणे वितरीत करण्यात आली आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	जिल्हा	गांव	मंजूर प्रकल्प	प्रकल्प किंमत रूपये	वितरीत निधी		
					केंद्र हिसा रूपये	राज्य हिस्सा रूपये	एकूण रूपये
१	ठाणे	शहापूर	२२	११.३०	१.०४	१.०४	२.०८
२	ठाणे	माळ	८६	४५.०५	४.०६	४.०६	८.१२
३	हिंगोली	भाटेगांव	४३	२१.५०	२.०३	२.०३	४.०६
४	नांदेड	सुगांव	२७	१३.५०	१.२७	१.२७	२.५४
५	नांदेड	मंग्याळ	१८	९.००	०.८५	०.८५	१.७०
६	यवतमाळ	जोडमोहा	१६	८.००	०.७५	०.७५	१.५०
७	बीड	जवळबन	३९	१९.५०	-	-	-
		एकूण	२५१	१२७.८५	१०.००	१०.००	२०.००

वरीलप्रमाणे शासनाने सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये दोन हप्त्यामध्ये रु. १००.०० लक्ष वितरीत केले होते.उर्वरित प्रकल्प किंमती पैकी रू.२७.८५ लक्ष वितरीत करणे बाबत शासनास विनंती केली होती. दरम्यान सन २०१५-२०१६ मध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद रुपये १,२८,९६२/-, चंद्रपूर रु.४,९०,०००/- व बीड रु. १२,३४,००८/- अशी एकूण अखर्चित रक्कम रुपये १८,५२,९७०/- परत केले होते. सदर अखर्चित निधी उपरोक्त संस्थांना खालील प्रमाणे वितरित करण्यांत आला.

(रुपये लाखात)

अ.क्र.	जिल्हा	गांव	मंजूर प्रकल्प	प्रकल्प किंमत रूपये	वितरीत निधी		
					केंद्र हिसा रूपये	राज्य हिस्सा रूपये	एकूण रूपये
१	ठाणे	शहापूर	२२	११.३०	२.०४	२.०४	४.०८
२	ठाणे	माळ	८६	४५.०५	५.५५५	५.५५५	११.११
३	हिंगोली	भाटेगांव	४३	२१.५०	-	-	-
४	नांदेड	सुगांव	२७	१३.५०	-	-	-
५	नांदेड	मंग्याळ	१८	९.००	०.६२	०.६२	१.२४
६	यवतमाळ	जोडमोहा	१६	८.००	१.०२५+ ०.०२४८५	१.०२५+ ०.०२४८५	२.०५+ ०.०४९७
७	बीड	जवळबन	३९	१९.५०	-	-	-
		एकूण	२५१	१२७.८५	९.२६४८५	९.२६४८५	१८.५२९७

प्रक्ल्प किंमत रु.१२७.८५ लक्ष पैकी रु.११८.५२९७ लक्ष वितरित केल्यामुळे उर्वरित रु.९.३२ लक्ष्ची मागणी शासनास प्राप्त झाली होती. त्यानुसार रु. ९.३२ लक्ष इतका निधी सन २०१५-१६ मध्ये खालीलप्रमाणे वितरित करण्यात आला.

(रुपये लाखात)

अ.क्र.	जिल्हा	गांव	मंजूर प्रकल्प	प्रकल्प किंमत रूपये	वितरीत निधी		
					केंद्र हिसा रूपये	राज्य हिस्सा रूपये	एकूण रूपये
१	ठाणे	शहापूर	२२	११.३०	-	-	-
२	ठाणे	माळ	८६	४५.०५	-	-	-
३	हिंगोली	भाटेगांव	४३	२१.५०	३.७२	३.७२	७.४४
४	नांदेड	सुगांव	२७	१३.५०	०.६०	०.६०	१.२०
५	नांदेड	मंग्याळ	१८	९.००	-	-	-
६	यवतमाळ	जोडमोहा	१६	८.००	०.३४०१५	०.३४०१५	०.६८०३
७	बीड	जवळबन	३९	१९.५०	-	-	-
		एकूण	२५१	१२७.८५	४.६६०१५	४.६६०१५	९.३२०३

सदरील मंजूर प्रकल्प किंमतीच्या खर्चात वाढ झालेली नाही अथवा त्यासाठी रु.४४.८० लक्ष च्या जादा निधीचीही मागणी करण्यात आलेली नाही.सदर योजना जिल्ह्या ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडुनराबविण्यात येते. सदर यंत्रणकडून आवश्यक इतका प्रतिसाद मिळत नसल्यामुळे घरकुल प्रकल्प पुर्ण करण्यास विलंब होतो. तसेच घरकुल प्रकल्प पुर्ण करण्यासाठी टप्पाटप्पाने निधी मिळत असल्यामुळेप्रकल्प पुर्ण करण्यास त्याप्रमाणात कालावधीची आवश्यक भासते.

परिच्छेद क्र. २.२.१३मनुष्यबळाची कमतरता.

विभागातील एकंदर १०५० मंजुर पदांपैकी ऑगस्ट २०१६ रोजी ३१३ पदे (३० टक्के) रिक्त होती. महत्वाच्या पदांचा अनुशेष तक्ता २.२६ मध्ये दर्शविला आहे.

पदांचे नांव	मंजुद पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	रिक्त पदांची टक्केवारी
सहआयुक्त	३	२	१	३३
प्रादेशिक उपआयुक्त	७	२	५	७१
सहा. आयुक्त मत्स्यव्यवसाय	४०	८	१९	३४
मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी	५६	३७	१९	३४

स्त्रोत - मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांनी सादर केलेली माहिती.

तक्ता क्र.२.२.६ वरुन असे दिसून येते की, प्रादेशिक स्तरावरील सनियंत्रण अधिकारी असलेल्याय तसेच आयुक्त आणि ACF मधील महत्त्वाच्या दुवा असलेल्या RDC च्या पदांमधील अनुशेष ७१ टक्के होता. तसेच, जिल्हा स्तरावरील महत्वाचे कार्यकारी असलेल्या ACF च्या पदांमधील अनुशेष ८० टक्के होता त्यामुळे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार दिला गेला होता किंवा AFC कडून दुहेरी कार्यभार संभाळला जात होता. मत्स्यव्यवसाय विकास/प्रशिक्षण अधिकां-यांची ३४ टक्के पदे रिक्त असणे हे मत्स्यबीजांचे कमी उत्पादन आणि मत्स्य बीज केंद्रे कार्यरत नसण्यामागचे एक कारण होते, ज्याबाबतीत परिच्छेद २.२.८.२ मध्ये चर्चा केली आहे. महत्त्वाच्या पदांच्या अनुशेषामुळे केंद्र/राज्य योजनांच्या अमंलबजावणीवर विपरित परिणाम झाला होता.

राज्य शासनाने नमुद केले की, वर्ग -१ आणि वर्ग २ प्रवर्गाचे भरतीचे नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला (MPSC) सादर केले आहेत. आणि त्यांच्या मंजुरी नंतर महत्त्वाची पदे भरण्यासाठी MPSC ला मागणी पत्रे पाठविली जातील.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सहआयुक्त संवर्गातील एकूण ३ पदे मंजुर असून सद्यस्थितीत २ पदे भरलेली असून एक पद सेवानिवृत्तीमुळे रिक्त आहे. मात्र सदर पदासाठी सध्या उमेदवार पात्र नसल्याने सदर पद भरणे शक्य होत नाही.

मत्स्यव्यवसाय विभागातील प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय ही ७ पदे मंजुर असून सद्यस्थितीत सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या ७ पदांपैकी एक उमेदवार पात्र असल्याने त्यांचे पदोन्नतीचे आदेश काढण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ६ रिक्त पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर सदर रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र मत्स्यसेवा गट अ (कनिष्ठ तांत्रिक),सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक)/प्रकल्प व्यवस्थापक (दापचरी),या सवंर्गातील ४० पदांपैकी २० पदे पदोन्नतीची व २० पदे नामनिर्देशनाने (सरळसेवने) भरणे आवश्यक आहे. सदर पदोन्नतीच्या २० पदांपैकी दिनांक ४.३.२०१४ च्या आदेशान्वये १ पद,दिनांक २५.३.२०१५ च्या आदेशान्वये ६ पदे व दिनांक १७.५.२०१७ च्या आदेशान्वये ८ पदे अशी एकूण १५ पदे भरण्यात आली आहेत. मात्र सदर १५ पदांपैकी श्रीमती शितूत यांच्या विनंतीनुसार त्यांना मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी या पदावर डिसेंबर,२०१६ मध्ये पदावनत केल्याने सद्यःस्थितीत १४ पदे भरलेली आहेत. व पदोन्नतीच्या उर्वरित ६ पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने सदर पदे भरणे शक्य झालेले नाही.

संवर्ग निहाय रिक्तपदांच्या ८०% प्रमाणे ६७ पदे भरण्यास उच्चस्तर समितीने तात्काळ मंजूर करावे असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने सद्यास्थितीत रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

पदांचे नांव	मंजूर पदे		भरलेली पदे		रिक्त पदे	
	सरळसेवा	पदोन्नती	सरळसेवा	पदोन्नती	सरळसेवा	पदोन्नती
सहआयुक्त	-	३	-	२	-	१
प्रादेशिक उपआयुक्त	-	७	-	-	-	७
ठसहा. आयुक्त मत्स्यव्यवसाय	२०	२०	-	१५	२०	०५
मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी	२८	२८	०२	२५	२६	०३
सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी	१७०	-	९४	-	७६	-

गट-क (तांत्रीक) सहायक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी या संवर्गातील ३८ पदे शासनाने प्रदान केलेल्या मान्यतेनुसार भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्त कार्यालय स्तरावरून अंतिम टप्यात आहे.

गट-अ (कनिष्ठ तांत्रिक) संवर्गातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय व गट-ब (तांत्रिक) संवर्गातील मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी या पदाच्या सेवाप्रवेश नियमाबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकासेवा आयोगाला सादर केला असता त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २८.९.२०१७ रोजी प्राप्त झाली असून, सरळसेवेची सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय २० पदासाठी आणि मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी २६ पदांसाठी सुधारित मागणी प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात येत आहे.

परिच्छेद क्र. २.२.१४ संनियंत्रण -

कुठल्याही योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेतील तफावती/दोषांवर दोषनिवारक कार्यवाही करण्यासाठी आणि भविष्यात नियोजन करताना त्यामधुन बोध घेण्यासाठी अशा दोषांचा शोध घेण्याच्या दृष्टीने योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी संनियंत्रण अतिश्य महत्वाचे असते. विभागाकडून राबविल्या जाणा-या वेगवेगळया योजनांचे संनियंत्रण पुढील कारणांमुळे कमकुवत होते.

(i) जलाशयातील मासेमारी कार्यक्रम आणि बंधीस्त जलाशयातील मत्स्य शेती यांच्या प्रगतीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असणा-या नियतकालीक अहवालांचा अभाव.

(ii) RKVY अंतर्गत मत्स्यबीज केंद्रांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यांसाठी जिल्हाकडून योजनेचे तपशीलवार आराखडे प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांचा अभाव आणि (iii) जतन, वाहतुक व पणन योजनेअंतर्गत कामाच्या प्रगतीचा आढावा न घेता निधी मुक्त करणे.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(i) विदर्भ व मराठवाडा विभागात आवर्षण परिस्थितीमुळे तलावामध्ये मुबलक पाणी साठयाचा अभाव. तसेच विभागाच्या कार्यक्षमतेवर सक्रीय आणि उपयुक्त आणि अनुकूल परिणाम करणा-या वरिष्ठव कनिष्ठ संवर्गातील तांत्रिक आणि प्रशासकीय संवर्गातील अधिका-यांची पदे रिक्त असूनही अतिरिक्त कार्यभार देऊन योजनांची अंमलबजावणी करण्यांत येते.

(ii) RKVY अंतर्गत मत्स्यबीज केंद्रांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण करतांना तांत्रिक अडचणी व अपुरा प्रशिक्षित कर्मचारी वृंद असल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या.

(iii) जतन, वाहतुक व पणन योजनेअंतर्गत कामाच्या प्रगतीचा आढावा घेऊन शासनाकडून निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येते.

परिच्छेद क्र. २.२.१५ निष्कर्ष -

राज्यातील मत्स्यव्यवसाय विकासाच्या नियोजनात अपर्याप्तता होत्या. नियोजन कालावधीत पुर्ण करावयाच्या विविध कार्ये घटकांसाठी पंचवार्षीक योजनेत वर्षनिहाय लक्ष्य आणि अनुरुप वित्तीय खर्च निर्देशीत केला नव्हता आणि वार्षिक विकास कार्यक्रम पंचवार्षीक योजनेतुन घेण्यात आले नव्हते. तसेच, राज्यातील भुजलाशयीन मत्स्य साधन संपत्ती आणि मासेमारी विषयक माहीती विश्वासनीय नव्हती, ज्यामुळे नियोजन प्रक्रियेवर विपरीत परिणाम झाला. विभागातील वसुली व्यवस्थापन सुमार होते कारण मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाकडुन ब-याच मोठया कालावधीपासुन लक्षणीय प्रमाणात भाडेपट्टा आणि कर्जे वसुलीसाठी प्रलंबीत होती. २०११ -१६ या कालावधीत रु.७.५० लक्ष टनाच्या लक्ष्याच्या तुलनेत माशांचे (भुजलाशयीन आणि सागरी) सरासरी वार्षीक उत्पादन फक्त रु.५.९१ लक्ष टन होते. (२१ टक्के तुट). निकृष्ट पायाभुत सुविधा आणि मनुष्य बळाच्या कमतरतेमुळे विभागाच्या मत्स्यबीज केंद्रामधुन मत्स्यबीजांचे उत्पादन अत्यंत कमी प्रमाणात होत होते.

अयोग्य जागेची निवड, लाभार्थी मच्छिमारांना अर्थसहाय्य मुक्त करण्यातील विलंब, कामाचे अंशतः / सदोष कार्यान्वयन इत्यादीमुळे मत्स्यव्यवासाय विकासाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झाला होता. मत्स्यव्यवसाय बंदरे आणि जेट्टी विकसीत करण्यात लक्षणीय प्रमाणत वाढीव वेळ लागला होता आणि अतिरिक्त खर्च झाला होता. विभागाकडे उच्च क्षमतेच्या इंजिन चलित गस्ती नौका नव्हत्या आणि सहाही सागरी तटीय जिल्हयांची गस्त कमी क्षमतेच्या इंजिन चलीत बोटी भाडयाने घेऊन त्याद्वारे केली जात होती. राज्यामध्ये नोंदणी झालेल्या सागरी मत्स्यमार नौका आणि प्रत्यक्षात परवाना प्राप्त सक्रिय मच्छिमार नौका यांच्या संख्येत मोठी तफावत होते त्याचा ताळमेळ घेतला नव्हता.अशा रितीने, विभागाने राज्याच्या सागरी मासेमारी नियमन अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी गंभीरतेने केली नव्हती. सदोष नियोजन आाणि संथ प्रगतीमुळे मच्छिमा-यांच्या कल्यांणासाठी आखलेल्या दोन योजनांच्या अंमलबजावणी करीता प्रतिकुल परिणाम झाला होता. महत्वाच्या पदांवर मनुष्यबळाची कमतरता होती विभागातील सनियंत्रण कार्यतंत्र अपर्याप्त होते.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात कृषि व पदुम (मत्स्यव्यवसाय) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी राबविण्यात येणा-या योजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतुन उपलब्ध होणा-या निधीच्या प्रमाणात कामे हाती घेणे क्रमप्राप्त असल्याने त्याच्या प्रगतीवर परिणाम झाल्याचे दिसून येते.

विदर्भ व मराठवाडा विभागात आवर्षण परिस्थितीमुळे तलावामध्ये मुबलक पाणी साठयाचा अभावामुळे तलाव भाडेपट्टयावरील वसुलीचे आणि मत्स्यबीज उत्पादन कमी प्रमाणात झाले.

समुद्रावरील मासेमारी करतांना होणा-या अपघातामध्ये मच्छिमारांच्या मृत्यू ,बंद अवस्थेतील बोटी, तसेच जीर्ण झालेल्या बोटी, इत्यादी कारणामुळे मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाकडून कर्ज वसुलीसाठी योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे कर्जवसुलीचे प्रमाण कमी आहे.

मत्स्यव्यवसाय विभागास जेटी व बंदरे या विकास कार्यक्रमातंर्गत केंद्रीय केंद्रपुरस्कृत योजना RKVY व नाबार्ड अंतर्गत तरतुद प्राप्तहोते. विभागाकडे कार्यकारी अभियंता हे पद असुन त्याच्या अधिपत्याखालील कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे टेंडर MCZA याच्या परवानगीने होते. व प्रत्यक्ष बांधकाम होण्यावेळी स्थानीक मच्छीमारांचा विरोध इत्यादी सर्व कारणामुळे जेटी व बंदरे याच्या बांधकामास विलंब होतो.

विभागाकडेउच्च क्षमतेच्या इंजिन चलित गस्ती नौका उपलब्ध नव्हत्या राज्याच्या जलधि क्षेत्रात उपलब्ध लाकडी व फायबर मासेमारी नौका भाडयाने घेण्याकरीता इ-निविदेद्वारे प्रयत्न करण्यात आले होते. इ-निविदा देऊनही निविदानां प्रतिसाद न मिळाल्यामुळे गस्तीनौका उपलब्ध झाल्या नाही. तथापि महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ ची अमलबजावणी करण्यारिता गस्ती नौकांची गरज असल्यामुळे इ-निविदेद्वारे उपलब्ध झालेल्या गस्ती नौका भाडयाने घेऊन गस्त घालण्यात आली.

राज्याच्या सागरी जिल्हयात परवाना अधिका-यांची पदे कमी प्रमाणातअसल्यामुळे तसेच अमलबजावणी अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे गस्ती नौकाद्वारे अवैद्य मासेमारी करण्या-यापकडण्यातआलेल्या नौकांवरकारवाई करताना अडचणी निर्माण होत होत्या. तालुक्यातील तहसीलदार हे अभिनिर्णय अधिकारी असल्याने, अवैद्य मासेमारी करण्या-या नौकांवर कारवाई करतांना विलंब होतो. मत्स्यव्ययवसाय विभागाच्या त्या-त्या जिल्हयातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना तहसिलदारऐवजी अभिनिर्णय अधिकारी म्हणून घोषित केल्यास अवैद्य मासेमारी करण्या-यानौकांधारकांवर तात्काळ कारवाईकरणे विभागास सुलभ होईल, असे वाटत असल्याने तसे करणे शक्य आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करण्यात येत आहे.

साक्ष :-

२. महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विभागाच्या सन २०११-१६ कालावधीच्या कार्यसिध्दी लेखा परीक्षेत महालेखाकारांना असे आढळून आले की, सांख्यिकीय परिपूर्ण / सक्षम आणि शास्त्रोक्त पध्दतीचा वापर करुन केल्या जाणा-या भूजलाशयीन मासेमारी विषयी विश्वासनीय माहिती उपलब्ध नसल्यामुळे मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी केले जाणारे नियोजन अपर्याप्त होते. तसेच विभागाने दीर्घकाळ मत्स्य सहकारी संस्थांकडून भाडेपटटा व कर्जाच्या लक्षणीय हिश्श्याची वसुली केली नव्हती.

निर्धारित ७.५० लक्ष टन वार्षीक मत्स्य पैदाशीच्या (भुजल व सागरी) तुलनेत सरासरी वार्षीक पैदास फक्त ५.९१ टन होती. ६० कोटी इतकी वार्षिक मागणी असताना मत्स्यबीज केंद्रातील वार्षिक मत्स्यबीज उत्पादन २.४३ कोटी ते ८.१६ कोटी होते. तसेच स्थानिक मच्छिमारांकडून होणारा विरोध, जमीन अधिग्रहण करण्यात, निधी मुक्त करण्यात आणि निविदा प्रकियेत होणा-या विलंबामुळे मासेमारीसाठीची बंदरे ,जेटी, सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र , बर्फाचा कारखाना आणि शीतगृहे इत्यादी सारख्या सागरी मत्स्यव्यवसायाच्या पायाभूत सुविधा निर्मितीवर प्रतिकूल परिणाम झाला. मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठीच्या विविध योजनांमध्ये अयोग्य जागेची निवड, लाभार्थी मच्छिमारांना अर्थसहाय्य देण्यातील विलंब, अर्धवट बांधकाम / कामाचे सदोष कार्यान्वयन इत्यादीमुळे अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम झाला. विभागाकडे स्वतःच्या मालकीच्या उच्च क्षमतेच्या इंजिन चलित गस्ती नौका नसल्यामुळे सहा सागरी तटीय जिल्हयांमध्ये गस्त घालण्यासाठी कमी क्षमतेच्या इंजिनचलीत नौकांचा भाडेतत्त्वावर वापर केला जाता होता. विभागाने प्रत्यक्षात परवाने दिलेल्या सागरी नौकांपेक्षा नोंदणी झालेल्या नौकांची संख्या खूपच अधिक होती, त्यामुळे बेकायदेशीर मासेमारी होत असल्याची शक्यता दर्शविण्यात येते.

मच्छिमारांसाठी विभागाकडून ज्या दोन कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी व्हावयाची होती त्यांपैकी एक (किरकोळ मत्स्यविक्रीसाठी फिरते वाहन योजना) सदोष नियोजनांमुळे सुरुच होऊ शकली नाही व दुसरी (आदर्श मच्छिमार ग्रामविकास) अंमलबजावणी दीर्घकाळ लांबली. सहआयुक्त ,प्रादेशिक उपायुक्त ,सहाय्यक आयुक्त इत्यादी महत्तपूर्ण पदांवरील मनुष्यबळ अपूरे होते.विभागातील सनियंत्रण कार्यतंत्र पर्याप्त नव्हते.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या कामकाजासंदर्भात महालेखाकारांना आढळून आलेला त्रुटीसंदर्भात समितीने दि. २१/११/२००१७, ५ व २०/२/१८ व ३/४/१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

परिच्छेद क्र. २.२.६ 'लेखापरीक्षेचे निष्कर्ष' :-

मत्स्यव्यवसाय विभागाच्या वाटचाल व कामकाजासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, मत्स्यव्यवसाय विभागाचे मुख्य कार्यालय येथे असून या विभागाअंतर्गत सात विभागीय उपायुक्त कार्यरत आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय कार्यरत आहेत. तसेच एक मत्स्य विकास महामंडळ सुद्धा आहे. या विभागाचे तीन कार्यक्षेत्र आहेत त्यामध्ये १) किनारपट्टी क्षेत्र २) अंतर्देशीय क्षेत्र ३) साठवण पाणी क्षेत्र ह्या तीन क्षेत्रांत काम केले जात आहे. किनारपट्टी क्षेत्रामध्ये सात जिल्ह्यांची मिळून ७२० किलोमीटर लांबीची समुद्र किनारपट्टी आहे. सदरील किनारपट्टीवर होणारी मासेमारी, मत्स्य उत्पादन आणि मत्स्य व्यवसायाशी संबंधित ज्या काही बाबी असतील त्याचे नियंत्रण मत्स्यव्यवसाय विभागामार्फत करण्यात येते. साठवण पाणी क्षेत्रातील खार जमीन भागातील मत्स्य उत्पादनाचे नियंत्रण करण्यात येते. अंतर्देशीय मासेमारीचे वेगवेगळ्या जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय यांच्यामार्फत नियंत्रण करण्यात येते. तसेच ठेका देणे, मत्स्य उत्पादन नियंत्रण आणि पर्यवेक्षण करणे इत्यादी कार्ये केले जातात. केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या मत्स्य विकासाच्या ज्या काही विविध योजना आहेत त्यांच्या अंमलबजावणीचे कार्य पार पाडण्यात येते.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या विकासासाठी ज्या काही योजना किंवा सरकारने आखलेली धोरणे आहेत त्याबाबतीत मागील दोन ते तीन वर्षातील नवीन योजना किंवा नवीन धोरणे सरकारकडून राबविण्यात आलेली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केंद्र सरकारच्या योजनेनुसार नील क्रांती ही योजना राबविण्यात येते. या योजनेचा उद्देश असा आहे की, सध्या होत असलेले अंतर्देशीय मत्स्य उत्पादन पाच वर्षात दुप्पट करणे. सदरील योजना ही सन २०१६-१७ पासून सुरू झालेली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून सन २०१६-१७ मध्ये २१ योजना मंजूर केलेल्या असून यामध्ये मत्स्य तलावांचे बांधकाम, जुन्या मत्स्य तलावांची दुरुस्ती, माश्यांसाठी खाद्य निर्मितीचा विभाग सुरू करणे अशा वेगवेगळ्या योजना आहेत. सन २०१६-१७ मध्ये मंजूर झालेल्या २१ योजना ह्या सन २०१७-१८ मध्ये अंमलात येतील. सदरील योजना नवीन असल्यामुळे मार्च २०१७ पर्यंत अंमलात आणता आलेल्या नाहीत. त्या योजना पुनर्मल्यांकित करून मिळाल्या असल्यामुळे त्या सन २०१७-१८ या वर्षात अंमलात आणल्या जाणार आहेत. तसेच सन २०१७-१८ साठी काही नवीन योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या त्यांना मंजुरी मिळाली आहे.

मत्स्य विकासाचे संशोधन आणि तंत्रज्ञान हे मच्छिमारापर्यंत पोहोचविणे हे विभागाचे काम आहे. याबाबतीत काही त्रुटी, किंवा ज्या गोष्टी व्हावयास पाहिजे होत्या त्या झालेल्या नाहीत म्हणून सदर आक्षेप महालेखाकारांनी काढले आहेत. विशेषतः ७२० किलोमीटरचा जो समुद्रकिनारा आहे तो आणि इतर ठिकाणी राबविण्यात येणा-या योजना हया परंपरागत आहेत की त्यात काही नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून योजना राबविण्यात येत आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरील व्यवसायासाठी पिंजरा पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. या पद्धतीला सध्या प्रोत्साहन मिळत आहे आणि त्यांचा वापर बहुतांश लोक करत आहेत. प्रत्येक ९.५० पिंजरा पद्धतीसाठी राखून ठेवण्यात आलेला आहे. ज्यावेळेस निविदा काढण्यात येतात, त्यावेळी ब-याच मोठ्या प्रमाणात त्याची मागणी येत असल्याचे दिसते. सध्या पिंजरा पद्धती स्थापित करण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे तसेच त्याची मागणी सुद्धा येत आहे.

पण मत्स्यव्यवसाय विभागाचे जे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते ते साध्य करण्यात आलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१६-१७ या वर्षाचे मत्स्य उत्पादन ४ लाख ६७ हजार मेट्रीक टन एवढे झालेले आहे.

विभागाने जे पाच वर्षासाठीचे सन २०१२ ते २०१७ नियोजन केले आहे त्यातून काही योजनांचे संकलितपणे उद्दिष्ट दिसते. विभागाचे उद्दिष्ट गाठण्याचे नियोजन हे सर्व योजनेचे असले पाहिजे. नियोजनात उद्दिष्ट, आतापर्यंत साध्य केलेले उद्दिष्ट अशा सर्व बाबींचा बोध होत नाही. ज्या ज्या योजनांसाठी काम केलेले आहे त्यांचे उद्दिष्ट सदरील नियोजनात दाखविण्यात आलेले आहे. पण इतर योजनांची माहिती देण्यात आलेली नाही. महालेखाकार यांचे एवढेच म्हणणे होते की सर्व योजनांचे प्रत्येक वर्षी साध्य करावयाचे प्रत्यक्ष उद्दिष्ट आणि वित्तीय लक्ष्य दर्शविण्यात यावे. तसे विभागाकडून दर्शविण्यात आलेले नाही. सन २०१४ व १५, २०१५-१६ च्या तुलनेमध्ये सन २०१६-१७ च्या मत्स्य उत्पादनामध्ये किती टक्क्यांनी वाढ झालेली आहे ? जर वाढ होत असेल तरच मत्स्यव्यवसाय संशोधनाचा उपयोग आहे याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, सन २०१६-१७ या वर्षाचे मत्स्य उत्पादन किती आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१६-१७ या वर्षाचे समुद्र किनारपट्टीचे मत्स्य उत्पादन ६.६७ लाख मेट्रीक टन इतके झालेले आहे. अंतर्देशीय मत्स्य उत्पादन हे २ लाख मेट्रीक टन इतके झालेले आहे.

अंतर्देशीय मत्स्य उत्पादनाचे उद्दिष्ट हे १.५ लाख मेट्रीक टन करण्याचे होते पण येथे २ लाख मेट्रीक टन उत्पादन काढलेले आहे. ज्यावेळी पाच वर्षाचे नियोजन तयार करण्यात येते त्यावेळी सर्व योजनांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात यावयास पाहिजे. सर्वसमावेशक स्वरूपाचे नियोजन तयार करावयास पाहिजे. तशा प्रकारचे सर्वसमावेशक नियोजन विभागाकडून करण्यात आलेले नाही असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली.

उपलब्ध अंतर्देशीय क्षेत्रामध्ये किती मत्स्य व्यवसाय होऊ शकतो याबाबतचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे काय ? सदरील क्षेत्राची क्षमता न तपासता उद्दिष्ट ठरविण्यात आले होते काय ? तसेच भूजलाशयीन मोसमारी विषयाची गणती करण्यासाठी माहिती गणक हे पद ठेवण्यात आले नाहीत तेव्हा नियोजन कसे करण्यात आलेले आहे ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मत्स्य व्यवसाय करण्यासाठी विभागाकडून सर्व प्रकारचे नियोजन करण्यात आलेले आहे. उपलब्ध आंतरदेर्शीय क्षेत्रामध्ये किती मत्स्यव्यवसाय होऊ शकता याबाबत सर्वेक्षण करण्यासाठी समुद्र किनारपट्टीसाठी कर्मचारी वर्ग आहे. तशा प्रकारचा कर्मचारी वर्ग अंतर्देशीय क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्यासाठी विभागाकडे उपलब्ध नाही. केंद्र सरकारकडून कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी नेमण्यास मंजुरी मिळाली आहे.

मत्स्य उत्पादन करण्यात येणारे जे तलाव आहेत त्यात जाणीवपूर्वक कमी उत्पादन होत असल्याचे दाखविण्यात येते आणि ठेकेदारांना ती वाढवून देण्यात येतात. ज्या ठिकाणी दहा टन उत्पादन होते तेथे एक टन उत्पादन होत असल्याचे दाखविण्यात येते असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. समुद्र किनारपट्टी आणि अंतर्देशीय मत्स्य उत्पादनात काहीही फरक नाही. समुद्र किनारपट्टीचे मत्स्य उत्पादनाचे कोष्टक ठरविण्यात आलेले आहे. अंतर्देशीय क्षेत्रात केवळ विदर्भामध्ये सध्या जवळ जवळ २५ लाख टन मत्स्य उत्पादन होत आहे पण प्रत्यक्षात मात्र एवढे उत्पादन होत असल्याचे दाखविण्यात येत नाही. विदर्भातील कटला, रुई हे मत्स्य उत्पादन कलकत्ता या ठिकाणी जाते. जिल्हा मत्स्य कार्यालयाकडून मत्स्य उत्पादनाची क्षमता कमी दाखविण्यात येत आहे. त्यामुळे लिलाव सुद्धा कमी होतो. लिलाव कमी झाल्यामुळे रक्कम कमी होते आणि कमी दराने ठेकेदारांना हे तलाव मिळतात. हा सर्व प्रकार संगनमताने घडून येतो, याकडे मात्र कोणीही लक्ष देत नाही.तसेच दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याप्रमाणे समुद्र किना-यावर मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो त्याप्रमाणे अंतर्देशीय क्षेत्रात मत्स्य उत्पादनात वाढ व्हावी यासाठी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत. गोंदिया, चंद्रपूर या भागात खरे आदिवासी मच्छिमार लोक आहेत. याचे सर्वेक्षण विभागाकडून करण्यात येणार आहे का नाही ? या ठिकाणी कर्मचारी वर्गाचा प्रश्न नाही कारण कर्मचारी वर्गाचे सूत्र विभागास देण्यात आलेले आहे. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (NCDC) जी प्रकरणे येतात ती किती क्षमता आहे या बाबीवरूनच ठरविण्यात येतात येथे समितीने लक्ष वेधले असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत खुलासा केला की, या विभागांतर्गत राज्यात एकूण १०५० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६४९ पदे भरलेली असून ४०१ इतकी पदे रिक्त आहेत. तसेच समुद्र किनारपट्टीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी विभागाकडे कर्मचारी वर्ग मंजूर झालेला आहे. त्याप्रमाणे अंतर्देशीय क्षेत्रासाठी वेगळा कर्मचारी वर्ग विभागाकडे उपलब्ध नाही. जिल्हा मत्स्य कार्यालयाकडे जो नियमित कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे त्यांच्या मार्फतच हे काम करुन घेण्यात येते.

बारा अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे केंद्र शासनाने जरी ऑक्टोबर २०१३ मध्ये मंजूर केली होती आणि २०१३-१४ पासून प्रत्येक वर्षी वेतनासाठी अनुदाने मुक्त केली जात होती (चार सध्याची पदे आणि १२ माहिती गणकांची पदे यासाठी) तरीही ३८ महिन्यांचा कालावधी उलटूनही विभागाकडून माहिती गणकांची पदे भरली जाऊ शकली नव्हती. (नोव्हेंबर २०१६) १२ माहिती गणकांच्या वेतन अनुदानाचा अखर्चित हिस्सा/भाग GOI ला प्रत्यार्पित करण्यात आला किंवा पुढील वर्षीच्या वापरासाठी GOI ने तो पुर्नवैध केला असा आक्षेप महालेखाकारांचा आहे त्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, केंद्र शासनाकडून विभागास जे अनुदान दिले जाते त्याचा वापर करण्यासाठी विभाग ५-५ वर्षे कंत्राटी पध्दतीच्या गणकांच्या पदावर नियुक्ती करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे आराखडे तयार करणे व त्यांचे नियोजन करणे या बाबी देखील विभागाकडून होत नाहीत. त्याबद्दल मत्स्यव्यवसाय विभागाने अजूनही वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेले नाहीत. या कंत्राटी नियुक्त्या न करण्याची कारणे कोणती आहेत. जर या नियुक्त्या नियमित नाहीत तरी सुध्दा अश्या नियुक्त्या करण्यासाठी पाच-पाच का वर्षे लागतात ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंबंधी राज्य शासनाचा दिनांक २ फेब्रुवारी, २०१३ रोजीचा एक शासन निर्णय आहे. त्यानुसार आऊटसोर्सिंगद्वारे नियुक्त्या करताना त्या वित्त विभागाच्या मान्यतेने करण्यात याव्यात असे म्हटले आहे. आता प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे. त्यांच्या काही त्रुटी होत्या त्यांची पूर्तता करुन आता पुन्हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे. तसेच यासंदर्भात विभागाकडून विलंब झाला आहे हे देखील विभागाने मान्य केले.

कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याची मान्यता सन २०१२ मिळालेली आहे आणि तेव्हापासून सन २०१७ पर्यंत केंद्र शासनाच्या अनुदानातून कंत्राटी गणकांची पदे भरण्यासाठी जो निधी वापरायचा होता त्यासाठी विभागाला ५-५ वर्षे शासनाची मान्यता घेता आली नाही तसेच पूर्वी केंद्र शासनाकडून निधी आल्यानंतर वित्त विभागाची मंजूरी मिळाली नसल्यामुळे ही पदे भरली नाहीत असे नमूद केले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत खुलासा केला की, आधी हा प्रस्ताव दिनांक ९.२.२०१७ ला पाठविला होता. त्यानंतर त्यांच्या काही बॅक क्युरीज आल्या होत्या. त्यानंतर तो पुन्हा दिनांक ९.५.२०१७ ला पाठविला आहे. विभागाने सन २०१३-१४ ला पाठवावयाचा प्रस्ताव दिनांक १६.९.२०१६ ला प्रथम वित्त विभागाकडे पाठविला. मधल्या काळात काहीच केले नाही. आता पाठपुरावा सुरू केला तर गेल्या एक ते दीड वर्षापासून परवानगी मिळत नाही. सद्यःस्थितीत सदर फाईल कोठे आहे ते सांगावे. वित्त विभागाकडे सदर फाईल बॅक क्युरीची पूर्तता करुन पाठविली असेल तर ती कधी पाठविली अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आयुक्तालयाने शासनाच्या पदुम विभागाकडे दिनांक २६.९.२०१५ ला प्रस्ताव पाठविला आहे आणि त्यांच्याकडून पुढे पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रस्ताव पाठविला आणि आता त्यालाही दोन महिने झाले असताना त्यावर काही निर्णय झालेला नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१३-२०१४ ला मंजूरी मिळाली पण आता वित्त विभागाकडे पाठपुरावा करुन लवकरात लवकर मान्यता घेण्यात येईल.

यामध्ये विभागाला तर काही निधी द्यायचा नाही. केंद्र शासनाकडून अनुदान आलेले आहे. त्याला विभागाकडून वारंवार पूर्तवैध (रिव्हॅलीडेट) करण्यात येत आहे. हा महत्त्वाचा विषय असून याबद्दल विभागाची नक्की काय भुमिका आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, लवकरात लवकर वित्त विभागाची मान्यता घेऊन ही पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, ज्यावेळी महालेखाकारांनी यासंबंधी लेखापरिक्षण केले होते तेव्हा विभागाने वित्त विभागाचा उल्लेख केला नव्हता. ही पदे विभागालाच भरावयाची होती. ही केंद्र शासनाने मंजूर केलेली पदे होती आणि त्यासाठी अनुदान सुध्दा केंद्र सरकारच देते. विभागाला फक्त ही पदे भरायची होती व त्यावर हे डेटा एन्युमरेटर्स काम करणार होते. त्यातून विभागाच्या उत्पादनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अक्युरेट डेटा मिळाला असता, हा मुद्दा होता. This is aspecially sponsored scheme for strengthening data base and GIS for fisheries sector. यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर पदे मत्स्यव्यवसाय विभागाने भरावयाची होती मात्र त्यासाठी वित्त विभागाची मान्यता हवी होती. आता लवकरात लवकर वित्त विभागाची मान्यता घेण्यात येईल.

सदर पदे वित्त विभागाची मान्यता घेऊन भरावीत.तपण आतापर्यंत का भरण्यात आली नाहीत याची कारणे काय आहेत आणि जर कारणे नसतील तर ही कार्यवाही आता किती दिवसात करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगतले की, पूर्वी केंद्र शासनाकडून निधी आल्यानंतर वित्त विभागाची मंजुरी मिळाली नसल्यामुळे ही पदे भरली नाहीत. आता वित्त विभागाची मान्यता मिळाल्यानंतर १५ दिवसांत सदर पदे भरण्यात येतील.

राज्य सरकारवर ज्या बाबीचा वित्तीय भार पडत असेल त्याच्याबद्दल उच्चाधिकार समितीपर्यंत विषय जाऊन ती समिती त्याचा निर्णय घेते. परंतु मत्स्यव्यवसाय विभागाला केंद्र शासनाच्या अनुदानातून जो निधी स्पेसिफिक कामासाठी मिळत आहे, त्यामध्ये १२ कंत्राटी गणकांची नियुक्ती करावी असे आदेशात नमूद आहे आणि त्यासाठी केंद्र शासनाने ऑलरेडी निधी दिलेला आहे. विभागाकडून दरवर्षी त्याला पुनवैध करण्यात येते. गणकांची नियुक्ती करीत नाही आणि समितीला सर्व बोगस आकडे सांगता. दीड लाख किंवा दोन लाख उत्पन्न वाढले. जर गणकच नसतील तर या आकड्यांवर कोणी विश्वास ठेवायचा ? गणकाची किंवा कोणतीही इतर पदे निर्माण करुन भरावयाची असतील तर दोन महिन्यांचा कालावधी खूप होतो. विभागाला तर या कामी ५-५ वर्षे लागली आहेत.तही पदे तर कंत्राटी स्वरुपाची तात्पुरती असून त्याचा निधी सुध्दा राज्य सरकारच्या तिजोरीतून जात नाही तर केंद्र सरकारने तो निधी दिलेला आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता वित्त सचिवांनी समितीस अवगत केले की, मत्स्यव्यवसाय विभागास ही पदे भरण्याच्या नस्तीबद्दल त्यांना माहिती नाही. परंतु सर्वसाधारणपणे उच्चाधिकार समितीसमोर जेव्हा मोठ्या प्रमाणावर पदे भरायची असतात तेव्हा जातो. केंद्राचा निधी असेल तर अशी पदे भरण्यासाठी जनरली परवानगी देण्यात येते. त्यामध्ये राज्याचा आणि केंद्राच्या हिश्याचा काही भाग असेल तर तो रेशियो बघावा लागतो.

यामध्ये केंद्र शासनाचे १०० टक्के अनुदान आहे. असे असताना ४-४ वर्षे लागत असतील तर यामध्ये विभागाकडून पाठपुराव योग्य रितीने होत नसल्याचे दिसून येते असे मत समितीने व्यक्त केले. व तसेच यासंदर्भात वित्त विभागाकडून देखील स्पष्टीकरण घेण्यात यावे असे निदेश समितीने दिले असता वित्त सचिवांनी समितीस अश्वास्त केले की, सदर नस्ती पाहून याबाबत माहिती देण्यात येईल. त्यानूसार वित्त विभागाकडून प्राप्त झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) "मत्स्य व्यवसाय क्षेत्राची आधारसामुग्री (Database) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) यांचे बळकटीकरण' या १००S केद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत, अंशकालिन कंत्राटी सामुग्री प्रगणक (Part time contractual data enumerator) यांची १२ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागात प्रथम दि. २५/०६/१४ रोजी प्राप्त झाला. सदर प्रस्तावावर कंत्राटी कर्मचा-यांना किती कालावधीसाठी नियुक्त करण्यात येणार आहे, त्याचा कालावधी नमूद करावा, असे अभिप्राय नोंदविण्यात येऊन धारिकास दि. ०१/०९/१४ रोजी मत्स्यव्यवसाय विभागास परत पाठविण्यात आली.

ब) त्यानंतर सदर धारिका विभागाकडून दि. १५/०५/१७ रोजी या विभागास पुन्हा प्राप्त झाली. त्यावर या विभागाने काही मुद्दे उपस्थित करुन धारिका दि.०५/०५/१७ रोजी पुन्हा विभागाकडे परत पाठविली.

क) तद्नंतर विभागाने दि.०५/१०/१७ च्या टिप्पणीअन्वये शेरेपूर्तता करुन धारिका वित्त विभागाकडे परत मान्यतेस्तव पाठविली. वित्त विभागाने सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी धारिका अमुस (व्यय) व अमुस (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या उपसमितीय दि. ०९/११/१७ रोजी सादर केली. तथापि, सदर प्रकरणी उपसमितीच्या मान्यतेचा प्रश्न उद्भवत नसल्याचे नमूद करुन साप्रविने धारिका पुनश्चः या विभागाकडे दि.१५/१२/१७ रोजी पाठविली.

ड) तद्नंतर वित्त विभागाने दि.२४/०१/१८ च्या टिप्पणीअन्वये प्रस्तुत प्रकरणी पद माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबतचे अभिप्राय देऊन धारिका साप्रविस पाठविली. त्यावर साप्रविने दि.०२/०२/१८ च्या टिप्पणीअन्वये माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत, असे नमूद करुन धारिका या विभागाकडे पाठविली. सदर धारिका दि.०५/०२/१८ रोजी मस्त्सव्यवसाय विभागाकडे परत पाठविण्यात आली.

ई) मत्स्यव्यवसाय विभागाने दि.२०/०२/१८ च्या टिप्पणीन्वये IT विभागाचे अभिप्राय घेण्याची आवश्यकता नसल्याचे नमूद करुन मान्यतेस्तव धारिका सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविली. सामान्य प्रशासन विभागाने अमुस (सेवा) व अमुस (व्यय), वित्त विभाग यांच्या मान्यतेस्तव दि.२६/०२/१८ रोजी धारिका सादर केली सदर धारिका या विभागास दि.०१/०३/१८ रोजी प्राप्त होऊन २०/०३/१८ रोजी त्याला मान्यता देण्यात आली.

फ) उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अंशकालिन कंत्राटी सामुग्री प्रगणक (Part time contractual data enumerator) यांची १२ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्याबाबत प्रस्तावावर वित्त विभागात कार्यवाही करण्यात आलेली आहे.

५. प्रस्तुत आश्वासनाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते, उपरोक्त बाबी अ.मु.स. (विसु) यांचया निदर्शनास आणण्यात आल्या असून आश्वासनाची पूर्तता झालेली आहे. सद्यःस्थितीत अंशकालिन कंत्राटी सामुग्री प्रगणकाची १२ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, समितीला विभागीय प्रतिनिधींकडून अपेक्षित उत्तरे प्राप्त होत नसल्याने सदर साक्ष समितीने प्रलंबित ठेवली.

समितीच्या पुढील बैठकीत उपरोक्त विषयाबाबत पून्हा चर्चा करण्यात आली त्यावेळी समितीने नमूद केले की, केंद्र सरकारने सन २०१२-२०१३ मध्ये १२ पदे मान्य केली होती. आऊटसोर्सींगची पदे ४-५ वर्षे भरता येत नाहीत, ही शोकांतिकाच आहे. त्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एम.पी.एस.सी.) लागू नाही, काहीच नाही फक्त आऊटसोर्सींग करावयाचे होते. त्या अभावी आराखडा, नियोजन काहीच करता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. याकरिता कोण दोषी आहे ? मत्स्यव्यवसाय विभागाकडून सन २०१६-२०१७ मध्ये वित्त विभागाकडे फाईल पाठविली जाते. त्यावर वित्त विभाग ज्या त्रुटी काढतात, त्याचे उत्तर विभागाकडून ४-६ महिने देण्यात येत नाही. आयुक्त कार्यालयात बाबी प्रलंबित असतात, अशा अनेक बाबी या परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीच्या समोर आलेल्या आहेत. वित्त विभागाकडे सदर प्रस्ताव केव्हा सादर केला होता ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने विभागाला सन २०१३ मध्ये कळविले होते. त्यानंतर दिनांक ९.४.२०१४ रोजी आयुक्तांकडून शासनाकडे प्रस्ताव आला. मत्स्यव्यवसाय विभागाने तो वित्त विभागाला दि.२५.८.२०१४ रोजी सादर केला.

पण समितीला सादर केलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केले होते की, दि. १६.९.२०१६ रोजीच्या पत्राद्वारे शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून तो सन २०१७ मध्ये वित्त विभागाच्या मान्यतेसाठी पाठविला. सन २०१६ पासून कारवाई सुरु झाली व ती सप्टेंबर, २०१७ पर्यंत रेंगाळत होती. मग ही आता सन २०१४ ची तारीख कोठून आणली आहे ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाला मत्स्यव्यवसाय विभागाने अगोदर विचारले होते तेव्हा त्यांनी दि.२५.८.२०१४ रोजी कळविले. त्यानुसार दिनांक १४.१.२०१५ रोजी आयुक्त कार्यालयाला कळविले की, सदर प्रस्ताव सादर करावा व त्यांनी दिनांक १६.९.२०१६ रोजी प्रस्ताव सादर केला.

केंद्र सरकार वेतन देणार असताना, त्याकरिता १०० टक्के ग्रँट असतानाही याबाबत विभागाची जी पूर्ण अकार्यक्षमता होती, त्याकरिता कोण जबाबदार आहे, त्याकरिता काही कारवाई केली काय ? तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्क्युलेटरीमध्ये ते मंजूर होत आहे. वित्त विभागाने ते सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविले आहे. वित्त विभागाने त्याला मान्यता दिलेली आहे. दिनांक ९.६.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार उच्चस्तरिय अंशसेवा सा.प्र.वि. व अ.मु.स. (व्यय) यांच्या उप समिती समोर सादर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. तसेच या प्रकरणासंदर्भात सध्या तरी कारवाई केलेली नाही परंतु, सदर कारवाई करण्यात येईल.

ज्या पदांकरिता केंद्र शासनाची १०० टक्के ग्रँट आहे, त्या पदांसाठी हायपॉवर समितीची मान्यता कशासाठी लागते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कंत्राटी पदांनाही मान्यता लागते. त्यांनी त्यामध्ये असा कोणताही अपवाद दिलेला नाही.

या प्रक्रियेकरिता ४-५ वर्षे लागतात काय ? महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, "Non-availability of proper persons conducting census of inland fish catch through sample survey, the database of inland fisheries, resources and catch of the fish in the state was not reliable and affected the planning. पूर्ण नियोजनावर याचा विपरित परिणाम झाला. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी मान्य केले की, हे थोड्या फार प्रमाणात खरे आहे.

याकरिता कोण जबाबदार आहे ? आयुक्त कार्यालयाकडून ४-५ वर्षे प्रस्ताव येत नाही. आला तर वित्त विभागाकडे पाठपुरावा करुन त्याला मार्गी लावण्याचे काम २-२ वर्षे होत नाही. ऑक्टोबर, २०१३ मध्ये मान्यता मिळाली. आता सन २०१७ संपून सन २०१८ सुरु झालेले आहे. या पदांकरिता केंद्र शासनाची १०० टक्के ग्रँट मिळणार आहे. तसेच, ती पदेही कंत्राटी आहेत. हाय पॉवर कमिटी ही फक्त नवीन पोस्ट क्रिएट करण्याकरिता आहे. ती कंत्राटी पदांकरिता नाही. पण विभागीय सचिव सांगत आहेत की, कंत्राटी पदांकरिताही उच्चाधिकार समिती आहे तर तसा या संदर्भातील शासन निर्णय समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहारेकरी, शिपाई ही पदेही जेव्हा आऊटसोर्सींगने घेण्यात येतात तेव्हा एच.पी.सी.ची मान्यता घेऊनच ती पदे निर्माण करण्यात येतात. उच्चाधिकार समितीची मान्यता असेल तरच ती आऊटसोर्सींग पध्दतीने भरता येतात. मत्स्यव्यवसाय विभागामध्ये जे वॉर्डनचे पद निर्माण केले होते तो प्रस्तावही एच.पी.सी. समोर गेला होता. त्यांच्यापुढे सर्व जाते.

उच्चाधिकार समितीकडे प्रस्ताव गेले त्याला समितीची हरकत नाही मात्र ५-५ वर्षे इतका वेळ कशाकरिता लागतो ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता या सर्व प्रक्रियेला विलंब झाला हे विभागीय सचिवांनी मान्य केले व यासंदर्भात जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे देखिल अश्वास्त केले.

याकरिता कमिशनर, फिशरिज यांना जबाबदार धरले पाहिजे. कारण त्यांनी इतकी वर्षे प्रस्तावच पाठविलेला नाही. सन २०१६ मध्ये त्यांनी प्रस्ताव पाठविला. सन २०१३ ची मान्यता असताना इतके महिने विलंब झाला हा तर खूपच अक्षम्य अपराध आहे. याकरिता जबाबदारी शिथिल करुन समितीला १ महिन्याच्या आत कळवावे. असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी सदर माहिती समितीस कळविण्यात येईल असे अश्वास्त केले व याबाबतची सद्यःस्थितीबाबत सांगितले की, आता चक्रिय पध्दतीने पदे मंजूर करण्यास सादर केले होते. वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. तिघांची सही झाली की, ते मंजूर होईल. केंद्राला निधी रिव्हॅलिडेट करण्यास प्रस्ताव दिलेला असून सदर प्रस्ताव रिव्हॅलिडेट करुन घ्यावा लागेल.

गोड्या पाण्यात मासेमारी उत्पादन होणा-या व्यवसायाकडे मत्स्यव्यवसाय विभाग दुर्लक्ष करतो आणि त्यातून खासकरुन विदर्भातील स्थानिक मच्छिमारांवर दुर्लक्ष व अन्याय विभागाकडून होत आहे. राज्यात गोड्या पाण्यात मत्स्य व्यवसायाकरिता सुध्दा योजना आहेत. विदर्भामधील साधारणपणे ३० टक्के माल वाया जातो. कारण तेथे साठवणूक क्षमता नाही, कोल्ड्ड स्टोअरेज नाही, फिश हब नाही. अमरावती जिल्ह्यात सुध्दा अनेक तलाव, धरणे आहेत. मात्र तेथे फिश हब नाही. अमरावती येथे ४० कोटी रुपये खर्च करुन फिश हब निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. त्यापैकी २० कोटी रुपये इतका निधी अर्थसंकल्पात मंजूर झाला असून मागील एक वर्षापासून तो निधी अमरावती जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाला असून सुध्दा प्रत्येक वेळी अर्थसंकल्पीय तरतूद कमी आहे असे सांगण्यात येते. नीलक्रांतीमध्ये (ब्लू रिव्हॅल्यूएशन) मध्ये अनेक प्रस्ताव आहेत. मात्र अर्थसंकल्पीय निधी कमी असल्यामुळे त्यांना मंजुरी मिळत नाही असे विभागाचे म्हणणे असते. तसेच जो २० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला आहे तो निधी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे मागील एक वर्षापूर्वी दिलेला असताना सुध्दा मत्स्यव्यवसाय विभागाकडून या रकमेचा विनियोग करण्यासाठी हालचाल झालेली दिसून येत नाही. मात्र फिश हब नाही. याच्याशी संबंधित विभागाच्या अधिका-यांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. यासंदर्भात एकदा तरी एखादा अधिकारी या विषयाचा पाठपूरावा करण्यास दिल्लीला गेला काय ? पण या संदर्भात पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दोन वेळा दिल्लीला जाऊन तेथील मंत्री महोदयांना भेटून आले आहेत, जर विभागाच्या अधिका-यांनी दिल्लीला जाऊन पाठपुरावा केला असता तर उर्वरित २० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होऊन विदर्भातील पहिला भव्य फिश हब निर्माण होऊ शकला असता असे मत समितीने व्यक्त केले.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, अमरावती येथे फिश हबसाठी ४० कोटी रुपयांपैकी २० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होऊन आज २ वर्षाचा कालावधी संपत असताना विभागाच्या अधिका-यांनी सदर निधी परत न जाता त्याचा वापर होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या विषयासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार त्याच्या अध्यक्षतेखाली ३-४ वेळा बैठका झाल्या. त्यानुसार डीपीआर तयार असून तो विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ (एनएफडीपी) ला पाठविला होता. त्यानंतर एनएफडीपीला बैठक झाली होती. हा प्रकल्प पायाभुत सुविधामध्ये येतो आणि यामध्ये विकासाचे उपक्रम (डेव्हलपमेंट ॲक्टीव्हीटी) कमी दिसत असून बांधकामाच्या ॲक्टीव्हीटी जास्त आहेत. दरम्यानच्या काळात मागच्या वर्षीपर्यंत केंद्र सरकार आणि एनएफडीपीच्या वेगवेगळ्या योजना येत होत्या. मागच्या वर्षी त्या योजनांचे स्वरुप बदलून टाकून आता महाराष्ट्रासाठी जेवढ्या काही योजना मंजूर केल्या जातील त्या संपूर्ण नीतक्रांती (ब्ल्यू रिव्हॅल्यूएशन) या एकाच हेडखाली मंजूर केल्या जातील असे ठरविले आहे. दरम्यानच्या काळात आयुक्तांकडून अमरावतीच्या बाबतीत जो प्रस्ताव गेला होता त्यामध्ये अर्ध्या निधीचा समावेश केलेला नव्हता. त्यानंतर पाठपुरावा केल्यावरुन मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने केंद्रीय मंत्री महोदयांना पत्र पाठविले होते. त्यांनी सूचना दिल्यानंतर पुन्हा एनएफडीपीला गेलो.ोत्यानंतर त्यांनी तो प्रकल्प ब्ल्यू रिव्हॅल्यूएशनमध्ये घेतला. सप्टेंबर २०१७ मध्ये झालेल्या बैठकीमध्ये २० कोटी निधीपैकी त्यांनी फक्त ४ कोटी ८५ लाख रुपये इतक्या रकमेस कोल्ड स्टोअरेज बांधण्यासाठी मान्यता दिली असून आता या प्रकल्पासाठी टोकन प्रोव्हीजन प्राप्त झाली असे समजून या प्रकल्पाचे काम सुरू करण्यास काही हरकत नाही. त्यामुळे आता निविदा काढण्यास सांगण्यात येईल.

या निविदा किती दिवसात काढण्यात येणार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, यामध्ये एक अडचण आहे की, जे २० कोटी रुपये प्राप्त झाले आहेत ते पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवयास विभागाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्या निविदा काढण्यात येणार असून सदर निविदा महानगरपालिकेस काढण्यास सांगण्यात येणार आहे. पण विभागास राज्य शासनाचे २० कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. त्यामधून निविदा काढता येत नाही का ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ते २० कोटी रुपये नगरविकास विभागाकडे वर्ग केलेले आहेत. तो निधी त्यांनी मत्स्य व्यवसाय विभागाला दिलेला नाही. सदर निधी नगरविकास विभागाचा असल्यामुळे नगरविकास विभागाला डीपीसीमधून तो निधी दिला. आता या प्रकरणी जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल त्यानंतर जिल्हाधिकारी महानगरपालिका कळवितील आणि त्यानंतर यासंबंधीचे निविदा महानगरपालिका काढण्यात येणार आहे.

मत्स्यव्यवसाय विभाग तो निधी विहीत कालावधी वापरला नसल्यामुळे तो निधी व्यपगत झाला असता आणि मत्स्यव्यवसाय विभागाने नगरविकास विभागाकडे तो वर्ग केला आहे. नगरविकास विभागाने तो निधी जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग केला. हा निधी मत्स्यव्यवसाय विभागाला वापरता यावा आणि तो परत जाऊ नये अशी त्यामागील भावना होती. कारण जर तो निधी मत्स्यव्यवसाय विभागाकडे तसाच ठेवला असता तर त्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाचे शीर्ष सुध्दा तयार नव्हते व तसा प्रस्तावही तयार नव्हता म्हणून ती व्यवस्था करण्यासाठी नगरविकास विभागाकडे पाठवून नगरविकास विभागाकडून थेट जिल्हाधिकारी यांच्याकडे सदर निधी वर्ग केले. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये अंमलबजावणी करणारी एजन्सी महापालिका असल्यामुळे त्यांना निविदा काढण्यासंदर्भात आठ दिवसात कळविण्यात येईल.

उपरोक्त मुद्यासंदर्भात समितीच्या पुढील बैठकीत विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर प्रस्ताव नियोजन विभागाकडे होता. नियोजन विभागाकडून तो वित्त विभागाकडे पोहचविण्यात आलेला आहे. वित्त विभागाने सदर प्रस्तावाबाबत दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. सदर मासेमारी केंद्र हे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये होणार आहे त्यासाठी नगर विकास विभागाकडून आगाऊ २० कोटी रुपयांचे अनुदान सुद्धा देण्यात आलेले आहे. त्यामध्ये महानगरपालिकेचा काही हिस्सा आणि मत्स्यव्यवसाय विभागाचा हिस्सा आहे. जमीन ही महानगरपालिकेची असल्यामुळे आणि सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या हद्दीत होत असल्यामुळे तो पूर्ण झाल्यानंतर कोण चालविणार आहे ? त्याचे नियंत्रण कोण करणार आहे ? त्याची देखभाल आणि दुरुस्ती कोण करणार आहे ? याबाबत विचारणा करण्यात आली म्हणून सदर प्रस्ताव नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे पाठविण्यात आला आहे. दोन तीन दिवसामध्ये त्यांच्याकडून अभिप्राय मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढण्यात येतील.

यासंदर्भातत एक बैठक घेऊन सदर प्रकल्पाची कोण देखभाल आणि दुरुस्ती करणार आहे ते ठरवून घेण्यात यावे. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर प्रकल्प महानगरपालिका क्षेत्रातील आहे आणि त्यासाठी नगर विकास विभागाचे जास्त अनुदान आहे त्यामुळे सदर प्रकल्प महानगरपालिका चांगल्या पद्धतीने चालवू शकेल. त्यासाठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे आणि त्यातून महानगरपालिकेला उत्पन्नही मिळणार आहे. महानगरपालिकेकडे मनुष्यबळ उपलब्ध आहे आणि याबाबीमुळे उत्पन्नही मिळणार आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.७ - 'वित्तीय व्यवस्थापन' :-

राष्ट्रीय सहकार विकास निगम या योजनेअंतर्गत २५% रक्कम अदा केलेल्या २५४ अपूर्ण नौका पूर्ण करण्यासाठी सदर लेखाशीर्षाखालील रक्कम ५५% कर्ज वितरीत करण्यासाठी ६४०५ कर्जे या शिर्षाखाली पूर्णविनियोजनाने वळती करण्याबाबत प्रस्तावित केले होते. वित्त विभागाकडून मार्च अखेरीस सदर ५५% च्या प्रस्तावांस मंजूरी प्राप्त झाली नाही. तथापि, ४१ गटांसाठी २५% रक्कम वितरीत करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाकडून दिनांक ३१/३/२०१३ रोजी मंजूरी प्राप्त झाली. दरम्यानच्या कालावधीत बीडीएस प्रणाली बंद झाल्यामुळे २५% रक्कम ४१ गटांना वितरीत करणे शक्य झाले नाही. सबब सदर रक्कम अखर्चित राहीली असल्याने समर्पित करणे क्रमप्राप्त झाले, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, जर शेवटच्या दिवशी वित्त विभागाकडे मंजुरी मागितली तर वित्त विभाग शेवटच्या दिवशीच मंजुरी देणार का ? नस्ती दोन दिवसांपूर्वी सादर करायची मग शेवटच्या क्षणी मंजुरी घ्यायची व नंतर बी.डी.एस.वर पैसे नाही असे म्हणायचे असे येथे झाले असेल, यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर प्रस्तावास दिनांक ३१.३.२०१३ रोजी मंजुरी मिळाली असल्यामुळे त्यात वेळ गेला.

मत्स्यव्यवसाय विभागाने जर प्रस्ताव १५ दिवस पूर्वी म्हणजे दिनांक १५ मार्च पूर्वी जरी सादर केला असेल तर यामध्ये वित्त विभागाची चूक झाली हे समिती मान्य करेल. पण जर प्रस्ताव विभागाने दिनांक २९ किंवा ३० मार्चला सादर केला असेल तर मंजूरी ३१ मार्चलाच मिळणार. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभागाने सदर प्रस्ताव वित्त विभागास कधी सादर केला अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींकडे सदर माहिती उपलब्ध नसल्याने सदर माहिती नंतर सादर करण्यात येईल असे आश्वास्त केले.

सन २०१२-२०१३ मध्ये जेव्हा निधी प्राप्त झाला त्यावेळेस विभागाकडे राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एन.सी.डी.सी.) चे किती प्रस्ताव प्रलंबित होते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर मुद्दा हा ४१ प्रस्तावांच्या बाबतीत आहे. मात्र जास्त प्रस्ताव प्रलंबित होते.

एन.सी.डी.सी.चे शेकडो प्रस्ताव आहेत. त्यापैकी किती प्रस्ताव प्रलंबित होते ? याची नेमकी माहिती समितीस सांगावी आणि जर सदर माहिती विभागाकडे नसेल तर ती त्यांनी नंतर सादर करावी असे निदेश समितीने दिले.

एकूण ४ कोटी २७ लाख ९० हजार रुपये समर्पित करण्यात आले. कारण याला शेवटच्या दिवशी मान्यता मिळाली. पण बी.डी.एस. प्रणाली बंद पडली. पण ज्या गटाला पूर्ण निधी दिला त्याबाबत शासनाची गॅरटी आहे. एन.सी.डी.सी. डायरेक्ट शासनाकडून वसूल करते. त्यासंदर्भात काय कारवाई करण्यात आली किंवा एन.सी.डी.सी. कडे कोणता पत्रव्यवहार करण्यात आला अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एन.सी.डी.सी. चे लोन असले तरी शासनाकडून पैसे मिळतात. पण एन.सी.डी.सी. शासनाला प्रकल्पानुसार पैसे देते त्याची गॅरटी शासन देते. उद्या ते पैसे बुडाले तर शासनाला पैसे भरावे लागतात. यात शासनाचे नूकसान होते.

विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, विहीत मुदतीत प्रस्ताव नसेल तर वित्त विभाग तो स्विकारत नाही. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, विहित मुदत म्हणजे काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विहित मुदत त्या त्या वर्षी ठरवून दिलेली असते. पण सन २०१३ मध्ये विहित मुदत नक्की कोणती होती. याची माहिती विभागाकडे उपलब्ध नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. व सदर परिच्छेदाबाबत योग्य माहिती समितीस पुढील बैठकीत अवगत करण्यात यावी. असे निदेश समितीने दिले.

समितीच्या पुढील बैठकीत विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, प्रस्ताव दिनांक २८ मार्च रोजी पाठविला होता व दिनांक ३१ मार्च रोजी बी.डी.एस. बंद झाले होते.

यामध्ये शासनाच्या स्तरावर दिरंगाई झाली. आयुक्तांकडून प्रस्ताव जानेवारी व फेब्रुवारीमध्ये आला होता. शासन स्तरावर विलंब झाला आहे. असे देखिल विभागीय सचिवांनी मान्य केले व याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वास्त केले.

यामध्ये फक्त एकच आहे की, ४१ पैकी ३५ गटांना पैसे देण्यात आलेले आहेत. फक्त १.५७ कोटी आता शिल्लक राहिले आहेत. तेव्हा ४ कोटीच होते. आता दीड कोटी शिल्लक राहिले आहेत. ४ कोटी लॅप्स झाले. परत पुढच्या वर्षी ज्यावेळेस निधी आला त्यामधून आपण या गटांना निधी दिला असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

पण समितीचा मुद्दा असा आहे की, विभागाने पूढच्या वर्षी पूढच्या नियत व्ययापासून खर्च केला पण आपण पुढच्या वर्षी पुढच्या नियतव्ययातून खर्च केला. आयुक्तालयाकडून प्रपोजल आलेले असताना, ते प्रपोजल वित्त विभागाकडे योग्य वेळेत सादर न करण्याची कारणे काय आहेत ? या दृष्टीने मंत्रालयातील जे जबाबदार अधिकारी आहेत, त्यांनी हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला पाहिजे होता, मात्र त्यांनी तो पाठविलेला नाही, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन समितीला १ महिन्याच्या आत कळवावे असे निदेश समितीने विभागाला दिले.

परिच्छेद क्रमांक : २.२.७.१ : मत्स्य सहकारी संस्थांकडून थकबाकीची वसूली न होणे :-

सहकारी संस्थांकडून थकबाकीची वसूली न होणे यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या तक्त्यामध्ये खालील माहिती नमूद केली की, सन २०१५-२०१६ ची सात सागरी जिल्हातील व मच्छिमार सहकारी संस्थांची यांत्रिकीकरणासाठी घेण्यात आलेल्या कर्जाच्या वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	बाब	वसुलपात्र रक्कमेची टक्केवारी	सरासरी
अ)	मासेमारी नौकांची यांत्रिकीकरण		
१.	कर्ज वसुलपात्र	६९.१२ %	
२.	भाग भांडवल	३५.८५ %	
३.	खास विमोचक भाग भांडवल	६.६१ %	
४.	व्याज	१२.७३ %	
५.	सरासरी टक्केवारी	. .	३१.१० %
ब)	मासळीचे सुरक्षण, परिवहन व पणन		
१.	कर्ज वसुलपात्र	६२.५७ %	
२.	भाग भांडवल	३१.७७ %	
३.	खास विमोचक भाग भांडवल	-	
४.	व्याज	१३.५२ %	
५.	सरासरी टक्केवारी		२७ %
क)	१००%भाग भांडवल		५०.०६ %
ड)	एकूण सरासरी (अ+ब+क)		४१.६१ %

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतू क्रियाशील मच्छिमारांच्या गटांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी नवीन नौका बांधण्यासाठी रासविनि योजनेअंतर्गत अर्थसहाय्य/कर्ज मंजूर करण्यात येते. शासनाकडून कर्ज मंजूर करतेवेळी शासन निर्णय दिनांक २.१.२०१४ अन्वये नवीन नौका हेच तारण म्हणून विचारात घेतले जाते. त्यामुळे कर्जाची वसुली केवळ नौकेपासून मिळणा-या उत्पन्नावर अवलंबून राहते.

तथापि मत्स्यव्यवयास विभागाकडून कर्ज वसुलीसाठी अथक प्रयत्न चालू आहेत.

१) कर्ज वसूलीचा वार्षिक अहवाल (सन २०१६ अखेर) संस्थांची गटनिहाय माहिती **विवरण पत्र क्र.१** मध्ये समाविष्ट आहे.

२) राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेअंतर्गत दिलेले कर्ज भाग भांडवल, खास विमोचक भाग भांडवल, व्याज (माहे सप्टेंबर, २०१० अखेर) **विवरण पत्र क्र.२** मध्ये समाविष्ट आहे.

३) सन २०१५-२०१६ व सप्टेंबर २०१७ अखेर पर्यंत सात सागरी जिल्ह्यातील व मच्छिमार सहकारी संस्थांची यांत्रिकिकरणासाठी घेण्यात आलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी मत्स्यव्यवसाय विभागालाच करण्यात येणा-या प्रयत्नाची माहिती विवरण क्र.३ मध्ये समाविष्ट आहे.

उपरोक्त माहितीनुसार ही टक्केवारी ३०-३५ टक्क्यांवर नसून वसूलीची सरासरी टक्केवारी ही ३१ टक्के आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी वसूलीसंदर्भातील सद्यःस्थिती समितीला अवगत करताना सांगितले की, आता आयुक्त कार्यालयाने एक ड्राईव्ह घेतलेला आहे. त्यानुसार दिनांक ३१ जानेवारीची परिस्थिती अशी आहे की, ३२३७ प्रकल्प आहेत. २३२ सोसायट्या आहेत. त्यांना ३-३ नोटिसा अशाप्रकारे ११०० नोटिसा वितरीत केलेल्या आहेत. वसुलीची टक्केवारी ४० टक्क्यांवर गेलेली आहे. शिल्लक रक्कम ६० टक्के आहे. यामध्ये नोटिसा देणे व त्यानंतर डिझेलच्या अनुदानातून त्याची वळती करुन घेणे याबाबत असे आहे की, सर्व सोसायट्या काही कर्ज घेत नाहीत. त्यामुळे डिझेल अनुदानातून १०० टक्के वसुली होत नाही. नंतर जिल्हाधिका-यांनी त्याला आर.आर.सी. म्हणून हाताळण्यासाठी पाठवावे लागेल. काही ठिकाणी त्यांची जप्तीही केलेली आहे. त्यामुळे आता सुधारणा झालेली आहे. आता वसुलीचे प्रमाण ४० टक्क्यांच्यावर आहे. द्वपण ही सुधारणा जेवढया प्रमाणात व्हावयास पाहिजे होती तेवढया प्रमाणात झाली नसली तरी सन २०१५-२०१६ मध्ये दर्शविण्यात आलेली ही ४१ टक्केवारी ही प्रलंबित टक्केवारी आहे.

एकूण सरासरी ४१.६१ टक्के नमूद केले आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते ३७ टक्के आहे. ६३ टक्के वसुली झालेली नाही, ३७ टक्के झालेली आहे. सद्यःस्थितीत आता हे प्रमाण ४० टक्क्यांच्या वर गेलेले आहे व ६० टक्के वसुली शिल्लक आहे. आता अधिक प्रयत्न करुन वसुली करुन घेण्यात येणार आहे.

वसूलीसाठी २-३ नोटिसेस दिल्यानंतर २ हप्त्यांच्या नंतर डिफॉल्ट असेल तर, संबंधितांना डिझेलची सबसिडी देण्यात येणार का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कर्ज घेणारे वेगळे आहेत. सर्व डिझेलवाले कर्ज घेत नाहीत. तसेच यामध्ये व्याजाची वसूली खूपच कमी आहे. कारण मागे एकदा एका ठराविक योजनेमध्ये सर्वांचेच व्याज माफ केले होते. त्यामुळे व्याज न देण्याची टेन्डसी आहे.

पूर्वी कर्जमाफी झाली त्यामुळे पुढेही कर्जमाफी होणार अशी अपेक्षा असते म्हणून व्याजच द्यायचे नाही, असे येथे दिसून येते. पण मूळ रकमेची थकबाकीही जास्त आहे, ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ रक्कमेची वसुली ६७ टक्के इतकी जास्त आहे.

सन २००६-२००७ च्या पूर्वीचे तर वसुली झालेली नाही, त्यासाठी विभागाने केलेल्या प्रयत्नासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, याकरिता दुसरा ड्राईव्ह घेतलेला आहे. या अंतर्गत कोणत्या बोटी सुरु आहेत याचा सर्वेक्षण केले जात आहे. कारण विभागाकडे नोंदी जास्त आहेत मात्र लायसन्स कमी आहेत. हा फरक कशामुळे आहे, त्या बंद पडल्या आहेत का, त्या कुठे आहेत, त्यांचे मालक कोठे आहेत याबाबतचे सर्व्हेक्षण करण्याचा ड्राईव्ह आता घेण्यात येत आहे. जवळजवळ ५ हजारच्यावर सर्व्हे पूर्ण केलेला आहे. एकूण २४ हजार नोंदणीकृत बोटी आहेत. त्यांचा पूर्ण सर्व्हे करुन त्यांची पडताळणी करुन मग त्यांचे सर्व ठावठिकाण मिळतील व नंतर वसूली होऊ शकेल.

वसुली अधिकारी यांची पदे रिक्त आहेत. पदे रिक्त असतील तर वसूली कशी होणार. सद्यःस्थितीत एकूण किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ८ पदे पदोन्नतीची व ८ सरळसेवेची अशी एकूण १६ पदे आहेत. त्यापैकी पदोन्नतीची ६ पदे भरलेली असून ८ पदांकरिता जाहीरात दिलेली आहे. वसुली अधिका-यांची पदे भरल्यानंतर वसुलीमध्ये सुधारणा होईल.

महाराष्ट्र जमीन महसूल नियम, १९६६ मधील कलम १७६ ते १८४ अंतर्गत कारवाई सुरु आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, नोटिसा देणे संपल्यानंतर सदर कारवाई करण्यात येईल.

या अनुषंगाने समितीने सूचित केले की, जोपर्यंत वसूली अधिकारी पूर्ण संख्येने असणार नाहीत तोपर्यंत ते वसूलीचे काम कार्यक्षमतेने होणार नाही, त्यामुळे विभागाने वसूली होण्यासाठी रिक्त पदे भरतीसंदर्भात प्राध्यान्याने लक्ष द्यावे.

ज्या सोसायट्यांना कर्ज दिलेले आहे, त्यापैकी नॉन परफॉर्मिंग सोसायट्या किती आहेत. त्यांच्याकडून किती कर्ज व किती व्याज वसुली होणे बाकी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ३ हप्ते भरले नाहीत ते कसूरदार आहेत. त्याप्रमाणे सर्व २३२ सोसायट्या कसूरदार आहेत. त्यांच्याकडून ३ नोटिसा दिल्यानंतरही वसुली होत नाही. नॉन फॉर्मिग सोसायटयासंदर्भातील माहिती समितीला सादर करावे असे निदेश समितीने दिले.

जर नौकेच्या मालकाने सलग ३ हप्ते भरले नाहीत तर, सदर कसूरदार नौका मालक ज्या सोसायटीशी संलग्न असतो, त्या सोसायटीला अकार्यक्षम संस्था म्हणून घोषित केले जाते. वसुली पूर्ण होईपर्यंत संस्थेला देण्यात येणारे शासकीय लाभ स्थगित करण्यात येतील, असे महालेखाकारांनी आक्षेपात नोंदविले आहेत याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगतले की, त्या २३२ सोसायट्यांना आता डिझेल देणार नाही. या सोसायटयामध्ये ५०० कोटी रुपयांची थकबाकी आहे त्यापैकी २१५ कोटी रुपये वसूल झाले आहेत आणि २५० कोटी रुपये शिल्लक आहे.

एनसीडीसी योजनांच्या अंतर्गत एफसीएसकडुन प्रलंबित वसुली ३२४ कोटी रुपये असे नमूद केले आहे याबाबत विभागीय सचिवांनी अवगत केले की, यामध्ये नियमित वसुली तसेच थकबाकीदार देखील आहेत. उरलेली वसुली ही नियमित लोकांची आहे. २१५ कोटी रुपये वसूल झाले आहेत आणि २५० कोटी रुपये बाकी आहेत तसेच त्यामध्ये २३२ सोसायटी डिफॉल्टर आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, २३२ डिफॉल्टरमध्ये ५०० कोटी रुपये थकबाकी आहेत. या वसुलीचे नियोजन कसे करण्यात येणार आहे, यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यात २१५ कोटी झालेले आहेत आणि २३२ डिफॉल्टर असल्यामुळे त्यांना नोटीस दिलेली आहे. हे सर्व त्यांच्या डिझेलमधुन वसूल होईल आणि यापुढे डिझेल सबसिडी देण्यात येणार नाही आणि असे करुनही ते वसूल झाले नाहीतर आरआरसी करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठविण्यात येईल. यामध्ये जप्ती करणे कठीण जाते कारण ती बोट कुठे ठेवणार त्यामुळे शासनाला अडचणी निर्माण होतात. शेवटी बोट जप्त करुन ती न चालवता त्यांच्याकडे ठेवण्यात येईल. विभागाकडून थकबाकी वसूली संदर्भातील माहिती **विवरणपत्र क्र. ३** मध्ये समाविष्ट आहे.

परिच्छेद क्र. २.२.७.२. रोख पुस्तिका ठेवण्यात आलेली विसंगती :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, रोख पुस्तिका मधल्या कालावधीत अद्ययावत नव्हते पण आता अद्ययावत झालेल्या आहेत.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, रोख पुस्तिका अद्यायावत झालेली आहेत. पण विभागाकडे मेंटेनन्स ऑफ टेक्स्टबुक सिस्टिम नव्हती काय ? हे सर्व टेक्स्टबुक मेंटेनन्स झाल्यानंतर महालेखाकारांना दाखवले आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकारास दाखविण्यात आले होते पण त्यावर त्यांनी काही टिप्पणी भाष्य केले नाही.

बँकांच्या अकाऊंटच्या माध्यमातून खर्चाचा ताळमेळ करायचा नाही. वित्तीय नियमांचे पालन न करता हा सर्व कारभार कसा चालत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आयुक्त कार्यालया ठिकाणी कर्मचारी वर्ग कमी आहे पण बँकांनी प्रतिसाद दिला नाही कारण बँकांनी खूप उशिरा विवरण पत्र दिलेले आहे. त्यानंतर खर्चाच्या ताळमेळाचे काम सुरु केलेले आहे.

खरे तर मच्छिमार हे एक रोजगाराचे साधन आहे. त्यामुळे आयुक्त कार्यालयाने आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग तरी दिला पाहिजे. या कार्यालयांना व्यवस्थित जागा नाही. त्यांच्या इमारती दुरावस्थेमध्ये आहेत. तेथे फर्निचरची व्यवस्था सुध्दा नाही. मच्छिमार सोसायटीची जागा चांगली आहे पण त्यांची अवस्था चांगली नाही. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उपआयुक्त आणि सहायक आयुक्त ही पदे रिक्त आहेत. आता सहायक मस्त्यव्यवसाय अधिका-यांची पदे भरलेली आहेत. तरी देखील व्हॅकन्सी आहेत. आताच ३८ लोकांची भरती केलेली आहे.

याचा अर्थ सन २०१४ नंतर ही भरती केलेली आहे तर मग याच्यापूर्वी कधी भरती करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यु.पी.एस.सी.मार्फत ब-याच वर्षापासून भरती झालेली नाही. एम.पी.एस.सी.ची सरळसेवा भरती असल्यामुळे गेल्यावर्षी ती पदे भरण्यात आलेली आहेत.

गेली २१ ते २२ वर्षापासून येथे भरती झालेली नाही. विभागाकडून फक्त औपचारिकता करण्यासाठी हा विभाग चालविण्यात येतो, असा याचा अर्थ होतो असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. २.२.८ मत्स्य व्यवसायातील तूट :-

सन २०११-१२ पासून राज्यातील एकूण मत्स्य उत्पादनामध्ये विभागाचे जे लक्ष होते ते देखील पूर्ण झाले नाही. शासनाच्या माध्यमातून मत्स्य व्यवसायाला जेवढे लक्ष देण्यात आलेले आहे त्या दृष्टीने विभागाचे टार्गेटसुद्धा वाढले पाहिजे आणि उत्पादन वाढले पाहिजे. भूजलामध्ये मत्स्य उत्पादन आणि सागरी मत्स्य उत्पादनाचे पण लक्ष साध्य होत नाही. कारण बाकीच्या पायाभूत सुविधांमध्ये पैसे आल्यावर त्याचा पूर्ण वापर करता येत नाही किंवा वेळेवर निर्णय घेता येत नाही. मत्स्य व्यवसायाला कसे वाढविता येईल या दृष्टीने शासनाच्या वतीने काही नियोजन केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१६-१७ मध्ये भुजलाशयीन मत्स्य उत्पादनांचे लक्ष्य १.५० लाख रुपये होते मात्र, प्रत्यक्ष उत्पादन हे २.०० लाख रुपये झाले असून मत्स्य उत्पादनात ३३.३३ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर सागरी मत्स्य उत्पादनाचे लक्ष्य ६.०००लाख रुपये होते मात्र, प्रत्यक्ष उत्पादन हे ४.६७ लाख रुपये झाले असून मागील वर्षापेक्षा ५ टक्केने तूट कमी झालेली आहे. सन २०१६-१७ चे भुजल आणि सागरी दोन्हींचे मत्स्य उत्पादन पाहिले तर त्या दोन्हींची मिळून ११ टक्केने तूट कमी झालेली आहे.

एवढी तूट येण्याचे काय कारण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सागरी मत्स्य व्यवसायामध्ये द्वदोन प्रकारचे ओव्हर एक्सप्लॉयटेशन आहे त्यामुळे यात काही दुमत नाही. त्यापैकी पर्ससीन नेटचे एक्सप्लॉयटेशन सन २०१६ रोजी नोटीफिकेशन काढून कंट्रोल केलेले आहे. दुसरे म्हणजे ट्रॉलिंग आहे. ज्या ठिकाणी ट्रॉल केले जात नाही त्या एरियामध्ये पण ट्रॉलिंग होते आणि ट्रॉलिंग खूप बारिक नेटच्या आकाराची होते. त्यामुळे माशांचे छोटे पिल्ल सरफेस क्रेप करुन जातात. त्यामुळे त्यांचे फुड पण खाले जाते, छोटे पिल्ले पण संपतात आणि पर्ससीन पण ओव्हर एक्सप्लॉयटेशन होते. आता सन २०१७ मध्ये ट्रॉलिंगचे पण एक्सप्लॉयटेशन निघाले आहे. त्यामुळे आता सागरी मत्स्य व्यवसायाचे उत्पादन निश्चितच वाढेल.

सर्चलाईटची जी अडचण आहे ती कशी सोडवण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एलईडी लाईटची कारवाई देखील सुरु केलेली आहे. हे सर्व इनडिस्क्रीमेंट मारायचे म्हणजे न बघता लाँग टर्ममध्ये नुकसान होईल. कारण त्यामुळे उत्पन्न कमी होणार असून त्यासाठी डीप सी फिशिंग करावे लागेल.

बारा नॉटिकल मैलच्या आतमध्ये मच्छीमारी करण्यात येते . ज्या ज्या बोटी किंवा ट्रॉलर तिथे काम करतात त्यांना त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड सीसीटीव्ही कॅमेरे लावून पाहू शकतो. त्याच्या बेसपर्यंत जाऊन त्यांचे फुड आणि बीजसह सर्व उचलत असेल तर यामुळे चार्ज मारायला पण मिळत नाही. त्यामध्ये सरकारने काहीतरी बंधन घालावी म्हणते यासाठी काहीतरी नियोजन करावे नाहीतर हे सर्व नष्ट होईल. जगातील बाकीच्या देशांनी यासाठी काहीतरी उपाययोजना केलेली आहे. श्रीलंका या देशाने सुद्धा यासाठी उपाययोजना केलेली आहे. मासेमारी आणि टुरिझमवर चालणारा तो देश आहे. त्यामुळे तिथे उपाययोजना करताना खूप काळजी घेऊन केल्या जातात. समुद्रकिना-यावरील मासेमारीवर टिकणारे जे देश आहेत त्या सर्वांनी काहीना काहीतरी उपाययोजना केलेली आहे. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये दोनच मार्ग आहेत की, यात नंबर ऑफ पर्ससीन लायसन्स कमी ठेवायचे. ते २०० लायसन्सच्या आत ठेवण्यात यावेत कारण आता ते ४०० वर लायसन्स आहेत. जसजसे ते लायसन्स एक्सपायर होतील तसे ते रद्द करायचे.

पण कोणाला व्यवसाय करण्यापासून थांबवू शकत नाही. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कोणालाही व्यवसाय करण्यापासून थांबवू शकतो कारण आता ते कोर्टामध्ये स्टँड झालेले आहे. १८२ लायसन्स फायनल करायचे आहेत आणि त्यासाठी शासनाने आक्षेप केलेला आहे. त्याची नेट साईज निश्चित केलेली आहे आणि ट्रॉलिंगमध्ये ट्रॉलवर काय कंट्रोल असावे हे देखील फिक्स केलेले आहे.

कोणाला व्यवसाय करण्यापासून थांबवणे हा अधिकार कोर्टाचा नाही. याकरिता तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घ्यावे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये सोमवंशी समितीच्या सर्व शिफारशी मान्य करण्यात आल्या आहेत.

राज्यात ४.१८ लाख हेक्टर भूजलाशयीन क्षेत्र उपलब्ध असून त्याकरीता ११४ कोटी मत्स्यबोटुकलीची आवश्यकता आहे. असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. या संदर्भातील सद्यः स्थितीची काय आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या ३० हॅचरी आणि १६ रेअरींग सेंटर आहेत. ३० हॅचरीपैकी ११ विभागाकडून चालविण्यात येतात. चालवतो आणि १९ आऊटसोर्स केलेल्या आहेत. आता बाकीच्या काही नवीन हॅचरी निर्माण करण्यात येत आहे तर ब्लू रिव्हॉल्युशन अंतर्गत १८ मिनि हॅचरी येत आहेत. या सर्व हॅचरी स्टाफ नसल्यामुळे आऊटसोर्स केलेले आहेत. आऊटसोर्सची पॉलिसी असल्यामुळे आपल्याला उत्पन्न मिळते आणि सिड प्रोडक्शन पण होते.

आऊटसोर्सींगच्या उत्पादनामध्ये काय आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये १८ मिनी हॅचरी आहेत आणि याशिवाय ३६ पोर्टेबल हॅचरीची ऑर्डर दिलेली आहे. या १८ मिनी हॅचरीमधून ९ कोटी मस्त्यबोटुकलीचे उत्पादन अपेक्षित आहे आणि सदर ३६ पोर्टेबल हॅचरीमधून ५.४० कोटी मस्त्यबोटुकलीचे उत्पादन अपेक्षित आहे.

राज्यामध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय वाढ करण्याकरिता पिंजरा मत्स्यसंवर्धन करण्याच्या धोरणास दिनांक १७/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या धोरणांतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाने प्रसिध्दी देवून इच्छूक प्रकल्प धारकांकडून निविदा मागवियात आल्या. त्याचप्रमाणे आजमितीपर्यंत ५९ बॅटरीज मंजूर करण्यात आल्या आहेत असे विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, बॅटरीज म्हणजे बंदिस्त जलाशय जोपासना (केज कल्चर) असते. १ बॅटरी म्हणजे ४८ केज असतात. त्यामुळे यात मोठया प्रमाणात उत्पादन होते. महामंडळाने देखील १५९ बॅटरीज मंजूर केल्या आहेत. १५९ बॅटरीज मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष ९४ करारनामे झाले आहेत त्यापैकी ४० ची कामे सुरु होऊन २० ची कामे प्रत्यक्ष सुरु झालेले आहेत.

सागरी मासेमारी आणि तलावातील मासेमारी या दोन्हीं प्रकार वेगळे करण्याची आवश्यकता आहे. परिस्थिती अशी आहे की, सर्व सेंटर पॉवर एकाच ठिकाणी आहेत. एखादा निर्णय घ्यावयाचा असेल तर त्या दोन्हींमध्ये डिफरन्स ऑफ ओपिनियन मोठया प्रमाणात असते कारण या दोन्हींना एकच परिपत्रक लागू होते. काही गोष्टींमध्ये सर्वच प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. सागरी आणि तलावातील मासेमारी यासाठी महाराष्ट्रामध्ये भरपूर प्रमाणावर स्कोप आहे. विदर्भात गोंदिया जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त तलाव आहेत. तसेच छोटे व मोठे बंधारे आहेत. आता तर जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून डिसेंबर ते जानेवारी महिन्यापर्यंत तलावांमध्ये पाणीसाठा असतो. यापूर्वी तेवढा पाणीसाठा कधीच नसायचा. उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून तलावामध्ये पाणी सोडले जात होते आणि ॲक्सेस पाणी वाहून जायचे. त्यामुळे या सर्वांवर विचार करुन सागरी आणि तलावातील मासेमारी वेगळी करण्याबाबत विचार करायला पाहिजे. तलावातील व सागरी मासेमारी या दोन्हींची मॅनेजींग वेगळी आहे पण निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांना अधिकार स्थानिक पातळीनुसार देण्यात यावेत. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन्हींसाठी एकच आहे पण काही तलावांचे लिलाव करण्यासाठी वेगळे शासन निर्णय निघतात आणि पर्ससीन नेट व ट्रॉलिंगसाठी वेगळे शासन निर्णय निघतात.

तलावातील मासेमारी व सागरी मासेमारी यामध्ये वेगळी यंत्रणा तयार करण्यात यावी असे विभागास वाटते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासाठी वेगळी आयुक्तालय (कमिशनरेट) तयार करायची आहे.

तलावांच्या संदर्भात निर्णय घेण्याची प्रक्रिया एवढी प्रलंबित असते की, एखादा निर्णय घ्यायचा असेल तर आयुक्तापर्यंत फाईल येण्यासाठी ६-६ महिने निघून जातात. ते निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याचे अधिकार दिले गेले तर खूप मोठे काम पूर्ण

होऊ शकते. गोड पाण्याच्या संदर्भातील खूप मोठी रोजंदारी महिलांना मिळू शकेल. तसेच सी.एस.आर.च्या लोकांना तिथे पैसे खर्च करण्यासाठी वाव मिळेल असे समितीने सूचित केले व विचारणा केली की, तलावातील आणि सागरी मासेमारी यांचा स्तर वेगळा येतो काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, २०० हेक्टर पर्यंतचा निर्णय घेण्याचे अधिकार जिल्ह्यामध्येच आहेत. नवीन मत्स्य व्यवसाय धोरण येणार आहे. सध्या सन २०१७ मध्ये नवीन तलाव ठेका धोरण काढलेले आहे. तसेच केज कल्चरसाठी एक धोरण बनवले आहे.

राज्यातील ४ शासकीय मत्स्यबिज केंद्राचे नुतनीकरण केलेले आहे हे मत्स्यबिज केंद्र कोणकोणत्या ठिकाणी आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आर.के.व्ही.आय.मध्ये मत्स्यबीज केंद्राचा निधी मिळालेला आहे. काटेपूर्णा, जि.अकोला, नागठाणा, जि.भंडारा, इटियाडोह, जि.गोंदीया आणि कोराडी, जि.बुलढाणा येथे मत्स्यबीज केंद्रे आहेत.

एकूण १० पैकी ४ मत्स्यबिज केंद्राचे काम विभागाने हाती घेतले आहेत. तर मग बाकीचे काय नियोजन आहे ? यामध्ये एक अंभोरा येथे सुध्दा आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यापैकी काही डीपीडीसीच्या फंडातून झालेले आहे. अंभोरा हे केंद्र खाजगीकरणामध्ये भाडेतत्वावर दिलेले आहे.

अंभोरा हे केंद्र भाडेतत्वावर दिले असले तरी त्याचे नुतनीकरण तर विभाग करु शकतो का नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एकदा भाडेतत्वावर दिल्यानंतर त्याचे नुतनीकरण करण्याचे काम ज्या संस्थेला दिले आहे त्यांचे आहे.

परिच्छेद क्र. २.२.८.१ नियमांचे योग्य पालन न करता केली जाणारी मासेमारी :-

मासेमारी संदर्भातील धोरण शासनाने मंजूर केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या बाबत अद्याप प्रस्ताव सादर झालेला नाही.

अनेकदा ठरवून दिलेल्या नियमांचे पालन न करता पर्ससीन मासेमारी केली जाते. शासनाने सन २०१६ मध्ये गाईडलाईन्स काढल्या आहेत. पर्ससीन नेटची यंत्रणा कशी मॉनिटर केली जाते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दि. ५ फेब्रुवारी, २०१६ मध्ये शासनाने नोटीफिकेशन काढले आहे. विभागाकडे २३ लायसन्सिंग ऑफिसर्स आहेत. व्हीटीएस बसवणे अनिवार्य केलेले आहे. काहींनी ही सिस्टीम बसवलेली आहे तर काही ठिकाणी यंत्रणा बसवण्याचे काम सुरु आहे. ज्यांनी नियमांचे पालन केलेले नाही, अशा ९४ जणांचे लायसन्स रद्द केलेले आहे. ट्रोलचे लायसन्स दिल्यानंतर ते जर पर्ससीन मासेमारी करीत असतील तर त्यांचे लायसन्स रद्द केले जाते. या संबंधी दंडात्मक कारवाई देखील केली जाते. तहसीलदार यांच्याकडून रकमेच्या ५ पट दंड आकारला जातो. आता पर्यंत एकूण ३७६ बोटींवर कारवाई केलेली आहे.

परिच्छेद क्र. २.२.८.२ मत्स्यबीजाचे नगण्य उत्पादन :-

सध्या मत्स्यबीजचे उत्पादन नगण्य आहे. सन २०१५-१६ मध्ये उत्पन्न क्षमता २०.९३ कोटी असून मत्स्यबीजाचे प्रत्यक्ष उत्पादन ८.१६ म्हणजेचच केवळ ४० टक्के उत्पादन आहे झाले. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१६-१७ मध्ये ३८कोटी रुपये उत्पादन झाले. भाडे तत्त्वावर दिलेल्या हॅचरीसहीत १०.७८ कोटी, खाजगी हॅचरी मधून ७ कोटी रुपये उत्पादन झाले असून सन २०१७-१८ मध्ये आणखी उत्पादन अपेक्षित आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून (आरकेव्हीवाय) निधी मिळाला तर १४ कोटी रुपयांपर्यंतचे उत्पादन होऊ शकते.

यवतमाळ, बेंबळा येथील मत्स्यबीज केंद्र बांधून पूर्ण झाली असून कामास सुरुवात झालेली आहे. या करिता किती खर्च झाला, बांधकामाची सद्यस्थिती काय आहे, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या केंद्राचा ताबा घेतला असून जून, पासून तेथील उत्पादन सुरु होईल.

मिशन फिगरलिंग अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरिता १८ मिनी हॅचरीच स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मिनिहॅचरीकरिता निधी मंजूर झाला असून द्वयेणे बाकी आहे. पोर्टेबल हॅचरीची ऑर्डर दिलेली आहे. टप्प्याटप्प्याने उत्पादन वाढत आहे. सुरुवातीला ८ चे १० कोटी रुपये झाले वव या वर्षी १४ कोटी रुपयांपर्यत वाढ होईल. सध्या ब्रुड बँकची आवश्यकता आहे. एकच वाण अनेक वर्षे वापरल्यानंतर त्याची गुणवत्ता कमी होते. वाण बदलल्यास उत्पादन वाढते. नवीन चांगले वाण आणल्यास चांगल्या स्पेशीज तयार होतात. याकरिता ६ ब्रुड बँक आणण्याचा विचार केला जात असून त्याचे काम सुरु झालेले आहे.

परिच्छेद क्र. २.२.९ केंद्र व राज्य योजनांची अंमलबजावणी :-

परिच्छेद क्र. २.२.९.१ जलसाठयातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंशतः अंमलबजावणी :-

जलसाठयातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंशतः अंमलबजावणी करण्यात आली. पण जलाशय विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून काहीच काम झालेले नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, दोन्ही कडून काम केले जाते. ही योजना शासनाकडून व एमएफडीसी कडून राबवली जाते. मत्स्यबीज वाढवण्याकरिता नवीन तलावांमध्ये पहिल्या ३ वर्षात टप्प्याटप्पयाने मत्स्यबीज साठा केला जातो. ७० टक्के, ५० टक्के व २५ टक्के या नुसार मत्स्यबीज साठा केला जातो व इतर साठा संबंधित सोसायटीने करावयाचा असतो. सन २०१५ मध्ये २२ तलावांनी साठा केला होता व सन २०१६ मध्ये ३२ तलावांमध्ये साठा केला होता.

जलाशय विकास कार्यक्रमाची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जलाशय विकास कार्यक्रमाला नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्डाच्या माध्यमातून एक रुपया अनुदान देऊन स्टॉकींग केले जाते. हा कार्यक्रम ५ वर्षाकरिता होता. नवीन तलावांकरिता डीपीडीसी मधील योजना आहे. पहिल्या वर्षी १०० टक्के, दुस-या वर्षी १०० टक्के, तिस-या वर्षी ७५ टक्के, चौथ्या वर्षी ५० टक्के व पाचव्या वर्षी २५ टक्के. शासकीय मत्स्यबीज केंद्रातून जे उत्पादन घेते ते त्यातून स्टॉकींग केले जाते. येथे जेवढे उत्पादन होते तेवढे स्टॉकींग करण्यात आले. काही ठिकाणी पाण्याची कमतरता व कर्मचा-यांची संख्या कमी होती यामुळे तेथे कमी उत्पादन झाले. जेवढे उत्पादन अपेक्षित होते तेवढे झाले नाही. डीपीडीसीची योजना होती. त्यामुळे उत्पादन कमी झाले. तलाव ठेका धोरणामध्ये त्यांच्याकडे ५ वर्षासाठी ठेका असावा अशी अट होती. त्यांच्याकडे २-३ वर्षे ठेका असताना योजना राबवली तररत्यांचा ठेक्याची मुदत वाढवावी लागत होती. यामुळे नंतर ही योजना बंद करण्यात आली. शासनाच्या पैशाने योजनेचे संचयन केल्यानंतर आम्हाला ५ वर्षाकरिता ठेवा असे ठेकेदाराकडून सांगितले जात होते. यामुळे ही सबसिडी योजना बंद केली आहे. ५ वर्षासाठी तलाव ठेका दिला जातो नवीन तलावांकरिता योजना आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.२ - बंदिस्त जलाशयात मत्स्यशेती करण्यासाठीच्या राज्य योजनेचे निर्धारीत लक्ष साध्य करण्यातील तूट :-

बंदिस्त जलाशयातील मत्स्यशेती या योजने अंतर्गत नाशिक व अमरावती मधील केंद्राची आकडेवारी प्राप्त झाली आहे. मात्र इतर केंद्रांची आकडेवारी प्राप्त झालेली नाही. आरडीसी औरंगाबाद, लातूर नागपूर यांच्याकडून मत्स्यबीजाच्या संबंधी माहिती उपलब्धध नसल्यामुळे ४ आरडीसीमधील या योजनेची काय परिस्थिती आहे याची खात्री करता आली नाही, असा आक्षेप महालेखाकारांनी काढला आहे. या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, या मुद्यासंदर्भात विभागाकडे दस्तऐवज (रेकॉर्ड) उपलब्ध नसण्याची कारणे काय आहेत ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध होते मात्र त्यांनी ते दाखवले नाहीत.

महालेखाकारांनी शेरा दिला आहे की, आरडीसी यांनी रेकॉर्ड दाखविले नाही. पण एक्झिट कॉन्फरन्समध्ये रेकॉर्डस दाखवावयास हवे होते. तलाशयात साठा करावयाच्या मत्स्यबीजाचे लक्ष निर्धारित २०६.० लक्ष्य मत्स्य बीजांच्या लक्ष्याच्या तुलनेत प्रत्यक्ष साठा १४६.७६ लक्ष होता. म्हणजेच २९ टक्के तूट होती. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ४-५ वर्षे अवर्षण होते, तसेच मनुष्यबळ कमी होते. यामुळे उत्पादनावर विपरित परिणाम झालेला आहे. इतर चार विभागांची माहिती विभागाकडे आहे, ती माहिती समितीला सादर करण्यात येईल.

इतर ४ आरडीसीचे रेकॉर्डस प्रथम महालेखाकारांना सादर करावेत व समितीला देखील माहिती द्यावी असे निदेश समितीने दिले.

परिच्छेद क्र. २.२.९.३ - मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी केंद्रीय अर्थसहाय्य वापर न करणे :-

१५ मत्स्यबीज केंद्रापैकी मुळानगर व चारगांव ही दोन मत्स्यबीज केंद्र महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली. त्यामुळे या केंद्राचे नुतनीकरण व बळकटीकरण करण्यात आले नाही. उर्वरीत सीना (अहमदनगर), खोपोली (रायगड), वेण्णा (नागपूर), नागठाणा (भंडारा), अंभोरा (गोंदिया) आणि अंमलनारा (चंद्रपूर) या ६ मत्स्यबीज केंद्रांचे तपशिलवार अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने सदरची कामे हाती घेण्यात आली नाहीत असे विभागाने लेखी उत्तरात नमूद केले आहे. पण त्यापैकी आता नागठाणा केले आहे. यामध्ये अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने कामे केली नाहीतर तसेच त्यामध्ये असेही सांगण्यात येते की, ४ मत्स्यबिज केंद्रांपैकी नागठाण्याचे काम करतो. एखाद्या वर्षापूर्वीच अंभोरा भाडेतत्वावर दिलेला आहे. सदर

केंद्रे भाडेतत्वावर दिले आहे म्हणजे विभागाने आपली जबाबदारी झटकली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता त्याला विकसित करता येणार नाही कारण खाजगीकरणामध्ये त्याला भाडेतत्वावर देण्यात आलेले आहे.

मग त्यामध्ये उत्पन्न का जास्त होत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याचा जो प्लॅन त्यांनी सबमिट केला होता तर त्या प्लॅनप्रमाणे ते काम करीत आहेत की नाही हे तपासण्यात येते नाही तर ते परत काढून घेण्यात येते.

ज्या अटीवर ते केंद्र भाडेतत्वावर दिलेले आहे त्यानुसार त्यांनी ते विकसित केले पाहिजे. ते जर करीत नसतील तर त्याला विड्रॉ करुन ते केंद्र आर.के.व्ही.वाय.मध्ये करावे. असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सर्व तपासून घेण्यात येईल.

सन २०१०-११ मध्ये एकूण १५ मत्स्यबीज केंद्राच्या सुधारणा व बळकटीकरण या योजनेअंतर्गत १५ पैकी ५ केंद्रासाठी काम झाले. उर्वरीत १० मत्स्यबीज केंद्राच्या बळकटीकरणाचे काम का झाले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १५ पैकी ५ केंद्राच्या बळकटीकरणाचे काम झाले व १० केंद्रे शिल्लक द्वहोती. १० पैकी ३ द्वडीपीडीसीने केले, २ एमएफडीसीने केले, २ भाडेपट्टयावर गेले व ३ शिल्लक राहिले. १५ पैकी १२ मध्ये काम झालेले आहे. पाऊस नव्हता, वीज नाही, मनुष्यबळ कमी इ. कारणामुळे ३ केंद्राचे काम झालेले नाही.

गोंदिया जिल्ह्यात सर्व काही उपलब्ध असताना मत्स्यबीज केंद्र ठेक्यावर देण्यात आले आहे. या संबंधी ३ वेळा बैठक देखील झाली होती. ३ केंद्रांचे काम करण्यासंबंधी आयुक्तांनी विचार करावा. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी आश्वास्त केले की, सदर बाब तपासून घेण्यात येईल.

पंधरा पैकी बारा केंद्राचे काम केले, त्या नुसार उर्वरीत ३ चे देखील काम करावे.असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अंभोश येथिल केंद्र भाडे पट्टयाने दिलेले आहे. सीना-वेण्णा, नागठाना केंद्राचे काम झालेले नाही.

राष्ट्रीय कृषी विकास योजनांतर्गत सन २०१७-१८ मध्ये काटेपूर्णा जि.अकोला, नागठाणा, जि.भंडारा इंटियाडोह जि.गोंदिया, कोराडी जि.बुलढाणा या चार केंद्राच्या नुतनीकरणासाठी रु.६.२५ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी आता किती शिल्लक आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केवळ सिना, वेण्णा केंद्रांचे काम शिल्लक आहे. खोपोली केंद्र डीपीडीसी मधून झालेले आहे. अंभोरा व करंजवन ही दोन भाडेपट्टयाच्या यादीमध्ये आहे.

या योजनेमधून १५ पैकी १० केंद्रांचे काम झाले, ३ भाडेपट्टयाने दिले. १५ पैकी ३ केंद्र भाडेपट्टयाने दिले व २ केंद्रांचे काम झाले नाही. ४ केंद्रांचे कामआरकेव्हीवाय मधून केले जाणार आहे. ५ केंद्रे लिजवर आहेत. ज्यांनी लिजवर घेतले आहे, त्यांनी ते काम करावे किंवा त्यांच्याकडून लिज रद्द करुन सदर काम विभागाने करावे. ५ केंद्रांचे काम आरकेव्हीवाय योजनेमधून हाती घ्यावे, असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. २.२.९.४ कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणात विलंब :-

कोळंबी बीज उत्पादनाकरिता दीड कोटी रुपये खर्च झाला, मात्र आतापर्यंत काहीच उत्पादन झालेले नाही. कोळंबी बीज उत्पादन केंद्राच्या बळकटीकरणास विलंब का होत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे बांधकाम होते. आता ते क्रॅबसाठी वापरले जाणार आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १.६६ कोटी रुपये इतका निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी सन २०१३ पर्यंतत १.५० कोटी रुपये निधी खर्च झाला.

तलावातील गाळ पूर्णपणे काढलेला नाही, फिडींग कॅनलच्या पृष्ठभागाची दुरुस्ती न होणे, तलावात आवश्यक उंचीपर्यंत पाणी साठवण्यातील असमर्थता, सांडवा पाटयाचे प्रबलित सिमेंट कॉंक्रीटीकरण केलेले नसणे इ. कमतरतांमुळे अर्धवट पूर्ण झालेले केंद्र ताब्यात घेण्यास एसीएफ, रत्नागिरी यांनी नकार दिला.असा आक्षेप महालेखाकारांनी काढला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आता केंद्र ताब्यात घेतले आहे. केंद्राची संपूर्ण दुरुस्ती केलेली आहे. तेथे कोळंबी ऐवजी क्रॅबचे उत्पादन घेतले जात आहे. येथील कंत्राटदाराच्या विरोधात काम योग्य झालेले नाही असे कारण सांगून उच्च न्यायालयात स्थानिकांनी रिट पिटीशन दाखल केले. पण यास उच्च न्यायालयाने स्टे दिला नव्हता. ३७ पैकी २५ कामे पूर्ण झाली असून ती हस्तांतरीत देखील झालेली आहेत. काम योग्य झाले नाही असे कारण सांगून उच्च न्यायालयात स्थानिकांनी रिट पिटीशन दाखल केले. हे रत्नागिरीतील प्रकरण आहे.

नोव्हेंबर २०१६ पर्यंत देखील काम अपूर्ण होते. पण रु.१.५० कोटीचा खर्च झाला. म्हणजे ठेकेदाराला पैसे दिले असे यातून निष्पन्न होते. तसेच कंत्राटदाराने नियमबाहयतेने काम केल्याच्या आरोपाखाली मुंबई हायकोर्टामध्ये शासन गेलेले आहे, असे देखील नमूद केलेले आहे. उच्च न्यायालयाने स्टे दिला होता कारण खाजगी व्यक्ती हायकोर्टामध्ये गेल्यामुळे कामावर परिणाम झाला का ? कोर्टात केस गेली होती, त्याचे काय झाले ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सेफ्टी म्हणून काम काही दिवस थांबले होते. नंतर ते काम चालू करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागही यामध्ये काम करीत आहे. कोळंबीच्या ऐवजी येथे क्रॅब प्रोडक्शन करण्यात येणार आहे. एसीएमने जानेवारी,२०१७ पासून या तलावाचा ताबा घेतला होता. कोर्टातील केस चालू आहे, त्यामध्ये हिअरिंग चालू आहेत. स्टे आलेला नाही. कोर्टाचा निर्णय येत नाही, तोपर्यंत याच्यामध्ये स्टे देण्यात येणार नाही.

परिच्छेद क्र. २.२.९.५ - 'मच्छिमार नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी वित्तीय सहाय्याचे अपर्याप्तवितरण' :-

'मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण' या योजनेखाली मासेमारीस दुर्बल गटातील कार्यक्रम असल्याचे गृहित धरुन NCDC कडून FCS ला शिथिल अटींवर अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेखाली अर्थसहाय्य राज्य शासन, NCDC आणि लाभार्थी यांना १०:८०:१० या प्रमाणात विभागून द्यावयाचे होते. म्हणजे यामध्ये राज्य शासन याचा १० % हिस्सा NCDC यांचा व लाभार्थी यांचा १०% दिला आहे. तर एनसीडीसीकडून पैसे कमी मिळतात का ? राज्य शासनाकडून पैसे कमी मिळतात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्य शासनाकडून कमी पैसे मिळतात. दहा टक्के डीपीडीसीचे पैसे मिळतात. राज्य शासनाकडून उरलेले २५+५५ टक्के मिळत नाहीत. एनसीडीसीकडून लोन मिळते. शासनाला त्याकरिता हमी द्यावी लागते. शासन लोन आणि हमी कमी ठेवण्याचा प्रयत्न करतो. ८० टक्के लोन असते, दहा टक्के डीपीडीसी आणि राज्य सरकार स्वतः म्हणजे ते पैसे डीपीडीसीच देते. शासनाचा सहभाग केवळ हमी देण्यापुरता मर्यादित आहे. सुरुवातील निधी द्यावा लागतो.ोतोही नंतर रिएम्बर्स्ड होतो. मंजूर प्रकल्पांप्रमाणे तरतूद कमी होते. आता मंजूरी देणे बंद झालेले आहे.

विभागाने ५५ टक्के पार्टली दिले असेल किंवा ३५ टक्के दिले असेल तर सुरुवातीला ९५ + ३५ असे याचे गुणोत्तर होते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एकूण अर्धवट असलेल्या ६६ संस्था आहेत. ४०७ गट आहेत.तजवळपास ११८ कोटी रुपये देणे आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, यामध्ये शासनाचे पैसे मागणीप्रमाणे मिळत नाहीत. डीपीडीसीमध्ये अडचण आहे का ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, डीपीडीसीमध्ये अडचण नाही. प्रकरणे येत राहतात.

नवीन प्रकल्प न घेता प्रथम या सर्व प्रकल्पांना पैसे उपलब्धततेप्रमाणे पूर्ण करावे अशी भुमिका विभागाची असली पाहिजे असे समितीने सुचित केले.

नौका बांधण्याकरीता अर्थसहायाचा तपशील याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **(विवरण क्र.४)** मध्ये समाविष्ट आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.१ - सागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधांचा विकास मच्छिमार बंदरे विकसीत न करणे :-

सन २००२-०३ मध्ये लागू झालेल्या सागरी मत्स्यव्यवसाय पायाभुत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे यासाठीच्या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाने एकूण रु.१६५.४७ कोटी खर्चात आनंदवाडी, सिंधुदुर्ग (फेब्रुवारी २००८), करंजा रायगड (मार्च २०११) आणि अर्नाळा ठाणे (मार्च २०११) येथे तीन मच्छिमार बंदरे बांधण्यास मंजूरी दिली. पण ते अद्याप पूर्ण झाले नसून त्यांनीच एक केंद्र तर वादामध्ये अडकले आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की,हे तिनही बंदरे आहेत. तीन जे सध्या चालू असतील तर ते टप्पा -१ आणि टप्पा-२ अशी कामे चालू आहेत. तिसरा भाऊचा धक्का आहे. अर्नाळा येथे पूर्णपणे विरोध झालेला आहे. आनंदवाडी येथे शिफ्ट केले, कारण तेथेही विरोध झालेला आहे. तेथे नवीन बांधकाम करावयाचे आहे. करंजाला हार्ड रॉक लागला. हार्ड रॉकमुळे तेथे प्रॉब्लेम आला, तेथे रिवाईज्ड एस्टीमेट काढावे लागले. याची निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे.

प्रकल्पावर ५.७० कोटी रुपये खर्च झालेले आहेत, त्याची काय परिस्थिती आहे ? तो खर्च व्यर्थ आहे, असे कसे नियोजन केले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हा खर्च व्यर्थ गेला नाही.

तथापि, विभागीय प्रतिनिधींनी आताच समितीला सांगितले की, आनंदवाडी येथे शिफ्ट केले आहे पण लेखी उत्तरामध्ये मात्र असे नमूद केले आहे की, हे स्थानिक मच्छिमारांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन काम हाती घेण्याबाबत विचार करण्यात येईल. यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आनंदवाडी,ता.देवगड येथे ५.७० कोटी रुपयांमध्ये ५०० मीटरचे रेक्लमेशनचे काम झालेले आहे. त्यानंतर लोकांच्या विरोधामुळे ते काम बंद झालेले आहे.

सदर काम बंद झालेले आहे. कारण तिकडच्या सर्व लोकांची मान्यता न घेता आता काम अर्धवट आहे, शासनाचे ५.७० कोटी रुपये खर्च झाले. एखाद्या प्रकल्पाची किंमत वाढली तर ठीक आहे. पण निष्फळ खर्च झालेला आहे. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी हार्बर इंजिनियर, सिंधुदुर्ग यांनी सांगितले की, रिक्लमेशनचा रिवाईज्ड केलेला प्रकल्प हा पार्ट आहे, त्याच्यामध्ये ५.७० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचा यामध्ये समावेश आहे. रिक्लमेशन लॅण्ड नवीन प्रोजेक्टचा भाग आहे. हा खर्च वाया जाणारा नाही.

याला आता सुप्रमा मिळालीच नाही ना ? केंद्र शासनाची मंजूरी मिळानी आहे का ? आता प्रकल्पाची किंमत किती आहे ? पूर्वी या प्रकल्पाची किंमत काय होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ११.१२.२०१७ रोजी सुप्रमा आलेली आहे. आता याकरिता २५ कोटी रुपये देणार आहोत. पूर्वी ५०-५० टक्के अशी होती. ८८ कोटी रुपये आता प्रोजेक्ट कॉस्ट आहे.

मग आता याबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे ? आता या प्रकल्पाची किंमत वाढली. केंद्र शासन ५० टक्के निधी देणार नाही.केंद्र शासन २५ टक्के देणार आहे. आता राज्य शासन हा प्रकल्प हाती घेणार नाही का ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, अगोदर केंद्र शासनाने विचारले होते की, २५ कोटी रुपये दिल्यानंतरी जी काही गॅप राहणार आहे, हमी दिल्यानंतर २५ कोटी रुपये मंजूर केले होते. हे सबमिट केल्यानंतरची ही ७५/२५ टक्के देण्याची डेव्हलपमेंट झालेली आहे. आता केंद्र शासन याकरिता २५ टक्के निधी देणार. राज्याने हमी दिलेली आहे.

आता या प्रकल्पाची किंमत ५०७० कोटी रुपय खर्च झालेला असून आता या कामाला कधी सुरुवात होणार आहे ? कोणती मान्यता बाकी आहे ? पूर्वी किती किंमत होती आता निविदा काढावे लागणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, २९ कोटी रुपये पूर्वी याची किंमत होती.

खर तर राज्य शासनाला मान्य असेल टोकन ग्रांट १० कोटी रुपये दिल्यानंतरही काम सुरु केले पाहिजे. पूर्ण पैसे एकाच वेळी मिळाले पाहिजे, असा हट्ट विभागाने धरता कामा नये. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, बजेटमध्ये पैसे नाहीत, पैसे पूर्ण असल्याशिवाय काम सुरु करता येणार नाही. डिपॉझिट वर्क हे आहे,

या प्रकल्पाकरिता ८८ कोटी रुपये पूर्णतः देता येत नाही. पार्ट पेमेंट म्हणजे राज्य शासनाने याकरिता मान्यता दिलेली आहे, त्याप्रमाणे या बजेटमध्ये याकरिता प्रोव्हिजन करण्यात येणार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पुरवाणी मागण्यांमध्ये निधी मागून त्यांना वर्ग करण्यात येणार आहे. त्यानंतर ते काम सुरु करण्यात येणार आहे.

सदर काम रिवाईज्ड झाले तर टेंडर नवीन काढणार का ? कारण २९ कोटी रुपयांचा प्रकल्प आता ८८ कोटी रुपयांचा झालेला आहे. ही बाब निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्राजेक्टमध्ये रिक्लमेशन ऑफ लॅण्ड आणि त्यावर स्ट्रक्चर बांधावयाचे असा प्रोजेक्ट होता. रिक्लमेशनचा १२ कोटी रुपयांचा टेंडर होते. त्यापैकी ०५ कोटी रुपयांचा रिक्लेमेशन ऑफ लॅण्ड झालले आहे, बाकीचे राहिलले आहे. आता एक पहिल्या पार्टचे टेंडर झालेले आहे, ते टेंडर लाईव्ह करुन १२ कोटी रुपयांमधील ०७ कोटी रुपयांचे उर्वरित रिक्लमेशनचे काम करणे शक्य आहे. उर्वरित भागाच्या कामाच्या निविदा पुन्हा नव्याने काढाव्या लागणार आहे.

फर्स्ट पार्टचा टेंडर ऑलरेडी आहे, त्याला १२ कोटी रुपये खर्च करुन ते पूर्ण करता येईल.ल त्यानंतर बाकीच्या कामाचा नवीन टेंडर फ्लोट करावे लागेल.लबाकीचे दोन प्रकल्पाची काय परिस्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्नाळा प्रकल्पाला हात लावलेला नाही. अर्नाळाकरिता विरोध झाला, ते रद्द झालेला आहे.ेजनमत तयार करा असे सांगितलले आहे, ते होत नाही. करंजामध्ये हार्ड रॉक लागलेला आहे. याकरिता सुप्रमा मिळालेली आहे. केंद्र हिस्सा प्राप्त होणेकरिता आपण केंद्राला कळविलेले आहे. केंद्राकडून पैसे आलेले नाही.

करंजा येथे हार्ड रॉक लागला पण जागेची निवड करण्यापूर्वी जागेची तपासणी करण्यात येत नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याचे सर्वेक्षण संस्थांने केले व त्याचे अंदाजपत्रक विभागास दिले.

विभागाने हा प्रस्ताव दिनांक ३ जानेवारी,२०१७ रोजी पाठविलेला आहे, एक वर्षानंतरही केंद्र शासनाची मान्यता मिळालेली नाही. यामध्ये कोणतेही नियोजन नाही, ५ कोटी व १० कोटी रुपये खर्च केले काम थांबवून आता थांबलेले आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये ३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. हार्ड रॉकमुळे विलंब झाला साईट तीच आहे.

करंजा येथे मात्र काम सुरु केलेले होते पण ते काम आता थांबलेले आहे. हे काम केव्हापासून सुरु केले व केव्हापासून ते थांबलेले आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश सन २०१२ मधला आहे. आता राज्य शासनाने सांगितले की, १५३.०६ कोटी खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सुरुवातीला याची किंमत ५७ कोटी रुपये होती असे समितीने नमूद केले व या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, आता या कामाचे पुढचे नियोजन काय आहे. सदर जागेवर कठीण खडक आहे. याची तपासणी नीट झाली नव्हती

का ? मेरी बोर्डाने ज्यावेळी याला मान्यता दिली असेल त्यावेळी टेस्टींग साईटचे सुपरव्हिजन, चेकिंग करुनच मान्यता दिली असेल ना, त्यावेळी हार्ड रॉक आहे, हे पाहिले नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सर्व्हिंगकरिता केंद्र शासनाची एक संस्था आहे, त्यांनीच येऊन इन्व्हेस्टींगेशन केले होते. याचे बोअरिंग केले होते. अजून डीप लागले असेल सॅम्पलमध्ये आले नाही परंतु प्रत्यक्षात आलेले आहे. साईट कंडिशंन व्हेअरी होतात.

ज्या साईटवर टेस्टींग केले, एकाच ठिकाणी ड्रील पीड करीत नाही, वेगवेगळया ठिकाणी करतात. जेट्टी म्हणजे सर्व ठिकाणी करावे लागते. विविध ठिकाणी ठराविक अंतरावर ते टेस्टींग करतात. त्यानंतर तो रिपोर्ट पाठविला जातो. इरिगेशन धरण बांध बांधतांनाही सॅम्पलींग करावे लागते. हार्ड रॉक लागला हे तर सहज लक्षात यायला पाहिजे होते. केंद्र सरकारच्या एजन्सीने योग्य सर्व्हे केलेला नाही का ? याबाबत आपण त्यांना कळविले का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तसे केंद्र सरकारने कळविले होते. नंतर त्यांनी सुधारित एस्टीमेट पाठविलेले आहे.

केंद्र शासनाची एजन्सी सॅम्पलींग करताना राज्य शासनाचा कोणताही अधिकार नसतो का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून फक्त केंद्र शासनाच्या प्रतिनिधींना साईटवर घेऊन जाण्यात येते, पॅसिलिटेट एक्स्पर्ट एजन्सी आहे. याबाबत स्टेट गव्हर्नमेंटकडून काहीही टेस्टींग करण्यात येत नाही.

परिच्छेद क्रमांक २.२.१०.२ जेट्टीच्या बांधकामातील विलंब राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत अर्थसहाय्य :-

राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत १३ जेट्टी पूर्ण झाल्या आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. पण विभागाच्या लेखी उत्तरामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना सन २०११-१२ मध्ये एकूण रुपये ६९.९९४९ कोटीची १९ कामाना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरच्या कामापैकी १० कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत ७ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. म्हणजे एकूण १७ जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, १७ पूर्ण झाल्या आहेत असे उत्तर दिले आहे. ४ जेट्टी फिजिकली पूर्ण आहेत. परंतु, अद्याप त्या फायनल केलेल्या नाहीत. २ रद्द झाल्या अशाप्रकारे १७ पूर्ण झाल्या आहेत. १३ पूर्ण होऊन हँड ओव्हर झालेल्या आहेत. याकरिता एकूण ५७.७० कोटी रुपयांचे सेव्हींग झाले आहे. जी २ कामे रद्द केली, त्यावर काही खर्च झाला नाही. ती सुरुवातीलाच रद्द झाली.

नाबार्ड अंतर्गत अर्थसहाय्य याअंतर्गत कामांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टप्पा १६ मध्ये २० कामे होती. त्यातील १९ पूर्ण झाली तर १ रद्द झाले आहे. त्याकरिता ६८ कोटी रुपयांचा खर्च झाला. टप्पा २० या नवीन टप्प्यामध्ये ९ कामे मंजूर आहेत. त्यातील २ पूर्ण झाली असून ७ कामे प्रगतीपथावर आहेत. टप्पा २० हा मागच्या वर्षाचा आहे. तसेच टप्पा २३ मध्ये कामे नाहीत.

पण विभागाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, टप्पा २३ अंतर्गत १० कामांसाठी ५० कोटी इतका निधी नाबार्डला मंजूर झाले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते अप्रायजल दिले आहे. ती कामे आता मंजूर होतील मग त्यांचे काम सुरु होईल.

टप्पा १६ अंतर्गत २० कामांपैकी १९ कामे पूर्ण केली तर १ काम रद्द केले असल्याचे नमूद केले आहे. तसेच, सदरच्या योजनेच्या कामातील काही कामे जागा उपलब्ध नसल्याने रद्द करण्यात आलेली आहेत असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, स्थानिक विरोधामुळे एक काम रद्द केले आहे. जागा उपलब्ध नसल्याने एक काम रद्द केले.

काही कामे रद्द करण्यात आलेली आहेत. तसेच, उपलब्धतेनुसार प्रस्तुत कामे लवकरच सुरु करण्यात येतील असेही लेखी उत्तरात नमूद केले आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जेट्टीच्या कामामध्ये ३-४ गोष्टी असतात. जेट्टी सुरु होऊन जाते परंतु, जाळी वाळत घालण्याची जागा असते किंवा लिलावाची इमारत असते. तसेच, बोट लावण्याकरिता एक जागा असते. सोसायटीच्या बैठकीकरिता इमारत अशाप्रकारे २-३ इमारती असतात. यासाठी काही ठिकाणी जागा उपलब्ध नाही. ते काम सोडून बाकी काम पूर्ण झाले आहे.

टप्पा २३ व २० बाबतची माहिती द्यावी असे समितीने सांगतले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, टप्पा २० मध्ये ९ कामे मंजूर आहेत. त्यातील २ पूर्ण झाली असून ७ कामे प्रगतीपथावर आहेत. त्या ९ कामांची किंमत १२० कोटी रुपयांची असून ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जेट्टीचे बांधकाम व त्या अनुषंगाने सर्व कामे आहेत.

परिच्छेद क्रमांक २.२.१०.३ सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र न बांधणे

सन २०१० मध्ये अलिबाग येथे प्रदर्शन सभागृह व वस्तूसंग्राहलय याचा समावेश असलेले मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र बांधण्यास १.८५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. त्यानंतर सन २०१४ मध्ये २.८८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. परंतु सन २०१८ पर्यंत प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम सुरु करण्यात आले नाही. याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यापूर्वी ज्या कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आले होते त्यानी सुरक्षा ठेवची रक्कम न भरल्यामुळे सदर कंत्राटदाराला टर्मिनेट करण्यात आले. त्यामुळे आता नव्याने निविदा काढून सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

प्रशासकीय मान्यता २.८८ कोटी रुपयांची असताना त्यापैकी कंत्राटदाराला किती रकमेचे काम देण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रशासकीय मान्यतेप्रमाणे कंत्राटदाराला काम देण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये कोणत्या सुविधा दिल्या जाणार आहेत ? व सदर प्रशिक्षण केंद्र कोठे तयार होणार आहे ? तसेच प्रशिक्षण नौका देखिल खरेदी करण्यात आली होती त्याची सध्या अवस्था कशी आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रदर्शन सभागृह, वस्तू संग्रहालय आहे. प्रशिक्षण नौका एप्रिल, २०१७ मध्ये विभागाच्या ताब्यात आली असून सदर नौका खरेदी केल्यानंतर त्याकरिता आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग मंजूर नसल्यामुळे शासनाने आऊटसोर्सिंग पध्दतीने कर्मचारी वर्ग भरण्यासाठी परवानगी दिली असून त्याकरिता निविदा काढण्यात आली आहे.

नोव्हेंबर, २०१६ मध्ये १.०५ कोटी रुपयांची प्रशिक्षण नौका खरेदी करण्यात आली. प्रशिक्षण नौकेसंबंधी कोणतेही नियोजन न करता किंवा त्याकरिता कोणताही कर्मचारी वर्गाची व्यवस्था न करता निविदा का काढली ? या प्रशिक्षण नौकेची लांबी रुंदी किती आहे तसेच ती फायबर, लाकूड, ॲल्यूमिनियम किंवा स्टीलची आहे ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रमुखांनी सांगितले की, सदर प्रशिक्षण नौका राष्ट्रीय कृषी विकास (RKVY) योजनेअंतर्गत मंजूर असून सदर योजनेअंतर्गत त्याकरिता आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग मंजूर होत नसल्यामुळे शासनाने त्याकरिता आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग नेमण्यासाठी आऊटसोर्सिंगकरिता परवानगी दिली आहे. तसेच सदर बोट फायबरची आहे.

प्रशिक्षण नौका कोणाकडून खरेदी केली, त्याकरिता किती लोकांना कोटेशन देण्यात आले होते, बोटीचे इंजिन कोणत्या कंपनीचे आहे ? याबाबत सविस्तर माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले असता बोटीसंबंधीची सविस्तर माहिती समितीला नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे समितीस आश्वास्त करण्यात आले.

सदर प्रशिक्षण केंद्र ज्या जागी बांधण्यात येत आहे ती जागा कस्टम विभागाकडून डिमांड केली जात आहे. तसेच सदर जागा सध्या वादामध्ये आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रशिक्षण केंद्राची सदर जागा मत्स्य व्यवसाय विभागाच्या नावावर झाली आहे. यापूर्वी सदर जागेवर मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रशिक्षण केंद्र होते ते आता पाडले आहे. तसेच सदर जमीन सुरुवातीला उपलब्ध नसल्यामुळे निविदा प्रक्रियेला विलंब झाला. त्यानंतर विभागीय

आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१४ च्या आदेशान्वये ०.६, ०.७ आर जमीन ही सर्व्हे नं.३५/१ अलिबाग, कोळीवाडा, मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या नावे उपलब्ध करुन दिली आहे.

तथापि, सदर प्रक्रियेनंतर कस्टम विभागाने तेथील नगरपालिका व स्थानिक लोकांना नोटीस दिली आहे की, तेथील सर्व बांधकाम काढून टाकावे. परंतु त्यावर माननीय महसूल मंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. सदर जागा वादामध्ये असून ती कस्टम विभागाकडे हॅण्डओव्हर करण्यात आली होती. आता ती जागा कस्टम विभागाकडून काढून घेण्याकरिता प्रक्रिया सुरु करावी अशी मागणी करण्यात आलेली आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या आदेशान्वये ७/१२ उता-यावर मत्स्यव्यवसाय विभागाचे नाव घेण्यात आले आहे.

सदर प्रकल्पासाठी सन २०१०-११ मध्ये १.८५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून सुध्दा सदर प्रकल्पामध्ये विलंब झाला आहे. तसेच ज्या जागेवर प्रशिक्षण केंद्र बांधण्यात येणार होते त्या जागेचा ७/१२ उतारा देण्यात आला नव्हता. हाच मूळ मुद्दा आहे. ती जागा वादामध्ये असताना सार्वजनिक बांधकाम विभागाला १ कोटी रुपये रिलिज करण्यात आले होते. परंतु त्यांनी एक वर्षाच्या काळात निविदा सुध्दा काढली नाही. यासंबंधी मत्स्यव्यवसाय विभागाचे त्यावर काही मॉनेटरिंग नाही का ? असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर जागा विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या दिनांक ६ जानेवारी, २०१४ च्या आदेशान्वये मिळालेली आहे. त्यानंतर निविदा काढून ज्या कंत्राटदाराला काम देण्यात आले होते. त्याने काम सुरु न केल्यामुळे त्याला टर्मिनेट करुन नवीन निविदा काढण्यात आली असून नवीन नियमानुसार कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) देण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसायाचे प्रशिक्षण सुरु करण्यासाठी तेथे चांगले वातावरण आवश्यक असते. परंतु त्या जागेच्या मागील बाजूस कोळीवाडयाची झोपडपट्टी व गटार असल्यामुळे सदर जागा प्रशिक्षण केंद्रासाठी योग्य नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली.

विभागीय आयुक्त यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१४ रोजी आदेश दिल्यानंतर सन २०१८ पर्यंत बांधकाम का सुरु करण्यात आले नाही ? जर सदर बांधकाम सुरु केले नसेल तर स्थानिक आमदार व समितीच्या सदस्यांना बरोबर घेऊन त्या जागेची तपासणी करुन योग्य जागेवर प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम सुरु करावे. कारण सदर प्रक्रियेकरिता आता विलंब लावण्यात येऊ नये असे समितीने सुचित केले.

प्रशिक्षण केंद्राचा भाग म्हणून बोट खरेदी केली आहे. मग सदर बोटीवर कर्मचारी वर्ग तर पाहिजे. त्या संदर्भातील विभागाचे नियोजन काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बोट बंदरात नोव्हेंबर, २०१६ पासून नांगर टाकून उभी आहे. बोटीवर कर्मचारी वर्ग नसल्याने बोटीवर प्रशिक्षण सुरु नाही. बोटीवरील तांडेल व कर्मचारी आऊटसोर्सिंग करण्याची निविदा काढली आहे, कर्मचारी वर्ग मिळाल्यानंतर प्रशिक्षण सुरु होईल.

कर्मचारी आऊट सोर्सिंगचे घेण्यासंदर्भात निविदा काढली, त्या कधी उघडण्यात येणार आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या निविदाप्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पुन्हा निविदा मागतिल्या आहेत.

मच्छिमार प्रशिक्षणासाठी बोट आहे, निधी आहे मात्र कर्मचारी वर्ग आऊटसोर्सिंगने भरण्यातकरता काढण्यात आलेल्या निविदेस प्रतिसाद न मिळण्याचे कारण काय ? त्यासाठीची पात्रता काय मागितली होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बोट चालविण्याचा अनुभव व परवाना असला पाहिजे. त्यासाठी ४ तांडेल व सह तांडेल लागतात.

मग याकरिता विभागाने जिल्हा संघाकडे किंवा मत्स्य सोसायटयाकडे मागणी करायची होती. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जर पुन्हा प्रतिसाद मिळाला नाही तर त्या संघाकडे किंवा मत्स्य सोसायट्याकडे मागण्यात येईल.

महालेखाकारांचा आक्षेप बरोबर आहे. बोट फायबरची आहे, म्हणजे जास्तीत जास्त ८ ते १० लाख रुपयांची आहे. पण त्यासाठी १ कोटी रुपये दिले आहेत. तेवढ्या किंमतीची बोट नाही. मशिनरी खरेदी करायची, तशीच न वापरता ठेवायची आणि नंतर ६ वर्षांनी तिचा लिलाव करुन भंगारात काढायची, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच १ कोटी ५ लाख रुपयांना घेतलेली मशिन आजच्या स्थितीत सुव्यवस्थित आहे का, हे पहाण्यासाठी विभागीय सचिवांनी एकदा स्वतः

बोटींची पाहणी करावी तसेच अनेक मच्छिमार संघटना आहेत, त्यांच्याकडून मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकत असल्यामुळे त्यातून मनुष्यबळ घेण्यात यावे असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास होकार दर्शविला.

फायबरच्या बोटीची किंमत साधारणपणे ८-१० लाख रुपये असते. पण येथे आणि त्यासाठी विभागाने १ कोटी रुपये खर्च केले. शिवाय यामध्ये इंजिनचे पैसे वेगळे आहेत म्हणून त्याचे थर्ड पार्टी लेखापरीक्षण झाले पाहिजे असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी समितीस अश्वास्त कले की, यासंदर्भात थर्ड पार्टी लेखापरीक्षण केले जाईल. तसेच बोटीसंदर्भातील सर्व माहिती समितीस सादर करण्यात येईल.

प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे काम अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही. या इमारतीसाठी कार्यारंभ आदेश कधी दिला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दिनांक २३/१/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश दिला आहे. यासाठी २४ महिन्याची मुदत दिली आहे. २ वर्षात हे काम सुरु होणार आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.१०.४ - सुरिमी प्रक्रिया केंद्रासाठी निधी मुक्त न करणे :-

सुरमि प्रकल्पाच्या थोडक्यात माहिती विषद करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर प्रकल्प २५ कोटी रुपयांचा होता, त्यापैकी २३ कोटी ८१ लाख रुपये संस्थेला देण्यात आले होते, उर्वरित १ कोटी ४८ लाख रुपयेदेखील देण्यात आले आहेत. सुरमी प्रकल्प म्हणजे यामध्ये माशाची पेस्ट केली जाते. सदर प्रकल्पाचे उदघाटन होऊन प्रकल्प सुरु झालेला आहे.

या प्रकल्पामध्ये ससून डॉक संस्थेचा १० टक्के वाटा आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रकल्प सुरु झाला आहे.यामध्ये ससून डॉक सोसायटीचा वाटा आहे. शासनाने मंजूर केलेल्या कर्जापैकी २ कोटी रुपये राहिले होते, त्यापैकी आता फक्त ७१ लाख रुपये संस्थेला देणे शिल्लक आहे. १ कोटी ४८ लाख रुपये देण्यात आले आहेत,

हा प्रकल्प सुरु होऊन एक महिनाच झाला आहे. सदर प्रकल्पाची उपयुक्तता काय

आहे ? आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी असल्याने हा प्रकल्प सुरु केला आहे तर तिकडे किती उत्पादन पाठविले गेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे उत्पादन १०० टक्के निर्यात (एक्सपोर्ट) करण्याचे आहे. माशांचे प्रोटिन काढून त्यांची अनेक प्रकारच्या माशांच्या आकाराप्रमाणे पेस्ट तयार करुन निर्यात (एक्सपोर्ट) करण्यात येते. हा प्रकल्प ससून डॉकला नसून हा प्रकल्प दिगोड्याला असून तिकडच्या ससून डॉक सोसायटीचा आहे. अगोदर त्यांचे आईस प्लँट व प्रोसेसिंग युनिट होते. केशव कोळी हे या प्रकल्पाशी संबंधित आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारात सुरिमीची वाढती मागणी लक्षात घेता NCDC ने रु.२५.३५ कोटी खर्चात रायगड जिल्ह्यातील उरण येथे दरवर्षी ५००० टन सुरिमीच्या उत्पादनासाठी सुरिमी प्रक्रिया केंद्र (SPU) प्रस्थापित करण्याच्या विभागाच्या ऑक्टोबर २०१३ च्या प्रस्तावास मान्यता दिली. असे महालेखाकारांनी नमूद केले आहे. या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, यावर्षीचे उद्दिष्ट किती आहे आणि किती उद्दिष्ट गाठण्यात येणार आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर प्रकल्प १ महिन्यापूर्वी सुरु केला आहे, महिन्याला किती उत्पादन होईल, याचा अंदाज घेतलेला नाही.

पण मंजुरी देताना स्पष्ट सांगितले आहे की, रायगड जिल्ह्यातील उरण येथे दरवर्षी ५ हजार टन सुरिमीच्या उत्पादनासाठी सुरिमी प्रक्रिया केंद्र प्रस्थापित करण्याचा विभागाचा ऑक्टोबर, २०१३ च्या प्रस्तावात मान्यता दिली. या प्रकल्पात ५ हजार टन सुरिमी दरवर्षी तयार होईल, इतक्या क्षमतेचा हा प्रकल्प आहे. आता सध्या किती उत्पादन होत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आता २४ मेट्रिक टन प्रति दिन उत्पादन होणार आहे.

जर २४ मेट्रिक टन प्रति दिन उत्पादन झाले तर ५ हजार मेट्रिक टन उत्पन्न नक्की होईल. पण बोट जेव्हा समुद्रात जाते तेव्हा सदर बोट ८ दिवसांनी परत येते मग २४ टन उत्पन्न प्रती दिन कसे होईल म्हणजे ही आकडेवारी फक्त पेपरवरच दिसून येते. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, काही बोटी या सोसायटीच्या स्वतःच्या मालकीच्या देखील आहे.

हा प्रकल्प एक्सपोर्ट ओरिएन्टेड आहे. सुरमीचे किती उत्पादन झाले, निर्यात कुठे केली, तसेच या प्रकल्पासंदर्भात कोणाशी एमओयू झाला याबाबतची माहिती विभागाडून समितीच्या बैठकीत प्राप्त झाली नसल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली. सदर माहिती समितीस सादर करण्यात यावी असे निदेश दिले.

या सोसायटीला पूर्वी आईस फॅक्टरी काढण्यासाठी पैसे दिले आहेत. सद्यःस्थितीत त्याच्या रिपेमेंटची स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर सोसायटीच्या आईस फॅक्टरीकरिता निधी दिला होता. बोटीसाठी व आईस फॅक्टरीसाठी रक्कम वसूलपात्र असून आईस फॅक्टरीची रक्कम वसूल झाली आहे.

जे २५ कोटी रुपये दिले आहेत, यातूनच सदर रक्कम वसुली केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी नकारार्थी उत्तर दिले.

या संदर्भात सविस्तर माहिती व प्रकल्पाचा सविस्तर अहवाल समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती समितीला सादर करण्यात येईल असे आश्वास्त केले.

परिच्छेद क्रमांक २.२.१०.५ बर्फाचा कारखाना शीतगृह प्रस्थापित न करणे :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय प्रतिनिधी समितीस विदित केले की, बर्फाचा कारखाना शीतगृह प्रस्थापित करणे याकरिता इरनेमाज फीशींग ॲन्ड क्रेडीट सहकारी संस्थेस १.१५ कोटी रुपये दिले होते, ते पूर्ण वसूल झालेले असून त्यावरील व्याज वसूल होणे बाकी आहे.

या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, या प्रकल्पाकरिता ७५ कोटी रुपये देऊनही जर काम सुरु केले नसेल तर त्यानंतर ४० कोटी रुपये का दिले गेले ? यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले की, या कारखान्याचे अंदाजपत्रक वाढल्यामुळे हा कारखाना सुरु होऊ शकलेला नाही. याकरिता शासनाने १.१५ कोटी रुपये दिले होते, ते सर्व वसूल झालेले असून आता केवळ त्यावरील व्याज वसूल करावयाचे आहे. ही बाब मार्च २०१२-२०१३ या दरम्यानची आहे.

विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरण ज्ञापनातील उत्तरात असे नमूद केले आहे की, सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन निदर्शनास येणा-या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, मात्र याप्रमाणे कारवाई केलेली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मूळ रक्कम वसूल झालेली आहे. व्याजाची वसूली होणे बाकी आहे. खरे तर यामध्ये कामाच्या प्रगतीनुसार तत्कालीन अधिका-यांनी रक्कम रिलीज करणे आवश्यक होते.े

असे असेल तर जबाबदार अधिका-यांवर फौजदारी खटला उभा करणे आवश्यक आहे. पण येथे तर संबंधित अधिका-यांवर पाच वर्षानंतरही कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब असमर्थनीय आहे. सन २०१३ मध्ये एक्झिट कॉन्फरन्स झाली त्यामध्ये सांगण्यात आले होते की, याबाबत कारवाई करण्यात येईल. परंतु अद्याप पावेतो यासंदर्भात कारवाईची प्रक्रिया सुरु केलेली नसल्यामुळे तत्कालीन अधिका-यांनी किती कालावधीत किती रक्कम मुक्त केली, याचा आढावा घेऊन व्याज वसूलीची व संबंधित जबाबदार अधिका-यांवर योग्य ती कारवाई करण्याची प्रक्रिया करावी. असे समितीने सुचित केले.

हा कारखाना चालू नाही तरीही १.१५ कोटी रुपये कसे वसूल झाले ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कारखाना जरी चालू झालेला नसला तरीही ज्याने हे पैसे कारखान्याकरिता घेतले होते, त्याच्या अकाऊंटमध्ये हे पैसे जसेच्या तसे होते, ते पैसे त्याने खर्च न केल्यामुळे शासनाला ते वसूल करता आले. आता त्याच्या व्याजाच्या वसूलीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

एनसीडीसीकडून निधी प्राप्त होतो, पण तो निधी व्यपगत होतो हे योग्य नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

पाच वर्षानंतरही कारवाई करण्यात येईल असे जर विभागाचे उत्तर असेल तर ते असमर्थनीय आहे. अधिका-यांनी चूक केली असल्यामुळे विभागीय सचिवांनी समितीसमोर बैठकीसाठी येताना संबधितांवर कारवाई करुनच यायला पाहिजे होते अशी समितीची अपेक्षा असते त्यामुळे एक महिन्याच्या आत सर्व जबाबदार अधिका-यांवर कारवाई करुन त्याबाबतची माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले.

एखाद्या प्रकल्पासाठी जेव्हा प्रस्ताव येतो व तो प्रकल्प इररिलेव्हंट होतो, त्यामुळे त्या प्रकल्पात गुंतविलेला निधी वाया जातो. त्यामुळे शासनाला किंवा लोकांना फायदा होत नाही. म्हणून ते पैसे वसूल झाले, एवढेच पुरे नाही. तर त्याच्यावरील व्याज व दंडही वसूल होणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्या सोसायटीने प्रयत्न केले होते. त्यांनी टेंडर काढले होते. जेवढे मंजूर झाले होते, त्यापेक्षा जास्त टेंडर आले होते. दरम्यानच्या काळात सोसायटीची मॅनेजमेंट बदलली होती. त्यांनी या पैशाचा वापर केलेला नाही.

प्रकल्पाच्या खर्चातील वाढ विचारात घेता संस्थेने ACF ला त्याच महिन्यात अतिरिक्त अर्थसहाय्य देण्याची किंवा रु.तीन कोटीच्या मंजूर अर्थसहाय्यात प्रकल्प उभारणे शक्य होण्यासाठी व्याप्ती ५० टक्क्यांनी कमी करण्याची विनंती केली. असा प्रस्ताव पाठविला होता. उत्तर आले नाही म्हणून ४० लाख रुपये परत सोसायटीला देण्यात आले. ९.१६ लाख रुपयांची खरेदी केलेली जमीन आहे, ती जमीन सोसायटीने त्यांच्या पैशाने खरेदी केली की, शासनाच्या पैशाने खरेदी केली, तसेच आता ती जमीन कोणाच्या मालकीची राहणार ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर जमिन सोसायटीच्या मालकीची राहणार.

कोकणातील या सात जिल्हयांमध्ये किती एनसीडीसी बर्फकारखाने आतापर्यंत केले? त्यांना किती कर्जव्यवहार झाला, किती जणांनी रिपेमेंट सुरळित केलेले आहे.ेयामध्ये थकित पेमेट किती आहे ? ही सर्व माहिती समितीस सादर करावी असे निदेश समितीने दिले.

परिच्छेद क्र. २.२.११.१ बंदरातील मच्छिमार नौकाची कामात संख्या निश्चित न करणे :-

बंदरातील मच्छिमार लोकांची कमाल संख्या निश्चित न करणे यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या उत्तरात नमूद केले आहे की, ससून डॉक बंदरावर नोंदणी झालेली आहे. मिरकर वाडा बंदर येथे रत्नागिरी येथील परिसरातील मासेमारीसाठी बंदराचा वापर करण्यात येतो.ोत्या ठिकाणी टप्पा-२ मध्ये बंदराचा विकास करुन मासेमारी नौका उतरविण्यासाठी जागेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे मासेमारी नौका उतरविण्यासाठी मच्छिमारांचे वाद नसल्यामुळे या ठिकाणी नौकांची संख्या निश्चित करण्यात आलेली नाही. हे योग्य आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, येथे तीन मोठी बंदरे असूननससून डॉक, भाऊचा धक्का आणि मिरकर वाडा यापैकी भाऊच्या धक्क्याचा मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यातील जो फिशिंग लॅण्डींग सेंटर आहे, तेथेच केवळ नियमन केलेले आहे, एवढया मच्छिमारांना लायसन्स द्यावयाचे इतर ठिकाणी त्या त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे ॲडजस्ट होतात. अजून असा काही प्रॉब्लेम निर्माण होत नाही की, त्याला नियंत्रित करावयाचे एवढे मर्यादित लायसन्स देणे याबाबत प्रॉब्लेम निर्माण होत नाही. याची आवश्यकता पडलेली नाही. केवळ भाऊच्या धक्क्याच्या याच्यात केलेली आहे. तसेच अनधिकृतपणे मासेमारी करणा-या नौकांवर महाराष्ट्र मासेमारी नियमांतर्गत कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ अन्वये मत्स्यव्यवसाय शाश्वात पध्दतीने करण्याच्या दृष्टीने जिल्हयातील प्रत्येक बंदरात नोंदणीकृत होण्याच्या दृष्टीने विशिष्ट प्रकारच्या मच्छिमार नौकांची कमाल संख्या ठरविली पाहिजे. असे कायद्यामध्ये असेल तर विभागीय प्रतिनिधी असे कसे म्हणतात की, बाकीच्या दोन ठिकाणी प्रॉब्लेम येत नसल्यामुळे ते नीट चालू आहे.ेनौकांची संख्या निश्चित करणे हे कर्तव्य आहे. अन्यथा कायदा बदलला पाहिजे. जास्त बोटी असल्यामुळे ओव्हरफिशिंग होणार नाही का ? आणि जर ओव्हरफिंशिग झाले तर यावर नियंत्रण कसे ठेवण्यात येणार असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, लॅण्डिंग सेंटर १७३ आहेत. त्यातील केवळ भाऊचा धक्का येथे कमाल संख्या निश्चित केलेली आहे.

सन १९८१ चा कायदा आहे, जर कायदा असेल तर मच्छिमार नौकाची कमाल संख्या कसे काय हे ठरवू शकतात ? असे असेल तर कायद्याला काही अर्थ नाही. मागणी असेल तर कायदा बदलण्यात यावा असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कायद्यान्वये नियमन कमाल मर्यादा संख्या निश्चित करण्यात येऊ शकते. ही अनेबलिंग प्रोव्हिजन आहे. हे बंधनकारक नाही.

सन १९८१ च्या कायद्याप्रमाणे बोटी नोंदणी करण्याचा अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाला प्राप्त झाला. फिशिंग मर्चंट शिपिंगमध्ये हा जो कायदा तयार झाला, त्या नूसार विभागाकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग आहे का ? तसेच बेकायदेशीर नोंदणी तसेच परवाने सुध्दा देण्यात येत आहेत. मत्स्यव्यवसाय विभाग फक्त मच्छिमारी करण्याचा परवाना देऊ शकते, पूर्वी जे अधिकार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे (एमएमबीकडे) होते, ते अधिकार आता ते मत्स्यव्यवसाय विभागाने स्वतःकडे घेतलेले आहेत. विभागाकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही तसेच कॅप्टन म्हणून ज्या व्यक्तीने बोटीमध्ये काम केले आहे तसा कॅप्टन लागतो असा मर्चट कायदा आहे. बोट किती आहे किती ड्राफट पाहिजे, समुद्रात किंवा खाडीत किती ड्राफटची खोली आहे. याबाबतचे तांत्रिक ज्ञान पाहिजे. जो फिटर आहे त्यास इंजिनियअरचे काम दिले तर चालेल का ? येथे सिव्हील इजिनिअरच पाहिजे. तसेच परवाना घेताना, लायसन देताना जे सर्वेक्षण करण्यात येते त्याकरिता तांत्रिक कर्मचारी पाहिजे. फिशींग कायद्याप्रमाणे सहा महिन्यांनी

परवाने चेक करायचे असतात. जेव्हा वादळ येते, किंवा समुद्रामध्ये ज्या पध्दतीने पाऊस पडतो त्यामुळे होणारे नुकसानाची भरपाई शासनास द्यावी लागते. तसेच बोटीची क्षमता, उंची, वजन किती आहे तपासण्याचे अधिकार पहिले एमएमबीकडे होते. पण शासन निर्णय काढला व हे अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाकडे देण्यात आले पण हे सर्व अधिकार पूर्वीप्रमाणे एमएमबीकडे देण्यात यावे असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एमएबीकडे याचे लायसन्स होते. परंतु १४ ऑगस्ट,२०१४ पासून केंद्र शासनाने सर्व मरीन्स स्टेटमध्ये त्यात युनिफॉर्मिटी आणण्यासाठी रजिस्ट्रेशन आणि लायसन्सचे अधिकार मत्स्यव्यसायिक विभागाला दिलेले आहेत. बोटीची लांबी जी आहे, २० मीटरपेक्षा जास्त लांबीची बोट असेल तर एमएमबीला अधिकार दिलेला आहे, तो कायम ठेवलेला आहे.

पण तांत्रिक ज्ञान नसलेले अधिका-यांना या विषयीचे अधिकार दिलेले आहेत. अधिका-यांना समितीचा विरोध नाही. पण मुद्दा काय आहे की, मत्स्यव्यवसाय विभागाकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्यामुळे प्रामाणिकपणे काम होऊ शकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मेरीटाईम बोर्डाप्रमाणे टेक्नीकल कॅप्टन किंवा नेव्हीतील टेक्नीकल स्टाफ नाही. पण केंद्र शासनाने हे अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाला दिलेले आहेत.त

परंतु त्या करिता लागणारा आवश्यक तांत्रिक कर्मचारी वर्ग विभागाकडे असावा.२० मीटरच्या खालच्या बोटींची क्षमता तपासण्याचा अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाकडे आहे. या बोटींची तपासणी कशी करण्यात येते, त्याची प्रोसिजर काय आहे ? त्याकरिता तांत्रिक तपासणीची गरज नाही का ? विभागाचे लोक सक्षम आहेत का ? ऑगस्ट,२०१४ पासून केंद्र शासनाने सांगितल्याप्रमाणे हा अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाकडे आलेला आहे. एखादी बोट रजिस्ट्रेशनकरिता आल्यानंतर ही बोट मच्छिमार करायच्या योग्यतेची आहे का ? तसेच या बोटीची क्षमता आहे किंवा नाही हे जे तांत्रिक मुद्दे (टेक्नीकल ॲस्पेक्ट) आहे,ते तपासण्याची कोणती पध्दत अवलंबिण्यात येते, संबंधितांकडे अर्ज केला, पैसे भरले आणि विभागाने परवाना दिले, असे होते का ? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मत्स्यव्यवसाय विभागाकडे जे सहायक आयुक्त आहेत, ते रजिस्ट्रेशन कंपिटंट म्हणून केंद्र शासनाने नामनिर्देशन दिलेले आहे. ज्यावेळी बोट रजिस्ट्रेशला येते, त्यावेळी लायसेन्सिंग ऑफिसर सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडून पाहणी करण्यात येते. हे कॅप्टन नसले तरीही सहायक आयुक्त किंवा लायसनिंग ऑफिसर फिशिंगमधील टेक्नीकल ऑफिसर्स आहेत.त

फिशिंगबद्दल टेक्नीकल अधिकारी आहेत पण ते बोटीबाबत टेक्नीकल नाहीत. जे लोक बोटींची नोंदणी करताना ते टेक्नीकली साऊंड असणे बंधनकारक आहे. त्यांना त्या विषयाबाबत ज्ञान असणे आवश्यक आहे. ते फिशरीज टेक्नीकल एक्सपर्ट आहेत, पण बोटीची जर रजिस्ट्रेशन हवे असेल त्यावेळी बोटीचे स्पेसिफिकेशन, साऊंडनेस बघण्यासाठी हे अधिकारी सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणून जे तांत्रिक तज्ञ असतील त्यांची नेमणूक करावी किंवा एमएमबीच्या अधिका-यांच्या मत्स्यव्यवसाय विभागाने प्रतिनिधीं पूर्वीच घेण्यात यावे किंवा जोपर्यंत तांत्रिक कर्मचारी वर्ग मत्स्यव्यवसाय विभाग नियुक्त करीत नाही, तोपर्यंत एमएमबीकडून अधिकारी घेण्यात यावेत असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक २.२.११.२ 'आर्थिक क्षमतेच्या गस्ती नौकाची अनुपलब्धता' :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शासनाच्या आदेशाप्रमाणे सर्व गस्ती नौका भाडयाने घेतलेल्या आहेत. ठाणे पालघर करिता एक, मुंबई उपनगराकरिता एक, सिंधुदुर्गव रत्नागिरी करिता एक-एक अशा नौका घेतल्या आहेत. रायगडकरिता अद्याप नौका मिळाली नाही. गस्ती नौका दरवर्षी ऑगस्टपासून कार्यरत असतात. त्यांचे भाडे १४ ते १५ हजार रुपये प्रतीदिन असते. सर्व कर्मचारीवृद ज्यांची नौका आहे त्यांचाच असतो. फक्त विभागाचा लायसनींग ऑफीसर किंवा ज्याला प्राधिकृत करयात येते तो अधिकारी या बोटीवर असतो. अशा सध्या चार बोटी कार्यरत आहेत. आता घेतलेल्या बोटी १२ नॉटीकल मैलाच्या एरियामध्ये आवश्यक त्या स्पीड क्षमतेच्या आहेत.

शासनाचे मुळ आदेश ५ गरती नौका खरेदी करण्याबाबत आहेत. ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तो बोट खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला नाही, नंतर शासनाने भाडे तत्वावर ई-टेंडरींगद्वारे बोटी वापरण्यास परवानगी दिलेली आहे. सध्या एकूण ५ बोटींची गरज आहे, ४ बोटी आहेत. प्रशिक्षण संस्थांना काही दिवस गस्ती नौका मध्ये रुपांतर करण्यात येणार आहे.

केवळ कंत्राटदारास पेमेंट करण्याचे काम विभागाकडून करण्यात येत आहे असे वाटते कारण तेथे प्रत्यक्ष काम होताना दिसत नाही. तसेच १२ नॉटीकल मैलामध्ये पोलीसांच्या गस्ती नौका आहेत असे असताना विभागाला वेगळया नौका भाडयाने

घेण्याची गरज नाही. कारण प्रत्येक बंदरावर व किना-यावर पोलिसांच्या भरपूर बोटी आहेत या बोटीचा वापर केला तर अतिरिक्त बोटींची गरज राहणार नाही तसेच त्यामध्ये अधिकारी सुध्दा बसू शकतात. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जेव्हा गरज पडते तेव्हा पोलिसांच्या गस्ती नौकाही त्याकरिता वापरण्यात येतात. सागरी पोलिसांच्या बोटी फक्त ५ नॉटीकल मैलांपर्यत असतात. १२ नॉटीकल मैलाच्या पुढे कोस्ट गार्डच्या बोटी असतात.

समुद्रामध्ये मासेमारीकरिता अनधिकृतरित्या संचार करणा-या नौकांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यासाठी विभागाने या नौका भाडयाने घेतलेल्या आहेत. पाचही जिल्हयात अनधिकृत मासेमारी करणा-या किती बोटी मागील एका वर्षात जप्त केल्या आहेत ? एलईडी लाईटच्या बोटीमुळे मच्छिमारांचा संप चालू आहे. त्यामुळे किती नौका पकडल्या आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एलईडी लाईट बोटींचा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. केंद्र सरकारने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ पासून एलईडी लाईटवर बंदी घातली आहे. ३८ अनधिकृत मासेमारी करणा-या नौकांवर कारवाई केली आहे. एलईडी लाईटद्वारे मासेमारी १२ नॉटीकल मैलाच्या बाहेर या बोटी करतात. १२ नॉटीकल मैलाच्या बाहेर ॲक्शन घेण्याबाबत अधिकार विभागास नाही. केंद्र सरकारने एलईडी लाईटवर बंदी घालताना नोटीफिकेशनमध्ये सांगितले आहे की, कोस्ट गार्डने त्यांच्यावर ॲक्शन घेतली पाहिजे.

रायगड जिल्हयातील ब-याच ठिकाणी एलईडीच्या लाईटच्या विरोधात बोटी सध्या बंद असून त्या सर्व बोटी किना-यावर उभ्या आहेत, त्यामुळे मासेमारी बंद आहे. याबाबत तेथील अधिका-यांनी विभागास काही रिपोर्ट दिला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एकूण ३७६ बोटींवर कारवाई केली आहे. ९४ बोटींचे परवानेसुध्दा रद्द केले आहेत. रायगडमधील ६ एलईडी बोटीवर कारवाई केली आहे. बोटीवर कारवाई करण्याचे स्वरुप वेगवेगळे आहे उदा. परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केला असेल, ट्रॉलर परवानगी नसेल, पर्ससीना जाळी वापरली असेल, जाळीमध्ये वेगळया प्रकारे काही बदल केला असेल. लायसन्स परवाना देणारा अधिकारी बोटीचा परवानाही रद्द करतो किंवा त्यांनी केलेल्या मासेमारीचे लिलाव (ऑक्शन) करुन पाच पट दंड करण्याचे अधिकार तहसिलदारला आहेत. या दंडातून ९ लाख ११ हजार रुपये प्राप्त झाले असून, काही प्रकरण अजून अंतिम झालेले नाहीत. एलईडीबाबत ३८ लोकांवर कारवाई केली आहे. खोल समुद्रात एलईडी लाईट सोडल्यामुळे एकाच ठिकाणी लाईटजवळ मासे जमा होतात. ते लगेच एक्सप्लाईड करतात. अशी मासेमारी करण्यास स्थानिक मच्छिमारांनी विरोध केलेला आहे. १२ नॉटीकल मैलाच्या पुढील मासेमारीकरीता आता केंद्र शासनाने देखील आदेश काढले आहेत की, कोस्ट गार्डनेदेखील यावर लक्ष ठेवावे. याप्रमाणे कोस्टगार्ड सोबत टायअप करण्यात येईल.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या बोटी, गृह विभागाच्या बोटीच्या गस्ती सुरु आहेत. त्याप्रमाणे मत्स्यव्यवसाय विभागाने देखील त्याच्या बोटीचा एरिया वाटप करुन घ्यावा, जेणे करुन डयुप्लीकेशन होणार नाही. तसेच विभागाचे अधिकारी गृह विभागाला बोटीमध्येसुध्दा बसविण्यात यावेत असे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पोलिसांच्या बोटी सुरक्षिततेच्या कारणासाठी आहेत, त्या ५ नॉटीकल माईल्सपर्यत जातात. विभागाला १२ नॉटीकल मैलापर्यत लक्ष ठेवायचे आहे म्हणून मत्स्यव्यवसाय विभागाला बोटी वेगळया आहेत.

परिच्छेद क्रमांक २.२.११.३ 'नोंदणी झालेल्या सागरी नौका आणि प्रत्यक्ष जारी केलेले परवाने यांच्या माहितीमध्ये ताळमेळ न होणे' :-

नोंदणी झालेल्या नौका व प्रत्यक्ष जारी केलेले परवाने यामधील फरक काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ॲक्टप्रमाणे सन २०१४ पूर्वी एमएमबी बोटीची नोंदणी करीत होते. नोंदणी नुसार नोंदणी झालेल्या नौकांची एकूण संख्या २४०३५ असून मासेमारी परवाना असलेली नौकांची संख्या १४२९९ असून उपरोक्त नौकांच्या संख्येमध्ये असणारी तफावत ९७३६ आहे. पहिल्यांदा कोणत्याही बोटीची नोंदणी करणे आवश्यक आहे. बोटीने फिशींग करावयाचे असेल तर फिशींगचा परवाना घ्यावा लागतो. १३ ते १४ हजार फिशींगचे परवाने घेतलेले परवानाधारकआहेत. सॉफटवेअरमध्ये नोंदणी झालेले २४ हजार आहेत. त्यात काही स्क्रॅप झालेले आहेत. जून, जुलैमध्येही मोहिम हाती घेतली आहे. त्यातून ७००-८०० परवाने रद्द केले आहेत. यातून फरक कमी करण्यात येत आहे.

परवाने रद्द करण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, तेथे त्या बोटीच नाही. त्या बोटींची नोंदणी केलेली आहे परंतु नोंदणी रद्द करण्यासाठी कोणी गेलेले नाही. जेव्हा विभागाकडून प्रत्यक्ष व्हेरीफिकेशन करण्यात येते तेव्हा बोटी न आढळल्यास त्याची व्हीआरसी म्हणजे नोंदणी रद्द करण्यात येते.

परराज्यातील बोटी येतात व त्या महाराष्ट्र राज्याच्या परवान्यावर चालतात. महाराष्ट्र राज्यात बोटी नोंदणी केलेल्या आहेत. पण केरळ, कर्नाटक, गोवा येथील बोटी महाराष्ट्रात येतात व त्या महाराष्ट्राच्या परवान्यावर चालतात म्हणून ही तफावत आहे. हा विषय गंभीर आहे. राज्याच्या दृष्टीने उत्पन्न वाढविण्याकरिता हा मोठा विभाग आहे, परंतु विभागाकडून मात्र दुर्लक्ष होत आहे. बोटींच्या संख्येमध्ये तफावत दिसत आहे. परराज्यातील किती बोटींवर कारवाई केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, चार दिवसांपूर्वीच गोव्याच्या चार बोटीवर सिंधुदुर्गमध्ये कारवाई केलेली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील लायसन्स असलेल्या बोटीला कलर कोडींग केलेले आहे. त्यामुळे बाहेरच्या बोटी ताबडतोब ओळखू येतात. इतर राज्यांची हद्द २०० नॉटीकल मैलाची आहे. तसेच १२ नॉटीकलमध्ये अशा बोटी येत नाही. आल्यास कारवाई करण्यात येते.

भाऊच्या धक्क्याला गुजरातच्या ज्या बोटी येतात, ते महाराष्ट्राचे परवाने वापरतात का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी नकारार्थी उत्तर दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, रजिस्टर्ड व अनरजिस्टर्ड बोटींमधील फरक कमी करण्याचा काय मार्ग आहे ? यावर विभागीय प्रितिनिधींनी सांगितले की, जून जुलै मध्ये मासेमारी बंद असते तेव्हा विशेष मोहिम घेऊन फिजीकली व्हेरीफिकेशन केले जाते. मागील वर्षी अशा प्रकारे ८०० बोटी कमी झाल्या होत्या.

तरी सुध्दा अद्याप ९००० बोटींचा फरक आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यावर्षी विशेष मोहिम हाती घेण्यात येईल. सर्व कर्मचारी वर्गाला त्याबाबत सूचना दिल्या जातील. ज्यांच्याकडे नोंदणी आहे परंतु परवाना नाही अशा बोटी देखील पाहिल्या जातील.

परिच्छेद क्र. २.२.१२.१ मच्छीमारासाठी कल्याणकारी योजना :-

परिच्छेद क्र. २.२.१२.१ फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र योजनेची अंमलबजावणी न करणे :-

फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र योजनेची अंमलबजावणी बाबतच्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मच्छिमारांसाठी कल्याणकारी योजना ही एक चांगली योजना होती. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळप्रवण जिल्ह्यासाठी ही योजना होती. यामध्ये प्रत्येकी ५ शेतक-यांचा एक गट तयार करायचा होता. त्यांना फिरत्या वाहनासाठी अर्थसहाय्य द्यायचे होते. यामध्ये नॅशनल फिशरीज बोर्डाने ४० टक्के आणि राज्य शासनाने ६० टक्के रक्कम द्यायची होती. राज्य शासनाचे ६० टक्के हे जिल्हा नियोजन समितीमार्फत मिळणार होते. १४ जिल्ह्यांमध्ये १३२ गट स्थापन करायचे होते त्यापैकी ४४ गट स्थापन झाले आहेत आणि डीपीसीच्या तरतुदीमधुन २ कोटी ६४ लाख रूपये गटाचे जे जॉइंट अकाऊंट आहे म्हणजे ग्रुप लिडर आणि जिल्ह्याच्या फिशरीजचा असिस्टंट कमिशनर यांच्या जॉइंट अकाऊंट नुसार हे जमा झाले आहेत. बराच पाठपुरावा करुनही ४० टक्केची रक्कम एनएसडीपीने दिलेली नाही.

एनएसडीपीने ते पैसे दिले नाहीत याचे काय कारण म्हणजे त्यांची जी अट होती ती बहुतेक विभागाने पूर्ण केलेली नसणार असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यांचे मुख्य कारण हे होते की, या कोऑपरेटीव्ह सोसायटीज नाहीत. जे ५-५ लोकांचे गट केले आहेत यामध्ये जिल्हाधिका-यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील २, १ ड्रायव्हर, १ फिशरमन अशा ५ लोकांचा समावेश असायला पाहिजे. आत्मा या केंद्र शासनाच्या योजनेमध्ये हे गट रजिस्टार्ड आहेत. हे देखील त्यांना कळविण्यात आले आहे.

यामध्ये केंद्र शासनाकडून पैसे का मिळाले नाहीत. केंद्र शासनाचा असा विषय आहे की, ती आपली सहकारी संस्था असली पाहिजे. आता बचत गटाच्या माध्यमातून ते पैसे ५-५ शेतक-यांचा एक गट तयार करुन वाटप केले आहेत. पण त्याला केंद्र शासनाची मान्यता नाही. याबद्दल केंद्र शासनाला कनव्हिन्स करुन १ कोटी ७६ लाख रुपये मंजूर करुन घेण्याचा प्रयत्न केला आहे का आणि ? केंद्र शासनाचे जे पैसे मिळू शकले नाहीत त्याबद्दल योग्य तो पाठपुरावा विभागाकडून करण्यात आला काय ? आत्मा नावाची एक रजिस्टर्ड संस्था आहे. त्यातील हे बचत गट आहेत. तर केंद्र शासनाने तशा प्रकारे मंजुरी दिली पाहिजे अशी जर संकल्पना किंवा मान्यता असेल तर केंद्र शासनाकडे जाऊन या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून पाठपुरावा केलेला आहे. यासंदर्भात पत्रही दिलेले आहे व मागणीही केलेली आहे. तसेच, १० लाख रुपयाचे जे अंदाजपत्रक आहे त्याला ६ लाख रुपयांमध्ये करण्यात येत आहे, यासाठीचा पाठपुरावा सुरु होता. ६ लाख ६० हजार रुपये घेण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल शासनाच्या मान्यतेसाठीचा

प्रस्ताव मागील २ वर्षापासून फिरत आहे, तर त्या बद्दल काय निर्णय झाला आहे ? केंद्र शासनाचे पैसे मिळू शकले आहेत त्याबाबत पाठपुरावा केलेला असून त्यासंदर्भात ६ लाख ६० हजार रुपयाची जी कॉस्ट ठरलेली आहे ती १० लाख रुपयांवरुन रिड्युस केली आहे.

'आत्मा' योजनेच्या आधारे करायला पाहिजे होते तसा पाठपुरावा केला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांचा एनएफडीबीचा जो मुख्य आक्षेप असा होता की, गटातील सदस्य हे मत्स्य व्यवसायिक नाहीत. या योजनेत आत्महत्याप्रवण क्षेत्रातील दुर्बल घटकातील शेतक-यांचा गट करुन हे केले होते. त्यांना मत्स्य व्यवसायाकडे वळविण्याचा आणि रोजंदारी मिळवून देण्याचा प्रयत्न होता. याबाबत झालेला विकास असा होता की, एनएफडीबीने १० टक्के रक्कम दिली नसल्यामुळे या गटाला त्या ६ लाख रुपयांमध्ये फक्त ६० हजार रुपये ॲड करायचे आहेत. त्या गटातील प्रत्येकाला १२ हजार रुपये कॉन्ट्रीब्युट करावे लागतील. Toward the cost of vehicle. ही शक्यता असल्याचे क्षेत्रीय अधिका-यांकडून कळलेले आहे. जर गटातील प्रत्येक सदस्याने जर १२ हजार रुपये दिले तर मग ६० हजार रुपयांची पूर्तता होईल मग हे ६ लाख ६० हजार रुपये वाहन त्यांच्या ताब्यात देण्यात येईल. या गटातील सदस्य मत्स्य व्यवसायिक असले पाहिजे असा मुद्दा काढलेला दिसून येतो. या योजनेमध्ये आत्महत्याग्रस्त दुर्बल भागातील अत्यल्प भूधारक जे शेतकरी आहेत त्यांच्यासाठी राबविण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हा नियोजन समित्यांनी यासाठी मान्यता दिली आणि निधी पण जमा केला आहे. आता ६० हजार रुपयांचा प्रश्न आहे. पास्ट ऑफ व्हेईकल रिड्युस केली आहे त्याचा प्रस्ताव आता मंत्रिमंडळासमोर नेण्यात येणार आहे.

हा प्रस्ताव २ वर्षापूर्वीचा आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या प्रस्तावाला नियोजन व वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. २ कोटी ६४ लाख रुपये एवढया मर्यादेपर्यंत प्रस्तावास सहमती दिलेली आहे. वित्त विभागाकडून या प्रस्तावाची फाईल मत्स्यव्यवसाय विभागाकडे आलेली आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेऊन ही योजना प्रत्यक्षात सुरु करण्याचा विभागाचा प्रयत्न राहील.

सन २०१५-१६ मध्ये हे पैसे रिलिज केले आहेत आता सन २०१८-१९ मध्ये त्याचा वापर करण्यात येणार आहे. ३ वर्ष २ कोटी ६४ लाख रुपये विभागाला ढिसाळ नियोजनामुळे अखर्चित राहिले आहेत. अजूनपर्यंत त्याचा निर्णय झालेला नाही. राज्य सरकारने २ कोटी ६४ लाख रुपये सुद्धा विभाजीत करण्यासाठी डीपीडीसीला दिले आहेत. त्यांनी बचत गटाला मान्यता दिली आहे. त्यानंतर केंद्र सरकारकडून पैसे मिळतील गृहीत धरले पण त्या योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नाही आणि त्या योजनेला इकडे-तिकडे विभाजीत केले आहे म्हणून केंद्र शासनाने नकार दिला आहे. आता २ लाख ६० हजार रुपयांमध्ये १० टक्के लोकवर्गणी असेल आणि बाकीचे ६ लाख रुपये विभागाचे असेल, अशा प्रकारचा प्रस्तावव गेल्या २ वर्षापासून विभागाच्या विभागाकडे मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी रेंगाळत आहे. ही या प्रकरणाची पूर्ण वस्तुस्थिती आहे. यामध्ये समितीची भूमिका एवढीच आहे की, यात सर्व ढिसाळ नियोजन व नियोजनाचा अभाव याची बरोबर माहिती न घेणे. मत्स्य व्यवसायिकांसाठी असलेली योजना नॉन व्यवसायिकांकडे वळवली आहे. यासाठी किती पैसे मिळणे अपेक्षित होते पण ते आता मिळणार नाहीत म्हणून आतापर्यंत या सर्व विषयाच्या निर्णयावर विभाग पोहचला नाही असे मत समितीने व्यक्त केले.

कोणत्याही योजनेला थकबाकी देत असताना केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी करणारच नाही तर त्यांचे पैसे कसे गृहीत धरले जातात ? वाहनाचे ६ लाख ६० रुपये गृहीत धरले होते. त्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आलेला नाही. तर या ६ लाख ६० हजार रुपयांमध्ये कोणते वाहन घेण्यात येणार आहे, त्याची आजची काय किंमत आहे, मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन लाभार्थ्यांची निवड होईपर्यंत जर या वाहनाची किंमत वाढली तर याची जबाबदारी कोण घेणार आहे आणि त्या योजनेची विहित मुदतीमध्ये कशी अंमलबजावणी करण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ज्या वाहनधारक कंपन्या आहेत त्यांच्याकडून टेंडर व इंटरेस्ट मागविले होते की, या ६ लाख रुपयांमध्ये वाहन किती रुपयांना उपलब्ध होईल ? तर त्या कंपन्यांनी सांगितले की, ६ लाख रुपयांपर्यंत वाहन उपलब्ध होऊ शकते. जसे त्यामध्ये टाटा कंपनी एसचे आहे त्याप्रमाणे मच्छीमारांना गॅस सिलेंडर किंवा आईस बॉक्स हे सर्व करुन ६ लाख रुपयांमध्ये वाहन उपलब्ध होऊ शकेल. उरलेल्या ६० हजार रुपयांमध्ये ॲक्सेसरीज आहेत. पण ६ लाख रुपयांमध्ये वाहन देणार अशा प्रकारचा करारनामा त्या कंपनीशी केला नाही.

जर हा करार नाही तर मग हे कसे शक्य आहे. कारण आता तर एएसडब्ल्यू पासून पुन्हा वाहनांच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळे पुन्हा वित्त विभागाकडे किंवा मंत्रिमंडळाकडे जावे लागेल किंवा त्या लाभार्थ्यांकडून घेणार की त्यातील फरक डीपीडीसीकडून घेणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यासाठी एकदा

मान्यता झाल्यानंतर निविदा मागवून तो दर निश्चित करता येईल. परंतु टाटा कंपनीशी विभागाच्या अधिका-यांची जी चर्चा झाली त्याप्रमाणे सर्वसाधारणपणे ६ लाख रुपयांमध्ये टाटा कंपनीने वाहनांचा विचार केला आहे.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, याबाबत मंत्रिमंडळाकडे जाण्यापूर्वी हे निश्चित करुन घ्यावे की, ६ लाख रुपयांमध्ये गाडी मिळणार आहे. त्यानंतर काही अडचणी असतील तर त्याला इनकार्पोरेट करुन तशाप्रकारे मान्यता घेण्यात यावी. नाहीतर पुन्हा पुन्हा मान्यतेमध्येच हे प्रस्ताव रेंगाळत राहतील आणि या योजनेला कधीच पुढे जाता येणार नाही.

या योजनेसाठी जे गट तयार केले आहेत त्याला जर मच्छिमाराची अट टाकली असती तर केंद्र शासनाचे सर्व पैसे मिळाले असते. आतापर्यंत ही पूर्ण योजना कार्यान्वित झाली असती. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील मच्छिमारांना मदत देण्यात यावी असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे जे गट तयार केला आहे तो फक्त मच्छिमारांसाठी करता येत नव्हता कारण त्यामध्ये एक ड्रायव्हर, एक मच्छिमार, दोन आत्महत्याग्रस्त शेतक-यांचा एक वारस आणि ज्यांच्या सातबारावर मोठया प्रमाणात कर्जाचा बोजा आहे असे दोन शेतकरी पाहिजे होते म्हणजे इंटीग्रटेडपणे सर्व घटक यामध्ये घेऊन हा गट तयार केला होता.

असे असेल तर हे सर्व केंद्र सरकारला का पटवून दिले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केंद्र शासनाची ही अट आहे की, त्यांना मच्छिमारच पाहिजे. ६ लाख ६० हजार रुपयांमध्ये गाडी बसविण्याचा प्रयत्न विभागाकडून करण्यात येईल आणि यासाठी मान्यता मिळाली तरच कॅबिनेटसमोर जाण्यात येईल.

गाडीची क्वालीटी पण चांगली पाहिजे, टाटाच्या काही गाडया ज्या पिकअपमध्ये आहेत त्यांचा रिझल्ट बरोबर नाही. टाटा कंपनीचे दोन ते तीन मॉडेल असे आहे की, ते बरोबर नाहीत. टाटा रिसेलची गाडी ५० हजार रुपयांमध्ये सुद्धा कोणी घेत नाही. पण महेंन्द्रा कंपनी चांगली आहे. वाहनाची व्हायबिलीटी ऑफ व्हेईकल सुद्धा तपासून घ्यावे लागेल. महेंन्द्रा आणि टाटा या कंपनीची तुलना करावी. कारण त्याची रिपेंअरींग किंमत जर वाढत असेल तर ती भंगारमध्ये जाईल असे मत समितीने व्यक्त केले असे विभागीय सचिवांनी सांगितले की, नामांकित असणा-या दोन ते तीन कंपन्यांकडे या किंमतीमध्ये बसणा-या वाहनाचा शोध घेऊन तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमारे सादर करण्यात येईल.

वाहनांसाठी १० ते ५० हजार रुपये जास्त लागत असतील तर चालेल पण चांगली वाहने घेण्यात यावी. एक महिन्याचा आत हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

कलकत्याहून विदर्भामध्ये रेल्वेने जी मच्छी येते त्याचा उपयोग पण त्यांना करता येईल की नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, लोकली ज्या ज्या ठिकाणी तलाव किंवा डॅम आहेत तिथे जी मच्छिमारी करण्यात येते ती मच्छी घेऊन त्या ॲडजॉर्नींग तालुक्यात ते विक्री करतील. आठवडी बाजारात याची जास्त विक्री होऊ शकेल.

अवर्षणामुळे बाधित भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मासळी विक्रिसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणेबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी पदूम विभागास पाठविलेले पत्र दिनांक २४/१०/२०१६ रोजीचे **(विवरण क्र. ५ वर)** जोडले आहे.

परिच्छेद क्र. २.२.१२.२ - आदर्श मच्छिमार गावे निर्माण करण्याचा विलंब :-

उपरोक्त मुदयासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ पासून २५१ घरांसाठी मंजुरी दिली आहे पण यासाठी वेळेची मर्यादा दिलेली नाही काय ? कारण इंदिरा आवास ही योजना जास्तीत जास्त २ वर्षासाठी आहे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण २५१ घरकुलाची बांधकामे होते. दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत १९७ घरे पूर्ण झालेली आहेत. उरलेल्या ६४ घरांपैकी ४९ घरे बांधण्याचे पूर्वीच रद्द झाले आहे कारण इतर योजनांमध्ये त्यांनी लाभ घेतलेला आहे. सद्यःस्थितीत १५ घरे बांधकामाची राहिलेली आहेत. तसेच लेखी उत्तरात ४२ रद्द झालेली घरे आहेत. असे नमूद केले आहे. परंतू रद्द झालेली घर ४२ नसून ती ४९ आहेत. व ५ घराचे बांधकाम प्रगतीपथावर असून त्यापैकी डी.आर.डी.एम. ला पैसे देखिल दिलेले आहेत. ४९ घरे ही आधीच विविध कारणांमुळे रद्द केलेली आहेत.

भू-जलाशयीन आणि सागरी मत्स्यव्यवसाय म्हणजे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कोकण किनारपट्टीवर होणारा मत्स्यव्यवसाय हा सागरी मत्स्यव्यवसाय आहे. याव्यतिरिक्त जमिनीवरील गोडया पाण्यामध्ये केल्या जाणा-या मासेमारीला भू-जलाशयीन मासेमारी असे म्हणतात.

एका घरासाठी ५० हजार रुपयेच दिले जातात का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्यावेळी या योजनेची अंमलबजावणी झाली त्यावेळी ५० हजार रुपये किंमत होती. आता त्याची किंमत वाढलेली आहे. पी.एम.ए.वाय. मध्ये सुमारे दीड लाख रुपये दर आहे.

ग्रामीण भागामध्ये दीड लाख रुपये नाहीत. कारण १ लाख २० हजार रुपये आहेत आणि १८ हजार रुपये एम.आर.ई.जी.एस. मधून देण्यात येतात. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यामध्ये आणखी १२ हजार रुपये शौचालयासाठी देण्यात येतात. एकूण अमाउंट १ कोटी २७ लाख रुपये यामध्ये ॲडजस्ट झाली आहे. १८ लाख रुपये उरले होते. ते देखील यामध्ये ॲडजस्ट झाले.े त्यानंतर शासनाने पुन्हा ९.३ दिलेले देखील यामध्ये ॲडजस्ट झाले. ५० हजार रुपयांप्रमाणे येणारी किंमत यामध्ये ॲडजस्ट झाली. एकूण १२७.८५ लाख रुपये मंजूर झाले होते. पहिल्यांदा ८० लाख रुपये, नंतर २० लाख असे १ कोटी रुपये दिले. त्यानंतर काही तालुक्यांमधून १८ लाख रुपये परत आले. ते घेतले व त्यानंतर शासनाने पुन्हा ९ लाख रुपये मंजूर केले. असे एकूण १.४ अशी किंमत आहे.

केंद्र व राज्य सरकारने मिळून १ कोटी रुपये दिले. सरेंडर झालेले १८ लाख रुपयाचे देखिल वाटप करण्यात आले ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रमखांनी सांगितले की, शासनाने पुन्हा ९.३२ लाख रुपये दिले. म्हणजे एकूण १२७.८४ लाख रुपये झाले.े

एकूण १०९.३२ लाख रुपयांमध्ये १९७ घरे बांधून झाली आहेत. तसेच आणखी ५ होणार आहेत का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एकूण १०४.५० लाख रुपये लागणार होते. त्यापैकी १२७ वजा १०४ म्हणजे २३.३४ लाख रुपये परत केले. ९ लाख रुपये देखील यामध्येच आले. १२७ लाख रुपयांमधून २३ लाख परत केले व १०४ लाख रुपये लागले असून त्याचे वाटप करण्यात आले.

असे असेल तर १०४ लक्ष रुपयांमध्ये २०८ घरांचे काम झाले पाहिजे. असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १९७ अ ५ अशी २०२ घरे झाली.

या २०२ घरांसाठी १०१ लक्ष रुपये लागले पाहिजेत.तकारण प्रत्येक घराला ५० हजार रुपये लागतात. उर्वरित तीन-चार लाख रुपये कुठे गेले ? विभागाकडे १०४ लक्ष रुपये राहिले परंतु बांधकामावर १०१ लक्ष रुपये एवढाच खर्च झाला. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर बाब तपासून घेण्यात येईल. परंतु २३.३४ लाख रुपये परत केले आहेत.

विभागाने १९७ अ ५ अशी २०२ घरे बांधली किंवा त्यातील काही प्रगतीपथावर आहेत.तत्यासाठी सुमारे १०४ लाख रुपये खर्च केले. हे कसे करता येईल ? रिफंड घ्यावा लागेल. यामध्ये सुमारे ३ लक्ष रुपये शिल्लक आहेत. असे समितीने नमूद केले व विचारणा केली की, २३ लक्ष रुपये जमा झाले का ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, २३.३४ लक्ष रुपये जमा झाले. सदर रक्कम सन २०१५-१६ मध्ये मिळाली.

विभागाला मिळालेले २३ लाख रुपये १२७ लाख रुपयांपैकी आहेत की नाहीत हे तपासून घ्यावे. तसेच २०२ घरांसाठी लागणारे पैसे व इतर पैसे परत करण्याबाबतचा हिशेब एक महिन्याच्या आत आपण समितीस सादर करावा व प्रगतीपथावर असलेली ५ घरे पुढील तीन महिन्यांमध्ये पूर्ण करावीत असे समितीने निदेश दिले असता विभागीय प्रतिनिधींनी सदर माहिती समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले.

परिच्छेद क्रमांक : २.२.१३ मनुष्यबळाची कमतरता

मत्यस्यव्यवसाय विभागामध्ये ७ प्रादेशिक उप आयुक्त आहेत.तया उप आयुक्तांची कार्यालये कोणकोणत्या ठिकाणी आहेत ? अशी विचारणा समितीने केली असे विभागीय सचिवांनी सांगितले की, उप आयुक्त पद विभागीय स्तरावरील आहे. औरंगाबाद, अमरावती, नाशिक, मुंबई इत्यादी ठिकाणी त्यांची कार्यालये आहेत.

"आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये योजना राबवायची, असे विभागाचे धोरण आहे. अमरावती विभाग हा सर्वाधिक आत्महत्याप्रवण विभाग आहे. अमरावती जिल्हयामधील पाचही जिल्हे, त्यानंतर नागपूर विभागातील वर्धा जिल्हा व आता मराठवाडयातील जिल्हयांचा समावेश करण्यात आला आहे. या ठिकाणी मत्स्यव्यवसाय वाढावा, शेतक-यांना उत्पन्नाची साधने उपलब्ध व्हावीत असा उद्देश आहे. प्रादेशिक उपायुक्ताची ५ पदे रिक्त आहेत. त्यापैकी अमरावती येथील पद किती वर्षांपासून रिक्त आहे ? व ते

किती दिवसांमध्ये भरण्यात येणार आहे ? व संपूर्ण रिक्त पदांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रादेशिक उप आयुक्तांची एकूण ७ पदे आहेत. त्यापैकी केवळ २ पदे भरलेली आहेत.त५ पदे रिक्त असले तरी त्यांचा अतिरिक्त कार्यभार कनिष्ठ अधिका-यांकडे देऊन काम सुरु ठेवलेले आहे. हे रिक्त असण्याचे कारण असे आहे की, सप्टेंबर, २०१७ मध्ये ज्यांची ३ वर्षे क्वालिफाईंग सर्व्हिस पूर्ण झालेली आहे अशा व्यक्तीलाच पदोन्नती देता येते. कारण सदर सर्व पदे पदोन्नतीची आहेत.तखालील संवर्गामधून पदोन्नत करण्यासाठी संबंधित व्यक्तीची ३ वर्षांची क्वालिफाइंग सर्व्हिस पूर्ण झालेली असावी लागते. सप्टेंबर, २०१७ रोजी सदर पात्रताधारक अधिकारी नव्हते. ते आता उपलब्ध होतील व खालील संवर्गातील अधिकारी पदोन्नत करुन ही पदे भरता येतील.लतोपर्यंत वरिष्ठ सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. सदर सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत.तयावर सरळसेवेने नियुक्ती करता येत नाही. तसेच प्रादेशिक उप आयुक्त, अमरावती हे पद सन २०१३ पासून रिक्त आहे.

तथापि, अमरावती येथील पद सन २०१३ च्या अगोदरपासून रिक्त आहे, मुंबईतील सर्व पदे भरण्यात येतात परंतु अमरावती, नागपूरकडे लक्षच दिले जात नाही. असा मुद्दा समितीस उपस्थित केला असा विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबईमधील मुख्यालयातील देखील एक पद रिक्त आहे. मुंबई येथे सह आयुक्त यांचे पद आहे. उप आयुक्त या पदाचा फिडर कॅडर प्रादेशिक उप आयुक्त हा आहे. प्रादेशिक उप आयुक्तांची ३ वर्षे सेवा पूर्ण झाली असेल तरच त्यांचा उप आयुक्त पदासाठी विचार करण्यात येतो.

सन २०१३ पासून ही पदे रिक्त आहेत.त मग सन २०१६ पर्यंत सह आयुक्तांची त्या पदावरील सेवेची तीन वर्षे पूर्ण होऊन ते पदोन्नतीसाठी पात्र व्हायला पाहिजे होते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रादेशिक उपायुक्तांचे नागपूर येथील एक पद चक्राकार पध्दतीने भरले आहे. पदोन्नतीसाठी एकच अधिकारी पात्र होते व त्यांना नागपूर येथील कार्यभार देण्यात आलेला आहे. कारण चक्रीय पध्दतीने वाटप करताना अगोदर नागपूर विभाग आणि त्यानंतर अमरावती विभाग आहे. दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी या अधिका-यांची क्वालिफाईंग सर्व्हिस पूर्ण होत आहे. त्यावेळी प्रादेशिक उप आयुक्तांची ५ पदे भरली जातील.

हे अधिकारी पदोन्नत झाल्यानंतर त्यांच्या जागी कोणाची नेमणूक केली जाईल ? अशी विचारणा समितीने केलीअसता विभागीय सचिवांनी सांगितले की, सहाय्यक आयुक्तांच्या खालील संवर्ग मत्स्यव्यवसाय विकास अधिका-यांचा आहे. त्यामधून पदोन्नत करावे लागतील. सहाय्यक आयुक्तांची उप आयुक्त म्हणून पदोन्नती होईल व सहाय्यक आयुक्तांची पदोन्नतीच्या कोटयातील पदे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांच्यामधून भरता येतील.

सन २०१३ पासून उप आयुक्तांची पदे पदोन्नतीने भरु शकले नाहीत.तजर अधिकारी उपलब्ध होत नसतील तर त्यांच्या क्वालिफाईंग सर्व्हिसच्या कालावधीची मर्यादा शिथिल करता येते, सामान्य प्रशासन विभागाची अशी अनेक प्रकरणे आहेत. Have you approached GAD ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ५ वर्षांची अट असेल तर ती शिथिल करता येते. परंतु या प्रकरणी क्वालिफाईंग सर्व्हिसची तीन वर्षांची अट आहे. तीन वर्षांच्या सेवेची अट शिथिल होत नाही. तरीही याबाबत माहिती घेऊन समितीस सादर करता येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

पदोन्नतीसाठी ३ वर्षाची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. त्यामध्ये सन २०१३ पासूनची विभागाची स्थिती नमूद करण्यात यावी. आणि जर ही अट शिथिल करुन लगेच भरती करता येत असेल तर त्याबाबत कार्यवाही करावी. कारण सामान्य प्रशासन विभागात अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ५ वर्षांच्या सेवा अटीसाठी करण्यात आलेले आहे.

तथापि, परिस्थितीनुसार अट शिथिल करता येऊ शकते. या प्रकरणी तीन वर्षांची अट अडीच वर्षे एवढी करायची आहे. त्यानुसार सप्टेंबर ऐवजी एप्रिल महिन्यामध्ये पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात यावा असे समितीने पुन्हा सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा जून, २०१५ चा शासन निर्णय आहे. त्यानुसार भरती वर्षामध्ये १ सप्टेंबर रोजीच किमान सेवा पूर्ण असली पाहिजे. त्यामध्ये १ दिवसाचा देखील विलंब शिथिल केला जात नाही. जर क्रायटेरियामध्ये किमान सेवेची ५ किंवा ७ वर्षे असतील तर त्यामध्ये अट शिथिल करतात. ज्या पदांना किमान ३ वर्षांची अट आहे ती अट सामान्य प्रशासन विभाग शिथिल करीत नाही.

पण लेखा व वित्त विभागामध्ये असे करण्यात आले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय हा सन २०१५ पासून आहे. तेव्हापासून असे केले जात नाही.

याअनुषंगाने समितीने पुन्हा सूचित केले की, ३ वर्षाची अट शिथिल करण्याबाबत प्रयत्न यावा. यावर विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सन २०१७ मध्ये ४६ पदांबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याची सद्यस्थिती काय आहे ? कारण या गोष्टीला आता ६ महिने होऊन गेले आहेत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रमुखांनी सांगितले की, या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करायचे असून ही कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

पदे भरण्याची कार्यवाहीचा अंतिम टप्पा कधी पूर्ण होणार आहे ? सत्तर-सत्तर टक्के पदे रिक्त असताना याबाबत तातडीने कार्यवाही का करण्यात येत नाही, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सेवाप्रवेश नियम दुरुस्तीला मान्यता दिली असूनन त्यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असा होता की, मत्स्यव्यवसाय विभागाच्या पदांवर बी.एफ.एस.सी.मधून पदवी धारण केलेल्यांचीच नियुक्ती करता आली पाहिजे. जेणेकरुन फिशरी सायंन्समधील पदवीधारक आपल्या सेवेमध्ये येऊ शकतील.लहा दुरुस्तीचा प्रस्ताव मंजूर केला असूननत्याला पुढे मान्यता मिळाल्यानंतर याबाबतची कार्यवाही होईल.

उर्वरित रिक्त पदे मोठया प्रमाणावर असून ते भरण्याबाबत काय नियोजन केलेले आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आता पदोन्नतीने २४ पदे भरण्यात येत आहेत. सर्वोच्च न्यायालयामध्ये पदोन्नतीबाबतचे प्रकरण आहे. त्यामुळे केवळ खुल्या प्रवर्गाचीच पदे भरण्यास परवानगी आहे. यानुसार पदोन्नतीची २० पैकी १२ पदे भरता येतील. सरळसेवेच्या अगेन्स्ट १२ लोकांना पात्र ठरविले आहे. म्हणजेच एकूण २४ पदे पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत. त्यापैकी १२ नियमित व १२ तात्पुरते असतील. सदर २४ पद १ महिन्यात पदोन्नतीचे पदे भरण्यात येतील. ही पदे ज्येष्ठतेने भरायची आहेत. दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीचे सामान्य प्रशासन विभागाचे तसे पत्र आहे. त्यानुसार केवळ खुल्या प्रवर्गाचीच पदे ज्येष्ठतेने भरायची आहेत.

यासंदर्भात समितीने सूचित केले की, पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी व तसा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठपुरावा करण्यात यावा. जेणेकरुन ४६ पदे भरली जातील. तसेच दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजीपर्यंतची अद्ययावत माहिती सादर करावी असे देखिल निदेश समितीने दिले.

परिच्छेद क्रमांक : २.२.१४ संनियत्रण

"विदर्भ, मराठवाडा विभागामध्ये कार्यक्षमतेवर सक्रीय, उपयुक्त आणि अनुकूल परिणाम करणा-या कनिष्ट व वरीष्ठ अधिका-यांची कमतरता आहे. त्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन अंमलबजावणी करण्यात येते. हे कसे शक्य आहे ?" सर्वच ठिकाणी अतिरिक्त कार्यभार दिला तर काम पूर्ण कसे होईल ? तसेच RKVY ची देखील अंमलबजावणी झालेली नाही. इतर बांधकामांची देखील हीच परिस्थिती आहे. मॉनिटरींगमध्ये खूप कमी पडल्याचे विभागाला मान्यच करावे लागेल. The fact remains that the absence of adequate monitoring detailed plan estimate from District. आधुनिकीकरण आणि मजबुतीकरण of fish seed farm and RKVY was not prepared. त्याचबरोबर आपले वाहतुकीसाठीचे पैसेही खर्च करता आलेले नाहीत. इत्यादी बाबी या परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

अमरावती विभागात अप्पर वर्धा हा सर्वात मोठा जलाशय असून तो दरवर्षी १०० टक्के भरतो. तसेच लोअर वर्धा प्रकल्पातून दरवर्षी पाणी सोडून देण्याची वेळ येते. बेंबळा प्रकल्पातून देखील दरवर्षी पाणी सोडून द्यावे लागत आहे. सदर तीनही तलावातील पाणी चंद्रपूरपर्यंत सोडले जाते. सिंचन प्रकल्पांचे काम पूर्ण झालेले नसल्यामुळे पाणी सोडून देण्याची वेळ आलेली आहे. पण विभागाकडे मात्र सांगण्यात येते की, अवर्षण परिस्थितीमुळे तलावात पाणीसाठा उपलब्ध नाही. यावर्षी छोट्या तलावांमध्ये पाणी उपलब्ध नाही पण यावर्षी अप्पर वर्धा प्रकल्प १०० टक्के भरलेला असून आज रोजी त्या ठिकाणी ६० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितलें की, सदर माहिती ही सन २०१० ते २०१५-१६ च्या दरम्यानची असून, तत्कालीन जी परिस्थिती होती त्याप्रमाणे माहिती सादर करण्यात आली होती.

सन २०१५-१६ मध्ये अवर्षण परिस्थिती होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पश्चिम विदर्भात पाऊस पडलाच नाही.

सदर प्रकल्पांसाठी अतिरिक्त पदभार देऊन कोणतेही काम होत नाही हे विभागाला मान्य करावे लागणार आहे. याबाबतीत कोठेतरी विभाग कमी पडला आहे असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी अवगत केले की, समितीने जो मुद्दा उपस्थित केला आहे तो रिक्त पदांचाच आहे. जी पदे रिक्त आहेत त्यामध्ये सहायक मत्स्य व्यवसाय अधिकारी, सहायक आयुक्त मत्स्य व्यवसाय, आणि पर्यवेक्षकीय पदे यांचा समावेश आहे. सदर रिक्त पदांमुळे कोणत्याही योजनेचे प्रभावीपणे सनियंत्रण करता येत नाही ही बाब मान्य केलेली आहे. याबाबत विभागाचे असे नियोजन आहे की, आता जी ७२ हजार पदांची भरती करण्यात येणार असल्याची जी घोषणा केली त्यामध्ये पशुसंवर्धन आणि मत्स्य व्यवसाय विभागाची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. मत्स्य विभागाच्या भरती प्रक्रियेवर जी बंधने घालण्यात आली होती ती आता शिथील करण्यात आल्यामुळे विभागामध्ये सरळसेवा भरती करता येऊ शकणार आहे. तसेच विभागांतर्गत ज्या बाबी आहेत त्याबाबत सर्व आयुक्तांची बैठक घेऊन त्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. विभागाच्या अंतर्गत भरती संदर्भात ज्या बाबी आहेत त्यामध्ये पदोन्नतीची पदे भरणे, अनुकंपाची पदे भरणे, वर्ग ४ मधील कर्मचा-यांची वर्ग ३ मध्ये पदोन्नती करणे, वर्ग ३ मधील कर्मचा-यांमधून वर्ग २ मध्ये पदोन्नती करणे या सर्व बाबी ज्या आयुक्तालयांच्या अखत्यारितील आहेत त्याबाबत एक महिन्याच्या आत आराखडा तयार करून सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यातील काही बाबी मार्गी लावण्यात आलेल्या आहेत. जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरणे आवश्यक आहेत त्यासाठी आयोगाला मागणी पत्र पाठवून ती पदे भरून घेण्यात येतील. ज्या पदांची भरती आयुक्त स्तरावर किंवा मंत्रालय स्तरावर करण्यात येते त्याबाबत विशेष लक्ष घालून सदर पदांची भरती करण्यात येईल. सदर पदांची भरती झाल्यानंतर मुबलक मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि सर्व योजनांचे प्रभावी सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी निश्चितपणे मदत होणार आहे. त्यामुळे सध्याची परिस्थिती कायम राहणार नाही.

परिच्छेद क्र. २.२.१५ - निष्कर्ष

तलाव भाडेपट्टीची कमी वसुली, सहकारी संस्थाकडून कर वसुलीसाठी योग्य तो प्रतिसाद न मिळणे, RKVY व NABARD अंतर्गत प्राप्त तरतुदींचा वेळेवर खर्च न होणे इत्यादी बाबीचा उल्लेख या परिच्छेदामध्ये आहे. याबाबत असे सांगण्यात आले आहे की, कार्यकारी अभियंता हे पद असून त्यांच्या अधिपत्याखाली कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे सदर प्रकार घडत आहेत. त्यामध्ये सदर पदे भरण्याची कार्यवाही विभागाने केली पाहिजे असे समितीने सूचित केले.

इंजीन चलीत गस्ती नौका बाबत सध्याची काय परिस्थिती आहे ? किंवा मत्स्य विभागाकडून त्यांची खरेदी का करण्यात येत नाही ? तसेच जी अवैध रीतीने मासेमारी करण्यात येते त्याबाबत असे म्हटले आहे की, तहसीलदार यांना जे अधिकार आहेत ते अधिकार मत्स्य व्यवसाय विभागाला असतील तर जास्त सोईचे होईल मग याबाबत विभागाकडून काय पाठपुरावा करण्यात आलेला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तहसीलदार यांना अनेक कामे आहेत. सहायक आयुक्त मत्स्य व्यवसाय हे वर्ग अ दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांना अधिकृतपणे प्राधिकृत करण्यासाठी काहीही हरकत नाही. विभागाच्या स्तरावर तशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे तो सकारात्मकरीतीने पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येणार आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

पण शासनाने यापूर्वी तहसीलदार यांना प्राधिकृत केलेले आहे त्यामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यात मान्यता कोण देणार अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, The Fisheries department will have to approve it. In consultation with the Revenue department we will have to do it.

सदर प्रकारची सुधारणा करणे हे व्यवहारिक वाटते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तहसीलदारांकडे अनेक महसुली प्रकरणे चालतात, कुळाची प्रकरणे चालतात त्यासोबतच मत्स्यव्यवसाय विभागाची प्रकरणे असतात.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र. २.२.६ 'नियोजनातील पर्याप्तता'

अभिप्राय

३ विभागाने सन २०१२-१७ साठी तयार केलेल्या मत्स्यव्यवसाय पंचवार्षिक योजनेत योजनांच्या (केंद्र व राज्य) फक्त काही घटकांसाठी संचयी लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते जे योजनेच्या कालावधी अखेर साध्य करावयाचे होते. परंतु या पंचवार्षिक योजनेत, योजनेच्या कालावधीतील इतर घटकांसाठी वर्षनिहाय उदिदष्टे आणि त्यासाठी समतुल्य वित्तीय खर्च दर्शविला नव्हता. विभागाने तयार केलेल्या वार्षिक विकास कार्यक्रमांतून (२०१२-१३ ते २०१५-१६) मागील वर्षापर्यंत विभागाने वेगवेगळया योजनांवर (केंद्र व राज्य) केलेला खर्च आणि वार्षिक विकास आराखडा ज्या चालू वर्षाशी संबंधित आहे त्या चालू वर्षाचा अंदाजित खर्चदर्शविलाहोता. अशाप्रकारे, वार्षिक विकास कार्यक्रम पंचवार्षिक योजनेच्या आधारावर तयार करण्यात आला नव्हता. नियोजन प्रक्रिये दरम्यान क्षेत्रीय कार्यालयांकडून (RDC/ACF) माहिती/सहभाग प्राप्त होता किंवा त्यात कार्यान्वयन संस्थांचा (ACF) सहभाग होता याची सुनिश्चीती करण्यात आली होती याचा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता. तसेच नमूना सर्वेक्षणाद्वारे प्रमाणीकृत कार्यपध्दतीचा वापर करुन भूजलाशयीन मासेमारी विषयीची गणती करण्यासाठी महत्वपूर्ण असलेलीमाहिती गणकांची पदे सुरुवातीपासूनच रिक्त होती. तसेच १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे केंद्र शासनाने जरी ऑक्टोबर,२०१३ मध्ये मंजूर केली होतीआणि सन २०१३-१४ पासून प्रत्येक वर्षी वेतनासाठी अनुदाने मुक्त केली जात होती (चार सध्याची पदे आणि १२ माहिती गणकांची पदे यासाठी) तरीही ३८ महिन्यांचा कालावधी उलटूनही विभागाकडून माहिती गणकांची पदे भरली जाऊ शकली नव्हती (नोव्हेंबर,२०१६). १२ माहिती गणकांच्या वेतन अनुदानाचा अखर्चित हिस्सा/भाग केंद्र शासनाला प्रत्यार्पित करण्यात आला किंवा पुढील वर्षाच्या वापरासाठी केंद्र शासनाने तो पुर्नवैध केला. माहिती गणकांची नियुक्ती केली नसल्याने राज्यातील भूजलाशयीन मत्स्यसंपत्ती आणि मासेमारीचा माहिती संच विश्वासनीय नव्हता ज्याचा राज्यातील मत्स्यव्यवसायाच्या एकात्मिक विकासासाठीच्या नियोजनावर परिणाम झाला असे आक्षेप महालेखापालांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

३.१ राज्याची आर्थिक स्थिती विचारांत घेऊन नियोजन व वित्त विभागामार्फत वार्षिक योजनेसाठी नियतव्ययांची मर्यादा दरवर्षी देण्यात येते. या मर्यादित नियतव्ययांमध्ये विभागांच्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व घटकांना निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. योजनांच्या प्राथम्यक्रमानुसार निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही होत असते. सबब, पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट सर्वच घटकांना निधीची उपलब्धता नसल्यामुळे त्यांच्यावर खर्च दर्शविता येत नाही. दरवर्षी निश्चित कार्यक्रमानुसार वार्षिक योजना तयार करण्यासाठी माहिती मागविण्यात येते व शासनाच्या उपलब्ध नियतव्ययांच्या मर्यादेत वार्षिक योजनेमध्ये विविध घटकांचा समावेश करुन योजना अंतिम करण्याची कार्यवाही केली जाते.

३.२ आयुक्तालयामार्फत तयार करण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनेमधील समाविष्ट घटकांना केंद्र शासन व राज्य शासनामार्फत निधीची उपलब्धता अपेक्षित असते. परंतु प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये सर्वच घटकांना निधी उपलब्ध होत नाही. ज्या घटकांना निधी उपलब्ध होतो अशा घटकासमोरच वर्षनिहाय उद्दिष्टे आणि समतुल्य वित्तीय खर्च दर्शविला जातो. तसेच १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे वित्त विभागाच्या मान्यतेने निर्माण करण्याची कार्यवाही सुरु असून सन २०१७-१८ साठी केंद्र शासनाकडून या घटकांसाठी प्राप्त निधी पुनर्वैध करुन मिळण्यासाठी केंद्र शासनास विनंती केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

३.३ मत्स्यव्यवसाय विभाग किनारपट्टी क्षेत्र, आंतर्देशीय क्षेत्र, साठवण पाणी क्षेत्र या तीन कार्यक्षेत्रात कार्यरत असून मासेमारी, मत्स्य उत्पादन व मत्स्यव्यवसाय याशी निगडीत बाबींचे तसेच मत्स्य कंत्राट देणे व त्याचे पर्यवेक्षण करणे याचे देखील योग्य ते नियोजन व नियंत्रण करण्याचे काम मत्स्यव्यवसाय विभागाचे आहे. परंतु या नियोजनामध्ये मोठ्या प्रमाणात अपर्याप्तता राहिल्यामुळे विभागाला त्याचे निश्चित उद्दिष्ट गाठता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाच्या धोरणानुसार व मार्गदर्शक तत्वानुसार विभागाने कोणत्याही योजनेचे पंचवार्षिक नियोजन करुन त्याची अंमलबजावणी वर्षनिहाय व त्यासाठी उपलब्ध निधीच्याआधारे करण्याबाबतचे तत्व विहित असताना त्याची अंमलबजावणी विभागाने केली नाही. परिणामी विभागाने राबविलेला वार्षिक विकास कार्यक्रम पंचवार्षिक योजनेच्या आधारावर तयार करण्यात आला नव्हता. विभाग ऑक्टोबर,२००४ पासून मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी माहिती संच व जीआयएसचे बळकटीकरण ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना राबवित असून शास्त्रोक्त पध्दतीचा वापर करुन भूजलाशयीन तसेच सागरी मत्स्य संपत्तीचा माहिती संच सुधारणे व मासेमारी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते व त्यासाठी केंद्र शासनाकडून १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे सन २०१३ मध्ये मंजूरही करण्यात आली

होती व त्यांच्या वेतनासाठी निधी देखील राज्य शासनाला प्राप्त झाला. परंतु विभागाच्या ढिसाळ व लालफितशाही कार्यपध्दतीमुळे या माहिती गणकांची नियुक्ती अद्यापही विभागाला करता आली नाही. परिणामी त्यांच्या वेतनासाठीचा प्राप्त निधी हा प्रत्येक आर्थिक वर्षात राज्य शासनाला केंद्राकडून पुनर्वैध करुन घ्यावा लागला ही तर अधिकच गंभीर बाब आहे. सद्यःस्थितीत केंद्र शासनाने निलक्रांती ही योजना सुरु केली असून सध्या होत असलेले आंतर्देशीय मत्स्य उत्पादन ५ वर्षात दुप्पट करण्याच्या उद्दिष्टाने सन २०१६-१७ पासून ही योजना सुरु करण्यात आली. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून २१ योजना मंजूर देखील झाल्या. परंतु त्या देखील विभागाला सन २०१७ पर्यंत अंमलात आणता आल्या नाहीत. यावरुनच विभाग शासनाचे हे उद्दिष्ट गाठण्यासंदर्भात उदासिन असल्याचे दिसून येते. यातही विभागाने साक्षी दरम्यान आर्थिक वर्षात मत्स्य उत्पादनात होणारी वाढ समितीच्या निदर्शनास आणली असता समितीने यावर तीव्र आक्षेप नोंदवित या आकडेवारीची वैधता व विश्वासार्हताच आक्षेपित केली. विभागाने जर माहिती गणकांची नियुक्तीच केली नाही तर या माहितीचा उगम व वैधता निश्चितच विश्वासनीय नाही. विभागाने या योजनेचे सर्वसमावेशक नियोजन केले नसून त्यात मोठ्या प्रमाणात त्रुटी व उणिवा असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अनेक ठिकाणी मत्स्य कंत्राट देतेवेळी मोठ्या प्रमाणात अनियमितता व संगनमत असल्याचे दिसून येते. मत्स्य उत्पादनाची क्षमता कमी दर्शविण्यात येणे व जाणीवपूर्वक कमी उत्पादन दर्शवून कंत्राटाचा कालावधी ठेकेदारांना वाढवून देणे अथवा कमी किंमतीत तलावाचा लिलाव करणे या सर्व बाबी संगनमताने होत असतात. परंतु या देखील बाबी विभाग गांभीर्याने घेत नाही. मत्स्यव्यवसायाच्या एकात्मिक विकासासाठीच्या नियोजनावर मोठ्या प्रमाणात परिणाम होण्याचे प्रमुख कारण हे माहिती गणकांची नियुक्ती न करणे हे असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. परंतु केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे मंजूर करुन व त्यासाठी निधी देवून देखील गत ५ वर्षे विभागाला कंत्राटी गणकांची नियुक्ती करता आली नाही, ही अधिकच गंभीर बाब आहे. परिणामी पंचवार्षिक आराखडे तयार करणे व योजनेचे नियोजन करणे या बाबी दुलर्क्षित राहिल्या.

शिफारशी

३.४ महाराष्ट्र राज्याला ८७ लक्ष हेक्टरच्या खंडान्त उतार क्षेत्रासह ३.१७ लक्ष हेक्टर गोड्या पाण्याचे क्षेत्र आणि ०.८० लक्ष हेक्टर निमखा-या पाण्याचे क्षेत्रासह ७२० कि.मी. लांबीचा सागरी किनारा लाभला आहे जो मत्स्य व्यवसायाला पोषक आहे. त्यामुळे राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी योजना व धोरणे आखतांना मासेमारी उत्पादन क्षमता, खाजण क्षेत्रातील जैवशास्त्रीय स्थिती, जलाशयांचा शोध, मासे उतरविण्यासाठीची केंद्रे, होड्या आणि अवजारे इत्यादी विषयी विश्वसनीय आणि अद्यावत माहिती आवश्यक असते. तसेच, क्षेत्रीय कार्यालयांकडून माहिती/सहकार्य आणि कार्यान्वयन संस्थांचा/कार्यालयांचा नियोजन प्रक्रियेतील सहभाग याला अनन्यसाधारण महत्व आहे. राज्यातील मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठीच्या योजना पुरेशा सर्वेक्षणानंतर आखण्यात आल्या होत्या, पर्याप्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती आणि निधीचे वाटप विनाविलंब करण्यात आले होते, विविध राज्य तसेच केंद्र योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे करण्यात आली होती आणि विभागातील संनियंत्रण कार्यतंत्र प्रभावी होते. या बाबी तपासण्याचे या लेखापरिक्षणाचे उद्दिष्ट होते. परंतु हे उद्दिष्ट विभागाला नियोजनाअभावी गाठता आले नाही. विभागाने नियोजनात पर्याप्तता व ताळमेळ न ठेवल्यामुळे मत्स्य विकासाचे उद्दिष्ट विभागास गाठता आले नाही. पंचवार्षिक आराखडे तयार करणे आवश्यक असताना विभागाने वार्षिक आराखड्यानुसार नियोजन करुन त्याची अंमलबजावणी केली, जे अभिप्रेत नव्हते. आर्थिक वर्षात विभागाला योजनेसाठी किती निधी प्राप्त होणार आहे याची शाश्वती नसल्यामुळे हे नियोजन पंचवार्षिक स्वरुपात न करता वार्षिक स्वरुपात करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु विभागाकडून ही कार्यपध्दती अभिप्रेत नसून विभागाने योजनांचे नियोजन पंचवार्षिक स्वरुपात करुन आर्थिक वर्षात निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची वर्षनिहाय अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अतः बंदिस्त जलाशयात जोपासना (cage culture) करणे (भूजलाशयीन मत्स्य व्यवसायासाठी), सागरी किनारी बंदिस्त जलाशयात जोपासना करणे (सागरी मत्स्य व्यवसायासाठी) यास प्रोत्साहन देवून, उबवणी केंद्राचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करून, निमखा-या पाण्यात माशांच `संवर्धन क्षेत्र वाढवून राज्यातील मत्स्योत्पादनातील दरी साधण्यासाठी आणि उत्पादन अधिकतम क्षमतेत करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्याची आवश्यकता असून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. त्याअनुषंगाने विभागाने पंचवार्षिक योजना वा आराखडा तयार करावा व त्याअनुषंगाने प्रत्येक वर्षी साध्य करावयाची विशिष्ट उद्दिष्टे आणि वित्तीय लक्ष्ये याची निश्चिती करावी त्यानंतर वार्षिक योजना आर्थिक व भौतिक उद्दिष्टनिहाय तयार करुन प्रत्यक्ष आर्थिक स्थिती व नियतव्ययाप्रमाणे त्याची अंमलबजावणी करावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.५ नमुना सर्वेक्षणाद्वारे प्रमाणित कार्यपध्दतीचा वापर करुन भूजलायशीन मासेमारी विषयीची गणती करण्यासाठी महत्वपुर्ण असलेली माहिती गणकांची पदे रिक्त असल्यामुळे योजनेची प्रभावी अंमलबजावणी विभागाला करता आली नाही. विभागाने समितीसमोर मत्स्यव्यवसायात झालेली वाढ निदर्शनास आणली असता यावर समितीने आक्षेप नोंदवित जर ही माहिती संकलित करण्यासाठीची गणकांची पदेच रिक्त होती तर या माहितीचा उगम व विश्वासार्हता ही निश्चितच विश्वासनीय असू शकत नाही. एवढेच नव्हेतर केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये १२ अर्धवेळ कंत्राटी गणकांची पदे मंजूर करुन व त्यासाठी निधी देवून देखील गत ५ वर्षे विभागाला कंत्राटी गणकांची नियुक्ती करता आली नाही, ही अधिकच गंभीर बाब आहे. परिणामी आराखडे तयार करणे व योजनेचे नियोजन करणे या बाबी दुलर्क्षित राहिल्या. विभागाकडे पदांची मंजूरी व निधी असे दोन्हीही उपलब्ध असताना पदे न भरण्याची कारणमिमांसा काय, याबाबत समितीने अधिक सखोल तपासणी केली असता हा प्रस्ताव वित्त विभागाच्या उच्चाधिकार समितीपुढे मान्यतेसाठी जात असल्यामुळे ही संपुर्ण कार्यपध्दती राबविण्यास हा विलंब झाल्याचे समितीस सांगण्यात आले. समितीने या संपुर्ण नस्तीच्या प्रवासाची दिनांकासह माहिती वित्त विभागाकडून घेतली असता विभागाने यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची गती थक्क करणारी आहे. सदरहू नस्ती मत्स्यव्यवसाय विभाग, वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागामध्येच मोठ्या कालावधीसाठी राहिल्याचे समितीला दिसून आले. या नस्तीवर विभागाने नोंदविलेल्या त्रुटी वा आक्षेप पाहता जणूकाही राज्य शासनाला ही नविन पदनिर्मिती करावयाची असून त्याचा संपुर्ण खर्च राज्य शासनाला सोसायचा असल्याप्रमाणे ही नस्ती हाताळण्यात आलेली आहे. वास्तविकतः पद मंजूरी व निधी अशा दोन्ही बाबी केंद्र शासनाकडून विभागाकडे अगोदरच प्राप्त असताना राज्य शासनाच्या स्तरावरुन केवळ तांत्रिक औपचारीकता पार पाडण्याची प्रक्रिया शिल्लक राहिल्यानंतरही ती देखील विभागाला कमीत कमी वेळेत पार पाडता येवू नये ही तर शोकांतिकाच आहे. विभागांच्या या आडमुठे वागण्यामुळे योजनेचे नुकसान तर झालेच परंतु केंद्र शासनाचा निधी देखील वेळोवेळी विभागाला पुनर्वैध करुन घ्यावा लागला. वित्त विभागाची भूमिका देखील या प्रकरणी अतिशय आक्षेपार्ह आहे. तांत्रिकदृष्ट्या या नस्तीला वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक असेल तरीही विभागाची अडवणूकीची भूमिका ही सर्वच ठिकाणी व सर्व प्रकरणी समानरित्या समर्थनीय ठरत नाही. वास्तविकतः कोणतीच प्रशासकीय व आर्थिक जबाबदारी या माध्यमातून राज्य शासनावर पडत नसतानाही अशाप्रकारे नस्ती वर्षानुवर्षे एका विभागाकडून दुस-या विभागाकडे फिरत राहणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. सदरहू प्रकरणी विलंब झालेला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले. अतः विभागाने या प्रकरणी जबाबदार असणा-या सर्व संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन समितीला १ महिन्याच्या आत कळवावे असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित करुनही अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. समिती या संपुर्ण कार्यपध्दतीबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच केंद्र पुरस्कृत वा अन्य योजनांमध्ये १०० टक्के अनुदान त्या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून शासनास प्राप्त होत असल्यास व त्यात राज्य शासनाच्या निधीचा कोणताही हिस्सा नसल्यास औपचारीक तांत्रिक प्रशासकीय मान्यता देताना वित्त विभागाने अतिशय सकारात्मक भूमिका ठेवून कमीत कमी कालबध्द पध्दतीने ही प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनस्तरावरुन मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात यावीत व या प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी. तसेच सांख्यिकीयदृष्ट्या परिपुर्ण/सक्षम आणि शास्त्रोक्त पध्दतीचा वापर करुन केल्या जाणा-या भूजलाशयीन मासेमारी विषयी विश्वासनीय माहिती उपलब्ध होण्यासाठी ही गणकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत, जेणेकरुन राज्यात मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी आखलेल्या योजना आणि धोरणे विश्वासनीय, भक्कम व कार्यान्वयन योग्य होईल यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना विभागाने करावी व मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी केले जाणारे नियोजन पर्याप्तरित्या करावे व कंत्राटी पद्धतीवर नेमणूकीची परवानगी मिळालेल्या गणक पदांची नेमणूक करण्याची कार्यवाही तात्काळ करुन सदर गणकांकडून सर्वेक्षणासंबंधीची आवश्यक कामे करुन घेण्याचे नियोजन विभागाने करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६ महाराष्ट्र राज्याला निसर्गाद्वारे लाभलेला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा जो मत्स्यव्यवसायाला अतिशय पोषक आहे. त्यामुळे राज्यात उपलब्ध असलेल्या गोड्या पाण्याच्या क्षेत्राचे योग्य नियोजन करुन मत्सव्यवसाय विकासाचे जास्तीत जास्त उद्दिष्ट विभागाने गाठावे. मासेमारीचे क्षेत्र आणि उत्पादन क्षमता वाढवून उपलब्ध तसेच नविन जलस्त्रोतांमधून जास्तीत जास्त मत्स्य उत्पादन करण्यात यावे. मच्छिमारांना शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण आणि नव्याने सुरु केलेल्या मत्स्य व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यात यावे. तसेच सागरी क्षेत्रात मासे योग्य रितीने उतरविणे व प्रक्रिया करण्यासाठी बंदरे, जेट्टी, मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण, बर्फाचे कारखाने, शीतगृहे इत्यादीसारख्या आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन मत्स्यव्यवसायात सुधारणा करुन मत्स्यव्यवसाय करणा-या व्यक्तींची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्याबाबतचे उद्दिष्ट नियोजनबध्द व कालबध्दरित्या विभागाने गाठावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.७ 'वित्तीय व्यवस्थापन'

अभिप्राय :

३.७ विभागाला राज्यशासनाकडून अर्थसंकल्पाच्या पाठबळाद्वारे निधी प्राप्त होतो ज्यामध्ये वेगवेगळया योजना राबविण्यासाठी अनुदाने व कर्जाच्या रुपात केंद्र शासनाकडून तसेच राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ (NFDB), राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) आणि कृषी व ग्रामीण विकासासाठीची राष्ट्रीयकृत बँक (NABARD) या इतर शासकीय संस्थांकडून प्राप्त होणा-या निधीचा समावेश असतो. सर्व अनुदाने व कर्जे राज्य अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मार्गस्थ केली जातात/वितरीत केली जातात. मत्स्य बीजांची विक्री, तलाव/जलाशयांचे भाडेपट्टी भाडे, मच्छिमारांकडून मासेमारीसाठी आणि मच्छिमार नौकांसाठी प्राप्त केलेले अनुज्ञप्तीशुल्क, मत्स्यसहकारी संस्थांना (FCS) वितरीत केलेल्या कर्जाची वसुली इत्यादीच्या माध्यमातून विभागाला महसूल प्राप्त होत असताना सन २०११-१६ दरम्यान, विभागाने रु. ७९८.१९ कोटी खर्च केला आणि रु. ८६.०३ कोटी बचती प्रत्यार्पित केल्या व बचतीपैकी रु. ३०.४४ कोटीची बचत मुख्यत्वे राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळांतर्गत 'मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण' या योजनेअंतर्गत झाली होती. जे विभागांतर्गत वित्तीय व्यवस्थापनाचा अभाव दर्शविणारे आहे.

३.८ यापूर्वी राष्ट्रीय सहकार विकास निगम या योजनेतंर्गत २५% रक्कम अदा केलेल्या २५४ अपूर्ण नौका पुर्ण करण्यासाठी सदर लेखाशीर्षाखालील रक्कम ५५% कर्ज वितरीत करण्यासाठी ६४०५ कर्जे या शिर्षाखाली पुनर्विनियोजनाने रक्कम वळती करण्याबाबत प्रस्तावित केले असता वित्तविभागाकडून मार्च अखेरीस सदर ५५% च्या प्रस्तावांस मंजूरी प्राप्त झाली नाही. तथापि, ४१ गटांसाठी २५% रक्कम वितरीत करण्याच्या प्रस्तावास वित्त विभागाकडून दि. ३१/३/१३ रोजी मंजूरी प्राप्त झाली. दरम्यानच्या कालावधीत बीडीएस प्रणाली बंद झाल्यामुळे २५% रक्कम ४१ गटांना वितरीत करणे शक्य झाले नाही. सबब, सदर रक्कम अखर्चित राहीली असल्याने समर्पित करणे क्रमप्राप्त झाले. तसेच रु. ४.२७९ कोटी एवढी रक्कम पुनर्विनीयोजनाद्वारे बीडीएस वर उपलब्ध झाली. परंतु दरम्यानच्या कालावधीत बीडीएस प्रणाली बंद झाल्यामुळे सदर रक्कम खर्च झाली नाही. त्यामुळे रु.४.२७९ कोटी रक्कम समर्पित करण्यात आली आहे.

३.९ विभागास सन २०११ ते २०१६ मध्ये रु. ८०७.१६ लक्ष अंतिम सुधारित अनुदान प्राप्त झाले असुन त्यापैकी रु.७९८.१९ लक्ष इतका खर्च झाला आहे व प्रत्यक्षात प्राप्त अनुदानाच्या तुलनेत रु.८.९७ लक्ष इतकी बचत झाली असुन ती फक्त १.११ टक्के इतकी नगण्य असून शासन मंजुरी प्राप्त झालेल्या यांत्रिक नौकांना रक्कम अदा करण्यासाठी बीडीएसवर प्राप्त झालेल्या तरतुदीनुसार खर्च करण्यात आला असुन मुळ तरतुदीनुसार बीडीएसवर अप्राप्त असलेली तरतुद समर्पित करण्यात आली होती असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. समितीने या कार्यपध्दतीवर तीव्र आक्षेप नोंदवित आर्थिक वर्षात तरतूद निधीचे व्यवस्थापन व खर्च आर्थिक वर्षाच्या अखेरच्या म्हणजेच मार्च महिन्यात करण्यालाच समितीचा आक्षेप आहे. वित्त विभागाने मार्च अखेर निधी वितरीत करायचा व विभागाला निधी दिल्याचे केवळ कागदोपत्री दाखवायचे, परंतु तो निधी विभाग वेळेअभावी खर्च देखील करु शकत नाही ही वित्तीय व्यवस्थाच सदोष आहे. विभागाला प्रस्तावास जर दि.२१ मार्चला मान्यता मिळत असेल तर विभाग हा निधी खर्चच करु शकत नाही. परंतु त्याचवेळी या निधी संदर्भातील प्रस्ताव विभागाने वित्त विभागास कधी पाठविला हे देखील तपासण्याची आवश्यकता आहे. विभागाने देखील परिपुर्ण प्रस्ताव विहित मुदतीत व त्रुटीविना वित्त विभागास सादर करणे आवश्यक आहे. या प्रकरणी समितीने प्रस्ताव सादर करण्याबाबतची माहिती घेतली असता आयुक्तांकडून प्रस्ताव जानेवारी-फेब्रुवारीमध्येच प्राप्त झाला असून त्यास शासनस्तरावर विलंब झाल्याचे सचिवांनी मान्य केले व याबाबत जबाबदारी निश्चित करुन १ महिन्यात समितीस कळविण्यात येईल असेही समितीस आश्वासित केले. साक्षीवेळी विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले की, प्रस्ताव वित्त विभागाकडे दिनांक २८ मार्च रोजी पाठविला होता व दिनांक ३१ मार्च रोजी बी.डी.एस. बंद झाले. परिणामी हा निधी खर्च करता येऊ शकला नाही व विभागाला समर्पित करावा लागला. ही कार्यपध्दतीच सदोष असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :

३.१० विभागाला राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित करुन प्राप्त होणा-या निधीचे योग्य नियोजन विभागाने करणे बंधनकारक असून त्याअनुषंगाने प्राप्त होणारे प्रस्ताव, त्यासाठी लागणारा निधी, योजना पुर्ण होण्याचा कालावधी, विभागाकडून त्या निधीत होणारी कपात या सर्व बाबींचा ताळमेळ विभागाने घालणे अभिप्रेत असताना अर्थसंकल्पित निधीत मोठ्या प्रमाणात बचत होवून आर्थिक वर्षअखेरीस तो प्रत्यार्पित होणे कदापि समर्थनीय नाही. या प्रक्रियेमध्ये संबंधित विभाग व वित्त विभाग यांची महत्वाची भूमिका असून कित्येक प्रकरणात विभागासाठी अर्थसंकल्पित निधी या आर्थिक वर्षअखेरीस म्हणजे मार्च महिन्यात वितरीत करण्यात येतो. ज्यामुळे वित्त विभागाने निधी वितरीत केल्याचे केवळ कागदोपत्री तांत्रिकदृष्ट्या दाखविणे, परंतु हा प्राप्त निधी

विहित वेळेत खर्च करण्यासाठी विभागाकडे कालावधी उपलब्ध नसतो ही अत्यंत सदोष कार्यपध्दती असून अर्थसंकल्पित निधीचे व्यवस्थापन व नियोजन संबंधित विभाग व वित्त विभागाने योग्य ताळमेळ ठेवून करणे आवश्यक आहे यासाठी विभागाने परिपुर्णरित्या प्रस्ताव तयार करुन विहित मुदतीत वित्त विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे व वित्त विभागाने देखील अशा प्रस्तावांवर सकारात्मक भूमिका स्विकारुन जर खरोखरच निधी वितरीत करायचा असेल तर तो विहित कालमर्यादेत खर्च करता येईल अशा पध्दतीने वितरीत करावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच सदरहू प्रकरणी प्रत्यार्पित झालेल्या निधीसंदर्भात आयुक्तांनी विहित कालावधीतच प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे दिसून येते. परंतु यास शासनस्तरावर विलंब झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन १ महिन्यात समितीस कळविण्यात येईल असे आश्वासित करुनही सदरहू माहिती समितीस अद्यापही प्राप्त झालेली नाही. अतः या प्रकरणी विलंबासाठी जबाबदार असणा-या अधिका-यांवर तसेच आश्वासित माहिती समितीस विहित मुदतीत न देणा-या अधिका-यांवर देखील विभागाने कारवाई करावी व भविष्यात असे आक्षेप टाळावेत. तसेच विभागाकडे राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत अनेक प्रस्ताव प्राप्त होतात. परंतु त्यातील बहुतांश प्रस्ताव निधीअभावी प्रलंबित राहतात. अतः विभागाने प्रस्तावांची संख्या व त्यासाठी निधीची उपलब्धता याचा योग्य ताळमेळ ठेवूनच कामांचे नियोजन करावे व आवश्यकता पडल्यास वाढीव निधी मिळविण्यासाठी देखील प्रयत्न करावेत व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.७.१ 'मत्स्य सहकारी संस्थांकडून थकबाकीची वसुली न होणे'

अभिप्राय :

३.११ विभागाने वेळोवेळी भाडेपट्टयावर दिलेल्या तलावांच्या भाडयापोटी मत्स्य सहकारी संस्थांकडून रू. ३३.७४ लक्ष रक्कमेची वसूली प्रलंबित होती. त्यापैकी रू. २४.८० लक्षची वसूली २००६-०७ पूर्वीच्या कालावधीशी संबधित होती. यासंदर्भात संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची अथवा थकबाकीची वसुली जमीन महसूलाप्रमाणे करणेबाबतची कारवाई देखील विभागाने केली नाही. कर्जाच्या वसुलीची जबाबदारी विभागाची होती. परंतु एकूण वसुलपात्र रु.५१७.७९ रकमेपैकी जवळजवळ रु.३२४.२१ कोटीची वसुली प्रलंबित होती, जे विभागातील वसुलीचे व्यवस्थापन सुमार दर्जाचे असल्याचे दर्शविते.

३.१२ यासंदर्भात वसुलीचा अहवाल समितीला सादर करतेवेळी रु. २४.८० लक्ष एवढी रक्कम वसुली करणेबाबत संबंधित मच्छिमार सहकारी संस्थांना नोटीसा बजावण्यात आल्या असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने याबाबत विस्तृत चर्चा केली असता ही वसुली सन २००६-२००७ च्या पूर्वीचीदेखील आहे. विभागाकडे जवळजवळ २४ हजार नोंदणीकृत बोटी आहेत. या नोंदीपेक्षा मात्र लायसन्सची संख्या कमी आहे. ही तफावत शोधण्यासाठी विभागाने त्या बोटींचे सर्वेक्षण सुरु केले असून कोणत्या बोटी सुरु आहेत, कोणत्या बंद आहेत व त्या कुठे कार्यरत आहेत,त्यांचे मालक कोण आहेत याबाबतचे सर्व्हेक्षण करण्यात येत आहे व त्यापैकी जवळजवळ ५ हजारच्यावर बोटींबाबत सर्व्हे पूर्ण केलेला आहे. बोटींचा पूर्ण सर्व्हे करुन त्यांची पडताळणी करुन मग ही वसूली होऊ शकेल असे विभागीय सचिवांकडून समितीसमोर सांगण्यात आले. याबाबत समितीने आक्षेप नोंदवित विभागाकडे वसुली अधिकारी यांची पदेच रिक्त आहेत. ही पदेच रिक्त असतील तर ही वसूली होऊ शकणार नाही.८ पदे पदोन्नतीची व ८ सरळसेवेची अशी एकूण १६ पदे आहेत. त्यापैकी पदोन्नतीची ६ पदे भरलेली असून ८ पदांकरिता जाहीरात दिलेली आहे. वसुली अधिका-यांची पदे भरल्यानंतर वसुलीमध्ये सुधारणा होईल असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच सद्यःस्थितीत २३२ संस्था डिफॉल्टरमध्ये रु.५०० कोटी थकबाकी आहेत. सद्यःस्थितीत यापैकी रु.२१५ कोटी वसूल झालेले आहेत आणि उर्वरित रक्कम प्रलंबित आहे. त्यामुळे त्या संस्थांना ३-३ वेळा नोटीस दिलेली आहे. त्यानंतर देखील ही वसुली झाली नाही तर ही सर्व वसुली त्यांच्या डिझेल अनुदानामधून वसूल करण्यात येईल व तरीही ही वसुली झाली नाही तर जमीन महसूली थकबाकी अन्वये (RRC) वसुली करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठविण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर आश्वासित केले.

शिफारस :

३.१३ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मत्स्य सहकारी संस्थांना मासेमारी होड्यांचे यांत्रिकीकरण, बर्फाचे कारखाने, शीतगृहे स्थापन करणे, जमिनीवरील वाहतूकीसाठीची वाहने, मत्स्य उत्पादने साठवण्यासाठी गोदामांचे बांधकाम, जाळी, नौका आणि इतर साधनसामग्रीची खरेदी यासाठी अर्थसहाय्य कर्ज वा अनुदान स्वरुपात देण्यात येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु क्रियाशील मच्छिमारांच्या गटांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी हे अर्थसहाय्य करण्याचे धोरण शासनाने एका उदात्त हेतूने स्विकारले व याचा निश्चितच लाभ या संस्थांना मिळतो आहे. परंतु या कर्जाची वसुली करण्याची जबाबदारी ही विभागाची

असताना जवळजवळ रु.३२४.२१ कोटी इतकी मोठ्या प्रमाणात ही थकीत वसुली असल्याचे महालेखाकारांनी आक्षेपित केले आहे ही देखील तितकीच गंभीर बाब आहे. शासनाकडून कर्ज देतेवेळी नौका हेच तारण म्हणून विचारात घेतले जाते. त्यामुळे कर्जाची वसुली केवळ नौकेपासून मिळणा-या उत्पन्नावर अवलंबून राहते. अशा परिस्थितीत या थकबाकीची वसुली, त्यासाठी व्यवस्थापन व त्याचा नियमित आढावा या कोणत्याही बाबी विभागाने योग्यरित्या केल्याचे दिसून येत नाही. शासनाने या मत्स्य सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जाच्या वा अनुदानाच्या माध्यमातून निश्चितच त्यांना लाभ होत आहे. परंतु त्याचवेळी ही वसुली न होण्याची कारणमिमांसा शोधणे व त्यासाठी आवश्यक असणारे प्रयत्न विभागाकडून कमी पडत असल्याचे दिसून येते. उपरोक्त कोट्यावधी रकमेच्या वसुलीकरिता आजतागायत विभागाने संस्थांना नोटीसी देण्यापलिकडे कोणतीही कारवाई केलेली नाही. मत्स्यव्यवसाय करणारा वर्ग हा राज्यात एक विशिष्ट वर्ग असून प्रसंगी जीव धोक्यात घालूनही ही मासेमारी करावी लागते. त्यामुळे अन्य वसुलीप्रमाणे तितक्याच कठोर पध्दतीने या गटाचा विचार विभागाने करणे निश्चितच व्यवहार्य ठरत नसले तरीही यामुळे शासनाकडून घेतलेले कर्ज परतफेडीची जबाबदारीच या संस्थांनी टाळावी व असे कर्ज न फेडल्यामुळे अशा संस्थांवर कोणतीही कारवाई होत नाही असा संदेश देखील शासन पातळीवरुन जाणे उचित होणार नाही. कित्येकदा हे कर्ज भविष्यात शासनाकडून माफ होण्याच्या अपेक्षेनेही कर्ज फेडण्याची क्षमता असतानाही असे कर्ज फेडण्याची मच्छीमार संस्थांची वृत्ती राहात नाही. अशा परिस्थितीत विभागाने हे प्रकरण नियोजनबध्दरित्या हाताळणे अभिप्रेत व आवश्यक असताना विभागाचे हे वसुलीचे व्यवस्थापन अतिशय सुमार दर्जाचे आहे. प्रलंबित वसुलीचा दीर्घ कालावधी पाहता संस्थांनी देखील हे कर्ज फेडण्याची तत्परता दाखविली नाही व विभागाने देखील त्याचा नियमाप्रमाणे हवा तसा व गतीने पाठपुरावा केला नाही. त्यामुळे समितीची सदरहु बैठक लागेपर्यंत विभागाने ही वसुलीची कार्यवाही गांभीर्याने केली नाही हे स्पष्टच होते. विभागाने याअगोदरच काही संस्थांवर तरी प्रायोगिक तत्वावर कारवाई करुन योग्य संदेश देण्याची आवश्यकता होती. राज्यात सद्यःस्थितीत असे ३२३७ प्रकल्प असून एकूण २३२ संस्था अस्तित्वात आहेत. मात्र वसुलीची थकबाकी जवळजवळ ६० टक्क्यापेक्षा जास्त प्रलंबित आहे. वसुली संदर्भात इतकी मवाळ भूमिका विभागाची राहिली तर ही वसुली विभागाला करणे केवळ अशक्यच आहे. विभागाकडून नोंदणीकृत बोटींची संख्या व देण्यात आलेल्या परवान्यांची संख्या यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. याचा अर्थ त्यातील किती बोटी सद्यःस्थितीत सुरु आहेत व किती बंद पडलेल्या आहेत याचा नियमित आढावा विभागाने घेणे अभिप्रेत असताना हा आढावा विभागाने आता घेण्यास सुरुवात केली. एकूण २४००० बोटींपैकी केवळ ५००० बोटींचे सर्वेक्षण झाले असून उर्वरित बोटींच्या सर्वेक्षणाचा कालावधी देखील सद्यःस्थितीत शाश्वत नाही. वारंवार प्रयत्न करुनही थकबाकी वसुल न झाल्यास डिझेल अनुदान थांबविणे, जमीन महसूली थकबाकीअन्वये ही वसुली करणे अथवा सदर कसूरदार नौका मालक ज्या मत्स्य सहकारी संस्थेसोबत संलग्न असेल त्या अकार्यक्षम संस्था म्हणून घोषित करणे तसेच वसुली पुर्ण होईपर्यंत संस्थेला देण्यात येणारे इतर शासकीय लाभ स्थगित ठेवणे हे सर्व कायदेशीर पर्याय विभागाकडे उपलब्ध असताना यापैकी कोणतीही कारवाई विभागाने गांभीर्याने केली नाही. त्यामुळेच ही थकबाकी वाढल्याचे दिसून येते. दुसरीकडे ही वसुली करण्यास विभागाकडे वसुली अधिका-यांची पदे देखील मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यामुळे ही वसुली प्रभावीपणे होवू शकली नाही. थकबाकी वसुलीसाठी मत्स्यमारांच्या बोटी जप्त करणे हा पर्याय विभागाकडे उपलब्ध असताना त्याचा देखील अवलंब विभागाने केला नाही. तसेच हा बोटी जप्तीचा पर्याय कितपत व्यवहार्य ठरेल व त्या जप्त बोटींचे व्यवस्थापन व सुरक्षितता विभाग कसे करेल हा देखील गंभीर प्रश्न कायम राहतो. या सर्व बाबींचे अवलोकन करता विभागाने कालबध्द पध्दतीने विशेष मोहिम हाती घेऊन थकबाकी प्रलंबित राहण्याची प्रामुख्याने कारणमिमांसा शोधावी, नोंदणीकृत व परवानेधारक बोटींच्या संख्येमध्ये असलेल्या तफावतीची तपासणी करावी व ही वसुली तात्काळ करण्यासाठी आवश्यक वसुली अधिका-यांची भरती तात्काळ करण्यात यावी व यास काही अडचणी येत असल्यास या वसुलीसाठी महसूली यंत्रणेची मदत घेण्याबाबतच्या पर्यायांचा देखील अवलंब करावा व ही वसुली कालबध्द पध्दतीने पुर्ण करावी. तरीही ही वसुली न झाल्यास नियमानुसार जमीन महसूली थकबाकी (RRC)अंतर्गत जिल्हाधिका-यांमार्फत ही वसुली करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.७.२ 'रोख पुस्तिका ठेवण्यात आढळलेल्या विसंगती'

अभिप्राय :

३.१४ विभागाने रोख पुस्तिका ठेवणे बंधनकारक असताना मे, २०१४ पासून अलीबाग कार्यालयाने रोख पुस्तिकेत नोंदी घेतल्या नव्हत्या. पुणे आणि मुंबई शहर/उपनगर यांनी अनुक्रमे एप्रिल, २०११ आणि जून, २०१५ पासून रोख पुस्तिके चा दैनिक व मासिक ताळमेळ घेतला गेला नव्हता.मुंबई शहर/उपनगर यांनी अनुक्रमे नोव्हेंबर, २०१५ व डिसेंबर, २०१५ पासून प्रत्येक महिन्याच्या अखेरीस रोख पुस्तिकेचा बँक शिल्लकीशी ताळमेळ घेतला नव्हता. परिणामी विभागामध्ये शासकीय रक्कमेचा दुर्विनियोग होण्याची पूर्ण संभावना आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने याबाबत साक्ष घेतली असता रोख पुस्तिका मधल्या कालावधीत अद्ययावत नव्हत्या पण आता अद्ययावत झालेल्याअसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारस :

३.१५ विभागाने रोख पुस्तिका नियमितरित्या ठेवणे व त्याचा बँकेच्या विवरणपत्राशी नियमित ताळमेळ करणे विभागावर बंधनकारक असताना विभागाने ते योग्यरित्या न केल्यामुळे हे आक्षेप नोंदविण्यात आले आहे. यामध्ये विसंगती राहिल्यास अनियमितता, गैरव्यवहार वा निधीचा अपव्यय व दुर्विनीयोग झाला असण्याचा पुर्ण धोका व शक्यता निश्चितच कायम राहते. आता विभागात त्रैमासिकरित्या खर्चाचा ताळमेळ (Reconcilliation) करुन घेणे विभागावर बंधनकारकच केलेले असताना त्याची देखील अंमलबजावणी विभागाकडून करण्यात येत नाही, ही गंभीर बाब आहे. विभागाने काम करताना आर्थिक शिस्त पाळणे बंधनकारक असून कोणत्याही परिस्थितीत वित्तीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दखल विभागाने घ्यावी. सदरहु परिच्छेदात आक्षेपित बाबींसंदर्भात व रोख पुस्तिका व त्याचा बँकेच्या विवरणपत्राशी घालावयाच्या ताळमेळासंदर्भात पुर्ण तपासणी करावी व त्याचा महालेखाकार कार्यालयाशी समन्वय साधून त्यांचेकडून यास मान्यता प्राप्त करुन घ्यावी तसेच यात काही अनियमितता वा गैरव्यवहार आढळून आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी. विभागाने अधिनस्त सर्व आहरण व संवितरण अधिका-यांकडील रोखपुस्तिकेचा ताळमेळ बँकेतील शिलकेशी विहीत वेळेत घालणेबाबत निदेशीत करावे व त्याची अंमलबजावणी न करणा-यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी व भविष्यात हे आक्षेप टाळावे व शासकीय रकमेच्या दुर्विनियोगाचा संभाव्य धोका टाळण्यासाठी रोख पुस्तिका आणि बँक शिल्लकीतील तफावतींचा त्वरीत व नियमित ताळमेळ घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.८ 'मत्स्य उत्पादनातील तूट'

अभिप्राय :

३.१६ सन २०११-१५ चे कार्यकारी/कार्यसिध्दी अर्थसंकल्प, मत्स्य उत्पादन अहवाल आणि विभागाने सादर केलेली २०१५-१६ च्या अंतरीम आकडेवारी वरुन सन२०११-१६ दरम्यान ७.५० लक्ष टन इतक्या निर्धारीत वार्षिक सरासरी मत्स्य उत्पादनाच्या (भूजलाशयीन तसेच सागरी) उद्दिष्टाच्या तुलनेत सरासरी वार्षिक उत्पादन ५.९१ लक्ष टन होते म्हणजेच २१ टक्क्यांची तूट होती. भूजलाशयीन मत्स्य उत्पादनातील तुटीशी (५.६२ टक्के) तुलना करता सागरी मत्स्य उत्पादनातील तूट (२५.०७टक्के) तीव्र होती. तसेच राज्यातील अन्य सात क्षेत्रांमध्ये देखील ही तूट वा घट मोठ्या प्रमाणात आढळून आल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

३.१७ गोडया पाण्यातील मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी जलद वाढ होणारे व चांगल्या प्रतीच्या मत्स्य बोटुकलीची साठवणूक जलाशयात/ तलावात करणे आवश्यक असते. याकरीता विभागाच्या मालकीच्या राज्यातील ३० मत्स्यबीज उत्पादन केंद्र (हॅचरी) व १६ संवर्धन केंद्र यांच्या मार्फत जास्तीतजास्त मत्स्यबीज निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच मत्स्यबीज केंद्राचे खाजगीकरण करुन बीजांची निकड भागविण्यात येत आहे. तसेच सागरी क्षेत्रातील मत्स्य उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने राज्यांच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारीवर प्रतिबंध करण्यासाठी दि.५.२.२०१६ अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे. शाश्वत मत्स्य उत्पादन, मत्स्यबीज जाळ्यात न अडकता बीजांची नैसर्गिकरीत्या वाढ होऊन प्रजननक्षम माशांची वाढ व मासळी साठ्यांचे जतन यादृष्टीने आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. भूजलाशयीन मत्स्यव्यवसाय क्षेत्रात मच्छिमार प्रामुख्याने लहान आकाराच्या फिशफ्रायचा साठा करतात ज्यामुळे त्यांचा मृत्यूदर अधिक असतो व उत्पादन कमी असते. अतः मत्स्य बोटुकलीचा साठा करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे ज्यामुळे माशांचा मृत्यू दर कमी होईल व भूजलाशयीन मत्स्य उत्पादन वाढेल.

३.१८ यासंदर्भात समितीच्या साक्षीदरम्यान मत्स्य उत्पादनाचे लक्ष्य व प्रत्यक्ष मत्स्य उत्पादन यामधील तूट तुलनेने कमी करण्यात आलेली असून सन २०१६-१७ चे भुजल आणि सागरी मत्स्य उत्पादन या दोन्हींची मिळून ११ टक्केने तूट कमी झालेली असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले. तरीही मत्स्य उत्पादनातील तूट भरुन काढणेसाठी व ही तूट कमी करण्यासाठी विभागाने अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :

३.१९ राज्यात मत्स्य उत्पादनात उत्तरोत्तर होणारी तूट हा महत्वाचा विषय असून ही तूट भरुन काढण्यासाठी वा कमी करण्यासाठी विभागाने ठोस प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासाठी गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धन व समुद्रातील खा-या पाण्यातील मत्स्य संवर्धन याची व्याप्ती वेगवेगळी असताना ते एकाच पातळीवर व निकषाद्वारे हाताळणे योग्य ठरणारे नाही. सागरी मासेमारी व गोड्या पाण्यातील मासेमारीसाठी स्वतंत्र कार्यपध्दती व नियम अवलंबिण्याची आवश्यकता आहे. विभागाला यामध्ये निश्चितच अडचणी येतात हे समितीला मान्य आहे. परंतु या दोन्ही मासेमारींमध्ये निश्चितच तफावत असून ते वेगवेगळ्या नियम व निकषाद्वारे हाताळण्याची आवश्यकता आहे. त्यातही समुद्रात पर्ससीन नेट, ट्रॉलींग, सर्च व एलईडी लाईटच्या माध्यमातून होणा-या मासेमारीमुळे राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. विभागाने यावर काही प्रमाणात बंधने घातलेली आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्याची कोणतीही शाश्वत यंत्रणा विभागाकडे अस्तित्वात असल्याचे समितीला दिसून आले नाही. यावर वेळेत कागदोपत्री नव्हेतर वस्तुतः निर्बंध आणले नाहीत तर मत्स्य प्रजननावर याचा गंभीर व विपरीत परिणाम निश्चितच होणारा आहे. त्यासाठी विभागाने आवश्यक ती उपाययोजना तातडीने करावी. अन्य सागरी देशांमध्ये या संदर्भात अस्तित्वात असलेल्या उपाययोजनांचा देखील विभागाने तुलनात्मक अभ्यास करुन यावर व्यवहार्य तोडगा काढावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन देखील यावर नियंत्रण आणणे विभागाला निश्चितच शक्य आहे. बोटीवर ट्रॅक रेकॉर्ड, सीसीटिव्ही, जीपीएस, मासेमारीचे प्रमाण दर्शविणारी यंत्रणा बसविल्यास ही घट कमी होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने देखील विभागाने आवश्यक ती उपाययोजना करावी. मासेमारीच्या परवान्यांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या पर्यायांचा देखील विभागाने विचार करावा. गोड्या पाण्याच्या तलावांमधील मासेमारीची अतिशय कमी असलेली व्याप्ती पाहता कंत्राट तलावातील मासेमारीचे कंत्राट देण्यासंबंधीची प्रक्रिया स्वतंत्ररित्या विहित करुन ती अधिक सुटसुटीत, कमी कालावधीत पुर्ण होणारी तसेच किचकट प्रशासकीय कार्यपध्दतीतून संरक्षण देणारी असावी. सद्यःस्थितीत विभागाने मत्स्यव्यवसायात वाढ करण्यासाठी उपाययोजनाचा अवलंब केलेलाच आहे, त्याची निश्चित अंमलबजावणी करावी. परंतु यासाठी मत्स्यव्यवसाय धोरण अधिक सर्वसमावेशक असण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने नविन सर्वसमावेशक मत्स्यव्यवसाय धोरण तयार करुन नविन तलाव ठेका धोरण व पिंजरा मत्स्य संवर्धन करण्याच्या धोरणाची योग्य प्रसिध्दी देवून अंमलबजावणी करावी व आवश्यक त्या सर्व उपाययोजना करुन राज्यातील मत्स्योत्पादनातील तूट भरुन काढण्यासाठी विभागामार्फत भरीव प्रयत्न करण्यात यावेत.तसेच याचा नियमित त्रैमासिक आढावा विभागाने घ्यावा, दरवर्षी उद्दिष्टात वाढ करुन त्याच्या पुर्तीसंदर्भातील आवश्यक ते नियोजन करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.८.१ 'नियमांचे योग्य पालन न करता केली जाणारी पर्ससीन (Purse Senine) मासेमारी'

अभिप्राय :

३.२० पर्ससीन मासेमारीने माश्यांचे लहान पील्ले प्रजोत्पादनाची किमान अवस्था येण्यापूर्वी पकडले जातात व त्यांचे जिवन चक्रामध्ये एकदातरी पुर्नउत्पादनाची संधी मिळत नसल्याने पूढील वर्षाच्या मत्स्य उत्पादनावर परिणाम होतो. उथळ पाण्यातील व प्रजोत्पादन हंगामातील पर्ससीन मासेमारीमूळे समुद्राचे तळावरील जीवसृष्टीची होणारी हानी, यामुळे पर्यावरणावर प्रतिकुल परिणाम होऊन कमाल शास्वत मत्स्योत्पादन बाधीत होते. पर्ससीन पध्दतीने राज्यात केली जाणारी मासेमारी कोणत्याही नियमांचे पालन न करता बेसुमार प्रमाणात केली जाते.राज्यातील पर्ससीन मासेमारीची स्थिती, या पध्दतीच्या मासेमारीचा पारंपारीक पध्दतीने केल्या जाणा-या मासेमारीवर होणारा पर्यावरणीय तसेच आर्थिक परिणाम आणि कमाल शाश्वत मत्स्योत्पादनाच्या आधारावर पर्ससीन मासेमारी नौकांच्या संख्येची निश्चीती याबाबींचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने एक समिती गठीत केली होती. यासमितीने सादर केलेल्या (मे २०१२) अहवालात राज्यात पर्ससीन पध्दती चा वापर करुन केला जाणारा मत्स्यव्यवसाय विनियमीत करण्यासाठी पर्ससीन पध्दतीचा वापर करणा-या मच्छीमारांचे कार्यक्षेत्र मर्यादीत करणे आणि प्रमाणित आकाराच्या जाळयाचा वापर करणे, पर्ससीन नौकांची संख्या कमी करणे, हंगामी परवाना पध्दती लागू करणे, पर्ससीन उद्योगात अधिक गुंतवणूकीस आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक धोरण आखणे, राज्यातील मत्स्यव्यवसायाचा कायमस्वरुपी विकास साधण्यासाठी मत्स्यव्यवसाय धोरणाचा मसुदा तयार करणे इत्यादी सारख्या अनेक शिफारसी समाविष्ट होत्या. प्रत्येक सागरी जिल्हयामार्फत जिल्हा सल्लागार समितीचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर राज्यातील मत्स्य व्यवसायाला कायमस्वरुपी विकास साधण्यासाठी शासनाने स्वीकृत केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचे आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना इत्यादीबाबत शिफारसीचा प्रारुप मसुदा शासनास प्राप्त झाला होता. परंतु यासंबंधीचे मत्स्यव्यवसाय धोरण विभागाने तयार केले नव्हते.

३.२१ अतः सद्यःस्थितीत शासनाने अनेकदा ठरवून दिलेल्या नियमांचे पालन न करता पर्ससीन मासेमारी केली जाते. शासनाने यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहित केली आहेत. परंतु यावर कशा पध्दतीने देखरेख ठेवली जाते अशी विचारणा समितीने केली असता विभागाकडे २३ लायसन्सिंग ऑफिसर्स आहेत. व्हीटीएस बसवणे अनिवार्य केलेले आहे. काहींनी ही सिस्टीम बसवलेली आहे तर काही ठिकाणी यंत्रणा बसवण्याचे काम सुरु आहे.ज्यांनी नियमांचे पालन केलेले नाही, अशा ९४ जणांचे लायसन्स रद्द केलेले आहे. ट्रोलचे लायसन्स दिल्यानंतर ते जर पर्ससीन मासेमारी करीत असतील तर त्यांचे लायसन्स रद्द केले जाते. या संबंधी दंडात्मक कारवाई देखील केली जाते. तहसीलदार यांच्याकडून रकमेच्या ५ पट दंड आकारला जातो.आता पर्यंत एकूण ३७६ बोटींवर कारवाई केलेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.२२ माशांचा समुदाय एखाद्या जागी असल्याचे निश्चित झाल्यावर त्या संपूर्ण क्षेत्राला वेढणारी जाळयाची मोठी भिंत म्हणजे पर्ससीन मासेमारी होय. यावर आळा घालण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेल्या (सप्टेंबर २०११) समितीच्या असे निदर्शनास आले की सुरमई, बांगडा आणि माशांच्या इतर निर्धारीत प्रजाती परिपक्व होण्यासाठी त्याकिमान आकाराच्या वाढण्याआधीच त्यांची पिल्ले मोठया प्रमाणात पर्ससीन मासेमारीत पकडली जातात. ज्याचा परिणाम अशा प्रजातींच्या भविष्यातील उत्पादनावर होतो. उथळ पाण्यात तसेच प्रजनन काळात पर्ससीन मासेमारीमुळे प्रतिकुल जैवशास्त्रीय परिणाम होतो. कारण त्यामुळे तळांतील जलाशयाच्या निम्नस्तरावरील (benthic) वनस्पतीचे संतुलन बिघडते. वेगवेगळया प्रकारच्या जाळयाचा वापर करुन मच्छीमार अनुसरत असलेल्या मासेमारीच्या पध्दतीत एकूण सागरी मासेमारीचे प्रमाण तसेच मासेमारी नौकेकडून प्रत्येक फेरीत केलेले मत्स्योत्पादन निर्धारीत करतात. पर्ससीन पध्दतीने राज्यात केली जाणारी मासेमारी कोणत्याही नियमांचे पालन न करता बेसुमार व अनिर्बंध प्रमाणात केली जाते.पर्ससीन नेट, ट्रॉलींग, सर्च व एलईडी लाईटच्या माध्यमातून करण्यात येणा-या मासेमारीमुळे मत्स्य प्रजनन व उत्पादनावर याचा मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला असून सद्यःस्थितीत गंभीर स्वरुप धारण केले असून त्यातून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती देखील निर्माण झालेली आहे. अशी मासेमारी करणा-यांवर कारवाई करण्यासंदर्भात अनेक तरतूदी उपलब्ध आहेत परंतु त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही ही वस्तुस्थिती आहे. यासाठी अधिक कडक कार्यपध्दती अवलंबिण्याची आवश्यकता आहे. तसेच यावर शासनाने नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. सदर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणा-या नौकांवर प्रतिबंध घालण्याच्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने सल्लागार समितीची शिफारस प्राप्त करुन राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन पध्दतीने मासेमारी करण्यासाठी वापरण्यांत येणा-या जाळयांचा आकारमान, जाळयांचा आस, मासेमारी क्षेत्र, हंगामी परवाना, पर्ससीन मासेमारी परवान्यांची संख्या टप्याटप्याने कमी करणेबाबत अधिसुचना निर्गमीत करण्यात आली. तसेच विभागाचे मत्स्य धोरण निश्चित करण्याचा मसूदा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे समितीला सांगण्यात आले. त्यानुसार विभागाने मत्स्यधोरण लवकरात लवकर निश्चित करुन त्याप्रमाणे अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा व त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व नियमांचे योग्य पालन न करता केली जाणारी पर्ससीन व अन्य मासेमारीवर प्रतिबंध घालण्यात यावा व यासाठी शासनाची देखरेख यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.८.२ 'मत्स्यबीजांचे नगण्य उत्पादन'

अभिप्राय :

३.२३ राज्यात वार्षिक ६० कोटी मत्स्यबीजांची मागणी असताना त्या तुलनेत ३३ मत्स्यबीज केंद्रांची क्षमता केवळ २१ कोटी इतकी स्थिर होती. परंतु, उत्पादन क्षमतेच्या तुलनेत प्रत्यक्ष वार्षिक उत्पादन नगण्य होते जे २.४३ कोटी (८८ टक्क्याची तूट) आणि ८.१६ कोटी (६१टक्क्याची तूट) होते. परिणामी खुल्या बाजारातून मत्स्यबीजांची खरेदी करुन मच्छिमार संस्थानी तूट भरुन काढली व या ३३ मत्स्य बीज केंद्रांना रु.१०.५५ कोटीचा व्यावसायिक तोटा झाला. सन २०११-१६ दरम्यान ३३ पैकी पाच मत्स्य बीज केंद्रात माशांची पैदास झाली नव्हती. कर्मचा-यांची व पाणी पुरवठा वाहिन्यांची कमतरता यामुळे काही ठिकाणी बीज केंद्रे व उबवणी केंद्रे कार्यरत नव्हती. आणि भीषण दुष्काळामुळे देखील मत्स्य केंद्रावर प्रतिकूल परिणाम झाला होता. तसेच यवतमाळ जिल्ह्यात दोन नवीन मत्स्य बीज केंद्रे रु.७.६५ कोटीच्या अंदाजित खर्चात बांधण्यासाठी मंजूरी दिली, परंतु जवळ जवळ पाच वर्षाचा कालापव्यय आणि रु.८.४१ कोटी खर्च करुनही दोन्ही मत्स्यबीज केंद्राचे काम पूर्ण होवू शकले नव्हते. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वर्ष २००८-०९ च्या अहवालातील मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्गत नियंत्रण यावरील लेखापरीक्षा परिच्छेदांवर चर्चेनंतर लोकलेखा

समितीने (PAC) तिच्या १७ व्या अहवालात (फेब्रुवारी २०१४) राज्यात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये मोठ्या संख्येत मत्स्यबीज केंद्रे स्थापने आवश्यक आहे अशी शिफारस केली होती. परंतु तरीही सध्याची मत्स्यबीज केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत नाहीत आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करुन व कालापव्यय होवूनही नवीन प्रकल्प सुरू होवू शकले नाहीत ही वस्तुस्थिती कायम आहे.

शिफारस :

३.२४ राज्यात वार्षिक पातळीवर मत्स्यबीजांची असलेली मागणी व मत्स्य बीज केंद्रांची उत्पादन क्षमता याचा कोणताही ताळमेळ नसून यात मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आल्यामुळे व संस्थांना विभागाकडून पुरेशा प्रमाणात मत्स्यबीज उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे संस्थांनी खुल्या बाजारातून ही मत्स्यबीज खरेदी केली. परिणामी या मत्स्यबीज केंद्रांचा देखील व्यावसायिक तोटा झाला. विभागाकडून मत्स्यबीज उत्पादनात वाढ करण्यासाठीचे सद्यःस्थितीतील प्रयत्न तोकडे व अपुर्ण असल्याचे स्पष्ट होते. केंद्रांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, मत्स्यबीजांच्या संवर्धनासाठी/वाढीसाठी पोषक वातावरण नसणे, फलनासाठी गोडेपाणी उपलब्ध नसणे, पाणी साठवण्यासाठी तलावांची व्यवस्था नसणे/देखभाल न करणे, मनुष्यबळाची व निधीची कमतरता असणे, अपुरा पाऊस वा दुष्काळ, मोडकळीस आलेली उबवणी केंद्रे, अपर्याप्त वीण साठा या सर्व बाबी क्षमतेचा पुरेपूर वापर न होण्यासाठी कारणीभूत व जबाबदार असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. यातून विभागाने निश्चित तोडगा काढून उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने विभागाने आवश्यक ते पुर्ण प्रयत्न करावे. राज्यात मत्स्यव्यवसायांचे व्यवस्थापन व शाश्वत विकास साधण्यासाठी मत्स्यबीज धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करावी व मत्स्यबीज केंद्राच्या पायाभूत सुविधामध्ये सुधारणा/ बळकटीकरण करुन तसेच त्याला पर्याप्त मनुष्यबळाची जोड देवुन मत्स्यबीज उत्पादनांतील कमतरतांवर तोडगा काढावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.९ 'केंद्र व राज्य योजनांची अंमलबजावणी'

परिच्छेद क्र. २.२.९.१ 'जलसाठ्यातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंशतः अंमलबजावणी'

अभिप्राय :

३.२५ विभागाकडून सन २०११-१२ व २०१४-१५ दरम्यान जलसाठ्यातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रम राबविला गेला नव्हता. ज्याची कोणतीही कारणे दस्तऐवजात उपलब्ध नव्हती/नोंदली नव्हती. उर्वरीत तीन वर्षात (२०१०-११, २०१२-१३ आणि २०१३-१४) ९४ जलसाठयांमध्ये मत्स्य बोटुकलीचा साठा करण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाने मान्यता दिली आणि विभागाला रु. ३.८६ कोटीचा निधी मुक्त केला. मत्स्य बोटुकलीच्या उत्पादनासाठी आवश्यक बीजे उपलब्ध नसणे, न्यायालयीन प्रकरण, जलसाठे वनक्षेत्रात तसेच MIDC क्षेत्रात असणे, जलसाठयात पाण्याचा तुटवडा, विद्यमान जलसाठयांचा भाडेपट्टा कालावधी पूर्ण न झाल्याने या कार्यक्रमासाठी त्यांचा वापर केला न जाणे (१० प्रकरणे) या कारणांमुळे ९४ जलसाठयांपैकी २८जलसाठया मध्ये (३०टक्के) मत्स्यबोटुकलीचा साठा करता येऊ शकला नव्हता. त्याचप्रमाणे उर्वरीत १० जलसाठयांमध्ये कार्यक्रम न राबविण्याची कारणे दस्तऐवजांवरुन पडताळता येऊ शकत नव्हती. परिणामी विभागाने राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळाला रु. ९२.१४ लक्ष प्रत्यार्पित केले. ज्या ६६ जलसाठयांमध्ये कार्यक्रम राबविला गेला तेथील संबंधित कार्यान्वयन संस्थांनी आयुक्तांना कार्यक्रम राबविण्यापूर्वी व राबविल्यानंतर झालेले उत्पादन दर्शविणारे त्रैमासिक प्रगती अहवाल सादर केले नव्हते किंवा आयुक्तांनी अशा अहवालांची मागणीही केली नव्हती. अशाप्रकारे, कार्यक्रमाच्या यश अथवा अपयशांचे मुल्यमापन करता येऊ शकले नाही.

३.२६ मत्स्यबीज कमतरता, तलावातील कमी पाणी साठा, अनियमित पर्जन्यमान, अवर्षण व अतिवृष्टी इ.कारणामुळे सदर योजना अपेक्षेप्रमाणे राबविता आली नाही हे विभागाने समितीसमोर मान्य केले. जलसाठ्यातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंशतः अंमलबजावणी करण्यात आली. पण जलाशय विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून काहीच काम झालेले नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता सदरची योजना महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळकडूनही राबविली जाते. त्यामुळे लाभार्थी दोन विभागांकडून सदर योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आल्याने व यामध्ये पारदर्शकता येण्याच्यादृष्टीने तसेच काही लाभार्थी त्यांच्याकडील एक किंवा दोन वर्ष शिल्लक असतांना सदरच्या योजनेचा लाभ घेवून पुढील तलावठेका मुदतवाढीचा लाभही घेतात. त्यामुळे त्यांच्या तलावाचा ठेका मुदत संपल्या नंतरही सदर योजना राबविल्यामुळे ठेक्यास मुदतवाढ द्यावी लागते. या सर्व कारणास्तव सदरची योजना सन २०१५-१६ पासून या विभागाकडून राबविण्यात आलेली नाही असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.२७ विभागाने जलसाठ्यातील मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी केली नाही. जलसाठ्यांमध्ये मत्स्यबोटूकलीचा साठा करण्यासाठी विभागाने मान्यता व निधी मुक्त केला. परंतु त्यासाठी आवश्यक बीज उपलब्ध नसणे, न्यायालयीन प्रकरण, जलसाठे वन क्षेत्रात तसेच एमआयडीसी क्षेत्रात असणे, जलसाठ्यात पाण्याचा तुटवडा, अनियमित पर्जन्यवृष्टी या कारणांमुळे जलसाठ्यात मत्स्यबोटूकलीचा साठा करता येऊ शकला नाही. परंतु विभागाने दिलेली सदरहू कारणमिमांसा स्विकारण्याजोगी नाही कारण योजना यशस्वी करण्यासाठी या सर्व बाबींची दुरदृष्टी ठेवून नियोजन करण्याची प्राथमिक जबाबदारी विभागाचीच असते ज्यात ते अपयशी ठरले. परिणामी यासाठी प्राप्त निधी देखील प्रत्यार्पित करावा लागला. विभागाला प्राप्त निधी प्रत्यार्पित करावा लागू नये यासंबंधी नियोजन करण्याची जबाबदारी ही विभागाच्या अधिका-यांचीच असते. लाभार्थी मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रम तसेच महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ या दोन्हीअंतर्गत लाभ घेत असून लाभार्थ्यांना दुहेरी लाभ होत असल्याचे लक्षात आल्यावर विभागाने ही योजना सद्यःस्थितीत राबविली नाही. वास्तविकतः लाभार्थी योजनांचे दुहेरी लाभ घेऊ शकतो ही योजनांमध्ये राहिलेली त्रुटी आहे. योजना तयार करताना ती परिपुर्णरित्या तयार करण्याची जबाबदारी विभागाच्याच अधिका-यांची असते. ज्याअर्थी लाभार्थी दुहेरी लाभ घेऊ शकतात याचा अर्थ योजनेतच त्रुटी राहिलेल्या आहेत. अशा परिस्थितीत योजना सुधारुन ती अधिक परिपुर्ण करणे अपेक्षित असताना विभागाने त्याची अंमलबजावणीच थांबविणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. अतः विभागाने जिल्हानिहाय आढावा घेऊन निधी समर्पित संदर्भात संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कारवाई करावी तसेच भविष्यात विभागाने मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्यासाठी योग्य ते नियोजन करावे व प्रसंगी योजना परिपुर्ण होण्यासाठी त्यात आवश्यकता असल्यास सुधारणा करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.२ 'बंदिस्त जलाशयात मत्स्यशेती करण्यासाठीच्या राज्य योजनेचे निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यातील तूट'

अभिप्राय :

३.२८ नव्याने बांधलेल्या तलाव/जलसाठ्यांमध्ये जलद गतीने मत्स्य बीजांचा साठा करुन राज्यातील एकंदर भूजलाशयीन मत्स्योत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने पाच वर्षासाठी बंदिस्त जलाशयातील मत्स्यशेती ही योजना आखली. विभागाकडून चालविल्या जाणा-या मत्स्यबीज केंद्रातून मत्स्यबीजे प्राप्त करावयाची होती. त्याअनुषंगाने पाच वर्षापैकी पहिल्या दोन वर्षी मत्स्य बीजांचा संपूर्ण साठा करण्याची जबाबदारी विभागाची होती आणि त्यानंतरच्या वर्षात साठा ७०, ५० व २५ टक्क्यापर्यंत कमी करावयाचा होता. उर्वरीत साठा (२५, ५० व ७५ टक्के) मत्स्य सहकरी संस्थेने करावयाचा होता ज्यांना तलाव/जलाशय भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. मत्स्यव्यवसाय संस्थेचा सहभाग टप्प्याटप्प्याने वाढविणे ही यामागील संकल्पना/उद्देश होता.

३.२९ २०११-१६ दरम्यान १०० तलाव/जलाशयात साठा करावयाच्या निर्धारीत २०६.०२ लक्ष मत्स्य बीजांच्या लक्ष्याच्या तुलनेत प्रत्यक्ष साठा १४६.७६ लक्ष होता, म्हणजेच यात २९ टक्के तूट होती. योजनेच्या पहिल्या वर्षात ५६ पैकी आठ तलावांमध्ये विभागाने मत्स्यबीजांचा कोणताही साठा केला नव्हता. मत्स्यबीजांच्या साठ्याकरीता निर्धारीत केलेल्या लक्ष्याची पूर्तता व असल्यास तूट यांची स्थितीदर्शक माहिती उपलब्ध नसल्याने योजनेची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व प्रभावीपणे झाली असल्याची खात्री करता आली नाही व दरम्यान विभागाने योजनेवर रु.१.५७ कोटी खर्च केला.

३.३० यासंदर्भात विभागाकडून सांगण्यात आले की, सदरच्या योजनेअंतर्गत साठवणूक करावयाचे मत्स्यबीज हे शासकीय मत्स्यबीजकेंद्रातून शासकीय दराने खरेदी करून केले जाते. नाशिक व अमरावती विभागात एकूण ७ मत्स्यबीज केंद्रे असून ५ संवर्धन केंद्रे आहेत. या केंद्रामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, पाणीपुरवठयाच्या सोयी व सुविधांचा अभाव, निधीचा अभाव, मनुष्यबळाची कमतरता इ. बाबींमुळे मत्स्यबीज केंद्रांचा पुरेपूर वापर करून क्षमतेप्रमाणे मत्स्यबीज उत्पादन करणे शक्य झाले नाही. तसेच या कालावधीमध्ये नाशिक व अमरावती विभागात कमी पर्जन्यवृष्टी झाल्याने त्याचाही प्रतिकूल परिणाम मत्स्यबीज निर्मितीवर झाला आहे. शासकीय मत्स्यबीज केंद्रामध्ये कर्मचा-यांची कमतरता, अपुरा पाऊस, मोडकळीस आलेली उबवणी केंद्रे व योग्य संख्येचे मत्स्यप्रजनक उपलब्ध न झाल्याने पुरेशा प्रमाणात मत्स्यबीज उत्पादन झाले नाही. त्यामुळे सदरहु योजनेमध्ये २९% तूट दिसून येत आहे. राज्यातील मत्स्यबीज केंद्रांची दुरुस्ती व बळकटीकरण व मत्स्यप्रजनकसाठा केंद्र स्थापन करणेचा कार्यक्रम विभागाने हाती घेतला असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. विभागाकडून बंदिस्त जलाशयातील मत्स्यशेती या योजनेअंतर्गत नाशिक व अमरावती मधील केंद्राची आकडेवारी प्राप्त झाली. मात्र इतर केंद्रांची आकडेवारी प्राप्त

झालेली नाही. निवासी उपजिल्हाधिकारी औरंगाबाद, लातूर, नागपूर यांच्याकडून मत्स्यबीजाच्या संबंधी माहिती उपलब्ध नसल्यामुळे ४ योजनांची काय परिस्थिती आहे याची खात्री करता आली नाही, असा आक्षेप महालेखाकारांनी काढला आहे. याअनुषंगाने विभागाकडे दस्तऐवज (रेकॉर्ड) उपलब्ध नसण्याची कारणे काय याबाबत समितीने विचारणा केली असता यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध होते मात्र त्यांनी ते दाखवले नाही. परंतु विभागाचे हे म्हणणे निश्चितच समर्थनीय नाही. विभागाकडून चालविल्या जाणा-या मत्स्यबीज केंद्रातील अपर्याप्त मत्स्यबीज उत्पादन या तुटीसाठी कारणीभूत आहेच परंतु विभागांतर्गत नियोजनाचा, दुरदृष्टीचा व समन्वयाचा अभाव देखील यात दिसून येतो असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :

३.३१ सदरहू परिच्छेदांतर्गत बंदिस्त जलाशयात मत्स्यशेती करण्यासाठीच्या राज्य योजनेचे निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात तूट दिसून येते. यासाठी विभागाला पायाभूत सुविधांचा अभाव, पाणी पुरवठ्याच्या सोयी सुविधांचा अभाव, निधीचा अभाव, मनुष्यबळाची कमतरता, कमी पर्जन्यवृष्टी या बाबींमुळे मत्स्यबीज केंद्राचा पुरेपूर वापर करुन क्षमतेप्रमाणे मत्स्यबीज उत्पादन करणे शक्य झाले नाही. हा विभागाचा बचाव निश्चितच पुर्णपणे समर्थनीय नाही. उद्दिष्ट व साध्य यातील तूट पाहता विभागाने दिलेले उत्तर समर्थनीय व स्विकारता येण्याजोगे नाही. हा विभागांतर्गत करावयाच्या नियोजनाचाच भाग आहे. अतः विभागाने जिल्हानिहाय आढावा घेऊन उद्दिष्टाप्रमाणे कामगिरी पार पाडण्यासाठी योग्य ते नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करावी तसेच बंदिस्त जलाशयात मत्स्यशेती करण्यासाठीच्या राज्य योजनेचे निर्धारीत लक्ष्य साध्य करण्यातील तूट दर्शविणारी सर्व वस्तुस्थितीदर्शक माहिती महालेखाकारांकडे सादर करुन मान्य करुन घ्यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. असे लेखे उपलब्ध करुन न देणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. विभागाने लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देणे बंधनकारकच आहे. तरीही जर ते विभागाने उपलब्ध करुन न दिल्यास विभागाने करावयाच्या कारवाईचे स्वरुप निश्चित करण्यात यावे व यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सुचनांचे परिपत्रक निर्गमित करुन त्याची अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.३ 'मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी केंद्रीय अर्थसहाय्याचा वापर न करणे'

अभिप्राय :

३.३२ विभागाच्या नियंत्रणाखालील १५ मत्स्यबीज केंद्रामध्ये' मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण' या केंद्रीय योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) (एक १०० टक्के केंद्रपुरस्कृत योजना) अंतर्गत रु. ८.०६ कोटी मंजूर केले. केंद्र शासनाने यातील पाच केंद्रासाठी मुक्त केलेल्या रु. ३.५५ कोटी निधीचा वापर करुन विभागाने या पाच मत्स्यबीज केंद्राचे बळकटीकरण/आधुनिकीकरण पूर्ण केले. परंतु योजनेची तपशीलवार अंदाजपत्रके सादर न केल्यामुळे उर्वरीत १० केंद्राच्या बळकटीकरण/आधुनिकीकरणाचे काम या योजनेखाली हाती घेण्यात आले नाही.

३.३३ आधुनिकीकरणानंतर पाचपैकी तीन मत्स्यबीज केंद्रातील प्रत्यक्ष वार्षिक उत्पादन १२ ते १११टक्के इतक्या लक्षणीय प्रमाणात वाढले ही वस्तुस्थिती विचारात घेता विभागाने RKVY अंतर्गत मंजूरी मिळालेल्या १० मत्स्य केंद्रातील उत्पादन वाढविण्याची संधी स्पष्टपणे गमावली.

३.३४ राष्ट्रीय कृषि विकास योजना(RKVY) ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या कामांना मंजूरी देण्याचे अंतिम अधिकार हे SLSC (State level sanctioning committee)यांचेकडे आहेत. सदरच्या समितीचे अध्यक्ष हे मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य हे असतात. विभागाने एकूण १५ मत्स्यबीज केंद्राच्या सुधारणा व बळकटीकरण या योजनेस दि. २८/१०/२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ५ केंद्रांसाठी प्राप्त झालेल्या रु. ३.५५ कोटी निधीचा वापर करून केंद्राचे बळकटीकरण व आधुनिकीकरणाचे काम पूर्ण केले. उर्वरीत १० मत्स्यबीज केंद्रांची कामे पूर्ण करण्याकरीता त्यांची अंदाजपत्रके प्राप्त करून घेण्याकरीता आयुक्त स्तरावरुन संबंधित प्रादेशिक कार्यालयांना कळविण्यात आले होते. १५ मत्स्यबीज केंद्राच्या बळकटीकरण/आधुनिकीकरणाची सर्व कामे जरी आयुक्तांनी मंजूर केली होती तरी, जिल्हा कार्यालयाकडून योजनेची तपशीलवार अंदाजपत्रके प्राप्त करण्यासाठी आयुक्तांनी देखील कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

त्यानंतर राज्यातील मत्स्य उत्पादन केंद्र काही तांत्रिक अडचणी, अपुरा निधी व अप्रशिक्षित अपु-या कर्मचारी वृंदामुळे पूर्ण क्षमतेने या केंद्रातून मत्स्यबीज उत्पादन घेणे शक्य झाले नसल्याने सदरची केंद्रे ठेक्याने देण्याबाबतचा निर्णय शासनस्तरावरून घेण्यात आला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. परंतु सदर केंद्रे भाडेतत्वावर देऊन विभाग आपली जबाबदारी झटकू शकत नाही. तसेच ज्या अटींवर ते केंद्र भाडेतत्वावर दिलेले आहे. त्यानुसार त्यांनी ते विकसीत केले आहे की नाही याची देखील तपासणी करुन जर ते त्याप्रमाणे विकसीत झाले नसेल तर ते परत घेऊन RKVYमध्ये समाविष्ट करावे असेही समितीने सूचित केले.

शिफारस :

३.३५ मत्स्यबीज केंद्राचे बांधकाम, बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यासाठी केंद्रीय अर्थसहाय्याचा वापर न करणे ही गंभीर बाब आहे. केंद्राकडून प्राप्त झालेल्या संपूर्ण निधीचे योग्य नियोजन करुन खर्च करण्याची जबाबदारी विभागाची होती मात्र विभागाच्या नियोजनातील ढिसाळपणामुळे मंजूर१५ मत्स्यबीज केंद्रापैकी फक्त ५ केंद्राचे काम पूर्ण होऊ शकले आणि त्या ५ केंद्राच्या बळकटीकरणामुळे त्याचे चांगले परिणाम पण दिसून आले व उर्वरित केंद्रे ठेक्याने देण्याबाबतचा निर्णय घेऊन विभागाने आपली जबाबदारी झटकली व ही बाब योग्य नाही. तसेच जिल्हा कार्यालयांकडून योजनेची तपशीलवार अंदाजपत्रके प्राप्त करण्यासाठी आयुक्तांनी देखील कोणतेही प्रयत्न केले नाही. ही देखील बाब योग्य नाही. अतः यास जबाबदार अधिका-यांवर योग्य ती कारवाई करुन केलेली कार्यवाही समितीला ३ महिन्यात कळवावी. त्याचप्रमाणे तपशिलवार अंदाजपत्रके विहीत वेळेत सादर न करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. विभागाने आता भाडेतत्वावर दिलेल्या केंद्राचा आढावा घ्यावा व त्यात विहित अटी शर्तींचे पालन करुन केंद्रे विकसीत होत आहेत काय याची तपासणी करावी अन्यथा ही केंद्रे RKVY अंतर्गत घेऊन कार्यरत करावी व यांसदर्भात केलेली कार्यवाही समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.४ 'कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणात विलंब'

अभिप्राय :

३.३६ ३३ मत्स्य बीज केंद्राव्यतिरिक्त विभागाच्या नियंत्रणाखाली ठाणे जिल्हयात आसनगांव व बडापोखरण येथे २ कोळंबी संवर्धन केंद्रे आणि रत्नागिरी येथे निमखा-या पाण्यातील एक कोळंबी बीज केंद्र आहे. तलावातील क्षारांचे प्रमाण आवश्यक मात्रेपेक्षा अधिक असल्याने दिर्घकाळापासून दोन कोळंबी संवर्धन केंद्रे कार्यरत नव्हती. म्हणूनच विभागाने ही दोन केंद्रे खाजगी संस्थाना भाडेपटटयावर देण्यासाठी जाहिर केलेल्या निविदा सूचनेला कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता. रत्नागिरी येथील निमखारे पाण्यातील कोळंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणासाठी आणि सुधारणेसाठी केंद्रशासनाने RKVY अंतर्गतरु. १.६६कोटी मुक्त केले (जून२०११) सार्वजनिक बांधकाम विभागाने जुलै २०११ ते मार्च २०१२ दरम्यान ३७ घटकांचा समावेश असलेली सुधारणात्मक कामे पूर्ण करायची होती. परंतु विभागाने ३७ पैकी २५ घटकांचे काम पूर्ण केले होते परंतू तलावातील गाळ पूर्णपणे काढलेला नसणे, फिडींग कॅनलच्या (Feeding Canal) पृष्ठभागाची दुरुस्तीन होणे, तलावात आवश्यक उंचीपर्यंत पाणी साठवण्यातील असमर्थता, सांडवा/पाचराचे (sluice gates)सिमेंट कॉंक्रीटिकरण केलेले नसणे इत्यादी वेगवेगळया दोष/कमतरतांमुळे हे अर्धवट पूर्ण झालेले केंद्र ताब्यात घेण्यास कार्यान्वयन संस्था,रत्नागिरी यांनी नकार दिला. फेब्रु २०१३ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाने रु. १.५० कोटी खर्च केला आणि विभागाने ज्या कंत्राटदारास हे काम सोपविले होत त्याने नियमबाहयतेने काम केल्याच्या आरोपासाठी त्याच्या विरुध्द मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे सप्टेंबर २०१३ नंतर काम थांबवण्यात आले व नोव्हें. २०१६ पर्यंत देखील ते काम अपूर्णहोते. अशाप्रकारे रु. १.५० कोटीचा खर्च होऊनही आणि चार वर्षापेक्षा अधिक काळ लोटूनही रत्नागिरी येथील कोळंबी बीजकेंद्राच्या बळकटीकरणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नव्हते.

३.३७ निमखारे पाण्यातील आसनगाव कोळंबी बीज केंद्र जि. पालघर व बाडापोखरण कोळंबी बीज उत्पादन केंद्र जि. पालघर दि. १८/१/२०१४ च्या शासननिर्णयान्वये १५ वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यास विभागाने मान्यता दिली आहे. त्यानुसार माहे फेब्रु. २०१७ मध्ये आसनगाव व वाडापोखरण कोळंबी बीज संवर्धन केंद्र खाजगी ठेकेदारास १५ वर्षाकरीता ई-निविदा पध्दतीने ठेक्याने देण्यात आले आहे. तसेच रत्नागिरी येथील केंद्र आता कार्यान्वय संस्था, रत्नागिरी यांनी ताब्यात घेतले असून केंद्राची संपूर्ण दुरुस्ती केलेली आहे व कोळंबी ऐवजी खेकड्याचे उत्पादन घेतले जात आहे. तसेच तेथील कंत्राटदाराच्या विरोधात काम योग्य झालेले नाही असे कारण सांगून उच्च न्यायालयात स्थानिकांनी रिट पिटीशन दाखल केले. पण यास उच्च न्यायालयाने स्टे दिला नव्हता. ३७ पैकी २५ कामे पूर्ण झाली असून ती हस्तांतरीत देखील झालेली आहेत व सद्यःस्थितीत प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारस :

३.३८ महालेखाकारांनी कोलंबी बीज केंद्राच्या बळकटीकरणात विलंब झाला असे आक्षेप नोंदविले तसेच आसनगाव व बाडापोखरण येथील तलावातील क्षारांचे प्रमाण आवश्यक मात्रेपेक्षा अधिक असल्याने ठाणे येथे दीर्घकाळापासून कोलंबी संवर्धन केंद्रे कार्यरत नव्हती. त्यामुळे ती भाडेपट्टयावर देण्यात आली नव्हती. तसेच रत्नागिरीमध्ये देखील विविध दोष व कमतरतांमुळे हे अर्धवट पुर्ण झालेले केंद्र ताब्यात घेण्यात आले नाही. तसेच हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्या कंत्राटदाराकडे सोपविले ते नियमबाह्यरित्या झाल्याच्या आक्षेपावरुन हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. या संपुर्ण प्रकरणी विभागाने कामाचे कोणतेही नियोजन न केल्यामुळे दिलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विभाग अपयशी ठरला. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. याबाबत चौकशी करुन जबाबदार अधिका-यांवर योग्य ती कारवाई करुन केलेली कार्यवाही समितीस ३ महिन्यात कळवावी तसेच ठाणे येथील कोलंबी संवर्धन केंद्रे शक्य असल्यास अधिक सक्षमतेने सुरु करण्यात यावी व क्षारयुक्त पाण्यामुळे ती सुरु करता येऊ शकत नसल्यास ती रद्द करण्यात यावी तसेच रत्नागिरी येथे सुरु करण्यात आलेले खेकडा संवर्धन केंद्र देखील अधिक सक्षमतेने चालू ठेवण्यात यावे व विभागाने अधिक नियोजनबध्दरित्या भविष्यात कामे करावीत अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.९.५ 'मच्छिमार नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी वित्तीय सहाय्याचे अपर्याप्त वितरण'

अभिप्राय :

३.३९ 'मासेमारी होडयांचे यांत्रिकीकरण' या योजनेखाली मासेमारीस दुर्बल गटातील कार्यक्रम असल्याचे गृहीत धरुन NCDC कडून मत्स्य सहकारी संस्थेला शिथिल अटींवर अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेखालील अर्थसहाय्य राज्य शासन, NCDC आणि लाभार्थी यांना १०:८०:१० या प्रमाणात विभागून द्यावयाचे होते. योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे आधी राज्य शासनाने निधी मुक्त करावयाचा होता. योजनेच्या अर्थसहाय्याच्या आकृतीबंधानुसार प्रारंभी लाभार्थ्यांना नौकांची बांधणी करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के रक्कम मुक्त करायची होती, त्यानंतर नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी इंजिन,यारी (winch), जीवरक्षक साधन इत्यादींच्या खरेदीसाठी ५५ टक्के मुक्त करायचे होते. विभागाने ४२२ मच्छीमारनौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी (एकूण प्रकल्प खर्चः १० टक्के लाभार्थी अंशदानासह रु.२३०.७५ कोटी) रु.२०७.९१ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले आणि रु.६५.५२ कोटी वितरीत केले.लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या रु. ८०.८२ कोटी (रु.२३०.७५ कोटीच्या ३५ टक्के) अर्थसहाय्यापैकी विभागाने फक्त रु.३९.८८ कोटी वितरीत केले आणि उर्वरीत रु.४०.९४ कोटीचे वितरण केले गेले नव्हते. (सप्टेंबर, २०१६). तसेच, एकूण रु.१२७.०९ कोटी अर्थसहाय्यापैकी (रु.२३०.७५ कोटीच्या ५५ टक्के) विभागाने फक्त रु.२५.६४ कोटी वितरीत केले, अशाप्रकारे रु.१०१.४५ कोटी शिल्लक राहिले जे वितरीत करण्यात आले नव्हते. तसेच विभागाने २०११-१४ दरम्यान ४२२ पैकी २७८ नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी प्रकल्प खर्चाच्या (रु.१४७.९४कोटी) ३५ टक्के एवढे म्हणजे रु. ५१.७७ कोटी अर्थसहाय्य मंजूर केले. परंतु रु.५१.७७ कोटींपैकी सप्टेंबर, २०१६ पर्यंत विभागाने एक ते चार वर्षांपर्यंतच्या विलंबाने लाभार्थ्यांना रु.३७.६० कोटी (७३ टक्के) मुक्त केले.नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरीत न करणे/ विलंबाने वितरीत करणे याचा परिणाम फक्त दुर्बल गटातील मच्छीमारांवरच नाही तर सागरी मत्स्य उत्पादनावर देखील झाला जे २०११-१६ दरम्यान ४.४९ लक्ष टनाचा पल्ला ओलांडू शकले नव्हते.सन २०११-१६ दरम्यान रु.१६३.७१ कोटी (२५ टक्के रक्कम रु.५१.८०कोटी + ५५ टक्के रु.१११.९१ कोटी)इतके एकूण अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले व रु.१६३.७१ कोटी इतका निधी प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला आहे. सदर रक्कमेमध्ये स्थानिक जिल्हा नियोजन मंडळामार्फत वितरीत होणारी १० टक्के रक्कम रु.२२.४३ कोटी समाविष्ट नाही. सदरची रक्कम समाविष्ट केल्यास सन २०११-१६ चे एकूण वितरण रु.१८६.१४कोटी इतकी होईल. सबब या प्रकल्पावरील ३५ टक्के रक्कम रु.७४.२३ कोटी इतकी होते.शासन स्तरावरुन प्रकल्प खर्चाच्या आवश्यकतेनुसार प्राप्त एकूण रु.१६३.७१ कोटी इतक्या रक्कमेचे वितरण विभागाच्या स्तरावरुन करण्यात आले असून सदर रक्कमेमध्ये स्थानिक जिल्हा नियोजन मंडळामार्फत वितरीत होणारी १० टक्के रक्कम रु.२२.४३कोटी समाविष्ट नाही.निधीच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेणे क्रमप्राप्त असल्याने सदर प्रकल्पांची पूर्ण रक्कम एकाच हप्त्यात वितरीत करणे विभागास शक्य झालेले नाही.गेल्या ५ वर्षांचे सरासरी मत्स्योत्पादन पहाता सरासरी मत्स्योत्पादनात मोठया प्रमाणात तफावत असल्याचे आढळून येत नाही.वित्त विभागाकडून राज्याची आर्थिक स्थिती विचारांत घेऊन मत्स्यव्यवसाय विभागाच्या नियत व्ययात कपात केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. प्रत्यक्ष अर्थसंकल्पीत तरतूद रक्कम रु.१९४.२८ कोटीच्या ऐवजी विभागास प्रत्यक्ष बीडीएस संगणक प्रणालीवर रु.१६३.७१ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली. उपलब्ध बीडीएस प्रमाणे पूर्ण निधी खर्च झाला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

यासंदर्भात समितीने विचारणा केली की, यामध्ये शासनाच्या हिश्श्याचे पैसे मागणीप्रमाणे मिळत नाहीत. डीपीडीसीचे १० टक्के मिळतात. NCDC कडून कर्ज मिळते परंतु शासनाला त्याकरिता हमी द्यावी लागते. एकूण अर्धवट कामे झालेल्या एकूण ६६ संस्था आहेत व ४०७ गट असून त्यात जवळपास रु.११८ कोटी देणे आहे. अशा परिस्थितीत नवीन प्रकल्प न घेता अपुर्ण प्रकल्प प्राधान्याने पुर्ण करण्यासाठी विभागाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे समितीने सूचीत केले.

शिफारसः

३.४० सदरहु परिच्छेदांतर्गत मच्छिमार नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी वित्तीय सहाय्याचे अपर्याप्त वितरण असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले असून यासाठी विभागांतर्गत नियोजनाचा अभावच कारणीभूत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. या योजनेंतर्गत निधीचे नियोजन विभागाने प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. राज्य शासनाकडून मागणीप्रमाणे निधी प्राप्त होत नाही. यामुळे देखील या अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत विभागाने नवीन प्रकल्प हाती न घेता प्रथम अपूर्ण असलेल्या सर्व प्रकल्पांना निधी उपलब्धतेप्रमाणे पूर्ण करावे व या योजनांसाठी जास्तीत जास्त निधी प्राप्त करुन घेण्याचा पुर्ण प्रयत्न करण्यात यावा. तसेच भविष्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व कार्यक्षमतेने होत असल्याची शासनाने सुनिश्चती करावी. जेणेकरुन मत्स्य उत्पादनवाढ आणि मच्छिमारांचे आर्थिक सबलीकरणही दुहेरी उद्दिष्टे साध्य करता येतील. योजनेसाठी योग्यजागेची निवड केली जाईल आणि निधीचे वितरण वेळच्यावेळी केले जाईल यांची शासनाने सुनिश्चती करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१० 'सागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधांचा विकास'

परिच्छेद क्र. २.२.१०.१ 'मच्छिमार बंदरे विकसित न करणे'

अभिप्राय :

३.४१ सन २००२-०३ मध्ये लागू झालेल्या द्वसागरी मत्स्यव्यवसाय पायाभूत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे यासाठीच्या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाने एकुण रु. १६५.४७ कोटी खर्चात आनंदवाडी, सिंधुदुर्ग (फेब्रुवारी २००८), करंजा रायगड (मार्च २०११) आणि अर्नाळा ठाणे (मार्च २०११) येथे तीन मच्छिमार बंदरे बांधण्यास मंजुरी दिली. स्थानिक मच्छिमारांकडुन विरोध झाल्यामुळे एकुण १६०० मीटर लांबी पैकी ४२० मीटर बंधा-याचेकाम पुर्ण झाल्यावर जुन२००८पासुन आनंदवाडी प्रकल्पाचे काम बंद करण्यात आले. परंतु या प्रकल्पावर रु.५.१७ कोटीचा खर्च करण्यात आला आहे. तसेच करंजा येथे मार्च २०१३ पर्यंत रु. ९.५५ कोटी खर्च झाल्यावर बंदर प्रकल्पामुळे बोटींच्या पाडावाच्या सध्याच्या तळाला बाधा येण्याची शक्यता असल्याने बोटींच्या पाडावासाठी तळ स्थानक बांधण्याची मागणी करण्या-या स्थानिक मच्छीमांराकडुन होणा-या विरोध आणि प्रकल्प स्थळावर उत्खननादरम्यान कठीण खडक आढळून येणे या कारणामुळे करंजा प्रकल्पाचे (मंजूर खर्च : ६८.०२ कोटी) काम बंद करण्यात आले. परिणामी प्रकल्प खर्च रु. १५९.५३ कोटीपर्यंत वाढला. स्थानिक मच्छिमार व ग्रामपंचायतीने खुद्द बंदरांच्या बांधकामासच हरकत घेतल्याने अर्नाळा बंदर प्रकल्प (मंजुर खर्च : रु. ६१.५६ कोटी) नोव्हेंबर २०१६ पर्यंत सुरु होऊ शकला नव्हता. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेला निधी रु. ३.०० कोटी परत करण्यात आला (नोव्हेंबर २०१६). स्थानिक मच्छिमार जे या योजनेचे मुख्य लाभार्थी होते त्यांच्याकडून विरोध झाल्यामुळे आनंदवाडी (जि.सिंधुदुर्ग), करंजा (जि.रायगड), अर्नाळा (जि.ठाणे) या तिनही मच्छिमार बंदर प्रकल्पाचे दिर्घकाळ बांधकाम लांबले ही वस्तुस्थिती योग्य नियोजन, सल्लामसलत व कार्यतंत्राचा अभाव असल्याचे निदर्शक आहे. परिणामी प्रकल्पाच्या कार्यान्वयनात वेळ व खर्च यांचा लक्षणीय अपव्यय झाला असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :

३.४२ सन २००२-०३ मध्ये लागू झालेल्या सागरी मत्स्यव्यवसाय पायाभुत सुविधा आणि प्रजनन पश्चात कामे यासाठीच्या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाने एकूण रु.१६५.४७ कोटी खर्चात आनंदवाडी, सिंधुदुर्ग (फेब्रुवारी २००८), करंजा रायगड (मार्च २०११) आणि अर्नाळा ठाणे (मार्च २०११) येथे तीन मच्छिमार बंदरे बांधण्यास मंजूरी दिली. पण ते अद्याप पूर्ण झाले नाही. अर्नाळा येथे स्थानिकांचा विरोध झालेला आहे. आनंदवाडी येथे अर्धवट केंद्र स्थलांतरीत केले, कारण तेथेही विरोध झालेला आहे. त्यामुळे तेथे नवीन बांधकाम करावयाचे आहे. करंजाला कठीण कडक लागला त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक काढावे लागले व याची निविदा प्रक्रिया करावी लागणार असेही समितीच्या निदर्शनास आले. वेगवेगळ्या कारणास्तव या तीन्ही मच्छिमार बंदर

प्रकल्पाचे दीर्घकाळ बांधकाम लांबले ही वस्तुस्थिती विभागामध्ये योग्य नियोजन सल्लामसलत व कार्यतंत्राचा अभाव असल्याचे निदर्शक आहे. ज्यामुळे या प्रकल्पाच्या कार्यान्वयनात वेळ व खर्च यांचा लक्षणीय अपव्यय झाला. तसेच कामामध्ये झालेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या अंदाजित खर्चातही वाढ झाली आहे. तसेच काही ठिकाणी प्रकल्प स्थलांतरीत केल्यामुळे झालेला खर्च देखील वाया जाण्याची शक्यता आहे. आनंदवाडी येथे ५०० मीटरचे रेक्लमेशन झाल्यानंतर लोकांचा विरोध झाला यावरुन प्रकल्प सुरु करण्याअगोदर स्थानिकांना विश्वासात घेतलेले नव्हते. एखाद्या प्रकल्पाची किंमत वाढली तर एकवेळ समिती समजू शकते. परंतु झालेला खर्च निष्फळ ठरणे अथवा वाया जाणे ही अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे. यात केंद्र व राज्य शासनाकडून वितरीत करण्यात येणा-या निधीचे विहित प्रमाण देखील राखले गेले पाहिजे व तो निधी वितरीत झाला पाहिजे. एकदा प्रकल्प सुरु झाला की निधीच्या कमतरतेमुळे तो अडकून पडू नये याची काळजी विभागाने घ्यावी. करंजा येथे कठीण खडक लागलेला आहे. याचाच अर्थ जागेची निवड करताना केलेली तपासणी ही परिपुर्ण व वस्तुस्थितीवर आधारीत नव्हती हे सिध्द होते व केलेल्या सर्वेक्षणात उणिवा व त्रुटी होत्या हे दिसून येते. परिणामी मुळ किंमत रु.५७ कोटी असलेला प्रकल्प आता रु.१५३ कोटींवर गेला. करंजा येथील जमीनीची तपासणी ही केंद्र शासनाच्या एजन्सीने केली असली तरी यात राज्याची निश्चितच जबाबदारी आहे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा समन्वय व ताळमेळ निश्चितच असण्याची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीत अर्नाळा प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. आनंदवाडी व करंजाबाबत शासनाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी व भविष्यात प्रकल्प राबविताना अधिक योग्य नियोजन करावे व मत्स्यव्यवसाय संवर्धनासाठी मत्स्य बंदरे नियोजनबध्द पध्दतीने विकसीत करावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.२ 'जेट्टीच्या बांधकामातील विलंब'

अभिप्राय :

३.४३ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत १९जेट्टींचे बांधकाम करण्यासाठी विभागाने मंजूरी दिली. केंद्र शासनाने यासाठी रु. ५७.४२ कोटी मुक्त केले आणि एकुण रु. ५७.३६ कोटी खर्चासाठीचे कार्यादेश दिले गेले व त्यानुसार मे, २०१४ पर्यंत जेट्टींचे काम पुर्ण करावयाचे होते.

३.४४ परंतु रु. ४२.५१ कोटी खर्चात १९ जेट्टींपैकी फक्त १० जेट्टींचे काम पुर्ण झाले होते. सात जेट्टींचे बांधकाम प्रगती पथावर होते व जुलै २०१६ पर्यंत रु. १४.०४ कोटी खर्च झाला होता आणि उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रु. १०.०२ कोटी इतक्या अतिरिक्त रक्कमेची आवश्यकता होती. त्यातच राज्य वन विभाग आणि मिठ आयुक्तयांच्या कडुन मंजूरी प्राप्त न झाल्यामुळे विभागाने उर्वरित दोन जेट्टींना दिलेली मंजूरी रद्द केली.

३.४५ राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २०११-१२ मध्ये एकुण रुपये ६९.९९ कोटीच्या १९ कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरच्या कामापैकी १० कामे पुर्ण झालेली असुन उर्वरित ७ कामे भौतिकदृष्ट्या पुर्ण झालेली आहेत. उर्वरित २ कामे रद्द करण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आलेली आहे. सदरच्या कामांवर आजमितीस उपलब्ध करुन दिलेल्या रु. ६२.९५ कोटीच्या तरतूदीपैकी रु. ५७.७० कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. त्याचप्रमाणे विभागाने नाबार्ड (९५ टक्के) आणि राज्य शासन (५टक्के) यांच्या अर्थसहाय्याने एकुण रु. ११६.१५ कोटी खर्चात २० जेट्टीचे बांधकाम करण्यास मंजुरी दिली व रु. ६६.६७ कोटी खर्चात २० जेटींचे बांधकाम करण्यासाठी कार्यादेश जारी करण्यात आले. कार्यादेशानुसार नोव्हेबर,२०१४ पर्यंत जेटींचे काम पूर्ण करायचे होते. तसेच जी २ कामे रद्द केली, त्यावर काही खर्च झाला नाही ती सुरुवातीलाच रद्द झाली. अशाप्रकारे राष्ट्रीय कृषि विकास योजना व नाबार्डअंतर्गत प्रत्येकी दोन जेट्टींचे काम अनुक्रमे २९ महीने आणि २४ महिन्यांचा कालावधी उलटुनही अद्याप पुर्ण झाले नव्हते ही वस्तुस्थिती कायम राहते. तसेच, राज्य शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजना व नाबार्ड अंतर्गत बांधकाम पुर्ण झालेल्या व काम प्रगतीपथावर असलेल्या जेट्टींवर झालेल्या खर्चाची माहीती सादर न केल्यामुळे लेखापरिक्षकांना बांधकाम पुर्ण झालेल्या/प्रगतीपथावर असलेल्या जेट्टींवर झालेल्या वाढीव खर्चाची परिगणना करता आली नाही. हा संपुर्ण घटनाक्रम अतिशय गंभीर असून विभागाच्या अनियोजनबध्द कामाचे द्योतक तर आहे, परंतु शासकीय निधीचा अपव्यय देखील आहे.

शिफारस :

३.४६ जेट्टीच्या बांधकामात झालेल्या विलंबामुळे मोठ्या प्रमाणात अंदाजित खर्चात वाढ झालेली असून शासकीय निधीचा अपव्यय झाल्याबाबतचे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी या परिच्छेदात नमूद केले आहे. विभागाने कोणतेही काम सुरु करताना काही मूलभूत बाबींचे नियोजन करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. यात विभाग कमी पडत असल्यामुळे अशाप्रकारचे आक्षेप

महालेखाकारांकडून नोंदविण्यात येतात. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत व नाबार्ड अंतर्गत जेट्टीच्या बांधकामांसाठी मंजूरी व निधी दोन्ही प्राप्त असतानाही विभागाला ही कामे नियोजनबध्द पध्दतीने करता आली नाही व या बांधकामांमध्ये अमर्याद विलंब झालेला आहे. परिणामी मत्स्य व्यावसायिक त्यांना अपेक्षित असलेल्या लाभापासून वंचित राहिले. विभाग प्रकल्पाचे नियोजन, अंदाजित खर्च, प्रशासकीय मान्यता, निधी व प्रकल्प पुर्ण करण्याचा कालावधी या सर्व बाबी कागदावर निश्चित करतात. परंतु जास्तीत जास्त प्रकरणांमध्ये ही मर्यादा पाळली जात नाही व या विहित अटीनुसार प्रकल्पाची अंमलबजावणी होत नाही. परिणामी या कागदावरील नियोजनाला कोणताही अर्थ शिल्लक राहात नाही. प्रकल्प विहित खर्चात व कालबध्दरितीने राबविण्यासंदर्भात विभागाने गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. अतः विभागाने या प्रकरणी दोषी अधिका-यांवर कारवाई करावी. तसेच अपुर्ण जेट्टी कालबध्द पध्दतीने पुर्ण कराव्यात व पुर्ण झालेल्या जेट्टींचा वापर पुर्ण क्षमतेने करावा व मच्छीमारांना मत्स्योत्पादन, प्रक्रीया आणि मत्स्य साधनसंपत्तीचे जतन कार्यक्षमतेने आणि कायमस्वरुपी करणे शक्य व्हावे यासाठी शासनाने सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील सर्व पायाभूत विकास कामे वेळेवर पूर्ण होतील याची सुनिश्चीती करावी व यासंदर्भात कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.३ 'सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र न बांधणे'

अभिप्राय

३.४७ महाराष्ट्र शासनाने रायगड जिल्हयातील अलिबाग येथे रु. १.८५ कोटी खर्च करुन प्रदर्शन सभागृह आणि वस्तू संग्रहालययांचा समावेश असलेलेमत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र बांधण्यास मान्यता दिली. (जुलै,२०१०) घटत्या सागरी मत्स्य उत्पादनात कायमस्वरुपी वाढ करण्यासाठी या प्रकल्पातून मत्स्य उद्योगाला प्रशिक्षित व्यावसायिक तरुण मच्छीमार उपलब्ध होणे अपेक्षित होते. प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत रु. १.८५ कोटी मुक्त केले. परंतु केंद्र बांधण्यासाठी प्रस्तावित केलेल्या जागेचा ७/१२ चा उतारा उपलब्ध नसल्याने जानेवारी, २०१४ पर्यंत काम सुरु होऊ शकले नव्हते.

३.४८ त्यानंतर विभागाने रु. ४.७३ कोटीची सुधारित मंजूरी दिली आणि काम सुरु करण्यासाठी सप्टेंबर, २०१५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाला रुपये एक कोटी मुक्त केले. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा प्रक्रियेत विलंब केल्याने नोव्हेंबर, २०१६ पर्यंत काम सुरु केले नव्हते. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचा वापर करुन विभागाने प्रशिक्षण केंद्रासाठी (जे अद्याप सुरु व्हायचे होते) रु. १.०५ कोटी खर्चात एक प्रशिक्षण नौका खरेदी केली होती. अशाप्रकारे ६ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटूनही मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र प्रस्थापित होऊ शकले नव्हते. तसेच खरेदी केलेल्या नौकेकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग मंजूर नसल्यामुळे बाह्यस्त्रोत पध्दतीने कर्मचारी भरणेकरिता निविदा काढण्यात आल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले, ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रशिक्षण केंद्र बांधण्यासाठी जमीन उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम सुरु करता आले नाही. त्यानंतर ४ वर्षानंतर जागा उपलब्ध करुन देण्यात आली तोपर्यंत अंदाजित खर्चातही वाढ झाली व आता यासही मान्यता देण्यात आली असून बांधकामासाठी निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.४९ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदाअंतर्गत नोंदविलेला घटनाक्रम अतिशय गंभीर, आक्षेपार्ह व विभागाच्या एकूणच कार्यपध्दतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. जागेच्या मालकी हक्काची कोणतीही शहानिशा न करता सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रास मंजूरी देणे, निधी देखील प्राप्त होणे व वस्तुतः कामे सुरु करताना जागेचा मालकी हक्क आक्षेपित होणे, पर्यायी जागा ४ वर्षाच्या विलंबाने मिळणे, तोपर्यंत केंद्राच्या अंदाजित प्रकल्प खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होणे, त्या वाढीव खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे क्रमःप्राप्त ठरणे व त्यातही विलंब झाला. त्याही उपर कर्मचा-यांची कोणतीही सुविधा व तरतूद नसताना प्रशिक्षण नौका खरेदी करणे व बांधकाम व कर्मचारी या दोन्ही संदर्भातील बाबी आठ वर्षानंतरही निविदास्तरावर असणे यासर्व बाबी अतिशय गंभीर व विभागाचे अनियोजनबध्द कामकाज दर्शविणारे आहे. विभागाने प्रशिक्षण केंद्राचे नियोजन कालबध्द पध्दतीने केले नसल्यामुळे यास अमर्याद विलंब झालेला आहे. त्याचप्रमाणे बोटीची किंमत रु. १ कोटी असणेबाबतही समितीने आक्षेप नोंदविलेले असल्यामुळे या बोटीचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करुन घेण्यात येईल व समितीला सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित करण्यात आले तरीपण ह्या विषयी अजूनही अहवाल समितीस प्राप्त झाला नाही. अतः त्याची अंमलबजावणी करुन समितीस तात्काळ कळविण्यात यावे व यासंदर्भात झालेल्या विलंबाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. तसेच हे प्रशिक्षण केंद्र बांधकाम तातडीने पुर्ण करावे व नौकेसाठी लागणारा कर्मचारी तात्काळ आऊटसोर्स करावा व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१०.४ 'सुरिमी प्रक्रिया केंद्रासाठी निधी मुक्त न करणे'

अभिप्राय :

३.५० सुरिमी हे जास्त नफा देणा-या काही मोजक्या मौल्यवान सागरी उत्पादनापैकी एक उत्पादन आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सुरिमीची वाढती मागणी लक्षात घेता राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने (NCDC) रु.२५.३५ कोटी खर्चात रायगड जिल्हयातील उरण येथे दरवर्षी ५००० टन सुरिमीच्या उत्पादनासाठी सुरिमी प्रक्रिया केंद्र (SPU) प्रस्थापित करण्यास या SPU ची स्थापना, व्यवस्थापन आणि कार्यान्वयन ससून डॉक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादित (संस्था) यांनी करायची होती. या प्रकल्पावरील खर्च राज्य शासन, NCDC आणि संस्था यांच्यात १०:८०:१० असा विभागावयाचा होता. परंतु विभागाने केलेल्या रु.१०.२२ कोटी प्राथमिक संवितरणानंतर संस्थेला उर्वरित रु. १२.५९ कोटी रक्कम मुक्त केली नव्हती. संस्थेने जानेवारी २०१६पर्यंत सुरिमी प्रक्रिया वाहिनी चे प्रापण, प्रशितन आणि जल प्रक्रिया साधनसामग्री, स्थापत्ये/ बांधकाम आणि विद्युतीकरण इत्यादीवर रु. १३.०५ कोटी (ज्यामध्ये तिचा १० टक्के हिस्सा होता) खर्च केले होते आणि प्रयोगशाळा/ विद्युत उपकरण आणि इतर स्थिर मत्तांचे प्रापण अद्याप करायचे होते. संस्थेला निधी मुक्त करण्यात विलंब झाल्याने विभागाला मार्च २०१६ पर्यंतच्या प्राथमिक कालमर्यादेत काम पूर्ण करण्यात अपयश आले व सदरहू वस्तुस्थिती विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्विकारली. एकूण प्रकल्प किंमतीच्या ९४ टक्के इतकी रक्कम वितरीत करण्यात आली असून प्रकल्प सद्यस्थितीत कार्यान्वीत करण्यात येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प प्रगतीत असुन प्रकल्प अंदाजपत्रकाची उर्वरित रक्कम उपलब्ध करण्यात येऊन प्रकल्प आता १ महिन्याच्या अगोदर सुरु करण्यात आला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

३.५१ रायगड जिल्ह्यातील उरण येथे दरवर्षी ५ हजार टन सुरिमीच्या उत्पादनासाठी सुरिमी प्रक्रिया केंद्र प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित असताना त्याची किती उद्दिष्टपूर्ती झाली याबाबत समितीने विचारणा केली असता आता २४ मेट्रिक टन प्रति दिन उत्पादन होणार असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असता बोट जेव्हा समुद्रात जाते तेव्हा सदर बोट ८ दिवसांनी परत येते मग प्रति दिन २४ टन उत्पन्न याची निश्चिती कशाच्या आधारे करण्यात आली, याची समितीने विचारणा केली असता काही बोटी या सोसायटीच्या स्वतःच्या मालकीच्या देखील असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.५२ विभागाने सुरिमी प्रक्रिया केंद्रासाठी प्रशासकीय मान्यता दिली. परंतु त्या प्रमाणात निधी मुक्त न केल्यामुळे प्राथमिक कालमर्यादेत काम पुर्ण करण्यात अपयश आले. या सर्व बाबी गंभीर असून पर्याप्त नियोजनाचा अभाव दर्शविणारी आहे. आता एक महिना अगोदर हा प्रकल्प पुर्ण करण्यात आला असून त्याअनुषंगाने दरदिवशी २४ मेट्रीक टन उत्पादन अपेक्षित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या केंद्र निर्मितीच्या विलंबासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच या केंद्रात उत्पादीत झालेली सुरिमी, त्याची निर्यात, विक्री, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ व त्याअनुषंगाने करावयाचे करार व या प्रकल्पाची उद्दिष्टपुर्ती या सर्वच बाबींचा आढावा घेऊन मुल्यमापन करण्यात यावे व याची माहिती समितीस सादर करण्यात यावी. तसेच प्रकल्प पूर्ण कार्यान्वित होण्यासाठी विभागाने नियोजन करावे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्प सुरू होण्यापूर्वी व सुरू झाल्यानंतर सुरिमी उत्पादनामध्ये किती वाढ झाली याबाबत विभागाने आढावा घ्यावा व उत्पादनात योग्य प्रकारे वाढ होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही समितीला ३ महिन्यात कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२.१०.५ 'बर्फाचा कारखाना आणि शीतगृह प्रस्थापित न करणे'

अभिप्राय :

३.५३ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने (NCDC) जतन वाहतुक आणि पणन (PTM) योजनेखाली रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुका येथे बर्फाचा कारखाना (क्षमता १०० टन प्रति दिवस) आणि शीतगृह (क्षमता १०० टन) बांधण्यासाठी हरनेपाज फिशिंग आणि क्रेडीट सहकारी संस्था मर्यादित (संस्था) या संस्थेला रु. तीन कोटी अर्थसहाय्य मंजूर केले (डिसेंबर २०११). सदर प्रकल्प मार्च २०१३ पर्यंत पूर्ण करायचा होता.आयुक्तांनी, कामाच्या प्रगतीच्या अनुरुप संस्थेला निधी मुक्त करण्याच्या सूचनेसह सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त (ACF), रत्नागिरी यांना रु.१.१५ कोटी मुक्त केले व जानेवारी २०१४ मध्ये प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, कार्यस्थळावर जरी कामाची सुरुवात झाली नव्हती तरीही ACF नी तोपर्यंत संस्थेला रु.०.७५ कोटी मुक्त देखील केले होते. फेब्रुवारी २०१४ मध्ये संस्थेने निविदा उघडल्या आणि रु.३.९९ कोटीची निम्नतम बोली

स्वीकारली. प्रकल्पाच्या खर्चातील वाढ विचारात घेता संस्थेने ACF ला त्याच महिन्यात अतिरिक्त अर्थसहाय्य देण्याची किंवा रु. तीन कोटीच्या मंजूर अर्थसहाय्यात प्रकल्प उभारणे शक्य होण्यासाठी व्याप्ती ५० टक्क्यांनी कमी करण्याची विनंती केली. मार्च २०१४ मध्ये ACF नी ही बाब आयुक्तांकडे संदर्भित केली परंतु त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. तथापि, एप्रिल २०१४ मध्ये, ACF ने संस्थेला उर्वरित रु.०.४० कोटी रक्कम मुक्त केली. जमीन खरेदीसाठी संस्थेने खर्च केलेल्या (मार्च २०१३) रु.९.१६ लक्ष रक्कमेव्यतिरिक्त उर्वरीत रु.१.०५ कोटी रक्कम संस्थेने त्या जमिनीवर कोणतेही काम न करता स्वतःकडे ठेवून घेतली होती. अशाप्रकारे केवळ बर्फाचा कारखाना व शीतगृहाचे बांधकाम ४४ महिन्यांनी लांबले असे नाही तर संस्थेने मार्च २०१३ पासून स्वतः जवळ ठेवलेली रु. १.०५ कोटी रक्कम देखील विनावापर पडून राहिली.सदरचा प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी संस्थेच्या स्तरावरुन आवश्यक ते प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. संस्थेने निविदा प्रक्रिया अंतिम करताना संबंधित निविदा धारकांच्या सोबत चर्चाकरुन निविदेतील अंतिम रक्कम शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीत होईल यांची खबरदारी घेणे आवश्यक होते. तसेच निविदा प्रक्रियेतील अटी व शर्ती मध्ये सुध्दा प्रकल्पांच्या किंमतीच्या अनुषंगाने निविदा धारकांना खर्चाच्या रक्कमा नमूद कराव्यात अशी अट नमूद करणे आवश्यक होते. तथापी तशी कार्यवाही संस्थेकडून झाल्याचे दिसून येत नाही.तसेच संस्थेने मंजूर प्रकल्प रक्कमेपैकी काही रक्कम खर्च केली आहे. सबब सद्यस्थितीत राष्ट्रीय सहकार विकास निगम आणि शासनाने अंतिमता मंजूर केलेल्या प्रकल्पांच्या संरचनेमध्ये बदल करण्याचे अधिकार या विभागास नाहीत. यास्तव संबंधित संस्थेला वितरीत केलेली रक्कम रु.१.१५ कोटी वसुल करण्यात आली असून सदर रक्कमेवरील व्याजाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच कामाच्या प्रगतीनुसार तत्कालिन अधिका-यांनी रक्कम वितरीत करणे आवश्यक होते. अतः सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन निदर्शनास येणा-या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले असता यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित सदरहू आक्षेप महालेखापरिक्षकांनी सन २०१३ मध्ये नोंदविले असून निर्गमन परिषदेत अधिका-यांवर कारवाई करण्याचे विभागाने त्यावेळी मान्य करुनही समितीची सदरहू साक्ष लागेपर्यंत गत पाच वर्षात विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. वास्तविक समितीसमोर साक्षीसाठी येताना विभागीय प्रतिनिधींनी संबंधित अधिका-यांवर कारवाई करुनच समितीसमोर येणे अपेक्षित होते. परंतु विभागाने हे प्रकरण गांभीर्याने हाताळले नाही. समितीने या प्रकरणी सर्व जबाबदार अधिका-यांवर कारवाई करुन त्याबाबतची माहिती समितीस १ महिन्यात सादर करणेबाबत समितीने निदेशीत केले. परंतु अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे.

शिफारस :

३.५४ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने जतन, वाहतूक आणि पणन योजनेखाली रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे बर्फाचा कारखाना व शीतगृहे प्रस्थापित करणेसाठी रु.३ कोटीचे अर्थसहाय्य मंजूर केले व एकूण रु.१.१५ कोटी पैकी प्रथम जानेवारीला रु. ७५ लक्ष आणि एप्रिल २०१४ मध्ये रु. ४० लक्ष एवढा निधी मुक्त देखील केला. कामाच्या प्रगतीच्या अनुरुप संस्थेला निधी मुक्त करणे आवश्यक असताना कामाचा कोणताही आढावा न घेता संस्थेला निधी वितरीत करण्यात आला, ही गंभीर बाब असून कामाच्या प्रगतीनुसार तत्कालिन अधिका-यांनी निधी वितरीत करणे आवश्यक होते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. परंतु महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यानंतर समितीच्या साक्षीला येईपर्यंत विभागीय प्रतिनिधींनी कोणत्याही अधिका-यांवर कारवाई केली नाही व साक्षीदरम्यान सदर प्रकरणाची चौकशी करुन झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर १ महिन्यात जबाबदारी निश्चित करण्याचे आश्वासित केले. परंतु अद्यापही ही माहिती समितीला अप्राप्त आहे, ही देखील गंभीर बाब असून समितीचा निश्चितच अवमान करणारी आहे.एवढेच नव्हेतर संस्थेने काढलेली निविदा ही अधिक दराची प्राप्त झाली असता राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाला सुधारीत प्रस्ताव सादर करुन मंजूरी देखील घेण्यात आली नाही व सदरहू निधी स्वतःकडे ठेवून घेतला व कामही करण्यात आले नाही. आता विभागाने संस्थेला वितरीत केलेली रक्कम रु.१.१५ कोटी वसूल केली. परंतु व्याजाची रक्कम अद्यापही वसूल केली नाही. अतः या संपुर्ण प्रकरणी सर्व संबंधित अधिका-यांवर व समितीला आश्वासित माहिती वेळेत न देणा-या अधिका-यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच सदर संस्थेकडून व्याजाची रक्कम दंडासह वसूल करण्यात यावी. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून प्राप्त निधीचा विनियोग विहित प्रयोजनासाठी व विदित कालमर्यादेत करणे अभिप्रेत असताना या निधीचा विनियोग गुणवत्तेवर होत नाही व तो व्यपगत होतो, ही बाब देखील गंभीर असून केवळ निधी संस्थांना वितरीत करुन विभागाची जबाबदारी संपत नाही तर त्या निधीच्या विनियोगाचा नियमित आढावा विभागाने घेऊन त्यावर

संनियंत्रण ठेवणे आवश्यक असताना त्याकडे देखील विभागाने दुर्लक्ष केले ही बाब गंभीर असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच कोकणातील सात जिल्हयांमध्ये NCDC ने किती बर्फकारखाने आतापर्यंत मंजूर केले आहे ? त्यात किती सुरु आहेत, त्यांना किती कर्ज वाटप झाले, किती जणांनी कर्जाची परतफेड सुरळीत केली आहे. यामध्ये थकबाकी किती आहे? ही सर्व माहिती देखील समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.११ 'नियामक तरतूदींची अंमलबजावणी न करणे'

परिच्छेद क्र. २.२.११.१ 'बंदरातील मच्छिमार नौकांची कमाल संख्या निश्चित न करणे'

अभिप्राय :

३.५५ विभागाच्या कार्यक्षेत्रातील ससुनडॉक व न्यु फिश जेटी (मुंबई शहरातील) आणि मिरकरवाडा बंदर (रत्नागिरी जिल्हयातील) यातीन बंदरापैकी फक्त न्यु फिश जेटी (मुंबई शहरातील) या एका बंदरात नोंदणी करावयाच्या विशिष्ट प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संख्या विभागाने विहित केली होती. इतर दोन बंदरांसाठी मच्छीमार नौकांच्या संख्येची मर्यादा निर्धारीत न केल्यामुळे या दोन बंदरांतून अनधिकृत मच्छीमार नौकांकडून बेसुमार प्रमाणात मासेमारी केली जात असल्याची शक्यता नाकारता येत नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. प्रत्येक मासेमारी नौकेची तपासणी सुरु असल्यामुळे मच्छीमार नौकांची संख्या निश्चित करण्याकरीता विलंब होत आहे. तसेच मासेमारी परवाना घेतल्याशिवाय कोणत्याही मासेमारी नौका अनधिकृतपणे मासेमारी करीत नाहीत व अनधिकृतपणे मासेमारी करणा-या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत कारवाई केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस :

३.५६ महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये मत्स्य व्यवसाय शाश्वत पध्दतीने करण्याच्या दृष्टीने जिल्हयातील प्रत्येक बंदरात नोंदणीकृत होण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संख्या राज्य शासनाने निश्चित करावयाची होती. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमन १९८१ अन्वये मत्स्यव्यवसाय शाश्वत पध्दतीने करण्याच्यादृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक बंदरात नोंदणीकृत होण्याच्यादृष्टीने विशिष्ट प्रकारच्या मच्छीमार नौकांची कमाल संस्था ठरविण्याची तसेच कलम ७ अन्वये कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात परवाना प्राप्त नसलेल्या मच्छीमार नौकांचा वापर करुन मासेमारी करणे प्रतिबंधीत करण्याची तरतूद अधिनियमामध्येच नमूद असताना व विभागाने त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक असताना त्याठिकाणी कोणत्याही अडचणी येत नसून सर्व ठिक सुरु असण्याचे समर्थन विभाग करुच शकत नाही. यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करताना कायद्यान्वये नियमन कमाल मर्यादा संख्या निश्चित करता येऊ शकते अशी तरतूद असून ती बंधनकारक नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परंतु विभागाने कायद्याचा अर्थउकल शासन हिताचा करुन त्याची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे. मच्छिमार नौकांची कमाल मर्यादा निश्चित केल्याने अनेक अनियमीत बाबींवर आळा बसण्याची शक्यता असताना विभागाने अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी करणे अधिक सुरक्षित व शासन हिताचे ठरेल. अतः विहीत प्रमाणापेक्षा जास्त बेसुमार होणा-या मासेमारीवर विभाग कशाप्रकारे नियंत्रण ठेवणार आहे. याबाबतचा कार्यक्रम तयार करुन त्याबाबतच्या अंमलबजावणीची रुपरेषा विभागाने तयार करावी तसेच तिन्ही बंदरामध्ये मच्छीमार नौकांची कमाल संख्या निश्चित करण्याची कार्यवाही विभागाने तात्काळ करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.११.२ 'अधिक क्षमतेच्या गस्ती नौकाची अनुपलब्धता'

अभिप्राय :

३.५७ मासेमारीचे नियमन करण्याची तरतूद महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमात (MMFRA) असून त्यानुसार कुठल्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी प्रतिबंधीत केली जाऊ शकते. म्हणूनच, समुद्रामध्ये मासेमारीसाठी अनधिकृतरित्या संचार करणा-या नौकांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यासाठी विभागाकडे पर्याप्त संख्येत गस्ती नौका उपलब्ध असणे आवश्यक असते. परंतु गस्त घालण्यासाठी विभागाकडे स्वतःची एकही नौका नव्हती आणि राज्याच्या सर्व सहासागरी तटीय जिल्हयामध्ये भाडयाच्या नौकांद्वारे गस्त घातली जात होती. परंतु भाडयाने घेतलेल्या नौकांची इंजिन क्षमता कमी असल्यामुळे गस्तीचे काम परिणामकारक आणि कार्यक्षमतेने होत नव्हते. त्यामुळे विभागाने आयुक्तांना उच्च इंजिन क्षमतेच्या पाच गस्ती नौका खरेदी करण्याचे

निर्देश दिले आणि नवीन नौका खरेदी करेपर्यंत नौका (उच्च इंजिन क्षमतेच्या) भाडेतत्वावर वापरण्याचे ठरविले. परंतु आयुक्तांनी मागविलेल्या निविदांना प्रतिसादन मिळाल्यामुळे नोव्हेंबर २०१६ पर्यंत एकाही नौकेची खरेदी होऊ शकली नाही. अशाप्रकारे १८ महिन्यांचा कालावधी उलटूनही विभागाने उच्च इंजिन क्षमतेच्या नौकांची खरेदी केली नव्हती किंवा भाडयानेही घेतल्या नव्हत्या असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

३.५८ शासनाने मत्स्यव्यवसाय विभागास उच्च इंजिन क्षमतेच्या ०५ गस्ती नौका खरेदी करण्यांचे निर्देश दिले. त्याप्रमाणे मत्स्यव्यवसाय विभागाने रु. १५६२.७२ लक्ष चा नौका खरेदी प्रस्ताव सादर केला होतातो मान्य झाला नाही. दरम्यानच्या कालावधीत हायस्पीड गस्ती नौका भाड्याने घेण्याबाबत मान्यता प्रदान केली व गस्ती नौका भाडेतत्वावर घेण्यांत आलेल्या आहेत.

३.५९ तसेच सन २०१७-१८ मध्ये भाडेतत्त्वावर गस्ती नौका घेण्यासाठी निविदा मागविण्यात आलेल्या असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असुन, प्रत्यक्षात गस्ती नौका तपासणी अहवाल जिल्हा कार्यालयामार्फत मागविण्यात आलेला आहे. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या गस्ती नौका तपासणी अहवाल प्राप्त झालेला असुन, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गस्ती नौका सुरु करण्यात आलेली आहे. उर्वरित जिल्ह्यांचे गस्ती नौका तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत जिल्ह्यांमध्ये देखील गस्ती नौकामार्फत महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम १९८१ ची अंमलबजावणी होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.६० समुद्रामध्ये मासेमारीकरिता अनधिकृतरित्या संचार करणा-या नौकांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यासाठी विभागाने या नौका भाड्याने घेतलेल्या आहेत. अशा परिस्थितीत अनधिकृत मासेमारी करणा-या किती बोटी मागील एका वर्षात विभागाने जप्त केल्या अशी विचारणा समितीने केली असता विभागाने एकूण ३७६ बोटींवर कारवाई केली आहे. ९४ बोटींचे परवानेसुध्दा रद्द केले आहेत. रायगड मधील ६ एलईडी बोटीवर कारवाई केली आहे. फक्तबोटीवर कारवाई करण्याचे स्वरुप वेगवेगळे आहे उदा. परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केला असेल, ट्रॉलर परवानगी नसेल, पर्सेशन जाळी वापरली असेल, जाळीमध्ये वेगळया प्रकारे काही बदल केला असेल. लायसन्स परवाना देणारा अधिकारी बोटीचा परवानाही रद्द करतो किंवा त्यांनी केलेल्या मासेमारीचे लिलाव (ऑक्शन) करुन पाच पट दंड करण्याचे अधिकार तहसिलदाराला आहेत. या दंडातून रु.९.११ लाख प्राप्त झाले असून, काही प्रकरणे अजून अंतिम झालेले नाहीत. एलईडीबाबत ३८ लोकांवर कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे १२ नॉटीकल मैलाच्या पुढील मासेमारीकरीता आता केंद्र शासनाने देखील आदेश काढले आहेत की, कोस्ट गार्डनेदेखील यावर लक्ष ठेवावे. याप्रमाणे कोस्टगार्ड सोबत सयुक्त प्रयत्नाने (टायअप) करुन समन्वय ठेवण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.६१ मासेमारीचे नियमन करण्याची तरतूद महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (MMFRA) असून त्यानुसार कुठल्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात मासेमारी प्रतिबंधीत केली जाऊ शकते. म्हणूनच, समुद्रामध्ये मासेमारीसाठी अनधिकृतरित्या संचार करणा-या नौकांचा शोध घेऊन त्या जप्त करण्यासाठी विभागाकडे पर्याप्त संख्येत गस्ती नौका उपलब्ध असणे आवश्यक असते. परंतु त्या पुर्ण क्षमतेने खरेदी/भाडेतत्वावर घेण्यात न आल्यामुळे तसेच अधिक क्षमतेच्या गस्तीनौकांची अनुपलब्धता असल्यामुळे गस्तीचे काम परिणामकारक आणि पुर्ण कार्यक्षमतेने होत नव्हते असे गंभीर आक्षेप सदरहू परिच्छेदात नोंदविण्यात आले आहेत. अतः शासनाने सागरी तटीय जिल्ह्यात गस्तीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अधिक क्षमतेच्या गस्तीनौका पुरेशा प्रमाणात भाड्याने/ विकत घेण्यासाठी त्वरेने कार्यवाही करावी. अनधिकृत सागरी नौका व सक्रिय परवानाधारक नौकांच्या संख्येतील तफावतीचा लवकरात लवकर ताळमेळ घ्यावा व अनधिकृत नौकांवर आवश्यक ती कडक कारवाई करण्यात यावी. तसेच भाडेतत्त्वावर घेतलेल्या नौका गस्तीसाठी पुरेशा आहेत का याचा आढावा घेऊन विभागाकडे पर्याप्त संख्येत गस्तीनौका उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कार्यवाही विभागाने तात्काळ करावी. त्याचप्रमाणे सद्यःस्थितीत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या बोटी (१२ नॉटीकल माईलपर्यंत) तसेच गृह विभागाच्या (५ नॉटीकल माईलपर्यंत) व १२ नॉटीकल माईलनंतर कोस्ट गार्डमार्फत बोटीच्या गस्ती सुरु आहेत. अशा परिस्थितीत कामाचे दुबारीकरण होणार नाही व अधिक सक्षम व प्रभावीपणे या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग, गृह विभाग, केंद्र शासनाचा कोस्ट गार्ड विभाग यांनी एकमेकांशी समन्वय व योग्य तो ताळमेळ ठेवून सागरी किनारा अनधिकृत मासेमारी व सुरक्षिततेच्या दृष्टीने नियंत्रीत ठेवावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.११.३ 'नोंदणी झालेल्या सागरी नौका आणि प्रत्यक्ष जारी केलेले परवाने यांच्या माहितीमध्ये ताळमेळ न होणे'

अभिप्राय

३.६२ राज्यातील मच्छीमार नौकांची नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र सागरीमंडळ (MMB) हे तत्कालीन प्राधिकारी होते तर मच्छीमार नौकांना परवाने विभागाकडून जारी केले जात होते. केंद्र शासनाच्या नौकानयन मंत्रालयाने अधिसुचना जारी केल्यावर (ऑगस्ट२०१४) सर्व सागरी मच्छीमार नौकांची नोंदणी करण्याचे अधिकार सागरी राज्यांच्या अधिसूचित निबंधकांना (राज्याचे मत्स्य व्यवसाय विभाग) सोपविण्यांत आले होते. अधिसुचनेनुसार कार्यवाही करताना MMB ने २३, २७३ नोंदणीकृत मच्छीमार नौकांची माहिती विभागाला सुपूर्त केली. परंतु मार्च २०१६ पर्यंत विभागाने फक्त १६,४७० मच्छीमार नौकांना (२३, २७३ नोंदणीकृत नौकांच्या तुलनेत) परवाने जारी केले होते, म्हणजेच ६,८०३ इतक्या लक्षणीय संख्येत नौकांच्या माहितीचा ताळ मेळ घेतला गेला नव्हता ज्यामुळे परवान्याशिवाय मासेमारी करत असल्याची शक्यता होती.

ज्यामुळे रियल क्राफ्ट अंतर्गत दिनांक१/८/२०१७ च्या नोंदणीनूसार नोंदणी झालेल्या नौकांची एकूण संख्या २४०३५ इतकी आहे. मासेमारी परवाना असलेल्या नौकांची संख्या १४२९९ इतकी असुन, उपरोक्त नौकांच्या संख्येमध्ये असणारी तफावत ९७३६ इतकी आहे. सन २०१७-१८ मध्ये सागरी जिल्हयांमध्ये मासेमारी नौका सर्वेक्षण अभियान हाती घेण्यात आलेले असून अभियानानुसार दिनांक ११/८/२०१८ पर्यंत तपासणी केलेल्या नौकांची संख्या ११८४६ इतकी आहे. रियल क्राफ्ट नोंदणीनुसार तफावत असलेल्या ९७३६ नौकांपैकी ४७०८ नौकांची तपासणी करण्यांत आलेली आहे. नोंदणी रद्द केलेल्या नौकांची संख्या ७६९ इतकी आहे. तसेच राज्यातील कोकण विभागाअंतर्गत मासेमारी नौका (यांत्रिक/बिगरयांत्रिक) सर्वेक्षण अभियान सन २०१७-१८ अंतर्गत तपासणी झालेल्या व बंद/निकामी नौकांना संबंधीत जिल्हा कार्यालयांकडून नोटीसा देण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर बंद व निकामी नौकांचे नोंदणी प्रमाणपत्र (VRC) रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

नोंदणी झालेल्या नौका व प्रत्यक्ष जारी केलेले परवाने यामधील फरक काय आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ॲक्टप्रमाणे सन २०१४ पूर्वी एमएमबी बोटीची नोंदणी करीत होते. त्यानुसार नोंदणी झालेल्या नौकांची एकूण संख्या २४०३५ असून मासेमारी परवाना असलेली नौकांची संख्या १४२९९ असून उपरोक्त नौकांच्या संख्येमध्ये असणारी तफावत ९७३६ आहे. कोणत्याही बोटीची नोंदणी करणे प्रथम आवश्यक आहे. बोटीने मासेमारी करावयाची असेल तर मासेमारीचा परवाना घ्यावा लागतो. १३ ते १४ हजार मासेमारीचे परवाने घेतलेले परवानाधारक आहेत. यातून तपासणी करुन हा फरक कमी करण्यात येत आहे. तसेच ज्या बोटी कार्यरत नाही त्यांचे परवाने रद्द करण्याचे काम सुरु आहे. विभागाकडून प्रत्यक्ष शहानिशा करण्यात येते तेव्हा बोटी न आढळल्यास त्याची नोंदणी रद्द करण्यात येते असे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले.

शिफारशी :

३.६३ नोंदणी झालेल्या व मासेमारी परवाना असलेल्या नौका यामध्ये अद्याप अंदाजे ९००० बोटींची तफावत आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यावर्षी विशेष मोहिम हाती घेण्यात येईल. सर्व कर्मचारी वर्गाला त्याबाबत सूचना दिल्या जातील. ज्यांच्याकडे नोंदणी आहे परंतु परवाना नाही अशा बोटींची देखील तपासणी करण्यात येईल असे विभागाने समितीला आश्वासित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व नोंदणी केलेल्या व परवाने असलेल्या बोटींमधील फरक कमी करण्यासाठी विभागाने विशेष मोहीम हाती घ्यावी व ज्यांचेकडे नोंदणी आहे परंतु परवाना नाही अशा बोटींची संख्या निश्चित करुन ही तफावत दूर करुन नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही विभागाने करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.६४ सन १९८१ च्या कायद्यान्वये बोटी नोंदणी करण्याचा अधिकार मत्स्यव्यवसाय विभागाला प्राप्त झाला. परंतु त्यासाठी विभागाकडे तांत्रिक व तज्ञ कर्मचारी वर्ग नाही. एखादी बोट नोंदणीकरिता विभागाकडे आल्यानंतर ती मच्छिमारीच्या योग्यतेची आहे काय ? तसेच बोटीचे स्पेसीफिकेशन्स, समुद्राचा ड्राफ्ट किती आहे, तसेच परवाने देताना करावयाचे सर्वेक्षण, बोटीची क्षमता, उंची, वजन या सर्व बाबींचे अधिकार पुर्वी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे होते ते आता मत्स्यव्यवसाय विभागाकडे देण्यात आले आहे. परंतु अशी तपासणी करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडे तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही. परिणामी या बोटींच्या तपासणीची गुणवत्ता व निकषांचे पालन होण्याची शाश्वती नाही वा तशी यंत्रणा देखील विभागाकडे उपलब्ध नाही. विभागाकडे मासेमारीचे परवाने देणेसंदर्भात तपासणी करण्यासाठी तांत्रिक कर्मचारी आहेत, परंतु बोटींची तपासणी करणेबाबत तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही. अतः विभागाने यासाठी जे तांत्रिक तज्ञ असतील त्यांची नेमणूक करावी किंवा जोपर्यंत तांत्रिक कर्मचारी वर्ग मत्स्यव्यवसाय विभाग नियुक्त करीत नाही, तोपर्यंत एमएमबीकडून प्रतिनियुक्तीने अधिकारी घेण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी शिफारस समिती करत आहे.

परिच्छेद २.२.१२ 'मच्छीमारासाठी कल्याणकारी योजना'

परिच्छेद २.२.१२.१ 'फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र योजनेची अंमलबजावणी न करणे'

अभिप्राय :

३.६५ विदर्भ व मराठवाडा या दुष्काळप्रवण जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्यशासनाने आर्थिक विवंचना ग्रस्त पाच शेतक-यांचा गट करुन प्रत्येक गटाला एका फिरत्या वाहनासाठी (फिरते किरकोळ मत्स्य विक्री केंद्र) अर्थसहाय देण्यासाठी एक योजना मंजूर केली (जुलै २०१५) या योजनेसाठी राष्ट्रीय मत्स्य व्यवसाय विकास मंडळ (NFDB) (४० टक्के) आणि राज्य शासनाने (६० टक्के) अर्थसहाय देण्याचे प्रस्तावित केले. हे फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र म्हणजे एक चार चाकी वाहन असणार होते ज्यामध्ये मासे ठेवण्यासाठी एक विसंवाही (insulated) खोका, शीतकपाट, स्टोव्ह आणि स्वयंपाकाचा गॅस असणार होता ज्याचा उपयोग शेतक-यांनी मत्स्य विक्रीसाठी करुन त्याव्दारे अर्थार्जन करावयाचे होते. त्यानूसार, राज्य शासनाने विदर्भ व मराठवाडयातील १४ जिल्हयांसाठी ६६० फिरत्या किरकोळ मत्स्यविक्री केंद्राच्या खरेदीसाठी (रु. १० लक्ष प्रति केंद्र) रू. ६६.०० कोटी मंजूर केले. राज्य शासनाने १० जिल्हयातील ४४ फिरत्या मत्स्यविक्री केंद्रासाठी स्वतःचा रु. २.६४ कोटीचा (६० टक्के) हिस्सा मुक्त केला (मार्च २०१६) आणि ही रक्कम शेतक-यांच्या गटप्रमुखाच्या व संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्तांच्या (ACF) संयुक्त बँक खात्यांमध्ये हस्तांतरीत केली. परंतु मान्यताप्राप्त प्रमाणकानुसार प्रति फिरत्या मत्स्यविक्री केंद्रा मागे NFDB चे दायित्व रु. १० लक्ष प्रतिकेंद्र नसून रू. ६.५० लक्ष प्रतिकेंद्र इतकेच मर्यादित होते आणि म्हणून प्रति फिरत्या मत्स्यविक्री केंद्रासाठी रु. २.६० लक्ष (रु. ६.५० लक्षाच्या ४०टक्के) एवढेच अर्थसहाय देणे शक्य होते. तसेच पाच शेतक-यांचा गट नोंदणीकृत संस्था नव्हता किंवा सहकारी संस्था देखील नव्हता आणि म्हणून त्यास कायदेशीर संस्था म्हणून विचारात घेतले जावू शकत नव्हते आणि भविष्यात त्यांच्या मालमत्तांचे व्यवस्थापन, मालकी आणि जबाबदा-या यामध्ये अडचणी उद्‌भवण्याची शक्यता होती, या कारणांकरीता NFDB नेत्यांचा रु. १.७६ कोटीचा (रु. ४० टक्के) हिस्सा मुक्त केला नव्हता. NFDB कडून अर्थसहाय्याबाबत ठोस आश्वासन मिळाले नसल्याने आयुक्तांनी जिल्हा नियोजन आणि विकास समिती अंतर्गत योजनेला १०० टक्के अर्थसहाय देण्याचे प्रस्तावित केले, ज्यावर महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा निर्णय प्रलंबित होता. अशाप्रकारे सदोष नियोजनामुळे दुष्काळप्रवण क्षेत्रातील विवंचनाग्रस्त शेतक-यांसाठी स्वयंरोजगार निर्माण करण्याचे योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

३.६६ समितीने यासंदर्भात साक्ष घेतली असता शेतक-यांच्या गटांनी व संबंधित मत्स्य सहकारी संस्थांनी विहित अटी शर्तींची पुर्तता न केल्यामुळे NFDB ने त्यांच्या हिश्याचा निधी मुक्त केला नाही. परंतु केंद्र शासनाकडे या प्रकरणी विभागाने देखील कोणताही पाठपुरावा केला नाही. तसेच NFDB चा यात मुळ आक्षेप असा होता की, या गटातील सदस्य हे मत्स्यव्यावसायिक नाहीत तर शेतकरी आहेत. या आक्षेपाचे समाधानकारक निराकरण देखील विभागाने आजतागायत केले नाही. केवळ नस्ती एका विभागाकडून दुस-या विभागाकडे फिरत असून अद्यापही यासंदर्भातील निर्णय प्रलंबित आहे. परिणामी ३ वर्षापासून विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे रु.२ कोटी ६४ लक्ष निधी अखर्चित राहिला व अद्यापही यात निर्णय झालेला नाही. मत्स्यव्यावसायिकांसाठी असलेली योजना बिगर मत्स्यव्यावसायीकांकडे वळविण्यात आली व त्याचे योग्य ते समर्थन, निराकरण व पाठपुरावा देखील विभाग केंद्र शासनाकडे वा राज्य शासनस्तरावर करु शकले नाही. आता या प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत वाहनांच्या किंमतीत अधिक वाढ होईल व पुन्हा अडचणी निर्माण होतील अशा परिस्थितीत या योजनेची विहित मुदतीत कशी अंमलबजावणी होणार याबाबत समिती साशंक आहे. त्यामुळे मंत्रीमंडळापुढे जाण्याअगोदरच गाडीच्या किंमतीबाबत विभागाने पुर्ण शहानिशा करुनच सुधारीत प्रस्तावासह जाणे आवश्यक आहे व १ महिन्याच्या आत हा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करणेबाबत समितीने निर्देशित केले. परंतु अद्यापही यासंदर्भातील माहिती समितीस अप्राप्त आहे.

शिफारस :

३.६७ विदर्भ व मराठवाडा या दुष्काळप्रवण जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने आर्थिक विवंचना ग्रस्त पाच शेतक-यांचा गट करुन प्रत्येक गटाला एका फिरत्या वाहनासाठी (फिरते किरकोळ मत्स्यविक्री केंद्र) अर्थसहाय देण्यासाठी एक योजना मंजूर केली व या योजनेसाठी NFDB (४०टक्के) आणि राज्य शासनाने (६० टक्के) अर्थसहाय देण्याचे प्रस्तावित केले व त्याअनुषंगाने राज्य शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील १४ जिल्ह्यांसाठी फिरते मत्स्य विक्री केंद्र खरेदी करण्यासाठी निधी देखील मंजूर करुन मुक्त केला. परंतु या योजनेअंतर्गत मत्स्यव्यवसाय करणा-यांना लाभ देणे अभिप्रेत असून तसे न करता पाच शेतक-यांचा गट निर्माण केल्यामुळे तसेच ते नोंदणीकृत संख्या किंवा सहकारी संस्था देखील

नसल्यामुळे केंद्राने त्यांच्या हिश्याचा निधी वितरीत केला नाही. वास्तविक ही योजना शासनाने विदर्भ व मराठवाडा या दुष्काळ प्रवण जिल्ह्यातील शेतक-यांच्या आत्महत्येवर तोडगा काढण्यासाठी तयार केली. परंतु त्यात मत्स्यव्यावसायीकाची अट राज्य शासनाने न घातल्यामुळे ही अडचण निर्माण झाली आहे. वास्तविक विभागाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन राज्य शासनाच्या भूमिकेचे योग्य ते स्पष्टीकरण देऊन व या विषयाचा पाठपुरावा करुन केंद्र शासनाचे शंका निरसन करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे गत ३ वर्षापासून विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे कोट्यावधीचा निधी अखर्चित राहिला. अद्यापही राज्य शासनाच्या स्तरावरुन देखील या प्रकरणी कोणताही निर्णय झालेला नसल्यामुळे या योजनेची विहित मुदतीत अंमलबजावणी होऊ शकली नाही ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. आजतागायत फिरत्या मत्स्य विक्री केंद्रासाठी वाहन खरेदी संदर्भात निर्णय होऊ शकला नाही. या योजनेअंतर्गत वाहन खरेदीसाठी ६० टक्के (रु.६ लक्ष) निधी डिपीडीसी व ४० टक्के (रु.४ लक्ष) निधी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ(NFDB)हे प्रमाण निश्चित होते. काही कारणास्तव आता NFDB कडून हा निधी प्राप्त होण्याची शक्यता नसल्याने राज्य शासनाकडून केवळ रु.६ लक्ष प्रति वाहन उपलब्ध करुन वाहनाचा आकार कमी करणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने मंत्रीमंडळ प्रस्ताव सादर केला असता ती नस्ती देखील प्रशासकीय स्तरावर फिरते आहे. निर्णय घेण्यास विलंब झाल्यामुळे आता या वाहनांची प्रस्तावित किंमत रु.६ लक्ष यामध्ये देखील वाढ झालेली आहे. या प्रस्तावास मान्यता मिळेपर्यंत हे वाहन रु.६ लक्ष किंमतीत घेणे शक्य न झाल्यास पुन्हा योजनेची अंमलबजावणी प्रलंबित राहिल. अतः अशा परिस्थितीत प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे जाणे अगोदरच या मंजूर रकमेत वाहन खरेदी शक्य आहे काय, याची पुर्ण शहानिशा करुन घ्यावी व आवश्यकता पडल्यास सुधारीत प्रस्ताव सादर करुन त्यास मान्यता घ्यावी व तात्काळ योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी. तसेच केंद्र शासनाकडे देखील या प्रकरणाचा पाठपुरावा करावा व त्रुटी दूर करण्याचा पुर्ण प्रयत्न करण्यात यावा. तसेच आवश्यकता पडल्यास योजनेचे पुनर्गठन करुन सुधारीत अटी व शर्ती निश्चित करुन यातून योग्य तो मार्ग काढण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१२.२ 'आदर्श मच्छिमार गावे निर्माण करण्याचा विलंब'

अभिप्राय :

३.६८ 'मच्छीमारांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय योजना' ही केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाकडून १९९१-९२ पासून ५०:५० तत्वावर राबविण्यात येत असलेली एक केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेचा एक घटक म्हणजे आदर्श मच्छीमार गांवे विकसीत करणे हे होते, ज्याअंतर्गत मच्छीमारांना (भूजलाशयीन आणि सागरी) घरे, पेयजल आणि मनोरंजनासाठी समाजकेंद्र, अशा मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात येणार होत्या. राज्यात २०१२-१३ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली होती. ३ वर्षापेक्षा अधिक काळ उलटुन गेल्यावरही, २५१ घरांपैकी फक्त ११९ घरे (४७टक्के) पूर्ण होऊ शकली होती. तसेच ३३ घरांचे बांधकाम सुरू न करण्याची आणि २४ घरांची रद्द करण्याची कारणेउपलब्ध नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

३.६९ सन २०१२-१३ मध्ये केंद्रशासनाने मंजूरी दिलेल्या २५१ घरकूलांपैकी १९७ घरकुले पुर्ण झालेली असुन ५ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. बनावट/ दुबार प्रस्ताव अन्य अनुषंगिक कारणांमुळे ४९घरकुले रद्द झालेली आहेत. तसेच सदर योजना जिल्ह्या ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडुन राबविण्यात येते. सदर यंत्रणेकडून आवश्यक इतका प्रतिसाद मिळत नसल्यामुळे घरकुल प्रकल्प पुर्ण करण्यास विलंब होतो. तसेच घरकुल प्रकल्प पुर्ण करण्यासाठी टप्प्याटप्प्याने निधी मिळत असल्यामुळे प्रकल्प पुर्ण करण्यास त्याप्रमाणात कालावधीची आवश्यक असते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाने रु. १ कोटी दिले. त्यानंतर शासनाने अधिकचा रु. १८ लक्ष व रु. ९ लक्ष असे एकूण रु. १२७ लक्ष रुपये दिले. त्यापैकी घरांच्या बांधकामासाठी रु. १०४ लक्ष लागले असून रु.२३ लक्ष परत करण्यात आल्याचे समितीसमोर सांगितले. यावर समितीने आक्षेप नोंदवित प्रति घरकुल रु. ५० हजार प्रमाणे २०८ घरकुलांसाठी विभागाला फक्त रु.१०१ लक्ष खर्च अपेक्षित आहे. परंतु यात रु. ३ लक्ष अधिकचा खर्च होण्याची कारणे काय तसेच विभागाने परत केलेले रु.२३ लक्ष हे रु.१२७ लक्ष रकमेपैकीच होते काय, अशी समितीने विचारणा केली असता ही बाब तपासून घेण्यात येईल व १ महिन्यात समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. परंतु सदरहु माहिती अद्यापही अप्राप्त आहे.

शिफारस :

३.७० 'मच्छीमारांच्या कल्याणसाठी राष्ट्रीय योजना' ही केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाकडून १९९१-९२ पासून ५०:५० तत्वावर राबविण्यात येत असलेली एक केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेचा एक घटक म्हणजे आदर्श मच्छीमार गांवे विकसीत

करणे हे होते, ज्याअंतर्गत मच्छीमारांना (भूजलाशयीन आणि सागरी) घरे, पेयजल आणि मनोरंजनासाठी समाजकेंद्र, अशा मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यात येणार होत्या. राज्यात २०१२-१३ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली होती. परंतु यासाठी मंजूर २५१ घरांपैकी केवळ २०२ घरे बांधून पुर्ण झाली व दुबार लाभ घेतल्याप्रकरणी ४९ घरकुले रद्द झाली. २५१ घरांसाठी शासनाकडून रु.१२७ लक्ष प्राप्त झाले. त्यापैकी रु.५० हजार प्रति घरकुलप्रमाणे २०२ घरांसाठी रु.१०१ लक्ष खर्च होणे अपेक्षित असताना रु.१०४ लक्ष खर्च झाले काय, तसेच विभागाने परत केलेले रु.२३ लक्ष हे रु.१२७ लक्षपैकी होते काय याची देखील विभागाने तपासणी करुन समितीस १ महिन्यात माहिती देण्याबाबत आश्वासित केल्यानंतरही अद्याप ही माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः या बाबींची विभागाने चौकशी करावी व एकुण मंजूर निधी, खर्च झालेला निधी व परत करण्यात आलेला निधी याचा योग्य ताळमेळ घालण्यात यावा. दुबार लाभ झाल्यामुळे ४९ घरकुले रद्द करण्यात आली. परंतु यासंदर्भातील दुबार मंजूरीबाबतची देखील तपासणी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. तसेच यापुढे घरे मंजूर करताना बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी नमूद करण्याची दक्षता विभागाने घ्यावी. तसेच बांधकाम पूर्ण झालेली घरे मच्छिमारांना हस्तांतरीत केली किंवा कसे ते समितीला कळवून अद्याप घरे हस्तांतर केली नसतील तर तात्काळ घरे हस्तांतरीत करुन या संपुर्ण प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.२.१३ 'मनुष्यबळाची कमतरता'

अभिप्रायः

३.५१ प्रादेशिक स्तरावरील सनियंत्रण अधिकारी असलेल्या तसेच आयुक्त आणि सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त (ACF) मधील महत्त्वाचा दुवा असलेल्या निवासी उपजिल्हाधिकारी पदांमधील अनुशेष ७१ टक्के होता. तसेच, जिल्हा स्तरावरील महत्वाचे कार्यकारी असलेल्या ACF च्या पदांमधील अनुशेष ८० टक्के होता त्यामुळे मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार दिला गेला होता किंवा ACFE कडून दुहेरी कार्यभार सांभाळला जात होता. मत्स्य व्यवसायविकास/प्रशिक्षण अधिका-यांची ३४ टक्के पदे रिक्त असणे हे मत्स्य बीजांचे कमी उत्पादन आणि मत्स्य बीज केंद्रे कार्यरत नसण्यामागचे एक कारण होते. महत्त्वाच्या पदांच्या अनुशेषामुळे केंद्र/राज्य योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झाला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

३.५२ सदरहू बाब गंभीर असून रिक्त पदे भरण्यासंदर्भात विभागाचे नियोजन काय, याबाबत समितीने विचारणा केली असता आता पदोन्नतीने २४ पदे भरण्यात येत आहेत. सर्वोच्च न्यायालयामध्ये पदोन्नतीतील आरक्षणाबाबतचे प्रकरण आहे. यानुसार पदोन्नतीची २० पैकी १२ पदे भरता येतील.लसरळसेवेच्या पदांवर १२ लोकांना पात्र ठरविले आहे. म्हणजेच एकूण २४ पदे पदोन्नतीने भरण्यात येणार आहेत. त्यापैकी १२ नियमित व १२ तात्पुरते असतील. सदर २४ पदांपैकी १ महिन्यात पदोन्नतीची पदे भरण्यात येतील असे समितीसमोर सांगण्यात आले.सरळसेवेने भरावयाच्या ४६ पदांबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवून मोठा कालावधी झालेला आहे. या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करायचे असून ही कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

३.७३ मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणा-या अनेक हितकारी योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मोठ्या प्रमाणात आक्षेप महालेखाकारांनी या अहवालात नोंदविलेले आहेत. या सर्व आक्षेपांना काही प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता या देखील बाबी कारणीभूत आहेत. पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्यास योजनांची अंमलबजावणी गुणवत्तेवर होऊच शकत नाही. अतः ही रिक्त पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही विभागाने तातडीने करावी व अधिका-यांवर अतिरिक्त कार्यभार हा पर्याय व्यवहार्य नाही व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे

परिच्छेद क्र. २.२.१४ 'संनियंत्रण'

अभिप्राय :

३.७४ कुठल्याही योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेतील तफावती/दोषांवर दोष निवारक कार्यवाही करण्यासाठी आणि भविष्यात नियोजन करताना त्यामधुन बोध घेण्यासाठी अशा दोषांचा शोध घेण्याच्या दृष्टीने योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी संनियंत्रण अतिशय महत्वाचे असते. परंतु विभागाकडून राबविल्या जाणा-या वेगवेगळया योजनांचे संनियंत्रण कमकुवत

होते. जलाशयातील मासेमारी कार्यक्रम आणि बंदीस्त जलाशयातील मत्स्य शेती यांच्या प्रगतीवर संनियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असणा-या नियतकालीक अहवालांचा अभाव, RKVY अंतर्गत मत्स्यबीज केंद्रांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण यांसाठी जिल्हा कडून योजनेचे तपशीलवार आराखडे प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांचा अभाव आणि जतन, वाहतुक व पणन योजनेअंतर्गत कामाच्या प्रगतीचा आढावा न घेता निधीमुक्त करणे अशा अनेक कारणांमुळे हे संनियत्रंण कमकुवत होते. ज्याचा थेट परिणाम योजनांच्या अंमलबजावणीवर झाला. अधिका-यांसह अतिरिक्त कार्यभार देऊन योजना राबविणे हा पर्याय निश्चितच व्यवहार्य नाही. तसेच घेण्यात आलेला कर्मचारी वर्ग हा पुरेसा प्रशिक्षित व तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे देखील आवश्यक आहे.

शिफारशी :

३.७५ कुठल्याही योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेतील तफावती/दोषांवर दोष निवारक कार्यवाही करण्यासाठी आणि भविष्यात नियोजन करताना त्यामधुन बोध घेण्यासाठी अशा दोषांचा शोध घेण्याच्या दृष्टीने योजना, कार्यक्रम अथवा प्रक्रियेच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी संनियंत्रण अतिशय महत्वाचे असते. परंतु विभागाकडून राबविल्या जाणा-या वेगवेगळया योजनांचे संनियंत्रण कमकुवत होते, ज्याचा थेट परिणाम योजनांच्या अंमलबजावणीवर झाला. अतः मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांवर विभागाने योग्य ते संनियंत्रण ठेवावे. त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्यात यावे. तसेच आयुक्तालय स्तरावर दरमहा/तिमाहीस आवश्यक ते अहवाल व आराखडे क्षेत्रीय कार्यालयांकडून नियमित मागवावेत व कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा व आधी मुक्त केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे विहित वेळेत सादर न केल्यास उर्वरित निधी मुक्त करणेबाबत शासन स्तरावरुन योग्य ते निर्बंध घालण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.७६ मत्स्यव्यवसाय विभागासंदर्भात सदरहू अहवालात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर आहेत. यात राज्यातील मत्स्य व्यवसाय विकासाच्या नियोजनात अप्रर्याप्तता होत्या. नियोजन कालावधीत पुर्ण करावयाच्या विविध कार्ये घटकांसाठी पंचवार्षिक योजनेत वर्षनिहाय लक्ष्य आणि अनुरुप वित्तीय खर्च निर्देशीत केला नव्हता आणि वार्षिक विकास कार्यक्रम पंचवार्षीक योजनेतुन घेण्यात आले नव्हते. तसेच, राज्यातील भुजलाशयीन मत्स्य साधनसंपत्ती आणि मासेमारी विषयक माहीती विश्वासनीय नव्हती, ज्यामुळे नियोजन प्रक्रियेवर विपरीत परिणाम झाला. विभागातील वसुली व्यवस्थापन सुमार होते कारण मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाकडुन ब-याच मोठया कालावधीपासुन लक्षणीय प्रमाणात भाडेपट्टा आणि कर्जे वसुलीसाठी प्रलंबीत होती. रु. ७.५० लक्ष टनाच्या लक्ष्याच्या तुलनेत माशांचे (भुजलाशयीन आणि सागरी) सरासरी वार्षीक उत्पादन फक्त रु. ५.९१ लक्ष टन होते. (२१ टक्के तुट). निकृष्ट पायाभुत सुविधा आणि मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे विभागाच्या मत्स्यबीज केंद्रामधुन मत्स्यबीजांचे उत्पादन अत्यंत कमी प्रमाणात होत होते. अयोग्य जागेची निवड, लाभार्थी मच्छिमारांना अर्थसहाय्य मुक्त करण्यातील विलंब, कामाचे अंशतः/सदोष कार्यान्वयन इत्यादीमुळे मत्स्य व्यवसाय विकासाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम झाला होता. मत्स्यव्यवसाय बंदरे आणि जेट्टी विकसीत करण्यात लक्षणीय प्रमाणात वाढीव वेळ लागला होता आणि अतिरिक्त खर्च झाला होता. विभागाकडे उच्च क्षमतेच्या इंजिन चलित गस्ती नौका नव्हत्या आणि सहाही सागरीतटीय जिल्हयांची गस्त कमी क्षमतेच्या इंजिन चलीत बोटी भाडयाने घेऊन त्याद्वारे केली जात होती. राज्यामध्ये नोंदणी झालेल्या सागरी मत्स्यमार नौका आणि प्रत्यक्षात परवाना प्राप्त सक्रिय मच्छिमार नौका यांच्या संख्येत मोठी तफावत होती त्याचा ताळमेळ घेतला नव्हता. अशारितीने, विभागाने राज्याच्या सागरी मासेमारी नियमन अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी गंभीरतेने केली नव्हती. सदोष नियोजन आाणि संथ प्रगतीमुळे मच्छिमा-यांच्या कल्याणासाठी आखलेल्या दोन योजनांच्या अंमलबजावणी करीता प्रतिकूल परिणाम झाला होता. महत्वाच्या पदांवर मनुष्यबळाची कमतरता होती विभागातील सनियंत्रण कार्यतंत्र अपर्याप्त होते. अशा अनेक बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. विभागाने या आक्षेपांच्या अनुषंगाने कार्यपध्दतीत योग्य ती सुधारणा करावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.३ "कंत्राटदारास जादा प्रदान"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्र. ३.३ कंत्राटदारास जादा प्रदान

कंत्राटातील कलमाचा अयोग्य, अमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु. २२.१४ कोटी जादा देण्यात आले.

अमरावती जिल्हयातील वासनी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम ज्यात सांडवा, मातीकाम आणि शीर्ष विमोचकांचे बांधकाम समाविष्ट होते, एका कंत्राटदारास रु. ११९.९७ कोटी किंमतीवर बहाल करण्यात आले. (ऑगस्ट २००८) जे ऑगस्ट २०१२ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रकल्प पूर्ण करण्याची निर्धारित तारीख (ऑगस्ट २०१२) दोनदा वाढविण्यात येऊन ऑगस्ट २०१७ करण्यात आली आणि कंत्राटदाराला जुलै २०१६ पर्यंत २५७.२५ कोटी (३७ वे चालू लेखा देयक) प्रदान करण्यात आले.

कराराच्या कलम ५५ मध्ये विनिर्दिष्ट आहे की कार्य निष्पादनाच्या वेळी दर खोदकामाचे एकूण परिणाम (मऊस्तर खडक आणि कठिण स्तर खडक) निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर मऊस्तर खडक आणि कठिणस्तर खडक दोहोंच्याही एकत्रित जास्तीच्या परिमाणाची अदायगी प्रचलित दर अनुसूचीनुसार (CSR) करावयाची होती. कलम ५५ मध्ये पुढे असे विनिर्दिष्ट आहे की जर कोणत्याही एका स्वतंत्र बाबीचे (मऊ खडक किंवा कठिण खडक) निष्पादित परिमाण निविदा परिमाणापेक्षा कमी अथवा तेवढेच असेल तर एकूण निविदा परिमाणाच्या (मऊ खडक आणि कठिण खडक दोन्ही एकत्रित धरुन) १२५ टक्क्यांपेक्षा जास्तीच्या सर्व परिमाणाची अदायगी, ज्या बाबीसाठी जास्त परिमाण झाले आहे. त्यासाठी असलेल्या क्च्ड प्रमाणे करावी. ह्या करारांतर्गत निविदा परिमाणाच्या तुलनेत तक्ता ३.३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे जेव्हा मऊस्तर खडकांमधील खोदकामाच्या प्रत्यक्ष परिमाणात लक्षणीय घसरण झाली तेव्हा कठिणस्तर खडकांमध्ये अवाजवी वाढ झाली.

तक्ता ३.३.१: निविदा परिमाणाचे आणि मऊस्तर व कठिणस्तर खडकाच्या खोदकामाचे परिमाणाचे तपशील

निविदाबाब	निविदा परिणाम	निविदा परिमाणाचे १२५टक्के	३७ व्या चालू लेखा देयका पर्यंत निष्पादित केलेले प्रत्यक्ष परिमाण
१	२	३	४
मऊस्तर खडकातील खोदकाम	२३५९७५३	२९४९६९१	९१८९६५
कठिणस्तर खडकातील खोदकाम	४६१७७	५७७२१	३३९४०२७
एकूण परिमाण	२४०५९३०	३००७४१२	४३१२९९२

अशा प्रकारे, कलम ५५, अन्वये एकूण निविदा परिमाणाचे १२५ टक्के (३०,०७,४१२ घनमी) कंत्राटदारास निविदा किंमतीवर देय होते, कठिणस्तर खडकामध्ये खोदकामासाठी (जेथे अतिरिक्त झाले आहे) १२५ टक्क्यांच्या (१३,०५,५८० घनमी) वर CSR प्रमाणे (रु. २४९.८५ प्रति घनमी) दाराने देय होते.

तथापि, लेखापरीक्षा पडताळणीत (सप्टेंबर २०१४) असे आढळले की कार्यकारी अभियंता, अमरावती सिंचन विभाग (AID), अमरावती (EE) यांनी CSR दराने (रु. २४९.८५ प्रति घनमी) कठिणस्तर खडकांच्या खोदकामासाठी (३१, ५३, ३८५ घनमी) कंत्राटदारास रु. ७८.७९ कोटी प्रदान केले. जेव्हा की कठीणस्तर खडकांच्या खोदकामासाठी कंत्राटदारास रु. २४९.८५ प्रति घनमी या क्च्ड दराने अदायगी केवळ १३, ०५, ५८० घनमीटर साठीच मर्यादित करावयाची होती.

अशाप्रकारे, कठिण खडकातील १८, ४७, ८०५ घनमी (३१,५३,३८५ घनमी- १३,०५,५८० घनमी) अतिरिक्त परिमाणाच्या खोदकामासाठी निविदा दर (रु. १५१.३२ प्रति घनमी) न लावता CSR दर (रु. २४९.८५ प्रति घनमी) लावल्यामुळे कंत्राटदारास ३७ व्या चालू लेखा देयका पर्यंत (जुलै २०१६) रु. १८.२० कोटी जादा प्रदान झाले.

या शिवाय, कठीणस्तर खडकातील खोदकामाचया अतिरिकत परिमाणासाठी CSR (रु. २४९.८५ प्रति घनमी) दर काढतांना कार्यकारी अभियंता, AID, अमरावती यांनी धरण पोच रस्त्याच्या रखरखावासाठी रु. ११.९० प्रति घनमीटर अशी अतिरिक्त किंमत त्यात लावली. तसेच, धरणस्थळी उत्खनन केलेल्या खोदकाम साहित्यांच्या विल्हेवाटीचे दर (रु. १५७.३० प्रति घनमी) ठरवितांना रु. ७.४९ प्रति घनमी अशी पोच रस्त्याच्या देखभालीसाठीची किंमत त्यात लावण्यात आली. अतिरिक्त किंमत लादण्यासाठी करारात कोणतेही सहाय्यभूत कलम नव्हते, त्यामुळे कंत्राटदारास रु. ३.९४ कोटीचे जादा प्रदान करण्यात आले.

अशाप्रकारे, कंत्राटातील कलमाचा चुकीचा अंमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी कंत्राटदारास अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु. २२.१४ कोटी जादा प्रदान केल्या गेले.

EE यांनी नमूद केले (नोव्हेंबर २०१६) की कलम ५५ लागू करण्याबाबत विभागास कोणतेही आदेश / सुचना प्राप्त न झाल्यामुळे सुधारात्मक कारवाई करण्यात आली नाही. रु. ३.९४ कोटीच्या जादा प्रदानाबाबत EE यांनी नमूद केले की कोणतेही ठोस आदेश प्राप्त न झाल्यामुळे कंत्राटदाराकडून वसुली करण्यात आली नाही.

उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण EE नी कंत्राट कलमांचे काटेकोरपणे लागू करणे अपेक्षित होते आणि कंत्राटातील कलमांचे अर्थउकल करण्यात कोणत्याही प्रकारची संदिग्धता असायला नको होती. याशिवाय, EE नी नोव्हेंबर २०१४ मध्ये रु. ३.९४ कोटी रकमेची जादा अदायगी केली असल्याचे मान्य केले होते. म्हणूनच कंत्राटदाराकडून वसुली न करण्याबाबत कोणतेही योग्य कारण / कारणे असल्याचे दिसत नाही.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निविदेच्या पृ.क्र. १२० कलम-५५ नुसार मऊ भूस्तर व कठीण भूस्तरामधील खोदकामाकरिता अनुसूची ब नुसार (१) मातीमधील खोदकाम

(२) मऊ खडकातील खोदकाम

(३) कठीण खडकातील खोदकाम

असे ३ घटक अंतर्भुत आहेत. प्रत्यक्षात १) मातीमधील खोदकाम, २) मऊ खडकामधील खोदकाम या दोनच बाबी कार्यान्वित झाल्या असून कठीण खडकातील खोदकाम द्वनिरंकक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष माती व मऊ खडकातील खोदकाम झाले असून ते मऊ भूस्तर या बाबीमध्ये येते. जर मऊ भूस्तर व कठीण भूस्तर या दोन्ही बाबी कार्यान्वित झाल्या तरच निविदेतील कलम-५५ लागू होतो. सदर प्रकरणात माती व मऊ खडक मऊ भूस्तरामध्ये मोडत असल्यामुळे कलम-५५ लागू शकत नाही. सदर परिणाम वाढ कलम-३८ अंतर्गत मुख्य अभियंता (वि.प्र.) यांनी १) पत्र क्रं. ९३० दि. २६/२/२००९ व २) पत्र क्रं. ४२८२ दि. ११/०९/२००९ नुसार मंजुर केले असून दायित्व वि.पा.वि.मं. नागपूर यांनी पत्र क्रं. ३७९१, दि. ११/०८/२००९ नुसार मंजूर केले आहे. कलम-५५ लागु होत नसल्यामुळे निविदेच्या कलम ३८- अंतर्गत परिमाण वाढ मंजूर करण्यात आली आहे. प्रत्यक्ष निविदेतील तरतूद, व अदा केलेले परिमाण पुढील प्रमाणे आहे.

बाब	निविदेनुसार परिमाण	भुगतान झालेले परिमाण
	(घ.मी.)	(घ.मी)
अ) मऊभूस्तर		
१) मातीमधील खोदकाम	२३,५९,७५३	९,१८,९६५
२) मऊ खडकातील खोदकाम	४६,१६७	३३,९४,०२७
ब)		
१) कठीण खडकातील खोदकाम	१०	०
एकुण	२४,०५,९३०	४३,१२,९९२

उपस्थित मुद्यातील तक्ता ३.३.१ः मध्ये दर्शविलेल्या कठिण भूस्तरातील निविदा परिमाण ४६१७७ घ.मी. नसून वरील प्रमाणे १०.०० घ.मी. आहे. व कार्यान्वित झालेले परिमाण ३३,९४,०२७ घ.मी. नसुन निरंक आहे. करिता कठिण भुस्तराचे काम न झाल्याने कलम ५५ लागू होत नसल्यामुळे गृहित धरण्यात आले नाही.

धरणाची लांबी २१०० मी. असून आगमन व पुच्छ कालव्याची लांबी १८०० मी आहे. १२५% टक्के पेक्षा अधिक परिमाण ३१,५३,३८५ घ.मी. आहे. तसेच जलरोध खंदकाचे खोदकाम व आगमन पुच्छ कालव्याचे खोदकाम मशिनरीव्दारे रस्ता तयार करुन करण्यात आलेले आहेत. यामध्ये मऊ खडकातील खोदकामाच्या परिमाणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. १२५ टक्क्यावरील वाढीव परिमाणा करीता ५ टक्के दराने रस्ते देखभालीची तरतुद करण्यात आलेली आहे. वाढीव खोदकामाचे साहित्य खोदकाम क्षेत्राच्या बाहेर काढण्याकरीता २ कि.मी. ची वहनावळ देण्यात आलेली आहे. त्याकरीता कंत्राटदाराने स्वखर्चाने रस्ता तयार केला. खोदकामाच्या मूळ दरामध्ये दरसुचीनुसार फक्त १५० मी. ची वहनावळ अंतर्भूत आहे. त्यामुळे पुढील २ कि.मी. चा रस्त्याची देखभाल करणे आवश्यक असल्यामुळे ३१.५३ लक्ष घ.मी. साहीत्याची वाहतुक करुन साहीत्याची विल्हेवाट करण्या करिता वारंवार रस्ता दुरुस्त करणे आवश्यक होते. विल्हेवाटीच्या साहित्या करीता जमीन ४ की.मी. अंतरावर संपादीत करण्यात आली त्या ठीकाणी विल्हेवाटीचे साहित्य जमा करण्यात आले. यास्तव १२५% वरील खोदकामांच्या वाढीव परीमाणा साठी व खोदकामातून निघालेल्या अतिरिक्त सामुग्री साठी कंत्राटदारास उभय मान्य दरानुसार (Mutual Agreed Rate) ५% तरतुद करुन अदायगी करण्यात आले.

वरील खुलाशा नुसार पत्रातील कलमाचा चुकीचा अंमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावाकरिता कंत्राटदारास अग्राह्य प्रदान झाले नाही. त्यामुळे वसुली करण्यात आलेली नाही.

महालेखाकार यांचे आक्षेपः-

विभागाने नमुद केल्याप्रमाणे खोदकाम रक्त मऊ भूस्तर मध्ये झालेला कारण मऊ खडक मऊ भूस्तर अंतर्गत मोडतो आणि म्हणून कलम ५५ निविदेतील खोदकाम परिमाणाच्या १२५ऽ पेक्षा जादाच्या परिमाणाकरीता लागू होत नाही ही धारणा खालीलप्रमाणे स्विकारार्ह नाही.

(१) निविदेच्या कलम ५५ अन्वये द्वजर कोणत्याही एका स्वतंत्र बाबीचे (मऊ खडक किंवा कठिण खडक) निष्पादित परिमाण निविदा परिमाणापेक्षा कमी अथवा तेवढेच असेल तर एकूण निविदा परिमाणाच्या (मऊ खडक आणि कठिण खडक दोन्ही एकत्रित धरुन) १२५ टक्क्यांपेक्षा जास्तीच्या सर्व परिमाणाची अदायगी, ज्या बाबीसाठी जास्त परिमाण झाले आहे. त्यासाठी असलेल्या CSR प्रमाणे करावी. करीता निविदेतील परिमाणाच्या १२५% पेक्षा जादाच्या कार्यान्वित झालेल्या परिमाणाकरीता देयक अदा करताना कठीण भूस्तराचे निविदा परिमाण विचारात घेणे अपेक्षित होते.

(२) भूस्तर हे २ प्रकारचे आहेत. मऊ भूस्तर व कठीण भूस्तर. मऊ भूस्तरामध्ये माती, चिकणमाती, मऊ मुरुम व कठीण मुरुम इत्यादीचा समावेश होतो. तसेच कठीण भूस्तरामध्ये मऊ खडक व कठीण खडक यांचा समावेश होतो. विभागाने दाखल केल्याप्रमाणे मऊस्तर मऊ खडकात मोडतो ही बाब अमान्य असून मऊ खडक व कठीण खडक या दोन्हींचा अंतर्भाव कठीण भूस्तरात होतो.

करिता जादा देय केलेले रुपये १८.२० कोटी कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावा.

खोदकामाच्या दरामध्ये अतिरीक्त रु. ११.९० प्रती घ.मी. असा पोहच रस्त्यांच्या देखभालीकरीता समावेश केलेला आहे. तसेच रु. ७.४९ प्रती घ.मी. रस्त्यांच्या देखभाली करीता समावेश केलेला आहे. यावर विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही, कारण कंत्राटामध्ये अशी कुठलीही ज्यादा दराकरीताची तरतुद नाही. सदर बाबी मुळे कंत्राटदारास रु. ३.९४ कोटीचे ज्यादा भुगतान झालेले आहे. अंदाजित खोदकामाच्या परिमाणा पेक्षा कार्यान्वित झालेल्या परिमाणात बरीच बदल झाल्याचे निदर्शनास येतो. वरील बाबीची (मऊस्तर व कठीण भूस्तर दोन्ही) निविदा परिमाण २४०५९३० घ.मी. व प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या परिमाण ४३१२९९२ घ.मी. इतके असून ही १७९ टक्क्यांनी जास्त आहे. इतक्या प्रमाणात झालेला बदल आणि सुधारित संकल्पनामुळे पुच्छ कालव्याची लांबीत झालेली वाढ याची कारणमीमांसा लोकलेखा समिती ला सादर करण्यात यावी.

योगायोगाने, निदर्शनास आणण्यात येते की, दि. २६/०९/२०१७ रोजी झालेल्या लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये सदर परिच्छेदावर चर्चा करण्यात आली आहे. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी सदर परिच्छेद मान्य केला असून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे वचन दिले आहेत.

शासनाचे अनुपालनः-

१. सदर निविदे अंतर्गत खोदकामाच्या बाबी,माती मध्ये खोदकाम व मऊ खडकातील खोदकाम व कठीण खडकातील खोदकाम अशा वेगवेगळ्या घेतल्यामुळे, सदर चुक झालेली आढळते. या एवजी निविदे अंतर्गत खोदकामाची बाब मऊ स्तरावरील खोदकाम व कठीण स्तरातील खोदकाम असे घेतले असते तर मऊ स्तरामध्ये, मऊ खडकासहीत खोदकामाचे परिमाण आले असते. यानुसार खालील बाबी आल्या असत्या.

मऊ स्तरवरील खोदकाम-२४,०५,९२० घ. मी. x ७५.८४ (Avg.) = १८,२४,६५,७३१.००

कठीण स्तरावरील खोदकाम- १० घ. मी. x २४३.१५ = २४३२.००

प्रत्यक्ष झालेल्या परिमाण नुसार मऊ स्तरावरील खोदकाम हे. ४३,१२,९९२ घ.मी. एवढे झाले आहे.

कलम ५५ कंडीशन नं-१ प्रमाणे ज्या बाबीचे परिमाण १२५% पेक्षा जास्त झालेले आहे. त्या बाबी करीता मऊ स्तर व कठीण स्तर दोघांचे परिमाणासह १२५% पेक्षा जास्त झालेले परिमाण (१३,०५,५७९ घ.मी.) नवीन दराने देता येते, या नुसार गणके केली असता रु. १८.१९ कोटीचे जास्त भुगतान झालेले दिसते. याबाबत दि. २६-०९-२०१७ रोजी झालेल्या लोकलेखा समितीचे बैठकी मध्ये प्राप्त निर्देशानुसार राज्यस्तरीय तांत्रिक सलागार समिती, नाशिक यांना शासनाचे दि. २८-०९-२०१७ च्या पत्रान्वये या प्रकरणात सविस्तर चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहे.

सदर चौकशी अंती अंतिम कार्यवाही करण्यात येईल.

२. निविदेतील खंड क्र. II निर्दिष्टे पान क्र. २१ कलम, २.५.० व कलम २.५.१ प्रमाणे मऊ भुसतर व कठीण भुस्तरची परिभाषा स्पष्टपणे निश्चित केलेली आहे. मऊ स्तराचे खोदकामामध्ये मऊ खडकापर्यंतचे म्हणजे माती,मुरूम,कठीण मुरूम,मऊ खडक इत्यादी परिमाणे येत असतात. मात्र कठीण स्तरामध्ये केवळ कठीण खडकाचे परिमाण येते.

३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती,नाशिक कडून होत असलेल्या चौकशी नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४. धरणाच्या सांडवा मध्ये वॅपकोसचे संपल्पना नुसार झालेल्या बदलामुळे पुच्छ कालवा, आगमन कालवा यांच्या रुंदी वाढल्यामुळेतसेच जलरोधी खंदकाचे परिमाणात वाढ झालेली आहे.

५. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती,नाशिक कडून होत असलेल्या चौकशी नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

साक्ष :

परिच्छेद क्र. ३.३ कंत्राटदारास जादा प्रदान

५ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २६ सप्टेंबर, १ नोव्हेंबर, २४ एप्रिल व २६ जून,२०१८ रोजी जलसंपदा विभागाच्या विभागीय सचिव विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक ३.३ च्या खुलाशामध्ये विभागाला समितीसमोर आणखी काही नमूद करावयाचे असेल तर ते करावे. असे समितीने सांगितले असता अमरावती जिल्ह्यातील वासनी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम ज्यात सांडवा, मातीकाम आणि शिर्ष विमोचकाचे बांधकाम समाविष्ट होते. कंत्राटातील कलमाचा अयोग्य, अमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु. २२.१४ कोटी जादा देण्यात आले.

या परिच्छेदामध्ये मुख्य विषय असा आहे की, ठेकेदारांना जे काही पेमेंट केलेले आहे, ते कलम ५५ अंतर्गत करणे क्रमप्राप्त होते. ठेकेदाराचे पेमेंट कलम ३८ अंतर्गत करण्यात आलेले आहे. याबाबत विभागाने मागील दहा दिवसांमध्ये तीन बैठका घेतल्या होत्या. तिस-या बैठकीच्या वेळी विभागाच्या असे लक्षात आले की, ठेकेदारांना पेमेंट कलम ३८ नव्हे तर कलम ५५ अंतर्गत देणे आवश्यक होते. या संदर्भात विभागाने चुकीची कार्यवाही केलेली आहे. कलम ५५ अंतर्गत हे १८.२२ कोटी रुपयांची वसूली होणे बंधनकारक आहे. वसुलीची कारवाई चालू आहे.

कलम ५५ अंतर्गत हार्ड रॉक एस्कव्हेशनचे रेट आणि सॉफ्ट रॉक एस्कव्हेशनवचे रेट यामध्ये व्हेरियेशन आहे. यामध्ये तर हार्ड रॉक एस्कवेशन शून्य आहे. कलम ५५ अंतर्गत सिंगल रॉक एस्कवेशनचे रेट व एका पेक्षा अधिक वेळा रॉक एस्कवेशनचे रेट यामध्येही तफावत आहे, त्याप्रमाणे याचे गणन होणे आवश्यक होते. कलम ५५ ची परिभाषा क्लियर आहे, त्यानुसार ठेकेदाराचे मोड ऑफ पेमेंट निश्चित होणे आवश्यक होते. कलम ५५ अंतर्गत "Mode of payment to quantities of escavation and concrete items executed excess of 125%. Clase No. 38 of B-1 tender form pertains to payment of quantities of different items of schedule B in excess of 125% of tendered quantities. It was to be clarified in case of items of excavation and soft starta and hard strata in present tender this clause will become applicable only if the total quantity of escavation i.e. (quantity given in schedule B of escavation of such strata + quantity given for escavation in hard strata) exceeds 125% execution." तसेच यामध्ये पुढे असे नमूद केले आहे की, "Where quantity of escavation executed exceeds 125% of total of tender quantity of items of excavation in soft strata and in hard strata but quantity executed of any one of individual item is less that or equal to tender quantity for that item all the excess quantity beyond 125% of total tender quantity in terms of escavation of soft strata and hard strata taken together be paid by revising the rate of only that item where excess has occured." याचा अर्थ विभागीय अधिका-यांनी असा लावला होता की, हार्ड रॉक एस्कव्हेशन शून्य असल्यामुळे येथे कलम ३८ लागू करुन त्याप्रमाणे ठेकेदारांना पेमेंट केलेले आहे. हे प्रकरण कलम ५५ अंतर्गत हाताळले असते तर १८.२२ कोटी रुपये इतका एक्सेस खर्च आला नसता.असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत कले. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये पुढीलप्रमाणे नमुद केले आहे. कलम ५५ ऐवजी कलम ३८ अंतर्गत केलेल्या चुकीच्या कार्यवाहीमुळे कंत्राटदारास केलेल्या अतिरिक्त प्रदान रु. १८.२२ रकमेची कोटी वसुली होणे आवश्यक आहे. पर्यावरण मंजुरी अभावी वासनी मध्यम प्रकल्पाचे काम बंद असल्यामुळे राज्यात अन्य ठिकाणी त्या संबंधित कंत्राटदारामार्फत सुरु असलेल्या कामाच्या देयकातून वसुली करण्याबाबत विपाविम, नागपूर यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

विभाग ही रक्कम वसूल करणार आहे, परंतु कोणत्याही कामाचे सर्वप्रथम एक अंदाजपत्रक तयार करण्यात येते. ट्रेल फिट स्ट्राटा खननामध्ये अनेक प्रकारच्या व्हेरियेशन्स येतच असतात. याबाबत समितीचे मत असे आहे की, अशा प्रकारचे मॅनिप्यूलेशन विभागीय अधिकारी मुद्दाम तयार करीत असतात.त याचा दुष्परिणाम म्हणजे अशा प्रकारे अनावश्यक जादा खर्च होत असतो. ज्या अधिका-यांनी याचे एस्टिमेट तयार केले, त्यांनी ट्रायल पिट घेतले असेल, उत्खननामध्ये दहा ते वीस टक्के व्हेरियेशन तर होतच असते, परंतु अशा प्रकारे खर्चामध्ये साठ टक्के व्हेरियेशन येणे, ही संघटित गुन्हेगारीच म्हणता येईल.ल एस्टीमेट आणि फायनल पेमेंट करेपर्यंत ही एक विभागीय अधिका-यांनी केलेली संघटित गुन्हेगारी आहे. याबाबत विभागाचे काय मत आहे ? असे समितीने विचारले असता, या उत्खननामध्ये हार्ड रॉकचा अंदाज दहा क्यूबिक मीटर इतका केला गेला होता. त्याप्रमाणे त्याचे शुल्क अंदाजित केले होते. परंतु या उत्खननामध्ये हार्ड रॉक शून्य आले. दुसरे जे सॉफ्ट रॉक आणि सॉईल, ब्लॅक सॉईलचे एस्कव्हेशन झाले ते २३,६९,००० कोटी रुपयांचे झाले. हार्ड रॉक एस्कवेशन शून्य आले व सॉफ्ट रॉक एस्कव्हेशन वाढले, त्यामुळे याच्या अंदाजपत्रकामधील एस्कव्हेशनही वाढले आहे असे सचिवांनी सांगितले.

विभागीय अधिका-यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार एस्कव्हेशनमधील व्हेरियेशन दहा वीस टक्के वाढले किंवा कमी झाले, परंतु ६० टक्के इतका फरक कसा काय आला ?

विभागाचा मुद्दा जर गृहित धरला तरीही बेसिक क्वांटिटी किती वाढली आणि त्यामध्ये इतका फरक कसा आला हे ट्रायल पिटच्या वेळी थोडे लक्षात येऊन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये अधिका-यांनी बदल करणे अपेक्षित होते. असे समितीने सांगितले असता, ८७ मीटर रुंदी पर्यंत ३१०० क्यूबिक मीटर प्रती सेकंद डिस्चार्ज होता, परंतु डिझाइन फ्लड व्हॅल्यू वाढल्यामुळे या सांडव्यातील डिस्चार्ज वाढलेला आहे. त्यामुळे उत्खननाच्या अंदाजपत्रकामध्ये व्हेरियेशन आलेले आहे. १४० मीटरची वाढ सांडव्याच्या बेसिक विड्थमध्ये करण्यात आलेली आहे. यामुळे क्वांटिटीही वाढलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींने समितीस अवगत केले.

सॉफ्ट रॉक वाढले आणि त्याचबरोबर ब्लॅक सॉईलमध्ये कशी काय वाढ झाली नाही ? वरच्या ब्लॅक सॉईलच्या लेयरचे काय केले ? तज्ज्ञांनी केलेल्या अंदाजपत्रकामध्ये ६० टक्क्यांचे व्हेरियेशन येत असेल तर तज्ज्ञ आणि एक्स्पर्टीज ओपिनियन यांची गरज नाही. अंदाजपत्रकामध्ये आणि प्रत्यक्ष खर्चामध्ये एवढी तफावत कशी आली ?

ही विभागीय अधिका-यांची एक मोडस ऑपरेंडी आहे. शासकीय निधी या माध्यमातून स्क्वीझ करण्यात येतो.यामध्ये जर कोणत्या अधिका-याला पाठीशी घालण्याचे काम करण्यात येत असेल तर ते योग्य नाही. ही बाब गंभीर आहे. यामध्ये दोषी अधिकारी तत्कालीन असतील तर त्यांच्यावर आज सर्व्हिसमध्ये असताना किंवा सेवोत्तर देखील कालबध्द कारवाई होणे आवश्यक आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता सचिवांनी संबंधित उप अभियंता, कार्यकारी अभियंता ज्यांनी हे एस्टीमेट तयार केले होते, ते सेवेत आहेत, त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात येणार आहे. असे समितीस अवगत केले. त्याअनुषंगाने विभागाने सादर केलेल्या अनुपालन अहवालात पुढील प्रमाणे नमुद केले आहे. रा.ता.स.स. (१) नाशिक, यांनी लोकलेखा समितीच्या दि.२६/०९/२०१७ च्या बैठकीतील आदेशानुसार शासनास चौकशी आहवाल सादर केला आहे व चौकशी अहवालाची प्रत लोकलेखा समितीस दि. २४/०१/२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. तथापि, दि. २२/११/२०१७ रोजी लोकलेखा समितीच्या बैठकीत अतिरिक्त मुद्यांबाबत चौकशी करण्याच्या दिलेल्या सूचना अनुसरून शासनाचे दि. २३/०१/२०१८ च्या पत्रान्वये रा.तां.स.स. (१) नाशिक, यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याविषयी कळविले असून चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

संबंधित अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात येईल, हे उत्तर आता बोथट झालेले आहे. यावर पॅरा आल्यानंतर विभागाने यासंबंधी बैठका घेऊन चर्चा केली, त्याअंती यामध्ये दोषी अधिका-यांविरुध्द चौकशी लावण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे, तोपर्यंत विभागाला हे लक्षातच आले नाही, हे योग्य नाही. ही गंभीर बाब आहे. ज्या अधिका-यांनी प्रारुप निविदा तयार करताना इंटरप्रिटेशन ऑफ क्लॉज न झाल्यामुळे जी चूक केली, त्याची सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्यात यावी. असे समितीने निदेश दिले असता, अधीक्षक अभियंता आणि उप अभियंता यांच्याकडून निविदा शर्तींमध्ये इंटरप्रिटेशन ऑफ क्लॉजचा प्रश्न निर्माण झाला होता.सबंधित प्रकरणासंदर्भात जबाबदार अधिका-यांविरुध्द काटेकोर व कठोर कारवाई करण्यात येईल.लअसे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासीत केले. त्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालात पुढीलप्रमाणे नमुद आहे. रा.ता.स.स.(१) नाशिक, यांनी लोलेखा समितीच्या दि. २६/०९/२०१७ च्या बैठकीतील आदेशानुसार शासनाच्या चौकशी अहवाल सादर केला आहे व चौकशी अहवालाची प्रत लोकलेखा समितीस दि. २४/०१/२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. तथापि, दि. २२/११/२०१७ रोजी लोकलेखा समितीच्या बैठकीत अतिरिक्त मुद्यांबाबत चौकशी करण्याच्या दिलेल्या सूचना अनुसरून शासनाचे दि. २३/०१/२०१८ च्या पत्रान्वये रा.तां.स.स. (१) नाशिक, यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याविषयी कळविले असून चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासनाचे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची जी चौकशी करण्यात येणार आहे, ते या प्रकल्पाचे सॅक्शन ॲथॉरिटी होते काय ? तसेच, ज्यांनी ट्रायल पिटस घेतलेली आहे, तो विभाग कोणता आणि त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सन २००८-०९ चे सदर प्रकरण आहे. यामध्ये जे कोणी कार्यकारी अभियंता, उप अभियंता असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. असे समितीस आश्वासित केले. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालात पुढील प्रमाणे नमुद केले आहे. शिर्षकामाचे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करताना Trail pits घेण्यात आलेले नव्हते. तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील तपासणीसूचीमध्ये भूस्तर प्रशासकीय मान्यता नुसार घेण्यात आले आहे. असे रा.तां.स.स. अहवालात नमूद आहे. तथापि, रा.तां.स.स. नाशिक, यांना पुनश्च दि. २३/०१/२०१८ च्या पत्रान्वये चौकशी करण्याचे सूचना देण्यात आलेल्या आहेत. संपूर्ण चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर यासंदर्भात जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

विभागाकडून वसुली करण्यात येईल असे सांगितले आहे.१८ कोटी रुपयांची वसूली करावयाची आहे. परंतु ज्या कार्यकारी अभियंता, उप प्रमुख अभियंता, प्रमुख अभियंता यांनी सदर प्रस्तावाला मंजूरी दिल्यानंतर त्यांना वेतन देण्यात आले. त्यामुळे या सर्व अधिका-यांचे पगार सदर वसुली पूर्ण होईपर्यंत थांबविणार काय? आणि सदरचा निर्णय तत्काळ लागू करणार काय ? असे समितीने विचारले असता या कामाच्या कंत्राटदाराचे अनेक कामे विभागाकडून सुरु आहेत आणि त्यांना द्यावयाचे पेमेंट सुध्दा विभागाकडे प्रलंबित आहे. सदर कंत्राटदाराला १३५ कोटी रुपये द्यावयाचे आहेत. त्यामुळे वसुलीची रक्कम देय रकमेतून वसूल करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अधिका-यांची चौकशी करीत असताना कनिष्ठ अधिका-यापासून ते वरिष्ठांपर्यंत चौकशीची कारवाई केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, संबंधीत अधिका-यांची विभागीय चौकशी तत्काळ सुरु करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

महालेखापालांचा मूळ मुद्दा असा आहे की, खडक आणि मऊ खडक असे जे वर्गिकरण केलेले आहे तसे वर्गिकरण त्यांच्यानुसार करण्याची कोणतीही पध्दत नाही आणि असे असताना कशा प्रकारे विभागाने खडकांची वर्गवारी केलेली आहे ? असे समितीने विचारले असता भूगर्भामध्ये काळी माती खूप मोठ्या प्रमाणावर आहे. मातीच्या खालच्या भागामध्ये मुरुम असतो. मुरुमापेक्षा थोडा कठीणण असतो आणि जो ब्लास्टने फोडावा लागतो तो कठीण खडक.कलम ५५ चा जो मुद्दा आहे त्यामध्ये केवळ दोनच सॉफ्ट स्ट्राटा आणि हार्ड स्ट्राटा आहे. परंतु निविदेच्या अनुसूची 'ब' मधील आयटेम मध्ये सॉईल, सॉफ्ट स्ट्राटा आणि हार्ड स्ट्राटा, असे तीन प्रकार आहेत. त्यामध्ये त्यांनी डी.टी.पी. करीत असताना तिसरा घटक सुध्दा कलम ५५ मध्ये अंतर्भूत करावयास पाहिजे होता, जो की, त्यांनी केलेला नसल्यामुळे त्यांची यामध्ये चूक झालेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

स्ट्रेटामध्ये केवळ एकाच प्रकारचे वर्गिकरण असताना अशा प्रकारचे वर्गिकरण का करण्यात आले ? This seems to be conspiracy right from the inception of project समितीचे असे मत आहे की, हा विषयं गांभिर्याने घेऊन यासाठी तीन महिन्यामध्ये याबाबतचे आऊटपुट सादर करता आले तर, विभागामध्ये चांगला संदेश जाईल. अशी सुचना समितीने केली असता यासाठी एस.एल.टी.ए.सी. नियुक्त केलेली आहे. तीन महिन्यामध्ये याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालात पुढील प्रमाणे नमुद केले आहे. रा.तां.स.स. नाशिक यांच्याकडून संपूर्ण चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

समितीच्या मते कंत्राटदाराकडून व्याजाची रक्कम वसूल करता येणार नाही. कारण जर अधिका-यांची चूक असेल आणि जे कॅलक्युलेशन करण्यात आले आणि त्यामुळे अतिरिक्त रक्कम द्यावी लागली. याबद्दल कोणावर तरी जबाबदारी निर्धारित करण्यात यावी असे मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्याबाबत चौकशी करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुपालन अहवालात पुढील प्रमाणे नमुद केले आहे. रा.तां.स.स. नाशिक यांच्याकडून संपूर्ण चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

कलम ५५ च्या ऐवजी कलम ३८ प्रमाणे पेमेंट करण्यात यावे, यासाठी अंतिम मंजूरी कोणी दिलेली होती ? आणि कोणाची शिफारस होती ? याबाबतच्या नस्तीची पुढील साक्षीच्या वेळेस समितीपुढे सादर करण्यात यावी. असे समितीने सुचित केले.

याबाबत विभागाकडून सदर नस्ती प्राप्त (विवरणपत्र क्र. ६)

परिच्छेद क्रमांक ३.३ मध्ये विभागाने कंत्राटदारास ३ कोटी रुपये रस्त्याच्या लीडसाठी दिलेले आहेत. त्या संदर्भात काय जस्टीफिकेशन आहे. कारण मटेरीयलच्या लिफ्टींगसाठी वेगळा निधी दिला आहे. तसेच ॲप्रोच रस्त्यासाठी सुध्दा वेगळा निधी दिला आहे. याबद्दल टेंडरमध्ये तरतूद नव्हती. याबाबत माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता या निविदेतंर्गत ज्या ज्या रोडचे काम क्वारीसाठी करावयाचे होते ते काम कंत्राटदाराने मटेरीयलसह स्वतः करावयाचे होते आणि मेन्टेन करावयाचे होते. या क्वॉन्टीटी १२५ टक्क्यांच्या पुढे बियॉन्ड टेंडर क्वालिटी घडल्या आहेत. आपल्याकडे जो सॉफ्ट स्ट्राटा होतो तो धरण्याच्या आत बेसीनमध्ये ठेवता येत नसल्यामुळे तो स्ट्राटा बाहेर काढणे आवश्यक होते. धरणाच्या बाहेर दोन किलो मीटर ते डिस्पोजेबल करण्यात आले आणि त्या ठिकाणी ते स्टॅक केले आहे. हे परिमाण निविदा क्वॉन्टीटीच्या बाहेरचे असल्यामुळे कंत्राटदारांने त्या खर्चाची मागणी केली होती. त्या काळामध्ये म्युचूअली ॲग्रीड रेटमध्ये त्या आयटमचा ५ टक्के निधी रोड मेन्टेनन्ससाठी दिलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

या संदर्भातील विभागाची ५ सदस्यीय मुख्य अभियंत्यांची जी समिती आहे त्या समितीने स्पॉट व्हिजीट करावी. त्यामध्ये त्यांना ब्लॅक सॉईल आणि रॉक किती टाकले या दोन्ही बाबी निदर्शनास येतील. त्यानुसार ते किती प्रमाणात लीड केले व कोठे टाकले हे दिसून येणार असल्यामुळे त्यांचा समावेश चौकशीमध्ये करावा. असे निदेश समितीने दिले.

समितीने सांगितल्याप्रमाणे तसे करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. त्याअनुषंगाने विभागाने केलेल्या कारवाईबाबत समितीस सादर केलेल्या अनुपालन अहवालामध्ये पुढील प्रमाणे नमुद केलेले आहे. महासंचालक तथा अध्यक्ष रातांसस-१ यांचे दिनांक ५.१०.२०१७ च्या आदेशाने नेमलेल्या उपसमितीच्या सदस्यांनी (रातांसस कार्यालय, नाशिक चे दोन कार्यकारी अभियंता व दोन उपविभागीय अभियंता/अधिकारी) दिनांक ११.१०.२०१७ व १२.१०.२०१७ रोजी कार्यक्षेत्रावर जाऊन पाहणी केलेली आहे. भूगर्भ सर्वेक्षणाकरीता म.सं.स. नाशिक, मधील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी दि.२४.१.२०१८ रोजी प्रकल्पास भेट दिली असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच सादर करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.

कंत्राटदाराने अप्रोच असण्यासाठी निधी घेतला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी २ किलोमिटर्स अंतरावर ३१ लाख क्युबिक मिटर्स टाकण्यात आले आणि त्यासाठी ज्या रस्त्यांचे काम केले त्यासाठी हा निधी देण्यात आला आहे असे समितीस अवगत केले.

विभागाने जी डबल बेनिफिट योजना राबविली तशी ती महाराष्ट्रात अन्यत्र कोठे दिसली आहे काय, समितीच्या माहितीप्रमाणे हे एकमेव उदाहरण आहे. हे युनिक आहे काय ? अशी विचारणा केली असता,अशा प्रकारची पहिलीच केस पाहण्यात आली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

How it can be applicable here ? This matter is very serious because that file must have gone to the C.E. and E.D. त्यांनी या सर्व गोष्टी पाहणे अभिप्रेत होते. आता हे प्रकरण ज्युनिअर इंजिनिअरपर्यंत राहिलेली नाही, हे विभागाने लक्षात घ्यावे. असे समितीने सांगितले असता we are not justifying it. We will inquire into the matter. कदाचित ही फाईल ईडी यांच्यापर्यंत पोहोचली असेल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही फाईल ईडीपर्यंत पोहोचली असेल. तर विभागाने हे समजून घेऊन त्या चौकशीमध्ये इन्क्लूड करावे. आता हे प्रकरण ज्युनिअर इंजिनिअर आणि त्या कार्यकारी अभियंत्यापुरती मर्यादित राहिलेली नाही तर डबल बेनिफिट योजना ज्या कंत्राटदारास दिली आहे, ती फाईल राईट अप टू ईडी अशी गेली आहे आणि त्यांनी ही फाईल न पाहताच सही केली असेल किंवा त्या फाईलवर त्यांनी ॲब्जेक्शन घेतले नसेल तर त्यांचे इन्व्हॉल्वमेंट असल्याचे दिसते. त्यामुळे विभागाने या चौकशीचा स्कोप वाढवावा. असे समितीने सूचित केले.

या वाढीव खर्चाची फाईल महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष तथा मंत्री महोदयांपर्यंत गेली असेल असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, यामध्ये जे काही झाले असेल त्याची चौकशी झाली पाहिजे.व्हीआयडीसीमध्ये बोर्डाच्या ईडीने प्रस्तावित केल्यानंतर ती फाईल थेट चेअरमनकडे जाते. त्यामध्ये प्रधान सचिवांचा संबंध येत नाहीकाय असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी ती फाईल डायरेक्ट चेअरमनकडे जाते असे समितीला सांगितले.

समितीने जे जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्रांसह समितीला सादर करावे विभागामार्फत एसएलटीएसी कडून करण्यात येणा-या चौकशी अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा असे समितीने निदेश दिले. तसेच येणा-या अधिवेशानामध्ये या विषयांच्या संदर्भातील अहवाल समितीला सभागृहाला सादर करावयाचा आहे आणि अधिवेशनाला आता फक्त अडीच महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. विभागाने समितीला ३० नोव्हेंबरपर्यंत अहवाल सादर करावा. असेही समितीने निदेश दिले असता विभागीय सचिवांनी हा अहवाल ३० नोव्हेंबरपर्यंत या समितीला सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. त्याअनुषंगाने विभागाने केलेली कारवाईबाबत अनुपालन अहवालात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. रातांसस १ नाशिक यांच्या चौकशी अहवालाची प्रत लोकलेखा समितीस दि.२४/१/२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवालात अधिका-यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. तसेच संबंधित नस्ती लो.ले समितीस दि. २२/११/२०१७ च्या साक्षीच्या आधी सादर करण्यात येईल.

(विभागाकडून प्राप्त झालेला चौकशी अहवाल सोबत जोडलेला आहे. विवरण क्रमांक ७)

दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये परिच्छेद क्रमांक ३.३ वर चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने विभागाकडून एका नस्तीची प्रत समितीला देण्यात येणार होते. सदर नस्तीची प्रत अजूनपर्यंत समितीला मिळालेली नाही. त्याचप्रमाणे सर्व अधिका-यांची नावासह यादी सुध्दा समितीला देण्याचा निर्णय झाला होता. मात्र ती यादी सुध्दा मिळालेली नाही. या संपूर्ण

प्रक्रियेमध्ये ज्या ज्या लोकांनी चुका केलेल्या आहेत त्या सर्वांची नावे मागविली होती. ती सुध्दा दिलेली नाहीत. त्याचबरोबर या विषयावर दिनांक ६ ऑक्टोबर २०१० रोजी ए.जी. यांनी पुन्हा एकदा अहवाल पाठविला आहे. त्यात असे म्हटले आहे की, To justify the excess payment made by the department याबद्दल पाठविलेल्या अतिरिक्त नोटसंबंधी आश्वासित माहिती आज आपण सादर केलेली नाही. त्याचबरोबर एसएलटीसी पासून सर्व प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना मागच्या बैठकीमध्ये देण्यात आल्या होत्या. ती माहिती येत्या ३० नोव्हेंबर २०१७ पूर्वी द्याल अशी समितीची सूचना आहे. दिनांक ६ ऑक्टोबर २०१७ रोजी ए.जी.नागपूर यांचेकडून सचिव, जलसंपदा यांना पुन्हा जे व्हेटींग करुन पाठविण्यात आले त्याचाही विचार एसएलटीसीच्या चौकशीमध्ये करण्यात यावा. तसेच जे अधिकारी या सर्व प्रकरणांमध्ये गुंतलेले असून ज्यांच्यावर कार्यवाही अपेक्षित आहे त्या सर्वांची नावानिशी यादी व संबंधित नस्ती पुढील ८ दिवसात या समितीला सादर करावी आणि दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ च्या आत एसएलटीसीचा अहवाल समितीला सादर करावा की, असे समितीने निदेश दिले.

त्यासंदर्भात विभागाने सादर केलेल्या अनुपालन अहवालात पुढील प्रमाणे नमुद केले आहे. रा.ता.स.स. नाशिक यांच्या चौकशी अहवालाची प्रत लोकलेखा समितीस दि. २४-०१-२०१८ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. सदर चौकशी अहवालात अधिका-यांची नावे नमुद करण्यात आली आहेत. तसचे संबंधित नस्ती लो.ले.समितीस दि. २२-११-२०१७ च्या साक्षीच्या आधी सादर करण्यात आली आहे.

३.३ कंत्राटदारास जादा प्रदान :

दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजीचा परिच्छेदाबाबत साक्ष अपूर्ण होती वासनीबाबत वारंवार तारखा वाढत चालल्या आहेत. विभागाने या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा माहिती द्यावी असे समिती सांगितले.विभागीय सचिवांचे याबाबत खुलासा करताना सांगितले की,दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वासनी प्रकल्पासंदर्भात साक्ष झाली आणि त्यामध्ये असे आश्वासन दिले होते की, जी काही त्यांची २२ कोटी रुपयाची रिकव्हरी आहे, विभागाकडून त्याची दुस-या प्रोजेक्टमधून वसूली करण्यात येईल.कारण जशी पुढची साक्ष झाली, २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी काही मुद्दे उपस्थित केले होते, त्याप्रमाणे त्यावेळी विभागाने आश्वासन दिले होते की, याची एसएलएटीसीमार्फत पाच इंजिनियर्सची चौकशी समिती स्थापन करुन डिटेल चौकशी अहवाल लोकलेखा समितीला सादर करण्यात येईल. त्यानंतर समितीने विभागाला २८ मार्च पर्यंत वेळ दिला होता.

यानंतर समितीने नोव्हेंबर २०१७ मध्ये बैठक झाली, त्यामध्ये समितीने त्या प्रकल्पाच्या काही विषयाबद्दल नवीन मुद्दे मांडले. त्यानंतर त्या विषयावर विभागाने सांगितले की, याबद्दल सुध्दा चौकशी करण्यात येईल असे सांगितले असता, विभागीय सचिवांनी ती ऑर्डर आपण २३ किंवा २४ जानेवारी, २०१८ ला काढली कारण दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त विभागाकडे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी प्राप्त झाले आणि दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी विभागाने चौकशी लावली, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला आश्वासन देऊनही विभाग दोन महिन्यापासून निष्क्रिय आहे. विभागाकडून वारंवार वेळ वाढविण्याची विनंती करण्यात येत आहे हे योग्य नाही. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी १७ जानेवारी, २०१८ रोजी विभागाकडे कार्यवृत्त प्राप्त झाल्यानंतर २३ जानेवारी, २०१८ रोजी चौकशीचे आदेश दिले. २१ मार्च, २०१८ रोजी समितीने विभागाला पत्र दिले, त्यानुसार विभाग सध्या रिपोर्ट तयार करीत आहेत, ते बेस्ड ऑन डिटेल जीपीएस प्रमाणे आहे असे समितीला सांगितले.

परिच्छेद क्र.३.३ : कंत्राटदारास जादा प्रदान :

उपरोक्त परिच्छेदाबाबत विभागाकडून चौकशी अहवाल समितीला सादर करण्यात येणार होते. विभागाने सदरहू अहवालाबाबतचे म्हणणे मांडावे असे समितीने निदेश दिले असता, विभागाला या संदर्भात सूचना प्राप्त झाल्या होत्या. सन्माननीय सदस्यांचे एक पत्र लोकलेखा समिती मार्फत प्राप्त झाले होते. त्यामध्ये असे नमूद केले होते की, प्रकल्पाच्या प्रत्यक्ष खोदकामाच्या परिणामीविषयी विभागाकडून उपलब्ध कागदपत्रे तपासून शासनास अहवाल सादर करावा. त्यादृष्टीने विभागाने विदर्भ पाटबंधारे सिंचन महामंडळाला सूचना दिल्या होत्या की, ज्यांचा कामाशी संबंध नाही अशी एक त्रयस्थ समिती गठित करून त्यांच्याकडून प्रत्यक्ष झालेल्या कामाची मोजमापे तपासून अहवाल सादर करावा त्यांचा अहवाल विभागाकडे सादर झालेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्या अहवालावर विभागाचे काय मत आहे ? असे समितीने विचारले असता, शासन त्या अहवालाशी सहमत आहे. त्यांनी प्रत्यक्ष मोजमापे घेऊन परिमाण परिगणित केले आहे. त्यामध्ये रेकॉर्डेड क्वांटिटीपेक्षा साधारणतः १,३२,९२७७ घन मीटर एवढे परिमाण अधिक्य दिसून येत आहे. तसेच, एक्सेस पेमेंट झालेले दिसत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एक्सेस पेमेंटची अमाऊंट किती होती ? असे समितीने विचारले असता, त्यांनी ओव्हरऑल क्वांटिटी दिली आहे. व्ही.आय.डी.सी.कडे ही जबाबदारी देण्यात आली होती. थर्ड पार्टी म्हणजे एक कार्यकारी अभियंता, त्यांच्या विभागात नसलेले एक उप अभियंता व त्यांच्या उप विभागात नसलेले ३ शाखा अभियंता अशी १ टिम तयार केली. आता जे एक्सपर्ट्स मेझरमेंटस आहेत ते फक्त टेल व अपर चॅनेलचे आहेत. सी.ओ.टी. वगैरेचे सर्व एक्सलेशन्स आता धरणाच्या खाली आहेत. यापैकी साधारणतः १ लाख ११ हजार क्युबिक मीटरची क्वांटिटी एक्सेस दिसत आहे. ती ॲप्रोच चॅनेलमध्ये आहे. २१ हजार इतकी क्वांटिटी टेल चॅनेलमध्ये आहे. १ लाख ११ हजार क्युबिक मीटरची क्वांटिटी ॲप्रोच चॅनेलमध्ये आहे. ती त्यावेळेस सॉफ्ट म्हणूनच देण्यात आलेली आहे. त्याचा रेट हा ५९ रुपये प्रती घन मीटर असा आहे. ती साधारणतः ६० ते ७० लाख रुपयांची अमाऊंट होईल. टेल चॅनेलचा जो पोर्शन आहे, त्या ठिकाणी २१ हजार क्युबिक मीटर आहे. तेथील रेट मात्र जास्त असून तो साधारणतः १५९ ते १६० रुपये आहे. साधारणतः १ कोटी पर्यंत ही किंमत जाते. मूळचे जे क्लासीफिकेशन आहे ते मेनटेन करुन जे रेकॉर्डवर क्लासिफिकेशन आहे त्याप्रमाणे ही एक्सेस अमाऊंट आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने समितीला पहिला अहवाल सादर केला. त्यानंतर समितीला जो दुसरा अहवाल सादर केला तो विथ्ड्रॉ केला. तिसरा अहवाल त्रयस्थ समितीकडून आणला. आज समिती त्या अहवालावर चर्चा करीत असतांना विभागाकडे अपूर्ण माहिती आहे. समितीने या विषयावर किती वेळ चर्चा करायची ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला.

विभागाने अहवाल समितीला सादर केला. मात्र विभागाने दुसरा अहवाल समितीला सादर केल्यानंतर तो विथ्ड्रॉ का केला ? पहिल्या व दुस-या अहवालामध्ये काय फरक आहे ? असे समितीने विचारले असता, विभागाने पहिला अहवाल सादर केला होता. दुसरा अहवाल सादर करण्याच्या सुमारास विभागाला समितीकडून पत्र प्राप्त झाले की, सविस्तर कागदपत्रे तपासून अहवाल करावा. पहिल्या अहवालामध्ये विभागाने एस.एल.टी.सी.ला सुरुवातीला तपासणी करायला सांगितली होती की, यामध्ये क्लॉज ५५ विचारात न घेता, क्लॉज ३८ चे इंटरप्रिटेशन चुकीचे करून हे घडलेले आहे. त्याला कोण जबाबदार आहे किंवा ही नेमकी अमाऊंट किती येते ? असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने प्रकल्पाच्या मोजमापाबाबत ॲक्चुअल साईटवर जाऊन तपासावे असे पत्र दिले होते असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविले.

पहिल्या अहवालाचे फार्इंडिंग्ज काय होते व या अहवालातील फार्इंडिंग्ज काय आहेत ? असे समितीने विचारले असता, त्या अहवालाबाबत विभागाचे असे म्हणणे होते की, ते इनडायरेक्ट मेथड वरील मेझरमेंट आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन टिम गठित करुन कारण सी.डी.ओ. मेरीचे अधिकारी आहेत रिसर्च डिझाईनचे अधिकारी एस.एल.ए.टी.सी.ला मदतीला असल्यामुळे त्यांच्याकडे अशी फिल्ड यंत्रणा नसल्यामुळे त्यांच्याकडून शेवटी सॅटेलाईट तंत्रज्ञानाच्या आधारे तयार केलेला अहवाल सादर केला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे असे म्हणणे आहे की, एकदा अहवालाचा रिपोर्ट तयार झाला, तो समितीला सादर केला. दुस-यांदा तयार झालेला अहवाल विथ्ड्रॉ करण्याचे काय कारण आहे, समितीने दिलेल्या निदेशावरुन ती चौकशी झाली होती, मग समितीला त्या अहवालाची प्रत सादर केलीच पाहिजे, विभागाने पहिला अहवाल सॅटेलाईट गुगल वरुन केला. तो प्रत्यक्ष साईटवर जाऊन केला

नव्हता. त्यामुळे समितीने विभागाला असे पत्र दिले की, विभागाने ॲक्चुअल साईटवर अधिकारी पाठवून मोजमाप करावे. त्याप्रमाणे दुसरा अहवाल तयार करावयाचा होता, हा अहवाल त्रयस्थ समितीने तयार केलेला तिसरा अहवाल आहे. विभागाने समितीला पहिला अहवाल सादर केला त्यानंतर दुसरा अहवाल समितीला सादर केला व तो विथ्ड्रॉ केला. मग त्रयस्थ समिती नेमली व परत तिसरा अहवाल समितीला सादर केला आहे. विभागाने समितीला पहिल्या, दुस-या व त्रयस्थ समितीच्या तिस-या अहवालाची प्रत सादर करावी. समिती त्यावर निर्णय घेईल असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

त्रयस्थ समितीचा अहवाल तयार झाला आणि लोकलेखा समितीची साक्ष लागली तेव्हा किती नुकसान झाले, काय झाले, किती रिकव्हरी करायची आहे, कोण जबाबदार आहे, या अहवालावर विभागाचे काय मत आहे, यासाठी कोण जबाबदार आहे, कोण अधिकारी विभागाला प्राथमिकतः जबाबदार दिसतात, शासनाचे किती रुपयांचे नुकसान झालेले आहे, त्याची वसुली करण्याचे काय नियोजन आहे ? तसेच तिस-या अहवालावर विभागाचे काय म्हणणे आहे, असे समितीने विचारले असता, विभागाने जे सांगितले त्यानुसार साधारणतः १ कोटी रुपयांपर्यंतची एक्सेस अमाऊंट होते. ज्यांनी हे एक्सेस मेझरमेंट बुकमध्ये रेकॉर्ड केले त्यासंबंधित कनिष्ठ अभियंता, डेप्युटी इंजिनिअर व कार्यकारी अभियंता आहेत. मोजमापाची जबाबदारी ही डिव्हीजन लेव्हलपर्यंत कार्यकारी अभियंत्यांपर्यंत सीमित असते. वरिष्ठ अधिकारी त्यामध्ये येत नाहीत. या तिन्ही टप्प्यांवरील अधिका-यांवर विभागीय शिस्तभंगाची कारवाई निश्चितपणे सुरु करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिस्तभंगाच्या कारवाईने कसे होईल ? विभागाच्या चौकशी अहवालाप्रमाणे १ कोटी रुपयांचे जास्त मेझरमेंट केले आहे. मेझरमेंट करणा-या अधिका-यांची जबाबदारी आहे की, त्यांनी साईटवर जाऊन मेझरमेंट केले पाहिजे. हा तर फ्राड आहे ? यामध्ये दोन गोष्टी झाल्या पाहिजेत. रिकव्हरी फिक्स झाली पाहिजे व गुन्हेही दाखल झाले पाहिजेत. तसेच ही वसुली कोणाकडून करणार ? असे समितीने विचारले असता, जे एक्सेस पेमेंट झालेले आहे त्याची पूर्ण वसुली कंत्राटदाराच्या देयकातून करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग कंत्राटदाराकडून वसुली करणार आहे हा एक भाग झाला. कंत्राटदाराकडील वसुलीची सद्यःस्थिती काय आहे, याची माहिती द्यावी. परंतु, ज्या अधिका-यांनी या सर्व गोष्टी केल्या आहेत त्यांच्यावर फक्त शिस्तभंगाची कारवाई होणे पुरेसे आहे काय ? या गोष्टी जर महालेखापालांच्या निदर्शनास आल्या नसत्या, तर शासनाचे नुकसान झाले असते.जे जे.ई. आहेत, जे डेप्युटी इंजिनिअर आहेत, त्यांना निलंबित करुन या सर्व गोष्टी पुढे केल्या पाहिजेत असे समितीने मत व्यक्त केले.

बिलाचे पेमेंट हे डिव्हीजन लेव्हलवर केले जाते. मेझरमेंट रेकॉर्ड करण्याची जबाबदारी जे.ई.ची आहे. ५ टक्क्यांपर्यंत मोजमापाच्या तपासाची जबाबदारी कार्यकारी अभियंत्यांची असते. ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम असेल किंवा जेथे रनिंग बिलाची रक्कम अडीच लाखांपेक्षा जास्त असते अशा ठिकाणी कार्यकारी अभियंत्यांनी नियमानुसार ५ टक्के मोजमापे तपासावयाची आहेत. तसेच उप अभियंत्यांनी १०० टक्के तपासणी करणे अपेक्षित आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाचे ३ चौकशी अहवाल आहेत. तिन्ही चौकशी अहवालांमध्ये विभागाने हे मान्य केले आहे फ्रॉड झालेला आहे. अतिरिक्त पेमेंट झालेले आहे. मेझरमेंटमध्ये गडबड आहे. गैरप्रकार करणा-या अधिका-यांना तातडीने निलंबित केले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

तिसरा अहवाल परवा संध्याकाळी प्राप्त झालेला आहे. त्याच्या आधारावर संबंधित कोण अधिकारी होते त्यांची तातडीने माहिती घेतली जाईल. आज सेवेत कोण आहे, काही अधिकारी सेवानिवृत्त झाले असतील तर ही सर्व माहिती घ्यावी लागेल कारण हे प्रकरण ८-९ वर्षांपूर्वी घडलेले आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या विषयावर आज तिस-यांदा साक्ष होत असताना विभागाला ते अधिकारी आहेत की नाहीत, ते सेवानिवृत्त झाले आहेत काय, ते प्रमोशनवर आहेत का, ते कोठे आहेत याची अजूनही माहिती नसेल तर ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. ते अधिकारी कोणकोणत्या पदावर, कोठेकोठे काम करीत आहेत, त्या अधिका-यांची नावे सांगावित असे समितीने निदेश दिले असता, हे प्रकरण सन २००८-२००९ मधील आहे.

विभागासमोर जी ३ अधिका-यांची नावे आलेली आहेत त्यामध्ये श्री.मातकर, कार्यकारी अभियंता हे आता सेवानिवृत्त झालेले आहेत. दिनांक २४.१२.२००८ ते दि.२०.१.२००९ या कालावधीत जे पेमेंट झालेले आहे, त्या कालावधीत श्री.रवी मातकर हे कार्यकारी अभियंता होते. श्री.मंडकर, सहायक अभियंता, श्रेणी-१ हे आता गोसीखुर्द येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहेत. श्री. र.पा. विरुळकर, शाखा अभियंता हे देखील सेवानिवृत्त झाले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सेवानिवृत्त झाल्यानंतरही ३ वर्षे विभाग कारवाई करु शकते. विभागाने या तिन्ही अधिका-यांवर कारवाई करावी. पुढील महिन्यात या विषयावरील साक्षीचे आयोजन करण्यात आलेले आहे, नाही तर समितीला शिफारस करावी लागेल असे समितीने मत व्यक्त केले.

(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्रमांक ८ ते १६)

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र. ३.३ : 'कंत्राटदारास जादा प्रदान'

अभिप्राय

६. अमरावती जिल्हयातील वासनी मध्यम प्रकल्पाचे बांधकाम ज्यात सांडवा,मातीकाम आणि शीर्ष विमोचकांचे बांधकाम समाविष्ट होते,एका कंत्राटदारास रु.११९.९७ कोटी किंमतीवर बहाल करण्यात आले. (ऑगस्ट २००८) जे ऑगस्ट २०१२ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रकल्प पूर्ण करण्याची निर्धारित तारीख दोनदा वाढविण्यात येऊन ऑगस्ट २०१७ करण्यात आली आणि कंत्राटदाराला जुलै २०१६ पर्यंत रु.२५७.२५ कोटी प्रदान करण्यात आले. कराराच्या कलम ५५ मध्ये विनिर्दिष्ट असल्याप्रमाणे कार्य निष्पादनाच्या वेळी जर खोदकामाचे एकूण परिमाण (मऊस्तर खडक आणि कठिण स्तर खडक) निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर मऊस्तर खडक आणि कठिणस्तर खडक दोहोंच्याही एकत्रित जास्तीच्या परिमाणाची अदायगी प्रचलित दर अनुसूचीनुसार (CSR)करावयाची होती. कलम ५५ मध्ये पुढे असे विनिर्दिष्ट आहे की जर कोणत्याही एका स्वतंत्र बाबीचे (मऊ खडक किंवा कठिण खडक) निष्पादित परिमाण निविदा परिमाणापेक्षा कमी अथवा तेवढेच असेल तर एकूण निविदा परिमाणाच्या (मऊ खडक आणि कठिण खडक दोन्ही एकत्रित धरुन) १२५ टक्क्यांपेक्षा जास्तीच्या सर्व परिमाणाची अदायगी,ज्या बाबीसाठी जास्त परिमाण झाले आहे,त्यासाठी असलेल्या CSR प्रमाणे करावी. ह्या करारांतर्गत निविदा परिमाणाच्या तुलनेत जेव्हा मऊस्तर खडकांमधील खोदकामाच्या प्रत्यक्ष परिमाणात लक्षणीय घसरण झाली तेव्हा कठिणस्तर खडकांमध्ये अवाजवी वाढ झाली. अशा प्रकारे,कलम ५५,अन्वये एकूण निविदा परिमाणाचे १२५ टक्के (३०,०७,४१२ घनमीटर) कंत्राटदारास निविदा किंमतीवर देय होते,कठिणस्तर खडकामध्ये खोदकामासाठी (जेथे अतिरिक्त झाले आहे) १२५ टक्क्यांच्या (१३,०५,५८० घनमीटर) वर CSRप्रमाणे (रु.२४९.८५ प्रति घनमीटर) दराने देय होते. परंतु विभागाने CSR दराने (रु.२४९.८५ प्रति घनमी) कठिणस्तर खडकांच्या खोदकामासाठी (३१,५३,३८५ घनमीटर) कंत्राटदारास रु.७८.७९ कोटी प्रदान केले. जेव्हा की कठीणस्तर खडकांच्या खोदकामासाठी कंत्राटदारास रु.२४९.८५ प्रति घनमी या CSR दराने अदायगी केवळ १३,०५,५८० घनमीटर साठीच मर्यादित करावयाची होती. अशाप्रकारे,कठिण खडकातील १८,४७,८०५ घनमीटर (३१,५३,३८५ घनमीटर - १३,०५,५८० घनमीटर) अतिरिक्त परिमाणाच्या खोदकामासाठी निविदा दर (रु. १५१.३२ प्रति घनमीटर) न लावता CSR दर (रु. २४९.८५ प्रति घनमीटर) लावल्यामुळे कंत्राटदारासरु.१८.२० कोटी जादा प्रदान झाले. याशिवाय,कठीणस्तर खडकातील खोदकामाच्या अतिरिक्त परिमाणासाठी CSR (रु.२४९.८५ प्रति घनमीटर) दर काढतांना धरण पोच रस्त्याच्या रखरखावासाठी रु.११.९० प्रति घनमीटर अशी अतिरिक्त किंमत त्यात लावली. तसेच,धरणस्थळी उत्खनन केलेल्या खोदकाम साहित्यांच्या विल्हेवाटीचे दर (रु.१५७.३० प्रति घनमीटर) ठरवितांना रु.७.४९ प्रति घनमीटर अशी पोच रस्त्याच्या देखभालीसाठीची किंमत त्यात लावण्यात आली. अतिरिक्त किंमत लादण्यासाठी करारात कोणतेही सहाय्यभूत कलम नव्हते,त्यामुळे कंत्राटदारास रु.३.९४ कोटीचे जादा प्रदान करण्यात आले. अशाप्रकारे,कंत्राटातील कलमाचा चुकीचा अंमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी कंत्राटदारास अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु.२२.१४ कोटी जादा प्रदान केले गेले.

६.१ महालेखाकारांनी सदरहु परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असून यासंदर्भात शासनाच्या अभिप्रायामध्ये विभागाने नमुद केल्याप्रमाणे कलम ५५ लागू करणेबाबत विभागास कोणतेही ठोस आदेश/सूचना प्राप्त न झाल्यामुळे सुधारात्मक कारवाई करण्यात आली नाही व त्यामुळे कंत्राटदाराकडून वसुली करण्यात आली नाही. तसेच खोदकाम फक्त मऊ भूस्तर मध्ये झालेले आहे. कारण मऊ खडक मऊ भूस्तर अंतर्गत मोडतो आणि म्हणून कलम ५५ निविदेतील खोदकाम परिमाणाच्या १२५% पेक्षा जादाच्या परिमाणाकरीता लागू होत नाही अशी भूमिका विभागाने स्विकारली. परंतु विभागाची ही धारणा निश्चितच स्विकारार्ह व समर्थनीय नाही, कारण विभागाने कंत्राट कलमांचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित होते आणि कंत्राटातील कलमांचे अर्थउकल करण्यात कोणत्याही प्रकारची संदिग्धता अभिप्रेत नव्हती. त्याचप्रमाणेनिविदेच्या कलम ५५ नुसार जर कोणत्याही एका स्वतंत्र बाबीचे (मऊ खडक किंवा कठिण खडक) निष्पादित परिमाण निविदा परिमाणापेक्षा कमी अथवा तेवढेच असेल तर एकूण निविदा परिमाणाच्या (मऊ खडक आणि कठिण खडक दोन्ही एकत्रित धरुन) १२५ टक्क्यांपेक्षा जास्तीच्या सर्व परिमाणाची अदायगी,ज्या बाबीसाठी जास्त परिमाण झाले आहे. त्यासाठी असलेल्या क्व्डप्रमाणे करावी. याआधारे निविदेतील परिमाणाच्या १२५% पेक्षा जादाच्या कार्यान्वित झालेल्या परिमाणाकरीता देयक अदा करताना कठीण भूस्तराचे निविदा परिमाण विचारात घेणे अपेक्षित होते. तसेच भूस्तरामध्ये मऊ भूस्तर व कठीण भूस्तर याचा समावेश असून मऊ भूस्तरामध्ये माती,चिकणमाती, मऊ मुरुम व कठीण मुरुम इत्यादीचा समावेश होतो. तसेच कठीण भूस्तरामध्ये मऊ खडक व

कठीण खडक यांचा समावेश होतो. विभागाने दाखल केल्याप्रमाणे मऊ खडक मऊ भूस्तरात मोडतो ही बाब अमान्य असून मऊ खडक व कठीण खडक या दोन्हींचा अंतर्भाव कठीण भूस्तरात होतो. त्यामुळे कंत्राटदाराला जादा अदायगी केलेले रु. १८.२० कोटी कंत्राटदाराकडून वसूल पात्र ठरतात. त्याचप्रमाणे खोदकामाच्या दरामध्ये अतिरीक्त रु.११.९० प्रती घ.मी. असा पोहचरस्त्यांच्या देखभालीकरीता समावेश केलेला आहे. तसेच रु. ७.४९ प्रती घ.मी. रस्त्यांच्या देखभाली करीता समावेश केलेला आहे. कंत्राटामध्ये कुठलीही ज्यादा दराकरिता तरतुद नसताना कंत्राटदारास रु. ३.९४ कोटीचे ज्यादा प्रदान झालेले आहे. विभागाने कंत्राटदारास उत्खनन केलेल्या खोदकाम साहित्याच्या विल्हेवाटीसाठी तसेच जोड रस्त्यासाठी (अप्रोच रस्त्यासाठी) अशा दोन्हीसाठी वेगळा निधी दिला, ज्याची करारात तरतूद नव्हती. निविदेअंतर्गत ज्या ज्या रोडचे काम क्वारीसाठी करावयाचे होते ते मटेरीयलसह कंत्राटदाराने स्वतः करावयाचे होते. त्यामुळे कंत्राटदाराला दुहेरी लाभ दिल्याचे दिसून येते व महाराष्ट्रात अन्यत्र कोठेही असे दुहेरी प्रदान झाले नसून हे पहिलेच प्रकरण असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. अशाप्रकारे दुहेरी लाभ दिल्याप्रकरणी देखील चौकशी करुन अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. अंदाजित खोदकामाच्या परिमाणापेक्षा कार्यान्वित झालेल्या परिमाणात बराच बदल झाल्याचे दिसून येते. मऊ स्तर व कठीण भूस्तर या दोन्ही बाबींचे निविदा परिमाण २४,०५,९३० घ.मी. व प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या परिमाण ४३,१२,९९२ घ.मी. इतके असूनही १७९ टक्क्यांनी जास्त आहे. १२५ टक्क्यापेक्षा जास्त खोदकामाच्या परिमाणानुसार १३,०५,५८० घ.मी.चे प्रदान CSR दराप्रमाणे करणे नियम ५५ अंतर्गत अभिप्रेत असताना संपुर्ण खडक खोदकामाच्या परिमाणाचे प्रदान केल्यामुळे अतिरिक्त प्रदान झाले आहे. इतक्या प्रमाणात झालेला बदल आणि सुधारित संकल्पनामुळे पुच्छ कालव्याच्या लांबीत झालेली वाढ विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर साक्षीदरम्यान मान्य केली.

६.२ सदर निविदेअंतर्गत अनुसूची 'ब' मध्ये खोदकामाच्या बाबींमध्ये मातीतील खोदकाम व मऊ खडकातील खोदकाम व कठीण खडकातील खोदकाम अशा वेगवेगळ्या ३ बाबी विचारात घेतल्यामुळे व निविदा अट क्र.५५ मध्ये मात्र मऊ स्तर व कठीण स्तर याप्रमाणे फक्त दोनच बाबींचा उल्लेख केल्याने हे अतिरिक्त प्रदान झाले आहे. वास्तविक पाहता मातीतील खोदकाम व मऊ खडकातील खोदकाम या बाबींचा समावेश मऊ स्तरात करणे आवश्यक होते. निविदेतील अनुसूची 'ब' अंतर्गत मऊ स्तरातील खोदकाम व कठीण स्तरातील खोदकाम याप्रमाणे दोनच बाबींचा समावेश करणे अपेक्षित होते असे प्रतिपादन विभागाने समितीसमोर केले. यांसदर्भात समितीने विस्तृत चर्चा केली असता कंत्राटदाराला या प्रकरणी कलम ३८ अन्वये रकमेचे प्रदान करणे अपेक्षित नसून कलम ५५ अंतर्गत प्रदान करणे आवश्यक होते. या प्रकरणी चुकीच्या पध्दतीने कार्यवाही केलेली असल्यामुळे कलम ५५ अंतर्गत रु.१८.२० कोटीची वसुली कंत्राटदाराकडून करणे बंधनकारक असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले.

६.३ कलम ५५ ऐवजी कलम ३८ अंतर्गत केलेल्या चुकीच्या कार्यवाहीमुळे कंत्राटदारास केलेले अतिरिक्त प्रदान रु.१८.२० कोटी रकमेची वसुली होणे आवश्यक असून राज्यात या कंत्राटदाराची अन्य ठिकाणी सुरु असलेल्या कामाच्या देयकातून ही वसुली करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. करारातील कलम ५५ नुसार मऊ व कठीण भूस्तर असा उल्लेख असून त्यातील अनुसूची-ब मध्ये मात्र १) मातीतील खोदकाम, २) मऊ खडकातील खोदकाम, ३) कठीण खडकातील खोदकाम असे तीन घटक अंतर्भूत आहेत. अनुसूची-ब मध्ये नमूद तिसरा घटक कलम ५५ मध्ये अंतर्भूत करणे आवश्यक होते, तो न केल्यामुळे ही चूक झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. कलम ५५ अंतर्गत मऊ स्तर व कठीण स्तर एकत्रित परिमाणाच्या १२५ टक्के पेक्षा जास्त झालेले परिमाण नवीन दराने अदा करणे अपेक्षित होते. यानुसार परिगणना केली असता रु.१८.२० कोटीचे जास्त भुगतान झालेले दिसते. याबाबत विस्तृत चौकशी करण्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले व त्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना शासनाच्या दि.२८/०९/२०१७ च्या पत्रान्वये या प्रकरणी सविस्तर चौकशी करण्याचे आदेश विभागामार्फत देण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

६.४ वास्तविक सदरहू प्रकरणी करारातील अटी शर्तीच्या अंमलबजावणीपुरती ही बाब मर्यादीत नसून या प्रकरणाच्या मुळाशी जावून अंदाजित खर्चापेक्षा जादा व अनावश्यक खर्चामागील कारणमिमांसा तपासण्याची आवश्यकता आहे. प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करताना ट्रायल पीट घेवूनच हे अंदाजपत्रक विभागाने तयार करणे अपेक्षित असते. सर्वसाधारणपणे विभागाने घेतलेल्या ट्रायल पिट व वस्तुतः उत्खननामध्ये १० ते २० टक्क्याची तफावत असू शकते. परंतु यामध्ये ६० टक्केची तफावत येणे ही अतिशय गंभीर बाब असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात जर ही तफावत येत असेल तर मुळ अंदाजपत्रकाची विश्वासार्हता व त्यासाठी घेतलेल्या ट्रायल पीटची गुणवत्ता, वैधता व अचूकता या सर्वच बाबी आक्षेपित

ठरतात. या उत्खननामध्ये कठीण खडकाचा अंदाज १० क्युबीक मीटर केला गेला होता. परंतु वस्तुतः यामध्ये कठीण खडक निघालाच नाही व मऊ खडकाचे जे प्रमाण विभागाने निश्चित केले होते, त्याचेही अंदाजपत्रक मोठ्या प्रमाणात वाढले. या सर्व बाबी पाहता तज्ञांनी केलेले हे संपुर्ण अंदाजपत्रकच दोषपुर्ण व चूकीचे असल्याचे सिध्द होते. अंदाजपत्रकात व प्रत्यक्ष खर्चामध्ये इतकी मोठी तफावत निश्चितच अभिप्रेत नाही. एवढे करुनही कंत्राटदाराला रकमेचे प्रदान करताना अथवा कंत्राट अटीचे अर्थउकल करताना विभागाने शासनाचे हित न जोपासता कंत्राटदाराचे हित जोपासणे ही अधिकच गंभीर बाब आहे व ही बाब कामाची विश्वासार्हता व या प्रकरणी विभागाच्या अधिका-यांची भूमिकाच शंकास्पद करते. या प्रकरणात ज्या अधिका-यांनी हे अंदाजपत्रक तयार केले तसेच कलम ५५ अन्वये रकमेचे प्रदान न करता कलम ३८ अन्वये रकमेचे अतिरिक्त प्रदान करणा-या अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले व ही संपुर्ण चौकशी करणेसंदर्भात दि.२६/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना शासनाने केली व या चौकशी समितीने या प्रकरणाचा अहवाल शासनामार्फत समितीस दि.२४/०१/२०१८ रोजी सादर केला. **(विवरणपत्र ७ जोडल्याप्रमाणे)**

६.५ परंतु दरम्यानच्या कालावधीत काही समिती सदस्यांनी या विषयावरील काही अतिरिक्त मुद्यांसंदर्भात माहिती समितीला सादर करुन त्या बाबींची देखील चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत पत्राद्वारे कळविले असता समितीने ती अतिरिक्त माहिती आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी विभागाकडे अग्रेषित केली. त्याचप्रमाणे वासनी प्रकल्प सद्यःस्थितीत पर्यावरणाच्या कारणास्तव बंद पडलेला आहे. सदरहू प्रकल्पास पर्यावरणाची आवश्यकता नाही असे मत काही सन्माननीय सदस्यांनी समितीसमोर मांडले असता या बाबींची देखील तपासणी सदरहू चौकशीमध्ये करण्यात येईल व या मुद्यासंदर्भात देखील राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना पुनःश्च चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासित करण्यात आले. त्याअनुषंगाने वासनी मध्यम प्रकल्पाच्या प्रत्यक्ष खोदकामाच्या परिमाणाविषयी सखोल चौकशी विभागाच्या त्रयस्थ समितीमार्फत करणेबाबत शासनास दि.१४.५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. **(विवरणपत्र ९ जोडल्याप्रमाणे)**

६.६ त्याअनुषंगाने राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या चौकशीच्या व्याप्तीमध्ये निविदा शर्त ५५ ऐवजी शर्त ३८ अन्वये केलेले रकमेचे प्रदान, कामाचे ट्रायल पीट करण्यात आले होते काय, खोदकामाच्या परिमाणात झालेल्या वाढीची कारणे, वाढीव आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावास मान्यता घेण्यात आली होती काय, कार्यक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी, यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर करावयाची कार्यवाही, प्रकल्प अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याची कारणे, भूस्तर वर्गीकरण योग्यप्रकारे झाले आहे काय ? झालेल्या अतिप्रदानाची निश्चिती, खोदकामातील साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता वहन अंतर वाढले काय ? खोदकामाकरिता ठेकेदारास अंतिमतः अदा केलेला दर संपुर्ण खोदकामाच्या परिमाणासाठी दिलेला आहे काय व असल्यास यात अतिप्रदान झाले आहे काय ? त्याचप्रमाणे प्रत्यक्ष मोजमापे तपासणी, अदायगी याबाबत त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करणे इत्यादी बाबींचा समावेश होता. या संपुर्ण प्रकरणाची विस्तृत चौकशी करुन राज्य तांत्रिक सल्लागार समितीने त्यांचा चौकशी अहवाल शासनास सादर केला व शासनाने राज्य तांत्रिक सल्लागार समितीने सादर केलेला अहवाल व महामंडळ स्तरावरुन त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करुन चौकशी अहवाल असे दोन्ही अहवाल समितीस सादर करण्यात आले. **(विवरणपत्र ८ व १० जोडल्याप्रमाणे)**

शिफारस

६.७ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून कंत्राटातील कलमाचा अयोग्य अंमल (रु.१८.२० कोटी) आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी अग्राह्य प्रदान (रु.३.९४ कोटी) यामुळे कंत्राटदारास एकूण रु.२२.१४ कोटी जादा देण्यात आले असल्याबाबतची बाब सदरहु परिच्छेदात आक्षेपित करण्यात आली आहे. सदरहू प्रकरण अतिशय गंभीर आहे व या माध्यमातून कंत्राटदारास अतिप्रदान झालेले असून यात निश्चितच शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. कराराच्या कलम ५५ मध्ये विनिर्दिष्ट असल्याप्रमाणे कार्य निष्पादनाच्या वेळी जर खोदकामाचे एकूण परिमाण (मऊ स्तर खडक आणि कठिण स्तर खडक) निविदा परिमाणाच्या १२५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर मऊ स्तर खडक आणि कठिणस्तर खडक दोहोंच्याही एकत्रित जास्तीच्या परिमाणाची अदायगी प्रचलित दर अनुसूचीनुसार (CSR)करावयाची होती. कलम ५५ मध्ये पुढे असे विनिर्दिष्ट आहे की जर कोणत्याही एका स्वतंत्र बाबीचे (मऊ खडक किंवा कठिण खडक) निष्पादित परिमाण निविदा परिमाणापेक्षा कमी अथवा तेवढेच असेल तर एकूण निविदा परिमाणाच्या (मऊ खडक आणि कठिण

खडक दोन्ही एकत्रित धरुन) १२५ टक्क्यांपेक्षा जास्तीच्या सर्व परिमाणाची अदायगी,ज्या बाबीसाठी जास्त परिमाण झाले आहे,त्यासाठी असलेल्या CSR प्रमाणे करावी. ह्या करारांतर्गत निविदा परिमाणाच्या तुलनेत जेव्हा मऊ स्तर खडकांमधील खोदकामाच्या प्रत्यक्ष परिमाणात लक्षणीय घसरण झाली तेव्हा कठिण स्तर खडकांमध्ये अवाजवी वाढ झाली. कंत्राटातील कलम ५५ ऐवजी कलम ३८ अंतर्गत कंत्राटदाराला रु.१८.२० कोटीचे अतिरिक्त प्रदान झालेले आहे. अधिका-यांनी अंदाजपत्रक तयार करताना करारातील अटींचे अर्थउकल (Interpretation)योग्यरित्या व शासनाच्या हितावह न केल्यामुळे हे अतिरिक्त प्रदान झालेले आहे. शीर्ष कामाचे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करताना ट्रायल पीट न घेता तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील तपासणी सूचीमध्ये भूस्तर प्रशासकीय मान्यतेनुसार करण्यात आले. एवढेच नव्हेतर कठीणस्तर खडकातील खोदकामाच्या अतिरिक्त परिमाणासाठी CSR (रु.२४९.८५ प्रति घनमीटर) दर काढतांना धरण पोच रस्त्याच्या रखरखावासाठी रु.११.९० प्रति घनमीटर अशी अतिरिक्त किंमत त्यात लावली. तसेच,धरणस्थळी उत्खनन केलेल्या खोदकाम साहित्यांच्या विल्हेवाटीचे दर (रु.१५७.३० प्रति घनमीटर) ठरवितांना रु.७.४९ प्रति घनमीटर अशी पोच रस्त्याच्या देखभालीसाठीची किंमत त्यात लावण्यात आली. अतिरिक्त किंमत लादण्यासाठी करारात कोणतेही सहाय्यभूत कलम नव्हते,त्यामुळे कंत्राटदारास रु.३.९४ कोटीचे जादा प्रदान करण्यात आले. अशाप्रकारे,कंत्राटातील कलमाचा चुकीचा अंमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी कंत्राटदारास अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु.२२.१४ कोटी जादा प्रदान केल्या गेले. ज्या अधिका-यांची या सर्व बाबींची सखोल तपासणी करण्याची जबाबदारी होती त्यांनी याची कोणतीही शहानिशा न करता प्रस्तावाला मंजूरी दिली. प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करताना ट्रायल पिट घेवूनच हे अंदाजपत्रक विभागाने तयार करणे अपेक्षित असताना या प्रकरणी ट्रायल पिटच घेण्यात आले नव्हते. सर्वसाधारणपणे विभागाने घेतलेल्या ट्रायल पिट व वस्तुतः उत्खननामध्ये १० ते २० टक्क्याची तफावत असू शकते. परंतु यामध्ये ६० टक्केची तफावत येणे ही अतिशय गंभीर बाब असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात जर ही तफावत येत असेल तर मुळ अंदाजपत्रकाची अचूकता, विश्वासार्हता व त्यासाठी घेतलेल्या ट्रायल पीटची गुणवत्ता व वैधता या सर्वच बाबी आक्षेपित ठरतात. या उत्खननामध्ये कठीण खडकाचा अंदाज १० क्युबीक मीटर केला गेला होता. परंतु वस्तुतः यामध्ये कठीण खडक निघालाच नाही व मऊ खडकाचे जे प्रमाण विभागाने निश्चित केले होते, त्याचेही अंदाजपत्रक मोठ्या प्रमाणात वाढले. या सर्व बाबी पाहता तज्ञांनी केलेले हे संपुर्ण अंदाजपत्रकच दोषपुर्ण असल्याचे सिध्द होते. अंदाजपत्रकात व प्रत्यक्ष खर्चामध्ये इतकी मोठी तफावत निश्चितच अभिप्रेत नाही. सद्यःस्थितीत सदरहु प्रकल्प पर्यावरण विभागाच्या मान्यतेअभावी बंद असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः या प्रकल्पास पर्यावरणाची मान्यता आवश्यक आहे किंवा कसे हीच बाब तपासणे गरजेचे असल्याचे काही सन्माननीय सदस्यांनी समितीसमोर विदीत केले. सदरहू प्रकरणी कंत्राटदारासोबत केलेल्या करारामध्ये नमूद अटी शर्तींचा अर्थउकल अधिक सुस्पष्टरित्या करताना विभागाने शासनाचे हित प्रथम पाहणे अपेक्षित असताना अन्य कलमांचा आधार घेवून त्याचा लाभ कंत्राटदारास देणे कदापि अभिप्रेत व शासन हिताचे नाही. याहीउपर समितीच्या साक्षीदरम्यान मात्र विभाग झालेली चूक मान्य करते व कंत्राटदाराकडून रक्कम वसुल करण्याची तयारी देखील दर्शविते. परंतु अशा पध्दतीने करारातील अटी शर्तींचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे कंत्राटदारास झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या अतिरिक्त प्रदानाबाबत जबाबदार अधिका-यांवर विभागाने कोणतीही कारवाई केली नाही ही देखील गंभीर बाब आहे. या प्रकरणी संबंधित अधिका-यांवर कारवाई करुनच विभागाने समितीसमोर येणे अपेक्षित होते. परंतु तसे करण्यात आले नाही व आता या कंत्राटदाराचे राज्यात अन्य ठिकाणी सुरु असलेल्या कामाच्या देयकामधून ही वसुली करण्याच्या सूचना विभागाने दिलेल्या असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले, ही देखील गंभीर बाब आहे. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर ज्या बाबी समितीसमोर निदर्शनास येत आहे त्या बाबी विभागानेच स्वतःहून करणे आवश्यक व बंधनकारक होते. केवळ समितीसमोर या प्रकरणी चर्चा झाली म्हणून विभाग अशा प्रकारची कारवाई करित असल्याचे चित्र विभागाने राज्यात निर्माण करणे अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर आहे. या प्रकरणी नियमानुसार कारवाई करण्याची प्राथमिक जबाबदारी विभागाचीच असताना त्यांनी ती गांभीर्याने पार पाडली नाही. या संपुर्ण प्रकरणातील अधिक गंभीर बाब म्हणजे महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविल्यानंतर समितीसमोर हा विषय चर्चेला आल्यावर विभागाने दोषी अधिका-यांविरुध्द चौकशी करण्याचे प्रस्तावित केले. परंतु तोपर्यंत विभागाने या प्रकरणाची कोणतीही दखल घेतली नाही. करारातील अटी शर्तींचा अर्थउकल योग्यप्रकारे व शासनाच्या हिताचे न करणा-या जबाबदार अधिका-यांविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला साक्षीदरम्यान आश्वासित केले. सदरहू प्रकरणी कंत्राटदारासोबत केलेल्या करारामध्ये नमूद अटी शर्तींचा अर्थउकल अधिक सुस्पष्टरित्या करताना विभागाने शासनाचे हित प्रथम पाहणे अपेक्षित होते. या प्रकरणी संबंधित अधिका-यांवर कारवाई करुनच विभागाने समितीसमोर येणे अपेक्षित होते. परंतु तसे करण्यात आले नाही. या संपुर्ण प्रकरणी विभागाने समितीसमोर मान्य केल्याप्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीमार्फत चौकशी प्रस्तावित केली. चौकशी

समितीने याबाबतचा प्रथम अहवाल शासनामार्फत लोकलेखा समितीस दि.२४/०१/२०१८ रोजी सादर केला व त्यात अनेक मुद्यांबाबत निरीक्षणे नोंदविलेली आहेत. दरम्यानच्या कालावधीत सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणी अधिकची माहिती समितीसमोर मांडली असता त्याअनुषंगाने वासनी मध्यम प्रकल्पाच्या प्रत्यक्ष खोदकामाच्या परिमाणाविषयी सखोल चौकशी विभागाच्या त्रयस्थ समितीमार्फत करुन दि.१४.५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये राज्य तांत्रिक सल्लागार समितीने शासनास कळविले, ज्यास लोकलेखा समितीने देखील सहमती दर्शविली. सदरहू समितीच्या चौकशीच्या व्याप्तीमध्ये निविदा शर्त ५५ ऐवजी शर्त ३८ अन्वये केलेले रकमेचे प्रदान, या कामाचे ट्रायल पीट न करणे, खोदकामाच्या परिमाणात झालेल्या वाढीची कारणे, वाढीव आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावास मान्यता घेण्यात आली होती काय, कार्यक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी, यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर करावयाची कारवाई, प्रकल्प अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याची कारणे, भूस्तर वर्गीकरण योग्यप्रकारे झाले आहे काय ? झालेल्या अतिप्रदानाची निश्चिती, खोदकामातील साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता वहन अंतर वाढले काय ? खोदकामाकरिता ठेकेदारास अंतिमतः अदा केलेला दर संपुर्ण खोदकामाच्या परिमाणासाठी दिलेला आहे काय व असल्यास यात अतिप्रदान झाले आहे काय ? त्याचप्रमाणे प्रत्यक्ष मोजमापे तपासणी, अदायगी याबाबत त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करणे इत्यादी बाबींचा समावेश होता. या संपुर्ण प्रकरणाची विस्तृत चौकशी करुन राज्य तांत्रिक सल्लागार समितीने त्यांचा चौकशी अहवाल शासनास दि.१७.३.२०१८ रोजी सादर केला व शासनाने राज्य तांत्रिक सल्लागार समितीने सादर केलेला अहवाल व महामंडळ स्तरावरुन त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करुन केलेला चौकशी अहवाल असे दोन्ही अहवाल समितीस सादर करण्यात आले.

६.८ विभागाने राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या माध्यमातून उपरोक्त सर्व मुद्यांची विस्तृत छाननी करुन दिलेले दोन्ही चौकशी अहवाल, त्रयस्थ यंत्रणेचा तपासणी अहवाल व त्यावर शासनाच्या अभिप्रायाचे समितीने अवलोकन केले असता त्यात विशेषतः ट्रायल पीट न घेता हे काम करण्यात येणे, अंदाजपत्रकातील उणिवा, तसेच तांत्रिक अंदाजपत्रकाबाबत झालेल्या अनियमितता, निविदा अंतर्गत काम करताना झालेली अनियमितता, मृदू खडकातील खोदकामातील वाढीव परिमाणानुसार काम करण्यापूर्वी सक्षम स्तरावरुन मंजूरी न घेणे, भूस्तर वर्गीकरण सक्षम स्तरावरुन न करणे, खोदकाम बाबीच्या वाढीव परिमाणाची अदायगी कलम ५५ नुसार न करता कलम ३८ नुसार करणे, वाढीव आर्थिक दायित्वाची सक्षम स्तरावरुन मान्यता न घेणे, माती व मृदू खडकातील खोदकाम साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता वहन अंतरात वाढ झालेली नसताना कंत्राटदारास अतिरिक्त प्रदान करणे इत्यादीसह अन्य इतर बाबींसंदर्भात दोष व उणिवा राहिलेल्या असल्याचे विभागाने त्यांच्या अहवालात मान्यच केलेल्या आहेत व अन्य तांत्रिक मुद्यांबाबत देखील चौकशी अहवालात विस्तृत विवेचन केलेले असून हा संपुर्ण अहवाल समितीने स्विकारला असून लोकलेखा समितीच्या या अहवालाचा तो भाग समजण्यात यावा. सदरहू अहवालाची छाननी करताना राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी त्यांचे चौकशी अहवालात अनेक महत्वाच्या तांत्रिक व प्रशासकीय बाबींसंदर्भात वस्तुस्थितीदर्शक निरिक्षणे नोंदविलेली आहेत. परंतु त्या निरिक्षणांवर शासनाने त्यांच्या अभिप्रायात भिन्न वा विसंगत निरिक्षणे नोंदविलेली आहेत. तसेच झालेल्या बाबींचे समर्थन केलेले आहे. या दोन्ही निरिक्षणांचा समितीने तुलनात्मक अभ्यास केला असता समितीला राज्य तांत्रिक सल्लागार समितीने नोंदविलेली निरिक्षणे अधिक वस्तुस्थितीदर्शक, सुसंगत व नियमानुसार समर्थनीय वाटतात. ज्यात प्रशासकीय व तांत्रिक बाबींसंदर्भात राहिलेल्या गंभीर उणिवा व अनियमितता अधिक स्पष्टपणे निदर्शनास आणलेल्या असून त्या समितीला दुर्लक्षित करता येणार नाहीत. विशेषतः तांत्रिक अंदाजपत्रक तयार करताना पृच्छ व आगमन कालवा कमीत कमी लांबीचे राहतील याबाबत पर्यायी अभ्यास न करणे तसेच सुधारीत संकल्पनामुळे वाढीव परिमाण व खर्चास सक्षम स्तरावरुन मान्यता न घेणे, तसेच कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेल्या वाढीस सक्षम स्तरावरुन मान्यता न घेणे, भूस्तर वर्गीकरणाबाबत १० टक्केपेक्षा जास्त बदल अपेक्षित असल्यास सक्षम स्तरावरील अधिका-याकडून मान्यता घेणे बंधनकारक असताना ती घेण्यात न येणे इत्यादी गंभीर, महत्वाच्या, अतिशिय तांत्रिक व प्रशासकीय स्वरुपाच्या उणिवा राज्य तांत्रिक सल्लागार समितीने निदर्शनास आणलेल्या आहेत. राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या या सर्व निरिक्षणांवर शासनाने त्यांच्या अभिप्रायात जरी यास मान्यता दिल्याचे नमूद केले असले तरी केवळ यास मान्यता दिल्यामुळे या बाबी नियमानुकुल व समर्थनीय ठरू शकत नाहीत. शासनाने राज्यात कोणतेही प्रकल्प राबविताना प्रशासकीय, तांत्रिक व कायदेशीर बाबींसंदर्भात कोणतीही तडजोड वा शिथीलता करणे आवश्यक व अभिप्रेत नाही. समिती यासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करीत असून शासनाने याची योग्य ती दखल घ्यावी. आता निदर्शनास आलेल्या या सर्व तांत्रिक वा प्रशासकीय उणिवांची दखल विभागाने त्यांच्या नियोजनात घेणे आवश्यक होते ज्याकडे विभागाने निश्चितच दुर्लक्ष केलेले आहे. भूस्तर वर्गीकरणाबाबत त्यावेळेस केलेले वर्गीकरण व आता सुमारे १० वर्षाच्या कालावधीनंतर केलेल्या भूस्तर वर्गीकरणावरुन कोणतेही निष्कर्ष काढणे

सुसंगत ठरणार नाही हे समितीला मान्य आहे. परंतु भूस्तर वर्गीकरणात झालेल्या बदलाबाबत सक्षम स्तरावरुन मान्यता न घेणे निश्चितच चूकीचे आहे. प्रत्यक्षात कामाच्या परिमाणापेक्षा जास्तीच्या परिमाणाची अदायगी, वाढीव परिमाणाच्या अदायगीसाठी निविदा शर्तीचा योग्य वापर न करता कलम ५५ ऐवजी कलम ३८ चा अवलंब करुन वाढीव परिमाणाचा दर निश्चित करताना अयोग्य पध्दतीने केलेले दर पृथःकरण, प्रत्यक्षात लागलेल्या वहन अंतरापेक्षा वाढीव वहन अंतर विचारात घेणे, अनावश्यक अतिरिक्त बाब दरसूची करुन अदायगी करणे या सर्व बाबींमुळे कंत्राटदारास अतिरिक्त प्रदान झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत असून त्याची वसुली करण्याचे विभागाने त्यांचे चौकशी अहवालात मान्यच केले आहे. त्याअनुषंगाने अतिरिक्त परिमाणाच्या प्रदानासाठी रु.१८.२० कोटी व धरण स्थळापर्यंतच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी अतिरिक्त प्रदान केलेली रु.३.९४ कोटी असे एकूण रु.२२.१४ कोटीची रक्कम कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावी. तसेच पोहच कालवा व पृच्छ कालवा या दोन घटक भागांसाठी १,३२,९२७ घ.मी. एवढी परिमाणाची जास्तीची अदायगी झाल्याचे विभागाने त्यांच्या अहवालात मान्यच केले आहे. सदर १,३२,९२७ घ.मी. परिमाणाची रक्कम रु. ३.३२ कोटी एवढी येत असल्याचे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने शासनामार्फत समितीस कळविले आहे. परंतु त्याचवेळी विषयांकीत कामाचे सुधारीत देयक कलम ३८, कलम ५५, दरवाढ इत्यादी सर्व बाबींची नव्याने क्षेत्रीय कार्यालयाकडून मांडणी करुन अतिरिक्त झालेल्या अदायगीची निश्चिती होईल असेही विभागाने नमूद केले आहे. अतः विभागाने या अतिरिक्त अदायगीची नियमानुसार फेरनिश्चिती करुन त्याची देखील वसुली करावी. तसेच या व्यतिरिक्त अन्य काही वसुली निघत असल्यास त्याची देखील वसुली करण्यात यावी. सदरहु वसुली या कंत्राटदाराच्या या प्रकल्पातील चालू देयकामधून अथवा द्यावयाच्या देयकामधून वसुल करण्यात यावी व त्यातून ती वसुली न झाल्यास या कंत्राटदाराच्या अन्य कामांमधून ही वसुली करण्यात यावी. सदरहू संपुर्ण आक्षेपाचे विस्तृत निरिक्षण केले असता या संपुर्ण प्रकरणात अधिका-यांकडून झालेल्या अनियमितता मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. या संपुर्ण बाबींची तीनदा विस्तृत चौकशी करुनही व या प्रकरणातील सर्व निष्कर्ष शासनासमोर व समितीसमोर आलेले असतानाही विभागाने या प्रकरणी दोषी अधिका-यांवर अद्यापही कोणतीही कारवाई केलेली नाही. विभाग झालेल्या अनियमितता स्पष्टपणे मान्य करते परंतु यात दोषी असणा-या कोणत्याही अधिका-यांवर समितीचा अहवाल सादर करेपर्यंत विभागाने कोणतीही कारवाई केली नाही ही बाब विभागाच्या हेतूवर शंका उपस्थित करणारी आहे. प्रकल्पाच्या प्रस्तावित द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय किंमतीत मंजूर प्रथम सुप्रमा अहवालाच्या तुलनेत अपु-या तरतूदींमुळे झालेली वाढ रु.२५०.२६ कोटी व संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ रु.८९.३८ कोटी इतकी प्रचंड असल्याने या प्रकल्पाचे सविस्तर तांत्रिक परिक्षण होणे आवश्यक असल्याची शिफारस राज्य तांत्रिक सल्लागार समितीने केली आहे व त्यात अशा तांत्रिक परिक्षणाअंती आढळून येणा-या अहवालानुसार जबाबदार अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भातील बाब शासनावर सोपविण्यात आली आहे. विभागाची ही भूमिका समितीला कदापि मान्य नाही. या संपुर्ण प्रकरणात दोषी असणा-या सर्व अधिका-यांवर विभागाने २ महिन्यात तात्काळ कारवाई करावी. या २ महिन्याच्या कालावधीत विभागाला आवश्यकता वाटल्यास त्यांनी आवश्यक त्या सर्व बाबींचे तांत्रिक परिक्षण त्यांचे स्तरावरुन करुन घ्यावे परंतु कोणत्याही परिस्थितीत विहित कालमर्यादेत ही अधिका-यांवरील कारवाई विभागाने पुर्ण करुन समितीस या संपुर्ण प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती सादर करावी. संबंधित दोषी अधिका-यांवर २ महिन्याच्या कालावधीत कारवाई न केल्यास यासाठी वरिष्ठ अधिकारी जबाबदार राहतील. तसेच अन्य सर्व बाबींसंदर्भात राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या दोन्ही अहवालात सादर केलेल्या निरिक्षणानुसार शासनाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. तसेच सदरहु प्रकरणी महालेखाकारांनी नोंदविलेले गंभीर आक्षेप पाहता त्याची पुनरावृत्ती भविष्यात टाळण्याच्यादृष्टीने भविष्यात राज्यात असे मोठे प्रकल्प राबविताना अवलंबावयाच्या कार्यपध्दतीसंदर्भात शासनस्तरावरुन योग्य त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

७. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.४ "**साधनसामग्री विनावापर पडून राहणे आणि टाळता येणाजोगा खर्च**". यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्र. ३.४ : साधनसामग्री विनावापर पडून राहणे आणि टाळता येणाजोगा खर्च.

दोन जलविद्युत प्रकल्प सुस्थापित करण्यासाठी वीज निमिर्ती साधनसामग्रीची खरेदी आणि बांधकामात समान गती राखताना, जलसंपदा विभागाने केलेल्या निकृष्ट नियोजनामुळे तात्पुरती साठवणूक शेड आणि राखण आणि पहा-यावरील रु. १.१६ कोटीच्या टाळता येण्याजोग्या खर्चाव्यतिरिक्त, रु. ३७.६६ कोटी मुल्याची साधनसामग्री १४ ते ३० महिन्यांसाठी विनावापर पडून होती.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने (WRD) विभाग कुंभे गावातील निराबाई नदीवर (तालुका माणगाव, जिल्हा रायगड) रु. ९७.२४ कोटी खर्चात, १० मेगा वॅट(MW) क्षमतेचा एक जलविद्युत प्रकल्प (HEP) बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता (AA) दिली (ऑक्टोबर १९९८). जून २००४ मध्ये विभागाने कुंभे गावातील (तालुका माणगाव) कुंभे HEP चे स्थान मौजे करमार या गावी (तालुका महाड) बदलण्याचे ठरविले जेणेकरुन कुंभे HEP तून शेवटच्या टप्प्यात उत्सर्जित होणारे पाणी, जुलै १९९८ मध्ये वारांगी गावातील काळ नदीवर (तालुका महाड) रु ९९ कोटी खर्चून बांधकामाची परवानगी दिलेल्या काळ HEP तून १५ 15 MW वीज निर्मितीसाठी पुन्हा उपयोगात आणता येऊ शकणार होते. त्यानुसार विभागाने, कुंभे आणि काळ HEP साठी रू १९४.८७ कोटी४२ खर्चाची एक सुधारित सामायिक प्रशासकीय मान्यता दिली (जून २००४). या प्रकल्पाची जून २००४ मधील रु १९४.८७ कोटी एकूण किंमत (कुंभे आणि काळ HEP ची एकत्रित) वाढून जानेवारी २०११ मध्ये (तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता) रु ७४०.४४ कोटी इतकी झाली. जिच्या तुलनेत ऑक्टोबर २०१५ पर्यंत रु १,१२७.२३ कोटीचा खर्च करण्यात आला होता. त्यानंतर चौथ्या सुधारित प्रशासकीय मंजुरीसाठी दोन्ही प्रकल्पांचे बांधकाम थांबविण्यात आले.

दोन्ही HEP च्या कामांचे तीन घटक होते, जसे की धरण, जल वाहतुक व्यवस्था ४३ आणि विद्युतगृह जलविद्युत प्रकल्पाच्या सुरळीत कार्यचालनासाठी हे तिन्ही कार्य घटक परिपूर्ण हवेत आणि त्यांनी समन्वयाने काम करावयास हवे जेणेकरुन धरण/जलाशयातील पाणी जल वाहतूक व्यवस्थेव्दारे वीज निर्मितीसाठी विद्युतगृहांना पोहोचेल.

कार्यकारी अभियंता (EE), घाटघर जल विद्युत विभाग क्र. ३ (GHED), ठाणे ४४, यांच्य कार्यालयातील कुंभे आणि काळ HEP च्या कार्यान्वयन संबंधातील दस्तऐवजांची छाननी करतांना (डिसेंबर २०१५) तसेच, जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ दरम्यान, EE, रायगड पाटबंधारे विभाग (RID), रायगड ४५ यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीतून खालील गोष्टी आढळून आल्या :

कुंभे जल विद्युत प्रकल्प (HEP)

कुंभे HEP साठी रु ९२.७६ कोटी सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत, बांधकामासाठी रु ६९.४९ कोटी राखीव होते ज्यामध्ये धरण, जल वाहतूक व्यवस्था आणि विद्युतगृह यांचा समावेश होता आणि रु २३.२७ कोटी विद्युत कामांसाठी दिले होते ज्यापैकी रु २१.८४ कोटी टर्बाइन (पवन/पाणचक्की), जनित्र आणि सहयोगी साधनसामग्रीचे (वीज निर्मितीची साधनसामग्री) प्रापण, उभारणी आणि ती कार्यरत करणे, यासाठी दिले होते.

धरण बांधण्याचे काम रु ३७.८६ कोटीला दिले होते (मार्च २००५) जे मार्च २००८ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. प्रकल्पग्रस्त व्यक्तिंच्या (HEP) पुनर्वसनात झालेल्या विलंबामुळे, २००८ पासून २०१२ पर्यंत सदर काम जवळ जवळ चार वर्षे थांबविण्यात आले होते. जून २०१५ पर्यंत कंत्राटदाराला तीनदा मुदतवाढ दिली गेली आणि त्यानंतर संपूर्ण प्रकल्पासाठी (कुंभे आणि काळ HEP साठी एकत्रित) चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी काम ठप्प झाले. सप्टेंबर २०१६ ला धरणाचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले होते.

दोन वेगवेगळया साखळी टप्प्यातील (chainages) जल वाहतूक व्यवस्थेचे बांधकाम एकूण रु २८.९९ कोटीला दोन कंत्राटदारांना दिले होते (ऑगस्ट २००९) जे अनुक्रमे फेब्रवारी २०११ आणि ऑगस्ट २०१२ ला पूर्ण करावयाचे होते. राज्य वन विभागाबरोवर सीमावाद मिटविण्यात विलंब झाल्यामुळे सप्टेंबर २०१६ पर्यंत ९१ टक्के काम पूर्ण झाले होते.

खुद्द धरण आणि जल वाहतुक व्यवस्था बांधून पूर्ण करण्यात विलंब झाल्यामुळे, विद्युतगृहाचे बांधकाम, जे मूळ आराखड्याप्रमाणे मार्च २०११ मध्ये पूर्ण करावयाचे होते. त्याचे कंत्राट ऑगस्ट २०१४ मध्ये ५.४२ कोटी खर्चास दिले गेले, जे ऑगस्ट २०१७ पर्यंत पूर्ण करायचे होते. सप्टेंबर २०१६ पर्यंत विद्युतगृहाचे फक्त १० टक्के बांधकाम पूर्ण झाले होते.

धरण, जल वाहतुक व्यवस्था आणि विद्युतगृहाच्या बांधकामाची प्रगती शोचनीय होती आणि विद्युत गृहांसाठी कंत्राट देण्यात आले नव्हते ही वस्तुस्थिती असतांना देखील अधीक्षक अभियंता, घाटघर (E & M) परिमंडळ , ठाणे (SE) यांनी मुख्य अभियंता (विद्युत), जल प्रकल्प, मुंबई (CE) यांच्या संमतीने विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे प्रापण, उभारणी आणि कार्यान्वयनाचे रु. २०.३२ कोटी मूल्याचे काम एनर्जी डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड, फरीदाबाद(पुरवठादार) यांना २४ महिन्यांच्या विहित कालावधीत (मार्च २०१३) पूर्ण करण्यास दिले (मार्च २०११), ज्यास मार्च २०१४ पर्यंत मुदतवाढ दिली गेली. नोव्हेंबर २०१२ आणि मार्च २०१४ दरम्यान विद्युत निर्मिती साधनसामग्री पुरविली गेली. पुरवठादाराला रु. १८.२३ कोटीचे प्रदान करण्यात आले (जुलै २०१४).

परंतु, साधनसामग्री ठेवण्यासाठी कायमस्वरुपी शेड उपलब्ध नसल्यामुळे, रु. ४९.०३ लक्ष खर्चून बांधलेल्या चार तात्पुरत्या शेड्समध्ये किंमती विद्युत निमिर्ती साधनसामग्री ठेवावी लागली होती. या तात्पुरत्या बांधलेल्या शेड्समध्ये ठेवलेल्या विद्युत निमिर्ती साधनसामग्रीच्या राखण व पहा-यावर नोव्हेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१५ दरम्यान विभागाने रु. २५.५७ लक्ष इतका अधिक खर्च केला होता. विद्युत निर्मिती साधनसामग्रीची वैधता मार्च २०१६ मध्ये संपली होती. तसेच, २८ मार्च २०११ रोजी पुरवठादाराने सादर केलेल्या चार वर्षे वैधता कालावधी (३१ मार्च २०१५) असलेल्या बँक हमीच्या रुपातील रु. २.०३ कोटी (कंत्राट मुल्याच्या १० टक्के) कार्यसुरक्षा ठेवीचेही नूतनीकरण पुरवठादाराकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे करता येऊ शकले नव्हते. याचा अर्थ असाही होतो की, भविष्यात विद्युत निर्मिती साधनसामग्रीच्या उभारणी आणि कार्यान्वयनाचा सर्व विभागाला सोसावा लागणार होता.

काळ जल विद्युत प्रकल्प (HEP)

त्याचप्रमाणे, काळ HEP मध्ये जरी धरण आणि जल वाहतुक व्यवस्थेचे काम सप्टेंबर २०१६ पर्यंत अनुक्रमे ८० टक्के आणि ९३ टक्के पूर्ण झाले होते तरीही, अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र परिमंडळ, पुणे यांचेकडून आरेखन उपलब्ध न झाल्यामुळे, विद्युतगृहासाठी निविदा मागविल्या जाऊ शकल्या नव्हत्या (नोव्हेंबर २०१६). ही सत्य परिस्थिती असताना SE नी विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे प्रापण, उभारणी आणि कार्यान्वयनाचे रु. २७.६९ कोटी खर्चाचे काम TPSC (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, नोएडा (पुरवठादार) यांना ३६ महिन्यांच्या विहित कालावधीत (डिसेंबर २०१४) पूर्ण करण्यासाठी दिले (डिसेंबर २०११), ज्यांसाठी जुलै २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली गेली होती. मार्च २०१४ ते जुलै २०१५ दरम्यान पुरविलेली विद्युत निर्मिती साधनसामग्री, रु. ३५.०३ लक्ष खर्चून बांधलेल्या तात्पुरत्या शेड्समध्ये विनावापर पडून होती (सप्टेंबर २०१६). सप्टेंबर २०१५ पर्यंत पुरवठादाराला रु. १३.२४ कोटी प्रदान केले होते आणि पुरवठादाराकडून ऑगस्ट २०१५मध्ये सादर केलेल्या रु. ६.१९ कोटी रकमेच्या देयकाचे प्रदान सप्टेंबर २०१६ पर्यंत केले नव्हते. तात्पुरत्या बांधलेल्या शेडस् मध्ये ठेवलेल्या विद्युत निर्मिती साधनसामग्रीच्या राखण आणि पहा-यासाठी देखील विभागाने जुलै २०१४ ते जुलै २०१५ दरम्यान रु. ६.६४ लक्ष खर्च केला होता. यावरुन असे सिध्द होते की निकृष्ट नियोजनामुळे वीज निर्मितीच्या साधनसामग्रीचे प्रापण आणि धरण, जल वाहतूक व्यवस्था आणि विद्युतगृहाच्या बांधकामाच्या प्रगतीचा मेळ घालण्यात विभाग अपयशी ठरला, परिणामी, रु ३७.६६ कोटी ४७ मूल्याची साधनसामग्री १४ ते ३० महिने विनावापर पडून होती. तसेच, दोन्ही प्रकल्पांच्या जागेवर वेळीच जर कायमस्वरुपी शेडस् बांधले असते तर तात्पुरत्या शेडसच्या बांधकामावर आणि राखण व पहा-यावर झालेला रु १.१६ कोटीचा खर्च टाळता येऊ शकला असता.

शासनाने असे नमूद केले (ऑक्टोबर २०१६) की, विद्युत निर्मिती साधनसामग्री ही बाजारात सहज उपलब्ध नसते आणि उपभोक्त्याच्या आवश्यकतेनुसार तिचे स्वतंत्ररित्या उत्पादन करावे लागते. म्हणून अश्या साधनसामग्रीचा पुरवठा करण्यासाठी किमान तीन वर्षाचा कालावधी अपेक्षित असतो. त्यानुसार विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे प्रापण नियोजित केले गेले होते. शासनाने पुढे असेही नमूद केले की, कार्यस्थळावरील परिस्थितीमुळे, कुंभे आणि काळ HEP च्या बांधकामाची संकल्पनचित्रे आणि आरेखनही बदलावे लागले ज्यामुळे कालमर्यादा अनुक्रमे ऑगस्ट २०१६ आणि मार्च २०१६ अशा बदलाव्या लागल्या. शासनाने पुढे असेही सांगितले की, विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरते शेड्स बांधावे लागले होते.

शासनाने दिलेले उत्तर खात्रीलायक नाही.दोन्ही जल विद्युत प्रकल्पातील वीज निर्मिती साधन सामग्रीचा पुरवठादाराकडून तीन वर्षाच्या कालावधीतच पुरवठा झाला होता. याबाबत दुमत नसले तरीही ,बांधकामातील प्रगतीचा वेग लक्षात घेता साधनसमग्रीच्या प्रापणाचीच वेळ चुकीची होती योगायोगाने, कुंभे HEP प्रकरणांत, बांधकामाची प्रगती आणि वीज निर्मिती साधनसामग्रीच्या साठवण व सुरक्षेवर व्हावयाच्या अपेक्षित अनाठायी खर्चाबदल च्क नी चिंता व्यक्त केली होती (डिसेंबर २०१०) तथापि, CE नी प्रापणासाठी परवानगी दिली आणि निविदा मागविल्या. पुढे, बांधकामासाठी ऑगस्ट २०१६ आणि मार्च २०१६ पर्यंत मुदतवाढ दिल्यावरही, दोन्ही जल प्रकल्पातील बांधकामाची गती मंदच राहिली, त्यामुळे साधनसामग्री विनावापर पडून राहिली व परिणामी टाळता येण्याजोगा खर्च झाला.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

(१) फेब्रुवारी २०१० पर्यंतच्या सद्यःस्थितीनुसार दोनही धरणांची व जलवहन प्रणालींची कामे जोमात सुरु होती व जलवाहक प्रणालीचे काम जून २०१२ पर्यंत पूर्ण होईल असे नियोजित होते. विद्युतगृहाच्या संकल्पनासाठी आवश्यक तांत्रिक माहिती मुख्य जनित्र संचाच्या पुरवठाराकडून सविस्तर संकल्पनानंतर उपलब्ध करुन घेणे व दरम्यान जनित्रसंचाच्या पुरवठा कालावधीत (१८ ते २४ महिने) विद्युतगृहाचेही स्थापत्य काम पूर्णत्वास नेणे असे जलविद्युत प्रकल्प उभारणीचे नियोजन होते त्यानुसार काळ कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या जानेवारी २०११ मधील प्रशासकीय मान्यतेनंतर कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या मुख्य जनत्र संचाचे आदेश EDCIL यांना दि. २५.०३.२०११ रोजी देण्यात आले. तसेच काळ जलविद्युत प्रकल्पाच्या मुख्य जनित्र संचाचे आदेश TPSCI यांना दि. २६.१२.२०११ रोजी देण्यात आले.

(२) प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी मंत्रालयीन स्तरावर घेण्यात आलेला आढावा खाली नमूद केल्याप्रमाणे :-

२.१ दि. २५.०४.२०११ रोजी काळ व कुंभे प्रकलपाविषयी आढावा बैठक झाल व काही स्थापत्य कामे मंजूर रेखाचित्रानुसार झालेली नसल्याने निदर्शनास आले.

२.२ दि. २६.०७.२०१२ रोजी काळ कुंभे प्रकल्पाविषयी आढावा बैठकीत मार्च २०१५ पर्यंत प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले.

२.३ दि. ०२.०९.२०१३ रोजी काळ व कुंभे प्रकल्पाविषयी आढावा बैठकीत कामाच्या प्रगतीचा आढावा घेऊन शेडयुलप्रमाणे कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच जी स्थापत्य कामे मंजुर रेखाचित्रानुसार झालेली नसल्याचे निदर्शनास आले त्याकरिता शासनाने समिती नियुक्त करुन सतिमीच्या निष्कर्षानुसार उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. दरम्यान प्रकल्पांची स्थापत्य कामे कुंभे व काळ अनुक्रमे ऑगस्ट २०१६ व मार्च २०१६ ला पूर्ण होणे नियोजित होते.

(३) प्रकल्पावरील खर्च प्र. मा. प्राप्त किंमतीपेक्षा जास्त झाल्याचे निदर्शनास आल्याने सप्टेंबर २०१५ मध्ये कामे स्थगित करणे अपरिहार्य ठरले. समांतररित्या मे २०१५ मध्ये कामातील तांत्रिक अनियेमततेस जबाबदार अधिका-यांची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित टेलर मेड जनित्रसंचाच्या उपकरणांची हवामानातील बदल, आर्द्रता, धूळ, पाऊस इ. पासून सुरक्षित साठवणूकीसाठी तात्पुरती शेड उभारणेकरिता केलेला खर्च न्याय्य आहे. वस्तुतः कालबध्द नियोजनानुसार कार्यान्वित होत असलेल्या जलविद्युत प्रकल्पाकरिता देखील क्रमाक्रमाने जनित्रसंचाच्या घटक उपकरणांची (जसे ड्राफ्ट टयूब, पाणचक्की, स्टेटर, रोटर इ.) उभारणी होत असल्याने तात्पुरतया पॅकेज शेडची उभारणी करण्यात येते.

साक्ष :

परिच्छेद क्रमांक ३.४ : साधनसामुग्री विनावापर पडून राहणे आणि टाळता येण्याजोगा खर्च

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक **२६ सप्टेंबर, १ नोव्हेंबर, २४ एप्रिल, ३० मे व २६ जून, २०१८** रोजी जलसंपदा विभागाच्या विभागीय सचिव विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.साधन सामुग्री विनावापर पडून राहणे आणि टाळता येण्यासारखा खर्च या परिच्छेद क्रमांक ३.४ संबंधित आपण समितीला माहिती द्यावी. हा परिच्छेद

जलविद्युत प्रकल्पासंबंधी असून या प्रकरणी तीन वेळा सुप्रमा झालेली आहे. प्रकल्पासाठी मशिनरी आपण विकत घेतली असून पुन्हा सुप्रमाची वाट पाहण्यात येत आहे. प्रकल्पाचे काम आता थांबलेले असल्यामुळे या संपूर्ण विषयाची स्थिती आपण समितीला विषद करावीअसे समितीने सांगितले.

काळ कुन्भे हा प्रकल्प २५ मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प आहे. याची मूळ प्रशासकीय मान्यता सन १९९८ मध्ये स्वतंत्रपणे देण्यात आली होती. काळ जलविद्युत प्रकल्प १५ मेगावॅटसाठी आणि कुन्भे जलविद्युत प्रकल्प १० मेगावॅटसाठी होता. त्यावेळी कुन्भे जलविद्युत प्रकल्प हा निराबाई नदी या नदीवर स्वतंत्र प्रस्तावित केला होता. काळ प्रकल्प हा काळ नदीवर होता. त्यानंतर सन २००४ मध्ये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता झाली त्यावेळी कुन्भे जलविद्युत प्रकल्पातून वीज निर्मितीनंतर जे पाणी सोडले जाईल ते पाणी जर काळ धरणात घेतले तर अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊन वीज निर्मिती सुध्दा वाढू शकेल असा विचार करुन हा प्रकल्प एकत्रित करण्यात आला व त्याला एकत्रितपणे सुप्रमा देण्यात आली. सन २०११ मध्ये या प्रकल्पाची द्वितीय सुप्रमा झाली आहे. हा प्रकल्प एकत्रितपणे २५ मेगावॅटचा प्रकल्प म्हणून निर्माण करण्यात आला. त्यामध्ये गांधारी नदीवरील सिंचन प्रकल्पाला सन २००५ मध्ये प्रथम स्वतंत्र प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. काळ धरणातून वीज निर्मितीनंतर जे पाणी सोडले जाईल ते पाणी गांधारी नदीमध्ये घेऊन त्यातून पुन्हा २१७५ हेक्टर जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित होते. त्यामुळे काळ धरणाचा ५० टक्के शेअर आहे तो या गांधारी प्रकल्पावर डेबीट टाकून त्यावेळी सुप्रमा आदेश काढण्यात आले आहेत. त्यानुसार सन २००४ पासून या प्रकल्पाची कामे सुरू झाली होती. कुन्भे प्रकल्पामध्ये आपल्याला ५०० मिटर्सचे हेड उपलब्ध असल्यामुळे उंचीचा वापर करुन वॉटर कन्व्हेअन्स यंत्रणा आपल्याला अंडर ग्राऊंड करावी लागते. त्यामध्ये हेडरेस्ट टनेल आणि प्रेशर शाफ्ट घेऊन सरफेस पॉवर हाऊसवर आपल्याला हे काम करावे लागते. त्यानुसार शासनाच्या परवानगीने या निविदा काढल्या गेल्या होत्या. दरम्यानच्या काळात कुन्भे आणि काळ या दोन धरणांना प्रकल्पग्रस्तांचा भूसंपादनासाठी विरोध होता. त्यामुळे या धरणांची कामे विलंबाने झाली. त्यामध्ये तशा प्रकारच्या काही अडचणी आल्या होत्या. त्यावेळी सिव्हील वर्कचे सुध्दा टेंडर झाले होते. सिव्हील वर्कच्या टेंडरसोबतच इलेक्ट्रिकल्स प्रोक्युरमेंट करावे लागते. कारण यामध्ये इंटरनल डिपेन्डन्ट ॲक्टीव्हीटी असतात. सिव्हील वर्कचे काही काम करायचे असते. फाऊंडेशनचे काम झाल्यानंतर त्यावर काही विद्युत घटकांची उभारणी करावी लागणे, अशा प्रकारचे ते इंटरफेस काम असते. यामध्ये इंटिग्रेटेड अप्रोच असल्यामुळे या दोन्ही कामांच्या निविदा काढल्या गेल्या आहेत. पण दुर्दैवाने काही प्रमाणात सिव्हीलचे काम मागे पडले. त्यामुळे इलेक्ट्रिकल्स कम्पोनन्टच्या दरम्यान त्यांनी प्रोक्युरमेंटच्या ऑर्डर्स दिल्या होत्या.त्याप्रमाणे कुन्भेच्या बाबतीत प्लॅन्ट जनरेटिंग मशीन शंभर टक्के प्राप्त झाली आहे. अजूनही ट्रान्सफामर्स किंवा स्वीचर आणि इक्वॅक्युशन अरेंजमेंट अशी काही कामे राहिली आहेत.त्या बाबतीत कोणत्याही निविदा झालेल्या नाहीत. दरम्यान या प्रकल्पाचा खर्च मान्यताप्राप्त सुप्रमा किंमती वाढल्यामुळे सन २०१५ मध्ये हे काम थांबविण्यात आले आहे. त्यानंतर शासनाने फार कडक भूमिका घेतली की, सुप्रमापेक्षा वाढीव खर्चाबाबत जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत वाढीव खर्चास मान्यता देण्यात येणार नाही. त्यामुळे काही इक्युपमेंट आली असून काही यायची आहेत.अशा परिस्थितीत सुप्रमाचा प्रस्ताव आता एसएलटीएसीकडे सादर केलेला आहे. तो विचाराधीन असून आम्ही सुप्रमा लवकरात लवकर प्राप्त करुन घेऊन या प्रकल्पावर शासनाची जी गुंतवणूक झाली आहे ती फलदायी ठरण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प लवकर मार्गी लावण्याचे शासनाचे धोरण आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आतापर्यंत विभागास ७४०.४४ कोटी रुपयांची तिसरी सुप्रमा मिळाली आहे. आतापर्यंत या प्रकल्पावर ११२७ कोटी रुपये इतका खर्च केला आहे. ७४० कोटी रुपयांच्या सुप्रमापेक्षा विभागाने एकूण ११२७ कोटी रुपये खर्च केले आहेत.त असे असताना आणखी सुप्रमा हवी आहे. द्वया प्रकल्पाची मूळ प्रस्तावित किंमत २०० कोटी रुपयांपेक्षा कमी होती. हा प्रकल्प सन २००४ पासून २०१७ पर्यंत रखडत आणायचा. प्रकल्पासंबंधीच्या मशिनरीच्या ऑर्डर्स देऊन टाकायच्या आणि त्या मशिनरी बसविण्यासाठी शेड तयार केल्या नाहीत. टेंपररी शेडसाठी निधी खर्च केला जातो. त्याच्या देखरेखीसाठी आणखी निधी खर्च होतो. ही सर्व व्यवस्था आपल्याला नियोजन शून्य वाटत नाही काय ? त्या सिव्हील वर्कला उशीर का झाला, त्याची कारणे कोणती ? असा प्रश्न समितीने केला असता, काळ आणि कुन्भे या दोन धरणाची कामे प्रस्तावित होती. त्यासाठी भूसंपादन आणि पुनर्वसन करणे आणि काही प्रमाणात प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या या कारणांमुळे विलंब झाला आहे. सिव्हील वर्कच्या निविदा काढल्यानंतरही काही विलंब झाला. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जमीन संपादन न झाल्यामुळे प्रकल्पाच्या कामाला विलंब झाला पण विभागाने मशिनरी का आणली तर इंटिग्रेटेड अप्रोचमुळे आणली असे विभागाचे आता म्हणणे आहे. त्याचवेळी सिव्हील वर्कला मात्र उशीर झाला आहे. द्वपण सिव्हील वर्क सुरू झाले होते की नाही असे समितीने विचारले असता, सिव्हील वर्क सुरू झाले होते.

सिव्हील वर्कच्या बाबतीत कुन्भे प्रकल्पाची जी जलवहन प्रणाली यंत्रणा आहे की, ज्यातून धरणाचे पाणी आपण पॉवर हाऊसमध्ये आणणार आहोत त्याच्या खोदकामामध्ये डिझाईनपेक्षा जास्त एरिया खोदकाम करण्यात आला. त्यामुळे डिझाईनच्या लोकांनी पॉईन्ट आऊट केले की, डिझाईनच्या रिक्वायरमेंटप्रमाणे खोदकाम व्हायला हवे होते. पाण्याच्या वाहून जाणा-या डिस्चार्ज सेक्शन एवढेच क्रॉस सेक्शन आवश्यक आहे. जास्तीचे काम करण्याची आवश्यकता नाही. हा डिस्पुट निर्माण झाला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बिलाचे पेमेंट विभागाने केले असेल.विभागाच्या म्हणण्यानुसार कंत्राटदाराने टनेलचे साईज वाढविले. ते डिझाईननुसार नाही व त्याची गरज सुध्दा नाही. मग त्या कंत्राटदाराने ज्यादाच्या केलेल्या कामाबद्दल त्या कंत्राटदारावर कारवाई केली आहे किंवा प्रस्तावित केली आहे काय असे समितीने विचारले असता.

विभागाने कंत्राटदाराला या कामाचे पेमेंट अद्याप केलेले नाही. ज्या अधिका-यांनी या वाढीव कामाला परवानगी दिली किंवा जे वाढीव काम त्यांच्या काळात झाले त्यातील अगदी शाखा अभियंतापासून ते मुख्य अभियंता यांच्यापर्यंत सर्वांवर आपण दोषारोप ठेवले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. ही चौकशी केव्हापासून सुरू झाली आहे ? त्यांच्यावर दोषारोप कधी दाखल केला आणि शो कॉज कधी दिले हे सांगा असे समितीने सूचित केले असता, २२ सप्टेंबर, २०१७ रोजी सर्वांना दोषारोप बजावण्यात आलेले आहेत. यासाठी शासनाने सन २०११ रोजी एक चौकशी समिती नेमली होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता हे सर्व अधिकारी सस्पेंड झालेले आहेत की कार्यरत आहेत ? असे समितीने विचारले असता, यातील श्री.रा.चं. रिठे, सहाय्यक अभियंता श्रेणी-१ आणि श्री. अ. पां.काळुंखे, कार्यकारी अभियंता हे अंडर सस्पेन्शन आहेत बाकीचे अधिकारी हे निवृत्त झालेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

निवृत्त झाले म्हणून ते अधिकारी काही दोषातून मुक्त होत नाहीत. माझे म्हणणे असे आहे की, जे सस्पेंडेड आहेत त्यांच्यावर आपल्याला दुसरी सुद्धा कारवाई करता येईल. पोलिस कारवाई सारख्या काही कारवाया करण्याची आपल्याकडे कायद्यामध्ये तरतूद आहे.

आपल्याला हे ही माहित असेल की, कॉज ऑफ ॲक्शन नंतर ४ वर्षाच्या आत जर आपण कारवाई नाही केली तर रिटायर झाल्यावर सुद्धा आपल्याला त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही. ते जर ड्युटीवर असतील तर ठिक आहे पण नसतील तर फार गंभीर विषय आहे. कॉज ऑफ ॲक्शन २०१०-११ मध्ये झाली म्हणून सन २०१५ नंतर आपल्याला त्यांच्यावर काही कारवाईच करता येणार नाही. यासाठी जाणून-बुजून ५-५ वर्ष इन्क्वायरी रिपोर्ट सादर न करणे, निर्णय न देणे किंवा ही सर्व यादी आम्हाला देऊन फक्त फेस सेव्हींग करायचे आणि दोषी लोकांवर काहीच कारवाई न होणे हा सर्व खूप गंभीर विषय आहे. बोगद्याची साईज जर परवानगीने वाढून दिली तर तुम्हाला पैसे द्यावेच लागणार आहेत. कॉन्ट्रॅक्टरने जर तुमच्या परवानगीने काम केले असेल तर पैसे द्यावेच लागणार आहेत. या प्रकारे २०० कोटी रुपयाचा प्रकल्प १२०० कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे. हे सर्व कधी पूर्ण होणार याचा काही पत्ता नाही आणि जबाबदारी फिक्स करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे काम खूप कासव गतीने चालत आहे की त्याचा आणखी काही निर्णयच होत नाही. यालाच जोडून आणखी एक विषय आहे की, १९८ कोटी रुपयाचे धरणाचे कामासाठी तिसरी सुप्रमा ७४०.४४ कोटी रुपये इतकी झाली आणि ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ११२७ कोटी रुपयाचा खर्च करण्यात आला, हे कसे काय ? याचे उत्तर द्यावे. असे समितीने सांगितले. एकत्रित खर्च विचारात घेतला तर याची तिसरी सुप्रमा ही १०८४ कोटी रुपयाची आहे. फक्त गांधारी प्रकल्पाचा विचार केला तर हा एरिगेशन प्रकल्प आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तिसरी सुप्रमा ही ७४० कोटी रुपयाची आहे आणि ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ११२७ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. अंदाजे ३९० कोटी रुपयाचा खर्च जास्त झालेला आहे असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी यामध्ये प्रमा ही १०८४ कोटी रुपयाची होती पण गांधारी प्रकल्पावर जो ३४४ कोटी रुपयाचा खर्च करायचा होता तो क्षेत्रिय स्तरावर केला गेला आहे. असे समितीस सांगितले.

११२७ कोटी रुपयांमध्ये ३४४ कोटी रुपये गांधारी प्रकल्पासाठी वेगळी प्रमा आहे काय ? असे समितीने विचारले असता, गांधारी प्रकल्पावर हा खर्च चार्ज करण्यासाठी यामध्ये प्रोव्हिजन केलेली आहे. याचा नेट खर्च हा ७४०.४४ कोटी रुपये आहे. पण गांधारी प्रकल्पाकरीता ३४४ कोटी रुपयाची प्रोव्हिजन यामध्ये केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गांधारी प्रकल्पासाठी तुमचा वेगळा प्रमा आहे काय ? विभागाच्या उत्तरामध्ये गांधारी प्रकल्पाचा उल्लेख कुठेही केलेला नाही. या दोन्ही प्रकल्पाला विभागाने जॉइन केलेले आहे आणि यांची प्रशासकीय मान्यता ७४० कोटी रुपयाच्या अनुषंगाने कट करुन घेणार असाल तर तशी कट करुन माहिती द्यावी असे समितीने विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिका-यांनी १०८४ कोटी रुपये विचारात घेऊन त्यानुसार खर्च केला हे चुकीचे आहे असे उत्तर दिले. तिसरी सुप्रमा ही ७४० कोटी रुपयाची होती आणि ११२७ कोटी रुपये खर्च झालेला आहे तर सुप्रमा ७४० कोटीची असताना खर्च त्यावर कसा गेला सुप्रमा नसताना इतका खर्च झाला यासाठी कोण जबाबदार आहे ? सुप्रमा १ आणि ३ याचा ही खर्च एकुण १११५ कोटी रुपयामध्ये येईल. सुप्रमा १ व २ मध्ये किती रुपयाची मान्यता होती ? असा प्रश्न समितीने केला त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सुप्रमा १ ला १९४.८७ कोटी रुपयाची मान्यता होती आणि नंतर सुप्रमा २ मध्ये ३७६.४१ कोटी रुपयाचा एकत्रित प्रकल्प झाला.

६ जानेवारी, २०११ ला जी तिसरी सुप्रमा झाली त्याच्या आदेशामध्येच स्पष्ट म्हटलेले आहे की, काळ जलविद्युत प्रकल्पाची एकूण किंमत ८२६ कोटी रुपये दाखवलेली आहे आणि गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग केलेली ३४४ कोटी रुपये एवढी रक्कम वजा करुन ४८२ कोटी रुपये काळ प्रकल्पाची आणि कुंभेची २५८ कोटी रुपये असे मिळून एकुण ७४० कोटी रुपयाची तरतूद दाखवलेली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या आर्थिक क्षेत्रावरील अहवालातील पेज नं. ५ मधील परिच्छेद क्र, ३ मध्ये आपण सांगितले आहे की, काळ प्रकल्पासाठी ८९५ कोटी रुपये आणि कुंभे प्रकल्पासाठी २३१ कोटी रुपये खर्च झालेला आहे. याचा आपण पूर्ण चार्ट दिलेला आहे पण यामध्ये गांधारी प्रकल्पाची माहिती कुठेही दिलेली नाही.

१० ते ५ कोटी रुपयांपर्यंतचा खर्च आम्ही समजू शकतो. हा खर्च परवानगीशिवाय केलेला असल्यामुळे विभागाने काही कारवाई केलेली आहे काय ? Its very primary question. ३९० कोटी रुपये प्रमा प्रमाणे आगाऊचा खर्च झालेला आहे त्याबद्दल आता लोकलेखा समितीचा परिच्छेद आला तरीही शासनाने काही भूमिका घेतेलेली आहे की नाही ? असे समितीने विचारले.

आता सर्व खर्च वाढलेला आहे हे निश्चित आहे.सन २०१५ नंतर या प्रकल्पावर काहीही खर्च झालेला नाही. कारण तेव्हाच हे सर्व काम थांबविण्यात आलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१२ साली विभागाने चौकशी समिती नेमली आणि सप्टेंबर, २०१७ साली विभागाने सांगितले की, श्री. ए.पी. काळरेखे यासाठी दोषी आहेत. ३८७ कोटी रुपयाचा एक्सेस खर्च सुप्रमा शिवाय केलेला आहे. एवढया मोठया खर्चाला केवळ एक कार्यकारी अभियंता जबाबदार असतो काय ? सुधारीत प्रशासकीय मान्यतेशिवाय कॉन्ट्रॅक्टरचा पेमेंट कसा करण्यात आला ? सुप्रमाशिवाय निधी कसा उपलब्ध झाला ? सुप्रमा नव्हती तरी अर्थसंकल्पामध्ये या निधीची तरतूद कशी करण्यात आली ? असे समितीने विचारले असता, हा सर्व खर्च निधी उपलब्ध असल्यामुळे झालेला आहे. अर्थसंकल्पामध्ये प्रकल्पनिहाय तरतूद होत असते. कारण शासनाने सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये वेळोवेळी निर्णय घेऊन जिथे वाढीव खर्च झालेला तिथे भू-संपादन किंवा पुनर्वसनावर झालेला खर्च किंवा काही बाबतीत उपलब्ध बजेटच्या मर्यादेत राहून वाढीव खर्च करण्यासाठी शासनाने सुप्रमाशिवाय परवानगी दिलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाची ही तिसरी सुप्रमा आहे. यासाठी परवानगी मिळालेली आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले. या प्रकल्पासाठी अशी परवानगी दिलेली नाही.

या प्रकल्पाला परवानगी नसताना वाढीव खर्च केला आणि त्याचे पेमेंट पण केलेले आहे. हे सर्व करणा-या अधिका-यांवर काही कारवाई चालू आहे काय ? हा विषय गंभीर आहे बोगद्याचे काम कमी किंवा जास्त झाले याबाबत त्या अधिका-यांवर कारवाई केली पण हा गंभीर विषय असताना देखील विचारात घेतला नाही हा एक प्रश्न आहे. दुसरे असे की, यावर सचिवांचे उत्तर आले की, एरिगेशनमध्ये हा खर्च होतच असतो. पण एक्सलेशन कॉस्टमध्ये नेमका १०,१५ किंवा २० टक्के किती पर्यंत खर्च करण्याची परवानगी आहे ? असे समितीने विचारले असता, १० टक्केपर्यंत खर्च करण्याची परवानगी आहे असे समितीला सांगितले. ही खर्च करण्याची परवानगी आहे पण यावर ३८७ कोटी रुपये खर्च करण्याची परवानगी नाही. त्यामुळे हा खूप गंभीर विषय आहे तरी देखील खात्याने याची दखल घेतलेली नाही. दुसरे असे की, एक्सलेशन कॉस्टची परवानगी शासन देत असेल तर शासनाने तशा स्वरुपाचे आदेश विभागाला निर्गमीत केले आहेत काय ? असे आदेश नसतील आणि जर हा खर्च चुकीचा केला असेल तर त्या संबंधाने कोणत्या अधिका-यांवर आपण कारवाई करणार आहात ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी या वाढीव खर्चावर शासन स्तरावरुन व्यवस्थित परवानगी दिलेली नाही. तथापि बजेटमध्ये तरतूद असल्यामुळे हा खर्च केलेला आहे. असे समितीला सांगितले.

बजेटमध्ये तरतूद करीत असताना निरनिराळया प्रकल्पाची वेगवेगळी मान्यता घेतलेली असते आणि त्या पद्धतीने विभागाने तरतूद केलेली असते. निरनिराळया कामासाठी तरतूद केलेली असताना ती एकत्रित करुन आपण डायव्हर्ट कशा पद्धतीने केलेली आहे आणि त्यासाठी कोणाची मान्यता आहे. असे समितीने विचारले असता, विभागीय अधिकारी ४८०१ या हेडच्या अंतर्गत राज्यात जलविद्युत प्रकल्पाची जी कामे सुरु आहेत त्यासाठी आपण प्रकल्पनिहाय तरतूदी केलेल्या आहेत. असे समितीस अवगत केले.

सन २०११-१२, सन २०१२-१३, सन २०१३-१४, सन २०१४-१५, सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या ६ वर्षाच्या काळात विभागाने शासनाला एकदा तरी सुधारीत प्रशासकीय मान्यता कार्योत्तर यांना देण्यात यावी, असे लिहिले आहे काय ? किंवा त्यांना मान्यता मागितलेली आहे काय ? असे समितीने विचारले असता, सन २०११ मध्ये ७४९ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सन २०११ पासून ते सन २०१५ पर्यंत जे ४ वर्षे बजेट मिळाले त्यामध्ये हा वाढीव खर्च झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सु.प्र.मा. नसताना अतिरिक्त खर्च केला. त्यावर अधिका-यांचे असे म्हणणे आहे की, त्यावेळेच्या सरकारने काही प्रकल्पांना अशा पध्दतीने खर्च करण्यास परवानगी दिली होती. बरोबर आहे काय ? या पर्टिक्युलर प्रोजेक्टला परवानगी नव्हती असेही तुमचे म्हणणे आहे. त्या संदर्भातील अधिका-यांवर तुम्ही काय कारवाई केली ? जनरल बजेटमध्ये या प्रोजेक्टकरिता ५०० कोटी रुपये आहेत. त्यामुळे १०० कोटीला मान्यता आहे उरलेले २०० कोटी रुपये खर्च केले, असे विभागाचे म्हणणे आहे. मात्र बजेटमध्ये असे होऊच शकत नाही. असे मत समितीने व्यक्त केले. या प्रकल्पाकरिता बजेट उपलब्ध होते व त्यातूनच खर्च झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे सर्व फायनान्शिअल मिसॲप्रोप्रिएशन आहे. सर्व टेक्नीकल टिम असते. यांनी असे नमूद केले आहे की, सन २०११ मध्ये काळ व कुंभे प्रकल्पाविषयी आढावा बैठक झाली, त्यात स्थापत्य कामे मंजूर रेखाचित्रानुसार झालेली नसल्याचे निदर्शनास आले. एवढा पैसा खर्च होऊनही तुम्ही जे ड्रॉईंग दिलेले आहे त्याप्रमाणे सिव्हिल वर्क होत नाही, मग त्या प्रोजेक्टकडे लक्ष कोण देतो? फायनान्शिल लूट तर सुरुच होती परंतु, फिजीकली जी कामे सुरु होती त्यांच्याकडेही कोणाचे लक्ष नव्हते. प्रोजेक्टचे कोण इन्चार्ज होते, कोण इ.डी. होते, कोण एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर होते, कोणाचेच लक्ष नव्हते काय येथे, ही ड्रॉईंग कोणी बनविली ? अशी समितीने विचारणा केली. याचे डिझाईनचे काम हे कोयना डिझाईन सर्कल म्हणजे जलविद्युत प्रकल्पामध्ये जे एक्सपर्ट आहेत, अशा डिझाईन सर्कलकडे हे काम दिलेले होते. त्यांनी डिझाईन इशु केले होते. त्या डिझाईन प्रमाणे काम करुन घेण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिका-यांची होती. त्यापेक्षा त्यांनी वाढीव सेक्शन घेणे किंवा या डिस्चार्जसाठी एक सेक्शन दिला असेल त्यापेक्षा जास्त सेक्शनमध्ये काम केले. त्यांच्या काही अडचणी त्यांनी मांडल्या असतील. मात्र त्यांचे पेमेंट झालेले नाही. ही सर्व जबाबदारी कार्यकारी अभियंत्यांची होती. क्षेत्रीय कार्यकारी अभियंत्यांनी डिझाईननुसार काम करुन घेणे ही, त्यांची जबाबदारी आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वाढीव खर्च झाला ही चूक झाली याच्याशी मी सहमत आहे. मग कारवाईबाबत काय केले जाणार आहे ? सन २०११ ते सन २०१५ पर्यंत सुधारित प्रशासकीय मान्यता नसतानाही ॲडिशनल ३८७ कोटी रुपयांचे काम केले गेले. विभागाला ४ वर्षे असेच काम करता आले तर, मग सन २०१७ पर्यंत तुम्ही असेच तुमच्या जबाबदारीवर काम पूर्ण का केले नाही? सुधारित प्रशासकीय मान्यता नसताना ३८७ कोटी रुपये खर्च करताना तुम्ही थांबला नाहीत. मग आता ११२७ कोटी रुपयांनंतर का थांबला ? तुम्ही ज्या परवानगीने आतापर्यंत ४ वर्षे काम केले, त्याच आधारावर ते काम पूर्ण केले पाहिजे होते.

दुसरा मुद्दा असा आहे की, सचिवांकडून समितीला मिळालेली माहिती ही समितीची दिशाभूल करणारी आहे. ही गंभीर गोष्ट आहे. यामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की, ऑक्टोबर, २०१५ अखेर झालेल्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे. काळ प्रकल्प, स्थापत्य, ८६९.२४ कोटी रुपये, विवया २६.२८ कोटी रुपये व एकूण ८९५.५२ कोटी रुपये. कुंभे द्व १९९.४४ कोटी रुपये, ३२.२७ कोटी रुपये, २३१.७१ व एकूण ११२७.२३ कोटी रुपये. असे स्पष्ट उत्तर दिलेले असताना गांधारी प्रकल्पावर खर्च झाला असे सांगून दिशाभूल करण्याचा प्रयत्न वारंवार झालेला आहे. समितीची दिशाभूल करणे ही चांगली गोष्ट नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

हा सर्व खर्च सु.प्र.मा.च्या आदेशातच नमूद केलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले. ७४० कोटी रुपयांच्या सु.प्र.मा. मध्ये गांधारी प्रकल्पाची वेगळी सु.प्र.मा. आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागीय प्रतिनिधीने ७४० कोटी रुपये अधिक गांधारी प्रकल्प असल्याचे समितीस सांगितले. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे.

सु.प्र.मा. मध्ये गांधारी प्रकल्पावर किती खर्च करायला सांगितला आहे आणि विभागाने किती केला आहे ? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय सचिवांनी गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग केलेली रक्कम ३४४ कोटी रुपयांची आहे. तसेच प्रकल्पावर काही खर्च झालेला नाही. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे, ही समितीची दिशाभूल आहे. याची मोडस ऑपरेंडी अशी दिसत आहे की, एखाद्या नवीन प्रकल्पाचे नाव टाकायचे, त्याकरिता पैसे घ्यायचे, तिन्ही प्रकल्पांना संयुक्त सु.प्र.मा. द्यायची व ज्या प्रकल्पासाठी ३४४ कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत, त्याचे काही काम करायचे नाही. तो पैसा येथे खर्च करायचा. हे खर्चाचे एस्टिमेट वाढतच चालले आहे. त्याला आता पुढचे पैसे द्यायचे नाहीत, त्याला कॅबिनेटमध्ये सु.प्र.मा. मिळू शकणार नाही त्यामुळे त्यातून काढलेला हा मिडल मार्ग आहे.

७४० कोटी रुपये दोन प्रकल्पांकरिता व गांधारी प्रकल्पाकरिता ३४४ कोटी रुपये अशाप्रकारे १०८८ कोटी रुपये होतात. मात्र जर गांधारी प्रकल्पावर एकही रुपया खर्च केलेला नसेल तर विभागाने ७४० कोटी रुपयांतून दोन्ही प्रकल्पावर खर्च केला. असे मत समितीने व्यक्त केले.

काळ या प्रकल्पावर होणा-या एकूण खर्चातील ३४४ कोटी १४ लाख रुपये हे गांधारी सिंचन प्रकल्पावर म्हणजे २१६५ हेक्टर क्षेत्र निर्मितीसाठी खर्च करणार आहोत. त्याच्या हेडवर्कचा हा कॉम्पोनंट गांधारी प्रकल्पावर खर्च करण्यासाठी गांधारी प्रकल्पाकरिता दाखविलेला आहे. यातील पाणी साठा हा आपण गांधारी प्रकल्पासाठी वापरणार आहोत. त्यामुळे ॲक्चुअली प्रशासकीय मान्यता ही, १०८४ कोटी रुपयांची आहे. परंतु, १०८४ कोटी रुपयांतील ३४४.१४ कोटी रुपये हे गांधारी प्रकल्पाचे हेडवर्क व राहिलेले ७४० कोटी रुपये काळ व कुंभे प्रकल्पासाठी आहेत. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

२ हजारापेक्षा जास्त हेक्टर जमिनीवर हे ३४४ कोटी रुपये खर्च करुन विभागास सिंचन क्षमता निर्माण करण्यात येणार होती. काळ व कुंभे प्रकल्पामुळे गांधारीचे क्षेत्र पाणलोट क्षेत्रात येणार होते व त्याचा फायदा हा २ हजारापेक्षा जास्त हेक्टर जमिनीला होणार होता. हे ३४४ कोटी रुपये खर्च करुन गांधारी योजनेतील किती हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळाला, ते सांगावे. असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधीने गांधारी हा भविष्यकालीन प्रकल्प असल्याचे समितीला सांगितले.

या परिच्छेदामध्ये कोठेही गांधारी प्रकल्पाबाबत नमूद नाही. जानेवारी, २०११ मध्ये काळ व कुंभे या प्रकल्पांना ७४० कोटी रुपयांचे शासनाचे रिवाईज ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अप्रुव्हल होते. ऑक्टोबर, २०१५ पर्यंत या दोन प्रकल्पांवर आपण ११२७.३३ कोटी रुपयांचा खर्च केलेला आहे. मुद्दा हा देखील आहे की, ओरिजनल रिवाईज्ड अप्रुव्हल हे १९४.८७ कोटी रुपयांचे होते. आपण ते सन २०११ मध्ये ७४० कोटी रुपयांना रिवाईज केले. एवढी कॉस्ट कशाकरिता वाढली आहे ते देखील आपण स्पष्ट करावे. कारण हे सर्व सिव्हील वर्क आहे. इलेक्ट्रीकल कॉम्पोनंटमध्ये विशेष काही चेंजेस झालेले नाहीत. हे रिहॅबिलीटेशन कॉस्टमुळे झाले की, डॅमची हाईट वाढल्यामुळे किंवा आणखी काही टेक्नीकल डिझाईनमुळे हे १९४.८७ कोटी रुपये वाढून ७४० कोटी रुपये झाले. या दोन प्रोजेक्ट्सचीच चर्चा येथे सुरु आहे. गांधारी प्रोजेक्टबाबत येथे काहीच नमूद नाही. या ७४० कोटी रुपयांच्या अगेन्स्ट आपला खर्च ११२७ कोटी रुपये झालेला आहे.

Secondly, whether the Division had requested the Government for revised approval आणि आपण ती प्रशासकीय मान्यता रोखून ठेवली असेल तर ती कोणत्या कारणासाठी हे समितीला सांगावे. असे प्रधान महालेखाकार यांनी सूचना केली.

दिनांक ६ जानेवारी, २०११ रोजी जी तृतीय सु.प्र.मा. झाली त्या आदेशाच्या अकम्पनीमेंट मध्येच हा तपशील नमूद केलेला आहे. गांधारी प्रकल्पासाठी ३४४ कोटी रुपये व ७४० कोटी रुपये हे जलविद्युत प्रकल्पासाठी अशी १०८४ कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यावर हा जो खर्च चार्ज करायचा की, गांधारी प्रकल्प म्हणजे काय तर काळ धरणाच्या खाली एका लोकेशनला एक वेअर बांधायची व तेथून कालवे काढून २१७५ हेक्टरला पाणी पुरवठा करायचा. त्यासाठी प्र.मा. वेगळी आहे. मात्र त्याचे हेडवर्क म्हणून कारण काळ येथे पार्शल स्टोअरेज होणार आहे. या प्रकल्पात पाणी अडविल्यामुळे खाली पाणी उपलब्ध होणार आहे म्हणून गांधारी प्रकल्पाचे हेडवर्क्स हे गांधारी प्रकल्पाचे एक धरणच आहे, काळ धरण असे गृहीत धरुन तो खर्च चार्ज केलेला आहे. एकत्रित काळ धरणाच्या ५० टक्के खर्च हा गांधारी प्रकल्पावर करावा असे सु.प्र.मा. आदेशामध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे. त्यादृष्टीने तो खर्च केलेला आहे. फक्त काळ व कुंभे येथे आयसोलेशनवर हायड्रो प्रकल्प विचारात घेतला तर त्याकरिता ७४० कोटी रुपयांची तरतूद आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले ११२७ कोटी रुपये हे फक्त काळ व कुंभे प्रकल्पाकरिता नाहीत असे आपल्याला म्हणावयाचे आहेत काय ? असे प्रधान महालेखाकार यांनी विचारले असता, काळ धरणावरही खर्च झालेला आहे व काळ धरणाच्या ५० टक्के खर्च हा गांधारी प्रकल्पावर वर्ग करायचा आहे, अशी तरतूद या सु.प्र.मा. आदेशातच आहे. त्या आदेशाची प्रत समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने गांधारी प्रकल्पाचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल किती आहे ? असे विचारले असता विभागीय सचिवांनी सन २००५ मध्ये गांधारी प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे २१७५ हेक्टर क्षेत्रासाठी हा खर्च २५ कोटी ४८ लक्ष इतका आहे. हा सन २००५ चा खर्च आहे. त्याच्या अगेन्स्ट तुम्ही ३४४ कोटी रुपये खर्च केले ? गांधारी हा फक्त वळण बंधारा बांधलेला आहे. कारण काळ प्रकल्पातून जल विद्युत निर्मितीनंतर जे पाणी सोडले जाईल ते कॅनॉल काढून सोडले जाईल. मुख्य पाणी हे काळ धरणातून उपलब्ध होणार आहे. ३४४ कोटी रुपयांची वेगळी प्र.मा. आहे काय ? सु.प्र.मा. आदेशामध्ये त्याची तरतूद केलेली आहे. तृतीय सु.प्र.मा. मध्येही याचा उल्लेख आहे. असे समितीस अवगत केले तसेच विभागीय प्रतिनिधीची सु.प्र.मा. मधील तरतुद पुढील प्रमाणे समितीने अवगत केले.

सु.प्र.मा. आदेश दिनांक ६ जानेवारी, २०११ रोजीचा आहे. यातील तिस-या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, 'काळ जलविद्युत प्रकल्पातून वीज निर्मितीनंतरचे अवजल म्हणजे बाहेर जाणारे पाणी ९७.९४ द.ल.घ.मी. गांधारी नदीत सोडणे प्रस्तावित आहे. गांधारी नदीत काळ जलविद्युत केंद्राचे अवजलाद्वारे नियंत्रित येवा उपलब्ध होणार असल्याने प्रस्तावित गांधारी लघू पाटबंधारे योजने ऐवजी वळण बंधारा पुरेसा ठरतो, म्हणजेच वळण बंधारा सफिशिअंट आहे असे यामध्ये म्हटले आहे. पुढे असे म्हटले आहे की, त्यामुळे गांधारी योजनेच्या खर्चातही बचत होणार आहे. काळ जलविद्युत प्रकल्पाचे अवजल गांधारी नदीवर मौजे कोंझर येथे वळण बंधारा बांधून महाड तालुक्यातील १९ गावातील २१७५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित गांधारी वळण बंधा-याद्वारे काळ जलविद्युत प्रकल्पाच्या अवजलापैकी १९.७७ द.ल.घ.मी. पाणी सिंचनासाठी, १४.६९ द.ल.घ.मी. पाणी पिण्यासाठी व ५४ द.ल.घ.मी. पाणी औद्योगिक वापरासाठी प्रस्तावित आहे. त्यामुळे काळ जलविद्युत केंद्राच्या धरणाचा ५० टक्के खर्च प्रस्तावित गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग करण्यात आलेला आहे. वरीलप्रमाणे खर्च गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग करुन झाल्यानंतरही प्रस्तावित गांधारी सिंचन प्रकल्प मापदंडात बसतो याची खातरजमा या प्रकल्प अहवालात केलेली आहे.'

ॲनेक्श्चरमध्ये दोन मुद्दे नमूद केले आहेत. १. काळ जलविद्युत प्रकल्पाची एकूण किंमत ८२६.२१ कोटी रुपये आहे, वजा गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग केलेली रक्कम ३४४ कोटी रुपये आहे, असे मिळून काळ जलविद्युत प्रकल्पाची किंमत ४८२.०६ कोटी रुपये आहे. २. कुंभे जलविद्युत प्रकल्पाची किंमत २५८.३७ कोटी रुपये आहे. काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पांची एकूण किंमत ७४०.४४ कोटी रुपये आहे.'

प्रकल्पाची किंमत ७४० कोटी रुपयांनंतर गांधारी प्रकल्पाचा समावेश केल्यावरही जो ज्यादाचा खर्च होत आहे आणि त्यासाठी विभागाने पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यतेची मागणी केली आहे. यामध्ये जो बदल झाला आहे तो व्हेरीएशन ऑफ कॉस्ट कामाची व्याप्ती वाढल्यामुळे आहे किंवा कॉस्ट एक्स्केलेशनमुळे झाले त्याची माहिती समितीला विषद करावी. असे समितीने सांगितले असता, कामाची व्याप्ती वाढली ती द्वितीय सुप्रमामध्येच काळ आणि कुंभे प्रकल्पाचा एकत्रित ले-आऊट करुन ते ठरविण्यात आले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारित प्रशासकीय मान्यतेचे परिपत्रक विभागीय अधिका-यांनी या ठिकाणी वाचले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, काळ धरणाच्या प्रकल्पावर जो खर्च करण्यात येईल त्यापैकी ५० टक्के निधी गांधारी प्रकल्पावर करण्यात यावा. काळ धरणावर ८९५ कोटी रुपये खर्च केले आहेत तर त्यापैकी ४०८ कोटी रुपये आपण गांधारी प्रकल्पावर खर्च केले आहेत काय ? आता वाचलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या पत्रानुसार जो काळ धरणावर ८९५.५२ कोटींचा निधी खर्च केला त्याच्या ५० टक्के निधी म्हणजे गांधारी प्रकल्पावर ४५० कोटी रुपये खर्च केला काय ते सांगावे. तसेच सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार जर गांधारी प्रकल्पावर ५० टक्के निधी खर्च करण्यास अनुमती आहे तर २५ कोटी रुपयांची वेगळी प्रशासकीय मान्यता गांधारी प्रकल्पासाठी घेण्याची गरज काय आहे ते सांगावे. असे समितीने विचारले असता, सुप्रमा आदेशामध्ये असे म्हटले आहे की, काळ धरणातील जलविद्युत प्रकल्पाच्या ५० टक्के खर्च प्रस्तावित गांधारी सिंचन प्रकल्पावर टाकायचा आहे. म्हणजे काळ धरण हे काळ धरण व गांधारी प्रकल्पासाठी कॉमन धरण असेल.ल यामध्ये असे म्हटले आहे की, एक छोटासा वळण बंधारा बांधायचा आहे आणि त्यासाठी हा खर्च करायचा आहे. गांधारीच्या मोठ्या धरणाची गरज नाही. ऑलरेडी धरण ॲज्युम्ड आहे. जलविद्युत निर्मितीनंतर जे पाणी सोडले जाईल तेच पाणी बंधा-याद्वारे कालव्यात डायव्हर्ट करायचे असे ते नियोजन असून त्यामुळे खर्चात बचत झाल्याचे यामध्ये स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे ३४४ कोटी रुपये हा काळ धरणाच्या कामासाठी खर्च झाला तो कम्पोनन्ट गांधारी प्रकल्पावरचा आहे. त्याचा हा भाग आहेच आणि संपूर्ण काळ जलविद्युत प्रकल्पावर खर्च झालेला नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने याच साक्षीमध्ये यापूर्वी असे उत्तर दिले आहे की, काळ धरणावर कोणताही खर्च झालेला नाही. आता विभाग सांगत आहे की, काळ प्रकल्पावर खर्च झाला म्हणजे तो गांधारी प्रकल्पावर खर्च झाला. आता सुप्रमानंतर काळ धरणावर झालेल्या खर्चाच्या ५० टक्के निधी गांधारी प्रकल्पावर खर्च करण्यात येईल व त्याची मर्यादा सुध्दा त्यामध्ये ३४४ कोटी रुपयांची घालून दिली आहे. ५० टक्के म्हटल्यानुसार ४५० कोटी होतात. आता आपण ३४४ कोटी रुपयांचा विचार केला तर ४५० कोटी रुपयांमध्ये सुध्दा अधिकच्या रकमेचा समावेश आहे. याबाबत समितीने विचारले असता, या प्रकल्पामध्ये अधिकचा निधी खर्च झालेला नाही या प्रकल्पासाठीचा निधी ४८०१ या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध होतो आणि गांधारी प्रकल्पाचा निधी हा सिंचन प्रकल्पाच्या ४७०१ या लेखाशीर्षांतर्गत मान्यता मिळालेली आहे. हा मध्यम प्रकल्प म्हणून गृहित धरला आहे. या प्रकल्पाला ४७०१ लेखाशीर्षाखाली प्रशासकीय मान्यता आहे. जेव्हा गांधारी प्रकल्पाच्या बॅरेजची निविदा काढली जाईल आणि जेव्हा त्यास नियमित बजेट उपलब्ध होईल तेव्हा बुक ॲडजेस्टमेंटने ४८०१ मधून ॲडजेस्ट केला जाईल. आजही तो खर्च डेबीट नसून ४८०१ या लेखाशीर्षाखाली खर्ची पडलेला आहे. आजही तो गांधारी प्रकल्पाच्या नावाखाली आहे. पण प्रत्यक्षात तो गांधारी प्रकल्पावर बुक ॲडजेस्टमेंटने ४७०१ खाली वर्ग होणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असे समितीने विचारले.

विभागाने आता नवीन सुप्रमा किती निधी मिळण्यासंबंधी काढली आहे. असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी महोदय, १६०० कोटी रुपयांची आहे. असे समितीला सांगितले. हा परिच्छेद काळ आणि कुंभे प्रकल्पाबद्दलचा आहे. Is the revised administrative approval of Rs. 740.44 cr. of January 2011 is for these two projects of Kal & Kumbhe ? असे प्रधान महालेखाकार यांनी विचारणा केली.

गांधारीचा मूळ प्रकल्प कोणता होता. असे समितीने विचारले असता, तो पिकअप वेअरचा प्रकल्प आहे. तो एक छोटा वळण बंधारा आहे. दिनांक २९ ऑक्टोबर २००५ ला गांधारी सिंचन प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली. त्या आदेशामध्ये असे नमूद केले आहे की, काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पातून जलविद्युत निर्मितीनंतरचे जे रेग्युलेटेड रिलीजेस म्हणजे जे विसर्ग गांधारी नदीमध्ये उपलब्ध होणार आहेत ते विसर्ग वळण बंधारा बांधून कालव्यात वळविणे व त्या योगे २१७५ हेक्टर क्षेत्र सिंचनाचा लाभ घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच त्यामुळे घरगुती पाणी वापर, औद्योगिक वापरासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. म्हणून ही प्रशासकीय मान्यता गांधारी वळण बंधारा सिंचन प्रकल्पाच्या ६० कोटी ६९ लाख रुपयांस मान्यता देत आहे. यामधून ३५.२१ कोटी रुपयांचा निधी हा काळ धरणाच्या कामासाठी वापरण्यात येईल असे या गांधारी प्रकल्पाच्या सन २००५ मधील पहिल्या प्रशासकीय मान्यतेमध्ये म्हटलेले आहे. हेच तत्त्व सन २०११ मध्ये सुध्दा फॉलो केले आहे.

प्रत्यक्षात गांधारी सिंचन प्रकल्प हे सन १९८०-८१ मध्ये गांधारी नदीवर चापगाव येथे सुमारे ३८ मिटर्स उंचीचे मातीचे धरण बांधून त्याच्या उजव्या व डाव्या कालव्याद्वारे २१७५ हेक्टर्स क्षेत्राचे सिंचन करणे असे नियोजन होते. त्यावेळी शासनाने दिनांक २५.५.१९८१ च्या शासन निर्णयाद्वारे ५१३.६१ लाख किंमतीस या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आज जर आपण ३८ मिटर्स उंचीचे धरण बांधण्यास गेलो तर त्याचे भूसंपादन आणि त्यावर होणारा खर्च पाहिला तर ३४४ कोटींपेक्षा तो किती तरी जास्त असू शकतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Sir, we asked the Governmentas to why that revised administrative approval is awaiting. शासनाकडून याचे स्पष्टीकरण यायला हवे असे प्रधान महालेखाकार यांनी सूचना केली. विभागाला १३०० कोटींच्या सुप्रमाला मान्यता देण्यास कुठे अडचण आहे असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी ते प्रपोजल राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे छाननीसाठी दिलेले आहे. आम्ही लवकरात लवकर त्याला सुप्रमा देण्यासाठी प्रयत्न करीत आहोत असे सांगितले.

पृष्ठ क्रमांक ४ वर काळ जलविद्युत प्रकल्पामध्ये आरेखने प्राप्त न होता विभागाने सन २०११ मध्ये टीपीएससी इंडिया प्रा. लिमिटेड नोएडा, पुरवठादार यांना विद्युत निर्मितीची साधनसामग्री, प्रापण उभारणी या कामाचे २७ कोटी रुपयांचे कंत्राट मुख्य अभियंता यांनी दिले आहे. आरेखने न येताच विभागाने ही २७ कोटी रुपयांची ऑर्डर दिली आहे. त्यातून ते साहित्य पुढे आले आणि आज रोजी ते विनावापर पडून आहे. त्याची देखभाल चौकीदार करतात. त्यासंबंधी संबंधित अधिका-यांवर कार्यवाही केली आहे किंवा प्रस्तावित केली आहे काय ? ज्यांनी डिझाईन हातामध्ये नसताना २७ कोटी रुपयांची ऑर्डर दिली त्याचे कारण काय आहे. असे समितीने विचारले असता, मुख्य अभियंता यांचे असे म्हणणे आहे की, त्याचे डिझाईन होते. पॅरामिटर्स फायनल करुनच सन २०११ मध्ये त्या साहित्याची ऑर्डर दिली होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार यांनी व्हेटींग करुन असे सांगितले की, "Has any explanation been called from the C.E. of Kumbhe Hydro Project, who approved the procurement of power generation equipment. महालेखाकार यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. महालेखाकाराचे असे म्हणणे आहे की, विभागाचा आराखडा जर तयार नव्हता तर विभागाने त्या साहित्याची ऑर्डर कशी दिली आणि हाच प्रश्न समितीने सदस्यांनी विचारलेला आहे. याबाबत महालेखकाराने असेही विचारले आहे की, विभागाने सी.ई.कडून संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे काय ?

डिझाईन हातात नसताना निविदा काढल्या, ही वस्तुस्थिती आहे की नाही ? असे समितीला विचारले असता, ही वस्तुस्थिती नाही. जनरेटर, टर्बाईन आणि त्याचे काही पार्ट ही जी मशिनरी आलेली आहे त्यामध्ये तांत्रिकदृष्ट्या जनरेटर आणि टर्बाईन हे डिटेल डिझाईन शिवाय फॅब्रीकेट करता येत नाही. असे विभागीय अधिका-यांनी सांगितले.

विद्युतगृहाची आरेखन संकल्पना न करता विभागाने आदेश दिले असे महालेखाकारांचे ऑब्जेक्शन आहे. विद्युत प्रकल्पाची ११०० कोटी रुपयाची एवढी मोठी बांधकामे विभागाने केली आणि ४ ते ५ कोटी रुपयांची विद्युतगृहे विभागाने बांधली नाहीत. ४ वर्षापासून मशिनरी येऊन पडलेली आहे याचा वॉरंटी संपला तर यासाठी कोण जबाबदार आहे ?असे समितीने विचारले असता, महालेखाकारांच्या म्हणण्याप्रमाणे काळ जलविद्युत प्रकल्पांतर्गत जो उल्लेख आलेला आहे तो मी या ठिकाणी सांगतो, काळ HEP मध्ये धरण आणि जल वाहतूक व्यवस्थेचे काम सप्टेंबर, २०१६ पर्यंत अनुक्रमे ८० टक्के आणि ९३ टक्के पूर्ण झाले होते तरीही, अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र परिमंडळ, पुणे यांच्याकडून आरेखन उपलब्ध न झाल्यामुळे, विद्युतगृहासाठी निविदा मागविल्या जाऊ शकल्या नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे. द्वहे विद्युतगृह म्हणजे फक्त पॉवरची इमारत आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग ११०० कोटी रुपयाचे बांधकाम करु शकतो पण विद्युतगृहाचे बांधकाम करण्यासाठी विभागाला कॉन्ट्रॅक्टर मिळालेला नाही किंवा संकल्पचित्र मिळालेले नाही. विभागाला टेंपररी शेड उभा करावा लागला. विभागाने सर्व ॲडव्हान्समध्ये दिले पण बाकीचे नियोजन बरोबर न झाल्यामुळे ती मशिनरी येऊन पडलेली आहे. It will be outdated after 5 years. यासाठी कोण जबाबदार आहे यासाठीच हा महालेखाकारांचा परिच्छेद आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवाने त्यावेळची कामाची सद्यःस्थिती विचारात घेऊन या निविदा घेतलेल्या आहेत. असे सांगितले.

आपल्या विद्युतगृहाच्या ड्रॉईंग पण तयार नव्हत्या आणि निविदा पण बोलावल्या नव्हत्या. पण ज्या विद्युतगृहात इक्विपमेंट इन्सटॉल करण्यात येणार ही ती सामग्री विभागाने अगोदर प्रोक्युअर केले. असे महालेखाकार यांनी सांगितले.

हे सरफेस पॉवर हाऊस आहे त्यामुळे याचा कन्स्ट्रक्शन काळ १ ते १.५ वर्ष आहे. दरम्यानची जी मेन प्लॅंट इक्विपमेंट आहे त्याला ब-याच डिझाईन आवश्यक आहेत. या इंटर डिपेंडंट ॲक्टिविटी असल्यामुळे यांच्या फाऊंडेशनच्या ज्या काही डिटेल, वेळ हे सिव्हिलला उपलब्ध करुन द्यावे लागतात. त्यामुळे वेळोवेळी बार चार्ट केले होते, शासनाकडून वेळोवेळी बैठका झाल्या होत्या आणि शासनाची परवानगी घेऊनच या सर्व ऑर्डर दिल्या गेल्या आहेत. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले. विभागाने जी मशिनेरी खरेदी केली आहे त्याची काही वॉरंटी आहे काय ? असल्यास ती आहे का संपली? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधीने मशिनची वॉरंटी आहे तथापी ती संपलेली आहे. असे समितीस सांगितले.

सुप्रमाशिवाय विभागाला काम करता येणार नाही आणि यासाठीचा प्रस्ताव विभागाने सादरच केलेला नाही. सन २०१५ पासून आतापर्यंत काम बंद आहे. ११०० कोटी रुपये खर्च झालेले आहेत, मशिनरी ३ वर्षात मिळेल हे विभागाला माहित होते तर विभागाने विद्युतगृहाचे बांधकाम तसेच सर्व प्रकल्प पूर्ण होणार काय याचा विचार करणे आवश्यक होते. प्रकल्प पूर्ण होणार नाहीत तो पर्यंत टर्बाईनचा काय उपयोग आहे ?असा प्रश्न समितीने केला असता, सर्व जलविद्युत प्रकल्पांसाठी विभागाकडे जी मशिनरी येते त्याचा पॅकेज शेड उभा केलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

विद्युतगृह बांधले असते तर पॅकेज शेडची गरज पडली नसती, दुसरा मुद्दा असा आहे की, या प्रकल्पाचे नियोजन फक्त खरेदी पुरते न ठेवता सर्व व्यवस्था करायला पाहिजे होती. २-२ वर्ष प्रकल्प बंद असताना विभाग सुप्रमाचा प्रस्ताव सादर करीत नाही तर मग यामागचा हेतू काय आहे ? हा प्रकल्प २०० ते २२५ कोटी रुपयांपर्यंत गेलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रत्येक जलविद्युत प्रकल्पाला पॅकेज शेड बांधण्यात येते. कारण सर्व इक्विपमेंट एकाच वेळेला इरिक्शन होत नाहीत. एक-एक इक्विपमेंट काढुन त्याच्या वेगवेगळया प्रकारच्या टेस्ट असतात त्या टेस्ट घेऊन मग इरिक्शन केले जाते. त्यामुळे काही इक्विपमेंट पॅकेज शेडमध्ये ठेवाव्या लागतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले. सर्व मशिनरीची वॉरंटी सपलेली आहे. मशिनरी फिक्स होणार त्या दिवशी ती आऊट डेटेड होणार आहे. ही सर्व मशिनरी ३७.६६ कोटी रुपयांची आहे तर याचे इन्स्टॉलेशन करण्यासाठी आणखी काही कालावधी जाईल. यासाठी पुन्हा वॉरंटी काळ एक्सटेंड करुन देण्याची प्रथा आहे. ही देण्याच्या दृष्टीकोनातून जी सर्व कॉस्ट लागेल ती यामध्ये इन्क्लुड करावी लागेल आणि यासाठी जबाबदार निश्चित लागेल. हे सर्व किती कालावधीमध्ये करणार आहात ?असे समितीने विचारले.

सन २०१६ मध्ये मुख्यमंत्री महोदयांनी एक आढावा बैठक घेतली होती त्यामध्ये हा विषय चर्चेला आला होता. बी.ओ.टी. तत्त्वावर हा प्रकल्प चालवण्यासाठी द्यावा असे या बैठकीत सूचना दिली होती. पश्चिम महाराष्ट्रात टेंभू प्रकल्पासाठी जे पंप घेऊन ठेवले होते तिथे हाच प्रश्न निर्माण झाला होता. पंपाची पसंती आधी झाली होती पण निधी कमी आल्यामुळे सिव्हिल वर्कला थोडा विलंब झाला. त्यामुळे प्रत्यक्ष इरिक्शन करताना वॉरंटी संपलेली होती. पण एक्सटेंड वॉरंटी घेऊन तो प्रश्न सॉर्ट आऊट करण्यात आला. त्याच धरतीवर एक्सटेंडेट वॉरंटीचा विचार करुन हा प्रश्न मार्गी लावू. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१६ मधील निर्णयामध्ये ठरले की, अशा प्रकारची परिस्थिती जर कुठे आली तर एक्सटेंडेड वारंटी घ्यावी. त्या दृष्टीकोनातून गेल्या वर्षाभरात काय पावले उचलली आहेत? त्या मशिनरीची तपासणी आणि त्याच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असलेली कॉस्ट आणि एक्सटेंडेड वॉरंटीसाठी काही कॉस्ट लागणार असेल तर ती प्रत्येक वर्षाची कॉस्ट याचा कधीतरी विचार करावाच लागणार आहे. याचे २ महिन्यात किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीत सायरॅन्टम विभागाने करायला हवे होते. विभागाकडून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविण्यात येत आहे आणि हे बी.ओ.टी. तत्त्वावर करण्यासाठी याचा प्रस्ताव शासनाला सादर केलेला आहे. असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

बी.ओ.टी. ची सूचना माननीय मुख्यमंत्र्यांनी दिड वर्षापूर्वी दिलेली आहे आणि त्याची कारवाई विभागाकडून आता करण्यात येत आहे. या प्रकल्पाची किंमत दरवर्षी १०० ते १५० कोटी रुपयांनी वाढत आहे. याचा विचार करुन कुठेतरी एकाच पॉइंटवर निर्णय पोहचायला पाहिजे. नाहीतर ही सर्व कॉस्ट, वॉरंटीचे पैसे वाढतील आणि ही सर्व मशिनरी आऊट डेटेड होईल आहे. या दृष्टीने आजच्या बैठकीत जी चर्चा झाली त्यात समितीचे तीन मुद्दे होते पण त्यापैकी एकाच मुद्दयावर चर्चा झाली. जोपर्यंत महालेखाकार सुप्रमाबद्दल १०८८ कोटी रुपयाचे समाधान करीत नाही तो पर्यंत हा परिच्छेद सुद्धा पेंडींग आहे. यावर शासनाकडून एका वर्षाच्या आत निर्णय करुन घ्यावा तसेच आपल्या विभागाप्रमाणे एका वर्षाच्या डिप्रेसिएशन मशिनरीचा किती टक्के घसारा विचारात घेतो ?असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधीने ६ टक्के डिप्रेसिएशन घेत असल्याचे समितीला सांगितले.

The Committee wants to know your rates for deprecitation. असे महालेखाकार यांनी विचारले असता विभागीय प्रतिनिधीने इलेक्ट्रिकल कॉम्पोनंटचे त्यामधील जे आयुष्य आहे ते ३० ते ३५ वर्षापर्यंत गृहीत धरतो. त्यातील रेट ऑफ डिप्रिसेशन ३ ते ५ टक्क्यांपर्यंत असतो. टेंभू योजनेत विभागाने जे पंप घेतले होते ते रिफर्बिशश केले आणि २ ते २.५ वर्षाच्या कालावधीनंतर विभागाने ते वापरले असे सांगितले.

सन २००९ च्या शासननिर्णयानुसार ७४०.४४ कोटी रुपयांची शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता दोन्ही प्रकल्पासाठी दिलेले आहे. एस.एल.ए.टी.सी. चा भाग नंतरचा आहे. पण हा प्रकल्प प्रशासनाने रिव्हाइस ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अप्रुव्हलवर विभागाचा निदर्शनास न आणता कसा केला ? त्यांनी आणखी फोर्थ रिव्हाइस ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अप्रुव्हलसाठी प्रपोजल दिले होते काय? ते प्रपोजल शासनाने मंजूर केले का नाही ? हे सर्व स्पष्ट झाल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. असे महालेखाकाराने मत व्यक्त केले. ७४० कोटी आणि ३४४ कोटी रुपयाचे महालेखाकार यांनी वेटिंग करावे. तोपर्यंत ११०० कोटी रुपयाच्या खर्चाचा कुठेतरी निर्णय घ्यावा लागणार आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, विभागाने सांगितले की, दोन अधिका-यांना निलंबित केले, इतर अधिकारी सेवानिवृत्त झाले. ते कधी सेवानिवृत्त झाले ? ओव्हरसाईज बोगदा तयार केल्याबाबत विभागाने ज्यांची इन्क्वायरी सुरु केली, त्यांच्याबाबत सी.ई. पासून प्रत्येकजण रिटायर झाले असे आपण सांगितले आणि एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर व डेप्युटी इंजिनिअर अशा दोघांना आपण सस्पेंड केले आहे. इतर लोक कधी रिटायर झाले, त्यांच्यावर कॉज ऑफ ॲक्शनपासून ४ वर्षांच्या आत कारवाई केली नसेल तर ती आता करता येईल का, याचीही माहिती आपण समितीला द्यावी. विभागाने सन २०१२ मध्ये विभागीय चौकशीस सुरुवात

केली आणि जाणीवपूर्वक या संपूर्ण चौकशीचा निकाल आता दिला. सन २०१७ मध्ये विभागाने दोषारोप दाखल केले, यामध्ये दिरंगाई झाली त्यामुळे या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वाचविण्याकरिता हा विलंब झालेला आहे काय, अशी समितीला शंका आहे असे समितीने मत व्यक्त केले.

सिव्हील ऑथॉरिटीजनी इलेक्ट्रिकलला रिक्वेस्ट केली होती की, सन २०१४ पर्यंत ही कामे पूर्ण होणार नाहीत, तर विभागाने प्रोक्युअरमेंटची प्रक्रिया थोडीशी लांबवावी. तसा करस्पॉन्डन्स केलेला आहे. They have requested you to postpone it. We have letters which we will give it to you. असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले. विभागाने कॉंट्रॅक्टरला असे पत्र लिहिले होते की, सिव्हील वर्क न झाल्यामुळे त्यांना एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

एक्झेक्युटिव्ह इंजिनिअरकडून इलेक्ट्रिकलला करस्पॉन्डन्स केलेला आहे की, सिव्हील वर्कला काही कारणामुळे विलंब होत चालला आहे, तो सन २०१४ पर्यंत जाणार आहे तर आपण प्रोक्युअरमेंटची प्रक्रिया थोडीशी पोस्टपोन करावी. असे महालेखाकार यांनी सांगितले असते, विभागीय प्रतिनिधीनी आमच्या विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनी मुख्य अभियंत्यांना पत्र लिहिले होते असे सांगितले.

The question is, why did the C.E. gave the approval to procure our equipment? असा प्रश्न प्रधान महालेखाकार यांनी केला.

अधीक्षक अभियंत्यांनी या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी या कार्यालयाने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १,७१,००,०००/- एवढ्या अनुदानाची मुख्य जनित्र संचाच्या ५ टक्के डाऊन पेमेंट व ५ टक्के ॲडव्हान्स पेमेंटसाठी मागणी केली होती. त्यापैकी ८५.५० लक्ष एवढे अनुदान उपलब्ध झाले आहे. जर मुख्य जनित्र संचाची निविदा प्रक्रिया लगेच पूर्ण झाली तर एकूण १० टक्के पेमेंट कंत्राटदाराला देय होईल. परंतु, स्थापत्य विभागाचे जलवहन प्रणालीच्या कामाचे नियोजन पाहता मुख्य जनित्र संचाच्या निविदा प्रक्रियेनंतरची प्रकल्प वळणावरील पुढील कामे रखडली जातील व कंत्राटदारांकडे केवळ १० टक्के पेमेंट अडकून राहील व विद्युत उपकरणांचा साठा करावा लागेल. त्यानंतर पॅकेजशेड व सुरक्षेची आवश्यकता लागेल. त्याऐवजी जर मुख्य जनित्र संचाची निविदा प्रक्रिया सप्टेंबर, २०११ नंतर पूर्ण केली तर १० टक्के पेमेंट अडकून राहणार नाही व पुढील कंत्राटाच्या विद्युत व यांत्रिकी उपकरणांचा पुरवठा व कामे पुढे ढकलली जातील. यामुळे विद्युत व यांत्रिकी उपकरणांचा अनावश्यक साठा टाळता येईल. परंतु, यासाठी शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान परत करावे लागेललल. वरील सर्व बाबतीत निर्णय घ्यावा असे त्यांनी चिफ इंजिनिअरना सांगितले. हे सर्व करणे योग्य होणार नाही, याबाबत त्यांना कॉन्शस केले. Despite of caution notice by your S.E., ही सर्व परिस्थिती पाहूनही विभाग थांबला नाहीत व पर्चेस केले, असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. असे समितीने सांगितले असता, मार्च, २०११ व डिसेंबर, २०११ ला ऑर्डर दिल्याचे विभागीय प्रतिनिधीनी समितीस अवगत केले.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र.३.४ 'साधनसामग्री विनावापर पडून राहणे आणि टाळता येण्याजोगा खर्च'

अभिप्राय

९. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने कुंभे (तालुका माणगाव, जिल्हा रायगड) येथील निराबाई नदीवर रु. ९७.२४ कोटी खर्चात, १० मेगा वॅट क्षमतेचा एक जलविद्युत प्रकल्प (HEP) बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर, १९९८ मध्ये दिली. जून, २००४ मध्ये विभागाने कुंभे गावातील कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे स्थान मौजे करमार (तालुका महाड) या गावी बदलण्याचे ठरविले जेणेकरुन कुंभे प्रकल्पातून शेवटच्या टप्प्यात उत्सर्जित होणारे पाणी, वारांगी गावातील काळ नदीवर (तालुका महाड) रु.९९ कोटी खर्चून बांधकामाची परवानगी दिलेल्या काळ जलविद्युत प्रकल्पातून १५ MW वीज निर्मितीसाठी पुन्हा उपयोगात आणता येऊ शकणार होते. त्यानुसार विभागाने, कुंभे आणि काळ प्रकल्पासाठी रू.१९४.८७ कोटी खर्चाची सुधारित सामायिक प्रशासकीय मान्यता जून, २००४ मध्ये दिली. परंतु या प्रकल्पाची किंमत वाढून जानेवारी २०११ मध्ये त्यात रु. ७४०.४४ कोटी इतकी वाढ झाली. परंतु त्यानंतर या प्रकल्पावर सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता ऑक्टोबर,२०१५ पर्यंत रु.१,१२७.२३ कोटीचा खर्च करण्यात आला होता. त्यानंतर चौथ्या सुधारित प्रशासकीय मंजुरीअभावी दोन्ही प्रकल्पांचे बांधकाम थांबविण्यात आले.

९.१ या दोन्ही जलविद्युत प्रकल्पाच्या कामांचे धरण, जल वाहतुक व्यवस्था आणि विद्युतगृह हे तीन घटक असून जलविद्युत प्रकल्पाच्या सुरळीत कार्यचालनासाठी हे तिन्ही कार्य घटक परिपूर्ण असण्याची आवश्यकता असून त्यांनी समन्वयाने काम करावयास हवे जेणेकरुन धरण/जलाशयातील पाणी जल वाहतूक व्यवस्थेव्दारे वीज निर्मितीसाठी विद्युतगृहांना पोहोचणे शक्य होईल. कुंभे प्रकल्पासाठी रु.९२.७६ कोटी सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत, बांधकामासाठी रु.६९.४९ कोटी राखीव होते ज्यामध्ये धरण, जल वाहतूक व्यवस्था आणि विद्युतगृह यांचा समावेश होता आणि रु.२३.२७ कोटी विद्युत कामांसाठी दिले होते ज्यापैकी रु.२१.८४ कोटी टर्बाईन (पवन/पाणचक्की), जनित्र आणि सहयोगी साधनसामग्रीचे (वीज निर्मितीची साधनसामग्री) प्रापण, उभारणी आणि ती कार्यरत करणे, यासाठी दिले होते. धरण बांधण्याचे काम रु.३७.८६ कोटीला दिले होते (मार्च, २००५) जे मार्च २००८ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. परंतु प्रकल्पग्रस्त व्यक्तिंच्या पुनर्वसनात झालेल्या विलंबामुळे, सन २०१२ पर्यंत सदर काम जवळ जवळ चार वर्षे थांबविण्यात आले होते. जून, २०१५ पर्यंत कंत्राटदाराला तीनदा मुदतवाढ दिली गेली आणि त्यानंतर संपूर्ण प्रकल्पासाठी (कुंभे आणि काळ प्रकल्पासाठी एकत्रित) चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी काम ठप्प झाले. सप्टेंबर, २०१६ ला धरणाचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले होते.

९.२ दोन वेगवेगळया साखळी टप्प्यातील (chainages) जल वाहतूक व्यवस्थेचे बांधकाम एकूण रु.२८.९९ कोटीला दोन कंत्राटदारांना दिले होते, जे अनुक्रमे सन २०११-१२ मध्ये पुर्ण करावयाचे होते. परंतु राज्य वन विभागाबरोवर सीमावाद मिटविण्यात विलंब झाल्यामुळे सप्टेंबर, २०१६ पर्यंत ९१ टक्के काम पूर्ण झाले होते. तसेच विद्युतगृहाचे बांधकाम, जे मूळ आराखड्याप्रमाणे मार्च, २०११ मध्ये पूर्ण करावयाचे होते. ते सप्टेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण झाले नव्हते. धरण, जल वाहतुक व्यवस्था आणि विद्युतगृहाच्या बांधकामाची प्रगती शोचनीय होती. तरीही विभागाने विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे प्रापण, उभारणी आणि कार्यान्वयनाचे रु.२०.३२ कोटी मूल्याचे काम एनर्जी डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड, फरीदाबाद(पुरवठादार) यांना २४ महिन्यांच्या विहित कालावधीत पूर्ण करण्यास दिले, ज्यास मार्च, २०१४ पर्यंत मुदतवाढ दिली गेली. नोव्हेंबर, २०१२ आणि मार्च, २०१४ दरम्यान विद्युत निर्मिती साधनसामग्री पुरविली गेली व पुरवठादाराला रु.१८.२३ कोटीचे प्रदान करण्यात आले (जुलै, २०१४). परंतु ही विद्युत साधनसामग्री ठेवण्यासाठी कायमस्वरुपी शेड उपलब्ध नसल्यामुळे रु.४९.०३ लक्ष खर्चून बांधलेल्या चार तात्पुरत्या शेड्समध्ये किंमती विद्युत निर्मिती साधनसामग्री ठेवावी लागली ज्याच्या राखण व पहा-यावर विभागाने रु.२५.५७ लक्ष इतका अधिक खर्च केला. त्यातही विद्युत निर्मिती साधनसामग्रीची वैधता मार्च, २०१६ मध्ये संपली होती. तसेच, दि.२८ मार्च, २०११ रोजी पुरवठादाराने सादर केलेल्या चार वर्षे वैधता कालावधी असलेल्या बँक हमीच्या रुपातील रु.२.०३ कोटी (कंत्राट मुल्याच्या १० टक्के) कार्यसुरक्षा ठेवीचेही नूतनीकरण पुरवठादाराकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे करता येऊ शकले नव्हते. याचा अर्थ भविष्यात विद्युत निर्मिती साधनसामग्रीच्या उभारणी आणि कार्यान्वयनाचा सर्व खर्च विभागाला सोसावा लागणार होता.

९.३ त्याचप्रमाणे, काळ जलविद्युत प्रकल्पामध्ये जरी धरण आणि जल वाहतुक व्यवस्थेचे काम सप्टेंबर, २०१६ पर्यंत अनुक्रमे ८० टक्के आणि ९३ टक्के पूर्ण झाले होते तरीही विभागाकडून आरेखन उपलब्ध न झाल्यामुळे, विद्युतगृहासाठी निविदा मागविल्या जाऊ शकल्या नव्हत्या. असे असतानाही विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे प्रापण, उभारणी आणि कार्यान्वयनाचे रु.

२७.६९ कोटी खर्चाचे काम TPSC (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, नोएडा (पुरवठादार) यांना ३६ महिन्यांच्या विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी दिले. ज्यासाठी जुलै, २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली गेली होती. परंतु पुरविलेली विद्युत निर्मिती साधनसामग्री, रु.३.०३ लक्ष खर्चून बांधलेल्या तात्पुरत्या शेड्समध्ये विनावापर पडून होती. तात्पुरत्या बांधलेल्या शेडस् मध्ये ठेवलेल्या विद्युत निर्मिती साधनसामग्रीच्या राखण आणि पहा-यासाठी देखील विभागाने रु.६.६४ लक्ष खर्च केला होता. यावरुन असे सिध्द होते की, निकृष्ट नियोजनामुळे वीज निर्मितीच्या साधनसामग्रीचे प्रापण आणि धरण, जल वाहतूक व्यवस्था आणि विद्युतगृहाच्या बांधकामाच्या प्रगतीचा मेळ घालण्यात विभाग अपयशी ठरला. परिणामी रु.३७.६६ कोटी मूल्याची साधनसामग्री १४ ते ३० महिने विनावापर पडून होती. तसेच दोन्ही प्रकल्पांच्या जागेवर वेळीच जर कायमस्वरुपी शेडस् बांधले असते तर तात्पुरत्या शेडसच्या बांधकामावर आणि राखण व पहा-यावर झालेला रु.१.१६ कोटीचा खर्च टाळता येऊ शकला असता असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

९.४ विद्युत निर्मिती साधनसामग्री ही बाजारात सहज उपलब्ध नसते व उपभोक्त्यांच्या आवश्यकतेनुसार त्याचे स्वतंत्ररित्या उत्पादन करावे लागते व यासाठी जवळजवळ ३ वर्षाचा कालावधी अपेक्षित असतो. त्याआधारे विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे नियोजन केले. परंतु काळ व कुंभे या दोन्ही प्रकल्पांना प्रकल्पग्रस्तांचा भूसंपादनासाठी विरोध असल्यामुळे प्रकल्पाच्या बांधकामाला विलंब झाला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु वास्तविक भूसंपादन झालेले नसताना बांधकाम व विद्युतसामग्री य दोन्हीची निविदा एकाचवेळी काढण्यात आली. विभागाने यामध्ये योग्य समन्वय न साधल्यामुळे बांधकामातील प्रगतीचा वेग व साधनसामग्रीच्या प्रापणाची वेळ चुकली. परिणामी बांधकाम झाले नाही मात्र विद्युतसामग्री मात्र पुरविण्यात आली. आजतागायत ही साधनसामग्री तात्पुरत्या शेडमध्ये ठेवण्यात येणे व त्याची वॉरंटीदेखील संपणे ही बाब निश्चितच अतिशय गंभीर असून समर्थनीय नाही. अनियोजनबध्द कामामुळे वा वेळेचा कोणताही ताळमेळ न घालता व समन्वय न ठेवता हे काम केल्यामुळे निधी खर्च झाला, साधनसामग्री पडून राहिली व जलविद्युत प्रकल्प देखील सुरु होऊ शकला नाही ही बाब अतिशय गंभीर आहे.काळ जलविद्युत प्रकल्प १५ मेगावॅटसाठी व कुंभे जलविद्युत प्रकल्प १० मेगावॅटसाठी असून सन १९९८ मध्ये मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर कुंभे जलविद्युत प्रकल्पातून वीज निर्मितीनंतर जे पाणी सोडले जाईल ते काळ धरणात घेतले तर अतिरिक्त पाणी उपलब्ध होवून वीज निर्मिती देखील वाढेल या उद्देशाने दोन्ही प्रकल्प एकत्र करण्यात आले. त्यामुळे सन २००४ मध्ये दोन्ही प्रकल्पांना एकत्रित सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्यानुसार या दोन्ही प्रकल्पाची कामे सन २००४ मध्ये सुरु झाली व त्याचवेळी विद्युत साधनसामग्रीचे आदेश देखील पुरवठादाराला देण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात काळ व कुंभे या दोन्ही धरणांना प्रकल्पग्रस्तांचा भूसंपादनासाठी विरोध असल्यामुळे धरणाच्या कामांना विलंब झाला. भूसंपादन पुर्णपणे झालेले नसताना धरणाचे बांधकाम व विद्युत स्थापत्य कामांची एकाचवेळी निविदा काढण्यात आली. परंतु धरणाचे बांधकाम मागे पडले व विद्युत यंत्रसामग्री मात्र निविदेनुसार पुरविण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत या प्रकल्पाचा खर्च मान्यताप्राप्त सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षाही जास्त झाले व त्यानंतर शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव खर्चास जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत काम करण्यात येऊ नये अशी भूमिका स्विकारल्यामुळे दोन्ही प्रकल्पांचे काम सन २०१५ मध्ये स्थगित करण्यात आले. विद्युत गृहे आरेखन संकल्पना न करता विभागाने विद्युत सामग्री विकत घेतली असे देखील आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत. जलविद्युत प्रकल्पाची रु.११२७ कोटी रुपयांची बांधकामे विभागाने केली परंतु रु. ४ ते ५ कोटीची विद्युत गृहे न बांधल्यामुळे ४ वर्षापासून ही विद्युत यंत्रसामग्री येवून पडलेली असून या कालावधीत त्या मशिनरीची वॉरंटी देखील संपलेली आहे. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता काळ जलविद्युत प्रकल्पामध्ये धरण आणि जलवाहतूक व्यवस्थेचे काम सप्टेंबर,२०१६ पर्यंत अनुक्रमे ८० आणि ९३ टक्के पुर्ण झाले होते. विद्युत गृहाचे आरेखन उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्या निविदा मागविल्या जावू शकल्या नाहीत ही वस्तुस्थिती असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. परिणामी तेथे तात्पुरती शेड उभारुन ही मशिनरी ठेवण्यात आल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले. सदरहू प्रकल्प आता पुर्ण न झाल्यामुळे त्या यंत्रसामग्रीचा कितपत उपयोग होणार हा देखील प्रश्न उपस्थित होतो. या सर्व बाबी अतिशय गंभीर आहेत. त्यातही काळ-कुंभे प्रकल्प एकत्रित राबविल्यानंतर काळ धरणातून वीज निर्मितीनंतर सोडण्यात येणारे पाणी गांधारी नदीमध्ये घेवून त्यातून पुन्हा २१७५ हे. जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित केल्यामुळे काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या एकूण अंदाजित किंमत रु. १०८४ कोटीपैकी रु.३४४ कोटी रक्कम गांधारी सिंचन प्रकल्पावर वर्ग केली. प्रत्यक्षात गांधारी सिंचन प्रकल्प हे सन १९८०-८१ मध्ये गांधारी नदीवर चापगाव येथे सुमारे ३८ मीटर उंचीचे मातीचे धरण बांधून त्याच्या उजव्या व डाव्या कालव्याद्वारे २१७५ हे. क्षेत्राचे सिंचन करण्याचे नियोजन होते व त्यासाठी १९८१ च्या शासन निर्णयाद्वारे रु. ५१३.६१ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता दिलेली होती. परंतु आता तेथे धरण नव्हेतर केवळ वळण बंधा-याचे कामास होणारा खर्च हा रु.३४४ कोटीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे

व त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देखील शासनाकडून प्राप्त झालेली नाही. वास्तविकतःगांधारी वळण बंधारा या सिंचन प्रकल्पास स्वतंत्र सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेणे व गांधारीचे स्वतंत्र लेखाशीर्ष सुरु न करणे यामुळे गांधारी प्रकल्पावर पुस्तकी समायोजनाने वर्ग करणे अपेक्षित असलेला खर्च त्या लेखाशीर्षावर वर्ग करणे विभागाला शक्य झाले नाही. परिणामी गांधारी प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता काळ व कुंभे या जलविद्युत प्रकल्पामधूनच हा खर्च वर्ग करण्यात आला. आतापर्यंत विभागास या काळ व कुंभे प्रकल्पांसाठी केवळ रु.७४०.४४ कोटी रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्पांवर आजपर्यंत रु.११२७ कोटी इतका खर्च झालेला आहे. प्रकल्पाची मुळ प्रस्तावित किंमत रु.२०० कोटीपेक्षा कमी असताना इतक्या मोठ्या प्रमाणात प्रकल्पाचा खर्च वाढणे व तरीही सन २००४ पासून २०१७ पर्यंत हा प्रकल्प आजतागायत पुर्ण न होणे या सर्व बाबी अतिशय गंभीर असून विभागाच्या नियोजनशून्य कामाचे द्योतक आहेच. परिणामी सद्यःस्थितीत कोट्यावधी रुपयांचा खर्च निष्फळ ठरलेला आहे. या प्रकरणी दिलेल्या आश्वासित माहितीमध्ये देखील विभागाने हे मान्य केले आहे की, तृतीय सुधारीत अंदाजपत्रकानुसार काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पाची एकत्रित किंमत रु. १०८४.५८ कोटी असून रु. ३४४.१५ कोटी एवढा खर्च गांधारी सिंचन प्रकलपावर वर्ग करणेची तरतूद होऊन, सदर खर्च वर्ग करुन काळ-कुंभे जलविद्युत प्रकलपास रु. ७४०.४४ कोटी इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत काळ जलविद्युत प्रकल्पावर रु. ९३६.२९ कोटी (स्थापत्य व विद्युत) तसेच कुंभे प्रकल्पावर रु. २४२.३० कोटी (स्थापत्य व विद्युत) इतका खर्च झालेला आहे. मंजूर तृतीय सुधारीत अंदाजपत्रकानुसार काळ प्रकल्पावर झालेल्या खर्चापैकी र.३४४.१५ कोटी रक्कम गांधारी प्रकल्पावर वर्ग करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्षामध्ये गांधारी प्रकल्पास स्वतंत्र सुधारीत प्रशासकीय मंजूरी नसल्याने गांधारी वळण बंधा-यावर खर्च वर्ग केलेला नाही. तसेच याही उपर काळ-कुंभे प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालात गांधारीचा बांधकाम खर्च समाविष्ट करुन काळ-कुंभे व गांधारी प्रकल्पास एकत्रित सुप्रमा घेणेबाबत दि.०७.०५.२०१८ रोजी बीओटी कृतीगटाच्या बैठकीत प्रस्तावित करण्यात आले होते. परंत काळ-कुंभे हा जलविद्युत प्रकल्प असून (लेखाशीर्ष : ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च), गांधारी हा सिंचन प्रकल्प (लेखाशीर्ष : ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील भांडवली खर्च) आहे. त्यामुळे काळ-कुंभे प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालात गांधारीचा बांधकाम खर्च समाविष्ट करुन काळ-कुंभे व गांधारी प्रकल्पास एकत्रित सुप्रमा घेता येणार नाही. त्यामुळे गांधारी वळण बंधारा सिंचन प्रकल्पासाठी मुळ प्रशासकीय मान्यता ४७०१ या लेखाशीर्षाखाली असल्याने गांधारी प्रकल्पाची सुप्रमा ४७०१ या लेखाशीर्षाखाली प्रस्तावित करावी व त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात यावा असे संबंधितांना कळविण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. यावरुनच हे काम विभागाने प्रशासकीय, आर्थिक व तांत्रिक अशा सर्वच आघाडीवर कोणतेही नियोजन न करता केले आहे हे स्पष्टच होते.

९.५ सदरहू प्रकल्पातील अधिक गंभीर बाब म्हणजे काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पाची स्थापत्य कामे मंजूर रेखाचित्रानुसार करण्यात आलेली नव्हती. क्षेत्रिय अधिका-यांनी संबधित संकल्पचित्र विभागाकडून मान्यता न घेता बोगद्याचे आकारमान वाढविले. बोगद्याचे आकारमान वाढल्यामुळे जलविद्युत निर्मितीसाठी आवश्यक असणारी पाण्याच्या प्रवाहाची गती (velocity) कमी झाली. ही अतिशय तांत्रिक परंतु सहज लक्षात येणारी बाब असतानाही विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांनी याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यातून आता विद्युत निर्मिती होण्याची शक्यता फारच कमी आहे व या कामांचे कंत्राटदारास रु.६.१९ कोटीचे देयकही अदा करण्यात आले. ज्या अधिका-यांनी मंजूरीशिवाय हे स्थापत्य काम केले त्या सर्व अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून दि.२२/०९/२०१७ रोजी संबंधित अधिका-यांवर दोषारोप बजावण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाने या अधिका-यांवर केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती समितीने विचारली असता यातील दोन अधिकारी निलंबित झाले असून अन्य अधिकारी निवृत्त झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सन २०११ मध्ये चौकशी समिती नेमली असतानाही ५-५ वर्षे चौकशीचा अहवाल प्राप्त होत नाही. त्यामुळे सन २०१७ मध्ये दोषारोप बजावताना जास्तीत जास्त अधिकारी सेवानिवृत्त झाले. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत या अधिका-यांवर विभाग कारवाई करण्याबाबत खरोखरच गंभीर आहे काय, याबाबत देखील शंका उपस्थित होते. विभागाने त्यांना सुखरुप सेवानिवृत्त होण्याची संधी उपलब्ध करुन दिली. जलविद्युत प्रकल्पाचे रु.२०० कोटीचे काम आता जवळजवळ रु.११२७ कोटीपर्यंत गेले व अद्याप प्रकल्पाचे कामही पुर्ण झाले नाही, निधी देखील अडकून पडला, विद्युत निर्मिती देखील झाली नाही व आता हा प्रकल्प सुरु होणे व्यवहार्य असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे यावर झालेला कोट्यावधी रुपयांचा खर्च निष्फळ ठरलेला आहे. असे असताना या प्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-यांवर विभाग जबाबदारी निश्चित करण्यास व कारवाई करण्याबाबत देखील गंभीर नसून यास अमर्याद विलंब लागलेला आहे. यावरुनच विभागाची या प्रकरणी एकंदरीत भूमिका ही संशयास्पद असल्याचे स्पष्ट होते. अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ४ वर्षापर्यंत दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याचे अधिकार विभागाला प्राप्त आहेत. परंतु या प्रकरणी ही अनियमितता सन २०१०-११ मध्ये झालेली असताना आता संबंधित अधिका-यांवर कारवाई

करण्यास कॉज ऑफ ॲक्शन शिल्लक राहते काय, हा देखील प्रश्न उद्‌भवत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले असता यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित नापसंती व्यक्त केली. अशा परिस्थितीत या अधिका-यांवर सेवानिवृत्तीनंतर विभागीय चौकशी सुरु करावयाची झाल्यास कॉज ऑफ ॲक्शनचा दिनांक कोणता ग्राह्य धरावा याबाबत सामान्य प्रशासन विभाग आणि विधी व न्याय विभागाचा सल्ला घेवून त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेशीत केले असता विधी व न्याय विभागाकडून पुढीलप्रमाणे अभिप्राय कळविण्यात आले. "The Present opinion is restricted to the extent of implementation of Rule 27(2)(b)(ii) of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982. So far as the questio regarding the cause of action in respect of the Departmental Enquiry is concerned the cause of action arises on the date on which the actual event which resulted in causing loss" विधी व न्याय विभागाच्या सदरहू अभिप्रायाच्याआधारे विभागाने अधिका-यांवर विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी काय भूमिका घेतली अशी समितीने विचारणा केली असता या प्रकरणी जे अधिकारी सेवेत आहेत त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे व दुसरीकडे हे संपुर्ण प्रकरण आता ॲन्टीकरप्शन ब्युरोकडे गेलेले असल्यामुळे त्यांचेमार्फत पुर्ण प्रकल्पाची व अधिका-यांची चौकशी सुरु आहे व या सर्व संबंधित अधिका-यांवर फौजदारी कारवाई करावयाची झाल्यास त्यास सेवानिवृत्तीची कोणतीही अडचण नसल्याचे विभागीय प्रतिनिधींकडून समितीसमोर सांगण्यात आले.

९.६ वास्तविक गांधारी प्रकल्पाच्या कामाचा समावेश काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पामध्ये नसताना तसेच त्यासाठी निधीची स्वतंत्र तरतूद, प्रशासकीय मान्यता व स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध नसताना केवळ आर्थिक वर्षात काळ व कुंभेसाठी निधी उपलब्ध आहे म्हणून गांधारीच्या कामाचा समावेश काळ व कुंभे प्रकल्पाच्या कामामध्ये करणे हीच बाब मुळात आक्षेपार्ह असून आर्थिक शिस्तीला धरुन नाही. प्रकल्पाची व्यवहार्यता लक्षात घेता काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पामध्ये ऐनवेळी गांधारी प्रकल्पाचा समावेश करणे व्यवहार्य ठरत होते तर त्यास विहित पध्दतीने मान्यता घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. गांधारीच्या कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता, स्वतंत्र निधीची तरतूद व स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करुन विभागाने हे काम करणे अपेक्षित होते. परंतु विहित प्रशासकीय कार्यपध्दतीचा अवलंब न करता अशाप्रकारे गांधारीच्या कामाचा समावेश काळ व कुंभे प्रकल्पाच्या अंदाजित खर्चातून करणे हे निश्चितच आर्थिक शिस्तीला धरुन नसून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी बाब आहे व हे कालानुरुप सिध्द देखील झाले. काळ व कुंभे प्रकल्पाच्या कामामध्ये निधीची तरतूद करताना कोठेही गांधारी प्रकल्पासाठी स्वतंत्र निधीची तरतूद व मान्यता नसल्याचे समितीने केलेल्या कागदपत्रांच्या तपासणीत स्पष्टपणे दिसून येते. गांधारी प्रकल्पासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्यास विभागाला कोणतीही अडचण नव्हती परंतु विभागाने त्याचा अवलंब केला नाही. तरी देखील प्रकल्पांच्या खर्चामध्ये १०-१२ टक्के अतिरिक्त खर्च झाल्यास समिती समजू शकते. परंतु सदरहू प्रकरणी मान्यतेशिवाय झालेला अतिरिक्त खर्च हा जवळजवळ रु.४०० कोटी इतका आहे ही अधिकच गंभीर बाब आहे. वाढीव खर्चाला सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळालेली नसतानाही कंत्राटदाराची देयके अदा करण्यात आली ही देखील बाब अयोग्य असून कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. सदरहू प्रकल्पाला एकत्रित सुधारीत मान्यता देण्यामागील एक उद्देश असाही होता की, महाड येथील पुराच्या पाण्यावर या प्रकल्पामुळे नियंत्रण होऊ शकेल असेही उपलब्ध कागदपत्रांमध्ये नमूद असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. त्यामुळे ही देखील बाब अंतिम निर्णय घेणेअगोदर विचारात घेणे आवश्यक आहे.

९.७ सदरहू प्रकरणातील घटनाक्रम अतिशय गंभीर व आक्षेपार्ह असताना त्याची विभागाने गांभीर्याने दखल घेतल्याचे दिसून येत नाही. आजतागायत या प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देखील प्राप्त झालेली नाही व मान्यतेशिवाय काम करु नये अशी भूमिका शासनाने घेतल्यामुळे या प्रकल्पाचे काम सद्यःस्थितीत स्थगित झाले आहे. परिणामी काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पाला येणारा एकंदरीत खर्च पाहता व यातून होणा-या वीज निर्मितीचा दर या सर्व बाबी अव्यवहार्य ठरत असल्यामुळे या प्रकल्पावर यापुढे शासनामार्फत गुंतवणूक करु नये व हा प्रकल्प जसाच्या तसा बीओटी तत्वावर हस्तांतरीत करावा असा तत्वतः निर्णय सन २०१६ मध्ये शासनामार्फत घेण्यात आला व त्याअनुषंगाने बीओटीचा प्रस्ताव, निविदा प्रक्रिया, निविदा दस्तऐवज या सर्व बाबींचे ठोस व कालबध्द नियोजन करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु असून त्याठिकाणी आता पम्प स्टोरेज स्कीममध्ये रुपांतरीत करुन जलविद्युत प्रकल्प उदंचन योजना म्हणून कार्यान्वित करणेबाबतच्या प्रस्तावाची व्यवहार्यता तपासून सादर झालेल्या अहवालात सकृतदर्शनी ही बाब तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दिसून येत नाही असे विभागाने त्यांच्या आश्वासित माहितीद्वारे समितीस कळविलेले आहे, ही देखील गंभीर बाब असून या प्रकल्पामध्ये झालेला एकूणच कोट्यावधी रुपयांचा खर्च यामुळे पुर्णपणे निष्फळ झालेला आहे.

शिफारस

९.८. सदरहु परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून शासनाच्या निधीचे मोठ्या प्रमाणात अपव्यय दर्शविणारे आहे. काळ व कुंभे या दोन्ही जलविद्युत प्रकल्पाच्या कामांत धरण, जलवाहतुक व्यवस्था आणि विद्युतगृह हे तीन घटक असून जलविद्युत प्रकल्पाच्या सुरळीत कार्यचालनासाठी हे तिन्ही कार्य घटक परिपूर्ण असण्याची आवश्यकता असून त्यांनी समन्वयाने काम करावयास हवे जेणेकरुन धरण/जलाशयातील पाणी जलवाहतूक व्यवस्थेव्दारे वीज निर्मितीसाठी विद्युतगृहांना पोहोचणे शक्य होईल. परंतु अपर्याप्त नियोजनामुळे वीज निर्मितीच्या साधनसामग्रीचे प्रापण आणि धरण, जलवाहतूक व्यवस्था आणि विद्युतगृहाच्या बांधकामाच्या प्रगतीचा मेळ घालण्यात विभाग अपयशी ठरला. विद्युत निर्मिती साधनसामग्री ही बाजारात सहज उपलब्ध नसते व उपभोक्त्यांच्या आवश्यकतेनुसार त्याचे स्वतंत्ररित्या उत्पादन करावे लागते व यासाठी जवळजवळ ३ वर्षाचा कालावधी अपेक्षित असतो. त्याआधारे विद्युत निर्मिती साधनसामग्रीचे नियोजन केले. परंतु काळ व कुंभे या दोन्ही प्रकल्पांना प्रकल्पग्रस्तांच्या भूसंपादनासाठी विरोध असल्यामुळे प्रकल्पाच्या बांधकामाला विलंब झाला. वास्तविक भूसंपादन झालेले नसताना बांधकाम व विद्युतसामग्री या दोन्हीची निविदा एकाचवेळी काढण्यात आली. परंतु यामध्ये योग्य समन्वय न साधल्यामुळे बांधकामातील प्रगतीचा वेग व साधनसामग्रीच्या प्रापणाची वेळ चुकली. परिणामी बांधकाम झाले नाही मात्र विद्युतसामग्री मात्र पुरविण्यात आली. आजतागायत ही साधनसामग्री तात्पुरत्या शेडमध्ये ठेवण्यात येणे व त्याची वॉरंटीदेखील संपणे ही बाब निश्चितच समर्थनीय नाही व अनियोजनबध्द कामामुळे वा वेळेचा कोणताही ताळमेळ न घालता व समन्वय न ठेवता विभागाने हे काम केल्यामुळे निधी खर्च झाला, साधनसामग्री पडून राहिली मात्र जलविद्युत प्रकल्प देखील सुरु होऊ शकला नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. काळ व कुंभे प्रकल्पासंदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून विभागाच्या अनियोजनबध्द कार्यपध्दतीचे द्योतक आहे. जमिन संपादनाची प्रक्रिया ही अत्यंत किचकट व वेळखाऊ असल्याचे विभागाला नियमितरित्या येणा-या अनुभवावरुन माहिती असतानाही दोन्ही कामांचे कोणतेही नियोजन, ताळमेळ व समन्वय विभागाने ठेवले नाही. परिणामी या प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात झालेल्या कोट्यावधी रुपयांचा निधी आज या प्रकल्पांमध्ये अडकून पडलेला आहे. यातून एकही मेगावॅट जलविद्युत निर्मिती देखील झालेली नसून सिंचन क्षमता देखील अपेक्षेप्रमाणे होऊ शकलेली नाही व सद्यःस्थितीत हा संपुर्ण खर्च निष्फळ ठरला आहे. त्यातही काळ व कुंभे प्रकल्पाच्या कामात गांधारी वळण बंधा-याचे काम देखील समाविष्ट केले. वेगवेगळ्या प्रकल्पाची व्यवहार्यता पाहता या सर्व बाबींचे नियोजन करण्याचे अधिकार विभागाचे आहेत. हे समितील मान्य आहे. परंतु त्यात विहित कार्यपध्दतीचे कुठेही उल्लंघन होणार नाही व वित्तीय नियमांचे पालन करुनच या बाबी विभागाने करणे अपेक्षित आहे. काळ व कुंभेसाठी त्या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध होता म्हणून तो गांधारी प्रकल्पासाठी वापरणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. विभागाने गांधारी प्रकल्पासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता व स्वतंत्र लेखाशीर्षाअंतर्गतच निधीची तरतूद व मान्यता घेऊन हे काम करणे आवश्यक व अभिप्रेत होते. याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पाची स्थापत्य कामे मंजूर रेखाचित्रानुसार करण्यात आलेली नव्हती. क्षेत्रिय अधिका-यांनी संबधित संकल्पचित्र विभागाकडून मान्यता न घेता बोगद्याचे आकारमान वाढविले. बोगद्याचे आकारमान वाढल्यामुळे जलविद्युत निर्मितीसाठी आवश्यक असणारी पाण्याच्या प्रवाहाची गती (velocity) कमी झाली. ही अतिशय तांत्रिक परंतु सहज लक्षात येणारी बाब असतानाही विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांनी याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यातून आता विद्युत निर्मिती होण्याची शक्यता फारच कमी आहे व या कामांचे रु. ६.१९ कोटीचे देयकही अदा करण्यात आले. ज्या अधिका-यांनी मंजूरीशिवाय हे स्थापत्य काम केले त्या सर्व अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून दि.२२/०९/२०१७ रोजी म्हणजेच समितीची साक्ष लागल्यानंतर संबंधित अधिका-यांवर दोषारोप बजावण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने या अधिका-यांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती विचारली असता यातील दोन अधिकारी निलंबित झाले असून अन्य अधिकारी सेवानिवृत्त झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सन २०११ मध्ये चौकशी समिती नेमली असतानाही ५-५ वर्षे चौकशीचा अहवाल प्राप्त होत नाही. त्यामुळे सन २०१७ मध्ये दोषारोप बजावताना जास्तीत जास्त अधिकारी सेवानिवृत्त झाले. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. अशा परिस्थितीत या अधिका-यांवर विभाग कारवाई करण्याबाबत खरोखरच गंभीर आहे काय, याबाबत देखील शंका उपस्थित होते. विभागाने त्या अधिका-यांना सुखरुप सेवानिवृत्त होण्याची संधी उपलब्ध करुन दिली. दोषी अधिका-यांवर सेवानिवृत्तीनंतर ४ वर्षापर्यंत विभागाकडून कारवाई करता येते. परंतु सदरहू प्रकरण सन २०१०-११ चे असल्यामुळे या प्रकरणात कारवाई करण्यास कॉज ऑफ ॲक्शनचा दिनांक कोणता धरावा यासंदर्भात विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिलेले असून जेव्हा शासनाचे वस्तुतः नुकसान झाले तो वेळ ग्राह्य धरण्यात यावा असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत. अतः सदरहू प्रकरणी हे प्रकरण अद्यापही सुरुच असल्यामुळे कॉज ऑफ ॲक्शन अद्यापही सुरुच असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे या संपुर्ण प्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-यांवर विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी. तसेच सदरहू प्रकरण आता ॲन्टीकरप्शन ब्युरोकडे देण्यात आलेले असल्यामुळे संबंधित दोषी अधिका-यांवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई करण्यास सेवानिवृत्तीची कोणतीही अडचण नाही. एखाद्या प्रकल्पाला मान्यता द्यायची, त्याकरिता निधीची तरतूद करायची, त्यात अन्य प्रकल्पांचा समावेश करुन

ते सर्व प्रकल्प एकत्रित करायचे व त्या सर्व प्रकल्पांना मिळून एकत्रित सुधारीत प्रशासकीय मान्यता घ्यायची ही कार्यपध्दतीच मुळात दोषपुर्ण आहे. काळ जलविद्युत प्रकल्पाचे काम समजूनच गांधारी प्रकल्पाचे काम करण्यात आले ही देखील बाब अयोग्य आहे. आर्थिक वर्षात केवळ प्रकल्पासाठी निधी उपलब्ध आहे म्हणून कोणत्याही परिस्थितीत वित्तीय नियमांचे उल्लंघन करुन हा खर्च करीत राहणे ही विभागाची भूमिका समर्थनीय नाही. विभागाने यासंदर्भात दिलेल्या आश्वासित माहितीमध्ये ही बाब मान्यच केली की, प्रत्यक्षामध्ये गांधारी प्रकल्पास स्वतंत्र सुधारीत प्रशासकीय मंजूरी नसल्यामुळे काळ व कुंभे प्रकल्पावरील खर्च गांधारी वळण बंधा-यावर वर्ग केलेला नाही. याहीउपर काळ व कुंभे हा जलविद्युत प्रकल्प असून गांधारी हा सिंचन प्रकल्प आहे. त्यामुळे काळ व कुंभे प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालात गांधारीचा बांधकाम खर्च समाविष्ट करुन काळ-कुंभे व गांधारी प्रकल्पास एकत्रित सुधारीत प्रशासकीय मान्यता घेता येणार नाही. सद्यःस्थितीत इतका प्रचंड निधी खर्च करुन कोणताही सार्वजनिक हेतू व उद्देश विभागाला साध्य करता आला नाही व यात कोट्यावधी रुपयांचा निधी निष्फळ ठरण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एवढेच नव्हेतर आता या प्रकल्पाची व्यवहार्यता व उपयोगीतेबाबत प्रश्न उपस्थित झालेले आहे. आतापर्यंत विभागास या काळ व कुंभे प्रकल्पांसाठी केवळ रु. ७४०.४४ कोटी रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्पांवर आजपर्यंत रु.११२७ कोटी इतका खर्च झालेला आहे. प्रकल्पाची मुळ प्रस्तावित किंमत रु.२०० कोटीपेक्षा कमी असताना इतक्या मोठ्या प्रमाणात प्रकल्पाचा खर्च वाढणे व तरीही सन २००४ पासून २०१७ पर्यंत हा प्रकल्प आजतागायत पुर्ण न होणे या सर्व बाबी नियोजनाचा अभाव दर्शविणा-या आहेत. परिणामी सद्यःस्थितीत कोट्यावधी रुपयांचा खर्च निष्फळ ठरलेला आहे. या प्रकल्पाला आजतागायत तीन वेळा सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली व तरीही त्या मान्यतेपेक्षा जास्त निधी खर्च झालेला असून चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यास शासनाने अद्याप निर्णय न केल्यामुळे या प्रकल्पाचे काम सद्यःस्थितीत स्थगित आहे. जवळजवळ रु.२०० कोटीच्या प्रकल्पाला रु. ७४० कोटीची सुधारीत प्रशासकीय मान्यता असून या प्रकल्पावर आजतागायत रु. ११२७ कोटी खर्च झालेला असून अद्यापही काम स्थगित आहे व सद्यःस्थितीत हा संपुर्ण खर्च निष्फळ ठरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने आता दि.२३/०२/२०१८ रोजी शासन निर्णय काढून समितीची स्थापना केली आहे व हा प्रकल्प बीओटी तत्वावर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. गांधारी प्रकल्पाचा निधी विभागाने खर्च करुन टाकला आहे. काळ-कुंभे प्रकल्पात शासनाचा जवळजवळ रु.११२७ कोटी एवढा प्रचंड निधी खर्च झाला आहे. परंतु हा प्रकल्प अद्यापही सुरु होऊ न शकल्यामुळे तो संपुर्ण खर्च निष्फळ ठरला आहे, कोणतेही सिंचन यातून झालेले नाही, कोणतीही वीज निर्मिती यातून होवू शकलेली नाही, बोगद्याचे आकारमान वाढविल्यामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत व यामुळे यातून भविष्यात वीज निर्मिती होण्याची शक्यता देखील नाही. अशा परिस्थितीत बीओटी तत्वावर देखील या प्रकल्पाची व्यवहार्यता निश्चित आहे का ? हा प्रश्न उद्भवतो. या सर्व घटनाक्रमात दोषी असलेले अधिकारी देखील सेवानिवृत्त झालेले आहेत. म्हणून या संपुर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी हा संपुर्ण प्रकल्प ॲन्टी करप्शन ब्युरोकडे देण्यात आलेला असून त्याअनुषंगाने संबंधितांवर कारवाई होईलच तसेच अधिका-यांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यासाठी त्यांच्या सेवानिवृत्तीची कोणतीही बाधा नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

९.९. दोन जलविद्युत प्रकल्प सुस्थापित करण्यासाठी वीज निर्मिती साधनसामग्रीची खरेदी आणि बांधकामात समान गती राखताना, जलसंपदा विभागाने केलेल्या अपर्याप्त नियोजनामुळे तात्पुरती साठवणूक शेड आणि राखण आणि पहा-यावरील रु.१.१६ कोटीच्या टाळता येण्याजोग्या खर्चाव्यतिरिक्त रु.३७.६६ कोटी मुल्याची साधनसामग्री विनावापर पडून राहिली व त्याची वॉरन्टीदेखील संपली. त्यावर समितीने आक्षेप नोंदवित विभागाने फक्त बोगद्याचा साईज वाढल्याप्रकरणी जबाबदार अधिका-यांवर कारवाई केलेली आहे. परंतु सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिकचा खर्च करणा-या अधिका-यांवर कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. त्यांचेवर देखील कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सद्यःस्थितीत या प्रकल्पाचे कोणतेही भवितव्य समितीला दिसून येत नाही. शासन हा प्रकल्प चालवू शकत नाही व बीओटी तत्वावर हा प्रकल्प कितपत यशस्वी ठरेल हे देखील अनिश्चित आहे. अतः या संपुर्ण प्रकरणी विभागाने संबंधित अधिका-यांवर तातडीने कडक कारवाई करावी, सर्व संबंधित अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करुन ती ६ महिन्यात कालबध्द पध्दतीने पुर्ण करावी. ॲन्टी करप्शन ब्युरोमार्फत सुरु असलेल्या चौकशीमधील निष्कर्षाच्या आधारावर विभागाने आवश्यक ती दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी. तसेच सदरहू प्रकल्पास आता पम्प स्टोअरेज योजनेमध्ये (**pumped storage scheme**) रुपांतरीत करुन ते उदंचन योजना म्हणून कार्यान्वित करणेबाबतची व्यवहार्यता विभागाने तपासली असता सकृतदर्शनी हे देखील तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दिसून येत नसल्याचे विभागाने त्यांचे लेखी आश्वाासित माहितीमध्ये नमूद केले आहे. अशा परिस्थितीत सदरहु प्रकल्प बीओटी तत्वावर चालविता येईल किंवा कसे, याची पुर्ण व्यवहार्यता तपासल्यानंतरच बीओटीचा निर्णय घेण्यात यावा. तसेच ज्या अधिका-यांच्या कालावधीत सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिकचा खर्च झालेला आहे त्यांचेवरही कारवाई करण्यात यावी. परंतु जर हा प्रकल्प बीओटी तत्वावर चालविणे व्यवहार्य ठरत नसेल व या प्रकल्पामुळे महाड येथील पुरसदृष्य परिस्थितीवर नियंत्रण येणार असेल तर शासनाने हा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा व या प्रकल्पाची उपयोगिता अंमलात आणावी. तसेच या प्रकल्पांसंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाची माहिती व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

१०. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.५ "थांबलेल्या सिंचन प्रकल्पामध्ये निधी अडकुन राहणे" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्र. ३.५ थांबलेल्या सिंचन प्रकल्पामध्ये निधी अडकुन राहणे

यवतमाळ जिल्ह्यातील महादापुर तलाव प्रकल्पाच्या त्रुटीपुर्ण सर्वेक्षण आणि तपासणीमुळे न केवळ प्रकल्पास ६७ महिन्यांचा विलंब झाला परंतु त्यावर केलेला रु.३४.६४ कोटी खर्च देखिल जून २०११ पासुन अडकुन राहीला होता.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका १९८४ च्या परीछेद २५१ नुसार संबंधित नागरी अधिका-याने जमिनीचा पुर्ण ताबा घेतल्याशिवाय या जमिनीवर कोणतेही काम सुरु करु नये. तसेच जेव्हा कामाच्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत परंतु त्या कामासाठी लागणारी जमिन अद्याप संपादीत करण्यात आली नसेल तर अशा प्रकरणात काम सुरु करावयाचे आदेश जारी करण्यापुर्वी जमिन संपादनासाठी लागणारा कालावधी संबधित जिल्हाधिका-याकडुन निश्चित करुन घ्यावयास पाहीजे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने, यवतमाळ जिल्हयातील महादापुर तलाव प्रकल्पास ९३२ हेक्टर (सिंचन योग्य लाभ क्षेत्र) ओलीताखाली आणण्यासाठी रु. २३.७७ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली (मार्च २००७). या प्रकल्पाव्दारे जिल्हयात आश्वासित अन्नधान्य उत्पादन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वित्तीय स्थिरता येणे अपेक्षित होते.

कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग (EE) यवतमाळ यांनी एका कंत्राटदारास रु. १५.८८ कोटी किमतीवर हे काम बहाल केले.(फेब्रुवारी २००८) जे ३६ महिन्यांच्या कालावधीत (फेब्रुवारी २०११) पूर्ण करावयाचे होते. परंतु कामास विलंब झाला आणि जून २०११ पर्यंत कंत्राटदारने ७० टक्के माती धरण, १०० टक्के सांडवा, पुच्छ कालवा आणि शिर्ष विमोचकाचे काम पूर्ण केले. या कामांसाठी कंत्राटदारास रु.२८.५८ कोटी अदा करण्यात आले. जून २०११ पर्यंत या प्रकल्पावर (भूमी संपादनासह) एकूण रु.३४.६४ कोटी खर्च झाला.

E.E. यवतमाळ यांच्या दस्तऐवजांच्या लेखापरीक्षा तपाणीत (जून २०१५) खालील बाबी निदर्शनास आल्या :–

• मुख्य वनसंरक्षक (CCF) यवतमाळ यांच्या प्रकल्प स्थळाशी लागून असलेल्या वन क्षेत्री प्रत्यक्ष दिलेल्या भेटीत (ऑगस्ट २०११) त्यांना असे आढळले की १५.६० हेक्टर वन जमीन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रांतर्गत येत होती. क.क. यवतमाळ यांनी १८ महिन्या नंतर (मार्च २०१३) पुष्टी केली की बुडीत क्षेत्राखाली आलेली एकूण जमीन १५२.२२ हेक्टर असुन, त्यात CCF ने दर्शविल्याप्रमाणे (१५.६० हेक्टर) वन जमीन, (१३५.६४ हेक्टर) खाजगी जमीन व (०.९८ हेक्टर) सरकारी जमीन समाविष्ट होती.

• EE सिंचन प्रकल्प अन्वेषण विभाग, अमरावती यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात (मार्च २००७) फक्त ८७.८० हेक्टर जमीन बुडीत क्षेत्राखाली येत असल्याचे विचारात घेतले होते आणि त्यात वन क्षेत्राचा अंतर्भाव नव्हता. अशाप्रकारे प्रकल्प अहवालात ६४.४२ हेक्टर क्षेत्र कमी दर्शविले होते.

• ऑगस्ट २०१६ पर्यंत एकूण १३५.६४ हेक्टर पैकी १११.८९ हेक्टर खाजगी जमीन क्क यवतमाळ यांनी संपादित केली होती तसेच १५.६० हेक्टर वनक्षेत्र संपादित करण्याची कारवाई प्रगती पथावर होती. ०.९८ हेक्टर सरकारी जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पाठविलेला होता. या दरम्यान, जुन २०११ पासून प्रकल्पाचे काम थांबले असल्यामुळे कंत्राटाच्या कलम-१५ अंतर्गत कंत्राटदाराने (जुलै २०१३) काम काढूण घेण्यासाठी आवेदन केले. तथापी, ऑगस्ट २०१६ पर्यंत EE यवतमाळ यांनी कंत्राटदाराला कंत्राटीय बंधनातून मुक्त केले नव्हते. प्रकल्पाच्या किंमतीत रु. २३.७७ कोटी पासून रु. ७७.८३ कोटी पर्यंत वाढ झाली होती, जी महाराष्ट्र शासनाद्वारे ऑगस्ट २०१६ पर्यंत मंजूर केलेली नव्हती.

अशाप्रकारे, महादापूर तलाव प्रकल्पाच्या त्रुटीपूर्ण सर्वेक्षण आणि तपासणीमुळे न केवळ प्रकल्पास ६७ महिन्यांचा (फेब्रुवारी २०११ ते सप्टेंबर २०१६) विलंब झाला परंतु रु.३४.६४ कोटीचा झालेला खर्च ही जून २०११ पासून अडकून राहिला. या शिवाय, जिह्यात आश्वासित अन्नधान्य उत्पादन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि वित्तीय स्थिरता हे प्रकल्पापासुन अभिप्रेत उद्दिष्ट साध्य झाले नाही. क्क यवतमाळ यांनी महादापूर तलाव प्रकल्पाच्या त्रुटीपुर्ण सर्वेक्षणाचे आणि तपासणीची कारणे स्पष्ट केली नाही ही बाब शासनास कळविण्यात आली. (मे २०१६) डिसेंबर २०१६ पर्यंत त्याचे उत्तर प्रतिक्षीत होते.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या योजनेस शासन निर्णय क्र. २२०७/८७४/२००७)/लपा-२, दि. २३.०३.२००७ अन्वये २३.७७ कोटी किंमती करिता प्रमाण प्राप्त आहे. प्रकल्पातील धरणाची लांबी ९१९ मी. असून ओगी पध्दतीचा सांडवा, मुख्य विमोचक आणि १०.३२ किमी लांबीचा डावा मुख्य कालवा प्रस्तावित असून या कालव्याव्दारे ९३२ हे सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. सिंचनाचा लाभ झरीजामणी तालुक्यास मिळणार आहे. मुख्य धरणाचे सांडव्याचे विमोचकाचे व पुच्छ कालव्याचे काम स्विकृत निविदा क्र. ब-१/३५/विभा/२००७-०८ दि. २२.०२.२००८ नुसार कंत्राटदार श्री. अनोजकुमार अग्रवाल, नागपूर यांना देण्यात आले होते. सदर कामास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लगेच सुरु करण्यात आले व सद्यःस्थितीत धरणाचे मातीकाम ७० टक्के पूर्ण झाले आहे. सांडवा, मुख्य विमोचक १०० टक्के पूर्ण झाले असून घळभरणी व इतर किरकोळ कामे प्रलंबित आहेत.

दि. २८.११.२०११ रोजी मुख्य वनसंरक्षक, यवतमाळ यांचे भेटी दरम्यान असे निदर्शनास आले की, प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात वन जमिन येत आहे. त्यानंतर विभागाने प्रकल्पाचे काम त्वरीत थांबविले. नंतर विभागाने तातडीने कार्यवाही करुन प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी व खात्री करुन वन प्रस्ताव दि. १०/१/२०१२ रोजी उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांना सादर करण्यात आला.

बुडीत क्षेत्राचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर असे निदर्शनास आले की बुडीत क्षेत्राकरिता एकूण १५२.२२ हे. जमिनीची आवश्यकता आहे त्यानुसार उर्वरित जमिनीच्या संपादनाची कार्यवाही विभागामार्फत सुरु करण्यात आली. कार्यकारी अभियंता, यवतमाळ यांनी १३४.६४ हे. खाजगी जमिनीपैकी १११.८९ हे. जमिन संपादीत केली व ०.९८ हे. शासकीय जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव तयार करुन उपविभागीय अधिकारी वणी यांना सादर केला.

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, अमरावती यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात फक्त ८७.८० हे. जमिन बुडीत क्षेत्राखाली येत असल्याचे विचारात घेतले होते आणि त्यात वनक्षेत्राचा कोणताही अंतर्भाव नव्हता. त्यामुळे धरण रेषेवरील जमिन संपादित करुन मुख्य धरणाचे काम सुरु करण्यात आले.

प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यापूर्वी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र, पाणी उपलब्धता, वनजमीन या सर्व बाबींची शहानिशा करणे आवश्यक असते. या अनुषंगाने सदर बाबींची काम सुरु करण्यापूर्वी शहानीशी न करता काम सुरु करण्या-या जबाबदार अधिका-यावर विभागीय चौकशीची कार्यवाही अगोदरच सुरु करण्यात आली आहे.

जरी कंत्राटाच्या कलम १५ अंतर्गत कंत्राटदाराने काम काढून घेण्यासाठी विनंती केली असली तरी, विभागाने कंत्राटदाराला अद्याप कंत्राटीय बंधनातून मुक्त केले नाही.

प्रकल्पाची प्र. मा. प्राप्त किंमत (रु. २३.७७ कोटी) रु. ९१.५९ कोटी पर्यंत (प्रस्तावित प्रथम सुप्रमा नुसार) वाढली आहे. झालेली वाढ ही प्रामुख्याने जमिनीच्या दरातील वाढ, दरसुचीतील वाढ, संकल्पचित्रातील बदल आहे.

सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या रु.९१.५९ कोटी किंमतीच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक, यांचे कडून छाननी करण्यात आली असून प्रस्ताव शासनाच्या त्रिसदस्यीय समितीपुढे सादर करण्यात आला आहे.

विभागीय कार्यालयाने वनजमिन प्रस्ताव दि.१०/१/२०१२ रोजी उप वनसंरक्षक पांढरकवडा यांना सादर केला आहे. प्रकल्प पूर्ण होण्यास वनजमिन आणि बाधीत वन क्षेत्राकरीता पर्यायी जमिन उपलब्ध होण्यास २.५ वर्षाचा कालावधी लागल्याने विलंब झाला. सद्यःस्थितीत वन जमिनीचा प्रस्ताव ऑनलाइन सादर करण्यासाठी क़ड्ऋ प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे वनजमिन प्रस्ताव प्रलंबित आहे.

सदर वन जमिनीवर स्थानिक शेतकरी वहीती करतात. सदर हक्क महसुल व वन विभागाने संबधितांना प्रदान केलेले नाहीत. सद्यःस्थितीत वन जमिन संबधित स्थानिक शेतक-यांना वन हक्क कायद्यानुसार पट्टे वाटपाव्दारे तालुका स्तरीय समिती समोर विचाराधीन आहे. जिल्हा स्तरीय समितीचा निर्णयानंतर सदर वन जमिनीबाबत अंतिम निर्णय होईल. त्यानंतर आवश्यकतेनुसार वन प्रस्ताव सादर करण्यात येईल.

प्रकल्पाची घळभरणी जून, २०१९ पर्यंत प्रस्तावित असून संपूर्ण प्रकल्प जून, २०२० पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

सदर बाबी लक्षात घेता विनंती करण्यात येत आहे की, सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

महालेखाकार यांनी उपस्थित केलेले मुद्दे :–

(१) प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात वन जमीन येत असल्या बाबतची शहनिशा करणे, ही खात्याची जबाबदारी होती.

(२) आजपर्यंत खात्यालमार्फत वन जमीन संपादित करण्यामत आलेली नाही.

(३) दोषयुक्त सर्वेक्षण व अन्वेनषणामुळे प्रकल्पातच्यार किंमती मध्ये रु. २३.७७ कोटीहून रु. ७७.८३ कोटी इतकी वाढ झाली आहे.

(४) प्रकल्पा.चे काम अद्याप अपूर्ण आहे त्याळमुळे लाभधारक प्रकल्पाच्या लाभापासून वंचित आहे. त्यामुळे प्रकल्पा वर झालेला खर्च रु. ३४.६४ कोटी मागील सहा वर्षापासून अडकून पडलेला आहे.

(५) सर्वेक्षणातील दुर्लक्षतेबाबत संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांवर कार्यवाही सुरु करण्याेत यावी असे निर्देशित केले.

अनुपालन :

(१) प्रकल्पाचे काम सुरु करण्याकपूर्वी खात्यागच्याय अधिका-यांनी पूर्ण संचय पातळीचे (FTL) सर्वेक्षण केलेले नाही. त्या मुळे वनक्षेत्राची शहानिशा झालेली नसल्याने संबंधितांवर खातेनिहाय चौकशी प्रस्ताळवित करण्या त आली आहे.

(२) वन प्रस्ताव विभागामार्फत उप-वन संरक्षक,पांढरकवडा जि.यवतमाळ यांना दि.१०/१/२०१२ रोजी सादर करण्यात आला. परंतु वनीकरणासाठी योग्ये पर्यायी जमीन उपलब्धं न झाल्याने, याकरीता दोन ते अडीच वर्षाचा कालावधी लागला. ऑनलाईन वन प्रस्तासव सादरीकरणासाठी FRA प्रमाणपत्राची आवश्यीकता असून, सदर प्रमाणपत्र स्थानिक शेतक-यांचा वनजमीनीवर असलेला दाव्यावचा प्रश्ने निकाली न निघाल्याने प्राप्ता होऊ शकले नाही.

(३) प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु.२३.७७ कोटी वरुन ९१.५९ कोटी एवढी वाढ झालेली आहे. सदर वाढ प्रामुख्याने दरसुची मध्ये झालेली वाढ, संपादित करावयाच्याज खाजगी क्षेत्र व दरामध्ये झालेली वाढ तसेच खाजगी जमीनीची १०३.८० हे. वरुन १६३.६१ हे. पर्यंतची वाढ, सरकारी जमीन ०.९८ हे. व १५.६० हे. वनक्षेत्रातील वाढ त्याचप्रमाणे धरण व ओगी सांडव्याच्या संकल्पनातील बदलामुळे वाढ झालेली आहे.

(४) प्रकल्पा.चा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्य ता प्रस्ताव रु.९१.५९ कोटीचा त्रिसदस्यीय समितीस सादर आहे. वन जमीनीचा प्रस्ताव उप-वन संरक्षक यांचे कडे यापूर्वीच सादर झालेला असून, सदर प्रस्ताव महसुल व वन खाते यांचे अंतर्गत असलेल्या FRA दाव्याकसंबंधी निकाली न लागल्याने वन प्रस्ताव प्रलंबित आहे. आता प्रकल्पाकरीता आवश्यक सुप्रमा प्रस्ताव मंजुरी, महाराष्ट्र व जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यंता व वनप्रस्तारवाची मान्यवता प्राप्त करुन प्रकल्पाचे काम जून २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) शासन निर्णय क्र.संकिर्ण २००१/२१/(५१६/२००१)/ल.पा.-२, दि.१८/९/२००१ (अन्वये) सर्वेक्षणात दुर्लक्षतेबाबत क्षेत्रिय अधिका-यांवर कार्यवाही सुरु करण्यापत आली आहे.

साक्ष :

परिच्छेद क्र. ३.५ थांबलेल्या सिंचन प्रकल्पामध्ये निधी अडकून राहणे

११. यवतमाळ जिल्हयातील महादापूर तलाव प्रकल्पासाठी २३.७७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. विभागाने विना सुप्रमा ७७.८३ कोटी रुपये खर्च केले. विना सुप्रमाचा खर्च कसा केला? हे सुधारित प्रशासकीय मान्यतेसह आहे का ? किती टक्के वाढीव खर्चाची परवानगी मिळते? सदर परिच्छेदाबाबत अधिक माहिती देण्यात यावी. असे समितीने विचारणा केली असता, तसेच ही पध्दत आताही सुरु आहे का?

महादापूर येथील प्रकल्पासाठी वाढीव खर्च करण्यासाठी शासनाची लेखी परवानगी आहे. या प्रकरणी काही कारणामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता प्रलंबित असली तरी विभागाला वाढीव खर्चासाठी शासन स्तरावर मान्यता मिळते तसेच त्यामध्ये अशी काही टक्केवारी नसते. आजही विभागाकडे ८ प्रकरणांमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता नाही, परंतु वित्त व नियोजन विभागाने सुप्रमापेक्षा जास्त खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे. कारण यावर भारत सरकारचे मॉनिटरींग आहे. तसेच प्रकल्प न थांबता वेळेत पूर्ण झाला पाहिजे असे सचिवांनी समितीस अवगत केले.

केंद्र शासनाचे मॉनिटरिंग आहे व त्यांचे पैसे घेण्यासाठी विभागाकडून प्रयत्न होत आहेत हे समितीस मान्य आहे. परंतु या प्रकल्पास भारत सरकारची मान्यता नव्हती. असे समितीस मत आहे.

ज्या प्रकल्पामध्ये विभागाला वाटते की, चालु वर्षामध्ये त्यासाठी निधी आहे, विशेष प्रकल्प आहे किंवा पी.एम.के.एस.वाय.चे प्रकल्प आहेत त्यामध्ये केस टू केस शासनाची परवानगी घेवून खर्च करण्यात येते असे सचिवांनी समितीस सांगितले.

खर्च करण्यात येते हे ठीक आहे, परंतु खर्च केल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतली पाहिजे, असा नियम आहे किंवा कसे? एखाद्या गोष्टीला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी महिना-दोन महिन्यांचा वेळ असेल व विभागाने मान्यता दिली तर समजू शकतो, परंतु खर्च केल्यानंतर दोन-दोन, पाच-पाच वर्षे सुप्रमा घ्यायची नाही किंवा विभागाला द्यायची नाही, असे कसे शक्य आहे? तसेच ही गोष्ट समर्थनीय आहे का ? यामध्ये २३.७७ वरुन ७७.८३ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली होती, असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले.

महादापूर प्रकल्पाची किंमत २३.७७ कोटी रुपये एवढी होती. जुलै अखेर या प्रकल्पावर आपण ३८ कोटी रुपये एवढा खर्च केला आहे मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा झालेला जास्तीचा खर्च १४ कोटी रुपये एवढा आहे हा खर्च सन २००९-१० ते २०१५-१६ दरम्यानचा आहे. त्यापैकी भूसंपादनासाठी २.८७ कोटी रुपये व बांधकामावर ११ कोटी रुपये खर्च केला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने हा खर्च कशावर केला याबाबत समितीला अडचण नाही. एखाद्या खर्चाला मान्यता मिळाल्यानंतर किती दिवसात सुधारित प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे याला काहीही बंधन नाही का? एकदा खर्च केल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता न देता फाईल बंद करायची, असे होते का? विभागाने खर्च केल्यानंतर एवढया दिवस सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव विभागासमोर का घेवून आले नाही? किंवा सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव आल्यानंतर सचिवांनी किंवा मंडळाने सुप्रमा नाकारली का? याचे कारण समितीला समजले पाहिजे.

मागील दोन वर्षांमध्ये विभागाने १९० सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत.

सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षे सुधारित प्रशासकीय मान्यता बंद होत्या. यादरम्यान एकही सुधारित प्रशासकीय मान्यता दिली गेली नाही.

सन २०१५-१६ ते २०१६-१७ मध्ये विभागाने १९ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत.तविभागाला २०० पेक्षा जास्त प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता होती. असे विभागीय सचिवांनी समिती अवगत केले.

सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा मुख्य म्हणजे सर्व्हे व इन्व्हेस्टिगेशन हा विषय आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत सन्माननीय सदस्यांनी काढलेला मुद्दादेखील बरोबर आहे, परंतु मुख्य भाग हा न झालेला किंवा चुकीचा झालेला सर्व्हे असा आहे वन विभागाची व शासनाची जमीन असताना त्यामध्ये दोन्ही ॲक्वीझिशन्स झालेल्या नाहीत. एफ. आर. ए. व पर्यायी जमीनदेखील अद्याप मिळालेली नाही. गॉर्ज झाला असता तर मला वाटते की, ब-याच गोष्टी संपू शकल्या असत्या, परंतु तसे झाले नाही. ७० टक्के काम झाले व तेव्हापासून काम बंद आहे त्यामुळे ३४ कोटी रुपये गुंतून पडले. आता तोच प्रकल्प ९१.५९ कोटी रुपयांपर्यंत पोचला आहे. यामध्ये इन्क्वायरी इन्स्टीगेट केल्याबाबत नमूद केले आहे. या चौकशीमध्ये काय झाले ? यामध्ये अंतिमतः कोणावर कारवाई झाली का व एफ.आर.ए. व पर्यायी जमीन केव्हा मिळणार? तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे अद्याप महाराष्ट्र शासनाच्या जमिनीचे देखील ॲक्विझिशन झालेले नाही. ते का झाले नाही व कधी होणार? यासाठी १० वर्षांचा विलंब झालेला आहे.

८८ हेक्टरपासून एवढा मोठा फरक का पडला? पर्यायी जमिनीची कागदपत्रे विभागाकडे उपलब्ध नसून एफ. आर. ए. मान्यतेसाठी अजूनपर्यंत पाठविण्यात आलेले नाही. त्याचबरोबर विभागाने कारवाई प्रस्तावित केल्याबाबत सांगितले, तर या चौकशीचे नेमके काय झाले? चुकीचा सर्व्हे, शासनाची एक हेक्टर जागा आपल्याला मिळत नाही. यामध्ये ३८ कोटी रुपये खर्च करुनही सर्व गप्प बसले आहेत का ?

संबंधित अधिका-यावर काय कारवाई सुरु आहे व ती कधी सुरु करण्यात आली आहे ? असे समितीने विचारणा केली असता.

महादापूर लघु पाटबंधारे योजनेच्या संदर्भात चुकीचा सर्वे झाला त्यांच्याशी संबंधित कोणत्याही अधिका-यांवर अद्याप दोषारोप बजावण्यात आलेले नाही. परंतु यासंदर्भात विभागाने सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने महदापूर लघुपाटबंधारे योजनेचे सर्वेक्षण योग्य किंवा चुकीचे झालेले हे तपासण्याची जबाबदारी ज्याच्यावर येते त्या अधिकारी कर्मचा-यास जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव प्रारुप दोषारोपपत्रासह शासनाच्या दिनांक २५/१०/२०१७ च्या पत्रान्वये मागविण्यात आला आहे. ८७.८ हेक्टरवरुन १५२ हेक्टर असा जो चुकीचा सर्व्हे झाला त्याच्याशी संबधित तीनही अधिकारी आज सेवेमध्ये आहेत. साखरे, विराळे व घाणेकर अशी त्यांची नावे आहेत. त्या तिघांची चौकशी सुरु करण्यात आली आहे असे सचिवांनी समितीस अवगत केले.

या प्रकरणामध्ये क्षेत्र वाढविले व त्यामध्ये वने आहेत असे सांगितलेच नाही. या अधिका-यांवर चौकशी कधी सुरु केली आहे? तीन वर्षांमध्ये आणखी काही झाले नाही का? जोपर्यंत ते सेवानिवृत्त होणार नाहीत तोपर्यंत हे करणार नाहीत का? असे समितीने विचारले असता, महदापूर लघु पाटबंधारे योजना या प्रकल्पाच्या कामात केलेल्या अनियमिततेबाबत श्री.क.सु.विमलकोंडा तत्कालीन कार्यकारी अभियंता व इतर ३ अधिका-यांविरुद्ध दिनांक २८/११/२०१४ च्या आदेशान्वये दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत. माननीय मंत्री महोदयांकडे दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत नस्ती सादर केलेली आहे.

या प्रकरणामध्ये मंत्री महोदयांकडून मंजुरी आली की लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

एकदा चौकशी सुरु केल्यानंतर ती पूर्ण करण्याबाबतच्या गाईडलाईन्स देखील विभागास माहिती असल्या पाहिजेत. असे असतानाही विभाग तीन-तीन वर्षे काहीही करीत नाहीत. दरम्यान दोषी अधिकारी सेवानिवृत्त होऊन जातात. Somebody should be responsible for the delay. ज्या लोकांनी उशीर केला त्यांना अर्धन्यायिक अधिकार आहेत.त त्यांच्यावर समिती काही कारवाई करु शकत नाही. त्यामुळे हे लोक विलंब लावतात. या सर्व सिस्टीमला टाइम बाउंड प्रोग्राम द्यावा अशी समितीला विभागाकडून अपेक्षा आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, सदर प्रकरण सहा महिन्यांमध्ये संपविण्यात येईल असे सचिवांनी आश्वासन दिले.

दुसरा मुद्दा वन जमिनीशी संबंधित आहे यावर वर्षानुवर्षे लोकांचा कब्जा होता. मागील आठवडयामध्ये जिल्हाधिकारी यांनी या जमिनीवर पट्टे इश्यू केले आहेत. The Collector has allotted this land to the occupants. यामध्ये १५.६० हेक्टरचा फॉरेस्ट होता. तेथे लोकांनी कब्जा करुन त्यावर शेती करीत होते त्यामुळे प्रस्ताव पाठविला नव्हता. याबाबतची छायाचित्रे विभागाकडे आहेत.त ते केवळ कागदावर फॉरेस्ट आहे. जिल्हाधिकारी यांनी याबाबत सुनावणी घेवून त्यांना पट्टे अलॉट केले. त्यांच्या नावावर ही जमीन केली आहे असे सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने समितीला जे उत्तर सादर केलेले आहे त्यामध्ये लिहिले आहे की, "तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समितीवर निर्णय घेणार आहोत." प्रोजेक्ट ऑन गोइंग असताना जिल्हाधिकारी यांनी असा निर्णय घेण्याअगोदर इरिगेशन विभागाची भूमिका जाणून घेतली पाहिजे किंवा नाही ? आपला रिप्लाय असा आहे की, "स्थानिक शेतक-यांना वन कायद्यानुसार पट्टे वाटपाद्वारे तालुकास्तरीय समितीसमोर विषय विचाराधीन आहे. जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयानंतर सदर जमिनीबाबत अंतिम निर्णय होईल."

निर्णय काय झाला आहे ? याची माहिती देण्यात यावी असे मत समितीने व्यक्त केले असता.

१५ हेक्टर जमिनीबाबत लक्षात आल्यानंतर विभागाने फॉरेस्ट लॅण्ड ॲक्विझिशनच्या नावाखाली प्रयत्न केला व तसा प्रस्ताव सादर केला. जेव्हा मूव्हमेंट झाली त्यावेळी एफ. आर. ए. प्रमाणपत्र आणून द्या असे सांगण्यात आले. माननीय जिल्हाधिकारी यांच्याकडे ज्यावेळी ॲप्रोच झालो त्यावेळी लक्षात आले की, ते लोक तेथे बेकायदा जमीन कसत होते. त्यामुळे फॉरेस्ट राईट ॲक्ट डिस्पोज करण्याच्या सूचना झाल्या. त्याची प्रोसिजर महसूल विभागाकडे असल्यामुळे तहसिल पातळीवरील, प्रांत पातळीवरील समिती हे सर्व आतापर्यंत झालेले असून आता अंतिम आदेश दिले जात आहेत. त्या संदर्भात विभागाने पुढील प्रमाणे सद्यःस्थिती दर्शक माहिती सादर केली आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील वनजमीनीवर स्थानिक शेतक-यांची वहीती आहे या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे संदर्भ पत्र क्र. अका/वनहक्क/कावि/२०१७, दि.३०.१२.२०१७ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम-२००६ नियम २००८ व सुधारीत नियम २०१२

अंमलबजावणीबाबत तालुका झरी जामीण येथील १४ वैयक्तिक वनहक्क दाव्याचे मुळ पट्टे वाटप करण्याची कार्यवाही झालेली आहे. पुढील कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष उपविभागीय स्तरीय वनहक्क समिती, केळापूर यांना मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी निर्देश दिलेले आहे. यानंतर भूसंपदानाची कार्यवाही निवाड्याद्वारे विभागाचे स्तरावरुन त्वरीत करण्यात येईल.

फॉरेस्ट राईट ॲक्टचे डिस्पोजल, ज्यांच्याकडे वर्ग-२ ची जमीन आहे त्यांना पैसे द्यावे लागतील. त्याशिवाय एफ. आर. ए. चे प्रमाणपत्र मिळणार नाही व फॉरेस्ट ॲक्टखालील भूसंपादनाचा प्रस्ताव क्लिअर होत नाही. हे दृष्टीपथात आलेले असून जून, २०१९ मध्ये याचे गॉर्ज करण्यात येत आहे, ही सर्व कार्यवाही महसूल विभागाने केलेली आहे असे सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाला त्या प्रकल्पासाठी ही जागा घेणे आवश्यक आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, पाणी साठविण्याच्या सबमर्जन्स मध्ये हा एरिया येत आहे त्यामुळे हे घेतल्याशिवाय पर्याय नाही.

फॉरेस्टला जी पर्यायी जमीन द्यायची आहे ती विकत घेण्याचे पैसे जलसंपदा विभागाने फॉरेस्टकडे भरले आहेत. एन. पी. पी. व्हॅल्यूदेखील भरली आहे. केवळ एफ. आर. ए. प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे काही करता येत नव्हते. आता ते फायनल डिस्पोज होत आहे. असे सचिवांनी सांगितले.

एफ. आर. ए. आहे. असे असताना त्या जागेचे हस्तांतरण विभागाला कसे करता येईल ? अशी समितीने विचारणा केली असता.

फॉरेस्टचे टायटल तसेच राहील मात्र वर्ग-२ ची जमीन असल्यास त्यांना पैसे द्यावे लागतील. ज्याप्रमाणे प्रायव्हेट फॉरेस्ट ॲक्टखाली शासन डायरेक्ट पर्चेस किंवा लॅण्ड ॲक्विझिशन ॲक्ट लागू करुन लॅण्ड ॲक्वायर करतो व त्याचे कॉम्पेन्सेशन संबंधितांना मिळते, त्याप्रमाणे याबाबत कार्यवाही करावी लागेल.

जिल्हाधिकारी यांनी फॉरेस्ट डिस्पोज केले आहे. ऑर्डर्स प्राप्त होतील व एफ. आर. ए. प्रमाणपत्र मिळाले की फॉरेस्ट कॉन्झर्व्हेशनकडे फाईल ऑनलाईन मूव्ह करण्यात येईल.ल सहा महिन्यात क्लिअरन्स मिळेल. जून, २०१९ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल.केवळ घळभरणी राहिलेली आहे. इतर सर्व काम झालेले आहे. अतिरिक्त लॅण्ड ॲक्विझिशनचा प्रश्न फायनल अवार्डला आलेला आहे. सुप्रमा नसल्यामुळे विभागाने पेमेंट केले नाही. तसेच दुसरी अडचण अशी आहे की, यवतमाळ हे नॉन-बॅकलॉग असल्यामुळे म्हणावा तेवढे पैसे मिळत नव्हते. असे सचिवांनी समितीस अवगत केले.

सुधारीत प्रशासकीय मान्यता ही सर्वात महत्त्वाची आहे कारण सुप्रमा मिळाली तरच सर्व गोष्टी होणार आहेत. या सर्व गोष्टींनंतर आपण प्रकल्प व्यवहार्य आहे किंवा कसे हे ठरवतो, तो कॉस्ट बेनिफिट रेशो काय येईल, या प्रकल्पाच्या जमिनीमध्ये व किमतीमध्ये झालेल्या वाढीमुळे तो कॉस्ट बेनिफिट रेशोमध्ये बसेल किंवा कसे ?

प्रोजेक्ट मंजूर झाला त्यावेळी रेशियो काय होता? एकूण किती जमिनीचे संपादन केले जाणार आहे? असे समितीने विचारणा केली असता, १.० रेशियो असून तो व्हाएबल होता. सुरुवातीला १.११ प्रमाण होते. आता १.०८ आहे. द्वमे, २०१६ मध्ये नवीन धोरण आले. नेटवर्कने कमांड एरियामध्ये काम करीत आहोत त्यामुळे किमतीमध्ये घट झालेली आहे. २४१ हेक्टर मधून ६०हेक्टर वजा केल्यास १८० हेक्टर जमिनीचे संपादन करावयाचे असून त्या पैकी १४० हेक्टरचे भूसंपादन झालेले आहे. यामुळे भूसंपादन करण्याची आवश्यकता नाही. बंद पाईपलाईनद्वारे पाणी जाणार आहे. या नवीन धोरणामुळे ६० एकर जमीन वाचली आहे. पाईपलाईनकरिता भू संपादनाची आवश्यकता नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र. ३.५ थांबलेल्या सिंचन प्रकल्पामध्ये निधी अडकून राहणे

अभिप्राय

१२. यवतमाळ जिल्हयातील महादापूर तलाव प्रकल्पास ९३२ हेक्टर (सिंचनयोग्य लाभक्षेत्र) ओलीताखाली आणण्यासाठी रु. २३.७७ कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली (मार्च २००७). या प्रकल्पाव्दारे जिल्ह्यात आश्वासित अन्नधान्य उत्पादन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वित्तीय स्थिरता येणे अपेक्षित होते. त्यानुसार विभागाने कंत्राटदारास रु. १५.८८ कोटी किमतीवर हे काम बहाल केले. जे ३६ महिन्यांच्या कालावधीत (फेब्रुवारी २०११) पूर्ण करावयाचे होते. परंतु कामास विलंब झाला आणि जून २०११ पर्यंत कंत्राटदाराने ७० टक्के मातीधरण, १०० टक्के सांडवा, पुच्छ कालवा आणि शीर्ष विमोचकाचे काम पूर्ण केले. या कामांसाठी कंत्राटदारास रु.२८.५८ कोटी अदा करण्यात आले. जून २०११ पर्यंत या प्रकल्पावर (भूमीसंपादनासह) एकूण रु. ३४.६४ कोटी खर्च झाला. परंतु ऑगस्ट,२०११ मध्ये निर्दानास आले की, यातील १५.६० हेक्टर वनजमीन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रांतर्गत येत होती व विभागाने १८ महिन्यानंतर (मार्च २०१३) पुष्टी केली की, बुडीत क्षेत्राखाली आलेली एकूण जमीन १५२.२२ हेक्टर असून, त्यात (१५.६० हेक्टर) वनजमीन, (१३५.६४ हेक्टर) खाजगी जमीन व (०.९८ हेक्टर) सरकारी जमीन समाविष्ट होती. परंतु त्यावेळी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात (मार्च,२००७) फक्त ८७.८० हेक्टर जमीन बुडीत क्षेत्राखाली येत असल्याचे विचारात घेतले होते आणि त्यात वनक्षेत्राचा अंतर्भाव नव्हता. अशाप्रकारे प्रकल्प अहवालात ६४.४२ हेक्टर क्षेत्र कमी दर्शविले होते. माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत एकूण १३५.६४ हेक्टरपैकी १११.८९ हेक्टर खाजगी जमीन विभागाने संपादित केली होती तसेच, १५.६० हेक्टर वनक्षेत्र संपादित करण्याची कारवाई प्रगतीपथावर होती. ०.९८ हेक्टर सरकारी जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पाठविलेला होता. परंतु यादरम्यान जून, २०११ पासून प्रकल्पाचे काम थांबले असल्यामुळे कंत्राटाच्या कलम १५ अंतर्गत कंत्राटदाराने (जुलै, २०१३) काम काढून घेण्यासाठी आवेदन दिले. तथापि, माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत विभागाने कंत्राटदाराला कंत्राटीय बंधनातून मुक्त केले नव्हते. तसेच प्रकल्पाच्या किंमतीत रु. २३.७७ कोटीपासून रु. ७७.८३ कोटीपर्यंत वाढ झाली होती, जी महाराष्ट्र शासनाद्वारे ऑगस्ट, २०१६ पर्यंत मंजूर केलेली नव्हती. अशाप्रकारे, महादापूर तलाव प्रकल्पाच्या त्रुटीपूर्ण सर्वेक्षण आणि तपासणीमुळे न केवळ प्रकल्पास ६७ महिन्यांचा विलंब झाला. परंतु रु. ३४.६४ कोटीचा झालेला खर्चही अडकून पडला. याशिवाय जिल्ह्यात आश्वासित अन्नधान्य उत्पादन,पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि वित्तीय स्थिरता हे प्रकल्पापासून अभिप्रेत उद्दिष्ट देखील साध्य झाले नाही.

१२.१. महालेखाकारांनी या परिच्छेदान्वये नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून शासनाच्या एकुणच कार्यपध्दतीवर प्रनचिन्ह उभे करणारे आहेत. प्रकल्प सुरु करताना जमिनीचे सर्वेक्षण व आवयक ते भूसंपादन हे नियोजनाचा मूलभूत व प्राथमिक भाग असताना विभागाने हे सर्वेक्षण व नियोजन सदोषरित्या केल्यामुळे या सर्व अडचणी आता उद्‌भवलेल्या आहेत. यातही अधिक गंभीर बाब म्हणजे सदरहु प्रकल्पासाठी प्राासकीय मान्यता रु. २३.७७ कोटीची असताना विभागाने सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता रु. ७७.८३ कोटी खर्च केले. सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी वेळ लागतो, परंतु चालू आर्थिक वर्षामध्ये जर प्रकल्पासाठी निधी उपलब्ध आहे तर तो खर्च करण्याच्या उद्देाने व प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याच्या हेतूने काही प्रकरणांमध्ये अशाप्रकारे कारवाई करण्यात येत असल्याचे विभागाचे म्हणणे अत्यंत आक्षेपार्ह असून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारे आहे. समितीने यावर तीव्र आक्षेप नोंदवित ही सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी २-३ महिन्याचा नव्हेतर तब्बल ५-६ वर्षाचा कालावधी गेलेला आहे, हे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. मुळातच कोणत्याही मान्यतेविना शासनस्तरावरुन काम करण्याच्या पध्दतीचे समिती कोणत्याही प्रकारे समर्थन करु शकत नाही. सुधारीत प्रशासकीय मान्यता घेवूनच विभागाने ही कामे करणे अभिप्रेत व बंधनकारक आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये अपरिहार्यरित्या व अत्यंत सार्वजनिक महत्वाच्या प्रकरणी जर विभागाला सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता एखादे काम करणे अनिवार्य व अपरिहार्य असेल तर नजिकच्या कमीत कमी कालावधीत ही सुधारीत प्रशासकीय मान्यता विभागाने घेणे बंधनकारक व अपेक्षित आहे. परंतु तसे न करता अमर्याद कालावधीसाठी ही सुधारीत प्राासकीय मान्यता प्रलंबित ठेवणे आक्षेपार्ह आहे. समिती या कार्यपध्दतीवर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

१२.२. सदरहू बुडीत क्षेत्रातील वन जमिनीवर सद्यःस्थितीत स्थानिक शेतक-यांची वहिती असल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या अंमलबजावणीबाबत तालुका झरीजामणी येथील १४ वैयक्तीक वन हक्क दाव्याचे मुळ पट्टे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे भूसंपादनाची कारवाई विभागाच्या स्तरावरुन करण्यात येणार असलेबाबत

समितीसमोर सांगण्यात आले. परंतु आता माहे मे, २०१६ मध्ये शासनाने अवलंबिलेल्या नविन धोरणामुळे भूसंपादनाची आवयकताच राहिलेली नसून बंद पाईप लाईनद्वारे पाणी जाणार आहे. त्यामुळे ६० एकर जमिनीची आता आवयकता राहिलेली नाही व पाईप लाईनकरिता भूसंपादनाची आवयकता नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. या परिच्छेदामध्ये अधिक गंभीर मुद्दा हा विभागाने केलेल्या दोषपुर्ण सर्वेक्षणाचा आहे. या प्रकल्पात बुडीत क्षेत्राखाली आलेली एकूण जमीन १५२.२२ हेक्टर असताना विभागाने फक्त ८७.८० हेक्टर जमीनच विचारात घेतली व त्यातही वनक्षेत्राचा अंतर्भाव नव्हता, जो प्रकल्प सुरु असताना निदर्शनास आला. हा सर्व घटनाक्रम या प्रकल्पाच्या झालेल्या सर्वेक्षणाची वैधता व विश्वासार्हताच आक्षेपित करते, ज्यामुळे प्रकल्पाच्या अंदाजित व प्रशासकीय मान्यतेच्या खर्चात मोठा प्रमाणात वाढ झाली. सदरहू प्रकल्पाचे आता ७० टक्के काम पूर्ण होवून सद्यःस्थितीत बंद पडलेले आहे व कोटावधीचा निधी यात गुंतून पडलेला तर आहेच, परंतु या प्रकल्पाचा अंदाजित खर्च देखील आता रु. ९१.५९ कोटीपर्यंत पोहोचला असून आवश्यक त्या जमिनीचे अधिग्रहण देखील झालेले नाही. या प्रकल्पाच्या कामात केलेल्या अनियमिततेबाबत व चूकीच्या सर्वेक्षणाबाबत संबंधित अधिका-यांवर दि.२८/११/२०१४ च्या आदेशान्वये विभागाने दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी सुरु केली. परंतु सविस्तर चौकीसाठी चौकशी अधिका-याची नेमणूक मात्र दि. १६/१/२०१८ च्या आदेशान्वये म्हणजेच समितीची साक्ष लागल्यानंतर करण्यात आली ही बाब देखील अतिशय गंभीर आहे. विभागीय चौकाशीसंदर्भातील म्यॅन्युअलमध्ये विभागीय चौकशी ६ महिन्यात पुर्ण करणे बंधनकारक असताना अशा गंभीर प्रकरणाच्या चौकशा ५ ते ६ वर्षे प्रलंबित ठेवल्यामुळे दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास अमर्याद विलंब होतो. दरम्यानच्या कालावधीत त्या कर्मचारी, अधिका-यांची पदोन्नती होते अथवा ते सेवानिवृत्त वा मृत होतात. दोषी अधिका-यांवर कारवाईमध्ये विलंब करुन विभाग अधिका-यांना चौकाशीतून पळवाट काढण्याची संधी उपलब्ध करुन देतात असे म्हटले तरी वावगे ठरणारे नाही. पाच-पाच वर्षे विभाग अधिका-यांच्या चौकशींमध्ये कोणत्याही निष्कर्षाप्रत येत नाही. याचाच अर्थ यात अधिका-यांमध्ये संगनमत असल्याचे व दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास विभाग गंभीर नाही हे निश्चितच सिध्द होते.

शिफारस

१२.३. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका १९८४ च्या परिच्छेद २५१ नुसार संबंधित नागरी अधिका-याने जमिनीचा पुर्ण ताबा घेतल्याशिवाय जमिनीवर कोणतेही काम सुरु करु नये तसेच, जेव्हा कामाच्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत. परंतु त्या कामासाठी लागणारी जमिन अद्याप संपादीत करण्यात आली नसेल तर अशा प्रकरणात काम सुरु करावयाचे आदेश जारी करण्यापुर्वी जमिन संपादनासाठी लागणारा कालावधी संबधित जिल्हाधिका-याकडुन निश्चित करुन घ्यावयास पाहीजे अशी सुस्पष्ट तरतूद असताना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणा-या जमिनीची कोणतीही शहानिशा न करता सदरहु काम केल्यामुळे हे काम आजतागायत पुर्ण होऊ शकले नाही. प्रकल्प सुरु करताना जमिनीचे सर्वेक्षण व त्यासाठी आवयक ते भूसंपादन हा प्रकल्पाच्या नियोजनाचा मूलभूत व प्राथमिक भाग असताना हे सर्वेक्षण व नियोजन सदोषरित्या करण्यात आले. वन जमिनीचा प्रस्ताव विभागामार्फत दि.१०/१/२०१२ रोजी सादर करण्यात आला. परंतु वनीकरणासाठी योग्य पर्यायी जमीन उपलब्ध न झाल्याने, याकरिता दोन ते अडीच वर्षाचा कालावधी लागला. ऑनलाईन वन प्रस्ताव सादरीकरणासाठी राखीव वनक्षेत्र (FRA) प्रमाणपत्राची आवयकता असून सदर प्रमाणपत्र स्थानिक शेतक-यांचा वनजमीनीवर असलेला दाव्याचा प्रश्न निकाली न निघाल्याने प्राप्त होऊ ाकले नाही. सद्यःस्थितीत प्रकल्पाच्या किंमतीमध्ये रु. २३.७७ कोटी वरुन रु. ९१.५९ कोटी एवढी वाढ झालेली आहे. सदर वाढ प्रामुख्याने दरसूचीमध्ये झालेली वाढ, संपादीत करावयाच्या खाजगी क्षेत्र व दरामध्ये झालेली वाढ तसेच खाजगी जमीनीची १०३.८० हेक्टर वरुन १६३.६१ हेक्टर पर्यंतची वाढ, सरकारी जमीन ०.९८ हेक्टर व १५.६० हेक्टर वनक्षेत्रातील वाढ त्याचप्रमाणे धरण व ओगी सांडव्याच्या संकल्पनातील बदलामुळे वाढ झालेली आहे. प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्राासकीय मान्यता प्रस्ताव रु.९१.५९ कोटीचा त्रिसदस्यीय समितीस सादर आहे. वनजमीनीचा प्रस्ताव उप-वन संरक्षक यांचेकडे यापूर्वीच सादर झालेला असून सदर प्रस्ताव महसूल व वन खाते यांचे अंतर्गत असलेल्या राखीव वनक्षेत्र (FRA) दाव्यासंबंधी निकाली न निघाल्याने वन प्रस्ताव प्रलंबित आहे. आता प्रकल्पाकरिता आवयक सुधारीत प्राासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता व वन प्रस्तावाची मान्यता प्राप्त करुन प्रकल्पाचे काम जून, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे व सर्वेक्षणात दुर्लक्षतेबाबत क्षेत्रिय अधिका-यांवर कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

१२.४. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात वन जमिन येत असल्याबाबतची शहानिशा करण्याची जबाबदारी ही विभागाचीच होती व विभागाने ती योग्यरित्या पार पाडली नाही. परिणामी विभागाच्या दोषपुर्ण सर्वेक्षण व अन्वेषणामुळे प्रकल्पाच्या मुळ किंमतीमध्ये रु.२३.७७ कोटीहून रु. ९१.५९ कोटी इतकी वाढ झाली आहे. एवढे करुनही प्रकल्पाचे काम अद्यापही अपूर्णच असून लाभधारक

प्रकल्पाच्या लाभापासून वंचित आहेत व जिल्ह्यात आश्वासित अन्नधान्य उत्पादन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि वित्तीय स्थिरता हे प्रकल्पासून अभिप्रेत उद्दिष्ट देखील साध्य करता आले नाही. तसेच या प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता रु.२३.७७ कोटी असताना विभागाने सुधारीत प्रशासकीय मान्यता न घेता रु. ७७.८३ कोटी खर्च केले ही देखील गंभीर बाब असून वित्तीय नियमांचे व आर्थिक शिस्तीचे उल्लंघन करणारी आहे. सद्यःस्थितीत प्रकल्पावर झालेला कोट्यावधी रुपयांचा खर्च अनेक वर्षापासून अडकून पडलेला आहे. प्रकल्पाचे काम सुरु करण्यापूर्वी विभागाच्या अधिका-यांनी पुर्ण संचय पातळीचे सर्वेक्षण केलेले नाही. त्यामुळे वनक्षेत्राची शहानिशा झालेली नसल्याने संबंधितांवर खातेनिहाय चौकशी सन २०१४ मध्ये सुरु करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु चौकशी अधिका-याची नेमणूक दि.१६/१/२०१८ रोजी म्हणजेच समितीची साक्ष लागल्यानंतर करण्यात आली ही तर बाब अक्षम्यच आहे. पाच-पाच वर्षे विभाग अधिका-यांच्या चौकशीमध्ये कोणत्याही निष्कर्षाप्रत येत नाही व त्या अधिका-यांना पदोन्नती घेण्याची वा सेवानिवृत्त होण्यास संधी प्राप्त करुन देते, याचाच अर्थ यात अधिका-यांमधील संगनमत स्पष्ट होते व दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यास विभाग गंभीर नाही हे देखील दिसून येते. समिती विभागाच्या या कार्यपध्दतीवर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

१२.५. यवतमाळ जिल्हयातील महादापुर तलाव प्रकल्पाच्या त्रुटीपुर्ण सर्व्हेक्षण आणि तपासणीमुळे न केवळ प्रकल्पास ६७ महिन्यांचा विलंब झाला, परंतु त्यावर केलेला रु. ३४.६४ कोटी खर्च देखील जून, २०११ पासुन अडकुन पडलेला आहे. तसेच यावर ऑगस्ट, २०१६ पर्यंत रु. ७७.८३ रुपये झाले. मात्र प्रकल्प पूर्ण आला नाही. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाने या संपुर्ण प्रकरणी जबाबदार असणा-या सर्व अधिकारी/कर्मचा-यांवर तात्काळ कारवाई करावी तसेच हा प्रकल्प तातडीने पुर्ण करुन पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी व त्याअनुषंगाने अपेक्षित सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी आवश्यक ते संपुर्ण नियोजन करुन हा प्रकल्प तातडीने पुर्ण करुन कार्यान्वित करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी आी समितीची शिफारस आहे.

जलसंपदा विभाग

१३. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.६ **"कंत्राटदाराकडून कमी वसूली"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्र. ३.६ कंत्राटदाराकडून कमी वसूली

सुसज्जता अग्रिमावर चुकीचे व्याज दर आकारल्यामुळे कंत्राटदाराकडून रु. ०.८७ कोटीची कमी वसुली झाली.

विदर्भ सिंचन विकास महामंडळ (VIDC) नागपुर ने येरळी, बुलढाणा येथील १३२/३३ KV सबस्टेान आणि इतर संबंधित कामे ५२ एका संयुक्त उपक्रम संस्थेस ५३ रु.१४७.८१ कोटी किंमतीवर बहाल केले. (जुलै २००९). हे काम जुलै २०१२ पर्यंत पुर्ण करावयाचे होते. हे काम अजुनही प्रगतीपथावर आहे (डिसेंबर २०१६) आणि जुलै २०१३ पर्यंत (८ व्या चालू लेखा देयका पर्यंत) संस्थेला रु. ५६.२४ कोटी अदा करण्यात आले होते. निधीच्या कमतरतेमुळे आणि प्रकल्पावरील तृतीय पक्षीय निरीक्षण अहवाल प्राप्त न झाल्यामुळे जुलै २०१३ नंतर कंत्राटदाराला अदायगी करण्यात आली नाही.

VICD, नागपूर ने प्रकल्पस्थळी यंत्रे व संयंत्रे सुसज्ज करण्यासाठी आणि मनुष्यबळ पुरविण्यासाठी संस्थेस रु. १४.७८ कोटी (निविदा किंमतीच्या १० टक्के) पर्यंत सुसज्जता अग्रीम देण्यासाठी संस्थेसोबत करार केला(ऑक्टोबर २००९). करारानुसार अग्रीमावर देय असलेले व्याज राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रचलित मुळ कर्जदर (PLR) अधिक ०.२ टक्के प्रमाणे चक्रवाढ पध्दतीने देयकांमधुन व्याज वसुल करावयाचे होते. ऑक्टोबर २००९ ते डिसेंबर २००९ दरम्यान VIDC, नागपूर ने कंत्राटदारास रु. १३.८५ कोटी सुसज्जता अग्रीम संवितरीत केले होते. कार्यकारी अभियंता, मून प्रकल्प विभाग, खामगांव (विभाग) यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत (ऑगस्ट - २०१४) असे आढळले की कंत्राटदाराकडून व्याजाची वसुली करताना विभागाने सुसज्जता अग्रिमाच्या शिल्लक रक्कमेवर १२.२५ टक्के अधिक ०.२ टक्के (१२.४५ टक्के) या स्थिर दराने व्याज परिगणित केले होते, जेव्हा की हे दर ऑक्टोबर २००९ ते जुलै २०१३ दरम्यान PLR जे ११.७५ टक्के ते १४.७५ टक्क्यापर्यंत बदलत होते, त्या अनुसार काढावयास पाहिजे होते. यामुळे २९ ऑक्टोबर २००९ ते ०२ जुलै २०१३ (८ वे चालू लेखा देयक) दरम्यान कंत्राटदाराकडून रु. ०.८७ ५४ कोटी कमी व्याज वसुली झाली. याशिवाय, सुसज्जता अग्रिमावर ०३ जुलै २०१३ ते ३० जून २०१६ या कालावधीसाठी रु. ५.१२ कोटी व्याजाचे दायित्व होते.

VIDC , नागपूर ने नमूद केले (नोव्हेंबर, २०१५) की सुसज्जता अग्रिम बहाल करते वेळी राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रचलित घ्ब्ङ नुसार, जे १२.२५ टक्के अधिक ०.२ टक्के होते, व्याज आकारावयाचे होते. म्हणून, वसुली १२.४५ टक्के दराने करण्यात आली, जी बरोबर होती.

उत्तर वास्तविकतः बरोबर नाही कारण करारानुसार व्याज आकारताना त्या महिन्यात प्रचलित असलेले PLR दर विचारात घ्यावयास पाहिजे होते, न की ते दर जे अग्रिम प्रदान करताना प्रचलित होते.

ही बाब शासनास कळविण्यात आली (मे २०१६), डिसेंबर २०१६ पर्यंत त्याचे उत्तर प्रतीक्षीत होते.

महालेखापाल यांचा परीक्षण शेरा :-

सुसज्जता अग्रीम मंजुर करते वेळी करण्यांत आलेल्या करारनाम्यामध्ये कोणता प्रचलित पी.एल.आर. घेण्यांत यावा याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. राष्ट्रीयकृत बँकेचा पी.एल.आर. वेळोवेळी बदलत असल्या कारणाने व्याज वसुल करतेवेळीचा पी.एल.आर. ने वसुली करावयास पाहीजे होती. तसेच दि. ३ जुलै २०१३ ते दि. ३० जुन २०१६ या कालावधीमध्ये सुसज्जता अग्रीमावर वसुल करावयाचा रु. ५.१२ कोटी एवढया व्याजाबाबत विभागाने काहीही स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे विभागाने सादर केलेले उत्तर मान्य नाही. सदर वसुलीचा सद्यःस्थितीचा अहवाल कागदपत्रीय पुराव्यासह सादर करावा.

ज्ञापन :

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात जलसंपदा विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम क्र. २६/१९९७ च्या कलम १९ (आय) नुसार कंत्राटदारास सुसज्जता अग्रिम मंजूर करण्यांत आले आहे. महामंडळाचे पत्र क्र. ५३३७ दिनांक २४.८.२००९ नुसार रु.१४७८.०६ लक्ष अग्रीम मंजूर केलेले आहे. या पत्राच्या ज्ञापनातील अट क्र.३ नुसार (Irrevocable bank guarantee from Nationalised/Schedule bank for the amount of principal with interest for a suitable period shall be obtained from the contractoru) कंत्राटदाराकडून रु. २३,३६,००,००० ची बँक गॅरंटी घेण्यांत आलेली आहे. अग्रीमावरील व्याजाची रक्कम काढतांना त्यावेळेचा बँकेचा प्रचलित व्याजदर अधिक ०.२% या प्रमाणे व्याज दर निश्चित कालावधीसाठी घेण्यांत आला आहे. त्यामुळे व्याजाच्या रकमेची वसुली कार्यकारी अभियंता मन प्रकल्प विभाग, खामगांव व कंत्राटदार यांचे करारनाम्यानुसार करण्यांत आली आहे. दिनांक २४.८.२००९ च्या ज्ञापनातील अट क्रमांक ३ नुसार अग्रीमावरील व्याज दर हा अग्रिमाच्या करारनाम्याच्या वेळेचा बँकेचा प्रचलित व्याज दर असून लेखा परीक्षकांनी परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे वेळोवेळी बदलणारा व्याज दर अपेक्षित नाही .

या अभिप्रायास अनुसरुन सदर परिच्छेद वगळण्यांत यावा ही विनंती.

महालेखापाल यांच्या परीक्षण शे-यावरील शासनाचे अभिप्राय :-

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या दि. २९/०८/२००९ च्या ज्ञापना नुसार कंत्राटदारास रु. १३.८५ कोटी सुसज्जता अग्रीम अदा करण्यांत आलेला आहे. महामंडळाचे आदेशाप्रमाणे सदर सुसज्जता अग्रीमावर १२.२५ टक्के + ०.२० टक्के = १२.४५ टक्के कायम व्याज दर आकारण्यांत आला आहे.

आतापर्यंत १२ वे चालू देयक दि.१२/०५/२०१७ पर्यंत कंत्राटदाराकडून रु. ११.१७ कोटी सुसज्जता अग्रीम व रु. ११.०० कोटी सुसज्जता अग्रीमावरील व्याज याप्रमाणे एकूण रु. २२.१७ कोटी रक्कम वसूल करण्यांत आली आहे.

दि. ३० सप्टेंबर २०१७ रोजी शील्लक रक्कम रु. २.८० कोटी (मूळ अग्रीम रु. २.६८ कोटी अ व्याज रु. ०.१२ कोटी) कंत्राटदाराचे पुढील चालू देयकामधून वसूल करण्यांत येईल.

दि. ३जुलै २०१३ ते ३० जून २०१६ या कालावधीमधे सुसज्जता अग्रीमावर व्याजाची गणना महालेखापाल हयांचे म्हणण्यानुसार रु. ५.१२ कोटी होत नसून त्याऐवजी रु. ४.८८ कोटी एवढी होत आहे व व्याजाची रक्कम कंत्राटदाराचे चालू देयकामधून वसूल करण्यांत आलेली आहे.

साक्ष :

परिच्छेद क्र. ३.६ कंत्राटदाराकडून कमी वसूली

१४. सुसज्जता अग्रिमावर चुकीचे व्याज दर आकारल्यामुळे कंत्राटदाराकडून रु. ०.८७ कोटीची कमी वसुली झाली. विदर्भ सिंचन विकास महामंडळ (VIDC) नागपूर ने येरळी, बुलढाणा येथील १३२/३३ KV सबस्टेान आणि इतर संबंधित कामे एका संयुक्त उपक्रम संस्थेस रु. १४७.८१ कोटी किंमतीवर बहाल केले. (जुलै २००९) हे काम जुलै, २०१२ पर्यंत पुर्ण करावयाचे होते. हे काम असूनही प्रगतीपथावर आहे (डिसेंबर, २०१६) आणि जुलै, २०१३ पर्यंत (८ व्या चालू लेखा देयका पर्यंत) संस्थेला रु. ५३.२४ कोटी अदा करण्यात आले होते. निधीच्या कमतरतेमुळे आणि प्रकल्पावरील तृतीय पक्षीय निरीक्षण अहवाल प्राप्त न झाल्यामुळे जुलै २०१३ नंतर कंत्राटदाराला अदायगी करण्यात आली नाही याबाबत खुलासा करावा असे समितीने सांगितले असता, महालेखापालांचे असे म्हणणे आहे की, दि. २९ ऑगस्ट २००९ मध्ये करार करण्यात आला होता, त्यावेळी फ्लोटींग रेट ऑफ इंटरेस्टट न लावता फिक्स इंटरेस्ट दर का लावण्यात आला. करारामध्ये प्रिव्हेलिंग रेट ऑफ इंटरेस्ट असे नमूद केले होते. या बाबत विभागाचा असा खुलासा आहे की, ज्यावेळी करार झाला त्या वेळी जे दर होते ते आकारण्यात यावे. आतापर्यंत पाटबंधारे विभागातर्फे झालेल्या कोणत्याही प्रोजेक्टकरिता फ्लोटींग इंटरेस्ट रेट लावण्यात आलेले नाही. महालेखापांलानी या बाबत मुद्दा उपस्थित केला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१६ में जब यह पॅरा लिया गया था, उस वक्त प्रिवेलिंग के बारे में ऐसा बताया गया था कि हमारा फ्लोटींग रेट होना चाहिए. तब तक तो विभाग ने कुछ नहीं कहा, लेकिन अब यह पॅरा पीएसी के सामने आ गया है. अब विभाग निर्णय ले रहे है कि यह रेट फिक्स होना चाहिए. क्या यह केवल ए. जी. पॅरा का डिस्पोजल दिखाने के लिए ही तो नहीं है ? असे महालेखाकार यांनी सांगितले.

पिछले १५-२० साल में एक भी प्रोजेक्ट में फ्लोटींग ब्याज लगाया होता, तो फिर यह आर्ग्यूमेंट आ सकता था कि विभागद्वारे फ्लोटींग को डिफेन्ड करके फिक्स में डिफेन्ड कर रहे हैं, लेकिन आज तक पूरे राज्य में एक भी ऐसा केस नहीं है जहां पर कभी भी फ्लोटींग ब्याज लिया हो. इसलिए इसमें भी विभागाने फ्लोटींग ब्याज नहीं लिया है. पूरे राज्य में ऐसा एक भी उदाहरण नहीं है असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अकाऊंट्स की गाइडलाइन क्या कहती है ? २० साल में जलसंपदा विभाग ने कुछ नहीं किया, विभाग महाराष्ट्र शासन के अंडर काम करता है. वित्त विभाग ने बताना चाहिए कि गव्हर्नमेंट की सिस्टिम क्या है ? वित्त विभाग का क्या कहना है, फाइनानियल सिस्टिम क्या है ? ऐसा तो नहीं हो सकता कि इनका विभाग डिसाईड करेगा कि हमारे विभाग में क्या होना चाहिए आी विचारणा समितीने केली असता, महाराष्ट्र शासनाचे सन १९८१ चे परिपत्रक आहे. त्यात असे नमूद आहे की, "The Advance shall bear prevailing Bank Rate of Interest and shall be recoverable in suitable instalments." त्यावेळी फ्लोटींग इंटरेस्ट रेट चा कोणताही कन्सेप्ट नव्हता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इरिगेशन प्रोजेक्टमध्ये ॲडव्हान्स देण्याची पद्धत सन २००४-२००५ या वर्षापासून सुरु झालेली आहे. विभागाच्या करारात असे नमूद केले पाहिजे की, "Prevailing Bank Prime Lending Rate at the time of Agreement or Disbursement of the amount.' बेनिफिट ऑफ डाऊट जलसंपदा विभागाने घेतला पाहिजे असे समितीने सूचित केले.

ॲडव्हान्स देण्याची पद्धत सन १९८१ पासून सुरु आहे. तेव्हाचे सर्क्युलर आहे. ज्या वेळी करार केला त्या वेळी कोणता दर प्रिव्हेल करत होता, त्याच कालावधीमध्ये त्याच महिन्यात जिगाव प्रकल्पाचे काम देखील सुरु होते. त्या करिता ९ टेंडर काढले होते त्यापैकी ८ टेंडरमध्ये फ्लोटींग इंटरेस्ट द्वरेट लावण्यात आला असता तरर १.४ कोटी रुपये रिफंड करावे लागले असते. या ठिकाणी ८७ लाख रुपये प्राप्त होत आहेत. त्यामुळे ६० लाख रुपयांचे नुकसान झाले असते. राज्यात असा एकही प्रकल्प नाही जेथे फ्लोटींग रेट ऑफ इंटरेस्ट लावण्यात आला असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मान लीजिए कि प्रिवेलिंग लिखा ही नहीं होता तो जिस दिन का एग्रीमेंट है उसी दिन का रेट लगता. तो फिर प्रिवेलिंग लिखा ही क्यों है ? असे महालेखाकारांनी विचारले असता, हम ८७ लाख रुपये की रिकवरी करेंगे तो हमें १.४ करोऱ रुपये सेम पीरिएड का, सेम प्रोजेक्ट का पॅरेलर एजेन्सी को रिफंड देना पऱेगा, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

मई २०१७ तक रुपये १२ लाख ४० हजार विभागको उनसे ब्याज के लेना है. समिती जैसा बता रही है वैसा विभागाने रेट लगाया तो २ करोऱ ८० लाख ६६ हजार ९५८ रुपये विभागको उनसे लेना है. विभाग जो लॉस बता रहे है, वह लॉस नहीं है. ही आकडेवारी समितीकडे आहे. १२ लक्ष ४० हजारर रुपयांऐवजी २ कोटी ८० लाख रुपये विभागाला अधिकचे प्राप्त झाले असते. २ कोटी ६८ लाख रुपयांचा फरक आहे. १ कोटी ४४ लाख रुपये द्यावे लागले असते. २ कोटी ८० लाख रुपये त्यांच्याकडून घ्यावे लागले असते. यामुळे विभागाला फायदाच झाला असता असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यासंदर्भात राज्यात कोणताही एक प्रोजेक्ट नाही जेथे फ्लोटींग रेट ऑफ इंटरेस्ट लावण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

करारामधील अनुक्रमांक १७ वर असे नमूद आहे की, "The Contractor hereby agrees with VIDC and undertakes that in the event of any type of delay in starting of the work or slow down of the work or total stoppage of the work or for any other ground, the recovery of an advances and interest thereupon shall not be deferred. Further no request for exemption or rebate will be made by the Contractor nor such demand will be entertained by VIDC." ५० टक्के काम झाल्याने त्यांचा ॲडव्हान्सस प्राप्त होणे आवयक होते. ॲडव्हान्सची रक्कम प्राप्त न झाल्यास २ टक्के पेनल्टी लावणे गरजेचे होते. मात्र विभागाने तसे केले नाही. Clause 2 reads as, “In the event of Contractor’s default in payment

of installment/interest due or in clearing interest at 2% p.a....." २ टक्के पेनॉल्टी आकारण्यात येणार आहे काय? अशी विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी ५० टक्के पर्यंत रिकव्हरी करावी असे समितीचे म्हणणे आहे. मात्र पूर्ण ५० टक्के काम झालेले नसून आतापर्यंत ४३ टक्के काम झालेले आहे असे समितीस अवगत केले.

काम झाले की नाही हा वेगळा मुद्दा आहे. करारातील नियम क्र. १७ नुसार त्यांनी पेमेंट करणे आवश्यक होते. विभागाने २ टक्के पेनल्टी आकारणे आवश्यक असताना ती आकारलेली नाही. विभागाच्या पातळीवर अकाऊंटसद्व ऑफिसर असतो. ही सर्व त्याची जबाबदारी आहे. विभागाने २ टक्के पेनॉल्टी लगेच वसूल करावी, असे समितीने निदेश दिले. यासंदर्भात विभागाने केलल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल समितीला सादर केला आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे मा. लोक लेखा समिती यांचे निर्देशानुसार अस्थिर व्याज दराने (Floting Rate) + ०.२ टक्के परिगणनाप्रमाणे मुद्दल रक्कम रू. २.५९ कोटी व व्यात रू. २.७३ कोटी (३१ डिसेंबर, २०१७ अखेर) अशी एकूण रू. ५.३२ कोटी इतकी येत आहे. तसेच अग्रिम व व्याजावर २ टक्के अद्यावत दंडनीय रक्कम रू. ४.४६ कोटी परिगणित होत आहे. संबंधीत वसुलीच्या अनुषंगाने कार्यवाही करीत असतांना, संबंधीत कंत्राटदाराने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका दाखल केली आहे. (रिट याचिका क्र. ३३९/ २०१८).

मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १९-०१-२०१८ च्या आदेशानुसार, याचिकाकर्त्यास (कंत्राटदारास) रू. ८७.०० लक्ष इतकी रक्कम ठेव स्वरूपात प्रतिवादीकडे (महामंडळाकडे) एका आठवड्यात जमा करावी व ठेव रकमेच्या आधिन राहून पुढील सक्तीची वसुली करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. या अनुषंगाने कंत्राटदाराने धनादेश स्वरूपात दिनांक २५/०१/२०१८ रोजी रू. ८७.०० लक्ष रक्कम जमा केली आहे. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार सद्यःस्थितीत पुढील वसुली करता आली नाही. विवरण क्रमांक १५.

अभिप्राय व शिफारशी :

परिच्छेद क्र. ३.६ कंत्राटदाराकडून कमी वसूली

अभिप्राय

१५. विदर्भ सिंचन विकास महामंडळ, (VIDC) नागपूर ने येरळी, बुलढाणा येथील १३२/३३ KV सबस्टेशन आणि इतर संबंधित कामे एका संयुक्त उपक्रम संस्थेस जुलै, २०१२ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीसह रू. १४७.८१ कोटी किंमतीवर बहाल केले. परंतु, हे काम सन २०१६ पर्यंत पूर्ण झालेले नसतानाही जुलै, २०१३ पर्यंत (८ व्या चालू लेखा देयकापर्यंत) संस्थेला रू. ५६.२४ कोटी अदा करण्यात आले. निधीच्या कमतरतेमुळे आणि प्रकल्पावरील तृतीय पक्षीय निरीक्षण अहवाल प्राप्त न झाल्यामुळे जुलै, २०१३ नंतर कंत्राटदाराला अदायगी करण्यात आली नाही.

वरील प्रमाणे पहाता मऊ रबडाचे स्वोदद्रव्यमान वाढ झालेली आहे. वरील प्रमाणे वाढीव परिमाणानुसार - तीनिदेवस रु. ३०,६५,८५,०१०/- इतके दायित्व होते.

३.०/- वरील प्रमाणे मऊ रबडातील स्वोदद्रव्यमान झालेली वाढ बघता ठेकेदाराने इलम-३८ अंतर्गत वाढीव दराने सांचे पत्र क्र. ११३/०९ नुसार मागणी केली आहे. तसेच तीनिदेशनीय घटी व दानी नुसार - इलम-३८ अंतर्गत येते मुंगलान झाले आहेत. म्हणून इलम-४५ मध्ये तीनिदा दिलेले आहेत. म्हणून तीनिदेशनीय एकूण स्वोदद्रव्याच्या (Soft + Hard plasta) १२५% ~~पर्यंत~~ परिमाणापर्यंत - ठेकेदारास तीनिदा दराने मुंगलान इतरे बंधनकारक आहे. म्हणजेच तीनिदेशनीय एकूण परिमाण - २४०५e३० x १.२५ = ३००६३१२ पर्यंत स्वोदद्रव्य होई पर्यंत इलम-३८ अंतर्गत नवीन दर देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

४.०/- तसेच वरील प्रमाणे वाढीव परिमाण मुळे -

कार्यालयीन टिप्पणी क्र. दि. / / पृष्ठ क्र.

विषय :-

दावेदार कर्मचारी
1. [illegible]
2. [illegible]
3. [illegible]
4. [illegible]
दिसले नाही

तिने सेवेच्या ३० वर्षांत रु. ३८,७२,८५,९७०/- इतक्या दायित्वाचे मूल्यांकन केलेले आहे. व त्यानुसार सदर दायित्वास मंजुरी प्रदान करण्याबाबत विचारले होती आहे.

सदरी दर्शित प्रमाणे विवेचन पाहता दायित्वाच्या मूल्यांकनाची मान्यता घेण्याचे दृष्टीने खालील विचारार्थ सादर.

(illegible)

(illegible)

१) परिच्छेद २.० मध्ये नमूद केल्यानुसार ३०,०६,४१२ वर्षांची खोदकाम होईपर्यंत ५७०३८ क्युबिक दर देण्यात आला. प्रश्न उपस्थित नाही.

मु.अ.यांनी मंजूर खडकाचे दर अधिक ३०,०६,८५,००२ इतके दायित्व कमी केलेली आहे. या दायित्वामध्ये मंजूर खडक वजा जाता खोदकाम याचा दर ~~[illegible]~~ दायित्व काढणे अपेक्षित होते.

प्रत्यक्ष दायित्व खालील प्रमाणे येते.

मु.अ.यांनी प्रस्तावित केलेले दायित्व → ३० ०६ ८५००२

वजा (२००८६८६ X ६४.५७) =

= १३,४२,२७२७६

वाचवर १६.२० रुपये अधिक दराने किंमत = - ९५१६६८९३

= ९४,०४,८६०८६

प्रत्यक्ष दायित्व ९४,०४,८६,०८६ रुपये येत असून हे दायित्व अपरिहार्य व स्वाभाविक असल्याचे मु.अ.यांनी प्रमाणित केलेले नाही.

दुरीना मूर्तीप्रतिष्ठादी मु.अ.यांना

कळवावे असे वाटते

कार्यकारी संचालक

अ.अ.

* - काम हलवावे
- तोपर्यंत वाहतूक मार्गिका
- रस्ता बंद ठेवण्याचे दायित्व
- रस्त्याची देखभा दुरुस्ती आणि पर्यावरणसंबंधित घेता येईल.

पूर्वी दर्शविल्याचे दायित्व → (२०७८७८७ − ४६१६७) × (१२६.९५ − ६४.५७) × १.९२ × १.२५
→ (२०७८७८७ − ५७७०४) × ७४.३८
→ २०२१०७९ × ७४.३८ = १५०२४७४३०

कार्यालयीन टिप्पणी क्र. दि. / / पृष्ठ क्र.

विषय :-

महोदय,

आदेशान्वये मा. मेघराज यांचे मान्यतेसाठी कागद ठेवण्याची
आहे. यादीचा सोबत अहवाल व मान्यतेकडे जावा.

(1) [illegible]
पडीत

मा. Praveen
Collector

का. अ.

उ. अ. 91/2/10

मा. जि.स.

कलम 38 मधील कार्यवाही
पूर्ण झालेली नाही
कार्यवाही करावी
तसेच ई. अधिकार सर्व रजिस्टर करावा.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,

कार्यालयीन टिपणी

विपाविम/कातां.७/ २०४
दिनांक : २३/०३/०९

विषय :- वासनी मध्यम प्रकल्प : ता.अचलपूर, जि.अमरावती प्रकल्पाचे जलोत्सारणी मातीकाम व मुख्य विमोचकाचे बांधकाम. ब-१ निविदा. कलम-३८ अंतर्गत दायित्व प्रस्ताव मंजुरीबाबत.

(३१) संदर्भ :- मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे पत्र क्र. १४७६/लेशा/आ.दा./वासनी/२००९, दिनांक २६.३.२००९.

महोदय,

१.० वासनी मध्यम प्रकल्प योजनेच्या जलोत्सारणी मातीकाम व मुख्य विमोचकाचे बांधकाम या कामाची रु.१००६४.६५ लक्ष किंमतीची निविदा १९.२० टक्के अधिक दराने स्विकृत झालेली आहे. (करारनामा क्र. ब-१/२४/डिएल/२००८-०९) सदर काम मे. एफ.ए.कन्स्ट्रक्शन, मुंबई या अभिकरणामार्फत सुरु आहे.

२.० विषयांकित योजनेच्या निविदेतील बाब क्र.२ मऊ खडकातील खोदकामामध्ये प्रत्यक्ष आढळलेल्या भुस्तराच्या वर्गीकरणामुळे वाढ झाल्यामुळे मुख्य अभियंता यांनी कलम-३८ अंतर्गत रु.११९०.१८ लक्षाचे दायित्वाचे प्रस्ताव शिफारशीसह मंजुरीकरिता सादर केलेला आहे. (परिशिष्ट-१)

३.० वाढ झालेल्या परिमाणास कलम-३८, अंतर्गत मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी ९३०/निली/वासनी बु/कलम-३८, दिनांक २६.२.२००९ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. मऊ खडकातील खोदकाम या बाबीचे कलम-३८ खाली एकूण रु.२५७५.६५ लक्ष चे दायित्व प्रस्तावित आहे, त्यामधुन माती व माऊ मुरुम चे खोदकामाचे बाबीचे रु.१३८५.४८ लक्षाची संभावित बचत लक्षात घेता रु.११९०.१८ लक्ष किंमतीचे आर्थिक दायित्वाचे प्रस्ताव मुख्य अभियंता यांनी सादर केले आहे.

४.० वरील मंजुरीनुसार सदर आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावाचे आर्थिक चित्र खालीलप्रमाणे आहे.

(अ) मुळ निविदा किंमत ... रु.१००६४.६५ लक्ष

(ब) करारनामा किंमत ... रु.११९९७.०६ लक्ष (१९.२० टक्के अधिक)

(क) प्रकल्पाची सुधारित किंमत ... रु.१२९८१.२९ लक्ष

(ड) आतापर्यंत मंजूर दायित्व ... निरंक

(इ) करारनाम्यावर येणारे दायित्व

(अ) अतिरिक्त बाबीमुळे दायित्व ... निरंक

(ब) कलम-३८ प्रस्तावामुळे येणारे दायित्व ... रु. ११९०.१८ लक्ष

एकूण रु. ११९०.१८ लक्ष

या मंजुर केलेल्या परिमाणानुसार येणारे अतिरिक्त दायित्व अपरिहार्य व स्विकारार्ह असल्याबाबत मुख्य अभियंता यांनी प्रमाणित केलेले आहे.

तेव्हा वरीलप्रमाणे मुख्य अभियंता यांनी शिफारस केलेल्या रु.११९०.१८ लक्ष चे दायित्वास मान्यता प्रदान करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

का.अ. 2014

अ.अ. 22/4

का.सं. मंजूर केले असून अवलोकनार्थ सादर.

22.4.2009
(देवेंद्र शिर्के)

मा. अध्यक्ष विपाविम,
तथा मंत्री (जलसंपदा)

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,

कार्यालयीन टिपणी

विपाविम/कातां.७/ ५२५/२००९
दिनांक : १७।८/२००९

विषय :- वासनी मध्यम प्रकल्पः ता.अचलपूर, जि.अमरावती प्रकल्पाचे जलोत्सारणी मातीकाम व मुख्य विमोचकाचे बांधकाम. ब-१ निविदा. कलम-३८ अंतर्गत दायित्व प्रस्ताव मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.३७९१/लेशा/आ.दा./वासनी/२००९, दिनांक ११.८.२००९ | पृ. १२५

महोदय,

१.० वासनी मध्यम प्रकल्प योजनेच्या जलोत्सारणी मातीकाम व मुख्य विमोचकाचे बांधकाम या कामाची रु.१००६४.६५ लक्ष किंमतीची निविदा १९.२० टक्के अधिक दराने स्विकृत झालेली आहे. (करारनामा क्र. ब-१/२४/डिएल/२००८-०९) सदर काम मे. एफ.ए.कन्स्ट्रक्शन, मुंबई या अभिकरणामार्फत सुरु आहे.

२.० विषयांकित योजनेच्या निविदेतील बाब क्र.२ मऊ खडकातील खोदकामामध्ये प्रत्यक्ष आढळलेल्या भुस्तराच्या वर्गीकरणामुळे वाढ झाल्यामुळे मुख्य अभियंता यांनी शिफारसीसह सादर केलेले कलम-३८ अंतर्गत रु.११९०.१८ लक्षाचे दायित्वाचे प्रस्ताव मा. अध्यक्ष, वि.पा.वि.म. यांना महामंडळाचे पत्र क्र.विपाविम/कातां७/२७४, दिनांक २३.४.२००९ अन्वये सादर करण्यात आले आहे. त्यास मंजूरी अप्राप्त आहे.

३.० संदर्भांकित पत्रान्वये मुख्य अभियंता, वि.प्र., जलसंपदा विभाग, अमरावती यांनी विषयांकित प्रकरणी अतिरिक्त बाबीचा रु.४१५५.५२ लक्ष किंमतीचा आर्थिक दायित्व प्रस्ताव शिफारशीसह मंजूरीकरिता सादर केला आहे. सदर अतिरिक्त बाब मृदु खडकामधील खोदकामामुळे अतिरिक्त ठरलेल्या परिमाणाची विल्हेवाट लावण्यासाठी रु.४१५५.५२ लक्षाची अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.१३२१, दि.१८.३.२००९ अन्वये मंजूर केली आहे. तसेच मुख्य अभियंता यांनी अतिरिक्त बाबीचे प्रस्तावास दिनांक ५.३.२००९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

४.० वरील मंजुरीनुसार सदर आर्थिक दायित्वाच्या प्रस्तावाचे आर्थिक चित्र खालीलप्रमाणे आहे.

(अ) मुळ निविदा किंमत ... रु.१००६४.६५ लक्ष

(ब) करारनामा किंमत ... रु.११९९७.०६ लक्ष (१९.२० टक्के अधिक)

(क) प्रकल्पाची सुधारित किंमत ... रु.१२९८१.२९ लक्ष

(ड) आतापर्यंत मंजूर दायित्व ... निरंक

(इ) करारनाम्यावर येणारे दायित्व

(अ) अतिरिक्त बाबीमुळे दायित्व ... रु.४१५५.५२ लक्ष

(ब) कलम-३८ प्रस्तावामुळे (मा. अध्यक्ष... रु. ११९०.१८ लक्ष
विपाविम यांना सादर केलेले परंतु मंजुरी
अप्राप्त प्रस्तावामुळे) एकूण रु. ५३४५.६० लक्ष

या मंजुर केलेल्या परिमाणानुसार येणारे अतिरिक्त दायित्व अपरिहार्य व स्विकार्ह असल्याबाबत मुख्य अभियंता यांनी प्रमाणित केलेले आहे.

तेव्हा वरीलप्रमाणे मुख्य अभियंता यांनी शिफारस केलेल्या रु.५३४५.६० लक्ष चे दायित्वास मान्यता प्रदान करण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

का.अ.

अ.अ.

का.स.

मंजूर केले असून अवलोकनार्थ सादर.

14.8.2009

मा. अध्यक्ष विपाविम,
तथा मंत्री (जलसंपदा)

देवेंद्र फ

विवरणपत्र क्र. ७

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता



महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 (**वासनी मध्यम प्रकल्प,**) संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा

चौकशी अहवाल

नोव्हेंबर- 2017

विषय: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 (**वासनी मध्यम प्रकल्प**) संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा चौकशी अहवाल.

अनुक्रमणिका

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
(1)	टिप्पणी	1 ते 27
	परिशिष्ट्ये	
(1)	शासन पत्र दि.28.9.2017	A 1 ते 2
(2) /1	शिर्ष कामाचा आराखडा दर्शविणारा नकाशा	A 3
(2) /2	प्रकल्पाची ठळक वैशिष्टे	A 4 ते 6
(3)	आगमन व पुच्छ कालव्यातील भूतलांक व तळपातळ्यांचा मोजमाप पुस्तक व अंदाजपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता	A 7 ते 10
(4)	तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 11
(5)	प्रारुप निविदा तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 12
(6)	कलम 38 चा प्रस्ताव तयार करणारे, तपासणारे व मंजूरी /मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 13 ते 16
(7)	कार्यकारी अभियंता, प्रकल्प अन्वेषण विभाग, अमरावती (तत्कालीन कार्यकारी अभियंता,पूर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपुर) यांनी दि.13.11.2007 रोजी रा.तां.स.स. कार्यालयास सादर केलेली काही कागदपत्रे	
(7)/1	कंत्राटदारास देण्यात आलेले पत्र दि.16.12.2008 व दि. 22.12.2008	A 17 ते 18
(7)/2	Level book हस्तांतरित करण्याबाबत चे कागदपत्र	A 19
(7)/3	क्षेत्रीय कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग यांनी पुच्छ कालव्यातील घेकतलेले सविस्तर भूतलांक व त्यानुसार खोदकामाची आकडेमोड	A 20 ते 21
(8)	अ.अ., उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांचे दि.13.11.2017 रोजीच्या पत्राची प्रत	A 22 ते 24
(9)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 चे उप समिती नेमण्याबाबतचे आदेश	A 25
(10)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 च्या आदेशान्वये नेमेलेल्या उप समितीचा अहवाल	A 26 ते 33
(11)	शिर्ष कामाच्या विविध घटकांच्या खोदकामाच्या परिमाणात ज्या कारणास्तव वाढ झाली आहे त्याबाबतची क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली आकडेमोड	A 34
(12)	आगमन व पुच्छ कालव्यातील पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अमरावती ने काम सुरू करण्यापुर्वी घेतलेले भूतलांक व मोजमाप पुस्तकातील भूतलांक यांचा तुलनात्मक तक्ता	A 35 ते 36
(13)	Geological mapping लंबछेद व मोजमाप पुस्तकानुसार मृद् खडकाचे तलांक दर्शविणारे लंबछेद	A 37ते 38

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 **(वासनी मध्यम प्रकल्प,)** संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा

चौकशी अहवाल

नोव्हेंबर- 2017

विषय: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा चौकशी अहवाल.

अनुक्रमणिका

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
(1)	टिप्पणी	1 ते 27
	परिशिष्टे :-	
(1)	शासन पत्र दि.28.9.2017	A 1 ते 2
(2) /1	शिर्ष कामाचा आराखडा दर्शविणारा नकाशा	A 3
(2) /2	प्रकल्पाची ठळक वैशिष्टे	A 4 ते 6
(3)	आगमन व पुच्छ कालव्यातील भूतलांक व तळपातळ्यांचा मोजमाप पुस्तक व अंदाजपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता	A 7 ते 10
(4)	तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 11
(5)	प्रारुप निविदा तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 12
(6)	कलम 3ε चा प्रस्ताव तयार करणारे, तपासणारे व मंजूरी /मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 13 ते 16
(7)	कार्यकारी अभियंता, प्रकल्प अन्वेषण विभाग, अमरावती (तत्कालीन कार्यकारी अभियंता,पूर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपुर) यांनी दि.13.11.2007 रोजी रा.तां.स.स. कार्यालयास सादर केलेली काही कागदपत्रे	
(7)/1	कंत्राटदारास देण्यात आलेले पत्र दि.16.12.2008 व दि. 22.12.2008	A 17 ते 18
(7)/2	Level book हस्तांतरित करण्याबाबत चे कागदपत्र	A 19
(7)/3	क्षेत्रीय कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग यांनी पुच्छ कालव्यातील घेकतलेले सविस्तर भूतलांक व त्यानुसार खोदकामाची आकडेमोड	A 20 ते 21
(8)	अ.अ., उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांचे दि.13.11.2017 रोजीच्या पत्राची प्रत	A 22 ते 24
(9)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 चे उप समिती नेमण्याबाबतचे आदेश	A 25
(10)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 च्या आदेशान्वये नेमेलेल्या उप समितीचा अहवाल	A 26 ते 33
(11)	शिर्ष कामाच्या विविध घटकांच्या खोदकामाच्या परिमाणात ज्या कारणास्तव वाढ झाली आहे त्याबाबतची क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली आकडेमोड	A 34
(12)	आगमन व पुच्छ कालव्यातील पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अमरावती ने काम सुरू करण्यापुर्वी घेतलेले भूतलांक व मोजमाप पुस्तकातील भूतलांक यांचा तुलनात्मक तक्ता	A 35 ते 36
(13)	Geological mapping लंबछेद व मोजमाप पुस्तकानुसार मृद् खडकाचे तलांक दर्शविणारे लंबछेद	A 37ते 38

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-1

चौकशी अहवाल

विषय: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 रोजी झालेल्या लोकलेखा समितीसमोरील प्रधान सचिव / सचिव यांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीने दिलेल्या चौकशीचे आदेश-

---

1.0 प्रस्तावना:

1.1. शासन पत्र सुप्रमा-2017/831/(प्र.क्र.281/2017) म.प्र., दि.28.9.2017 अन्वये (परिशिष्ठ क्र.1) वर नमुद विषयाला अनुसरुन **वासनी मध्यम प्रकल्प,** जि.अमरावती या प्रकल्पांतर्गत कंत्राटदारास निविदा शर्त क्र.55 ऐवजी शर्त क्र.38 अन्वये अदा केलेल्या रकमेच्या अनुषंगाने राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती, नाशिक यांचे मार्फत चौकशी करण्याचा निर्णय शासनाकडुन घेण्यात आला आहे. सदर चौकशी अहवाल कोणत्याही परिस्थितीत दि.5.11.2017 पुर्वी शासनास सादर करावयाच्या सुचना शासन पत्रात दिलेल्या आहेत.

शासन पत्रात नमुद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मुद्येनिहाय रा.तां.स.स.चा चौकशी अहवाल पुढील परिच्छेदांमध्ये देण्यात येत आहे.

2.0 प्रकल्पाचा संक्षिप्त तपशील:

2.1 प्रकल्पाचा आराखडा:

वासनी मध्यम प्रकल्प हा अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालूक्यातील वासनी गावाजवळ सपन नदीवर बांधकामाधीन असुन प्रकल्पाचे मुख्य धरणाचे बांधकाम माहे 9/2008 पासुन सुरु आहे. प्रकल्पाची साठवण क्षमता 22.591 द.ल.घ.मी. असुन 13.28 किमी लांबीच्या उजव्या कालव्याद्वारे अचलपूर, दर्यापूर व अंजनगाव सुर्जी या तीन तालुक्यातील 4317 हे. क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

धरणाची लांबी 2100 मी. असून महत्तम उंची 19.77 मी. इतकी आहे. डाव्या तीरावर 117 मी लांबीचा ओगी पध्दतीचा सांडवा प्रस्तावित असुन संकल्पित पूर 3669 घमी प्रती सेंकद आहे. सांडव्याकरीता 12.00 मी. x 8.00 मी आकाराचे 8 वक्रद्वारे प्रस्तावित आहे.

प्रकल्पाचा शीर्ष कामाचा नकाशा **परिशिष्ठ क्र.2/1** मध्ये व ठळक वैशिष्ठ्ये **परिशिष्ठ क्र.2/2** मध्ये जोडण्यात आलेला आहे.

2.2 प्रशासकीय मान्यतेचा तपशील:

अ.क्र.	प्रशासकीय मान्यता	संदर्भ	दरसूची वर्ष	रक्कम रु.कोटी
1	मूळ प्रशासकीय मान्यता	महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कातां-6/813/वासनी/प्रमा/25 /2007-08, दि.14.2.2008.	2007-08	102.81
2	प्रथम सु.प्र.मा.	महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कातां-4 / 13 / वासनी / प्रमा / 13 /2009, दि.15.1.2009.	2008-09	197.82
3	प्रस्तावित द्वितीय सुप्रमा	प्रकल्पाचा महामंडळाकडून प्राप्त द्वितीय सुप्रमा प्रस्तावावर रा.तां.स.स. च्या दि.18.10.2016 रोजी झालेल्या 84 व्या बैठकीत चर्चा होऊन, रा.तां.स.स च्या दि.21.11.2016 च्या पत्राअन्वये महामंडळास निर्णयास्तव सादर (मान्यता प्रलंबित).	2013.14	751.67

2.3 **तांत्रिक मंजूरी:**

सदर प्रकल्पाला दि.14.2.2008 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाच्या शिर्षकामाच्या (माती धरण, सांडवा व पुच्छ कालवा) अंदाजपत्रकास मुख्य अभियंता (जसं), अमरावती यांनी दि.19.3.2008 रोजी रु.109.71 कोटी इतक्या किंमतीस (दरसूची 2007-08) तांत्रिक मान्यता दिली.

2.4 **निविदा स्विकृती:**

प्रकल्पाचे शिर्षकाम (माती धरण, सांडवा व मुख्य विमोचक) B-1/24/DL/2008-09 निविदेअंतर्गत दि.15.9.2008 पासून सुरु आहे. शिर्ष कामाचे कंत्राटदार M/S. F.A. Constructions, Mumbai आहेत. कामाची निविदा किंमत रु.100.65 कोटी असून निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.20% जादा दराने (अद्ययावत किंमतीच्या तुलनेत 4.52% जादा) स्विकारल्याने कामाची किंमत रु.119.71 कोटी झालेली आहे.

2.5 **शीर्ष कामाच्या निविदेअंतर्गत कामाची सद्य:स्थिती-**

(a) <u>भौतिक सद्य:स्थिती:-</u> क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार

(i) मातीकाम : 40% काम पूर्ण, घळभरणी बाकी.
(ii) सांडवा : 70% काम पूर्ण.
(iii) आगमन कालवा : 75% काम पूर्ण.
(iv) पुच्छ कालवा : काम पुर्ण.
(v) मुख्य विमोचक : सर्व कामे बाकी

कामाची सद्य:स्थिती दर्शविणारे छायाचित्रे **परिशिष्ठ क्र.10** मध्ये जोडण्यात आलेले आहे.

(b) <u>आर्थिक सद्य:स्थिती:</u>

स्विकृत निविदेची अद्ययावत किंमत रु.319.86 कोटी इतकी आहे. सद्य:स्थितीत निविदेअंतर्गत झालेला खर्च रु.257.26 कोटी असून उर्वरित कामाची किंमत रु.62.60 कोटी आहे. झालेल्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे-

अ.क्र.	तपशील	रु. कोटी
(i)	निविदेअंतर्गत कामाकरिता झालेला खर्च	85.44
(ii)	अदा केलेली भाववाढ	29.42
(iii)	कलम-38 अंतर्गत अदा केलेली रक्कम	79.66
(iv)	अतिरिक्त बाब दरसूची नूसार अदा केलेली रक्कम	62.74
	एकूण	257.26

3.0 शासन पत्रातील नमूद मुद्याच्या अनुषंगाने महानिहाय चौकशी अहवाल

3.1 **शासन पत्रातील मुद्दा क्र. 1**

वरील निविदेतील कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना trial pit व्दारे भूस्तर वर्गीकरण करुन विविध स्तरातील खोदकामाचे परिमाण निश्चित करण्यात आले होते किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी. तसेच प्रत्यक्षात काम करतांना मृदू खडकातील खोदकामाच्या परिमाणात अनुसूची 'ब' मधील नमूद परिमाणापेक्षा बऱ्याच प्रमाणात वाढ झाली असून परिमाणात झालेल्या मोठया वाढीच्या कारणांची सखोल चौकशी करण्यात यावी. सदर प्रकरणी अंदाजपत्रक तयार करणे व तांत्रिक मान्यता देणे इ. संदर्भात करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीची चौकशी करण्यात यावी. तसेच अंदाजपत्रक तयार करणाऱ्या व तांत्रिक मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे अहवालात नमूद करावीत.

या मुद्यातील विविध उपमुद्यांच्या अनुषंगाने रा.तां.स.स.ची निरिक्षणे पुढील प्रमाणे-

(1) शीर्ष कामाच्या निविदेतील कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना Trial Pit व्दारे भूस्तर वर्गीकरण करुन विविध स्तरातील खोदकामाचे परिमाण निश्चित करण्यात आले होते किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:

(i) शिर्षकामाचे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करतांना trial pit घेण्यात आलेले नव्हते. तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील तपासणीसुचीमध्ये 'भूस्तर प्रशासकीय मान्यता नुसार घेण्यात आले आहे' असे नमुद आहे.

(ii) मंजूर प्र.मा. च्या अंदाजपत्रकात धरण संरेखेवर एकूण 21 विंधन विवरांचा तपशील देण्यात आला आहे. या विंधन विवरांचा तपशीलानुसार साधारणपणे 10 ते 23 मी. खोली पर्यंत पिवळी माती व त्यानंतर खाली कठिण मान असे भूस्तर नमूद आहे.

(iii) प्र.मा. अहवालात धरणाच्या मध्यभागी नदी पात्रात सांडवा असल्याने आगमन कालवा व पुच्छ कालवा प्रस्तावित नव्हते. त्यामुळे प्रमा अहवालाचे वेळेस आगमन कालवा व पुच्छ कालवा भागात विंधनविवरे घेण्यात आलेली नव्हती.

(iv) तांत्रिक मंजूर अंदाजपत्रकात शीर्ष कामाच्या घटकनिहाय व भूस्तरनिहाय खोदकामाच्या परिमाणाची तरतूद.

(परिमाणे घमी)

घटक	स्तर				एकूण
	Soil	Hard Murum	Rock	Hard Rock	
धरण पाया	35,787	14,457	-	-	50,244
जलरोधी खंदक	1,89,457	-	3,449	-	1,92,906
शीर्ष विमोचक	2,314	-	493	-	2,807
सांडवा (आगमन व पुच्छ कालव्यासह)	20,93,182	-	42,718	10	21,35,910
एकूण	23,20,740	14,457	46,660	10	23,81,867

खोदकामाचे एकूण परिमाण 23,81,867 घमी पैकी धरण पाया, जलरोधी खंदक व शीर्ष विमोचक या घटकांचे 2,45,957 घमी परिमाणाची तरतूद धरण संरेखेवर घेण्यात आलेल्या विंधन विवरांच्या आधारे व सांडवा (आगमन व पुच्छ कालव्यासह) करिता 21,35,910 घमी खोदकामाची तरतूद धरण संरेखेवरिल विंधन विवरांच्या भूस्तराच्या आधारे आलेल्या भूस्तर वर्गीकरणानुसार करण्यात आलेली आहे.

शीर्ष कामाच्या मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विवेचन अहवालाच्या परिच्छेद क्र.4.1 मध्ये देण्यात आलेले आहे.

(2) प्रत्यक्षात काम करतांना मुदु खडकातील खोदकामाच्या परिमाणात वाढ झाली असून परिमाणात झालेल्या मोठ्या वाढीच्या कारणांची सखोल चौकशी करण्यात यावी.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:

(I) मृदू खडकातील खोदकामात झालेली वाढ

निविदेतील अनुसूची-ब मधील परिमाण	46,167 घमी.
प्रत्यक्षात कामानुसार 37 व्या चालू देयकानुसार झालेले परिमाण	33,94,027 घमी.
निविदेतील परिमाणाच्या तुलनेत झालेली वाढ	33,47,860 घमी

(II) मृदू खडकातील 33,47,860 घमी खोदकामाच्या परिमाण वाढीबाबत समितीने सखोल तपासणी केली असून ही परिमाण वाढ पुढील कारणास्तव झाल्याचे निदर्शनास आले आहे-

[A] <u>निव्वळ भूस्तर वर्गीकरण बदलामुळे झालेली वाढ (14,40,788 घमी):</u>
मोजमाप पुस्तकातील नोंदणीनुसार (37 वे चालू देयक दि.16.7.2016 नुसार) माती खोदकामात मंजूर अदांजपत्रकाच्या तुलनेत 14,40,788 घमी (23,59,753 घमी ऐवजी 9,18,956 घमी) घट होऊन पर्यायाने मृदू खडकाचे तेवढेच परिमाण वाढलेले आहे. क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात आलेल्या भूस्तर वर्गीकरणामुळे ही वाढ झालेली आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.3</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

[B] <u>विविध घटकांच्या खोदकामाच्या परिमाणात वाढ झाल्याने व हे वाढीव परिमाणे मृदू खडक म्हणून वर्गीकरण झाल्याने झालेली वाढ (19,07,062 घमी):</u>

(i) <u>पुच्छ व आगमन कालव्याच्या तळ रुंदीत झालेली वाढ व बाजूच्या उतारामध्ये झालेले बदल (9,63,018 घमी वाढ)-</u>

(a) <u>पुच्छ कालवा (7,68,362 घमी वाढ):</u>
मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार पुच्छ कालव्याची तळ रुंदी 107 मी. व खोदकामाकरिता बाजूचे उतार 1:1 होते. क्षेत्रीय अधीक्षक अभियंता यांनी मंजूर केलेल्या संकल्पनानुसार पुच्छ कालव्याची तळरुंदी 140 मी. व खोदकामाकरिता बाजूचे उतार 2:1 इतके आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.4</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(b) <u>आगमन कालवा (1,94,656 घमी वाढ):</u>
मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार आगमन कालव्याची तळ रुंदी 107 मी. व खोदकामाकरिता बाजूचे उतार 1:1 होते. क्षेत्रीय अधीक्षक अभियंता यांनी मंजूर केलेल्या संकल्पनानुसार आगमन कालव्याची तळरुंदी 120 मी. व खोदकामाकरिता बाजूचे उतार 1:1 इतके आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.4</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(ii) <u>आगमन व पुच्छ कालव्याच्या लांबीत वाढ (3,52,257 घमी):</u>

(a) <u>आगमन कालवा (2,57,764 घमी):</u>
मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार आगमन कालव्याची लांबी 360 मी. इतकी होती. क्षेत्रीय मुख्य अभियंता यांच्या दि.5.2.2012 च्या प्रकल्प पाहणी अहवालात आगमन कालव्याची लांबी 360 मी. वरुन 720 मी. पर्यंत एवढी करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले.

(b) <u>पुच्छ कालवा (94,493 घमी वाढ):</u>
मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार पुच्छ कालव्याची लांबी 1000 मी. इतकी होती. प्रत्यक्षात काम करताना क्षेत्रीय परिस्थितीनुसार पुच्छ कालव्याची लांबी 1125 मी. इतकी झाली.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.5</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(iii) <u>पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेली वाढ (2,75,237 घमी):</u>

(a) <u>पुच्छ कालवा (1,96,403 घमी वाढ):</u>

मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार पुच्छ कालवा भागात सरासरी जमीन तलांक 6.80 मी. ने वर (Higher) आहे. याबाबतचा सा.क्र.निहाय तपशील **परिशिष्ठ क्र.3** मध्ये जोडण्यात आलेला आहे.

पुच्छ कालव्याच्या मंजूर संकल्पनानुसार तळ पातळीचे तलांक (Formation Level) मंजूर अंदाजपत्रकातील सरासरी तलांकापेक्षा 4.12 मी. ने वर (Higher) आहे **(परिशिष्ठ क्र.3)**.

भू-तलांक वर असल्याने पुच्छ कालव्याच्या खोदकामात वाढ तर formation level वर असल्याने खोदकामात घट झालेली आहे. मात्र वरिल दोन्ही कारणांचा एकत्रित परिणामामुळे पुच्छ कालव्याच्या खोदकामात निव्वळ वाढ झालेली आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.6</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(b) <u>आगमन कालवा (78,834 घमी वाढ)</u>

मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार आगमन कालवा भागात सरासरी जमीन तलांक 3.96 मी. ने वर (Higher) आहे. याबाबतचा सा.क्र.निहाय तपशील **परिशिष्ठ क्र.3** मध्ये जोडण्यात आलेला आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.6</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(iv) <u>जलरोधी खंदकाच्या खोदकामात झालेली वाढ (54,927 घमी):</u>

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात जलरोधी खंदकाच्या एकूण 2100 मी. लांबीपैकी 1560 मी. लांबीत तळ रुंदी 3 मी. व उर्वरित 540 मी. लांबीत तळरुंदी 5 मी. इतकी प्रस्तावित होती. म.सं.सं. कडून प्राप्त संकल्पनानुसार संपूर्ण लांबीत खोदकाम तळ रुंदी 5 मी. प्रमाणे करण्यात आली.

मंजूर अंदाजपत्रकात जलरोधी खंदकाचे खोदकामाकरिता Berm ची तरतूद नव्हती. प्रत्यक्षात काम करताना काही लांबीत दोन्ही बाजूस 3 मी. रुंदीचे Berm देऊन खोदकाम करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.7</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(v) <u>सांडव्याचे खोदकामात झालेली बचत ((-)38,872 घमी):</u> मंजूर अंदाजपत्रकात सांडव्याची एकूण लांबी 187 मी. (उत्सारित भाग 87 मी. व दोन्ही कडील अनुत्सारित भाग 50 मी. प्रत्येकी) व पायाचे तलांक 310.84 मी. एवढे विचारत घेतले होते.

सांडव्याच्या सविस्तर संकल्पनानुसार एकूण लांबी 137 मी. (उत्सारित भाग 117 मी. व दोन्ही कडील अनुत्सारित भाग 10 मी. प्रत्येकी) व पायाचे तलांक 317.90 मी. एवढे झाले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.8</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(vi) <u>नवीन घटकांचा समावेश (3,00,479 घमी वाढ):</u>

मंजूर अंदाजपत्रकात नदी रुंदीकरण व पुच्छ कालव्यात प्रपात प्रस्तावित नव्हता.

(a) <u>नदी रुंदीकरण (2,26,188 घमी वाढ):</u>

महामंडळाकडून प्राप्त मंजूरीनुसार 700 मी. लांबीत नदीचे रुंदीकरण करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.9</u> मध्ये देण्यात आलेले आहे

(b) <u>प्रपात (74,291 घमी वाढ)</u>

पुच्छ कालव्याच्या संकल्पनानुसार सा.क्र.210 वर प्रपातचे बांधकाम करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.9</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(III) <u>वरिल नमूद विविध कारणास्तव मृद् खडकातील वाढीव खोदकामास मान्यतेचे अधिकारपत्र:</u>

(i)	भूस्तर वर्गीकरणामुळे झालेली वाढ- (14,40,788 घमी)	शासन पत्र दि.4.9.2000 नुसार चालू कंत्राटाच्या बाबतीत खोदकामातील मऊ स्तर आणि कठिण भूस्तर याच्या वर्गीकरणामुळे 10% पेक्षा जास्त बदल अपेक्षित असल्यास सक्षम स्तरावरील अधिकाऱ्याकडून मान्यता घेणे अत्यंत आवश्यक आहे असे निर्देश आहेत. भूस्तर वर्गीकरणामुळे झालेल्या वाढीबाबत काम करण्यापुर्वी सक्षम स्तरावरुन (मु.अ.) मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.	मृद् खडकातील खोदकामाच्या वाढीव परिमाण करिता मुख्य अभियंता स्तरावरुन कलम-38 अंतर्गत खालील प्रमाणे मान्यता आहे- (i)मुख्य अभियंता (विप्र), अमरावती यांचे पत्र क्र. 930, दि.26.2.2009 अन्वये 26,14,078 घमी
(ii)	पुच्छ व आगमन कालव्याच्या तळ रुंदीत झालेली वाढ व बाजूच्या उतारामध्ये झालेले बदल (9,63,018 घमी वाढ)	शीर्ष कामाचे अंदाजपत्रकास मुख्य अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. तथापी पुंच्छ व आगमन कालव्याचे मूळ व सुधारित संकल्पनास अधीक्षक अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. पुच्छ कालव्याच्या विसर्ग व सुधारित संकल्पनामुळे वाढीव परिमाण व खर्च विचारात घेता मुख्य अभियंता स्तरावरुन सुधारित संकल्पन मंजूर होणे आवश्यक होते.	(ii)मुख्य अभियंता (विप्र), अमरावती यांचे पत्र क्र.4282, दि.11.9.2009 अन्वये 5,39,307 घमी अशी एकूण 31,53,385 घमी परिमाणास मान्यता. वरिल मान्यता घेताना आगमन व पुच्छ कालव्याच्या सुधारित संकल्पचित्रामुळे झालेली वाढ, भूस्तर वर्गीकरणामुळे झालेली वाढ व नदी रुंदीकरणामुळे झालेली वाढीबाबत मान्यता दिसून येत आहे. तथापी वरिल मान्यतेत आगमन व पुच्छ कालव्याच्या वाढीव लांबी तसेच खोदकामाच्या
(iii)	आगमन व पुच्छ कालव्याच्या लांबीत वाढ	आगमन व पुच्छ कालव्याचे सुधारित लांबी बाबत सक्षम स्तरावरुन मान्यता घेतल्याचे दिसत नाही.	
(iv)	पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेली वाढ (2,75,237 घमी)	याबाबत सक्षम स्तरावरुन मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.	
(v)	जलरोधी खंदकाच्या खोदकामात झालेली वाढ (54,927 घमी)	जलरोधी खंदकाच्या तळ रुंदीत वाढ बाबत मुख्य अभियंता स्तरावरुन संकल्पनास मान्यता दिलेली आहे.	
(vi)	सांडव्याचे खोदकामात झालेली बचत ((-)38,872 घमी)	मुख्य अभियंता यांनी सांडव्याच्या संकल्पनास मान्यता दिलेली आहे.	

(iii) पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेली वाढ (2,75,237 घमी):

(a) पुच्छ कालवा (1,96,403 घमी वाढ):
मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार पुच्छ कालवा भागात सरासरी जमीन तलांक 6.80 मी. ने वर (Higher) आहे. याबाबतचा सा.क्र.निहाय तपशील **परिशिष्ठ क्र.3** मध्ये जोडण्यात आलेला आहे.

पुच्छ कालव्याच्या मंजूर संकल्पनानुसार तळ पातळीचे तलांक (Formation Level) मंजूर अंदाजपत्रकातील सरासरी तलांकापेक्षा 4.12 मी. ने वर (Higher) आहे **(परिशिष्ठ क्र.3)**.

भू-तलांक वर असल्याने पुच्छ कालव्याच्या खोदकामात वाढ तर formation level वर असल्याने खोदकामात घट झालेली आहे. मात्र वरिल दोन्ही कारणांचा एकत्रित परिणामामुळे पुच्छ कालव्याच्या खोदकामात निव्वळ वाढ झालेली आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या परिच्छेद क्र.4.6 मध्ये देण्यात आलेले आहे.

(b) आगमन कालवा (78,834 घमी वाढ)
मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार आगमन कालवा भागात सरासरी जमीन तलांक 3.96 मी. ने वर (Higher) आहे. याबाबतचा सा.क्र.निहाय तपशील **परिशिष्ठ क्र.3** मध्ये जोडण्यात आलेला आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या परिच्छेद क्र.4.6 मध्ये देण्यात आलेले आहे.

(iv) जलरोधी खंदकाच्या खोदकामात झालेली वाढ (54,927 घमी):
मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात जलरोधी खंदकाच्या एकूण 2100 मी. लांबीपैकी 1560 मी. लांबीत तळ रुंदी 3 मी. व उर्वरित 540 मी. लांबीत तळरुंदी 5 मी. इतकी प्रस्तावित होती. म.सं.सं. कडून प्राप्त संकल्पनानुसार संपूर्ण लांबीत खोदकाम तळ रुंदी 5 मी. प्रमाणे करण्यात आली.

मंजूर अंदाजपत्रकात जलरोधी खंदकाचे खोदकामाकरिता Berm ची तरतूद नव्हती. प्रत्यक्षात काम करताना काही लांबीत दोन्ही बाजूस 3 मी. रुंदीचे Berm देऊन खोदकाम करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या परिच्छेद क्र.4.7 मध्ये देण्यात आलेले आहे.

(v) सांडव्याचे खोदकामात झालेली बचत ((-)38,872 घमी): मंजूर अंदाजपत्रकात सांडव्याची एकूण लांबी 187 मी. (उत्सारित भाग 87 मी. व दोन्ही कडील अनुत्सारित भाग 50 मी. प्रत्येकी) व पायाचे तलांक 310.84 मी. एवढे विचारत घेतले होते.

सांडव्याच्या सविस्तर संकल्पनानुसार एकूण लांबी 137 मी. (उत्सारित भाग 117 मी. व दोन्ही कडील अनुत्सारित भाग 10 मी. प्रत्येकी) व पायाचे तलांक 317.90 मी. एवढे झाले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.8</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(vi) <u>नवीन घटकांचा समावेश (3,00,479 घमी वाढ):</u>

मंजूर अंदाजपत्रकात नदी रुंदीकरण व पुच्छ कालव्यात प्रपात प्रस्तावित नव्हता.

(a) <u>नदी रुंदीकरण (2,26,188 घमी वाढ):</u>

महामंडळाकडून प्राप्त मंजूरीनुसार 700 मी. लांबीत नदीचे रुंदीकरण करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.9</u> मध्ये देण्यात आलेले आहे

(b) <u>प्रपात (74,291 घमी वाढ)</u>

पुच्छ कालव्याच्या संकल्पनानुसार सा.क्र.210 वर प्रपातचे बांधकाम करण्यात आले.

याबाबतचे सविस्तर विवेचन अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.9</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(III) <u>वरिल नमूद विविध कारणास्तव मृद् खडकातील वाढीव खोदकामास मान्यतेचे अधिकारपत्र:</u>

(i)	भूस्तर वर्गीकरणामुळे झालेली वाढ- (14,40,788 घमी)	शासन पत्र दि.4.9.2000 नुसार चालू कंत्राटाच्या बाबतीत खोदकामातील मऊ स्तर आणि कठिण भूस्तर याच्या वर्गीकरणामुळे 10% पेक्षा जास्त बदल अपेक्षित असल्यास सक्षम स्तरावरील अधिकाऱ्याकडून मान्यता घेणे अत्यंत आवश्यक आहे असे निर्देश आहेत. भूस्तर वर्गीकरणामुळे झालेल्या वाढीबाबत काम करण्यापुर्वी सक्षम स्तरावरुन (मु.अ.) मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.	मृद् खडकातील खोदकामाच्या वाढीव परिमाण करिता मुख्य अभियंता स्तरावरुन कलम-38 अंतर्गत खालील प्रमाणे मान्यता आहे- (i)मुख्य अभियंता (विप्र), अमरावती यांचे पत्र क्र. 930, दि.26.2.2009 अन्वये 26,14,078 घमी ---------- (ii)मुख्य अभियंता (विप्र), अमरावती यांचे पत्र क्र.4282, दि.11.9.2009 अन्वये 5,39,307 घमी अशी एकूण 31,53,385 घमी परिमाणास मान्यता. वरिल मान्यता घेताना आगमन व पुच्छ कालव्याच्या सुधारित संकल्पचित्रामुळे झालेली वाढ, भूस्तर वर्गीकरणामुळे झालेली वाढ व नदी रुंदीकरणामुळे झालेली वाढीबाबत मान्यता दिसून येत आहे. तथापी वरिल मान्यतेत आगमन व पुच्छ कालव्याच्या वाढीव लांबी तसेच खोदकामाच्या
(ii)	पुच्छ व आगमन कालव्याच्या तळ रुंदीत झालेली वाढ व बाजूच्या उतारामध्ये झालेले बदल (9,63,018 घमी वाढ)	शीर्ष कामाचे अंदाजपत्रकास मुख्य अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. तथापी पुच्छ व आगमन कालव्याचे मूळ व सुधारित संकल्पनास अधीक्षक अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. पुच्छ कालव्याच्या विसर्ग व सुधारित संकल्पनामुळे वाढीव परिमाण व खर्च विचारात घेता मुख्य अभियंता स्तरावरुन सुधारित संकल्पन मंजूर होणे आवश्यक होते.	
(iii)	आगमन व पुच्छ कालव्याच्या लांबीत वाढ	आगमन व पुच्छ कालव्याचे सुधारित लांबी बाबत सक्षम स्तरावरुन मान्यता घेतल्याचे दिसत नाही.	
(iv)	पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेली वाढ (2,75,237 घमी)	याबाबत सक्षम स्तरावरुन मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.	
(v)	जलरोधी खंदकाच्या खोदकामात झालेली वाढ (54,927 घमी)	जलरोधी खंदकाच्या तळ रुंदीत वाढ बाबत मुख्य अभियंता स्तरावरुन संकल्पनास मान्यता दिलेली आहे.	
(vi)	सांडव्याचे खोदकामात झालेली बचत ((-)38,872 घमी)	मुख्य अभियंता यांनी सांडव्याच्या संकल्पनास मान्यता दिलेली आहे.	

अ क्र.	वाढीचे कारण	मान्यता	शेरा
(vii)	नवीन घटकांचा समावेश (3,00,479 घमी वाढ)	नदी रुंदीकरणाबाबत कार्यकारी संचालक यांची मान्यता आहे. पुच्छ कालव्यातील प्रपाताच्या संकल्पनास मुख्य अभियंता यांची मान्यता आहे.	खोलीत झालेल्या वाढीमुळे झालेल्या वाढीबाबत उल्लेख नाही.

[C] सदर प्रकरणी अंदाजपत्रक तयार करणे व तांत्रिक मान्यता देणे इ. संदर्भात करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीची चौकशी करण्यात यावी.

(1) **अंदाजपत्रकातील उणिवा:**

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात खालील प्रमाणे उणिवा दिसून आल्या-

(a) शासन पत्र दि.29.9.2001 व शासन निर्णय दि.15.11.2001 मधील निर्देशांचे पालन न होणे:

(i) शासन पत्र दि.29.9.2001 मधील मुद्दा क्र.3 मध्ये (अंदाजीत काटछेदावर निविदा बोलविण्याबाबत प्रतिबंध) पुढील प्रमाणे निर्देश आहेत-

"धरणाचे काटछेद व आराखडा (ले-आऊट) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडुन तपासून मंजूर करुन घेण्यात यावेत व तदनंतरच प्रकल्प अहवाल तयार करावा. संकल्पचित्र संघटनेने सुचविलेल्या छेदावर आधारित प्रस्ताव तयार झाल्यास पुढे बदल होणार नाहीत. घाईत अंदाजित काटछेदावर व लेआऊटवर आधारित प्रस्ताव यापुढे तयार करण्याची अजिबात गरज नाही. आय.पी.आय.च्या अंदाजीत काटदेदावर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा बोलाविणे इत्यादीस यापुढे प्रतिबंध घालण्यात येत आहे".

(ii) शासन निर्णय दि.15.11.2001 च्य परिच्छेद क्र.4 पुढील प्रमाणे-

"मध्यम प्रकल्पांचा सर्वसाधारण आराखडा संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता यांच्याकडून याबाबतचा प्रसताव प्राप्त झाल्यावर तयार करावा. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तांत्रिक दृष्टीकोनातून आवश्यक वाटल्यास योग्य ते बदल करावेत व त्यानंतर मध्यम प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा व संकल्पन आणि संकल्पचित्रे तसेच सर्व उपघटकांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी तयार करावीत. तथापी त्यास प्रादेशिक मुख्य अभियंता यांचे स्तरावर मान्यता देण्यात यावी व अशा संकल्पचित्रांची (अहवालासह) प्रत शासनास माहितीसाठी अग्रेषित करावी"

(iii) शीर्ष कामाचे तांत्रिक मंजूर अंदाजपत्रक IPI च्या अंदाजीत काटछेदावर तयार करण्यात आलेले आहे. हे अंदाजपत्रक तयार करताना वरिल नमूद शासन पत्र दि.29.9.2001 मधील निर्देशाचे पालन झालेले दिसून येत नाही.

तसेच शासन निर्णय दि.15.11.2001 नुसार शीर्ष कामाचे तांत्रिक मान्यतेच्या वेळेस प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा व सविस्तर संकल्पने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून प्राप्त करुन घेणे अपेक्षीत होते. तथापी सविस्तर संकल्पन म.सं.सं. कडून घेण्यात आलेले नव्हते.

(b) (i) अंदाजपत्रकात माती धरण (Stripping, Longitudinal & cross drains, COT, Chute & Catch water drain) करिता भूतलांक व भुस्तर निहाय खोदकामाकरिता सविस्तर मोजमापे नमुद करुन खोदकामाचे परिमाणे काढण्यात आलेली आहेत

(ii) सांडवा (उत्सारीत व अनुत्सारीत भाग, स्टीलींग बेसीन, आगमन कालवा व पुच्छ कालवा) करिता सविस्तर तलांकानुसार आकडेमोड न करिता सरासरी भुतलांक व foundation/formation level नुसार खोदकामाची परिमाणे काढण्यात आलेली आहेत.

सांडव्याच्या विविध भागांकरिता सविस्तर मोजमापे नमुद करुन खोदकामाचे परिमाणे काढणे आवश्यक होते.

[D] <u>अंदाजपत्रक तयार करणाऱ्या व तांत्रिक मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे अहवालात नमूद करावीत.</u>
संबंधित अधिकाऱ्यांची नांवे परिशिष्ठ क्र.4 मध्ये देण्यात आलेली आहेत.

3.2 शासन पत्रातील मुद्दा क्र.2

सदर कामाच्या तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाच्या आधारे प्रारुप निविदेचा मसुदा तयार करतांना अनुसूची 'ब' मधील खोदकामाच्या विविध बाबी विचारात घेऊन त्यांच्याशी सुसंगत निविदा शर्त क्र. 38 व 55 चा मसुदा तयार करण्यात आला होता का? प्रारुप निविदा कागदपत्रे मंजुर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी याबाबत काय निर्देश दिले होते. याबाबत प्रकरणाशी संबंधित धारिकांची तपासणी करुन निविदा शर्त क्र. 55 व अनुसुची 'ब' मधील खोदकामाच्या बाबी मधील विसंगतीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची नावे नमूद करावीत.

या मुद्यातील विविध उपमुद्यांच्या अनुषंगाने रा.तां.स.स.ची निरिक्षणे पुढील प्रमाणे-

(1) सदर कामाच्या तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाच्या आधारे प्रारुप निविदेचा मसुदा तयार करतांना अनुसूची-ब मधील खोदकामाच्या विविध बाबी विचारात घेऊन त्यांच्याशी सुसंगत निविदा शर्त क्र.38 व 55 चा मसुदा तयार करण्यात आला होता का?

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:

(i) निविदेतील शर्त क्र.38 व 55 चा मसूदा व निविदेतील मऊ स्तर व कठिण स्तर याबाबतच्या specification चा एकत्रित विचार करता अनुसूची 'ब' मधील खोदकामाच्या विविध बाबी शर्त क्र.38 व 55 चा मसुदा सुसंगत दिसून येत आहे.

याबाबतचे सविस्तर विवेचन या अहवालाच्या <u>परिच्छेद क्र.4.10</u> मध्ये देण्यात आलेले आहे.

(ii) दि.19.3.2008 रोजी झालेल्या निविदापुर्व बैठकीत (Pre Bid Conference) कोणीही कंत्राटदार उपस्थित नव्हते असे क्षेत्रीय स्तरावरुन उपलब्ध झालेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सविस्तर निविदा सुचनेतिल परिच्छेद 5 (1) व (2) मधील सुचना पुढील प्रमाणे आहे-

5 (1)- Pre-tender conference open to all prospective prequalified tenderers will be held in the office as stated in Annexure-A of this Section, wherein the prospective tenderers will have an opportunity to obtain clarifications regarding the work and the tender conditions.

5 (2)- The prospective tenderers are free to ask for any additional clarification, either in writing or orally, and the reply to the same will be given by the Chief Engineer/Superintending Engineer, in writing and these clarifications referred to as common set of conditions, shall form part of tender documents and which will also be common and applicable to all tenderers.

निविदा पुर्व बैठकित Prospective Prequalified Tenderers *यांनी निविदा शर्ती बाबत कोणतेही स्पष्टीकरणे मागितलेली नाहीत.*

(iii) स्विकृत निविदा अंदाजपत्रकीय दराच्या तुलनेत 19.20% जादा दराची आहे. जादा दराची निविदा ज्या कारणास्तव मान्य करण्यात आली त्या कारणामध्ये निविदा शर्ती क्र.38, शर्त क्र.55 तसेच खोदकामांच्या अनुसूची-ब च्या बाबींबाबत काही उल्लेख दिसून येत नाही.

(2) प्रारुप निविदा कागदपत्रे मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी याबाबत काय निर्देश दिले होते.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:
क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त कागदपत्रात मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कोणतेही निर्देश दिल्याची नोंद नाही.

(3) याबाबत प्ररकणाशी संबंधित थारिकांची तपासणी करुन निविदा शर्त क्र.55 व अनुसूची-'ब' मधील खोदकामाच्या बाबी यामधील विसंगतीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची नावे नमूद करावीत.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:
उपरोक्त परिच्छेद 3.2 (1) (i) मध्ये नमूद केल्यानुसार निविदा शर्त क्र.55 व अनुसूची-'ब' मधील खोदकामाच्या बाबी यामधील विसंगती दिसून येत नाही. यामुळे विसंगतीस जबाबदार अधिकाऱ्यांची नावे नमूद करण्याचे प्रश्न उद्भवत नाही. तथापी माहितीस्तव प्रारुप निविदा मंजूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची नांवे **परिशिष्ठ क्र.5** मध्ये देण्यात आलेली आहेत.

3.3 शासन पत्रातील मुद्दा क्र.3:
निविदा कलम 38 अंतर्गत वाढीव परिमाणाच्या रकमेमुळे निर्माण झालेले आर्थिक/भौतिक दायित्व मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी निविदा शर्त क्र.55 नुसार कार्यवाही न करण्याची कारण मिमांसा व याबाबत विधिज्ञांचा सल्ला घेतला असल्यास त्याचा तपशील इ. बाबत चौकशी करण्यात यावी. कलम 38 अंतर्गत वाढीव परिमाणाचा व यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक दायित्वाचा प्रस्ताव मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे नमूद करावीत.

(1) निविदा कलम 38 अंतर्गत वाढीव परिमाणाच्या रकमेमुळे निर्माण झालेले आर्थिक/ भौतिक दायित्व मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणी निविदा शर्त क्र.55 नुसार कार्यवाही न करण्याची कारणमिमांसा. याबाबत विधिज्ञाचा सल्ला घेतला असल्यास त्याचा तपशील इ. बाबत चौकशी करण्यात यावी.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:
(i) क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त आर्थिक व भौतिक दायित्व मंजूर करण्याबाबतच्या धारिकेतील नोंदीनुसार आर्थिक/भौतिक दायित्व मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मंजूरी देताना सदर प्रकरणी निविदा शर्त क्र.55 नुसार कार्यवाही न करण्याची कारणमिमांसा नमूद केलेली नाही.

(ii) निविदा शर्त क्र.55 बाबत विधिज्ञाचा सल्ला घेतलेला नाही असे महामंडळाच्या दि.30.10.2017 च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(2) कलम-38 अंतर्गत वाढीव परिमाणाचा व यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक दायित्वाच्या प्रस्ताव मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे नमूद करावीत.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:
संबंधित अधिकाऱ्यांची नांवे **परिशिष्ठ क्र.6** मध्ये देण्यात आलेली आहेत.

3.4 शासन पत्रातील मुद्दा क्र.4:

वरील मुद्यांमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अनियमितता घडल्याचे निष्पन्न झाल्यास प्रत्येक बाबीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध नेमकी कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करावी याबाबत समितीने स्पष्ट अभिप्राय अहवालात नमूद करावेत.

(1) <u>वरील मुद्यांमध्ये नमुद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अनियमितता:</u>

सदर प्रकरणी शासन पत्र दि.28.9.2017 अन्वये कळविण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने रा.तां.स.स.1 ने सविस्तर चौकशी केली. या चौकशी अंती समितीस तांत्रिक अंदाजपत्रकाचे वेळेस व निविदा अंतर्गत काम करताना पुढील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत-

[A] तांत्रिक अंदाजपत्रकाबाबत झालेल्या अनियमितता:

(i) शासन पत्र दि.29.9.2001 मधील मुद्दा क्र.3 मध्ये "निविदा बोलविण्यापुर्वी धरणाचे काटछेद व आराखडा (ले-आऊट) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडुन तपासून मंजूर करुन घेण्यात यावेत असे निर्देश होते. तथापी तांत्रिक अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी म.सं.सं.कडून सविस्तर संकल्पन प्राप्त करण्यात आलेले नव्हते.

(ii) तांत्रिक मान्यता अंदाजपत्रक करताना आगमन व पुच्छ कालव्याच्या विविध स्तरामध्ये खोदकामाच्या परिमाण ठरविण्याकरिता आगमन कालवा (लांबी 360 मी.) व पुच्छ कालव्यात (लांबी 1000 मी.) विंधन विवरे/ Trial pit घेणे अपेक्षित होते तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

(iii) सांडवा (आगमन व पुच्छ कालव्यासह) करिता खोदकामाचे परिमाण सरासरी भूतलांक व अंदाजीत पाया/तळ पातळी तलांकावर परिगणित करण्यात आलेले आहे. सविस्तर सर्वेक्षणावर आधारित भूतलांक व सविस्तर संकल्पनावर आधारित पाया/तळ पातळी नुसार परिमाण परिगणित करणे अपेक्षित होते.

[B] निविदाअंतर्गत काम करताना झालेली अनियमितता:

(i) <u>प्रथम चालू देयक तसेच पुढे चालू देयकामध्ये खोदकामाचे परिमाण सविस्तर भूतंलाकावर आधारित नसणे:</u>

(a) निविदा अंतर्गत प्रकल्पाचे काम दि.15.9.2008 ला सुरु करण्यात आले. त्यावेळेस प्रकल्पाचे काम अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर या विभागाकडे होते. महामंडळाच्या आदेशानुसार दि.24.12.2008 रोजी हे काम उर्ध्व वर्धा कालवा विभाग क्र.1, अमरावती यांचेकडे हस्तांतरित झाले. दि.14.1.2009 रोजी निविदाचे प्रथम चालू देयक रु.30.00 कोटी (खोदकामाचे परिमाण 23 लक्ष घमी अदा करण्यात आले). दि.20.1.2009 हा प्रकल्प अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती (सध्याचे नांव अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती) या विभागास हस्तांतरित झाला. निविदाचे उर्वरित चालू देयके या विभागाकडून अदा करण्यात आलेले आहे.

निविदेच्या खोदकामाबाबत specifications च्या परिच्छेद 2.3.2 नुसार काम सुरु करताना Working level बाबत पुढील प्रमाणे सुचना आहे-

"Before starting the work the contractor shall have to sign the fieldbooks and plans showing the working longitudinal sections and cross sections of the portions of the alignment that he has to tackle. If

the Contractor fails to sign them within three days of being called upon to do so the levels and sections as recorded by Engineer-in-charge or his assistant will be final and binding on the Contractor".

(b) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे अन्वेषण विभाग, अमरावती (तत्कालीन कार्यकारी अभियंता, पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर) यांनी दि.13.11.2017 च्या पत्रान्वये रा.तां.स.स. कार्यालयास वासनी प्रकल्पाच्या शीर्ष कामाच्या निविदेबाबत संक्षिप्त अहवाल, प्रकल्प हस्तांतरण टिप्पणी व इतर कागदपत्रे सादर केलेली आहे **(परिशिष्ठ क्र.7)**. प्रकल्प हस्तांतरण करताना उपविभाग स्तरावर तलांक पुस्तिका हस्तांतरित करण्यात आली आहे, याबाबतचे कागदपत्रे सादर करण्यात आलेले आहे.

(c) प्रथम चालू देयकातील खोदकामाचे मोजमापे नोंदविताना वरिल प्रमाणे हस्तांतरित झालेली तलांक पुस्तिकाच्या नोंदणी विचारात घेण्यात आल्या नाही तसेच पुर्णा मध्यम प्रकल्प विभागाकडून इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त करण्यात आलेले नाही. प्रथम चालू देयकात मोजमाप पुस्तकात दोन्ही काठावरचे (Average Top width 180 मी.) भू-तलांकाच्या आधारावर सरासरी भूतलांक नोंदवून परिमाण काढण्यात आलेले आहेत. तसेच पुच्छ कालव्याची तळ रुंदी 120 मी. वरुन 140 मी. झाल्यावर (Average Top width 200 मी.) सुधारित काटछेदाने कामाचे परिमाण पुढील चालू देयकांत काढताना प्रथम चालू देयकाचे दोन्ही काठावरच्या जमिनीच्या तलांकानुसार काढण्यात आलेले आहे. ही बाब अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांच्या दि.13.11.2017 अन्वये रा.तां.स.स. कार्यालयाला सादर पत्रात नमूद करण्यात आलेली आहे **(परिशिष्ठ क्र.8)**. सादर निविदेच्या वरिल specifications नुसार पुढील चालू देयकात वाढीव रुंदीकरीता (180 मी. वरुन 200 मी.) भू-तलांक घेण्यात आलेले नाही.

[C] मृदू खडकातील खोदकामातील वाढीव परिमाणानुसार काम करण्यापूर्वी सक्षम स्तरावरुन मंजूरी न घेणे:

निविदा अंतर्गत काम दि.14.9.2008 रोजी पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर या विभागांतर्गत सुरु करण्यात आले होते. सदर कामाच्या हस्तातरण टिप्पणीत जोडलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते कि, दि.16.12.2008 व दि.22.12.2008 रोजी संबंधीत कंत्राटदारास लिहिलेल्या पत्रानुसार असे दिसून येते कि, पुच्छ कालव्याच्या पूर्ण लांबीत व सांडव्याच्या ठिकाणी असलेला भूस्तर मृदू खडक म्हणून वर्गीकरण करण्यास नकार कळविलेला होता.

हे काम दि.24.12.2008 रोजी उर्ध्व वर्धा कालवा विभाग क्र.1, अमरावती यांचेकडे वर्ग झालेला आहे. या विभागाकडून दि.14.1.2009 च्या प्रथम चालू देयकात मृदू खडकात खोदकाम याबाबी करिता 20,78,787 घमी (निविदेतील परिमाण 46,167 घमी) इतके परिमाण अदा करण्यात आलेले आहे. पुर्वीच्या कार्यकारी अभियंता कडून पुच्छ कालवा व सांडव्याचे ठिकाणी असलेले भूस्तर मृदू खडक म्हणून वर्गीकरण करण्यास नकार दिलेला असतानाही खोदलेले भूस्तर मृदू खडक म्हणून अदा करण्यापुर्वी तसेच वाढीव परिमाणाबाबत सक्षम स्तरावरुन मान्यता घेण्यात आलेली नव्हती (परिशिष्ठ क्र.7).

[D] भूस्तर वर्गीकरण सक्षम स्तरावरुन न करणे:
निविदेच्या विविध खोदकामाच्या बाबी अंतर्गत खोदकामचे परिमाण अदा करताना भूस्तर वर्गीकरण Engineer-in-charge (कार्यकारी अभियंता) कडून होणे आवश्यक होते. तथापी चालू देयकाच्या मोजमाप पुस्तकात कार्यकारी अभियंता स्तरावरुन भूस्तर वर्गीकरण केल्याचे दिसून येत नाही. तथापी भूस्तर वर्गीकरणाबाबत आठव्या चालू देयकाच्या (दि.13.5.2009) मोजमाप पुस्तकात 'strata classification is as per U.W.Canal Sub Division No.10, Dhamangaon Tail channel record' अशी नोंद दिसून येत आहे.

[E] खोदकाम बाबीच्या वाढीव परिमाणाचे अदायगीबाबत निविदा शर्त क्र.38 मध्ये नमुद केल्यानुसार विशेष शर्त कलम-55 नुसार कार्यवाही केलेली नाही.

[F] शीर्ष कामाच्या तांत्रिक अंदाजपत्रकास मुख्य अभियंता यांनी दि.19.3.2008 रोजी मंजूर प्रदान केलेली आहे. तथापी पुच्छ कालव्याचे संकल्पन अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, यांनी दि.23.12.2008 रोजी व सुधारित संकल्पन अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांनी दि.30.4.2009 रोजी मंजूर केलेले आहे. पुच्छ कालव्याचे विसर्ग, विविध भू-स्तरामध्ये खोदकामाचे परिमाण व किंमत विचारात घेता पुच्छ कालव्याचे संकल्पन मुख्य अभियंता स्तरावरुन मंजूर होणे आवश्यक होते.

(2) <u>जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत:</u>
प्रकल्पाच्या प्रस्तावित द्वितीय सुप्रमा अंदाजपत्रकीय किंमतीत मंजूर प्रथम सुप्रमा अहवालाच्या तुलनेत अपूऱ्या तरतुदीमुळे झालेली वाढ रु.250.26 कोटी व संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ रु.89.38 कोटी इतकी प्रचंड असल्याने या प्रकल्पाचे सविस्तर तांत्रिक परिक्षण (Technical Audit) होणे आवश्यक आहे अशी शिफारस रा.तां.स.स.च्या दि.18.10.2016 रोजीच्या 84 व्या बैठकित करण्यात आली आहे.

सदर तांत्रिक परिक्षण करताना वर नमूद अनियमिततांच्या अनुषंगानेही सविस्तर तपासणी होणे आवश्यक आहे. तांत्रिक परिक्षणाच्या अंती आढळून येणाऱ्या अहवालानुसार अनियमिततांच्याबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द नेमकी कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करावी याबाबत शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात यावा.

3.5 शासन पत्रातील मुद्दा क्र.5:

चौकशीची कार्यवाही सुरु करण्यापूर्वी समितीने प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची समक्ष पाहणी करावी.

मा. महांसचालक तथा अध्यक्ष रातांसस-1 यांचे दि.5.10.2017 च्या आदेशाने **(परिशिष्ठ क्र.9)** नेमलेल्या उपसमितीच्या सदस्यांनी (रा.तां.स.स.कार्यालय, नाशिक चे दोन कार्यकारी अभियंता व दोन उपविभागीय अभियंता/अधिकारी) दि.11.10.2017 व 12.10.2017 रोजी कार्यक्षेत्रावर जाऊन पाहणी केली व क्षेत्रिय कार्यालयाकडून उपलब्ध झालेले कागदपत्रे प्राप्त केले. पाहणी अहवाल **परिशिष्ठ क्र.10** मध्ये जोडण्यात आला आहे.

4.0 शासन पत्र दि.29.9.2017 मध्ये नमूद मुद्याच्या अनुषंगाने सविस्तर विवेचन:

4.1 <u>शिर्ष कामाच्या तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकाबाबत:</u>

(i) प्रकल्पाला रु.102.81 कोटी (दरसुची सन 2007-08) रकमेस महामंडळाचे दि.14.2.2008 च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या प्रमात शिर्षकामाच्या बांधकामासाठी रु.55.73 कोटीची तरतूद होती.

(ii) शीर्ष कामाच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता (जसं), अमरावती यांनी दि.19.3.2008 रोजी रु.109.71 कोटी (दरसूची 2007-08) इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सदर अंदाजपत्रक उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ यांच्या अंतर्गत असलेल्या पूर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अंचलपूर या कार्यालयाद्वारे तयार करण्यात आले आहे.

(iii) प्रशासकीय मान्यता अहवालानुसार प्रकल्पाचा सांडवा नदीपात्रात (Centraly located) प्रस्तावित होता. तथापी तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात सांडवा धरणाच्या डाव्या तिरावर प्रस्तावित करण्यात आला. त्या अनुषंगाने 360 मी. लांबीचा आगमन कालवा व 1000 मी. लांबीच्या पुच्छ कालव्याची तरतूद करण्यात आली.

(iv) शासन पत्र दि.29.9.2001 मधील मुद्दा क्र.3 मध्ये (अंदाजीत काटछेदावर निविदा बोलविण्याबाबत प्रतिबंध) पुढील प्रमाणे निर्देश आहेत-

"धरणाचे काटछेद व आराखडा (ले-आऊट) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडुन तपासून मंजूर करुन घेण्यात यावेत व तद्नंतरच प्रकल्प अहवाल तयार करावा. संकल्पचित्र संघटनेने सुचविलेल्या छेदावर आधारित प्रस्ताव तयार झाल्यास पुढे बदल होणार नाहीत. घाईत अंदाजित काटछेदावर व लेआऊटवर आधारित प्रस्ताव यापुढे तयार करण्याची अजिबात गरज नाही. आय.पी.आय.च्या अंदाजीत काटदेदावर प्रकल्प अहवाल तयार करणे निविदा बोलाविणे इत्यादीस यापुढे प्रतिबंध घालण्यात येत आहे".

शासन निर्णय दि.15.11.2001 च्य परिच्छे क्र.4 मध्ये मध्यम प्रकल्पाच्या सर्वसाधारण आराखडा व संकल्पन आणि संकल्पचित्रे तसेच सर्व उपघटकांचे संकल्पचित्रे म.सं.सं.ने तयार करावीत तथापी त्यास प्रादेशिक मुख्य अभियंता स्तरावर मान्यता देण्यात यावी असे निर्देश आहेत.

शीर्ष कामाचे तांत्रिक अंदाजपत्रक IPI च्या अंदाजीत काटछेदावर तयार करण्यात आलेले आहे. हे अंदाजपत्रक तयार करताना वरिल नमूद शासन पत्र दि.29.9.2001 मधील निर्देशाचे पालन झालेले दिसून येत नाही.

तसेच शासन निर्णय दि.15.11.2001 नुसार शीर्ष कामाचे तांत्रिक मान्यतेच्या वेळेस प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा व सविस्तर संकल्पने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून प्राप्त करुन घेणे अपेक्षीत होते. तथापी सविस्तर संकल्पन म.सं.सं. कडून घेण्यात आलेले नव्हते.

(v) शिर्षकामाचे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करतांना trial pit घेण्यात आलेले नव्हते. तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील तपासणीसुचीमध्ये 'भूस्तर प्रशासकीय मान्यता नुसार घेण्यात आले आहे' असे नमुद आहे.

मंजूर प्र.मा. च्या अंदाजपत्रकात धरण संरेखेवर एकूण 21 विंधन विवरांचा तपशील देण्यात आला आहे. या विंधन विवरांचा तपशीलानुसार साधारणपणे 10 ते 23 मी. खोली पर्यंत पिवळी माती व त्यानंतर खाली कठिण मान असे भूस्तर नमूद आहे.

प्र.मा. अहवालात धरणाच्या मध्यभागी नदी पात्रात सांडवा असल्याने आगमन कालवा व पुच्छ कालवा प्रस्तावित नव्हते. त्यामुळे प्रमा अहवालाचे वेळेस आगमन कालवा व पुच्छ कालवा भागात विंधनविवरे घेण्यात आलेली नव्हती.

(vi) तांत्रिक मान्य अंदाजपत्रकात माती धरण (Stripping, Longitudianal & cross drains, COT, Chute & Catch water drain या घटक भागांकरीता) करिता भूतलांक व भुस्तर निहाय खोदकामाकरिता सविस्तर मोजमापे नमुद करुन खोदकामाचे परिमाणे काढण्यात आलेली आहेत.

तथापी सांडवा (उत्सारीत व अनुत्सारीत भाग, स्टीलींग बेसीन, आगमन कालवा व पुच्छ कालवा या घटक भागांकरीता) करिता सविस्तर तलांकानुसार आकडेमोड न करिता सरासरी भुतलांक व foundation/formation level नुसार खोदकामाची परिमाणे काढण्यात आलेली आहेत. या घटकांकरिता धरण संरेखेवरती घेण्यात आलेल्या विंधन विवरांच्या भूस्तर प्रमाणात एकूण खोदकामाच्या 98% माती व उर्वरित 2% खोदकामाकरिता मृदु खडकात खोदकाम विचारात घेण्यात आले आहे.

या अंदाजपत्रकात शीर्ष कामाचे (जलरोधी खंदक, सांडवा व शीर्ष विमोचक) सर्व घटकाकरिता खोदकाम बाबी अंतर्गत माती 23,21,056 घमी, कठिण मुरुम 14,457 घमी, मृदु खडक 46,661 घमी व कठीण घटक 10 घमी असे एकूण 23,82,184 घमीची तरतूद आहे.

(vii) तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात माती व कठिण मुरुम खोदकाम या बाबींकरिता Drainage, Dam seat & Cut off trench या घटकभागांमध्ये 1 किमी वहन अंतर व Gated spillway (आगमन व पुच्छ कालव्यासह) या घटक भागासाठी 1 ते 6 किमी पर्यंत वहन अंतर घेऊन दर निश्चित करण्यात आले आहेत.

Excavation in soft rock या बाबीच्या दरात Cut off trench करिता 1 किमी व Gated spillway (आगमन व पुच्छ कालव्यासह) या घटकासाठी 2 ते 4 किमी वहन अंतर घेऊन दर निश्चित करण्यात आले आहेत. Drainage & Dam seat या घटकात Excavation in soft rock अंतर्भूत नव्हते.

निविदेतील अनुसूची-ब मधील बाब क्र.2 (Excavation in soft rock in wet or dry condition with all leads and lifts) अंतर्गत मृदू खडकाचे खोदकाम करावयाचे आहे.

Excavation in hard rock with blasting या बाबीकरिता Gated spillway (आगमन व पुच्छ कालव्यासह) या घटकात 10 घमी तरतुद करण्यात आली असुन या बाबीचे मोजमाप तथा दरपृ:थकरण अंदाजपत्रकात जोडण्यात आलेले नाही. ही बाब या घटकाच्या गोषवाऱ्यात हस्तलिखित आहे.

(viii) तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात खोदकामातून उपलब्ध साहित्याचा वापर करुन पुच्छ कालव्या लगत व गावाच्या संरक्षणार्थ बांध बांधणे कामाची (4,33,800 घमी) तरतूद आहे. सदर बाबीचा समावेश निविदेतील अनुसूची-ब (बाब क्र.35) मध्ये केलेला आहे.

(ix) प्रमाच्या अंदाजपत्रकाच्या तुलनेत मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात महत्वाचे बदलाबाबतचा तपशील पुढील तक्त्यात देण्यात आलेले आहेत-

तक्ता क्र.1

अ.क्र.	बाब	प्रमा अंदाजपत्रकानुसार	तां.म. अंदाजपत्रकानुसार
(1)	सांडवा	धरणाच्या मध्यभागी नदी पात्रात	धरणाच्या डाव्या तिरावर
(2)	आगमन व पुच्छ कालवा	सांडवा नदीपात्रात असल्याने आगमन पुच्छ कालव्याची तरतूद नव्हती	360 मी. लांबीचा आगमन कालवा व 1000 मी. लांबीच्या पुच्छ कालव्याची तरतूद आगमन व पुच्छ कालव्याची रुंदी 102 मी.
(3)	न-वापरण्या योग्य अतिरिक्त साहित्याची विल्हेवाट	अतिरिक्त साहित्य विल्हेवाटीची तरतूद नव्हती	(i) माती खोदकामातील अतिरिक्त साहित्य विल्हेवाटीकरिता वहन अंतर 1 ते 6 किमी (ii) मृदू खडकातील खोदकाम अतिरिक्त साहित्य विल्हेवाटीकरिता वहन अंतर (a) Dam seat, Cross Drains, COT या घटकांकरिता वहन अंतर 1 किमी (b) आगमन व पुच्छ कालव्याकरिता वहन अंतर 2 ते 4 किमी

अ. क्र.	बाब	प्रमाण अंदाजपत्रकानुसार	मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकानुसार
			(iii) अतिरिक्त साहित्याचे (16.08 लक्ष घमी) dry rolling करिता तरतूद.

4.2 प्रत्यक्षात काम करताना मृदू खडकातील खोदकामाच्या परिमाणात निविदेतील अनुसूची-'ब' च्या तुलनेत झालेली वाढ:

(a) निविदे अंतर्गत प्रत्यक्ष कामानुसार मृदू खडकाच्या खोदकामाच्या परिमाणात झालेली वाढ:

निविदेनुसार खोदकामाचे परिमाण व प्रत्यक्ष झालेल्या कामानुसार (37 व्या चालू देयकाअखेर-जुलै 2016) खोदकामाच्या परिमाणातील वाढीचा घटकनिहाय तपशील पुढील तक्त्यांमध्ये नमुद केलेला आहे.

तक्ता-1 निविदेतील अनुसूची 'ब' व 37 व्या चालू देयकानुसार बाबनिहाय खोदकामाचे परिमाण व बाबनिहाय वाढ/घट तपशील-

(परिमाण घमी)

तपशील	निविदेतील बाब क्र. 1 मातीचे खोदकाम	निविदेतील बाब क्र. 2 मृदू खडकाचे खोदकाम	निविदेतील बाब क्र. 3 कठिण खडकाचे खोदकाम		
निविदेनुसार परिमाण	23,59,753	46,167	10	24,05,930*	कठिण खडकातील खोदकाम बाब अद्याप कार्यान्वित झालेली नाही.
प्रत्यक्ष कामाचे परिमाण (दि.12.6.2016 च्या 37 व्या चालू देयकानुसार)	9,18,965**	33,94,027**	0	43,12,992	
निविदा परिमाणाच्या तुलनेत वाढ/घट	(-)14,40,788	(+)33,47,860	(-)10	(+)19,07,062	
निविदेतील परिमाणाच्या तुलनेत वाढ/घट टक्केवारी	(-)61.05%	7251.62%	0%	79.27%	

*मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या खोदकामाचे एकूण परिमाणाचे तुलनेत निविदा अनुसूची-ब मध्ये खोदकामाच्या बाबीकरिता 23,746 घमी इतकी जास्त तरतूद करण्यात आलेली आहे.

**सद्य:स्थितीत आगमन कालव्याचे खोदकाम सुमारे 75% पूर्ण झालेले आहे. आगमन कालव्याचे उर्वरित काम झाल्यावर माती व मृदू खडकातील खोदकामाच्या परिमाणात वाढ होणार आहे. द्वितीय सुप्रमा प्रस्तावात या उर्वरित खोदकामाकरिता 2,26,855 घमीची तरतूद करण्यात आली आहे.

मृदू खडकातील खोदकामात झालेली वाढ-

निविदेतील अनुसूची-ब मधील परिमाण

प्रत्यक्षात कामानुसार 37 व्या चालू देयाकानुसार झालेले परिमाण 46,167 घमी.

निविदेतील परिमाणाच्या तुलनेत झालेली वाढ 33,94,027 घमी.

33,47,860 घमी

तक्ता-1 प्रमाणे एकूण खोदकामात निविदेच्या तुलनेत 19,07,062 घमी वाढ झालेली आहे. खोदकामातील ही वाढ शीर्ष कामाच्या विविध घटकांत झालेल्या बदलामुळे आहे. त्याबाबत तपशील तक्ता क्र.2 मध्ये देण्यात येत आहे. एकूण खोदकामात झालेली वाढ प्रत्यक्षात काम करताना मृदू खडक म्हणून वर्गीकरण झाल्याने ही वाढ मृदू खडक या बाबीत झालेली आहे.

प्रत्यक्षात काम करताना वर्गीकरणानुसार माती खोदकामाच्या परिमाणात 14,40,788 घमी घट झालेली दिसते एवढेच परिमाण मृदू खडकात वाढलेले आहे. ही वाढ निव्वळ भूस्तर वर्गीरकरणामुळे झालेली दिसते.

याप्रमाणे मृदू खडकात विविध घटकांच्या बदलामुळे 19,07,062 घमी व निव्वळ वर्गीकरणामुळे 14,40,788 घमी अशी एकूण 33,47,860 घमी वाढ झालेली आहे.

तक्ता-2 खोदकामातील घटकनिहाय वाढ व वाढीची कारणे

(परिमाण घमी)

अ. क्र.	वाढीचे कारण	खोदकामातील घटक						एकूण
		पुच्छ कालवा	आगमन कालवा	जलरोधी खंदक	सांडवा	प्रपात	इतर	
(1)	खोदकामात तळ रुंदीत व बाजूच्या उतारामध्ये झालेले बदल	7,68,362	1,94,656	54,927	-38,872	0	0	9,79,073
(2)	आगमन व पुच्छ कालव्याच्या लांबीत वाढ	94,493	2,57,764	0	0	0	0	3,52,257
(3)	पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे	1,96,403	78,834	0	0	0	0	2,75,237
(4)	नवीन घटकांचा समावेश केल्याने	0	0	0	0	74,291	2,26,188	3,00,479
	एकूण	10,59,258	5,31,254	54,927	-38,872	74,291	2,26,188	19,07,046

टिप: विविध घटकांच्या परिमाणात ज्या कारणास्तव वाढ झाली आहे त्याबाबतची आकडेमोड क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली आहे (परिशिष्ठ क्र.11).

4.3 निव्वळ भूस्तर वर्गीकरणामुळे मृदू खडकाच्या परिमाणात झालेली वाढ 14,40,788 घमी:

तक्ता क्र.1 मध्ये दिलेल्या तपशीलानुसार प्रत्यक्षात काम करताना निव्वळ भूस्तर वर्गीकरणामुळे मातीत खोदकामात घट 14,40,788 घमीने झाली. पर्यायाने एवढेच परिमाण मृदू खडकात वाढलेले आहे.

भुस्तर वर्गीकरणबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे-

(a) निविदा अंतर्गत काम सुरु करण्याचे आदेश दि.21.8.2008 चा आहे. धरण संरेखेवर घेण्यात आलेल्या विंधन विवरांचा भुतांत्रीक अहवाल क्र.731 म.सं.सं.च्या दि.29.12.2008 पत्रान्वये अन्वये अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळास पाठविण्यात आला होता. ही विंधन विवरे धरण संरेखेवर केंव्हा घेण्यात आली. याबाबतचा तपशील क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही.

(b) धरणाच्या पायाचे mapping व पुच्छकालव्याचे mapping बाबत म.सं.सं च्या अहवाल क्र.732 दि.29.12.2008 अन्वये अ.अ. उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळास पाठविण्यात आला. यासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, म.सं.सं., नाशिक यांनी दि.19.12.2008 रोजी प्रकल्प स्थळाची पहाणी केली, सांडवा व पुच्छकालव्याचे पाहणीच्या दिवशीच्या खोदकामाच्या स्थितीनुसार (Left side excavated face chainage 0 to1185 m व Right side excavated face chainage 0 to525 m, 765 m ते 945 m) भूस्तराचे Geological mapping चा अहवाल वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी दिला.

(c) म.सं.सं.च्या Geological mapping अहवालानुसार सांडवा, आगमन कालवा, पुच्छ कालवा व जलरोधी खंदक या सर्व घटकांच्या खोदकामाचे वर्गीकरण करून मृदू खडकाचे तलांक ठरविले असल्याचे कलम 38 च्या प्रस्तावाबाबतच्या कागदपत्रानुसार दिसून येत आहे. तथापी मोजणी पुस्तकातील खोदकामांच्या मोजमापांवर मृदू खडकाचे वर्गीकरण भुवैज्ञानिकाच्या mapping नुसार केले आहे याबाबत नोंद मोजमाप पुस्तिकेत नाही. तसेच क्षेत्रीय कार्यकारी अभियंता यांनी भूस्तर निहाय खोदकामाचे मोजमाप नोंदविण्याकरीता भूस्तराचे वर्गीकरण केल्याचे मोजमाप पुस्तिकेत दिसून येत नाही. याबाबत अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांनी पत्र क्र.5604, दि.13.11.2017 च्या

पत्रान्वये मोजमाप पुस्तकामध्ये भूस्तर वर्गीकरणाबाबत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही असे कळविले आहे.

(d) WAPCOS कडून दि.20.2.2012 रोजी प्राप्त सांडव्याच्या संकल्पन टिप्पणीत भूस्तराबाबत पुढील प्रमाणे नमूद आहे-

The overburden strata is of alluvium type containing sand, sand mixed with silt and kankar, yellow soil etc., which is permeable and flexible in nature. The safe bearing capacity 20 t/m^2.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे-

(i) मंजुर तांत्रिक अंदाजपत्रकात व त्यानुसार निविदेत पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाकरिता मातीत 16,64,298 घमी व मृदु खडकात 33,965 घमी अशी एकूण 16,98,263 घमी परिमाणाची तरतूद आहे. तांत्रिक अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी आगमन व पुच्छ कालव्यात विंधनविवरे घेण्यात आली असती तर आढळलेल्या भुस्तरानुसार भूस्तर निहाय खोदकामाची अचूक तरतूद संबंधीत भूस्तरात करणे शक्य झाले असते.

(ii) Geological mapping नुसार सांडवा, आगमन कालवा, पुच्छ कालवा व जलरोधी खंदक व नदी रुंदीकरण या सर्व घटकांकरिता खोदकामात मऊ खडकाचे वर्गीकरण करण्यात आले आहे असे कलम-38 च्या विविध प्रस्तावात नमूद आहे. तथापी जलरोधी खंदक व आगमन कालव्याचे mapping म.सं.सं. कडून देण्यात आलेले नाही. तसेच पुच्छकालव्याच्या उजव्या face चे सा.क्र.525 ते 765 मी व 945 मी ते 1185 मी या सा.क्र. चे mapping करण्यात आलेले नाही.

मोजमापाच्या नोंदीनुसार पुच्छ कालवा व आगमन कालवा अनुक्रमे सर्वसाधारण 0.45 मी व 1.40 मी मातीनंतर उर्वरीत बहूतांश खोलीत मृदू खडकाची मोजमापे आहेत. तसेच जलरोधी खंदकात सुमारे 0.90 मी मातीनंतर उर्वरित खोलीत मृदू खडकाची मोजमापांची नोंद आहे.

Geological mapping च्या नकाशात नमूद मृदु खडकाचे तलांक व मोजमापातील नमूद मृदु खडकाचे भूतलांकात यामध्ये तफावत दिसून येत आहे **(परिशिष्ट क्र.13).**

4.4 खोदकामात तळरुंदीत व बाजूच्या उतारामध्ये झालेले बदल (वाढ 9,63,018 घमी):

(a) <u>पुच्छ कालवा (वाढ 7,68,362 घमी):</u>

तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात पुच्छ कालव्याची तळरुंदी 102 मी आहे. माती व मृदू खडकाच्या खोदकामासाठी बाजूचे उतार 1:1 इतके आहेत.

प्रत्यक्षात पुच्छ कालव्याचे खोदकाम मंजूर संकल्पनानुसार करण्यात आलेले आहे. या संकल्पनानुसार पुच्छ कालव्याची तळरूंदी 140 मी , बाजुचे उतार 2:1 व पुच्छ कालव्याच्या सा.क्र.210 मी वर 4.70 मी ऊंचीचा प्रपात आहे. या बदलांमुळे मंजूर अंदाजपत्रकाचे तुलनेत पुच्छ कालव्याच्या खोदकामात 7,68,362 घमी वाढ झालेली आहे.

(b) <u>आगमन कालवा (वाढ 1,94,656 घमी):</u>

तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात पुच्छ कालव्याची तळरुंदी 102 मी आहे. माती व मृदू खडकाच्या खोदकामासाठी बाजूचे उतार 1:1 इतके आहेत.

प्रत्यक्षात आगमन कालव्याचे काम तळरुंदी 120 मी व खोदकामाचे बाजुचे उतार 1:1 यानुसार करण्यात आले आहे. आगमन कालव्याच्या रुंदीत मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत वाढ झाल्याने खोदकाम परिमाणात 1,94,656 घमी वाढ झालेली आहे.

<u>सांडवा, आगमन व पुच्छ कालव्याच्या सर्वसाधारण आराखडा व सविस्तर संकल्पनांचा तपशील:</u>

सांडवा, आगमन व पुच्छ कालव्याच्या सर्वसाधारण आराखडा व सविस्तर संकल्पनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे-

(i) तांत्रिक अंदाजपत्रकाच्या वेळी प्रकल्पाचा संकल्पीत पूर 3143 घमी/सें इतका होता. या करीता 12 x 8 मी आकाराचे 6 वक्राकार दरवाजे असलेल्या 102मी. लांबीच्या सांडव्याची तरतूद करण्यात आलेली होती.

(ii) प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा अ.अ. (दरवाजे) म.सं.सं.नाशिक कडून दि.18.12.2008 रोजी क्षेत्रिय कार्यालयास पाठविण्यात आला व त्यास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग अमरावती यांनी दि. 31.01.2009 अन्वये मान्यता दिली. मंजुर आराखड्यात तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील तरतुदींच्या तुलनेत खालील प्रमाणे बदल झाले आहेत.

संकल्पित पूर विसर्ग 3143 घमी/से ऐवजी 3969.65 घमी/से झाला. या सुधारीत पूर विसर्गानुसार 12 x 8 m आकाराच्या 6 वक्रद्वारांऐवजी 12 x 8 m आकाराची 8 वक्रद्वारे प्रस्तावित करण्यात आले. सांडव्याची लांबी 87 मी. ऐवजी 117 मी झाली.

सदर आराखड्यामध्ये पुच्छ कालव्याची संरेखा व संकल्पन क्षेत्रिय स्तरावर करणेबाबत व EDA, Fall, Protection wall या बांधकामांची संकल्पने अ. अ. (दगडी धरण) म.सं.सं. नाशिक यांचेकडून करून घेण्याच्या सुचना होत्या.

(iii) अ.अ.उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ कार्यालयाने दि.23.12.2008 रोजी पुच्छ कालव्याचे संकल्पनास मान्यता दिली. या संकल्पनात पुच्छकालव्याकरिता पुढील प्रमाणे परिगणके मान्य करण्यात आली. Q =3980 m3/s, BW= 117 m, Velocity =2.67 m/s, side slope 0.5:1, Bed slope 1: 3500 व 8.475 m Fall at RD 210 m.

(iv) दि.12.01.2009 रोजीच्या निरिक्षण टिप्पणीमध्ये अ. अ. उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ यांनी कामाच्या प्रारंभापासून पुच्छकालव्याची तळरूंदी 120 मी असल्याने सदर 120 मी रूंदी मान्य असल्याचे व बाजुचे उतार (0.5:1) हे भुस्तराच्या अनुषंगाने अपुरे आहेत असे अभिप्राय नमूद करुन बाजुचे उतार 2:1 घेऊन याप्रमाणे संकल्पन तपासण्याच्या सुचना दिलेल्या होत्या.

(v) दरम्यान सदर प्रकल्पाचे काम अ.अ. अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला या कार्यालयाकडे हस्तांतर झाले. अ.अ. अकोला पाटबंधारे मंडळ यांनी दि.13.04.2009 च्या पत्रानुसार अ.अ. (द.ध.) मसंसं यांना पुच्छकालव्याच्या खोदकामाची सद्यस्थिती कळविली (तळरुंदी 120 मी., बाजू उतार 2:1, पाण्याचा प्रवेग 2.56 मी/से, FSD 11.20 मी व तळपातळी संकल्पनानुसार पुर्ण). तसेच सदर पत्रात सा.क्र. 80 व 210 मी वर अनुक्रमे दोन प्रपातांची शिफारस करून पुच्छ कालव्यामधील भुस्तराचा विचार करता संकल्पित FSD व प्रवाह वेग जास्त असल्याने सर्वसाधारण आराखडा सुधारित करण्याविषयी विनंती केली होती.

(vi) अ.अ. (द.ध.) मसंसं यांनी दि.6.3.2009 व दि.29.4.2009 च्या पत्राद्वारे मऊ भुस्तराच्या कारणास्तव संकल्पनाबाबत असमर्थता दर्शवून सांडवा व पुच्छकालव्याचे संकल्पन केंद्रिय जलआयोगामार्फत घ्यावे असे अ. अ. अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांना कळविले.

(vii) अ.अ. (दरवाजे) मसंसं यांनी दि.30.4.2009 च्या पत्रान्वये पुच्छकालव्याच्या संकल्पनाबाबत अ. अ. अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांना पुढीलप्रमाणे कळविले-

a) 'सांडवा व इतर घटकांचे सविस्तर संकल्पन केंद्रीय जल आयोगाकडून प्राप्त करुन घेण्याबाबत अधीक्षक अभियंता (दध) मसंसं, नाशिक यांनी दि.6.3.2009 अन्वये कळविले आहे.

b) वरीलप्रमाणे संकल्पन प्राप्त झाल्यानंतरच Tail Water Level व संबंधित बाबी विचारात घेऊनच पुच्छ कालव्याचे सविस्तर संकल्पन करणे शक्य होणार आहे.

c) पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 150 मी.वर 8.475 मी. च्या प्रपाताऐवजी सा.क्र.80 मी. व सा.क्र.210मी. वर प्रत्येकी 4 मी.चे प्रपात सकृतदर्शनी योग्य वाटतात.

d) पुच्छ कालव्यामधील क्षेत्रिय स्तरावरुन संकल्पीत FSD-11.20 मी. व प्रवेग 2.51 प्रतिसें, भूस्तराचा विचार करता जास्त वाटत असल्याचे क्षेत्रिय स्तरावरुन कळविण्यात आलेले आहे. तथापी पुच्छ कालव्याची तळरुंदी वाढवून व FSD कमी करण्याचा विचार करुन प्रवाहाचा वेग 2 ते 3 मी. प्रतिसे दरम्याने ठेवणे उचित ठरेल. मात्र केंद्रीय जल आयोगाकडून सांडवा संकल्पन झाल्यानंतरच याबाबी निश्चित करणे योग्य राहील असे वाटते.'

(viii) अ. अ. अकोला पाटबंधारे मंडळ यांनी दि.04.05.2009 रोजी अ.अ. (दरवाजे) मसंसं च्या दि.30.04.2009 च्या पत्रातील अभिप्रायास अनुसरून कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग या कार्यालयाने सादर केलेल्या पुच्छ कालव्याच्या संकल्पन प्रस्तावास मान्यता दिली. यानुसार पुच्छकालव्याची सुधारित परिगणके पुढील प्रमाणे आहेत.

(ix) BW= 140 m , Velocity =2.42 m/s, side slope 2 :1, Bed slope 1: 3500, FSD 10.20 मी., 4.0 m Fall at RD 80 m.& , 4.70 m Fall at RD 210 m.

(x) सांडव्याचे सविस्तर संकल्पन WAPCOS कडून प्राप्त होऊन दि.20.02.2012 रोजी मान्य करण्यात आले. या संकल्पनानुसार EDA च्या तळपातळीनुसार अ. अ., उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ यांनी दि.10.02.2012 चे निरिक्षण टिप्पणीनुसार सा.क्र. 80 मी वरिल प्रपात वगळला.

(xi) WAPCOS कडून प्राप्त झालेले सा.क्र. 210 मी वरील प्रपाताचे सविस्तर संकल्पन दि.01.04.2014 रोजी मुख्य अभियंता (जसं), अमरावती यांनी मान्य केले.

रा.तां.स.स. ची निरिक्षणे:

(i) अ.अ. दरवाजे म.सं.स. यांनी दि.30.04.2009 च्या पत्रान्वये सुचविल्यानुसार केंद्रीय जल आयोगाकडून सांडवा व इतर घटकांचे सविस्तर संकल्पन प्राप्त झाल्यानंतरच Tail Water Level व संबंधित बाबी विचारात घेऊनच पुच्छ कालव्याचे सविस्तर संकल्पन करणे शक्य होणार होते.

WAPCOS कडून प्राप्त सांडव्याचे सविस्तर संकल्पनास दि.20.2.2012 रोजी क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी मान्यता दिली आहे.

तथापी सांडव्याच्या संकल्पन होणेपुर्वीच क्षेत्रिय स्तरावर पुच्छ कालव्याचे संकल्पन करून पुच्छकालव्याचे बहुतांश खोदकाम सन 2009 मध्ये पुर्ण झालेले होते.

(ii) सांडव्याचे सविस्तर संकल्पनानंतर Stilling basin च्या end weir ठिकाणी पाणी पातळी, पुच्छ कालव्याचे विविध काटछेद व प्रपाताचे स्थान वेगवेगळे ठिकाण विचारात घेऊन end weir ते पुच्छ कालव्याच्या शेवटापर्यंत water profile काढून पुच्छ कालव्याच्या खोदकाम परिमाणाबाबत पर्यायी अभ्यास करणे आवश्यक होते. या पर्यायी अभ्यासवरून ज्या पर्याया करिता पुच्छकालव्याचे खोदकाम कमीत कमी

येईल तो पर्याय निवडून पुच्छकालव्याचे काटछेद व प्रपाताची जागा ठरवीणे अपेक्षित होते.

तथापी याप्रमाणे पर्यायी अभ्यास न करता पुच्छकालव्याची तळरुंदी 140 मी. व सा.क्र.210 मी वर 4.875 मी ऊंचीचा प्रपात निश्चित करून पुच्छ कालव्याचे खोदकाम केलेले आहे.

(iii) क्षेत्रिय स्तरावर पुच्छ कालव्याचे संकल्पन करताना प्रत्यक्षातील आढळलेला भुस्तरानुसार (कामाच्या मोजमापानुसार खोदकामात सर्वसाधारण 0.50 मी माती व उर्वरित 15 मी खोलीचा मदू खडकाचा स्तर) बाजुचे stable slope न ठरविता सरसकट 2:1 या बाजुचे उतार निश्चित करून संकल्पन अंतिम करण्यात आले व त्याप्रमाणे काम झाल्याचे मोजमाप पुस्तिकेतील नोंदीवरून दिसते.

(iv) क्षेत्रिय स्तरावर दि.23.12.2008 ला संकल्पित पुच्छ कालव्याची तळरूंदी 117मी व प्रवाह वेग 2.67 मी/से होती. प्रत्यक्षात खोदकामाच्या वेळेस तळरूंदी 120 मी असताना प्रवाह वेग 2.56 मी/से असल्याचे अ. अ. अकोला पाटबंधारे मंडळाच्या दि.13.04.2009 च्या पत्रात नमूद आहे. म.सं.सं. च्या दि.30.04.2009 च्या पत्रात प्रवाह वेग 2 ते 3 मी/से दरम्यान असावा असे नमूद असताना क्षेत्रिय स्तरावर दि.4.5.2009 रोजी संकल्पन करून पुच्छ कालव्याची तळरूंदी 120 मी वरून 140 मी करण्यात आली.या सुधारित संकल्पनामुळे प्रवाह वेगात मात्र 0.14 मी./से (प्रवाह वेग 2.56 मी./से. ऐवजी 2.42 मी./से.) घट झालेली दिसते. तसेच F.S.D. 1.0 मी.ने कमी (11.20 मी. वरुन 10.20 मी.) झालेली आहे. एकूण खोदकामाची खोली विचारात घेता रुंदी वाढवून F.S.D. कमी झाल्याने तांत्रिक दृष्ट्या फारसा उपयोग झालेला नाही. तथापी खोदकामाचे परिमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

(v) तांत्रिक अंदाजपत्रकात पुच्छकालव्याची 1000 मी लांबी व आगमन कालव्याची लांबी 360 मी. इतकी होती. प्रत्यक्षात क्षेत्रिय परिस्थितीनुसार पुच्छकालव्याची लांबी 1125 मी. व आगमंन कालव्याची लांबी 720 मी. झालेली आहे. तांत्रिक अंदाजपत्रक तयार करतांना पुच्छकालवा व आगमन कालवा कमीतकमी लांबीचे राहतील याबाबत पर्यायी अभ्यास झालेला दिसून येत नाही.

(vi) प्रकल्प मध्यम प्रकारचा आहे. धरणाचे शीर्ष कामाच्या संकल्पनास मुख्य अभियंता स्तरावरुन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी आगमन व पुच्छ कालव्याच्या संकल्पनास अधीक्षक अभियंता स्तरावरुन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. आगमन व पुच्छ कालव्याचा संकल्पित विसर्ग 3669 घमी/सेंकद विचारात घेता आगमन व पुच्छ कालव्याचे संकल्पन मुख्य अभियंता स्तरावरुन मंजूर होणे आवश्यक होते.

4.5 <u>आगमन व पुच्छ कालव्याच्या लांबीत वाढ (वाढ 3,52,257 घमी):</u>

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात आगमन व पुच्छ कालव्याची लांबी अनुक्रमे 360 मी. व 1000 मी. इतकी होती.

(a) <u>आगमन कालवा (2,57,767 घमी):</u>

क्षेत्रिय मुख्य अभियंता यांच्या दि.05.02.2012 क्षेत्रिय पाहणी दरम्यान पुराचे पाणी सांडव्याकडे वळविण्याकरीता आगमन कालव्याची लांबी 360 वरुन 720 मी. पर्यंत एवढी करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. या वाढीव लांबीमुळे आगमन कालव्याचे खोदकामात 2,57,764 घमी इतकी वाढ झालेली आहे.

(b) पुच्छ कालवा (94,493 घमी):

प्रत्यक्षात काम करतांना क्षेत्रिय परिस्थितीनुसार पुच्छ कालव्याची लांबी 1125 मी. झाली. यामुळे पुच्छ कामाच्या खोदकामात 94,493 घमी वाढ झालेली आहे.

4.6 पुच्छ व आगमन कालव्याच्या खोदकामाच्या खोलीतील फरकामुळे झालेली वाढ (वाढ 2,75,237 घमी):

(a) पुच्छ कालव्यात झालेली वाढ: (1,96,403 घमी)

तांत्रिक मंजूर अंदाजपत्रकात पुच्छ कालव्याची एकूण लांबी 1000 मी. असून खोदकामाचे परिमाण सा.क्र.0 ते 360 मी. करीता जमिनीचा सरासरी तलांक 334.00 मी. व सा.क्र.360 ते 1000 मी. करीता जमिनीचा सरासरी तलांक 326.40 मी. व पुच्छ कालव्याची तळपातळी (formation level) 316.00 मी. विचारात घेऊन परिमाण परिगणित करण्यात आले होते.

पुच्छ कालव्याचे काम तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकातील संरेखेनुसार करण्यात येत आहे, तरीही मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार जमिनीच्या तलांकात मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत आहेत. मोजमाप पुस्तकातील नोंदणीनुसार पुच्छ कालव्याच्या सा.क्र.0 ते 360 मी. पर्यंत जमीनीचा सरासरी तलांक 336.99 मी. (मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत 2.99 मी.ने वर) व सा.क्र. 360 ते 1000 मी. पर्यंत जमीनीचा सरासरी तलांक 333.25 मी. (मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत 6.85 मी. ने वर) ऐवढे आहे. (परिशिष्ठ क्र.3).

तसेच पुच्छ कालव्याचे खोदकाम सा.क्र. 0 ते 210 मी. करिता तळपातळी तलांक 323.80 मी. व सा.क्र. 210 ते 1000 मी. पर्यंत तळपातळी तलांक 319.10 मी. करिता करण्यात आले आहे. या प्रमाणे येणारा weighted formation level 320.09 मी. हा मंजूर अंदाजपत्रकात विचारात घेतलेल्या formation level पेक्षा 4.09 मी. उंच आहे.

याप्रमाणे प्रत्यक्ष काम करताना पुच्छ कालव्यातील जमिनीच्या तलांक तांत्रिक अंदाजपत्रकात नमूद जमिनीच्या तलांकापेक्षा वर (Higher) आहे. या कारणास्तव पुच्छ कालव्याची तळपातळी 4.09 मी. वर होऊनही मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत पुच्छ कालव्याचे खोदकामात 1,96,403 घमी वाढ झालेली आहे.

(b) आगमन कालव्यात झालेली वाढ (78,834 घमी):

तांत्रिक मंजूर अंदाजपत्रकात आगमन कालव्याच्या खोदकामासाठी (लांबी 360 मी.) जमिनीचा सरासरी तलांक 334.40 मी. नुसार परिमाण परिगणित करण्यात आले होते. प्रत्यक्षात पुच्छ कालव्याचे काम तांत्रिक अंदाजपत्रकातील संरेखेनुसारच असूनही मोजमाप पुस्तीकेतील नोंदणीनुसार जमिनीच्या तलांकात मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत आहेत. मोजमाप पुस्तकातील नोंदणीनुसार जमीन सरासरी भूतलांक 338.36 मी. (मंजूर अंदाजपत्रकाच्या तुलनेत 3.96 मी.ने वर) ऐवढी आहे (परिशिष्ठ क्र.3).

या तलांकाच्या बदलामुळे मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत आगमन कालव्याचे खोदकामात 78,834 घमी इतकी वाढ झालेली आहे.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:

(i) कामाच्या चालू देयकांच्या मोजमाप पुस्तकात खोदकामाकरिता सा.क्र.निहाय (chainage wise) दोन्ही काठावरचे भू-तलांक नुसार सरासरी तलांक (average ground level) नोंदवून खोदकामाचे परिमाण परिगणीत करण्यात आलेले आहेत.

(ii) (a) क्षेत्रिय कार्यलायाकडून दि.14.1.2009 च्या प्रथम चालु देयकासोबत जोडलेले पुच्छ कालव्याचे 1125 मी लांबी व 30 मी अंतराचे काटछेद प्राप्त झालेले आहेत. या काटछेदात

पुच्छकालव्याची तळरूंदी 120 मी. (Top width सुमारे 180 मी.) व बाजुचे उतार 2:1 इतके दर्शविण्यात आलेले आहेत. या काटछेदांमध्ये नमूद जमिनीचे तलांक पुर्ण रूंदीत नसून मात्र दोन्ही काठाचे तलांक नमूद आहेत. या काटछेदांवर Field/Level Book संदर्भ देण्यात आलेले नाहीत.

(b) पुच्छ कालव्याच्या काठावरचे तलांक घेऊन देयक अदा करण्याबाबत अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांचे पत्र क्र.5604, दि.13.11.2017 अन्वये पुढील प्रमाणे कळविले आहे (परिशिष्ठ क्र.8)-

"सदर प्रकल्पाच्या बांधकामाचे कार्यारंभ आदेश दि.21.8.2008 रोजी पुर्णा प्रकल्प विभाग, अचलपूर यांचेकडून देण्यात येऊन त्यांनी कामास सुरुवात केली. त्यानंतर दि.24.12.2008 ला प्रकल्प उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र.1 यांचे कडे हस्तांतरित झाला, हस्तांतरण अहवालावरुन पुच्छ कालव्याचे खोदकाम पूर्ण लांबीमध्ये 1125 मी. व 120 मी. रुंदी मध्ये तळ पातळीपर्यंत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्यक्ष काम सुरु करतांना घेण्यात आलेले क्षेत्रीय पुस्तक पुर्णा प्रकल्प विभाग यांचेकडेच असणे क्रमप्राप्त होते. परंतु ती क्षेत्रीय पुस्तेके हस्तांतरित झाल्याचे अहवालावरुन दिसून येत नाही. त्यानंतर देयकाची अदायगी करण्याकरिता कालवे विभाग, अमरावती यांनी प्रत्यक्षात खोदलेल्या काठाचे (Bank) तलांक घेऊन त्यानुसार काटछेद काढून त्यानुसार क्षेत्रीय पुस्तकामध्ये नोंद घेतली. सदर नोंद पुस्तक क्र.459 ची प्रमाणित प्रत हस्तांतरित करण्यात आली".

(c) प्रकल्पाचे शीर्ष कामे दि.24.12.2008 रोजी कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर यांचेकडून कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र.1, अमरावती यांचेकडे महामंडळाच्या पत्रानुसार हस्तांतरित करण्यात आलेलें आहे.

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांचे गोपनीय पत्र क्र.107, दि.13.11.2017 अन्वये प्रकल्पाच्या शीर्षकामाचे हस्तांतरण करण्याबाबत कागदपत्रे रा.तां.स.स. कार्यालयास प्राप्त झालेली आहेत (परिशिष्ठ क्र.7). सदर कागदपत्रानुसार उपविभागीय अभियंता, पुर्णा मध्यम प्रकल्प उ.वि.क्र.4, चांदूरबाजार यांनी स.अ.-1, उर्ध्व वर्धा कालवा, उ.वि.10, धामणगांव यांना दि.24.12.2008 रोजी हस्तांतरणाच्या इतर कागदपत्रासह one Level book हस्तांतरित केल्याचे दिसून येत आहे.

(d) तसेच कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांच्या वरिल पत्रासोबत आगमन व पुच्छ कालव्याच्या आराखड्यास मंजूर प्रदान करण्याबाबत अधीक्षक अभियंता, उर्ध्व प्रकल्प मंडळ, अमरावती यांना दि.23.12.2008 रोजी सादर झालेला अनुपालन अहवालाची प्रत प्राप्त झाली आहे. सदर अनुपालन अहवालात पुच्छ कालव्याचे 1155 मीटर लांबी व 150 मी. रुंदी करिता 15 मी. x 15 मी. मधील Block level देण्यात आलेली असून पुच्छ कालव्याची तळ रुंदी 120 मी. व खोदकामाचे बाजूचे उतार 1:1 नुसार खोदकामाचे परिमाण 13,59,026 घमी इतके काढण्यात आल्याचे दिसून येत आहे.

(iii) वरिल अ.क्र. (ii) (c) व (d) मध्ये नमूद कागदपत्रावरुन पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर यांनी पुच्छ कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण करुन जमिनीचे तलांक घेतल्याचे दिसून येत आहे. या करिता अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांनी दि.13.11.2017 च्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे देयकाची अदायगी करण्याकरिता काठाचे तलांक घेऊन अदायगीची करण्याची कार्यवाही करणे योग्य वाटत नाही.

(iv) सद्य:स्थितीत आगमन कालव्याचे काम 120 मी. व पुच्छकालव्याचे काम 140 मी. तळ रुंदीनुसार झालेले आहे. तथापी या सुधारित तळ रुंदीनुसार क्षेत्रिय कार्यालयाकडून काटछेद उपलब्ध झालेले नाहीत.

(v) *"शीर्ष कामांचा विविध घटकांसाठी तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकात विचारात घेतलेल्या जमिनीच्या तलांकाच्या सर्वेक्षण/नोंदणीबाबत क्षेत्र कार्यपुस्तक (Field/level book) उपलब्धत नाही"* असे अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती यांचे पत्र क्र.5604, दि.13.11.2017 अन्वये कळविले आहे **(परिशिष्ठ क्र.8).**

(vi) क्षेत्रीय स्तरावरून खोदकाम परिमाणाच्या वाढीबाबत कलम-38 च्या विविध प्रस्तावांत आगमन व पुच्छ कालव्याच्या जमिन तलांक बदल्यामुळे खोदकामाच्या वाढीव परिमाणाबाबत कोणताही उल्लेख आढळून येत नाही.

(vii) पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर विभागाकडून शीर्ष कामाचे हस्तांतरण दि.24.12.2008 रोजी करण्यापुर्वी पुच्छ कालव्याचे सविस्तर जमिनीचे तलांक घेतलेले दिसून येत आहे. देयकांच्या अदायगी करिता मोजमाप पुस्तकात नोंदविलेले जमिनीचे तलांक पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर विभागाकडून घेतलेल्या तलांकापेक्षा फार उंच (Average ground level 2.58 m. higher) दिसून येत आहे **(परिशिष्ठ क्र.12).**

4.7 <u>(a) COT च्या बाजुचे Side Slopes मध्ये बदल झाल्याने व बाजुस Berm प्रस्तावीत केल्याने झालेली वाढ (34,880 घमी):</u>

अंदाजपत्रकात बाजु उताराकरिता मातीत 1:1 व मान करिता 0.25:1 या बाजु उताराऐवजी प्रत्यक्ष काम करताना सुमारे 0.90 मी खोलीच्या मातीत व 18 मी खोलीच्या मदू खडकात (या दोन्ही भुस्तरात) एकसारख्या 1:1 बाजु उतारानुसार काम करण्यात आलेले आहे. मंजुर अंदाजपत्रकामध्ये side berm ची तरतुद नव्हती तथापी COT च्या खोदकामात काही लांबीमध्ये दोन्ही बाजूस 3.0 मी रुंदीचे Berm देण्यात आलेले आहेत. या बदलांमुळे 34,880 घमी परिमाणात वाढ झाली आहे.

<u>(b) जलरोधी खंदकाच्या (COT) तळपातळीत बदल (वाढ 20,047 घमी):</u>

तांत्रिक मंजूर अंदाजपत्रकात Partial C.O.T. असून C.O.T. ची खोली F.R.L.व G.L.च्या फरकाच्या 1.25 पट प्रस्तावित आहे. तसेच C.O.T. च्या एकूण 2100 मी.लांबीपैकी 1560 मी.लांबीत तळ रुंदी 3 मी. व उर्वरित 540 मी.लांबीत तळरुंदी 5 मी. इतकी प्रस्तावित होती.

प्रत्यक्षात काम करतांना अ.अ. (माती धरण) म.सं.स. यांचेकडून दि.22.5.2009 व दि.28.09.2010 नुसार प्राप्त संकल्पनानुसार C.O.T. चे संपुर्ण लांबीत खोदकाम तळरुंदी 5 मी. प्रमाणे करण्यात आले आहे. तसेच धरणाच्या काही लांबीत C.O.T. चे तळपातळीत वाळूचे थर लागल्याने C.O.T.ची खोली वाढली. त्यामुळे तांत्रिक अंदाजपत्रकाच्या तुलनेत खोदकाम परिमाणात 20,047 घमी वाढ झालेली आहे.

4.8 <u>सांडव्याच्या पायापातळीत व रुंदीत, अनुत्सारीत भागाच्या लांबीत बदल (बचत (-) 38,872 घमी):</u>

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकाच्या वेळेस सांडवा अनुत्सारीत भागाचे सविस्तर संकल्पन करण्यात आलेले नव्हते. अंदाजपत्रकात 102 मी लांबीचा सांडवा व दोन्ही बाजुकडील 50मी लांबीच्या अनुत्सारीत भागाकरीता सरासरी जमिनीचा तलांक 337.70 मी. पासून पाया करिता 26.86 मी. खोली (म्हणजे पाया तलांक 310.84 मी.) यानुसार खोदकामाचे परिमाण परिगणीत करण्यात आलेले होते.

WAPCOS कडून प्राप्त सांडव्याचे सविस्तर संकल्पनास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी दि.20.02.2012 रोजी पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे.या मंजुर संकल्पनानुसार 117 मी. लांबीचा सांडवा व दोन्ही बाजुकडील 10 मी. लांबीच्या अनुत्सारीत भागाचा पाया तलांक 317.90 मी. इतका आहे. या संकल्पनात झालेल्या बदलानुसार खोदकाम केल्याने परिमाणात 38,872 घमी बचत झालेली आहे.

नवीन घटकांच्या समावेशामुळे झालेली खोदकामातील वाढ (वाढ 3,00,479 घमी):

(a) **नदीपात्र रुंदीकरण (2,26,188 घमी):**

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात पुच्छ कालव्याच्या खालील बाजूस नदीच्या रुंदीकरणाकरीता तरतूद नव्हती. पुच्छ कालवा व नदीच्या संगमापासून नदीचे काटछेद पुराचे पाणी वाहून नेण्यास पुरेसा नसल्याने 700 मी.लांबीच्या नदी रुंदीकरणाच्या क्षेत्रिय प्रस्तावास का.सं.वि.पा.वि.मं.नागपूर यांनी दि.18.07.2009 च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. नदी रुंदीकरणामुळे खोदकामाच्या परिमाणात 2,26,188 घमी इतकी वाढ झाली.

रा.तां.स.स.ची निरिक्षणे:

नदीचे रूंदीकरण 700 मी लांबीकरिताच कसे आवश्यक होते याबाबत water profile काढून अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही.

(b) **प्रपात (74,291 घमी):**

मंजूर तांत्रिक अंदाजपत्रकात पुच्छ कालव्याच्या संरेखेत प्रपाताची तरतूद नव्हती. प्रत्यक्षात सा.क्र.210 मी. वर 4.70 मी.चा प्रपात बांधण्यात आला आहे. या बांधकामाच्या खोदकामामुळे खोदकामात 74,291 घमी इतकी वाढ झालेली आहे.

4.10 निविदेतील अनुसूची-ब मधील खोदकामाच्या विविध बाबी, निविदा शर्त क्र.38, निविदा शर्त क्र.55 व Specifications यांच्या सुसंगतेबाबत:

(a) निविदेतील अनुसूची-ब मधील खोदकामाच्या विविध बाबीचा तपशील:

बाब क्र.1-

Excavation in soil in wet or dry condition including site clearance including removing thick and tall grass shrubs weeds etc., dewatering, diversion of river, dressing the side slopes and bed to the specified grade and line and utilisation disposing the excavated material as and where direct with all leads and lifts including spreading in uniform layer, dry compaction at spoil bank etc. complete as per specifications and as directed by Engineer-in-charge.

बाब क्र.2-

Excavation in soil rock in wet or dry condition including site clearance including removing thick and tall grass shrubs weeds etc., dewatering, diversion of river, dressing the side slopes and bed to the specified grade and line and utilisation disposing the excavated material as and where direct with all leads and lifts including spreading in uniform layer, dry compaction at spoil bank etc. complete as per specifications and as directed by Engineer-in-charge.

बाब क्र.2(B)-

Excavation in hard rock with blasting in wet or dry condition including dewatering, diversion of river, dressing the side slopes and bed to the specified grade and line and utilisation/disposing the excavated material as and where directed with all leads and lifts including spreading in uniform layer, dry compaction at spoil bank etc. complete as per specifications and as directed by Engineer-in-charge.

(b) स्विकृत निविदेच्या सर्व साधारण शर्तीतील शर्त क्र.38-

Clause 38

Claim for qualities entered in the tender on estimates.

1) *Quantities shown in the tender are approximate and no claim shall be entertained for quantities of work executed being either more or less than those entered in the tender or estimate=*

2) *Quantities in respect of the several items shown in the Schedule "B" Part of the tender are approximate and no revision in the tendered rates shall be permitted in respect of any items so long as subject to any special provision contained in the*

Executed quantity of individual item of Structural Steel for gate
Total Executed quantity of all items of structural steel for gate work taken together

and will be paid by revising the rate of individual item as per clause 38 (2), subject to the provision that the revision of rate will be applicable only for the quantity of individual item executed beyond the tendered quantity.

In case the executed quantity is less than 75% of the total quantity of all masonry items taken together these will be treated on similar lines as in case(1) and (2) .

Case 4: Where total quantity of all concrete items taken together exceeds 125% of the total tendered quantities of all concrete items quantity in excess of 125% of total tendered quantity will be distributed in the Ratio of

Executed quantity of individual item of concrete
Total executed quantity of all concrete items taken together

and will be paid by revising the rate of individual item as per clause 38(2), subject to the provision that the revision of rate will be applicable only for the quantity of individual item executed beyond the tendered quantity.

In case the executed quantity is less than 75% of the total quantity of all concrete items taken together, these will be treated on similar lines as in case (1) and (2) above.

For payment of quantities in excess of 125% of tendered quantity for items other than excavation, masonry and concrete items, provision of clause 38(2) of B-1 Tender Form will be applicable.

(d) निविदेच्या खंड 2 (Specifications) मध्ये खोदकामाच्या Specifications मध्ये Soft strata व Hard strata याबाबत तपशील पुढील प्रमाणे आहे-

Specifications

2.5 CLASSIFICATIONS:
2.5.1 The classification of strata shall be as under

I. Soft Strata
This shall include all kinds of rock or shale, indurated clay, soil, silt, sand and gravel, soft average and hard murrum and any other materials which can best be removed with a shovel after loosening with a pick and/or bar. It shall also include isolated boulders up to 0.1 cubic meter each, which does not need blasting and could be removed with a pick/bar and shovel.

II. HARD STRATA:
This shall include all rock occurring in masses in all types of geological formations which could best be removed by blasting. It shall also include rock which owing to the proximity of buildings/structures/electric lines public roads or for any other reasons has to be cut by means of chisels or wedges. It shall also include boulders in mass and isolated boulders over 0.1 cubic meter each, which requires blasting or waging and breaking for easy removal. Merely the use of explosives in excavation shall not be considered a reason for classification in hard strata unless regular blasting is clearly necessary in the opinion of the Engineers in charge. The hardness of strata or material to be excavated presence of different type of geotechnical constitutes requiring increased drilling efforts, consumption of explosives, labor and use of machinery shall not be considered as reason for claim/increase in contract rates.

In case of the disputes over the classifications of strata meet with during execution the decision of the Engineer incharge will be final.

रा.तां.स.स.चे अभिप्राय:

(i) निविदेतील शर्त क्र.38 मधील उपशर्त क्र.5 नुसार खोदकाम, बांधकाम व संधानकाच्या बाबींच्या निविदे परिमाणाच्या 125% पेक्षा जास्त परिमाणासाठी अदायगी Special Conditions of Contract च्या शर्त क्र.55 नुसार नियमन करण्यात येईल असे नमूद आहे.

specifications prescribing different percentage of permissible variation the quantity of the items does not exceed the tender quantity by more than 25 percent and so long as the value of the excess quantity beyond this limit at the rate of the items specified in the tender is not more than Rs.50,000/-

3) *The contractor shall if ordered in writing by the Engineer so to do, also carry out any quantities in excess of the limit mentioned in sub clause (2) hereof on the same condition as and in accordance with the specification in the tender and at the rates (i) derived from the rates entered in the current schedule of rates and in the absence of such rates (ii) at the rate prevailing in the market. The price variation clause shall be applicable with the initial basic index existing on the date when quantity exceeds/decrease more than 25% in Schedule "B" The rates once decided as above shall not be revised till completion of the quantity under that item.*

4) *In case the quantity of any item reduces by more than 25% the rates of such items shall be revised as per provisions of sub clause 3 of clause 38. However the total payment of such item shall be limited to seventy five percent of estimated cost of that item put to tender.*

5) *The provisions this clause will not be applicable to the additional anticipated items payment for quantities in excess of 125% for tendered quantities, in respect of excavation, masonry and concrete, will be regulated as per the provisions of Para 55 of special conditions of contract.*

6) *For quantities above 125% VIDC's prior sanction shall be essential VIDC's Decision on the issue will be binding on the contractor.*

(c) स्विकृत निविदेतील Special Conditions of Contract मधील शर्त/कलम 55-

MODE OF PAYMENT OF THE QUANTITIES OF EXCAVATION GATE WEIR AND CONCRETE ITEMS EXECUTED IN EXCESS OF 125%

Clause No.38 of B-1 Tender Form pertains to payment of quantities of different items of Schedule 'B' in Excess of 125% of the tendered quantities it is to be clarified that in the case of items of excavation in soft strata and hard strata, in the present tender, this clause will become applicable only if the total quantity of excavation (i.e. quantity given in Schedule 'B' of Excavation in soft strata plus quantity given for Excavation in hard strata) exceeds by 125% during excecution. For payment of quantity executed in excess of 125% of total quantity of excavation following procedure will apply.

***Case 1** : Where quantity of excavation executed, exceeds 125% of total of tendered quantity of items of excavation in soft strata and in hard strata, but quantity executed of any one of the individual items is less than or equal to the tendered quantity for that item, all the excess quantity beyond 125% of total tendered quantity in items of excavation in soft strata and hard strata, taken together, will be paid by revising the rate of only that item where excess has occurred.*

***Case 2:** Where total quantity of excavation executed for both items (excavation in soft strata and hard strata) exceeds 125% of the total tendered quantity of items of excavation, quantity in excess of 125% of total tendered quantity will be distributed in the Ratio of*

$$\frac{\text{Executed quantity of individual item of excavation}}{\text{Total Executed quantity of items of excavation in soft strata and hard strata}}$$

and will be paid by revising the rate of individual item as per clause 38(2), subject to the provision that the revision of rate will be applicable only for the quantity of individual item executed beyond the tendered quantity.

In case the executed quantity is less than 75% of the total quantity of excavation in soft strata and hard strata, these will be treated on similar lines as in case (1) and (2) above.

***Case 3:** Where total quantity of all structural steel for gate work items taken together exceeds 125% of the total tendered quantities of all masonry items quantity in exceeds of 125% of total tendered quantity will be distributed in the Ratio of*

(ii) Special Conditions of Contract चे शर्त-55 लागू करण्याचे अनुषंगाने निविदेच्या शर्त-55 मध्ये मृदू खडकाचा (Soft Rock) सरळ उल्लेख नाही. सदर शर्तीत Soft Strata व Hard Strata चा उल्लेख करण्यात आलेला आहे.

(iii) निविदेतील खोदकाम बाबीच्या Specifications मध्ये Soft Strata व Hard Strata च्या तपशीलानुसार निवेदितील बाब क्र.1 माती खोदकाम व बाब क्र.2 मृदु खडक खोदकाम या दोन्ही बाबी soft strata मध्ये अंतर्भूत होतात. निविदेतील बाब क्र.2(B) कठीण खडकातील खोदकाम Hard strata मध्ये अंतर्भूत होते.

(iv) वरिल (i) ते (iii) प्रमाणे निविदेतील शर्त क्र.38 व 55 चा मसूदा व निविदेतील मऊ स्तर व कठिण स्तर याबाबतच्या specification चा एकत्रित विचार करता अनुसूची 'ब' मधील खोदकामाच्या विविध बाबी शर्त क्र.38 व 55 चा मसुदा सुसंगत दिसून येत आहे.

5.0 शासन पत्र क्र.सुप्रमा-2017/ 831/ (प्र.क्र.281/2017)/ म.प्र., दि.28.9.2017 अन्वये दि.16.11.2017 रोजीच्या रा.तां.स.स. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार वासनी मध्यम प्रकल्पा संबंधात दिलेल्या चौकशी आदेशाच्या अनुषंगाने तयार केलेला चौकशी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर.

(रा. च. हुमणे)
अधीक्षक अभियंता
तथा सदस्य सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-1,
नाशिक

(र. ए. उपासनी)
मुख्य अभियंता,
म.सं.सं., नाशिक व सदस्य,
रा.तां.स.स.-1

(दि. रा. जोशी)
मुख्य अभियंता,
नियोजन व जलविज्ञान, नाशिक व
सदस्य, रा.तां.स.स.-1

(डॉ.संजय बेलसरे)
मुख्य अभियंता (जसं)
व सहसचिव, मंत्रालय मुंबई व
सदस्य, रा.तां.स.स.-1, नाशिक

(अ. मु. खापरे)
महासंचालक
संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी, नाशिक
तथा अध्यक्ष, रा.तां.स.स.-1

...क्रमशः...

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता



महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 **(वासनी मध्यम प्रकल्प,)** संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा

चौकशी अहवाल

नोव्हेंबर- 2017

विषय: भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्या सन 2015-16 या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र.3.3 (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात शासनाच्या दि.26.9.2017 अन्वये दिलेल्या चौकशी आदेशास अनुसरून रा.तां.स.स.चा चौकशी अहवाल.

अनुक्रमणिका

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्र.
(1)	टिप्पणी	1 ते 27
	परिशिष्टे	
(1)	शासन पत्र दि.28.9.2017	A 1 ते 2
(2) /1	शिर्ष कामाचा आराखडा दर्शविणारा नकाशा	A 3
(2) /2	प्रकल्पाची ठळक वैशिष्टे	A 4 ते 6
(3)	आगमन व पुच्छ कालव्यातील भूतलांक व तळपातळ्यांचा मोजमाप पुस्तक व अंदाजपत्रकानुसार तुलनात्मक तक्ता	A 7 ते 10
(4)	तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 11
(5)	प्रारुप निविदा तयार करणारे, तपासणारे व मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 12
(6)	कलम 38 चा प्रस्ताव तयार करणारे, तपासणारे व मंजूरी /मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नावांची यादी	A 13 ते 16
(7)	कार्यकारी अभियंता, प्रकल्प अन्वेषण विभाग, अमरावती (तत्कालीन कार्यकारी अभियंता,पूर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपुर) यांनी दि.13.11.2007 रोजी रा.तां.स.स. कार्यालयास सादर केलेली काही कागदपत्रे	
(7)/1	कंत्राटदारास देण्यात आलेले पत्र दि.16.12.2008 व दि. 22.12.2008	A 17 ते 18
(7)/2	Level book हस्तांतरित करण्याबाबत चे कागदपत्र	A 19
(7)/3	क्षेत्रीय कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग यांनी पुच्छ कालव्यातील घेकतलेले सविस्तर भूतलांक व त्यानुसार खोदकामाची आकडेमोड	A 20 ते 21
(8)	अ.अ., उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांचे दि.13.11.2017 रोजीच्या पत्राची प्रत	A 22 ते 24
(9)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 चे उप समिती नेमण्याबाबतचे आदेश	A 25
(10)	मा.महासंचालक यांचे दि.5.10.2017 च्या आदेशान्वये नेमेलेल्या उप समितीचा अहवाल	A 26 ते 33
(11)	शिर्ष कामाच्या विविध घटकाच्या खोदकामाच्या परिमाणात ज्या कारणास्तव वाढ झाली आहे त्याबाबतची क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेली आकडेमोड	A 34
(12)	आगमन व पुच्छ कालव्यातील पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अमरावती ने काम सुरू करण्यापुर्वी घेतलेले भूतलांक व मोजमाप पुस्तकातील भूतलांक यांचा तुलनात्मक तक्ता	A 35 ते 36
(13)	Geological mapping लंबछेद व मोजमाप पुस्तकानुसार मृदू खडकाचे तलांक दर्शविणारे लंबछेद	A 37ते 38

परिशिष्टे

महाराष्ट्र शासन

ईमेल पत्ता :- domedium.wrd@maharashtra.gov.in
क्रमांक :सुप्रमा- २०१७/८३१/(प्र.क्र.२८१/२०१७)/म.प्र.

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुबई-४०० ०३२
दिनांक :२८/०९/२०१७

अ., रा.तां.स.स. कार्यालय, नाशिक
दि. 12 OCT 2017

प्रति,
महासंचालक,सं.ग्र.ज.सं.सु., महा. अभि. संशोधन संस्था,तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक.

विषय -: भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र. ३.३ (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात दि. २६/०९/२०१७ रोजी झालेल्या लोकलेखा समितीसमोरील प्रधान सचिव/ सचिव यांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीने दिलेले चौकशी चे आदेश...

विषयांकित प्रकरणी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद ३.३ "कंत्राटदारास जादा [illegible] कंत्राटातील कलमाचा अयोग्य अमल आणि धरण स्थळाच्या पोच रस्त्याच्या रखरखावासाठी अग्राह्य प्रदान यामुळे कंत्राटदारास रु. २२.१४ कोटी जादा देण्यात आले", यासंदर्भात लोकलेखा समितीसमोर दिनांक २६/०९/२०१७ ला प्रधान सचिव यांची साक्ष घेण्यात आली.

वरील प्रकरण हे अमरावती जिल्ह्यातील वासनी मध्यम प्रकल्पातील धरण बांधकामाच्या निविदे बाबतचे असून सदर निविदेत सांडवा, मातीकाम व शीर्ष दिशादर्शकाचे बांधकाम इ. घटकांचा समावेश आहे.लोकलेखा समितीसमोरील साक्षीच्या वेळी सदर प्रकरणी कंत्राटदारास निविदा शर्त क्र. ५५ ऐवजी शर्त क्र. ३८ अन्वये अदा केलेल्या रकमेच्या अनुषंगाने स.तां.स.स.नाशिक, यांचे मार्फ़त चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.तरी सदर प्रकरणी निम्नलिखित मुद्दे विचारात घेवून सत्वर चौकशी करून कोणत्याही परिस्थितीत दि. ०५/११/२०१७ पूर्वी समितीचा अहवाल शासनास सादर करावा.

१) वरील निविदेतील कामांचे अंदाजपत्रक तयार करतांना trial pit द्वारे भूस्तर वर्गीकरण करून विविध स्तरातील खोदकामाचे परिमाण निश्चित करण्यात आले होते किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी. तसेच प्रत्यक्षात काम करतांना मृदू खडकातील खोदकामाच्या परिमाणात अनुसूची 'ब' मधील नमूद परिमाणापेक्षा ब-याच प्रमाणात वाढ झाली असून परिमाणात झालेल्या मोठ्या वाढीच्या कारणांची सखोल चौकशी करण्यात यावी. सदर प्रकरणी अंदाजपत्रक तयार करणे व तांत्रिक मान्यता देणे इ. संदर्भात करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीची चौकशी करण्यात यावी. तसेच अंदाजपत्रक तयार करणा-या व तांत्रिक मंजुरी देणा-या अधिक-यांची नावे अहवालात नमूद करावीत.

२) सदर कामाच्या तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाच्या आधारे प्रारूप निविदेचा मसुदा तयार करतांना अनुसूची 'ब' मधील खोदकामाच्या विविध बाबी विचारात घेवून त्यांच्याशी सुसंगत निविदा शर्त क्र. ३८ व ५५ चा मसुदा तयार करण्यात आला होता का? प्रारूप निविदा कागदपत्रे मंजूर करणा-या अधिका-यांनी याबाबत काय निर्देश दिले होते, याबाबत प्रकरणाशी संबंधित धारिकांची तपासणी करून निविदा शर्त क्र. ५५ व अनुसूची 'ब' मधील खोदकामाच्या बाबी यामधील विसंगतीस जबाबदार असणा-या संबंधित अधिका-यांची नावे नमूद करावीत.

३) निविदा कलम ३८ अंतर्गत वाढीव परिमाणाच्या रकमेमुळे निर्माण झालेले आर्थिक/भौतिक दायित्व मंजूर करणा-या अधिका-यांनी सदर प्रकरणी निविदा शर्त क्र. ५५ नुसार कार्यवाही न करण्याची कारण मिमांसा व याबाबत विधिज्ञाचा सल्ला घेतला असल्यास त्याचा तपशील इ. बाबत चौकशी करण्यात यावी. कलम ३८ अंतर्गत वाढीव परिमाणाचा व यामुळे निर्माण झालेल्या आर्थिक दायित्वाच्या प्रस्ताव मंजूर करणा-या अधिका-याची नावे नमूद करावीत.


४) वरील मुद्यांमध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अनियमितता घडल्याचे निष्पन्न झाल्यास प्रत्येक बाबीस जबाबदार असणा-या अधिका-यांविरुद्ध नेमकी कोणत्या स्वरूपाची कार्यवाही करावी याबाबत समितीने स्पष्ट अभिप्राय अहवालात नमूद करावेत.

५) चौकशीची कार्यवाही सुरू करण्यापूर्वी समितीने प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची समक्ष पाहणी करावी.

(म.ई.घरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाही करिता अग्रेषित

१. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ ,नागपूर.
२. मुख्य अभियंता ,जलसंपदा विभाग,अमरावती.
३. अधीक्षक अभियंता ,ऊर्ध्व वर्धा सिंचन मंडळ ,अमरावती.
४. मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ



परिशिष्ट- 2/2

WASANI (BK.) MEDIUM PROJECT

Tq. Achalpur Dist:- Amravati

Comaparative Salient Features

Sr. No.	Particulars	As per Ist Revised Estimate	As per IInd Revised Estimate
1	Name Of Project	Wasani Bk Medium Project	Wasani Bk Medium Project
	a) State	Maharastra	Maharastra
	b) District	Amravati	Amravati
	c) Taluka	Achalpur	Achalpur
2	Location	D/S of confluence of Sapan & Pili River.	D/S of confluence of Sapan & Pili River.
	a) Toposheet No.	55G/7; 55G/8; 55G/11; 55G/12	55G/7; 55G/8; 55G/11; 55G/12
	b) Latitude	21 09' 50"	21 09' 50"
	c) Longitude	77 32' 21"	77 32' 21"
3	River Basin		
	a) Name of River	Sapan	Sapan
	b) Basin	Tapi	Tapi
	c) Sub-basin	Purna	Purna
4	Catchment Area		
	a) Total Catchment Area(Free)	427 sqkm	427 sqkm
	b) Classification	Good	Good
	c) Upstream reservation	213 sqkm	213 sqkm
	d) Free catchment area	214 sqkm	214 sqkm
5	Rainfall (Average annual)		
	a) Raingauge Station	Achalpur, Chikhaldara, Chandur Bz.	Achalpur, Chikhaldara, Chandur Bz.
	b) 75% Depandable man soon run off	16.692 cm	16.692 cm
6	Yield		
	a) 50% depandable yield		
	b) 75% depandable yield	48.712 Mm^3 (Excluding P.M. & Regenration)	48.712 Mm^3 (Excluding P.M. & Regenration)
	c) Net yield for planning	52.192 Mm^3	52.192 Mm^3
	d) Annual utilisation	31.52 Mm^3	31.52 Mm^3
	e) Spill over	20.672 Mm^3	20.672 Mm^3
7	Losses		
	a) a) Evaporation losses	3.708 Mm^3	3.708 Mm^3
	b) b) Silt losses	7.71 Mm^3	7.71 Mm^3
8	Storage Capacity		
	a) Dead Storage	2.934 Mm^3	2.934 Mm^3
	b) Live Storage	19.657 Mm^3	19.657 Mm^3
	c) Gross Storage at F.R.L.	22.591 Mm^3	22.591 Mm^3

Sr. No.	Particulars	As per Ist Revised Estimate	As per IInd Revised Estimate
9	Controlling levels		
	a) N.B.L.	320.235 m	320.235 m
	b) D.S.L.	328.815 m	328.815 m
	c) M.D.D.L.	330.55 m	330.55 m
	d) F.R.L.	337.90 m	337.90 m
	e) H.F.L.	337.90 m	337.90 m
	f) T.B.L.	339.90 m	339.90 m
	g) Crest R.L.	329.90 m	329.90 m
10	Details of Dam		
	a) Type of Dam	Rolled filled Earthen Dam.	Rolled filled Earthen Dam.
	b) Max. Height of Dam	19.77 m	19.77 m
	c) Length of Dam	2100.00 m	2100.00 m
	d) Length of Spillway	87.00 m	123.00 m
	I) Overflow Section	87.00 m	117.00 m
	II) Nonoverflow Section	50.00 m	24.00 m
11	Spillway		
	a) Type of Spillway	Side ogee Shaped	Side ogee Shaped
	b) Gated/ Non Gated	Gated 12.00x 8.00m 6 No	Gated 12.00x 8.00m 8 No
	c) Location	Side Spillway	Side Spillway
	d) Length	87.00 m.	123.00 m.
12	Head Regulator.		
	a) No of Regulator	1 No	1 No
	b) Location	On right bank side @ RD 1135.m.	On right bank side @ RD 1135.m.
	c) C.B.L.At Start	328.43 m.	328.43 m.
13	Canal		
	a) Total Length of R.B.C.	13.24 Km.	13.24 Km.
	b) Total length of L.B.C.	Nil	Nil
	c) Irrigation by R.B.C.	4317.00 Ha.	4317.00 Ha.
	d) Irrigation by L.B.C.	Nil	Nil
	e) Discharge at Canal Head	4.22 Cumecs	5.29 Cumecs
	f) Bed Width	5.95 m	3.75 m
	g) F.S.D.	1.35 m	1.80 m
14	Land aquisition		
	1) Head works		
	a) Private land	401.31 Ha	485.85 Ha
	b) Govt land	136.00 Ha	58.95 Ha
	c) Forest land	22.00 Ha	24.38 Ha
	Total Land	559.31 Ha	569.18 Ha
	2) Canal		
	a) Private land	60.00 Ha	215.44 Ha
	b) Govt land	5.00 Ha	5.00 Ha
	c) Forest land	0.00 Ha	0.00 Ha
	Total Land	65.00 Ha	220.44 Ha
	3) Submergence Ratio	10.61 %	10.61 %
	4) Gaothan affected	2 No (Borgaon Dori, Borgaon Peth.)	3 No (Borgaon Dori, Borgaon Talni, Borgaon Peth (Partial))

Sr. No.	Particulars	As per Ist Revised Estimate	As per IInd Revised Estimate
15	Details of Command.		
	a) G.C.A.	5892.00 Ha	5892.00 Ha
	b) C.C.A.	5043.00 Ha	5043.00 Ha
	c) I.C.A.	4317.00 Ha	4317.00 Ha
	d) Taluka Benefited	Achalpur, Daryapur & Anjangaon.	Achalpur, Daryapur & Anjangaon.
	e) Talukawised Village Benifited.	Achalpur 16 No, Daryapur 4 No & Anjangaon 3 No.	Achalpur 16 No, Daryapur 4 No & Anjangaon 3 No.
16	Cost Economics.		
	a) Total Estimated Cost	Rs. 19782.513 Lakhs	Rs. 75167.26 Lakhs
	b) Gross storage	22.591 mm³	22.591 mm³
	c) Total Utilisation	31.52 mm³	31.52 mm³
	d) Cost / Ha of Irricabal area	Rs. 4.58 Lakhs	Rs. 17.41 Lakhs/Ha.
	e) Submergence Ratio	10.61 %	10.61 %
	f) B.C.Ratio	1.502	(0.564) 0.49
	g) Economical Rate of Return.	12.14 %	(2.36)% 5.88%

Prep. By.

Sub-Divisional Engineer,
Minor Irrigation Const. Sub-Division,
Achalpur.

Executive Engineer,
Amravati Medium Project Division,
Amravati.

Superintending Engineer,
Upper Wardha Irrigation Circle,
Amravati.

WASANI PROJECT

I) Comparision Of Ground level As per Technical Sanction Estimate & As recorded in M.B. (Meter)						II) Comparision Of Formation level As per Technical Sanction Estimate & As recorded In M.B. (AS per Design) (Meter)				
APPROACH CHHANEL										
Sr.No.	Chainage	GL As per T. S. Estimate	GL As per MB	Diff (GL As per MB - GL As per T.S.)		Sr.No.	Chainage	F.L. As per T. S. Estimate	F.L. As per MB	Diff (F.L. As per MB - F.L As per T.S.)
1	300.00	334.40	335.18	0.775		1	300.00	329.90	329.90	0.000
2	285.00	334.40	335.98	1.577		2	285.00	329.90	329.90	0.000
3	270.00	334.40	336.08	1.683		3	270.00	329.90	329.90	0.000
4	255.00	334.40	336.80	2.400		4	255.00	329.90	329.90	0.000
5	240.00	334.40	336.65	2.245		5	240.00	329.90	329.90	0.000
6	225.00	334.40	337.24	2.838		6	225.00	329.90	329.90	0.000
7	210.00	334.40	337.90	3.498		7	210.00	329.90	329.90	0.000
8	195.00	334.40	339.36	4.958		8	195.00	329.90	329.90	0.000
9	180.00	334.40	338.15	3.753		9	180.00	329.90	329.90	0.000
10	165.00	334.40	338.53	4.127		10	165.00	329.90	329.90	0.000
11	150.00	334.40	339.39	4.985		11	150.00	329.90	329.90	0.000
12	135.00	334.40	339.21	4.806		12	135.00	329.90	329.90	0.000
13	120.00	334.40	339.16	4.764		13	120.00	329.90	329.90	0.000
14	105.00	334.40	339.64	5.237		14	105.00	329.90	329.90	0.000
15	90.00	334.40	339.56	5.155		15	90.00	329.90	329.90	0.000
16	75.00	334.40	339.44	5.036		16	75.00	329.90	329.90	0.000
17	60.00	334.40	339.38	4.981		17	60.00	329.90	329.90	0.000
18	45.00	334.40	339.46	5.062		18	45.00	329.90	329.90	0.000
19	30.00	334.40	339.62	5.215		19	30.00	329.90	329.90	0.000
20	15.00	334.40	339.66	5.260		20	15.00	329.90	329.90	0.000
21	0.00	334.40	339.13	4.730		21	0.00	329.90	329.90	0.000
AVARAGE		334.400	0.000	3.956		AVARAGE		329.900	329.900	0.000
1)Average Paid Ground level (Ch.0 to 360) as per MB = 338.856 mtr 2) Difference in G.L.3.956 Mtr.						1)Average Paid Ground level (Ch.0 to 360) as per MB = 329.90 mtr 2) Difference in G.L.0.0Mtr.				

III) Comparision Of Ground level As per Technical Sanction Estimate & As recorded in M.B. (Meter)

IV) Comparision Of Formation level As per Technical Sanction Estimate & As recorded In M.B. (AS per Design) (Meter)

TAIL CHHANEL

Sr.No.	Chainage	GL As per T. S. Estimate	GL As per MB	Diff (GL As per MB - GL As per T.S.)
1	0.00	334.00	339.13	5.13
2	15.00	334.00	339.40	5.40
3	30.00	334.00	339.41	5.41
4	45.00	334.00	339.15	5.15
5	60.00	334.00	339.34	5.34
6	75.00	334.00	339.14	5.14
7	90.00	334.00	338.78	4.78
8	105.00	334.00	338.85	4.85
9	120.00	334.00	338.23	4.23
10	135.00	334.00	338.35	4.35
11	150.00	334.00	337.91	3.91
12	165.00	334.00	334.41	0.41
13	180.00	334.00	334.65	0.65
14	195.00	334.00	335.27	1.27
15	210.00	334.00	335.38	1.38
16	225.00	334.00	335.98	1.98
17	240.00	334.00	336.42	2.42
18	255.00	334.00	334.62	0.62
19	270.00	334.00	335.71	1.71
20	285.00	334.00	334.37	0.37
21	300.00	334.00	334.93	0.93
22	315.00	334.00	335.72	1.72
23	330.00	334.00	335.52	1.52
24	345.00	334.00	335.46	1.46
25	360.00	334.00	335.60	1.60
AVERAGE		334.400	336.87	2.99

Sr.No.	Chainage	F.L. As per T. S. Estimate	F.L. As per MB	Diff (F.L. As per MB - F.L As per T.S.)
1	0.00	316.00	323.90	7.90
2	15.00	316.00	323.90	7.90
3	30.00	316.00	323.90	7.90
4	45.00	316.00	327.89	11.89
5	60.00	316.00	327.89	11.89
1) विषयांकीत प्रकरणी रा.तां.स.स. -1 च्या दि.20.11.2017 च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या अहवालात परिच्छेद क्र.4.10 मध्ये निविदेतील परिमाण विचलन विषयक शर्ती (सर्वसाधारण शर्त क्र. 38 व विशेष शर्त क्र. 55) बाबत सविस्तर स्पष्टीकरण केल्याप्रमाणे खोदकामाच्या वाढीव परिमाणाकरिता निविदेतील विशेष शर्त क्र.55 लागू करणे आवश्यक ठरते.

खोदकामाच्या विविध बाबींचे परिमाणाकरिता या अहवालाच्या परि. 3.2 मध्ये नमूद केलेल्या भूस्तर वर्गीकरण व विशेष शर्त क्र. 55 लागू करुन परिगणना करण्यात आली आहे.

2) वासनी प्रकल्पाच्या विविध ठिकाणी प्रत्यक्षात झालेल्या कामांची मोजमापांची तपासणी करण्याकरिता अधीक्षक अभियंता,रा.तां.स.स. कार्यालय नाशिक यांच्या नेतृत्वात दोन कार्यकारी अभियंता व दोन उप विभागीय अभियंता चे विशेष पथक नेमण्यात आले

(**परिशिष्ठ क्र.**4). या पथकाने दि.14.2.2018 ते दि.17.2.2018 दरम्यान संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या विभागाकडे असलेले D.G.P.S. (Differntial Global Positioning System) यंत्रणेच्या सहाय्याने प्रकल्पाच्या विविध घटकांचे (आगमन, पुच्छ कालवा व नदी रूंदीकरण) मोजमाप तपासले (**परिशिष्ठ क्र.** 5).तसेच दि.5.3.2018 रोजी महासंचालक मेरी तथा अध्यक्ष, रा.तां.स.स.-1 व अधीक्षक अभियंता व सदस्य सचिव, रा.तां.स.स.-1 नाशिक यांनी प्रकल्पाची पाहणी केली.

3) COT, Stripping and Drainages for Dam, Spillway,guide wall and Fall in Tail Chanel या घटकांकरिता खोदकाम फेब्रुवारी 2009 ते एप्रिल 2016 या कालावधीत झालेले असून सद्य:स्थितीत या सर्व घटकांचे बांधकाम जमिन पातळीच्या वर आलेले आहे. येथील खोदकामाचे मोजमापे भूमीगत (Hidden measurements) असल्याने तपासणे शक्य झाले नाही. या करिता चौकशी अहवालात या घटकांच्या खोदकामाचे परिमाण मोजमाप पुस्तकाप्रमाणेच जसे च्या तसे विचारात घेण्यात आलेली आहे.

4) आगमन, पुच्छ कालवा व नदी रूंदीकरण या घटकांचे खोदकामाचा मोजमाप तपासणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

(A) <u>मोजमापा बाबत केलेली कार्यवाही:</u>

(i) D.G.P.S. (Differntial Global Positioning System) यंत्रणेचे Base unit व Rover unit असे दोन भाग आहेत. Base unit बांधकामाच्या ज्या भागाचे तलांक निश्चितपणे माहित आहेत तिथे स्थापित करण्यात येतो. विविध ठिकाणांचे तलांक व अंतरे मोजण्याकरिता Rover unit त्या त्या ठिकाणी ठेवण्यात येतो. क्षेत्रिय सर्वेक्षणा दरम्यान हे दोन्ही units चे एकूण उपलब्ध असलेले 24 Global Positioning System Satellites पैकी काही Satellites सोबत link होऊन तलांक व अंतर बाबत माहिती नोंदविली जाते. या यंत्रणेच्या computer software च्या सहाय्याने नोंदविलेल्या माहितीच्या आधारे विविध ठिकाणचे तलांक व अंतरे (Reduced levels व distances) प्राप्त होतात.

D.G.P.S. (Differntial Global Positioning System) यंत्रणेचे सहाय्याने प्रकल्पाच्या विविध घटकांचे (आगमन, पुच्छ कालवा व नदी रूंदीकरण) मोजमाप घेण्याकरिता यंत्रणेचा Base unit धरणाच्या डाव्या तिरावरील अनुत्सारीत भागाच्या शिर्ष तलांकांवर स्थापित करून खोदकामाच्या विविध सुमारे 1000 ठिकाणी Rover unit च्या सहाय्याने तलांक व अंतरे मोजण्यात आलेली आहेत.

(ii) आगमन, पुच्छ कालवा व नदी रूंदीकरण च्या संरेखेवर प्रत्येकी 30 मी.अंतरावर तसेच त्या अंतरावरच्या काटछेदावर measuring tape च्या सहाय्याने सर्वेक्षणासाठी विविध ठिकाण निश्चित करण्यात आले.त्यानंतर D.G.P.S. यंत्रणे द्वारे खोदकामाच्या डाव्या व उजव्या काठावरिल तलांक व तळपातळीचे तलांक व अंतर घेण्यात आले.

पुच्छकालव्याच्या सा.क्र.0 ते 57 मी. व सा.क्र.210 ते 274.13 मी. या लांबीत सांडवा, EDA, Guide wall व पुच्छ कालव्यातील प्रपात चे बांधकाम प्रगतीत आहे. या घटकांचे बांधकाम जमिन पातळीच्या वर झाले असल्याने बांधकामाकरिता झालेल्या पायाच्या खोदकामाचे तलांक घेणे शक्य झाले नाही.

मात्र सा.क्र. 57 ते 210 मी या भागात पुच्छकालव्याच्या तळरुंदीत तळतलांक घेण्यात आले. या भागात डाव्या व उजव्या बाजूच्या NOF लगत पोहोच रस्ता व दोन्ही बाजूस अतिरीक्त साहित्याचे spoil banks असल्याने मूळ जमिनीचे तलांक घेणे शक्य झाले नाही.

(iii) पुच्छ कालव्याच्या सा.क्र.274 ते 1110 मी.,आगमन कालवा -1 व आगमन कालवा -2 च्या काही लांबीत, डाव्या व उजव्या काठावर खोदकामातून निघालेले अतिरीक्त साहित्याचे spoil banks तसेच हे साहित्य टाकण्याकरिता भूसपाटीकरण (खोदकाम व भराव) केलेले आहे. अशा लांबीत D.G.P.S. यंत्रणाद्वारे विशेष पथकाने सद्य:स्थितीतील काठांवरचे, लगतच्या क्षेत्रात घेतलेले तलांक व सर्वेक्षणादरम्यान केलेल्या निरिक्षण नोंदणीच्या आधारे या लांबीत काठांवरचे भूतलांक व खोदकामाची Top width निश्चित करण्यात आली.

(iv) नदी रुंदीकरण झालेल्या लांबीत नदीच्या मध्य भागापासून सुमारे 30 मी. ते 50 मी.अंतरावर खाजगी वहित शेती आहे तसेच शेती साठी तयार केलेले बांध, काटेरी कुंपण व झाडे आहेत. वरिल कारणास्तव ज्या रुंदीत नदीचा भूभाग आढळून आला तेवढ्याच रुंदीत नदीकाठापर्यंत DGPS च्या सहाय्याने भूतलांक व अंतरे मोजण्यात आली.

(B) <u>परिमाण गणना बाबत केलेली कार्यवाही:</u>

(a) <u>पुच्छ कालवा व आगमन कालवा -1 :</u>

(i) पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर यांच्याकडून दि.24.12.2008 पासून प्रकल्पाचे काम उर्ध्व वर्धा कालवे विभाग.1, अमरावती यांचे कडे हस्तांतरित झाले. कार्यकारी अभियंता, प्रकल्क्प अन्वेषण विभाग अमरावती (तत्कालीन कार्यकारी अभियंता पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग, अचलपूर) यांनी दि.13.11.2017 रोजी रा.तां.स.स. कार्यालयाला सादर केलेल्या कागदपत्रांनुसार प्रकल्प हस्तांतरणाचे वेळेस उर्ध्व वर्धा कालवे विभाग.1, अमरावती यांना एक तलांक पुस्तिका (Level Book) हस्तांतरित केली होती असे कळते.

(ii) दि.14.1.2009 रोजी पुच्छ कालव्याचे खोदकामाचे मोजमाप व अदायगी द्वितीय चालू देयका अंतर्गत उर्ध्व वर्धा कालवा विभाग क्र.1,अमरावती यांचे कडून करण्यात आली या देयकाची मोजमाप पुस्तिका व काटछेद तपासले असता पुच्छ कालव्याच्या काटछेदांमध्ये मध्य रेषेच्या डाव्या व उजव्या बाजूस 60 व 75 मी. अंतरावर प्रत्येकी दोन असे एकुण चार भूतलांक नमूद केलेले आहेत तथापी मधल्या 120 मी. रुंदीत भूतलांक नमूद केलेले नाहीत. नोंदविलेल्या चार भूतलांकांची सरासरी तलांक नुसार खोदकामाचे परिमाण परिगणित करून भुगतान करण्यात आले. खोदकामाचे परिमाण परिगणित करण्याकरिता पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपूर कडून हस्तांतरित झालेल्या तलांक पुस्तिकेतील भूतलांकाचा विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे खोदकामाच्या परिमाणात वाढ झाल्याचे दिसून आले.

(iii) वासनी प्रकल्पाच्या तलांक पुस्तिकेची झेरॉक्स प्रत कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जलसंधारण विभाग, अमरावती (तत्कालीन उपविभागीय अभियंता, पुर्णा मध्यम प्रकल्प उपविभाग क्र.4 चांदूर बाजार) यांनी दि.22.2.2018 च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांना दिली. दि.5.3.2018

च्या प्रकल्प भेटीच्या वेळेस सदर तलांक पुस्तिकेची झेरॉक्स प्रत रा.तां.स.स.ला सुपुर्त करण्यात आली.

सदर पुस्तिकेत पुच्छ कालव्याच्या व आगमन कालवा-1 च्या (0 ते 300 मी.) संरेखेवर 150 मी. रुंदीत प्रत्येकी 15 मी. अंतरावर पुच्छ कालवा व आगमन कालवा-1चे खोदकाम करण्यापुर्वीचे भूतलांक नोंदविलेले आहेत.

(iv) क्षेत्रिय कार्यालयाकडून पुच्छ कालव्याच्या माहे एप्रिल 2009 मध्ये करण्यात आलेले सुधारीत संकल्पन (तळरुंदी 120 वरून 140 मी. करण्याबाबत) प्रस्तावाची प्रत प्राप्त झाली आहे. सदर प्रस्तावासोबत पुच्छ कालवा व आगमन कालवा-1 चा L-section प्राप्त झालेला आहे. सदर नकाशात पुच्छ कालवा व आगमन कालवा-1 चे डाव्या व उजव्या तिराचे भूतलांक दर्शविण्यात आले आहेत, तथापी दर्शविण्यात आलेले डावे व उजवे तिर मध्य रेषेपासून किती अंतरावर आहेत हे नमूद नाही.

वरिल (i) ते (iv) तपशील विचारात घेऊन त्याच्या उपलब्ध मूळ भू-पातळीबाबत तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर-

a. पुच्छ कालवा सा.क्र.274.13 ते 1110 मी. व आगमन कालवा-1 मधील खोदकामाची परिगणना विशेष पथकाने D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले दोन्ही काठावरचे व तळपातळीचे तलांकाच्या आधारावर परिमाणाची गणना करण्यात आलेली आहे.

b. विशेष पथकाला पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 0 ते 274.13 मी. पर्यंत काठावरचे तलांक घेणे शक्य झाले नव्हते या करिता पुर्णा मध्यम प्रकल्प उपविभाग क्र.4च्या तलांक पुस्तिकेत या लांबीकरिता नमूद भुतलांक व D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले तळपातळीचे तलांकाच्या आधारावर परिमाणाची गणना करण्यात आलेली आहे.

(b) <u>आगमन कालवा-2:</u>

आगमन कालवा-2 करिता पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपुर या कार्यालयाकडून खोदकाम करण्यापुर्वीचे भूतलांक घेण्यात आलेले नव्हते, या मुळे या भागाची तलांक पुस्तिका तसेच L-section नकाशा उपलब्ध नाही.

वरिल तपशिल विचारात घेता आगमन कालवा-2 मधील खोदकामाची परिगणना विशेष पथकाने D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले दोन्ही काठावरचे व तळपातळीचे तलांकांच्या आधारावर करण्यात आलेली आहे.

(c) <u>नदी रुंदीकरण:</u>

नदी रुंदीकरण करिता केलेल्या खोदकामाचे परिमाण काढण्याकरिता काम करण्यापुर्वी मोजमाप पुस्तकात नोंदविलेले भूतलांक व DGPS च्या सहाय्याने घेण्यात आलेले सद्य:स्थितील भूतलांक यांच्या आधारावर खोदकामाच्या परिमाणाची गणना करण्यात आली आहे.काही साखळीत मोजमाप पुस्तिकेत काम करण्यापुर्वी -नोंदविलेल्या भूतलांकांपेक्षा सद्यस्थितीतील भुतलांक वर, (Higher) दिसत असल्याने या साखळीत खोदकामाचे परिमाण negative येत आहे , हे negative परिमाण एकूण खोदकामाचे परिमाण परिगणित करतांना वगळण्यात आले आहे.

5) घटकनिहाय अदा केलेले खोदकामाचे परिमाण व विशेष पथकाने परिगणित केलेले खोदकामाच्या परिमाणाबाबतचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता-1

Quantity in CuM

Sr. No	Component	As per excavation qty paid up to 37 R.A. Bill			Quantity calculated by SLTAC (based on DGPS survey & strata classification based on Geo. Report March 2018 by Sr. Geologist,CDO)		
		Ex. In soil	Ex. In S.R.	Total	Ex. In soil	Ex. In S.R.	Total
1	DAM (Stripping & Drains)	28150	0	28150	28150	0	28150
2	COT	45105	218784	263889	263889	0	263889
3	Tail Channel	310839	2436191	2747030	2141395	0	2141395
4	Approach channel	405015	363546	768561	417674	0	417674
5	River Regradation	44665	181524	226189	72012	0	72012
6	Spillway, Guide wall & Fall in tail channel	85190	193983	279173	279173	0	279173
	Total	9,18,964	33,94,027	43,12,992	32,02,293	0	32,02,293

रा.तां.स.स.चे अभिप्राय:

1) **अतिप्रदान झालेले खोदकामाचे परिमाण (11,10,699 घमी):**
मोजमाप पुस्तकात अभिलेखीत केल्यानुसार खोदकामाचे एकूण परिमाण 43,12,992 घमी इतके आहे. विविध घटकांच्या झालेल्या खोदकामा करिता रा.तां.स.स. कार्यालयाने परिगणित केलेली एकूण खोदकामाचे परिमाण 32,02,293 घमी इतके येत आहे. या दोन्ही परिमाणांची तुलना करता खोदकामात एकूण 11,10,699 घमीचे अतिप्रदान झालेले दिसते.

2) **खोदकामा बाबीत अतिप्रदान झालेली रक्कम - (रु.117.62 कोटी)**

(i) या अहवालाच्या परिच्छेद क्र.3.3 च्या तक्ता क्र. 1 नुसार खोदकामाचे परिमाण 32,02,293 घमी देय आहे. अहवालाच्या परिच्छेद क्र.3.2 च्या रा.तां. स.स.च्या अभिप्रायानुसार खोदकामाचे सर्व परिमाण माती खोदकामात अंतर्भुत होत आहे.

अहवालाच्या पुढील परिच्छेद 3.4 वहन अंतराबाबत रा.तां.स.स.च्या अभिप्रायानुसार देय असलेले खोदकामाचे सर्व परिमाण निविदेतील माती खोदकामाची बाब (With lead of 1 to 2 Km) च्या दराने देय होत आहे. त्यापेक्षा जादा वहन अंतराची आवश्यकता दिसून येत नाही.

मंजुर निविदेत माती खोदकामासाठी 23,59,753 घमी , मृदु खडक खोदकामासाठी 46,167 घमी व कठिण खडक खोदकामासाठी 10 घमी असे एकुण 24,05,930 घमी तरतुद आहे. निविदेतील कलम 38 (General conditions) व कलम 55 (Special condition) च्या तरतुदी नुसार 24,05,930 X 1.25 = 30,07,412 घमी पर्यंतचे परिमाण, निविदा दराने वहन अंतरासह देय होत आहे.

(ii) उर्वरीत परिमाण 1,94,881 घमी (32,02,293 घमी - 30,07,412 घमी) निविदा शर्तीनुसार चालू दरसूचीच्या आधारावर येणाऱ्या दरानुसार देय आहे. अदा झालेल्या देयंकानुसार आगमन कालवा-2 चे खोदकाम वर्ष 2015-16 झालेले आहे. हे खोदकामाचे परिमाण 1,94,881 घमी पेक्षा जास्त आहे. या करिता 194881 घमी परिमाणकरिता चालू दरसूची 2015-16 नुसार माती खोदकाम (वहन अंतर 1 ते 2 किमी) करिता येणारा दर (रु.77.05 प्रती घमी) देय ठरतो.

च्या प्रकल्प भेटीच्या वेळेस सदर तलांक पुस्तिकेची झेरॉक्स प्रत रा.तां.स.स.ला सुपुर्त करण्यात आली.

सदर पुस्तिकेत पुच्छ कालव्याच्या व आगमन कालवा-1 च्या (0 ते 300 मी.) संरेखेवर 150 मी. रुंदीत प्रत्येकी 15 मी. अंतरावर पुच्छ कालवा व आगमन कालवा-1चे खोदकाम करण्यापुर्वीचे भूतलांक नोंदविलेले आहेत.

(iv) क्षेत्रिय कार्यालयाकडून पुच्छ कालव्याच्या माहे एप्रिल 2009 मध्ये करण्यात आलेले सुधारीत संकल्पन (तळरुंदी 120 वरून 140 मी. करण्याबाबत) प्रस्तावाची प्रत प्राप्त झाली आहे. सदर प्रस्तावासोबत पुच्छ कालवा व आगमन कालवा-1 चा L-section प्राप्त झालेला आहे. सदर नकाशात पुच्छ कालवा व आगमन कालवा-1 चे डाव्या व उजव्या तिराचे भूतलांक दर्शविण्यात आले आहेत, तथापी दर्शविण्यात आलेले डावे व उजवे तिर मध्य रेषेपासून किती अंतरावर आहेत हे नमूद नाही.

वरिल (i) ते (iv) तपशील विचारात घेऊन त्याच्या उपलब्ध मूळ भू-पातळीबाबत तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर-

a. पुच्छ कालवा सा.क्र.274.13 ते 1110 मी. व आगमन कालवा-1 मधील खोदकामाची परिगणना विशेष पथकाने D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले दोन्ही काठावरचे व तळपातळीचे तलांकाच्या आधारावर परिमाणाची गणना करण्यात आलेली आहे.

b. विशेष पथकाला पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 0 ते 274.13 मी. पर्यंत काठावरचे तलांक घेणे शक्य झाले नव्हते या करिता पुर्णा मध्यम प्रकल्प उपविभाग क्र.4च्या तलांक पुस्तिकेत या लांबीकरिता नमूद भुतलांक व D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले तळपातळीचे तल्रांकाच्या आधारावर परिमाणाची गणना करण्यात आलेली आहे.

(b) <u>आगमन कालवा-2:</u>

आगमन कालवा-2 करिता पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,अचलपुर या कार्यालयाकडून खोदकाम करण्यापुर्वीचे भूतलांक घेण्यात आलेले नव्हते, या मुळे या भागाची तलांक पुस्तिका तसेच L-section नकाशा उपलब्ध नाही.

वरिल तपशिल विचारात घेता आगमन कालवा-2 मधील खोदकामाची परिगणना विशेष पथकाने D.G.P.S. च्या सहाय्याने घेतलेले दोन्ही काठावरचे व तळपातळीचे तलांकांच्या आधारावर करण्यात आलेली आहे.

(c) <u>नदी रुंदीकरण:</u>

नदी रुंदीकरण करिता केलेल्या खोदकामाचे परिमाण काढण्याकरिता काम करण्यापुर्वी मोजमाप पुस्तकात नोंदविलेले भूतलांक व DGPS च्या सहाय्याने घेण्यात आलेले सद्य:स्थितील भूतलांक यांच्या आधारावर खोदकामाच्या परिमाणाची गणना करण्यात आली आहे.काही साखळीत मोजमाप पुस्तिकेत काम करण्यापुर्वी नोंदविलेल्या भूतलांकांपेक्षा सद्यस्थितीतील भुतलांक वर, (Higher) दिसत असल्याने या साखळीत खोदकामाचे परिमाण negative येत आहे , हे negative परिमाण एकूण खोदकामाचे परिमाण परिगणित करतांना वगळण्यात आले आहे.

5) घटकनिहाय अदा केलेले खोदकामाचे परिमाण व विशेष पथकाने परिगणित केलेले खोदकामाच्या परिमाणाबाबतचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता-1

Quantity in CuM

Sr. No	Component	As per excavation qty paid up to 37 R.A. Bill			Quantity calculated by SLTAC (based on DGPS survey & strata classification based on Geo. Report March 2018 by Sr. Geologist,CDO)		
		Ex. In soil	Ex. In S.R.	Total	Ex. In soil	Ex. In S.R.	Total
1	DAM (Stripping & Drains)	28150	0	28150	28150	0	28150
2	COT	45105	218784	263889	263889	0	263889
3	Tail Channel	310839	2436191	2747030	2141395	0	2141395
4	Approach channel	405015	363546	768561	417674	0	417674
5	River Regradation	44665	181524	226189	72012	0	72012
6	Spillway, Guide wall & Fall in tail channel	85190	193983	279173	279173	0	279173
	Total	9,18,964	33,94,027	43,12,992	32,02,293	0	32,02,293

रा.तां.स.स.चे अभिप्राय:

1) **अतिप्रदान झालेले खोदकामाचे परिमाण (11,10,699 घमी):**
मोजमाप पुस्तकात अभिलेखीत केल्यानुसार खोदकामाचे एकूण परिमाण 43,12,992 घमी इतके आहे. विविध घटकांच्या झालेल्या खोदकामा करिता रा.तां.स.स. कार्यालयाने परिगणित केलेली एकूण खोदकामाचे परिमाण 32,02,293 घमी इतके येत आहे. या दोन्ही परिमाणांची तुलना करता खोदकामात एकूण 11,10,699 घमीचे अतिप्रदान झालेले दिसते.

2) **खोदकामा बाबीत अतिप्रदान झालेली रक्कम - (रु.117.62 कोटी)**

(i) या अहवालाच्या परिच्छेद क्र.3.3 च्या तक्ता क्र. 1 नुसार खोदकामाचे परिमाण 32,02,293 घमी देय आहे. अहवालाच्या परिच्छेद क्र.3.2 च्या रा.तां. स.स.च्या अभिप्रायानुसार खोदकामाचे सर्व परिमाण माती खोदकामात अंतर्भुत होत आहे.

अहवालाच्या पुढील परिच्छेद 3.4 वहन अंतराबाबत रा.तां.स.स.च्या अभिप्रायानुसार देय असलेले खोदकामाचे सर्व परिमाण निविदेतील माती खोदकामाची बाब (With lead of 1 to 2 Km) च्या दराने देय होत आहे. त्यापेक्षा जादा वहन अंतराची आवश्यकता दिसून येत नाही.

मंजुर निविदेत माती खोदकामासाठी 23,59,753 घमी , मृदु खडक खोदकामासाठी 46,167 घमी व कठिण खडक खोदकामासाठी 10 घमी असे एकुण 24,05,930 घमी तरतुद आहे. निविदेतील कलम 38 (General conditions) व कलम 55 (Special condition) च्या तरतुदी नुसार 24,05,930 X 1.25 = 30,07,412 घमी पर्यंतचे परिमाण, निविदा दराने वहन अंतरासह देय होत आहे.

(ii) उर्वरीत परिमाण 1,94,881 घमी (32,02,293 घमी - 30,07,412 घमी) निविदा शर्तीनुसार चालू दरसूचीच्या आधारावर येणाऱ्या दरानुसार देय आहे. अदा झालेल्या देयंकानुसार आगमन कालवा-2 चे खोदकाम वर्ष 2015-16 झालेले आहे. हे खोदकामाचे परिमाण 1,94,881 घमी पेक्षा जास्त आहे. या करिता 194881 घमी परिमाणकरिता चालू दरसूची 2015-16 नुसार माती खोदकाम (वहन अंतर 1 ते 2 किमी) करिता येणारा दर (रु.77.05 प्रती घमी) देय ठरतो.

(iii) प्रकल्पाच्या निविदा अंतर्गत खोदकामाच्या विविध बाबी करिता अदा केलेली रक्कम व रा.तां. स.स. ने तपासणी अंती निश्चित केलेली देय रक्कम बाबत तक्ता पुढील प्रमाणे आहे-

तक्ता - 2

अ. क्र.	खोदकामांच्या बाबी	अद्ययावत देयकानुसार अदा झालेले परिमाण व रक्कम			रा.तां.स.स.-1 नाशिक यांनी निश्चित केलेले खोदकामाचे परिमाण व वरिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या मार्च 2018 च्या भूवैज्ञानिक अहवालाच्या आधारावर केलेले भूस्तर वर्गीकरणानुसार		
		परिमाण घमी	दर प्रति घमी	रक्कम (रुपये)	परिमाण घमी	दर प्रति घमी	रक्कम (रुपये)
1	Item No 1: Excavation in soil etc. complete as per specifications and directed by engineer in charge.						
	(A) With lead of 1 to 2 Km	142975.21	59.7	8535620.04	30,07,412	59.70	179542496
	(B) With lead of 2 to 3 Km	462219.72	67.1	31014943.2	0	0	0
	(C) With lead of 3 to 4 Km	58481.45	79.05	4622958.62	0		0
	(D) With lead of 4 to 5 Km	59642.61	84.05	5012961.37	0		0
	(E) With lead of 5 to 6 Km	195645.84	93.95	18380926.7	0		
	Total	918964.83		67567409.9	30,07,412		179542496
	Add 19.20% above			12972942.7			34472159
	SUBTOTAL	91896483		80540352.6	-		214014655
	As per clause 38 Ex. in soil with lead 1 to 2 km)	-		-	194881	77.05	15015581
	Total (I)	91896483		80540352.6	32,02,293		22,90,30,236
2	Item No 2: Excavation in S.R.						
	(A) As per tender rate	240642.41	126.95	30549553.9	0	0	0
	Add 19.20% above			5865514.36	0	0	0
	SUBTOTAL	240642.41		36415068.26	0	0	0
	(B) As per clause 38	3153385	249.85	787873242	0	0	0
	(C) EIRL	3181094.3 *	157.3	500386133	0	0	0
	Total (II)	3394027.4		1324674444	0	0	0
	GRAND TOTAL [TOTAL I +TOTALII)	43,12,992		140,52,14,797	32,02,293		22,90,30,236

*हे परिमाण मऊ खडकाचे एकूण खोदकाम 33,94,027 घमी मध्ये अंतर्भुतआहे.

वरील तक्त्यानुसार खोदकामाच्या बाबींकरिता रु.117,61,84,560 (140,52,14,797-22,90,30,236) रकमेचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येत आहे.

सदर अतिप्रदान पुढिल कारणांस्तव झालेले आहे-

1) भूस्तर वर्गीकरण
2) प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या परिमाणापेक्षा जास्तीच्या परिमाणाची अदायगी
3) वाढीव परिमाणाच्या अदायगीसाठी निविदा शर्तीचा योग्य वापर न करणे (क्लम 55 चा वापर न करणे) व वाढीव परिमाणाचा दर निश्चित करतांना अयोग्य पध्दतीने केलेले दरपृथ:करण
4) प्रत्यक्षात लागलेल्या वहन अंतरापेक्षा वाढीव वहन अंतर विचारात घेणे.
5) अनावश्यक अतिरिक्त बाब दरसूची करुन अदायगी करणे.

3.4 *मुद्दा क्र.4:*

मृदू खडक (Soft rock) व्यातिरिक्त खोदकामातील साहित्यांची विल्हेवाट लावण्याकरीता वहन अंतर वाढले का? त्याची प्रत्यक्ष स्थळावर तपासणी करुन अहवाल सादर करावा.

रा.तां.स.स. चा अभिप्राय:

(A) माती खोदकामातील वहन अंतर:

वासनी प्रकल्पाच्या विविध घटकांकरिता खोदकाम मृदु खडका व्यतिरिक्त माती या स्तरात खोदकाम करण्यात आलेले आहे. मंजूर निविदेत माती खोदकामा करिता किमी 1 ते 2, किमी 2 ते 3 किमी, 3 ते 4 किमी, 4 ते 5, किमी 5 ते 6 या वहनअंतरांकरिता स्वतंत्र दरांची तरतूद आहे.

वरील तक्ता क्र.2 मध्ये दर्शविण्यात आलेले मातीतील खोदकाम 9,18,964.83 घमी पैकी धरणाचे गाभा क्षेत्र 45,806 घमी, बांधकामांचे back filling करिता 20,046 घमी व नदीच्या काठावर गावालगत संरक्षक माती बांधाच्या गाभा भरावाकरिता 2,05,193 घमी असे एकुण 2,71,045 घमी परिमाण वापरण्यात आलेले आहे आहे असे वाटते, तथापी चालू देयकांसोबत पुर्नवापर तक्ता (Reutilisation statement) जोडण्यात आलेला नाही तसेच मोजमापपुस्तिकेत या बाबत नोंद नाही. हे घटक खोदकामाच्या जागेपासून 1 ते 2 किमी अंतरावर आहे.

मातीतील खोदकामातील अतिरीक्त असलेल्या साहित्याची विल्हेवाट आगमन व पुच्छ कालव्याच्या लगत संपादित क्षेत्रात करण्यात आलेली आहे. Spoil bank करिता संपादीत क्षेत्र खोदकामापासून 1 ते 2 किमी वहन अंतरावर आहे (**परिशिष्ट क्र.**6 Spoil bank नकाशा)

वरीलं प्रमाणे प्रत्यक्ष स्थळावरील तपासणीनुसार माती खोदकामा करिता आलेले वहन अंतर 1 ते 2 किमी असून हे अंतर निविदेच्या बाब क्र.1 मध्ये विचारात घेतलेल्या वहन अंतराच्या मर्यादेत आहे. आतापर्यंत देयकानुसार किमी 2 ते 6 किमी वहन अंतराकरिता अदा झालेली रक्कम या बाबी (माती खोदकाम) अंतर्गत देय ठरत नाही.

(B) मृदु खडकातील खोदकामा करिता वहन अंतर:

(i) मृदु खडकातील खोदकामाकरिता निविदा दर रु.126.95 प्रती घमी For all leads & lifts सह, कलम 38 अंतर्गत दर रु.249.85 प्रती घमी वहन अंतर 1 किमी सह व अतिरीक्त बाब दरसूची अंतर्गत दर रु. 157.30 प्रती घमी वहन अंतर 2 किमी सह मंजूर आहे.

(ii) वरील तक्ता क्र.2 मध्ये नमूद केलेले एकूण खोदकाम 33,94,027 घमी पैकी धरणाचे आवरण क्षेत्र 1,49,675 घमी व नदीच्या काठावर गावालगत संरक्षक माती बांधाच्या आवरणाकरिता 63,258 घमी असे एकुण 2,12,933 घमी परिमाण वापरण्यात आलेले आहे असे वाटते, तथापी चालू देयकांसोबत पुर्नवापर तक्ता (Reutilisation statement) जोडण्यात आलेला नाही व मोजमापपुस्तिकेत नोंदविलेला नाही. हे घटक खोदकामाच्या जागेपासून 1 ते 2 किमी अंतरावर आहे.

मृदु खडकातील खोदकामातील अतिरीक्त असलेल्या साहित्याची विल्हेवाट आगमन व पुच्छ कालव्याच्या लगत संपादित क्षेत्रात करण्यात आलेली आहे. Spoil bank करिता संपादीत क्षेत्र खोदकामापासून 1 ते 2 किमी वहन अंतरावर आहे (**परिशिष्ट क्र.6** Spoil bank नकाशा)

प्रत्यक्ष स्थळावरील तपासणीनुसार खोदकामा वहन अंतर 1 ते 2 किमी. हे अंतर निविदेच्या बाब क्र.2 मध्ये विचारात घेतलेले All leads and lifts च्या मर्यादेत आहे.

(iii) मृदु खडकाच्या खोदकामा करिता मंजूर निविदेतील दर (रु.126.95/घमी) with all leads & lift करिताआहे. तसेच या दरात spreading in uniform layer व Dry compaction at spoil banks अशीही तरतूद आहे.

कलम 38 अंतर्गत अदा झालेले मृदु खडकातील परिमाणाकरिता मंजूर दराच्या (रु.249.85/घमी) दर पृथ:करणात वहन अंतर 1 किमी, 35 मी. अंतराकरिता manual lead, 19 मी. extra lift, wet condition 20% जादा व रस्ते रखरखावा करिता 5% अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम 38 अंतर्गत मंजूर दर चे दर पृथ:करण निविदा दराच्या दर पृथ:करण नुसार करणे अपेक्षीत होते. तथापी अशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

(iv) कलम 38 अंतर्गत सुधारित दराचे दर पृथ:करण निविदा दराप्रमाणे करण्यात आल्याचे दिसून येत नाही. अतिरिक्त बाब दरसुची मंजूर दराच्या (रु.157.30/घमी) दरपृथ:करण मध्ये आणखी वाढीव वहन अंतर 2 किमी, Spreading by Dozer व Dry rolling by vibratory roller अशी तरतूद करण्यात आलेली आहे, म्हणून हे अतिप्रदान ठरते.

माती व मृदू खडकातील खोदकाम साहित्याची विल्लेवाट लावण्याकरिता वहन अंतरात वाढ झालेली नाही .

3.5 *मुद्दा क्र.5:*

तसेच खोदकामाकरीता ठेकेदारास अंतिमत: अदा केलेला दर संपूर्ण खोदकामाच्या परिमाणासाठी दिलेला आहे का? असे असल्यास अतिप्रदान झाले आहे का? तपासून अहवाल सादर करावा.

रा.तां.स.स. चा अभिप्राय:

निविदे अंतर्गत खोदकामाच्या विविध बाबी करिता अदा केलेले ,कलम 38 व EIRL अंतर्गत अदा केलेले परिमाण,दर व रक्कम तसेच रा.तां.स.स. च्या अभिप्रायानुसार देय परिमाण, दर व रक्कम याबाबत तपशील तक्ता क्र. 2 मध्ये नमुद करण्यात आलेला आहे. यानुसार रु.117.62 कोटी चे अतिप्रदान झालेले आहे.

3.6 *मुद्दा क्र.6:*

वरील निष्कर्षामध्ये अतिप्रदान झालेले आढळल्यास यास जबाबादार कर्मचारी व अधिकाऱ्यांची नावे व त्यांचे कार्यकाळ नमूद करण्यात यावे तसेच यामुळे किती रकमेचे अतिप्रदान झाले आहे याचे विवरणपत्र तयार करुन आपले अभिप्राय सादर करावे.

रा.तां.स.स. चा अहवाल:

अतिप्रदान रक्कम:

a) वरील परि.3.3 मध्ये नमूद केल्यानुसार रु.117.62 कोटीचे अतिप्रदान झाल्याचे दिसते.

b) याप्रकरणी दि.20.11.2017 च्या रा.तां.स.स.-1 ने शासनास यापुर्वी सादर केलेल्या अहवालात प्रकल्पाचे शीर्षकामाचे अंदाजपत्रक,प्रारुप निविदा,कलम 38 प्रस्ताव,अतिरिक्त बाब इ. बाबत मूळ कागदपत्रे तयार करण्यापासून ते मंजूरीपर्यंत कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांची यादी जोडण्यात आलेली आहे.

खोदकामाचे देयके अदा करणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडण्यात येत आहे (परिशिष्ठ क्र. 7).

4.0 शासन पत्रातील मुद्यांव्यतिरीक्त मोजमाप तपासणीच्या अनुषंगाने आढळलेले इतर महत्वाचे मुद्दे:

(A) **सांडवा व पुच्छकालव्याच्या स्थानातील बदल**

प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यतेचे (2/2008) वेळी सांडवा नदी पात्रात (Centrally located) होता. तांत्रिक मान्यता प्राप्त अंदाजपत्रकात (3/2008) सांडवा डाव्या तिरावर प्रस्तावित करण्यात आला. या अंदाजपत्रकात आगमन कालव्याची लांबी 360 मी. रुंदी 102 मी. व पुच्छ कालव्याची लांबी 1000 मी.रुंदी 102 मी.इतकी प्रस्तावित होती. सदर स्थान बदल करणेबाबत तांत्रिक व आर्थिक कारणमिमांसा नमुद करण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात काम करताना पुच्छ कालव्याची लांबी 1125 मी व रुंदी 140 मी तसेच आगमन कालव्याची लांबी 720 मी.व रुंदी 120 मी झालेली आहे.

सांडव्याच्या विविध पर्यायी स्थानांचे तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या तुलना करुन त्याप्रमाणे सांडव्याचा स्थान निश्चित करणे योग्य ठरले असते. तसेच या बदलास सक्षम स्तरावर मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

(B) **सांडवा,पुच्छ कालवा,प्रपात व आगमन कालव्याचे जलशास्त्रीय अभ्यास व बांधकामाचे संकल्पन :**

(i) एप्रील 2009 मध्ये क्षेत्रिय स्तरावरून पुच्छ कालव्याचे संकल्पन (विभागाने तयार करून मंडळ कार्यालयाची मान्यता) करुन तळरुंदी 102 मी. वरून 140 मी., खोदकामाच्या बाजूचे उतार भूस्तर निहाय न करता सरसकट 2:1 असे बदल करण्यात आले तसेच पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 210 मी. वर 4.875 मी. उंचीचा प्रपाताची नव्याने तरतूद करण्यात आली.

(ii) वरील बदलांमुळे पुच्छ कालव्याच्या खोदकामात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

(iii) शासन निर्णय दि.15.1.2001 च्या परि. 4 नुसार 'मध्यम प्रकल्पाचे सर्व उपघटकांचे संकल्पन म.सं.सं., नाशिक यांनी तयार करावे व त्या प्रादेशीक मुख्य अभियंता यांचे स्तरावर मान्यता देण्यात यावी. व अशा संकल्प चित्रांची (अहवालासह) प्रत शासनास माहितीसाठी अग्रेषीत करावी.'असे नमूद आहे.

(iv) वरिल अ.क्र. (i) मध्ये नमूद संकल्पनातील बदल शासन निर्णय दि.15.1.2001नुसार करणे अपेक्षित होते.

शासन निर्णयात नमुद असल्याप्रमाणे म.सं.स. कडुन सांडवा,पुच्छ कालवा व आगमन कालव्याचे जलवैज्ञानिक संकल्पन करुन त्याप्रमाणे काटछेद ,प्रपाताचे स्थान व तळपातळी निश्चित करणे आवश्यक होते. तसेच सदर फेरबदलामुळे खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने त्यास सक्षम स्तरावर वेळीच मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

प्रकल्पस्थळी पायाचा भुस्तर मऊ असल्याने सांडव्याचे संकल्पन केंद्रीय जलआयोगाकडुन करण्यात यावे असा सल्ला म.सं.स. कडुन क्षेत्रीय कार्यालयाला देण्यात आला. त्याप्रमाणे क्षेत्रिय कार्यालयाने सांडव्याचे संकल्पन WAPCOS कडुन प्राप्त करुन फेब्रुवारी 2012 मध्ये मान्यता प्रदान केली .यानंतर पुच्छ व आगमन कालव्याचे जलवैज्ञानिक संकल्पन म.सं.स. कडुन प्राप्त करुन क्षेत्रिय मुख्य अभियंता यांच्या मंजूरी नंतर पुच्छ व आगमन कालव्याचे काम करणे अपेक्षित होते. परंतु अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

(C) <u>पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 220 मी. वर असलेले प्रगतीत असलेले प्रपाताचे बांधकाम:</u>
दि.5.3.2018 च्या प्रकल्प पहाणीच्या वेळेस WAPCOS कडून प्राप्त spillway तसेच पुच्छ कालव्याच्या सा.क्र. 220 मी. वर असलेले प्रपाताचे संकल्पन व संकल्प चित्रे बाबत प्रकल्प अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. प्रपातचे संकल्पन spillway च्या संकल्पनाशी सुसंगत नाही असे दिसून आले. त्यामुळे पुढील काम करण्यापुर्वी या दोन्ही संकल्पनाच्या सुसंगती असल्याबाबत म.सं.सं., नाशिक कडून तपासणी करणे आवश्यक आहे असे वाटते.

(D) <u>नदी रुंदीकरणाचे काम:</u>
पुच्छ कालव्याचे पुढील भागात नदीचे 810 मी. लांबीचे रुंदीकरण करण्यात आले. सदर काम जलशास्त्रीय अभ्यास करुन (water profiles काढुन), त्याप्रमाणे आवश्यक असल्यासच करणे योग्य होते, अन्यथा हे अतिप्रदान ठरते.

(रा. च. हुमणे)
अधीक्षक अभियंता
तथा सदस्य सचिव, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-1,
नाशिक

(र. ए. उपासनी)
मुख्य अभियंता,
म.सं.सं., नाशिक व सदस्य,
रा.तां.स.स.-1

(दि. रा. जोशी)
मुख्य अभियंता,
नियोजन व जलविज्ञान, नाशिक व
सदस्य, रा.तां.स.स.-1

(डॉ.संजय बेलसरे)
मुख्य अभियंता (जसं)
व सहसचिव, मंत्रालय मुंबई व
सदस्य, रा.तां.स.स.-1, नाशिक

(राजेंद्र पवार)
महासंचालक
संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी, नाशिक
तथा अध्यक्ष, रा.तां.स.स.-1

...

परिशिष्टे

महाराष्ट्र शासन

परिशिष्ट- 1

ईमेल पत्ता :- domedium.wal@maharashtra.gov.in
क्रमांक :सुप्रमा- २०१७/८३१/(प्र.क्र २८२/२०१७)/प.प्र.

जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
दिनांक :२३/१/२०१८

प्रति,

महासंचालक, सं.प्र.ज.सं.सु., महा. अभि. संशोधन संस्था,तथा
अध्यक्ष, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक.

विषय:- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्र. ३.३ (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात दि. २६/०९/२०१७ रोजी झालेल्या लोकलेखा समितीसमोरील प्रधान सचिव/ सचिव यांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीने दिलेले चौकशी चे आदेश...

संदर्भ:- १) शासनाचे समक्रमांकित पत्र दि. २६/०९/२०१७ व १३/११/२०१७
२)अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र. रातांसस(१)/वासनी प्रकल्प/(धा.क्र.९३/२०१७)/५०/२०१७, दि. २०/११/२०१७

विषयांकित प्रकरणी लोकलेखा समितीसमोरील साक्षीच्या वेळी सदर प्रकरणे कंत्राटदारास निविदा शर्त क्र. ५५ एवजी शर्त क्र. ३८ अन्वये अदा केलेल्या रकमेच्या अनुषंगाने रा.तां.स.स.नाशिक. यांचे मार्फत चौकशी करण्याची सूचना संदर्भ क्र.१ अन्वये देण्यात आली होती. त्यास अनुसरून संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये आपले कडून चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे.

विषयांकित परिच्छेदावर लोकलेखा समिती समोर दि. २२/११/२०१७ रोजी पुन्हा प्रधान सचिव/सचिवांची साक्ष झाली असता लोकलेखा समितीने निम्नलिखित मुद्यांवर परत चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

१. वासनी मध्यम प्रकल्प, ता. अचलपूर, जि. अमरावती हा प्रकल्प कोणत्या कारणात्सव वेगवेगळ्या विभागीय कार्यालय व मंडळ कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आला? अमरावती जिल्हातील प्रकल्प असून हा अकोला पाटबंधारे मंडळाकडे का हस्तांतरीत करण्यात आला?

२. सदर प्रकल्प साधारणपणे खारपाण पट्यात मोडतो. या ठिकाणी खडक ४० ते ५० मी खोलीवर लागत असून वर काळी माती लागते. असे असतांना या प्रकल्पामध्ये निविदा परिमाणाच्या तुलनेत माती खोदकामा मध्ये बचत व मृदू खडक खोदकामा मध्ये प्रचंड वाढ झालेली दिसत. यामध्य (strata classification) पुनर्वर वर्गीकरण योग्य प्रकारे झाले आहे

का? या विषयी भुगर्भीय सर्वेक्षण करण्यात यावे. त्याआधार सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा.

३. या कामामध्ये मृदू खडकाच्या (soft rock) परिमाणात प्रचंड वाढ झाल्याचे दिसते. तसेच काम करताना मूळ निविदेच्या एकूण खोदकाम परिमाणापेक्षा प्रचंड वाढ झालेली दिसते. त्यामुळे निविदेतील परिमाण विचलन विषयक शर्तीचा (Quanatity variation clause) वापर करावा लागलेला दिसतो. याकरिता आपले मार्फ़त विशेष पथक नियुक्त करून केलेल्या प्रत्यक्षात झालेल्या कामांची मोजमापांची तपासणी करावी व त्यांची संबंधित मोजमाप पुस्तकांमध्ये अभिलिखित केलेल्य मोजमापांची व अंतिमत: परिमाणाशी तुलना करून अतिप्रदान झाले आहे काय याबाबत तपासणी अहवाल सादर करावा.

४. मृदू खडक (soft rock) व्यतिरिक्त खोदकामातील साहित्यांची विल्हेवाट लावण्याकरिता वहन अंतर वाढले का? त्याची प्रत्यक्ष स्थळावर तपासणी करून अहवाल सादर करावा.

५. तसेच खोदकामांकरिता ठेकेदारास अंतिमत: अदा केलेला दर संपूर्ण खोदकामाच्या परिमाणासाठी दिलेला आहे का? असे असल्यास अतिप्रदान झाले आहे का? तपासून अहवाल सादर करावा.

६. वरील निष्कर्षामध्ये अतिप्रदान झालेले आढळल्यास यास जबाबदार कर्मचारी व अधिकाऱ्यांची नावे व त्यांचे कार्यकाळ नमूद करण्यात यावे. तसेच यामुळे किती रकमेचे अतिप्रदान झाले आहे याचे विवरणपत्र तयार करून आपले अभिप्राय सादर करावे.

७. वरील सर्व माहिती ही लोकलेखा समितीस सादर करावयाची असल्यामुळे काटेकोरपणे तपासून चौकशी अहवाल दि. ३१/०१/२०१८ पर्यंत सादर करावा.

(म.ई.धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाही करिता अग्रेषित

१. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ ,नागपूर.
२. मुख्य अभियंता ,जलसंपदा विभाग,अमरावती.
३. अधीक्षक अभियंता ,उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ .अमरावती.
४. मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ

परिशिष्ट- 2/1

जा.क्र./३५८३/उवकाविक्र१/निविदा/०८

उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र. १
अमरावती.
दिनांक :- २४/१२/०८

प्रति,

कार्यकारी अभियंता,
पुर्णा मध्यम प्रकल्प विभाग,
अचलपुर.

विषय : वासणी मध्यम प्रकल्पाचे दस्ताऐवज हस्तातरणाबाबत.

संदर्भ : १) मा.अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांचा दुरध्वनी संदेश दिनांक २३/१२/०८
२)

संदर्भिय दुरध्वनी संदेशानुसार वासणी मध्यम प्रकल्पाची निविदा विषयक तसेच तांत्रिक दस्ताऐवज प्राप्त करण्याकरीता श्री संजय सिन्हा विभागीय लेखाधिकारी, श्री एस.एच.मेश्राम, वरिष्ठ लिपीक व श्री व्हि.एम.गावंडे, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

तरी संबंधीतास वासणी मध्यम प्रकल्पाशी संबंधीत संपुर्ण दस्ताऐवज हस्तातरीत करण्यांत यावी, ही विनंती.

कार्यकारी अभियंता
उर्ध्व वर्धा कालवे विभाग क्र १
अमरावती.

प्रतिलिपी :- मा. अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलिपी :- श्री संजय सिन्हा, विभागीय लेखा अधिकारी श्रेणी-२ / श्री एस.एच.मेश्राम, वरिष्ठ लिपीक / श्री व्हि.एम.गावंडे, स अ श्रेणी-२ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

Word/Amrute /Genera 522005

वासनी मध्यम प्रकल्प

ता.अचलपुर जि. अमरावती

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्राबाबतच्या अहवालातील परिच्छेद क्रं. ३.३ (वासनी मध्यम प्रकल्प) संदर्भात दि. २६/०९/२०१७ रोजी झालेल्या लोकलेखा समितीसमोरील प्रधान सचिव यांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीने दिलेले चौकशीचे आदेश.

संदर्भ :- जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. संकीर्ण-२०१७/८३१/ (प्र.क्र.२८१/१७)/म.प्र. दिनांक २९/०१/२०१८

संदर्भीय पत्र नुसार व विषयानुसार उपस्थित मुद्यांचे अनुपालन खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मुद्या क्र.१ :- वासनी मध्यम प्रकल्प, ता. अचलपूर, जि. अमरावती हा प्रकल्प कोणत्या कारणास्तव वेगवेगळया विभागीय कार्यालय व मंडळ कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आला अमरावती जिल्हयातील प्रकल्प असून हा अकोला पाटबंधारे मंडळाकडे का हस्तांतरीत करण्यात आला

अनुपालन :- वासनी मध्यम प्रकल्पास महामंडळाचे पत्र क्र.विपाविम/काता-६/ ६१३ दि.१४/०२/२००८ नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन कार्यान्वयीत करण्याकरीता मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ अमरावती अंतर्गत पुर्णा प्रकल्प विभाग, अचलपुर यांच्याकडे देण्यात आला. प्रकल्पाची प्राथमिक कामे तसेच "सी" कामांचे अंदाजपत्रक निविदा व कार्यारंभ आदेश दि.२१/०८/२००८ रोजी देण्यात आला व त्यानुसार कामास सुरूवात करण्यात आली. त्यानंतर दि. २४/१२/२००८ रोजी सदर प्रकल्प उर्ध्व वर्धा कालवे विभाग, अमरावती या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला. त्यानंतर महामंडळाचे पत्र क्र. १३/विपाविम/कांता-७ /२००८ दि.१७/०१/२००९ नुसार वासनी मध्यम प्रकल्प मुख्य अभियंता, (वि.प्र.) अमरावती यांच्या अधिनस्त असलेल्या अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांच्याकडे देण्यात आला. त्यावेळी अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती हा विभाग अकोला पाटबंधारे मंडळ अकोला अंतर्गत कार्यान्वित होता. तेव्हापासुन सदर प्रकल्प याच विभागाकडे आहे. आता हा विभाग उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ अमरावती यांच्या अंतर्गत कार्यान्वित आहे.

परिशिष्ट- २/२

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर.
फॅक्स :- (०७१२-२५५०७१६) ☎ २५६०७४९
E-mail - vvd@sancharnet.in

गोपनीय
क्र. ७३ /विपाविम/का.तां.अ/२००९ दिनांक :- १६/१/०९

प्रति,

मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग,
अमरावती.

विषय : अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पाची दिशादर्शिकेबाबत.

संदर्भ : महामंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. २१६७/विपाविम/का.तां.८
दिनांक १२/५/२००८

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा, धारणी व मेळघाट तालुक्यातील आदिवासी उपाययोजनेतील प्रकल्पांची कामे अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांच्यामार्फत व अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांचेकडून करण्यात यावे असे संदर्भिय पत्राद्वारे निर्देश देण्यात आले आहेत. तरी सदर मध्यम प्रकल्प ता. धारणी जि. अमरावती या प्रकल्पाचे काम सदर विभागास व मंडळास सोयिस्करीता निर्देश व्हावे.

तसेच प्रशासकीय सोईस्या दृष्टीने कलमी (६) अन्वये प्रकल्प ता. अचलपूर या प्रकल्पाचे व्यवस्थापन अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे मार्फत करण्याकरिता मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती यांना हस्तांतरीत करण्यात यावे.

सहपत्र- निरंक

(के. पी. शिर्के)
कार्यकारी संचालक,
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

प्रत,
१) खाजगी सचिव, मा. मंत्री (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती
३) अधीक्षक अभियंता, तापी पूर्णा प्रकल्प मंडळ, अमरावती/अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला.

(के. पी. शिर्के)
कार्यकारी संचालक,
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

परिशिष्ट- 2/3

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर
फॅक्स (०७१२-२६५०७९६) २५५०७४९
E.mail vidcd.dataone.in

कल्प मंडळ अवती

-:कार्यालयीन आदेश:- 30/9/06

विषय : मु.अ.,वि.प्र.ज.सं.वि.,अमरावती अंतर्गत अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती हा विभाग मु.अ.,ज.सं.वि.,अमरावती कडे व मु.अ.,ज.सं.वि., अमरावती अंतर्गत लघु पाटबंधारे वि.क्र.२, अकोला हा विभाग मु.अ.,वि.प्र. ज.सं.वि.,अमरावती अंतर्गत जोडणे बाबत.

महामंडळाचे ,अधिपत्याखालील अमरावती प्रादेशिक विभागातील मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती / मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती अंतर्गत खालील विभाग त्या अंतर्गत सर्व उपविभाग यांचे नियंत्रणात प्रशासकिय कारणास्तव खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ. क्र.	विभाग / उपविभाग	सद्याचे प्रादेशिक / मंडळ / कार्यालय	नियंत्रणात बदल करण्यात आल्यानंतरचे प्रादेशिक / मंडळ कार्यालय
1	-	-	4
१)	अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती.	मु.अ.,विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.	मु.अ.,जलसंपदा विभाग, अमरावती.
	उपविभाग	अकोला पाट.मंडळ, अकोला.	उर्ध्व वर्धा प्र.मं.,अमरावती.
	१) पाट.उ.वि.,अमरावती. २) लघु पाट.बांध.उ.वि.,धारणी. ३) नविन लघु पाट.उ.वि.,अचलपूर. ४) पंढरी म.प्र.उ.वि.क्र.१, वरुड. ५) लघु पाट.बांध.उ.वि.,अचलपूर. ६) पंढरी म.प्र.उ.वि.क्र.२, वरुड.		
२)	लघु पाटबंधारे विभाग क्र.२, अकोला.	मु.अ.,जलसंपदा विभाग, अमरावती.	मु.अ.,विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
	उपविभाग	बुलढाणा पाट.प्र.मं.,बुलढाणा.	अकोला पाट.मं.,अकोला.
	१) अडोळ लघु प्र.उ.वि.,मालेगांव. २) लघु पाट.बांध.उ.वि.,आकोट. ३) लघु पाट.उ.वि.क्र.१, पातूर.		

वरील प्रमाणे विभाग / उपविभागातील संपूर्ण आस्थापना मंजूर पदासह नव्याने [illegible] करण्यात आलेल्या प्रादेशिक / मंडळ कार्यालयाकडे वर्ग करण्यात यावी.

उपरोक्त विभाग / उपविभाग दिनांक १६/०५/२०११ पासून नविन नियंत्रण कार्यालयांतर्गत कार्यरत होतील.

"मुळ प्रत मा.कार्यकारी संचालक यांना माहितीस्तव"

(अ.द.भगत)
अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपुर.

पृष्ठा.क्र./३६६० /विपाविम/का.आ.१/आढावा/२०११ दिनांक: ६/०५

प्रतिलीपी:-

1. मा.सचिव (ज.सं.),जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सस्नेह सादर.
2. मुख्य अभियंता,
   विशेष प्रकल्प, जलसंपदा विभाग, अमरावती.
   जलसंपदा विभाग, अमरावती .
   यांना पुढील कार्यवाहीसाठी.
3. अधीक्षक अभियंता,
   अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला.
   ~~ऊर्ध्व~~ वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.
   यांना पुढील कार्यवाहीसाठी.
4. कार्यकारी अभियंता,
   अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती.
   लघु पाटबंधारे विभाग क्र.२, अकोला.
   यांना पुढील कार्यवाहीसाठी.
5. लेखा-१ शाखा महामंडळ कार्यालय.
6. कार्यालयीन आदेश धारीका.

परिशिष्ट- ३

GEOLOGICAL CONDITIONS ARROUND WASNI (BK) MEDIUM PROJECT

TALUKA : ACHALPUR DIST : AMARAVTI

1. **BACKGROUND:** Wasni medium project situated south east of Amravati district and under construction stage since from 2008 on river Sapan. During 2008 excavation of tail channel and approach channel has been carried out. Before this visit excavation and back filling of C.O.T. between Ch.300 & 900m. approximately has been completed as reported by field officers. The spillway portion has been excavated and construction was carried out upto sill level as reported by field officers.

In accordance with the instructions by Hon. Director General MERI Nashik on dated 30-01-2018 and as per Superintending Engineer, State Level Technical Advisory Committee-1, Nashik vide his marathi letter no.जा.क्र.रातांससस-1 /वासनी/(धा.क्र.93/2017)/96/2018, dated 01-02-2018 the detail geological survey and studies of the area under the vicinity of project, detail geological mapping of trial pits and trenches along side slope of tail channel, and trial pits in beds of approach channel and upstream side of C.O.T. has been carried out by Shri. K. G. Bhongade, Assistant Geologist, Geological unit, Nagpur, Shri. P. M. Jaiswal and Dr. Sau. R.R. Ukey, Geological Assistant of Geological Division, CDO, Nashik between 14-02-2018 and 16-02-2018 under the guidance of Senior Geologist Shri. S. R. Jadhav in view of paragraph 3.3 raised by PAC in his audit report of Wasni medium project.

The existing levels were supplied by Superintending Engineer, State Level Technical Advisory Committee, Nashik vide his marathi letter no.जा.क्र.रातांससस-1 /वासनी/(धा.क्र.93/2017) /182/2018 dated 05-03-2018 and .जा.क्र.रातांससस-1 /वासनी/(धा.क्र.93/2017) /204/2018 dated 07-03-2018

On the basis of supplied levels and geological observations component wise geological sections are developed and appended to the report as drawings annexure.

2. **WORK ALLOTTED:** As per the instruction given on dated 30-01-2018 by Hon. Director General MERI Nashik to carry out geological work in the following format.

I. Geology around the project area.
II. Geological observations of wells in project area.
III. Geology along tail channel by digging trial pits as per requirement of geologist.
IV. Geology along Approach channel by digging trial pits as per requirement of geologist
V. Geology along Back filled C.O.T. by digging trial pits as per requirement of geologist
VI. Geology along End weir of constructed fall by digging trial pits as per requirement of geologist
VII. Geology along River bed and river bank downstream 1000m. by digging trial pits as per requirement of geologist.
VIII. Geology of dumped material.

3. **METHODOLOGY:** To know the geology of the entire project area and its components number of trial pits and trenches has been digged upto maximum depth 5.00 m. approximately. On the basis of trial pits and trenches and its observations geological sections of every component has been prepared and are appended to the report. The number of trial pits and trenches taken are given below.

I. Left side slope trench of Tail channel---------- 28Nos.
II. Right side slope trench of Tail channel ---------- 5Nos.
III. Left side slope bottom trial pits of Tail channel--------- 28 Nos.
IV. Right side slope bottom trial pits of Tail channel--------- 5 Nos.
V. Center line trial pits of Tail channel---------- 9 Nos.

VI. Left side trial pits of Approach channel---------- 2 Nos.
VII. Right side trial pits of Approach channel---------- 3Nos.
VIII. Center line trial pits of Approach channel---------- 4 Nos.
IX. 10 m. downstream of End weir of provided fall---------- 3 Nos.
X. Upstream side of Cut Off Trench (C.O.T.) ---------- 2 Nos.
XI. Well observations.
XII. River bed trial pit ---------- 1 Nos.

Besides these, a close geological traverse was taken along river bed and river bank. As reported by the villagers two wells were observed in the upstream and downstream side 200 m and 20 m respectively, approximately of dam alignment along river bed.

4. **FINDINGS:** In view of the chapter no.2 following findings have been summarized :

i. **Geology of the project area** : Close geological traverses made over the project area, reveals that area is geologically intersected mainly comprised of alluvial type of overburden of Quaternary stratigraphy of Cenozoic era (0-2 M.Y.) and popularly known as PURNA alluvium deposits and have been deposited in the Purna valley. Alluvium occupies nearly one third of the Amravati district on the northern side along Purna River stretching over a width of 55 km. and on area of 3500 sq. km. The maximum thickness of this alluvium is upto 185m (reported by GSI). The basement for alluvium is basalt met with at different depths. Predominant slope of trap basement is northwards. (As per Government of India, Ministry of Water resources, Central ground water bore and District Resources Map of Amravati by Geological Survey of India.)

As on today, rather than trial pits we don't have any newly drilled bore hole to know the geology beneath the excavated level. For ready reference, previously bore holes based geological report prepared by this division is being referred here.

During the field season programme 2008-09 the geological investigation was carried out on 11-11-2008 and geological report no.731 of Dec.08 based on 32 number of drill holes was issued by this office to the project officer vide letter

No.जा.क्र.वासनी बु.प्र /(1108)/(249/2008)भुवि/218/2008 dated 29-12-2008. All these bore hole yielded alluvial type of overburden which is consist of silt, silt stone (calcareous concretion) silt admixed with sand, silt + lime segregation, silt + rolled pieces of basalt, pebbles and cobles and these are angular and sub- rounded and may be coated with calcareous material. The bore holes are drilled from 8.00m.depth to 80.65m.depth All 32 bore holes did not encounter bed rock upto their respective bore hole depths.

ii. **Well Observation:** The area in the periphery of dam alignment has been observed for well identification. Two wells was found, one is about 20m.downstream side of the dam alignment along the left side river, however, the depth could not ascertain as it was filled with dumped material by the farmer. Another well was observed along the river upstream side 200 m. approximately of dam alignment the well digged between depths 25 and 30 feet as reported by the villagers and found to be fully constructed, it indicates that silt pocket may be there upto full depth. Villagers have also reported that in the vicinity of Wasni village there is no soft or hard rock formations found.

iii. **Geology of slopes and trail pits along Tail Channel:**

a) **Left side Slopes:** To evaluate the sequence of geological strata along the slopes which is covered by collapsible soil since excavation was done in 2008-10. Hence, the trenches along slopes has been taken at every 30 m. distance from ch.260m. to 1125m. and digged upto 1 to 2.00 m. depths in tail channel slopes. All the trenches have shown silt, silt admixed with lime nodules, with few exceptions where B.C.soil is at top portion. Besides this formation sand layer between B.C.soil and silt is noticed at ch.420 m. measuring about 0.1 to 0.5 m. thick. and these sand layers did not observed nearer to the ch.390m. and ch.450m. Another sand layer of 0.1 to 0.5 m thick is observed from ch. 690 to 700 m. between silt layers. From ch.1080m to 1125m.thick sand layer measuring about 2.00 to 2.5m.at ground level has been noticed which is itself of river bed. It means that majority part of left side slopes is covered by silt, sparse nodule of lime and

very few thin sand layers in discontinuous form. Spars nodules of lime and sand layers were observed in negligible amount.

b) **Left side Trial pits :** To evaluate the geology below the existing bottom of tail channel on left side from ch.262m to 1095m.trial pits has been taken at every 30m.sequence down to average depths of 2.00 m.and has reveals that all along the left side existing bottom below 2.00 m. silt and sparse lime nodules have been observed.

c) **Right Side slopes** : All along the excavated trenches silt and sparse lime nodules has been recovered. At ch.900 m. silt with lime nodules followed by sand admixed with silt has been noticed from tail channel bed to nearly 4 to 5 m. above it. This sand admixed with silt is not seen at ch.930m.all along the right side slopes it shows that the right side slopes mostly consist of silt with negligible content of lime nodules and sand admixed with silt.

d) **Right Side Trial Pits:** To know the geology along right side bottom of nearly 865m. long tail channel 5 numbers of trial pits has been taken and indicates silt and sparse lime nodules except at ch.900 m. where sand admixed with silt is noticed.

e) **Central Line Trial Pits:** To know geology of approximately 865 m. long excavated bottom of tail channel 9 numbers of trial pits has been taken along the central line measuring dimension minimum of 2.40 x 3 m. and maximum of 15 x 5 m. with 2 m & 4.5 m. depths respectively. All the trial pits constitutes silt as main geological strata except at ch.990 & 870 m. where silt and lime nodules in sparse is noticed. Hence, it is inferred that central line is occupied by silt formation.

iv. **Geology along Approach Channel:** Nearly 390 m. long and 120 m. wide approach channel has been explored by taking 10 numbers of trial pits along centre line. Right side and Left side of minimum dimension 3 x2 m.and maximum of 2.8 x 4 m.with minimum depth at ch.270 Right side is 1.20 m. and maximum depth ch.180 centre line is 2.40 m.

All the trial pits indicates silt as major constituents and soil, sparse lime nodules, sand, cobbles & pebbles in few patches. At ch.90 m. from centre to Left side, soil admixed with silt and coarse sand has been observed. While on right side of ch.90 m. coarse sand did not noticed. At ch.180 m centre has recovered cobbles and pebbles and sand gravels. While on right side and left side of ch.180m have indicated silt, coarse sand and soil admixed with silt respectively. Overall along the approach channel sand, cobbles and pebbles observed in very small amount.

v. **Geology along C.O.T.:** Cut off trench (C.O.T.) is running from ch.300 m to 1335 m. approximately. Excavation and back filling of C.O.T. has been carried out from ch.300m to 900m. as reported by the field officers. Geological traverses is taken between ch.300 m. and 900 m. of C.O.T. by taking 2 numbers of trial pits at the upstream side of alignment. In upstream side most of the portion was surrounded by ruts and Nallas. These ruts and Nalla are having open face along both sides with minimum depth of 0.50 m.and maximum of 4.00 m. Its observation indicates that C.O.T. may have comprised of silt formation. Trial pits leads to indicate that majority portion of C.O.T.is covered by silt with few exceptions of cobbles and pebbles along with very thin layer of sand in the nallas and ruts.

vi. **Geology along End Weir** : End Weir measuring about as equal to the width of tail channel and lies at ch.260 m. To evaluate lithology along the end weir three numbers of trial pits has been taken down to depth from 1.50 m. to 4.5 m.with dimensions varying from 2.30 x 4.20m. to 7.50 x 2.50m. all these trial pits indicates silt as major constituents. Besides silt, dumped material has been noticed from these pits.

vii. **Geology along River Bed and Bank:** River bed along with its bank has been observed upto downstream 1000 m. from dam alignment. River bed is covered by coarse sand gravels and pebbles while bank has lithology of silt followed by riverine deposit i.e. fine & coarse sand. Existing trial pit along river bed about 15

to 20 m downstream of dam alignment have indicated coarse and fine sand, gravels and pebbles.

viii. **Geology of dumped material in Tail channel:** The dumped material excavated from fall portion is dumped in already excavated tail channel, on prima facie observation it resembles to conglomerate and found to be suspicious hence needs to be identified and tested from competent authority. This dumped material of conglomerate is excavated from fall portion of tail channel as per information given by site engineers. However, as per observations of project area, side slopes, bed of tail channel and approach channel, the conglomerate was not observed or seen at any other components of dam.

From the above geological discussions it is reveals that the area under the vicinity of project is covered by alluvial deposits which mainly constitute silt and secondary constituent as lime nodules, in small amount sand layers, coarse sand, pebbles and cobbles. Based on this picture, 4 geological sections has been developed and are appended to the report as annexure.

5. **CONCLUSIONS:** Based on detail geological observations and geological mapping following conclusions are placed.

   I. The project area falls on Quaternary Stratigraphy (0 - 2 m.y.) of Cenozoic Era mainly comprised of different variant of alluvial deposits, and consist of silt, and sand admixed with silt.

